# 'सातारा जिल्हयातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास' (सन १९६० ते सन २०००)


## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
## इतिहास विभाग


## तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


**संशोधक**

श्री.चंद्रकांत बाबुराव कुंभार

**मार्गदर्शक**

प्राचार्य, डॉ.तुकाराम एस.पाटील


**सप्टेंबर, २०१७**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री. चंद्रकांत बाबुराव कुंभार यांनी **''सातारा जिल्हयातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास' (सन १९६० ते सन २०००)''** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : हुपरी                                        मार्गदर्शक
दिनांक : .०८.२०१७

(प्राचार्य डॉ.तुकाराम एस.पाटील)

# CERTIFICATE

**This is to certify that the thesis entitled, ''सातारा जिल्हयातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास' (सन १९६० ते सन २०००)'' Submitted by Shri. Kumbhar Chadrakant Baburao to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of philosophy (Ph.D.) is a bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents if the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.**

**Furthermore, in accordance with the UGC rules 2009: that govern the Ph.D. students, the students has completed the due process that includes Entrance Examination, Interview and pre-submission Viva.**

**Place: Hupari** **Signature of Research Guide**

**Date :**

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **''सातारा जिल्हयातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास' (सन १९६० ते सन २०००)''** हा शोधप्रबंध मी प्राचार्य डॉ.तुकाराम एस.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर केला आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : कोल्हापूर

संशोधक

दिनांक :

(श्री. चंद्रकांत बाबुराव कुंभार)

# ऋणनिर्देश

माझ्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) शोधप्रबंधाचे काम पूर्ण होण्यासाठी ज्या संस्था, व्यक्तीपासून मला मार्गदर्शन व सहकार्य लाभले तसेच ज्यांच्यापासून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मला माहिती मिळाली त्या सर्वांचा मी आभारी आहे. या सर्वांचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो. या सर्वांच्या सहकार्याविना मी माझा अभ्यास पूर्ण करू शकलो नसतो.

मी रयत शिक्षण संस्थेतून सेवाकाल संपवून सेवानिवृत्त झालो आहे. रयत शिक्षण संस्थेचे महाराज सयाजीराव विद्यालयातून शिकण्याचे व श्री.छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस नं.२ गांधी टेकडी सातारा येथे राहण्याचे व शिकण्याचे भाग्य मला लाभले. त्याबददल मी त्यांचा ऋणी आहे. रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे आदरणीय कै. प्राचार्य अत्तार ए.डी. व प्राचार्य पानवळ पी.ए. यांचे मार्गदर्शनाखाली प्रयोगशाळा सहाय्यक व लेखनिक या पदावर काम करण्याची संधी मिळाली. कर्मवीरांच्या सहवासातील या मार्गदर्शक व्यक्तींच्या सहवासाने माझे जीवनच बदलून गेले. प्राचार्य कै.गणीभाई अत्तार साहेब व कै.प्राचार्य पानवळसरांच्या तोलामोलाचे माझे पीएच.डी.चे मार्गदर्शक प्राचार्य टी.एस.पाटील मला लाभले हे माझे भाग्य समजतो. मार्गदर्शक प्रा.डॉ.टी.एस.पाटील यांच्याकडे एवढा कामाचा व्याप असूनसुध्दा मला उत्तम मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू आदरणीय डॉ.दिपक जयवंतराव टिळक, रजिस्ट्रार डॉ.उमेश केसकर, तात्विक व सामाजिकशास्त्र विद्यापीठाचे डीन आदरणीय डॉ.कुलकर्णी बी.डी., इतिहास विभागप्रमुख डॉ.नलिनी वाघमारे व डॉ.स्वराली कुलकर्णी, प्रशासन अधिकारी सौ.स्वाती बेल्हे पीएच.डी. विभागातील डॉ.सुरेश पाटील, डॉ.श्रध्दा कुंभोजकर, डॉ.कारेकर सर व नवनाथ भाडळे तसेच इतर सहकारी यांचे उत्तम सहकार्य लाभले. त्याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

विषयाची उपयुक्त संदर्भ साधने मला मुंबई पुराभिलेखागार, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठाचे बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर, क्रांतिसिंह नाना पाटील लोकविद्यापीठ, विटा, कराड नगरपालिकेचे ग्रंथालय, वेणुताई चव्हाण ग्रंथालय, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय कार्यालय, कराड (विरंगुळा), सातारा नगरवाचनालय, सातारा, टिळक वाचनालय, वाई, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, डेक्कन कॉलेज, पुणे, कराड इ.ठिकाणावरून उपलब्ध झाली. नामवंत पत्रकार मोहन कुलकर्णी यांचेही सहकार्य झाले. वरील संस्थेतील व ग्रंथालयातील सहकारी सेवक यांचा मी आभारी आहे.

याचबरोबर स.गा.म. कॉलेज, कराड ग्रंथालय, व छ.शिवाजी कॉलेज ग्रंथालय, रयत शिक्षण संस्था, सातारा, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, कन्या शाळा, सातारा यांचा मी ऋणी आहे. माझ्या शोधनिबंधाचे संदर्भांत ॲड.सुभाष पाटील (विटा), ॲड.रविंद्र पवार (कराड) आदरणीय संपतराव पवार बलवडी भाळवणी, सातारचे परिवर्तन चळवळीचे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर चळवळीचे कार्यवाह किशोर बेडकीहाळ सर, सातारचे अरूण गोडबोले सर, सातारा समता आंदोलन, चळवळीचे युवक दलाचे पार्थ पोळके सर, शाहूपुरी सातारचे संभाजीराव पाटणे सर, अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे डॉ.हमीद दाभोळकर, प्रा.डॉ.अनिल जगताप सर, कराडचे गडदुर्ग भ्रमण मंडळाचे शिवभक्त के.एन देसाई सर, ॲड.रविंद्र भाऊसाहेब देसाई समीर, डॉ.अजित देसाई, डॉ.इंद्रजीत बाबा मोहिते सर, कराडचे माजी मंत्री महोदय शामराव अष्टेकर, सातारचे रविंद्र चव्हाण सर, वेणुताई चव्हाण कॉलेजचे प्राचार्य बी.एन.कालेकर सर, वेणुताईचे माजी प्राचार्य पी.टी.थोरात सर, शंकराप्पा संसुद्दी, डॉ.रघुनाथ केंगार सर, ग्रंथपाल संजय शिंदे सर, डॉ.आ.ह.साळुंखे सर, प्रा.विद्याधर गोखले सर, प्राचार्य विश्वास सायनाकर सर, स.गा.म.कॉलेजचे प्रा.सावंत एस.आर., प्रा.सुर्यवंशी एन.आर. माझ्यावर प्रेम करणारे माझे विद्यार्थी प्रा.डॉ.भरत महाडीक, डॉ.सुरेश पवार, सहा.प्रा.कमलसिंग क्षत्रिय, माझे सहकारी मित्र प्रा.नागवे सर जालना, प्रा.संतोष यादव अहमदनगर, माझे सहकारी मित्र कांतीलाल शेटे सर, डाके सर, पवार पी.टी., रमेश कुलकर्णी, डी.वाय.पाटील, बी.एस.लोहार, कालेकर मित्र मंडळ या सर्वांचा मी आभारी आहे.

मला गुरूस्थानी असलेले प्रा.डॉ.अभय पाटील सर, प्रा.डॉ.विश्वनाथ पवार सर, प्रा.डॉ.आत्माराम गोपाळराव थोरात इ.चा मी आभारी आहे. यांचेबरोबर मी अनेकदा अभ्यासासंदर्भांत चर्चा केली, बऱ्याच वेळी त्यांचे चांगले मार्गदर्शन मिळाले. माझे प्रबंध टंकलेखनाचे काम माझे सहकारी मित्र सहा.प्रा.सूर्यकांत अदाटे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.कुमुदिनी अदाटे ताई यांनी मला अल्पावधीत उत्तम प्रकारे करून दिले हे मी विसरू शकत नाही. त्यांचे मी मन:पुर्वक आभार मानतो. माझ्या संशोधन प्रक्रियेत अनेक व्यक्तिंचे, प्राध्यापकांचे अध्यापकांचे मोलाचे सहकार्य झाले. मला वैचारिक व अभ्यासाची गोडी लावणारी माझी आई कै.कृष्णामाई कुंभार व पिताश्री श्री.बाबुराव (आप्पा) कुंभार, माझेवर संस्कार करणारे माझे शिक्षक यांचेमुळे माझे संशोधन पुरे होऊ शकले. त्यांचे ऋण मी नमुद करतो. माझे या संशोधनकार्यात माझे विद्यार्थी प्रा.डॉ.भरत महाडिक, डॉ.सुरेश पवार, सातारचे उद्योजक युवराज पवार इ. मंडळींचा सहभाग कसा विसरू शकेन?

शेवटी मी सेवानिवृत्तीनंतर संशोधन करतोय म्हणून माझी कुटुंबीय मंडळी, माझी मुले डॉ.राहूल कुंभार, सौ.उज्वला कुंभार, अभिजित कुंभार, सौ.माधुरी कुंभार, चि.आशुतोष कुंभार, माझी

सहचारीणी सौ.वंदना कुंभार व मुले यांचा उल्लेख केल्याखेरीज हा ऋणनिर्देश पूर्ण होणार नाही. संशोधनकार्यात ही विविध कार्याची मदत नसती तर मी हे काम करूच शकलो नसतो. माझी पत्नी सौ.वंदना कुंभार व मुले यांचे आभार मानणे योग्य नसले तरी त्यांच्या सहकार्याची नोंद करणे अत्यंत आवश्यक आहे. अभ्यासाचा आवाका मोठा आहे. तो त्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात त्रूटी राहण्याची शक्यता आहे. त्रूटीची जबाबदारी सर्वथा माझीच आहे. सातारसारख्या जिल्हयाचा राजकीय सामाजिक अभ्यास करणे हे काही एका संशोधकाचे काम नाही शिवाय ते एकदा करून संपणारे नाही. संशोधकांनी निरनिराळया पध्दतीनी अखंडपणे हे काम करण्याचे प्रयत्न केले. मी फक्त त्यातील छोटासा खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न केला आहे इतकेच.

अभ्यासक

श्री. चंद्रकांत बाबुराव कुंभार

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I-II |
| ● | प्रतिज्ञापत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-VI |
| १. | सातारा जिल्हयाचे स्वातंत्र्यपूर्व योगदान | १ ते ४० |
| | प्रबंधाचे शिर्षक, स़ंशोधन विषयाची निवड, संशोधनाची | |
| | आवश्यकता, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, | |
| | संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, सिद्धांत कल्पना, | |
| | संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, संशोधन पद्धती, | |
| | संदर्भ साधने, प्रकरण नियोजन | |
| | सातारा जिल्हयाचे स्वातंत्र्यपूर्व योगदान | |
| २. | सातारा जिल्हयातील राजकीय चळवळीं (१९६० ते २०००) | ४१ ते ७९ |
| ३. | सातारा जिल्हयातील सामाजिक चळवळीं (१९६० ते २०००) | ८० ते १७७ |
| ४. | सातारा जिल्हयातील सामाजिक आणि राजकीय नेतृत्व | १७८ ते २८९ |
| ५. | उपसंहार | २९० ते ३१२ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३१३ ते ३४५ |
| | परिशिष्टे | ३४६ ते ३५८ |
| | नकाशे | ३५९ ते ३६२ |
| | छायाचित्रे | ३६३ ते ३७२ |

## प्रकरण पहिले

# सातारा जिल्हयाचे स्वातंत्र्यपूर्व योगदान

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र हे विविध जिल्हयांनी बनलेले राज्य आहे. प्रत्येक जिल्हा आपआपल्या गुणांनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. परंतु त्यात सातारा जिल्हयाचे महत्व असे की, या जिल्हयाला एक वैशिष्ट्यपूर्ण असा राजकीय इतिहास आहे. कालखंड कोणताही असो जिल्हयाचा राजकीय व सामाजिक इतिहास नेहमीच संस्मरणीय आणि उद्‌बोधक राहिलेला आहे. साम्राज्य विस्ताराचा एक भाग म्हणून ब्रिटिशांनी सातारच्या प्रतापसिंह राजाचे राज्य खालसा केले. या अन्यायाविरूद्ध प्रतिकारातून जो संघर्ष सातारा जिल्हयात उभा राहीला तो पुढे स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत विविध अंगांनी स्पष्ट झाल्याचे दिसते. जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळ ही देशातील राष्ट्रीय चळवळीचे केवळ प्रतिबिंब नव्हते. काही स्थानिक वैशिष्टये या चळवळीला होती. हिंदू–मुस्लीम एकता, शेतकऱ्यातील राष्ट्रीय जागृती, प्राथमिक शिक्षणातील राजकीय प्रगल्भता व क्रांतीकारकांच्या बेडर हालचाली इ. जिल्हयातील आधुनिक इतिहासाला विविध अंगे आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे व्यक्तिमत्व त्यांनी केलेले समाजस्थितीचे निदान व सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून त्यांनी केलेला शिक्षणप्रचार व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निर्मूलन कार्य या बाबी जिल्हयाच्या मानबिंदू आहेत.

हाच वैचारिक दृष्टीकोण समोर ठेवून मी 'सातारा जिल्हयातील राजकीय व सामाजिक चळवळींचा अभ्यास इ.स.१९६०–इ.स.२०००' असा विषय संशोधनासाठी निवडला. या विषयाचा अभ्यास करीत असताना सातारा जिल्हयातील राजकीय त्याचप्रमाणे सामाजिक चळवळींच्या संदर्भात जे जे संदर्भ मिळतील त्याची मांडणी करीत गेलो. मांडणी करीत असताना या विषयाचे काम प्रचंड आहे याची जाणीव झाली. एवढी कामाची प्रचंड व्याप्ती असून सुद्धा माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.टी.एस पाटील यांनी तेवढयाच ताकदीने संशोधनाचे काम करून घेतले.

इ.स.१९६० मध्ये चव्हाणांनी महाराष्ट्राची सूत्रे हातात घेतली. अनेक समस्या असून यशवंतराव चव्हाण यांनी कार्यक्षम प्रशासनाच्या माध्यमातून चोख कारभार केला. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राच्या मुद्दयावरून काँग्रेस व विरोधक यांच्यातील उघड संघर्ष कमी करण्याचा प्रयत्न केला. दुसरे आव्हान पक्षसंघटनेचे होते. या दोन्ही आव्हानांना तोंड देण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी त्यांचे बेरजेचे राजकारण विकसित केले. नेहरूंचा संसदीय राजकारणातील कित्ता यशवंतरावांनी महाराष्ट्र विधानसभेत गिरवला. विरोधी पक्षाशी संघर्ष न करता त्याला आपल्या राजकीय प्रक्रियेत सामावून घ्यायचे काम यशवंतराव चव्हाणांनी कौशल्याने केले व राज्यात काँग्रेसचे वर्चस्व निर्माण करून राज्यात राजकीय स्थिरतेचा पाया घातला. पुढे १९६९ मध्ये काँग्रेसमध्ये फूट पडली. इ.स.१९७२ मध्ये श्रीमती इंदिरांनी सर्वच प्रांतात पर्यायी नेतृत्व उभे करण्याचा प्रयत्न केला. सन १९७५ मध्ये वसंतराव नाईक यांना पदच्युत करून शंकरराव चव्हाण यांना

मुख्यमंत्री करण्यात आले. पी.के.सावंत यांना प्रदेश अध्यक्ष केल्याने पुन्हा पक्षात गटबाजीस प्रारंभ झाला. इ.स.१९७७ मध्ये आणीबाणीच्या काळात काँग्रेस मध्ये संघर्ष झाला. १९७७ चे निवडणूकीत ४८ जागा पैकी २८ जागा विरोधकांनी जिंकल्या १९७८ च्या विधानसभा निवडणूकीत जनता पक्ष व मित्र पक्षाची प्रबळ आघाडी झाली. यशवंतराव चव्हाण व वसंतराव दादा पाटील यांची रेड्डी काँग्रेस नासिकराव तिरपुडे यांच्या संघर्षाने कमजोर झाली. सन १९८० मध्ये इंदिरा काँग्रेसचे बळ वाढले इंदिरांनी काँग्रेसची फेरमांडणी केली.

थोडक्यात सन १९८० नंतर महाराष्ट्रात काँग्रेसचा ऱ्हास होत गेला. त्याचे पडसाद सातारा जिल्हयातील राजकीय चळवळीवर उमटले. काँग्रेसचा हळूहळू ऱ्हास होत गेला. पुढे राष्ट्रवादी व कॉग्रेस यांचे सरकार सत्तेवर आले. २००४ मध्ये कॉग्रेस आघाडीने भाजपा व सेनायुतीचा पराभव करून १४१ जागा जिंकल्या. गेल्या काही वर्षात राजकारणात नवे बदल होत गेले.

सामाजिक सेवेत सातारा जिल्हा कार्यरत आहे. शिक्षण, ग्रंथालय चळवळीत सातारा फारच आघाडीवर आहे. प्रतापसिंह महाराजानीसुध्दा शिक्षणास उत्तेजन दिल्याचे आढळते. १९१९ मध्ये कर्मवीरअण्णांनी रयत शिक्षण संस्थेची व डॉ.बापूजी साळुंखे यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणक्षेत्रात मोठी क्रांती केली. जिल्हयात साक्षरतेचे कामसुध्दा गतीने झालेले दिसते. सन १९७१ मध्ये साक्षरतेच्या कार्यात राज्यात जिल्हयाचा १० वा क्रमांक होता. गॅझेटियर पृ.६६१ ग्रंथालय चळवळीत सातारा जिल्हयाचे उत्तम काम दिसून येते. प्रतापसिंह महाराजांचे स्वतः चे नेटिव्ह ग्रंथालय होते. आज सातारचे नगर वाचनालय, कराडचे वेणुताई चव्हाण स्मारकामधील ग्रंथभांडार, वाईतील लोकमान्य ग्रंथालय ही नावारूपाला आलेली ग्रंथालये आहेत. संभाजीराव पाटणे सरांच्या उत्तम मार्गदर्शनाचा लाभ जिल्हयातील ग्रंथालयांना होतो. इ.स. १९५७ मध्ये कराड येथे नगरपालिका नगरवाचनालय झाले. ग्रंथालयाप्रमाणे १० डिसेंबर १८५८ पासून वृत्तपत्र चळवळ कार्यरत आहे. जिल्हयात दलित चळवळी, महिला चळवळी, अपंग कल्याण चळवळी, अंधश्रध्दा निर्मुलन चळवळ, रयत शिक्षण शैक्षणिक चळवळ, परिवर्तन चळवळ, श्रमिक चळवळ, धरण पुर्नवसन चळवळ इत्यादी चळवळी उत्तम प्रकारे कार्य करीत आहेत. सेवाभावी सुधारक ती चळवळ पुढे नेण्याचे कार्य करीत आहेत.

**प्रबंधाचे शीर्षक :**

''सातारा जिल्हयातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास' (सन १९६० ते सन २०००)''

## संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा (Review of Literature)

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात झालेल्या राजकीय व सामाजिक चळवळींचा अभ्यास आजवर खूप संशोधकांनी केला आहे. आजवर बऱ्याच संशोधकांनी डॉ. आंबेडकर कालखंडातील दलित चळवळींचा अभ्यास केलेला आहे. डॉ. राजश्री निकम यांनी शिवाजी विद्यापीठात कराड नगरपालिकेचा इतिहास या विषयावर संशोधन केले आहे. प्रा. डॉ. अनिल जगताप यांनी दलित चळवळींवर संशोधन केले आहे. अलिकडे सन २०११ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रा. डॉ. अभय पाटील यांनी कराडचा इतिहास या

विषयावर संशोधन केले आहे. सातारचे प्रतिसरकार या विषयावर प्रा. डॉ. आबासाहेब शिंदे यांनी संशोधन केले आहे. त्याचप्रमाणे सातारच्या सत्यशोधक चळवळींवर अभ्यास झाला आहे. परंतु हे सर्व काम सन १९५० पूर्वीचे आहे. सन १९६० ते सन २००० या कालखंडातील सामजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास मात्र कोणीच कैलेला नाही. म्हणून हा विषय मी संशोधनासाठी निवडला.

सन १९६० ते सन २००० हा कालखंड सर्व दृष्टीने महत्वपूर्ण आहे. पुढच्या काळातील विकासाची बीजे याच काळात रूजली गेली. राज्य पातळीवरचा अभ्यास करताना स्थानिक पातळीवरचे राजकारण समजून घेणे आवश्यक आहे. यातूनच स्थानिक पातळीवरील संदर्भ लक्षात येतात. घडलेल्या घटनांची गुंतागुंत समजून येते. केवळ राजकीय चळवळीपुरतीच ही बाब मर्यादित न राहता त्याचा प्रभाव आर्थिक, शेती, व्यापार व औद्योगिक अशा सर्वच बाबींवर होतो.

**संशोधनाची आवश्यकता :**

महाराष्ट्र मराठी भाषिक घटक राज्य विविध जिल्हयानी तयार झाले आहे. प्रत्येक जिल्हा अंगभूत गुणांनी वैशिष्टयपूर्ण आहे. परंतु सातारा जिल्हयाचे महत्व वेगळया प्रकाराचे आहे. जिल्हयाला वैशिष्टयपूर्ण राजकीय सामाजिक इतिहास आहे. मी विद्यावाचस्पती (पीएच.डी.) करीता सातारा जिल्हयातील राजकीय व सामाजिक चळवळींचा अभ्यास सन १९६० ते सन २००० यावर प्रबंध सादर करीत आहे.

भारतासारख्या संघराज्यात एका राज्याचे एका जिल्हयाचे महत्व काय? याचा अभ्यास करण्याची काय गरज? असा प्रश्न मनात येणे स्वाभाविक आहे. उत्तर साधे आहे. भारत राज्यांचा संघ आहे व राज्य जिल्हयाचा समूह आहे. राज्याला स्वतंत्र आणि वैशिष्टयपूर्ण अस्तित्व आहे. प्रत्येक प्रदेशाला निरनिराळया राजकीय व सांस्कृतिक घडामोडींनी तयार झालेली विविधता आहे. भाषावार प्रांतरचनेमुळे घटक राज्ये निर्माण केली तरी काही भाग भिन्न भिन्न भाषिक स्वरूपाचा आहे. राज्यपरत्वे राजकीय प्रक्रियेचे स्वरूप भिन्न असण्याची शक्यता असते.

दुसरी बाब अशी की, देशपातळीवर राजकीय, सामाजिक इतिहास लेखन करताना मोठमोठया घडामोडींचा परामर्श घेतला जातो. त्यामध्ये प्रादेशिक पातळीवरच्या घडलेल्या अनेक महत्वपूर्ण घटनांचा उल्लेखसुध्दा येत नाही अशा घटना दुर्लक्षित राहतात म्हणून जिल्हा प्रादेशिक पातळीवरील घडामोडींचा अभ्यास करणे आवश्यक आहे. राज्यातील विविध जिल्हयात वेगवेगळया प्रकारच्या राजकीय चळवळी, सामाजिक चळवळी असतात त्यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. राजकीय व सामाजिक चळवळी जरी एकाच प्रकारच्या असतील तर त्यांचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यांची तिव्रता कमीअधिक स्वरूपाची असते.

तिसरी बाब एका चळवळीचा दुसऱ्या चळवळीवर समाज जीवनावर वेगवेगळा व कमी अधिक प्रभाव होत असतो म्हणून प्रादेशिक पातळीवरील चळवळींचा घटनांचा अभ्यास करणे गरजेचे असते.

चौथी बाब म्हणजे देशपातळीवरची चळवळ समजून घेताना राज्यपातळीवर व जिल्हापातळीवर त्या चळवळीचे स्वरूप व तीव्रता समजून घेण्याची आवश्यकता असते यातून चळवळीतील घटनेचा प्रभाव

तुलनात्मक अभ्यासता येतो. शिवाय त्याची तीव्रता स्वरूप कोठे कसे आहे हे लक्षात येते व त्यापाठीमागील कारणांचा मागोवा घेता येतो. जिल्हयातील राजकीय किंवा सामाजिक प्रक्रिया ही राज्यातील प्रक्रियेची उपप्रक्रिया नसते ती एक स्वयंभू व स्वतंत्र प्रक्रिया असते. जिल्हांतर्गत राजकीय किंवा सामाजिक घटनेची वैशिष्टयपूर्ण माहिती अभ्यासणे गरजेचे आहे. स्थलपरत्वे त्याची तीव्रता, त्या ठिकाणची भाषिक, सामाजिक स्थिती इ. बाबींचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. यामुळे जिल्हा जिल्हयातील समान सूत्रे स्पष्ट होतात. अगदी दूरवर घडणाऱ्या छोटया बाबी उजेडात येतात. एकाचे वेगळे वैशिष्टये दुसऱ्यापर्यंत पोहोचते. वेगवेगळया बाबीचा त्यामुळे उलगडा होतो. जिल्हा पातळीवरील स्थूल प्रवाहांचे विश्लेषण करता येते.

सातारा जिल्हा एक सृजनात्मक वारसा लाभलेला जिल्हा आहे. येथे डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची रयत शिक्षण चळवळ आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची अस्पृश्यता चळवळ आहे. वामन पंडित, संत रामदास, पठ्ठे बापूराव व शाहीर साबळे, शाहीर फरांदे, रामराव चिटणीस यांच्यासारखे बखरकार निर्माण झाले. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, आगरकर, न.चि.केळकर, समाजसुधारक निर्माण झाले. द.बा.पारसनीस, रा.न.गोडबोले, भाऊशास्त्री लेले, ग.ह.खरे, लक्ष्मणशास्त्री जोशी असे किर्तीमान इतिहास संशोधक निर्माण झाले. श्री.म.म.माटे, काकासाहेब कालेलकर, शाहीर हैबती, बा.सी.मर्ढेकर यासारखे व्यासंगी साहित्यीक जन्मास आले. हयानंतर हाच वारसा नवीन पिढी चालवत आहे. कृष्णाकाठी वाई येथे ज्ञानसाधनेची मोठी परंपरा आहे. बालगंधर्व, रविंद्र भट, राजा गोसावी, कोल्हटकर यांच्यासारखे अभिनेते येथेच निर्माण झाले. कर्मवीर भाऊराव पाटील व क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण यांच्यासारखी समाज परिवर्तन घडविणारी मंडळी येथे तयार झाली. नररत्नांनी सातारचा सांस्कृतिक आसमंत समृध्द केला आहे. मी या वैभवशाली सातारा जिल्हयाचा अभ्यास केला खरा परंतु याचे सर्वस्वी श्रेय मी माझ्या मार्गदर्शक प्रा.डॉ.टी.एस.पाटील यांना देतो कारण संशोधनाची प्रतिमा त्यांनी माझ्या मनात उभी केली. म्हणून सर्वप्रथम मी त्यांना अभिवादन करतो. त्यांच्या व्यासंगाने चिकित्सक मार्गदर्शनाने माझा शोधप्रबंध साकार झाला. मी त्यांचा ऋणी आहे. संशोधनासाठी साधने व संदर्भ जमविणेकामी विविध संस्था, ग्रंथालये, विविध व्यक्ती, विविध वृत्तपत्रे खास करून सातारा व कराडची नगर वाचनालये व केसरी वाडा पुणे यांचे सहकार्य झाले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे मा.कुलगुरू डॉ.दिपक जयंतराव टिळक, विद्यापीठाचे रजिस्ट्रार उमेश केसरकर, तात्विक व सामाजिक शास्त्राचे आदरणीय डिन डॉ.बी.डी.कुलकर्णी व इतिहास विषयांच्या विभाग प्रमुख डॉ.नलिनी वाघमारे, ग्रंथपाल, पीएच.डी. विभागाची सर्व सदस्य मंडळी, कार्यालयीन सहकारी या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

**उद्दिष्टे :**

१.सातारा जिल्हयाच्या राजकीय चळवळींचा अभ्यास करणे.

२.सातारा जिल्हयाच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करणे.

३.आधुनिक काळातील विविध घटनांचा अभ्यास करणे तसेच राजकीय घटनांचे विश्लेषण करणे.

४.सातारा जिल्हयाच्या राजकीय चळवळी, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, आ.भा.शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट, शिवसेना, रिपब्लिकन पक्ष यांचा अभ्यास करणे.

५.सातारा जिल्हयाच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करणे.

१.शैक्षणिक चळवळ २.ग्रंथालय चळवळ ३.डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी

४.दलित चळवळ ५.अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ

६.सातारा जिल्हयातील आधुनिक वाटचालीतील राजकीय नेतृत्वांचा अभ्यास करणे.

१.यशवंतराव चव्हाण २.बाळासाहेब देसाई ३.किसन वीर ४.यशवंतराव मोहिते

७.सातारा जिल्हयातील सामाजिक नेतृत्वाचा अभ्यास करणे.

१.क्रांतिसिंह नाना पाटील २.कर्मवीर भाऊराव पाटील ३.प्रा.डॉ.एन.डी.पाटील

४.डॉ.नरेंद्र दाभोळकर

८. सातारा जिल्हयातील राजकीय चळवळीतील घटना, मोर्चा, आंदोलने इ.चा अभ्यास करणे.

९. सातारा जिल्हयातील सामाजिक चळवळींच्या अनुषंगाने येणाऱ्या घटना यांचा अभ्यास करणे.

१०. सातारा जिल्हयातील व्यक्तीच्या जीवनकार्याचा अभ्यास करणे.

११. सातारा जिल्हयातील सत्यशोधक चळवळीचा अभ्यास करणे.

१२. सातारा जिल्हयातील संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा अभ्यास करणे.

१३. सातारा जिल्हयातील अनुषंगाने येणाऱ्या प्रतिसरकार चळवळींचा अभ्यास करणे.

**गृहितके** :

१.सातारा जिल्हा एक प्राचीन राजकीय व सृजनात्मक वारसा लाभलेला जिल्हा आहे.

२.सातारा जिल्हयाचा राजकीय इतिहास फार प्राचीन व समृध्द आहे.

३.सातारा जिल्हयात विविध सामाजिक चळवळी घडल्या आहेत.

४.सामाजिक चळवळींनी व राजकीय चळवळींनी समृध्द असा सातारा जिल्हा आहे.

५.सातारा शहर व जिल्हयात शैक्षणिक चळवळ घडली.

६.सातारा जिल्हा ग्रंथालय चळवळीत एक अग्रेसर असा जिल्हा आहे.

७.सातारा जिल्हयात वाईला ज्ञानसाधनेची मोठी परंपरा आहे.

८.सातारा येथील अजिंक्यतारा हा ऐतिहासिक किल्ला आहे.

९.सन १९१९ मध्ये सातारा जिल्हयात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.

१०.सातारा व कराड शैक्षणिक केंद्रे म्हणून उदयास आली आहेत.

११.जिल्हयातील भौगोलिक परिस्थितीचा आर्थिक परिस्थितीवर प्रभाव पडला आहे.

१२.छत्रपती प्रतापसिंह थोरले महाराज नगरवाचनालय सातारा सर्वात जुने व मोठे वाचनालय असून ते 'अ' वर्गातील जिल्हा ग्रंथालय आहे.

१३. कराड नगर वाचनालय ‘अ’ दर्जाचे प्राप्त समृध्द ग्रंथालय आहे.

१४.जिल्हयातील सामाजिक चळवळीचा जनमानसावर प्रभाव पडलेला आहे.

१५.सातारा, कराड नगरपालिका ब्रिटिशकालीन असून तिने सातारा, कराडमधील जनतेला सोईसुविधा उपलब्ध केल्या आहेत.

१६.जिल्हयातील राजकीय व सामाजिक द्रष्टे नेतेमंडळींचा प्रभाव जनमानसावर पडला आहे.

**संशोधनाची व्याप्ती** :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती केवळ सातारा जिल्हा आहे. माझ्या अभ्यासासाठी मी इ.स. १९६० ते इ.स. २००० हा कालखंड घेतला आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र घटक राज्य अस्तित्वात आले. राज्यनिर्मितीनंतर राज्यातील राजकीय व सामाजिक चळवळी त्यांचा समाजावर पडणारा प्रभाव तसेच राजकीय नेतृत्व व सामाजिक नेतृत्व यांचा अभ्यास संशोधन साधने, संदर्भ, स्मरणिका, शासकीय कागदपत्रे, मुलाखती इत्यादी सहाय्याने हा अभ्यास पूर्ण केला.

**संशोधन मर्यादा** :

आधुनिक काळात प्रत्येक विषयाची व्याप्ती खूपच वाढली आहे. परिणामी एकटया अभ्यासकाला हे करणे शक्य होत नाही. तो फक्त विषयाचा स्थूलमानाने अभ्यास करू शकतो. हे गृहीत धरून जी साधने उपलब्ध झाली. त्या साधनांच्या आधारावर मी माझ्या विषयाची मांडणी केली असून त्यात उणीवा, मर्यादा असू शकतात. मला या सातारा जिल्हयाच्या संदर्भांत जे जे पुरावे मिळाले ते प्रामाणिकपणे चिकित्सकपणे घेतले आहेत.

**सैदधांतिक चर्चा** :

आधुनिक युग हे विज्ञानाचे युग आहे. त्यात संसूचनांना अतिशय महत्व प्राप्त झाले आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, मासिके ही सर्वसंसूचनांची महत्वपूर्ण माध्यमे आहेत. आधुनिक काळात अभ्यासामध्ये ‘विशेषीकरणाला’ महत्व दिले जाते. विशेषीकरणामुळे आपल्या पुढे असलेल्या अभ्यास विषयातील आपल्या विशेष आवडीचा एखादा विभाग, एखादी शाखा यावर लक्ष केंद्रित करता येते. यामुळे अधिक खोलात शिरून माहिती मिळविणे शक्य होते. इतिहासाची व्याप्ती मोठी असल्याने इतिहासातील एका भागावर लक्ष केंद्रित करून या भागाची, प्रदेशाची, शहराची सविस्तर माहिती देणे अभ्यासाच्या दृष्टीने सोईचे असते. स्थानिक इतिहासाच्या आधारे राष्ट्रीय इतिहास अधिक समृध्द बनविता येऊ शकतो. हा इतिहास विशिष्ठ ठिकाणाशी असला तरी अनेक स्थानिक घटनांचा राष्ट्रीय इतिहासाशीही संबंध येत असतो. तेव्हा स्थानिक इतिहासामुळे राष्ट्रीय इतिहासातील प्रमुख घटनांवर प्रकाश टाकणे शक्य होत असते. राष्ट्रीय इतिहासात अनेक गोष्टी सामान्य स्वरूपात मांडलेल्या असतात. तेव्हाबरोबर हाच धागा पकडून ‘सातारा जिल्हयातील सामाजिक व राजकीय चळवळींचा अभ्यास’ (सन १९६० ते सन २०००) आधुनिक इतिहासावर सातारा जिल्हयाच्या अनुषंगाने जी संदर्भ साधने उपलब्ध झाली ती घेऊन संशोधन करण्याचा

प्रयत्न केला. सातारा जिल्हयातील राजकीय चळवळी व सामाजिक चळवळी यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला. शहरातील संघटना, मोर्चे, आंदोलन याचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला. जिल्हयातील सामाजिक चळवळींचा वस्तुनिष्ठ अभ्यास केला. जिल्हयातील राजकीय नेतृत्व जिल्हयातील सामाजिक नेतृत्व याचा वृत्तपत्रे, स्मरणिका, विशेषांक, संदर्भ ग्रंथ, शासकीय कागदपत्रे या आधारे वस्तुनिष्ठ अभ्यास केला व वस्तुनिष्ठपणे लेखन केले. या विषयाचा आवाका प्रचंड आहे. संदर्भ साधनाकरिता वेगवेगळया ठिकाणी जावे लागले. माझ्या संशोधनातून स्थानिक परिस्थितीची माहिती मिळेल. परिसरातील जनतेच्या अडचणीची शासनाला दखल घेता येईल. स्थानिक अडचणीचे निराकरण या संशोधनातून होऊ शकेल.

### संशोधन पध्दती (Research Methdology) :

विषयाची मांडणी करताना १.विश्लेषणात्मक पध्दत २.सूक्ष्म पध्दत ३.मुलाखत ४.संदर्भ पध्दत या पध्दती वापरल्या आहेत.

### संशोधनाची आवश्यक माहिती :

या संशोधनाची आवश्यक माहिती प्रामुख्याने शासकीय कागदपत्रे, नगरपालिका व इतर संस्था, बँका, जिल्हा परिषद, स्थानिक कार्यालये यांचे अहवाल, मुंबई पुराभिलेखागारातील कागदपत्रे, जुनी हस्तलिखिते, अप्रकाशित कागदपत्रे, जुने संदर्भ ग्रंथ वृत्तपत्रे विशेषांक, गौरव अंक, जुने संदर्भ, स्मरणिका, नियतकालिके, गॅझेटियर व मुलाखती इ.

### संशोधन आराखडा (Analysis and Interpretation)

संशोधनासाठी निदानात्मक संशोधन आराखडयाचे उपयोजन केले जाणार आहे. यामध्ये संशोधकाने आपल्या संशोधन अहवालात पुढीलप्रमाणे पाच प्रकरणांची निश्चिती केली आहे.

प्रकरण पहिले – सातारा जिल्हयाचे स्वातंत्र्यपूर्व योगदान

प्रकरण दुसरे – सातारा जिल्हयातील राजकीय चळवळीं (१९६० ते २०००)

प्रकरण तिसरे – सातारा जिल्हयातील सामाजिक चळवळीं (१९६० ते २०००)

प्रकरण चौथे – सातारा जिल्हयातील सामाजिक आणि राजकीय नेतृत्व

प्रकरण पाचवे – उपसंहार

### प्रकरण पहिले

### सातारा जिल्हयाचे स्वातंत्र्यपूर्व योगदान

या प्रकरणात पार्श्वभूमी, प्रतापसिंह महाराजांचे कार्य, २० व्या शतकातील सामाजिक, राजकीय स्थिती, सत्यशोधक, ब्राह्मणेतर चळवळी, १९४२ चा स्वातंत्र्यलढा, प्रतिसरकार व संयुक्त महाराष्ट्राचा लढा याचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण दुसरे**

## सातारा जिल्हयातील राजकीय चळवळीं (१९६० ते २०००)

या प्रकरणात कॉंग्रेस पक्षाच्या राजकीय, सामाजिक, कृषीविषयक औद्योगिक चळवळींचा आढावा घेण्यात आला आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा, लढयासंबंधी सातारा जिल्हयाने केलेला संघर्ष यात समाविष्ट केलेला आहे. स्वतंत्र विदर्भाची चळवळ, मराठवाडा विकास चळवळ, कोरेगावचा शेतकरी मेळावा, भूकंप पुनर्वसनाचे केलेले काम यांचा आढावा घेण्यात आला आहे. सामाजिक चळवळींमध्ये जिल्हयातील गुंडांचा बिमोड, रस्ते सुधार मोहीम, दुष्काळ निवारणाचे प्रयत्न, धोम–कण्हेर धरणाची मागणी यांचा आढावा घेण्यात आला आहे. जिल्हयातील शैक्षणिक उठाव मोहीम, मोफत शिक्षण सवलत, कर्मवीरांचे शैक्षणिक कार्य, ग्रंथालय चळवळ, जिल्हा प्रौढ शिक्षण अभियान याचा अभ्यास करण्यात आला आहे. कृषी संदर्भात बंडींग योजना, कॉंग्रेसप्रणित प्रगती मंडळ, सर्वोदय चळवळ, ग्रामराज्य, भूदान चळवळ, दलित भूमीहक्क चळवळी यांचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच शेकापच्या राजकीय चळवळीं, शेतीमालाला किफायतशीर भाव, इगतपुरी आंदोलन, महार वतन गुलामगिरी आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र लढा, वैरागचा गोळीबार, १९७२ चा दुष्काळ, एन्रॉनचा लढा या राजकीय चळवळींचा आढावा घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शेकापच्या सामाजिक चळवळीं, उपासमार, विरोधी कृती समिती, दुधबंदी आंदोलन, साखर कारखाना गैरव्यवहार, वाळवा इस्लामपूर डांबरीकरण, साराबंदी आंदोलन, सातारा रेल्वे चळवळ यांचा आढावा घेतला आहे. त्याचप्रमाणे शेतकरी दिंडी, चलो नागपूर आंदोलन, भ्रष्ट्राचार व निधीचा गैरवापर, रायगडचा सेज लढा त्याचप्रमाणे शैक्षणिक श्वेतपत्रिका विरोधी लढा या संदर्भात अभ्यास करण्यात आला आहे.

कम्युनिष्ट पक्ष चळवळी, १९६९ चा मुंबईतील सीमा प्रश्न लढा, दुष्काळातील महागाई विरोधी पक्ष कार्य, कम्युनिष्ट पक्षाचे शेतकरी लढे, जमीनीचे फेरवाटप योजना, फलटण खंडकरी शेतकऱ्याचा लढा, शेतीमालाला हमीभाव संघर्ष, धरणग्रस्तांचा लढा, बळीराजास स्मृतीधरण योजना व कम्युनिष्ट पक्षाने दिलेले सामाजिक लढे या संदर्भात अभ्यास करण्यात आला आहे.

पक्षबाहय संघटना व आंदोलन, युवक क्रातीदल–एक गाव एक पाणवठा चळवळ, दलित चळचळीचे सातारा जिल्हयातील काम, रोटरी क्लब यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रकरण तिसरे**

## सातारा जिल्हयातील सामाजिक चळवळीं (१९६० ते २०००)

या प्रकरणात शैक्षणिक चळवळीचा आरंभ, प्राथमिक शिक्षण, दलितांचे शिक्षण, रयत शिक्षण संस्थेने केलेले शैक्षणिक कार्य, त्यांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा कार्यविस्तार या बाबींची चर्चा यात करण्यात आली आहे.

सातारा जिल्हयातील ग्रंथालय चळवळीचा पूर्वकाळ, साताराचे नगर वाचनालय, ग्रंथालय संघ वाटचाल, अधिवेशन व चळवळीतील योगदान त्याचप्रमाणे सार्वजनिक ग्रंथालयांची यादी यांचा सहभाग आहे.

अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ, स्त्रिया व अंधश्रध्दा, मनोविकार, चळवळीची वाटचाल यांचा अभ्यास केलेला आहे. यासंदर्भात डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचे चिंतन, लेखन आणि सामाजिक कार्य या संदर्भात करण्यात आले आहे. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, उद्देश व स्थापना, कार्यकारिणी रचना, अकादमीचे उपक्रम, विचारवेध संमेलने, इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे.

दलित चळवळीचा इतिहास, आंबेडकरपूर्व दलित चळवळी, सत्यशोधक चळवळ व वृत्तपत्रातून होणारी समाजजागृती याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या संदर्भात सातारा जिल्हयातील दलित चळवळ, सत्यशोधकी लोकजागृती, सत्यशोधकी जलसे, राष्ट्रसेवा क्रांतीदल, शाहीर तुकाराम, सवाखंडे, प्रा.मच्छिंद्र सकटे, डॉ.केंगार, प्राचार्य कालेकर, पार्थ पोळके यांचे कार्य नमूद करण्यात आले आहे.

**प्रकरण चौथे**

**सातारा जिल्हयातील सामाजिक आणि राजकीय नेतृत्व**

या प्रकरणामध्ये यशवंतराव चव्हाण यांचा प्रत्यक्ष चळवळीतील सहभाग, त्यांचा राजकीय प्रभाव, मुख्यमंत्री म्हणून त्यांचे राजकीय, सामाजिक, शेतीविषयक कार्य यांचा आढावा घेण्यात आला आहे. बाळासाहेब देसाई यांचे लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणून कार्य, जिल्हयातील श्रमदान योजना या संदर्भातील कार्य, बांधकाम, दळणवळण, पाटबंधारे म्हणून त्यांचे काम, कोयना धरण योजना त्याने गतिमान केली. शिक्षण मंत्री म्हणून मोफत शिक्षण सवलत, कोल्हापूर विद्यापीठ, कृषी विद्यापीठ यांची स्थापना केली. त्यानी आधुनिक शेती तंत्रावर भर दिला. भूकंपग्रस्तांसाठी मोठे कार्य केले. कोयना एज्युकेशन सोसायटी व दौलत सहकारी कारखाना यांची स्थापना केली.

किसन वीर यांची राष्ट्रीय विचारांची जागृती, त्यांनी केलेला जंगल सत्याग्रह, चलेजावचा लढा, ग्रामविकास योजना या कामाचा आढावा घेण्यात आला आहे. किसन वीर यांची जिल्हा काँग्रेस अध्यक्ष म्हणून केलेले काम, शेती विकासातील कार्य, सहकारी बँक व सहकारी साखर कारखाना इत्यादी बाबींचा आढावा घेण्यात आला आहे.

यशवंतराव मोहिते यांनी संयुक्त महाराष्ट्राचा ठराव विधानसभेत मांडला. सहकार मंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य, कापूस एकाधिकार योजना, पन्हाळा शिबीर, शेतकऱ्यांच्या संदर्भात केलेली कामे, उपसा जलसिंचन योजना, भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन, भारती विद्यापीठाचे अध्यक्ष म्हणून केलेले कार्य व त्यांचे मार्क्सवादी विचार यांचा आढावा घेतला आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील – म.फुल्यांचा आदर्श, अस्पृश्यता निवारण कार्य, रयत शिक्षण संस्थेची स्थापना, प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण या गोष्टींचा आढावा घेण्यात आला आहे.

क्रांतिसिंह नाना पाटील – नाना पाटील यांचे सत्यशोधक चळवळीतील साक्षरता अभियानातील प्रौढ शिक्षणाबाबतचे कार्य यांची चर्चा करण्यात आली आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांची प्रतिसरकार

चळवळ, त्यांनी केलेला दुधबंदी लढा, इगतपुरी आंदोलन, श्रमिकांच्या प्रश्नाला त्यांनी फोडलेली वाचा, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, खंडकरी लढा, धरणग्रस्त लढा यांचा आढावा घेतला आहे.

प्रा.डॉ.एन.डी.पाटील–कष्टकरी जनतेचे एक लढाऊ नेते, डाव्या आघाडीचे नेते, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस म्हणून केलेले कार्य तसेच त्यांनी केलेले रयत शिक्षण संस्थेतील कार्य, त्यांनी दिलेले अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीतील लढे, त्यांनी लढविलेला १९७२ चा दुष्काळी लढा, एन्रॉन हटाव लढा, साखर कारखानदारांची वाटमारी, सीमा प्रश्न लढा, सेझ लढा याबाबत आढावा घेण्यात आला आहे.

डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या माध्यमातून दीर्घकाळ लढा दिला. मोहीमा व परिषदा आयोजित केल्या. जादूटोणा विधेयकासाठी लढा दिला.

**प्रकरण पाचवे**

## उपसंहार (Finding / Conclusion) :

या प्रकरणात संशोधनातून निघालेला निष्कर्ष मांडला आहे.

**सातारा जिल्हयाचे स्वातंत्र्यपूर्व योगदान**

**प्रास्ताविक:**

मुघल–मराठा संघर्षात अजिंक्यतारा, परळी असे दोन किल्ले जिंकण्यासाठी स्वत: औरंगजेबाला प्रदीर्घ संघर्ष करावा लागला.[१] पंचवीस वर्षाच्या प्रदीर्घ लढयानंतरही मराठयांचे राज्य तो नष्ट करू शकला नाही त्यामुळे अत्यंत निराश मन:स्थितीत अहमदनगर मुक्कामी औरंगजेब बादशहा २० फेब्रुवारी १७०७ रोजी मूत्यू पावला.[२] औरंगजेबाच्या मृत्यूची बातमी माळव्याच्या सुभेदारीवर रवाना झालेल्या त्याच्या आझमशहा मुलास समजली. त्याने स्वत:ला बादशहा म्हणून जाहीर केले. काही मुत्सद्यांच्या सल्ल्यानुसार आझमशहाने शाहूची ८ मे १७०७रोजी बंदीवासातून सुटका केली.[३] किल्ल्याचा हवलदार शेखमिरा होता. त्यांनी प्रतिनिधीस सातारा किल्ला शाहू छत्रपतींच्या स्वाधीन करण्याचा सल्ला दिला. शेखमिराने प्रतिनिधीस पकडले व किल्ला शाहूंचे स्वाधीन केला.[४] लगेच शुभमुहूर्त पाहून माघ शुध्द १ सोमवार शके १६२९(दि.१२ जानेवारी १७०८) रोजी त्यांनी स्वत:चा राज्याभिषेक उरकला.[५]

**१.१ सातारा जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी: –छत्रपती शाहू:**

शाहूनी किल्ल्याच्या उत्तरेकडील पायथ्याशी शाहूनगर नामक शहर वसविले ते हेच आजचे सातारा शहर होय.[६] शाहूनगरामध्ये व वाडयात खर्चास पाणी नाही म्हणून त्यांनी यवतेश्वरला एक तलाव बांधला. यवतेश्वराहून व महादऱ्याहून खापरी नळाने पाणी आणून उत्तम सोय केली. ही मराठयांची राजधानी असल्यामुळे प्रधानजी व सरदारांचेकरिता राजवाडे बांधले. नवीन पेठा वसविल्या. त्यांना वारांची नावे दिली.[७] याबरोबर जुनावाडा, अक्कलकोटकरांचा वाडा, पिंगळयांचा वाडा, शेख मिरची वाडा तसेच सातपेठा, रामाचा गोट, यादोगोपाळ पेठ, व्यंकटपुरा, चिमणपुरा, दर्गापुरा, राजसपुरा, पंताचा गोट, रघूनाथपुरा इ.नावे ऐतिहासिक व्यक्तीवरून पडली. [८] शाहूनगरमध्ये शाहू छत्रपतीनी रंगमहाल, अदालतवाडा या वास्तू बांधल्या.

ही शाहूच्या आमदनीची आठवण करून देतात.[९]

### १.२ आधुनिकतेचे पहिले पर्व – राजा छ.प्रतापसिंह:

सातारा जिल्हयाच्या इतिहासातील आधुनिकतेचे पहिले पर्व श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह राजे. (इ.स.१८०८ ते इ.स.१८३९) दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मृत्यू पावला. त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवर बसविण्यात आले.[१०] मुंबई प्रांताचा पहिला गव्हर्नर माऊन्ट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन व जॉन माल्कम, ग्रँड डफ, कर्नल ब्रिग्ज, रॉबर्टसन, कर्नल लॉडविक इ. इंग्रज अधिकारी व बिशप हेवर यासारख्या इतिहासकारांनी छत्रपती प्रतापसिंहांची त्यांच्या राज्यकारभाराची प्रशंसा केली आहे.[११] शहराला पाणी अपुरे पडले म्हणून त्यांनी यवतेश्वराहून देवालयाचे मागे तलाव बांधून पाणी पुरविले. शहरात हमरस्ते तयार केले. साडेपाच लाख रूपये खर्चून मोठा राजवाडा बांधला. (इ.स. १८२६) येथे काही काळ जिल्हा न्यायालय होते. सरदार व इतर सामान्यांना बांधकामासाठी अर्थसहाय्य दिले. रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण केले. दुकान व व्यवसायाकरिता लोकांना कर्जे दिली.[१२] राजा शिक्षणाकरिताही दक्ष होता. मुलामुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी संस्कृत, मराठी व इंग्रजी या विषयांच्या शिक्षणास्तव एक मोठी पाठशाळा बांधली. तेथे एक छापखाना काढून उपयुक्त ग्रंथ छपाई करून घेतले. लाखो रूपये खर्चून मंदीरांचा जीर्णोध्दार केला. सातारा राजधानीत चांगल्या प्रकारची सुधारणा केली. प्रजाहितदक्ष म्हणून लौकिक मिळविला.[१३] सातारा कसे नमुनेदार होईल या संदर्भात ग्रँड डफ यांनी मार्गदर्शन केले.[१४] प्रजाहिताच्या अनेक गोष्टी त्यांनी केल्या. न्यायनिवाडयाकरिता ते स्वत: कचेरीत जात. ग्रँड डफ व छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्या परस्पर सहकार्याने सातारा संस्थान खूप उत्तम प्रकारे चालले होते .[१५]

या लष्करी शिक्षणात अश्वारोहण, भालाफेक, बंदूक नेमबाजी यांचे शिक्षण देण्याची सोय केली. गोरा अधिकारी मुलींना लष्करी शिक्षण देतोय यास्तव येथे लोकमताचा प्रक्षोभ झाला.[१६] प्रतापसिंहांचे राज्यकारभारातील कर्तृत्व व त्यांची लोककल्याणासाठी झटण्याची तयारी पाहून ग्रँट डफ यांनी प्रशंसोदगार काढले व ५ एप्रिल १८२२ रोजी सातारला खास मोठा दरबार भरविण्यात आला. या प्रसंगी अधिकारनामाचा सरकारी जाहीरनामा वाचून दाखविण्यात आला.[१७] इतिहासकार बिशप हेबरने प्रतापसिंह महाराजांचेबददल प्रसंशोद्गार लिहून ठेवलेले आहेत.

''चांगली ग्रहणशक्ती असलेला अधिपती निर्मळ मनाचा आहे. त्यांच्या राज्यात शांतता व सुव्यवस्था आहे. राज्यात नुकताच दुष्काळ पडलेला असतानासुध्दा धनधान्य पुरेसे आहे. हा राजा इतका शांतताप्रिय आहे की विश्वास ठेवणे सकृतदर्शनी कठीण वाटते. राज्यातील रस्ते व तलावाच्या सुधारणाकडेही त्यांनी लक्ष दिले.'' [१८] लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीने १८२३ च्या सुमारास छत्रपती प्रतापसिंह राजास सभासदत्व देऊन गौरव केला. प्रतापसिंहाच्या एतद्देशीय शत्रूनी व इंग्रजांनी कट कारस्थाने करून त्यांना पदच्युत केले.[१९] इ.स. १८४८ मध्ये सातारा हे ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली आले. प्रतापसिंहाना संतती नसल्याने त्यांना दत्तक घ्यावा लागला. परंतु हा दत्तक इंग्रज सरकारने १६ मे १८४९ रोजी नामंजूर करून

त्यानुसार सातारा हे संस्थान खालसा केले. अशा प्रकारे शिवछत्रपतीच्या मराठी राज्याचा अवशेष समाप्त झाला.[२०]

सन १८५७ च्या सातारा उठावातील पाच आरोपींना गेंडामाळावर गोसावीपुऱ्यातील वडाला टांगून सप्टेंबर १८५७ मध्ये फाशी देण्यात आली. सहा आरोपींना तोफेच्या तोंडी देण्यात आले व सहाजणांना गोळ्या घालून ठार केले.[२१] मराठे व ब्रिटीश यांच्यात आष्टी येथे १९ फेब्रुवारी १८१८ रोजी अखेरची लढाई झाली. या लढाईमध्ये मराठयांचा प्रचंड पराभव झाला. पेशवाई बुडाली. या मराठेशाहीच्या नाशानंतर ब्रिटिशांचे निर्वेध साम्राज्य सुरू झाले. [२२] या ब्रिटीश सत्तेबद्दल असंतोष पसरला. प्रारंभी छोटया मोठया स्वरूपाचे सशस्त्र उठाव झाले. इंग्रज सत्तेविरूध्द इ.स.१८५७ चा उठाव मोठया प्रमाणात घडून आला. उठावाचे स्वरूप प्रचंड होते. [२३] संपूर्ण इंग्रजी सत्तेचे देशातून उच्चाटन होते की काय असे चित्र निर्माण झाले. इ.स.१८५७ चा हा उठाव पूर्णपणे चिरडून टाकण्यात ब्रिटिशांना यश मिळाले परंतु या घटनेचा त्याना मोठा धक्का बसला. ब्रिटिश पार्लमेंटने ईस्ट इंडिया कंपनीकडून भारताचा राजकारभार काढून स्वत:कडे चालविण्यास घेतला.

ब्रिटिश राजवटीमुळे शिक्षण, विज्ञान, धर्म, कायदा, दळणवळण यामध्ये सुधारणा झाल्या. पाश्चात्य संस्कृतीशी जनतेचा घनिष्ठ संबंध झाला. पाश्चिमात्य शिक्षणाने तरूणवर्ग तयार झाला.[२४] ब्रिटिश व भारतीय संस्कृतीचा तुलनेने विचार करू लागला. महाराष्ट्र ही परिवर्तनशील भूमी आहे. देशात स्थित्यंतर घडून आली. राष्ट्रवादाचा उदय झाला. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे रूढी अंधश्रध्दाची जागा बुध्दीवादाने आणि विज्ञानाने घेतली. इंग्रजी शिक्षणाने कायदा व न्यायव्यवस्था मुद्रण व वृत्तपत्रे यामुळे नवशिक्षित तरूण व समाजसुधारकांच्या विचारसरणीची जडणघडण झाली.[२५] सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले यांनी इ.स. १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाजाची' पुण्यात स्थापना केली.[२६]

**१.३ विसावे शतक सामाजिक स्थिती :**

महाराष्ट्रातील समाजजीवन इंग्रजी राजवटीने बदलले होते. राजे, व्यापारी, नोकरवर्ग, सरंजामदार, शहरी व ग्रामीण भाग यामध्ये समाज विभागला होता. एकोणिसाव्या शतकातील चळवळीमुळे झालेले बदल शहरी भागात चटकन मान्य झाले.[२७] पण ग्रामीण अशिक्षित समाज अंधश्रध्दा, दैववाद, भ्रामक समजुती यातच गुरफटलेला होता. महात्मा फुले यांच्या उदयामुळे महाराष्ट्रात नवयुगाची प्रभात उजाडली.[२८] महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रारंभी प्रार्थना समाजाच्या माध्यमातून समाजकार्य केले. त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी इ.स. १९०६ मध्ये मुंबई येथे 'डिप्रेस्ड क्लासेस मिशनची' स्थापना केली तसेच डॉ.ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली इ.स.१९१७ मध्ये कलकत्ता राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात 'अस्पृश्यता' निवारण्याचा ठराव मंजूर करून घेतला. त्यांनी संपूर्ण आयुष्यभर शिक्षणप्रसार व दलितोध्दाराचे कार्य केले.[२९] महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी विधवा स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी इ.स. १८९३ मध्ये विधवा विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना केली. त्याचप्रमाणे मुलींना शिक्षण घेता यावे म्हणून इ.स.१९०७ मध्ये हिंगणे

येथे स्वतंत्र महिला महाविद्यालयाची स्थापना केली.[३०] इ.स.१९१६ मध्ये महिला शिक्षणासाठी स्वतंत्र अशा महिला विद्यापीठाची स्थापना केली. महर्षी कर्वे यांनी प्रामुख्याने स्त्री शिक्षण व विधवा पुर्नविवाह या क्षेत्रात बहुमोल कार्य केले.

राजर्षी शाहू महाराज यांनी सुरूवातीपासूनच जातीभेदाला विरोध केला. कोल्हापूर संस्थानात इ.स. १८९४ पासून अब्राहमणांना नोकऱ्या देण्यास प्रारंभ केला. [३१] ब्राहमणेत्तरांना प्रतिष्ठेची नोकरी म्हणजे सामाजिक अवमूल्यन ही ब्राहमणांची धारणा होती. म्हणून या वर्गानी महाराजांच्या या सामाजिक समता निर्माण प्रयत्नास विरोध केला. राजर्षी शाहू महाराजांनी जातीयवादाविरोधात लढण्यासाठी महात्मा फुले सत्यशोधक समाजाचा वैचारिक पाया महत्वपूर्ण असल्याने कोल्हापूरात इ.स. १९११ मध्ये सत्यशोधक समाज चळवळीचे पुर्नजीवन केले.[३२] ही चळवळ महाराष्ट्राच्या खेडोपाडयांपर्यंत पोहोचविली. सर्वसामान्य अज्ञानी व अशिक्षित प्रजेला विषमतेच्या दरीतून बाहेर काढण्यासाठी त्यांना शिक्षण देण्याचा घाट घातला. शेतकऱ्यांच्या मुलांना कमी खर्चात राहणे व जेवण्याच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी प्रथम १८ एप्रिल १९०१ मध्ये महाराणी व्हिक्टोरिया मराठा वसतिगृह कोल्हापूरात सुरू केले. पुढे १९०१ ते १९२२ पर्यंत त्यांनी कोल्हापूरात स्वतंत्र अशी २२ वसतिगृहे निर्माण केली.[३३]

**१.४ सातारा जिल्हयाची लढाऊ परंपरा :**

महाराष्ट्राच्या इतिहासात सातारा जिल्हयाला एक वैशिष्टयपूर्ण व उल्लेखनीय असे स्थान आहे. सातारा ही नाना पाटील व कर्मवीर भाऊराव पाटील यांची कर्मभूमी आहे. या लढाऊ सातारला पंडीत नेहरूंनी 'जय सातारा' शब्दांनी गौरविले आहे.[३४] इ.स.१८३९ मध्ये छत्रपती प्रतापसिंह यांना सातारच्या गादीवरून पदच्यूत केले. तेंव्हा देशातील संस्थानिकांच्यामध्ये असंतोष पसरला. सातारा परिसरात लहानलहान बंडांची मालिका सुरू झाली. कराडच्या (कोळे गावच्या) धारराव पवार यांनी बंडासाठी लोकांना संघटित केले. इस्लामपूरचे नरसाप्पा दत्तात्रय पेटकर, बेनाराम व जगमोहन, लिंबचे राधे जनार्दन आपटे, परळीचे निंवाजी व नरसाजी यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटीशांविरूध्द बंड केले. परंतु ते यशस्वी झाले नाही.[३५] रंगो बापूजी गुप्ते यांनी प्रतापसिंह राजास न्याय मिळावा म्हणून १४ वर्षे इंग्लडमध्ये राहून खूप प्रयत्न केले.इ.स. १८४९ मध्ये जेव्हा सातारा संस्थान खालसा केले. तेंव्हा चतुरसिंग भोसले व नंतर रूपसिंह परदेशी यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटीशांविरूध्द बंडे झाली. ब्रिटिशांनी लोकांची धरपकड केली. अनेकांना तुरूंगात डांबले. पटवर्धन व गोपाळ हरी पंडीत यांना काळया पाण्याची व अण्णा शेंडे व कुंडलकर यांना सक्त कैद केली.[३६]

इ.स. १८५४ मध्ये रंगो बापूजींनी इंग्लडहून परत आल्यावर इंग्रजांचे विरूध्द उठाव केला. परंतु या बंडाचा सुगावा अगोदरच ब्रिटिशांना लागला व हे बंड त्यांनी मूळासह मोडून काढले. १७ लोकांना पकडून त्यांचेवर खटले दाखल केले. व त्यांना ८ सप्टेंबरला सातारच्या गेंडामाळावर जाहीरपणे मृत्यूदंड देण्यात आला. निकाल ७.७.१८५८ ला झाला लगेच दुसरे दिवशी ८ सप्टेंबर १८५७ रोजी सर्वांना शिक्षा दिली. समाजात एकात्मता व एकसंधपणा होता.[३७] इ.स. १८७६ मध्ये सातारा, कराड, वाई येथे सार्वजनिक सभेच्या

शाखा सुरू झाल्या नारायण कोल्हटकर, कृष्ण सखाराम महाजन, गुंडाचार्य घळसासी व नानासाहेब वैद्य हे प्रमुख होते.[३८]

त्याचप्रमाणे पांडोबा भोसले यांनी 'महाराष्ट्र वृत्त' व काशीनाथ वामन (भाऊशास्त्री लेले) यांनी 'मोदवृत्त' त्याचप्रमाणे रामचंद्र पिंगळे यांनी 'प्रेक्षक' ही वृत्तपत्रे सुरू करून ब्रिटीश राजवटीच्या शोषक नीतीचे वृत्त जनतेपर्यंत पोहचविले. यामुळे सातारमधील राष्ट्रीय चळवळ अधिकच दृढ झाली.[३९] इ.स.१८८५ मध्ये मुंबई येथे राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. साताऱ्यात दादासाहेब करंदीकर, बळवंत कोल्हटकर, गोविंदराव लिमये, बळवंतराव सहस्त्रबुध्दे, कृष्णाजी आबाजी गुरूजी, विठ्ठलराव पाठक, रावबहाददूर आर आर काळे, नारायण कृष्णा आगाशे, आर.व्ही. कुलकर्णी, रामकृष्ण माधवराव(नानासाहेब वैद्य), भाऊसाहेब भागवत या सर्वानी राष्ट्रीय काँग्रेस वृध्दींगत व्हावे, वाढावे म्हणून राष्ट्रीय संदेशाचा प्रसार केला. इ.स. १९०० रोजी हिंदी राष्ट्रीय सभेची प्रांतिक परिषद सातारला भरली होती.[४०]

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सनदशीर मार्गाने प्रयत्न करणारी काही मंडळी होती तशीच सशस्त्र मार्गाने स्वातंत्र्य मिळवायचे या विचारांची काही मंडळीसुध्दा सातारा जिल्हयात होती.न्यू इंग्लिश स्कूल सातारा शाळेतील शिक्षक दामोदर बळवंत भिडे हे त्यापैकी एक. त्यांचा गदर पक्षाशी संबंध होता.[४१] त्याचप्रमाणे डॉ.व्ही.व्ही.आठले यांनी इ.स. १९१० मध्ये एक गुप्त क्रांतिकारी संघटना स्थापन केली होती. त्या संघटनेचे २००चे वर सभासद होते.[४२] डॉ.व्ही.व्ही.आठल्ये यांनी श्री.बापट यांचेकडून बॉम्ब तयार करण्याचे तंत्र शिकून हिंगे यांना दिले. इ.स.१९१० मध्ये हिंगेनी प्रायोगिक बॉम्ब तयार केला. ही गोष्ट न्यू इंग्लिश स्कूलच्या वसतिगृहातील अधिक्षकांना समजली व त्यांनी ही गोष्ट सातारा डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट यांना सांगितली म्हणून डॉ.आठल्ये, हिंगे, इंगळे व मेहेंदळे यांना अटक झाली व पुढे खटला चालला व शिक्षा झाली.[४३]

एकंदरीत विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात सामाजिक व राजकीय चळवळीला गती प्राप्त झाली. सामाजिक क्षेत्रात सत्यशोधक समाज चळवळ, ब्राहमणेत्तर चळवळ, विठ्ठल रामजी शिंदे यांची अस्पृश्यता उध्दार चळवळ, कर्मवीर भाऊराव पाटील यांची शैक्षणिक चळवळ होती.[४४] समाजक्रांतीचे जनक महात्मा फुले यांना धर्मभोळेपणा, अंधश्रध्दा, समाजातील अज्ञान घालविण्याखेरीज समता प्रस्थापित होणार नाही याची जाणीव झाली.[४५] १९व्या शतकातील अग्रगण्य सुधारक लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख होते. स्त्रियांच्यावरील अन्याय आणि विषम जातीव्यवस्था यामुळे समाजाची दुरावस्था होती. दोघांचा दर्जा समान आहे असे त्यांचे मत होते. पुर्नविवाहाचे त्यांनी जोरदार समर्थन केले.[४६] न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे आधुनिक सुधारणीचे जनक होते. जातपात व वंशाच्या दुराभिमानातून मुक्त होऊन मनुष्यामनुष्यात न्याय प्रस्थापित करावा असा त्यांचा विचार होता. समता मिळवून देण्यासाठी झटणे हा उदारमतवाद होता.[४७] याप्रमाणे समाजसुधारक गो.ग.आगरकर यांनासुध्दा सर्वांना समान स्वातंत्र्य अभिप्रेत होते. बालविवाहाची चाल कायदयाने बंद होणे गरजेचे होते. स्त्री पुरूष समान स्वातंत्र्याचा त्यानी विचार मांडला.[४८]

**महात्मा जोतीराव फुले :**

आधुनिक युगात म. फुले यांनी स्त्रियांच्या मानवी हक्काचा पुरस्कार केला. विधवाविवाह व एकपत्नित्व इत्यादी सुधारणा फुलेंनी प्रथम मांडल्या म्हणून त्यांची गणना थोर पुरूषात केली गेली. महात्मा फुले यांनी सक्तीच्या शिक्षणाची चळवळ केली.[४९] बोलल्याप्रमाणे कृती न करणे या गोष्टींचा म.फुले यांना अत्यंत तिटकारा येत असे.[५०] पुणे 'ज्ञानप्रकाश' पत्राच्या ता.१३.९.१९२५च्या अग्रलेखात रा. वझे लिहितात. इ.स.१८५४ म्हणजे बंडाच्या अगोदर तीन वर्षे जोतीराव फुले यांनी मुलींची शाळा स्थापन केली. ही पुणे शहरातील पहिली खाजगी शाळा. स्त्री शिक्षिका मिळेना म्हणून त्यांनी स्वतःच्या पत्नीला शिक्षण देऊन आपल्या शाळेत स्त्री शिक्षिकेचे काम करण्यास तयार केले. उभयतांनी ही शाळा चालवून नंतर काही ग्रहस्थांच्या कमिटीकडे तिची व्यवस्था सोपविली.[५१]

सासवड येथील इनामदार श्री.दादासाहेब पुरंदरे यांनी '' म. फुले यांचेवरील आक्षेपाचे खंडन'' असा मोठा लेख लिहला. ते त्यात लिहितात, '' श्री संत तुकाराम, श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री गोरा कुंभार, श्री सावता माळी, साधूवर्य चोखामेळा, कबीर कमाल, दादू पिंजारी हे संतसुधारक महात्मे गेल्यावर समाजातील खूळचट रूढी, अयोग्य बाबी यांचा बीमोड करून जो समाज स्थापन झाला. त्यास सत्यसमाज हे सार्थ नाव मिळाले.[५२] सामान्य घटकाचे कल्याण करण्यासाठी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज चळवळ, ब्राम्हणेत्तर चळवळी घडल्या. यापैकी सत्यशोधक समाज चळवळ ही दीर्घकाळ चाललेली व प्रभावीपणे समाजपरिवर्तन करणारी चळवळ ठरली.[५३]

**१.५ सातारा जिल्हयातील सत्यशोधक चळवळ:**

पुरोहितांनी स्त्री, शूद्रांना ज्ञानापासून वंचित ठेवून, धर्मग्रंथावर स्वतःची मक्तेदारी निर्माण करून आपल्या वर्णवर्चस्वाला बळकटी आणली. त्यांची बुध्दी, शाब्दिक पांडित्य, धर्मचिंतन व कर्मठपणा यातच खर्च होत होती. समाजाचा विकास व जनहिताच्या इतर प्रश्नांचा त्यांनी कधी विचारच केला नाही. ब्राह्मण सोडून सर्व जातींना त्यांनी शूद्र लेखले. या जाती व वर्ण वर्चस्वाला पहिले आव्हान महात्मा जोतीराव फुलेंनी दिले.[५४] म.फुले यांचा रोख ब्राहमणावर नसून ब्राहमणशाहीवर होता. या सत्यशोधक चळवळीचा प्रभाव प्रथमपासून साताऱ्यावर दिसून येतो. दहिवडीसारख्या छोटया गावात त्यांचा अनुयायी श्री.धोंडीराम नामदेव कुंभार कार्यरत होता. धोंडीराम कुंभार म्हणजे हिंदु धर्माविरूध्द बंड करणाऱ्या गौतमबुध्दाला हिंदुंच्या दशावतारात स्थान देऊन बौध्द धर्मीयांना हिंदु समाजात सामावून घेणाऱ्या प्राचीन परंपरेचा एकोणिसाव्या शतकातील हा नवा अविष्कार होता.[५५] म.जोतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे मुक्कामी सहकाऱ्यांच्या मदतीने सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली.[५६]

भारतीय सत्यशोधक समाज–घटना, प्रकाशन: श्री.के.व्ही.विचारे महाध्यक्ष, १.संस्थेचे नाव : संस्थेचे नाव 'सत्यशोधक समाज' असे राहील. २.मध्यवर्ती कार्यालय: ३६५ डिलाईल रोड मुंबई नं. ११ ३.उद्‌देश: दैववादी व कल्पनावादी विचारसरणी समाजाच्या नाशाला कारणीभूत झालेली आहे.यासाठी

प्रयत्नवादी शास्त्रशुध्द विचारसरणीने धार्मिक गुलामगिरी नाहिशी करणे. सहकार्याने व स्वावलंबनाने समाजास अनाठायी होणारा पैशाचा, श्रमाचा आणि वेळेचा नाश थांबविण्यास लावून उच्चदर्जाची सुखे उपभोगणारी व माणूसकीने जगता येईल अशी समता, बंधूता व सहकारिता या तत्वावर आधारलेली समाजरचना करण्यास मदत करणे हे या समाजाचे ध्येय राहील. हा समाज राजकारणापासून अलिप्त राहील.[५७]

४.कार्यक्रम: समाजाचा प्रसार झपाटयानी होण्यासाठी व समाज कार्यक्षम होण्यासाठी प्रमुख असे कार्याचे चार विभाग पाडण्यात येतील.

अ) शिक्षण: ज्ञानाचा प्रसार करणे.विचार जागृती करणे.[५८]

ब) संघटना: सभासद वाढविणे. स्वयंसेवक तयार करणे. घटक समाज स्थापन करणे.

क) प्रचार: नियतकालिके पुस्तके प्रसिध्द करून समाजमताचा प्रसार करणे. सभा, कलापथके यांच्यामार्फत हे काम करवून घेणे.

**सत्यशोधक समाज मूलतत्वे:**

सत्यशोधक समाज सामान्यांच्या उध्दारासाठी जोतीराव फुले यांनी स्थापन केला. त्याची मूलतत्वे पुढीलप्रमाणे: १. ईश्वर हा एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण व सत्यरूप आहे. २.ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. परमेश्वराची भक्ती करण्यास भट अथवा दलालाची गरज नाही. ३. मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नसून तो गुणाने श्रेष्ठ ठरतो.[५९]

**सत्यशोधक समाज उद्देश :**

मूलतत्वानूसार सत्यशोधक समाज चळवळीचा उद्देश धार्मिक गुलामगिरी नष्ट करणे, जातीपातीवर आधारलेला समाज समतेच्या तत्वावर उभा करून समाजातील विषमता नष्ट करणे हा होय. महात्मा फुले या ग्रंथाचे चरित्रकार व सत्यशोधक समाजाचे आघाडीचे कार्यकर्ते पंढरीनाथ सीताराम पाटील म्हणतात. मनुष्य सत्यशोधक समाज म्हटले की गुलामगिरीचा नायनाट, शिक्षणाची चळवळ, स्त्री शिक्षण प्रसार, अस्पृश्योध्दार, आंधळया पांगळयावर भूतदया इत्यादी गोष्टींचा आपोआप बोध होतो. सत्यशोधक समाज चळवळीची हीच तत्वे आहेत.[६०]

२ एप्रिल १८८४ मध्ये छत्रपती शाहू महाराजांचे राज्यारोहण झाले. आपल्या राज्यारोहण प्रसंगी जनतेला उद्देशून त्यांनी राज्य चालविण्यासंदर्भात उद्घोषणा करताना ते म्हणाले, ''आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावेत. त्यांच्या हिताची एकसारखी अभिवृध्दी होत जावी व संस्थानाचा सर्व बाजूंनी अभ्यूदय व्हावा.अशी आमची उत्कट इच्छा आहे.[६१] कोल्हापूर हे मराठयांचे राज्य म्हणून प्रसिध्द असले तरी राज्यात धार्मिकदृष्टया ब्राह्मणांचे वर्चस्व होते. छत्रपती हा नामधारी होता. सर्व अधिकार ब्राह्मण व युरोपियन अधिकारी यांच्याच हातात होते.[६२] सातार्‍यात ब्राह्मण ब्राह्मणेत्तर भेदाच्या विषवल्लीचे पुणेरी बीज पेरले. ब्राह्मणेत्तर मंडळींनी कोल्हापूरच्या छत्रपतीला आपला राजा मानले व ते राजर्षी झाले. ब्राह्मणाविरूध्द आवाज उठविणारी सत्यशोधक चळवळ सातार्‍यात जोमाने वाढली. त्यांचे बरेचसे श्रेय गुरूवर्य केशवराव

विचारे यांना जाते.[६३]

## १.६ सातारचे बंडखोर सत्यशोधक प्रतापसिंह महाराज

इ.स. १८३९च्या दरम्यान वेदोक्त प्रकरणातून प्रतापसिंह महाराजानी समतेचा लढा देऊन सामाजिक व धार्मिक चळवळ सुरू केली. ते सनदशीर सत्यशोधकाचे उद्गाते ठरले.[६४]

राजसत्तेवर धर्मसत्तेचा जो पगडा होता तो त्यांनी झुगारून दिला. मराठी समाजाची परिषद भरवून वेदोक्त विधी करण्याचा अधिकार मराठयांना मिळावा अशी आग्रही भूमिका स्विकारली. शूद्रांनी विद्या शिकू नये हा मनुस्मृतीचा दंडक झुगारून महाराजांनी दोन मिशनरी व आबा पारसनीस यांच्या मदतीने शाळा चालविली. मुलींना शिकविले पाहिजे म्हणून मराठा समाजातील शिकलेली पहिली स्त्री म्हणून गोजराबाईचा उल्लेख करावा लागतो. केसरीकरांना छत्रपतीचे कायम वावडे होते. यापुढे ब्राहमण–मराठा यांच्यातील दरी वाढली. सत्यशोधक चळवळीचे बीजारोपण येथे झाले. १८२८ ते १९०३ सातारा, कोल्हापूर व बडोदा या तीन ठिकाणी वेदोक्त प्रकरणे झाली. ब्राह्मणांनी मराठा वर्गाचे अधिकार हिरावून घेतले. या संघर्षातून तावून सुलाखून एक विचारप्रणाली पुढे आली. तीच ही सत्यशोधक चळवळ होय.[६५] माणसे अडली नडली तर इतिहास अडतो. ही केशवराव विचारे यांची धारणा होती. प्रतापसिंह महाराजांचा आदर्श व म.फुलेंचे तत्वज्ञान समोर ठेवून त्यांनी समाजप्रबोधन व परिवर्तनास प्रारंभ केला. यातून त्यांना रा.ना.चव्हाण व जोत्याजीराव फाळके ही दोन माणसे समाजपरिवर्तनाला मिळाली.[६६]

१३ नोव्हें. १८७५ रोजी प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या आगमनाप्रित्यर्थ सातारा जिल्हयातील दहिवडीचे धोंडीराम नामदेव कुंभार व कृष्णराव भालेकर यांनी काही पदे रचून म्हटल्याचा संदर्भ सत्यशोधक समाजाला १८७३च्या हकीकतेमध्ये सापडतो. इ.स. १८८५च्या सुमारास पाचगणी, वाई, फलटण, कटगुण येथे जोतीराव फुले येऊन गेल्याचे संदर्भ मिळतात.[६७]

इ.स.१९११ ची पुणे परिषदेनंतर सातारा जिल्हयात ही चळवळ ‘सत्यसमाज’ या नावाने गाजली.[६८] सातारा जिल्हयात कामेरी, पेठ, काले, भिलवडी, सोनी, येडेमच्छिंद्र, शिवथर, चितळी, वाई, पाडळी या ठिकाणी सत्यशोधक चळवळीचे काम मोठया प्रमाणावर झाले. जनजागरण मोहिमेत केशवराव विचारेंचा मोठा सहभाग होता. दाजी पाटील, संभाजी मल्हारजी पाटील पेठ, कृष्णा रामजी पाटील, दादा बाळाजी पाटील कामेरी, रामचंद्र घाटगे, तातोबा खोत, नारायण खोत काले, आत्माराम चव्हाण सोनी, भाऊराव पाटोळे, रामचंद्र आकाराम पाटील, गोविंदराव पाटील, शामराव पाटील भिलवडी, सीताराम पाटील येडेमच्छिंद्र, तातोबा यादव कासेगाव, भाऊसाहेब पवार चितळी, कळंबे गुरूजी कराड, विठोबा थोरात कार्वे, काळू माळी बागणी, भाऊराव पाटील, ॲड.रघुनाथ राणे सातारा, शंकरराव बांगर येलूर, भाऊराव बर्गे कोरेगाव, रामराव बाबर, नारायण चव्हाण वाई, मानसिंग जगताप, केंजळ, विठोबा पाटील, विटा इ. लोकांशी सतत संपर्क ठेवून त्यांचेबरोबर चर्चा करून सत्यशोधक चळवळीचे काम गुरूजींनी केले. सातारा जिल्हयातील प्रा. शिक्षकांनी भरीव काम केले. कृष्णराव भाऊराव बाबर यांनी ब्राहमणेत्तर शिक्षक संघ स्थापन केला.कलढोणचे

अनंतराव ज्ञानोबा भोसले हे रामराव बाबर यांचे समकालीन होते. दि.१२ एप्रिल व १३ एप्रिल मध्ये झालेली कराड तालुक्यातील काले गावातील सत्यशोधक परिषद फारच गाजली. परिषदेला केशवराव बगाडे अध्यक्ष होते. भाऊराव पाटील यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले, उपेक्षित समाजातील मुलामुलींना शिक्षण देण्याकरिता शिक्षण संस्था स्थापन करणे गरजेचे आहे. तसा ठराव परिषदेत पास केला. यावेळी संस्थेच्या नावाची चर्चा झाली. 'रयत शिक्षण संस्था' असे नाव देण्याचे ठरले.[६९]

**१.७ सत्यशोधक चळवळीचा सातारा जिल्हयावर परिणाम:**

इ.स. १८७६ च्या सुमारास धामणकर नावाचे सातारा कलेक्टरांचे चिटणीस होते.त्यांची जोतीरावांची ओळख होती.पाचगणीच्या जवळ भिलार या गावी कै. गोविंदरावभिलारे नावाचे सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांनी सत्यशोधक समाजापासून स्फूर्ती घेतली व त्यांनी ब्राह्मण पुरोहिताशिवाय लग्ने लावली. जोतीराव व त्यांचा स्नेह होता.[७०] इ.स.१९११ च्या पुणे येथील परिषदेनंतर सातारा जिल्हयातील खेडोपाडी बहिष्कार टाकला गेला. जोतीराव फुले यांच्या सहवासातील कै.पांडुबा भोसले ( रा.सातारा) इ.स.१८८५ पासून साप्ताहिक ( महाराष्ट्र वृत्त)काढीत. पांडोबा भोसले हे सातारा जिल्हयातील बहुजन समाजातील पहिले पत्रकार इ.स. १९२० नंतर वाई येथे मोठी सत्यशोधक चळवळ होऊन गेली.[७१]

दि.१३ डिसेंबर १९२५ ला कै.दिनकरराव जवळकर यांचे गणपती घाट वाई येथे व्याख्यान झाले. यापूर्वी सातारच्या कर्मवीर भाऊराव पाटील यांचेही असेच एक व्याख्यान वाई घाटावर गाजले. येथील सनातन्यांचा विरोध झाला. जेव्हा सातारा येथे प्रबोधनकार ठाकरे रहात होते. तेव्हा त्यांनीदेखील रयत शिक्षण संस्थेस हातभार लावला.[७२] जेधे जवळकरांची जी चळवळ पुण्यात चालू होती तीचा परिणाम सातारा जिल्हयावर होतच होता.म.फुले ख्रिस्ताळले होते. ते ख्रिस्ती झाले होते असे म्हणण्यापर्यंत जवळकर जेधे यांच्या विरोधकांची मजल गेली. या विरोधकामध्ये कै.बाबुराव फुले जोतीरावांचे नातू देखील सहभागी होते. पुणे येथील या सत्यशोधक घटनेचा सातारा जिल्हयावर परिणाम होत होता.[७३]

रयत शिक्षण संस्था व शाहू बोर्डिंग ही चळवळीतून साकार झालेली होती. ऐतवडेकर भाऊराव यांचे चळवळीत मोठे कार्य होते. शाहू बोर्डींगमध्ये नाना जातीधर्माची, स्पृश्य अस्पृश्यांची मुले राहत होती. यात ब्राहमणदेखील होते. जातीभेद मोडणे हा चळवळीचा उद्देश होता.[७४]

**१.८ सातारा जिल्हा – सत्यशोधक चळवळी:**

सन १९२० मध्ये कै.भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली वाईमध्ये पहिली मोठी सभा रविवार पेठ चौकात झाली. वाईत सत्यशोधक समाज चळवळ स्थापन करण्यात आली. कै बाबुराव पाडळे, नारायण कृष्णाजी चव्हाण, माधवराव नलवडे, प.वा.बळवंतराव पवार, प.वा.शंकर तुकाराम भोज ही समाजजागृती करणारी तरूण कार्यकर्ती मंडळी हजर होती. यांनी 'विजयी मराठा', 'जागृती', 'जागरूक', 'राष्ट्रवीर', 'दीनमित्र', तत्सम वृत्तपत्रे लोकांनी वाचावीत म्हणून एक वाचनालय वाई येथील रविवार चौकात बिष्णुबुवा पाडळे यांच्या जागेत सुरू केले.[७५] दि.२.५.१९२३ डॉ.पटवर्धन बुवा यांच्या अध्यक्षतेखाली ब्राह्मण,

ब्राह्मणेत्तर ऐक्याबद्दल काही सूचना या विषयावर वाई वसंत व्याख्यानमालेत गणपती घाटावर एक व्याख्यान झाले. दि.३.५.१९२३ रोजी कै.वि.धो.तेली (संपादक तेली समाचार) यांच्या अध्यक्षतेखाली गणपतराव साळुंखे माजी शिक्षक द्रविड हायस्कूल वाई यांचे 'अस्पृश्योध्दाराचा ७५ वर्षाचा इतिहास' या विषयावर व्याख्यान झाले.[७६]

सन १९२४ मध्ये ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांचे अध्यक्षतेखाली भाऊराव पाटील यांचे 'अस्पृश्यता निवारण' या विषयावर व्याख्यान झाले. वाईमध्ये नारायण चव्हाण व त्यांचे साथीदार मोठया अवघड स्थितीत काम करीत होते. दि.१३.१२.१९२५ ला कै.दिनकरराव जवळकर यांचे व्याख्यान कै.बाबुराव पाडळे यांच्या अध्यक्षतेखाली गणपती घाटावर होत असताना जवळकरांना फार मोठा प्रतिविरोध झाला. नंतर चव्हाण पाडळे यांनी सातारा जिल्हा अधिवेशनाची मागणी केली.ता.६.३.२६ व ७.३.२६ या दिवशी ही महान परिषद झाली. सिध्देश्वराच्या वाळवंटावर कै.बाबुराव यादव यांची मुलुखमैदान तोफ गरजली. कै.बागडे, कै.जेधे जवळकर, कै.सोनोपंत कुलकर्णी इ. वक्त्यांची भाषणे झाली. आठ नऊ हजारापर्यंत जनसमुदाय हजर होता.[७७] १९२९ मध्ये वाई वाळवंटात सभा झाली. याप्रमाणे इस्लामपूर, वाटवे, कराड या ठिकाणी सभा झाल्या. १९२६-२७ मध्ये महाबळेश्वर येथे सभा झाली. रा.ना.चव्हाण हे त्यांच्या पिताश्रीसोबत हजर होते.[७८] बाळासाहेब देसाई यांनी १९८३मध्ये सत्यशोधक समाज चळवळीची जन्मशताब्दी साजरी केली. सत्यशोधक समाज चळवळी जागृतीचे काम शाहीर पुंडलिकराव फरांदे यांनी केले.

### १.९ सातारा जिल्हयातील ब्राहमणेत्तर चळवळ:

### पूर्वपिठीका

ब्राह्मणेत्तर चळवळीच्या माध्यमातून बहुजनाला जागृत करण्यासाठी शाहू महाराजांनी काम केले. शाहू महाराज म्हणतात, ''बहुजन समाजाचा उध्दार हे माझे पवित्र जीवनकार्य आहे. ब्राहमणेत्तर चळवळीसंदर्भात सरकार शाहू महाराजांना पदच्यूत करण्यासंदर्भात धमकी देत. त्यावर बोलताना राजर्षी शाहू महाराज म्हणाले, ''सरकारने पदच्यूत करण्यापूर्वी मीच आत्मसंतोषाने गादीचा राजीनामा देईन. पण हातात घेतलेली ब्राहमणेत्तर चळवळ प्राण जाईतोवर हा शाहू सोडणार नाही.''[७९] शेवटपर्यंत ब्राहमणेत्तरांच्या हक्कासाठी शाहू महाराजांनी अहोरात्र कार्य केले. महर्षी वि.रा.शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, रामराव देसाई, केशवराव जेधे, केशवराव मोरे, तुळशीदास जाधव, बाबुराव यादव या नेत्यांनी ब्राहमणेत्तर चळवळीचे काम केले. यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले.[८०]

### ब्राहमणेत्तर चळवळीचा उदय:

ज्यावेळी ब्रिटिशांनी भारतात करावयाच्या सुधारणांचा जाहीरनामा प्रसिध्द केला त्यावेळचे भारतमंत्री माँटेग्यू (इ.स.१९१७) यांनी मागास वर्गांना हक्क मिळावेत याकरिता महाराष्ट्र, कर्नाटक, मद्रास या प्रांतात ब्राहमणेत्तर पक्षाची निर्मिती केली. ही निर्मिती करण्यामागे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, धनजीशा कुपर, सिदद्प्पा कंबळी,

डोंगरसिंग पाटील इ.चा पुढाकार होता. ब्राहमणेत्तर पक्षाचे लक्ष सावकारशाही व भिक्षुकशाहीविरूध्द होते. कर्जबाजारी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी ब्रिटीश सरकारने ठोस उपाय योजावेत, कुळांना संरक्षण देण्यात यावे, वसुलित सवलत दयावी. शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता करावी यासाठी ब्राहमणेत्तर पक्षाने कार्य केले.[८१] सन १९२० नंतर राष्ट्रीय आंदोलनाचे नेतृत्व म.गांधीजींच्याकडे आले. महाराष्ट्रातील शेतकरी कामगार मोठया संख्येने ब्राहमणेत्तर वर्गातले असल्याने साम्राज्यशाहीच्या विरोधात म.गांधीजींच्या बाजूने होते.[८२] ब्राहमणेत्तर पक्षातील अंतर्गत मतभेदामुळे पक्ष कोलमडला. पक्षातील इंग्रजी राज्यकर्त्यांशी एकनिष्ठ असलेले भास्करराव जाधव, धनजीशा कुपर, सिददप्पा कांबळी, डोंगरसिंग पाटील यांचा गट निष्प्रभ झाला. तर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रेरणेने ब्राहमणेत्तर पक्षातील  केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी जहाल तरूण कॉंग्रेसच्या आंदोलनात सहभागी झाले. कर्मवीर विठठल रामजी शिंदे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, यांनी कायदेभंग करून तुरूंगवास भोगला. हजारो ब्राहमणेत्तरांनी लढयात त्याग केला. यामुळे महाराष्ट्रात कॉंग्रेस शक्तीशाली झाली आहे.[८३] दि.१० ऑक्टों.१९४५ रोजी सरदार पटेल म्हणाले, ''हजारो ब्राहमणेत्तरांनी लढयाच्या कामी त्याग केला असून त्यांच्या त्यागातून महाराष्ट्रातील कॉंग्रेस शक्तीशाली झाली आहे.''[८४]

सन १९३० नंतर या चळवळीचे विघटन झाले. तीन गटांनी महाराष्ट्राला मोठे योगदान दिले. चळवळीच्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचा एक गट रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नेतृत्वाखाली शिक्षणाकडे वळला. दुसरा गट केशवराव विचारे यांचे नेतृत्वाखाली सहकार चळवळीकडे वळला. तिसरा गट राजकीय क्षेत्रात कार्यरत झाला. त्याचे नेतृत्व भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे, केशवराव जेधे, क्रांतिसिंह नाना पाटील इत्यादीने केले.[८५] ब्राहमणेत्तर चळवळ ही दहाव्या शतकापासून महाराष्ट्रात सुरू झाली असे म्हणावे लागेल. नामदेव, चोखामेळा, रोहिदास, कान्होपात्रा, तुकाराम यांनी आपण हीन असल्याचा, आपल्याला वेदोधिकार नसल्याचा व मंदीर प्रवेशाचा हक्क नसल्याचा टाहो ज्या दिवशी फोडला त्याच दिवशी खऱ्या अर्थानी समाजपरिवर्तनाची म्हणजेच ब्राहमणेत्तरांची चळवळ सुरू झाली असे म्हटले पाहिजे.[८६]

इ.स.१९२१ ते १९४५ असे चोवीस वर्षे केशवराव विचारे लोकल बोर्ड सदस्य होते. इ.स.१९२३ मध्ये भास्करराव जाधव शिक्षणखात्याचे मंत्री होते. यामुळे सातारा जिल्हयात शिक्षणप्रसाराचे कार्य वेगाने झाले. रयत शिक्षण संस्था मजबूत करण्यात केशवराव विचारे यांचे काम उपयुक्त ठरले. कोरेगाव तालुक्यात फक्त तीन माध्यमिक शाळा होत्या. गुरूजींनी दहा माध्यमिक शाळा सुरू करण्यास लावल्याने प्रत्येक गावी प्राथमिक शाळा उघडल्या.[८७] केशवराव जेधे व केशवराव विचारे या दोघांनी ब्राम्हणेतर पक्षाची धोरणे व कार्यक्रम निश्चित करण्यासाठी एकत्रपणे काम केले. या पत्रातील मजकूर असा होता, ''असहकारच करायचा असेल तर तो ब्राम्हणांशी करा.'' या पत्रावर ब्राम्हणी पत्रे तुटून पडताच 'ते पत्र माझे नाही' असे छ.शाहूंनी 'जस्टिस' पत्रकर्त्यांना कळविले. या प्रकरणात 'तो मी नव्हेच' असा शाहू महाराजांनी पवित्रा घेतला.[८८]

### १.१० कामगार हितवर्धक सभा:

निपाणी परिषदेपासून सर्व महाराष्ट्रातील सत्यशोधक उत्साहाने कामाला लागले. भाऊराव पाटील त्यावेळी किर्लोस्करांच्याकडे नोकरीला होते. भाऊराव पाटील शेतकऱ्यांमध्ये नांगरांचा प्रचार करीत होते.[८९] केशवराव विचारे कार्यरत असलेल्या मराठा शिक्षण परिषदेचे दि.२८ डिसेंबर १९१७ रोजी खामगाव येथे अधिवेशन भरले. छ.शाहू महाराजांनी अध्यक्षपद स्विकारून सक्रीय सहभाग घेतला. या परिषदेच्या निमित्ताने शाहू महाराज व केशवराव विचारे यांचा दाट परिचय झाला.[९०] १९१९ मध्ये शाहू महाराजांना केशवराव ठाकरे व केशवराव विचारे हे नविन पूर्णवेळ कार्यकर्ते मिळाले. अशा रितीने सत्यशोधक चळवळ ब्राम्हणेत्तर पक्षाच्या रूपाने उत्क्रांत होऊ लागली.[९१] सातारा जिल्हयातील सत्यशोधकांनी ब्राम्हणांशी असहकार करण्याचे धोरण अवलंबिल्यामुळे ब्राम्हणेत्तर कुळे ब्राम्हण जमीन मालकाच्या जमिनी खंडाने करण्यास नकार देऊ लागली. आपल्या घरातील धार्मिक विधी, पुजा अर्चा, धर्मकृत्ये करण्यास ब्राम्हण पुरोहितांना बोलवले जात नसे. कुंभार ब्राम्हणास मडकी दयायची नाहीत. त्यांच्या घरी कोणी पाणी भरायचे नाही. न्हाव्यानी त्यांची हजामत करायची नाही. असे या असहकाराचे स्वरूप होते.[९२]

सातारा जिल्हा सत्यशोधक समाजाचे चिटणीस बाळकृष्ण नानासाहेब फाळके होते. केशवराव विचारे देखील एक पुढारी होते. सन १९२० च्या सुमारास सातारा जिल्हयात चळवळीचा जोर वाढलेला होता. भाऊराव पाटलांचा सत्यशोधकी जलसा शेकडो लोकांचा जमाव खेचित होता. इ.स.१९२१ मध्ये सत्यशोधकी जलसा झाल्यावर तेथील ब्राम्हण कुटुंबांना सतवण्याचे सत्र सुरू झाले. यावेळी भाऊराव सोमण, दादासाहेब करंदीकर, सदाशीव आळतेकर व सीताराम गोपाळ पाटील या पाच पुढाऱ्यांनी याबद्दल चौकशी केली. प्रतिष्ठित ब्राम्हणाचे घरावर दगडफेक, त्यांच्या घरातील साहित्य आडात टाकणे, घराच्या दरवाज्यासमोर गवत टाकून पेटविणे, त्यांना दमदाटी करणे, त्यांच्याकडून पैसे उकळणे इत्यादी प्रकार घडले. असे या चौकशी अहवालात म्हटले.[९३] सातारा जिल्हयातील पेठ, शिराळा पेटयातील सागाव, तासगाव तालुक्यातील सोनी या ठिकाणी ब्राह्मणांना जमिनी कसणाऱ्या वाटेकऱ्यांना बेदम मारहाण करण्याचे प्रकार घडले. सत्यशोधकी लोकांना पाठिशी घालणाऱ्या पाटण तालुक्याचे मामलेदार दुदुसकर व सातारचे जिल्हाधिकरी मॉयसी यांची बदली त्वरीत करावी अशी मागणी केसरीसारखी वृत्तपत्रे करीत होती. [९४]

### १.११ भाऊराव पाटील सत्यशोधकी जलसात:

कराड तालुक्यातील काले गावातील रामचंद्र घाडगे नामक एका गरीब गृहस्थाने इ.स.१९१५ मध्ये एक सत्यशोधक जलसा स्थापन केला. रामचंद्र घाडगे यांच्या सत्यशोधकी जलाशातील गीते, कवणे, लोकांची गर्दी खेचीत होती. या तमाशाने सातारा जिल्हयात अनेक तमाशे निर्माण झाले. इ.स.१९२५ मध्ये महाराष्ट्रातील एकोणतीस तमाशांपैकी बारा तमाशे एकटया सातारा जिल्हयात होते. या तमाशात बहुसंख्य संघटक मराठा जातीचे असले तरी न्हावी, सोनार व ब्राह्मणसुध्दा होते. सत्यशोधकी जलशात गायल्या जाणाऱ्या पदांचे व अभंगाचे फारच थोडे संग्रह उपलब्ध आहेत.[९५] परंतु जे उपलब्ध आहेत त्यातील पदांचा

मारा भटजी व शेटजी यांच्यावर होता. जलशातील पदे ब्राह्मणी मारवाडी स्त्रियांवर अभद्र टीका करणारी होती त्याचा निषेध झाला.[९६] ब्राह्मणेत्तर पक्षावर शहाण्णवकुळी देशमुखाची पाटलांची जबरदस्त पकड होती.[९७]

### १.१२ ब्राह्मणेत्तर पक्ष अन् शेतकऱ्यांचे प्रश्न:

जमिनीच्या विखंडणाबाबतचे विधेयक व सारावाढीचा प्रस्ताव इ.स. १९२८ मध्ये मुंबई सरकारने मांडला. दोन्हीही विधेयकांना संघटितपणे विरोध करण्याची आवश्यकता ब्राह्मणेत्तर पक्षातील कर्मवीर शिंदे जेधे बंधू रामराव शिंदे इ.ना जाणवू लागली म्हणून २५ जुलै १९२८ ला पुणे येथे मुंबई इलाखा परिषद घेण्याचे ठरविले. परिषेदेचे अध्यक्ष कर्मवीर शिंदे वि.रा. यांना ही दोन्ही विधेयके नापसंत होती. विधेयकांना विरोध करावा असा ठराव परिषदेने बहुमताने मंजूर केल्यास इतर सभासद विरूध्द मत नोंदवतील असे भास्कररावांनी जाहीर केले. अखेरीस ब्राह्मणेत्तर पक्ष शेतकऱ्यांशी बेईमानी करणार नाही. असे साठ हजार शेतकऱ्यांच्या सहयांचे निवेदन सादर केले. यामुळे विधेयकाचा विचार सरकारला लांबणीवर टाकावा लागला.[९८] सन १९२५/२६ चे काळात ही चळवळ पुणे सातारा भागात फार जोरात होती. ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर ऐक्य व्हावे म्हणून प्रयत्न झाले. महर्षी वि.रा.शिंदे यांचे अध्यक्षतेखाली सामाजिक परिषद भरविण्यात आली. साताराची सभा आटोपून दुसऱ्या दिवशी वाईतील गणपती घाटावर त्यांचे जाहीर व्याख्यान झाले. स्थुलमानाने येथे सातारा सत्यशोधक व ब्राह्मणेत्तर चळवळीचा इतिहास नमुद केला आहे.

### १.१३ सातारा जिल्हा – स्वातंत्र्यलढा :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास अतिशय रोमहर्षक असा आहे. इ.स.१८५७ च्या सशस्त्र उठावाला अपयश आले. त्यानंतर सनदशीर मार्गाने स्वातंत्र्याकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न इ.स.१८८५ साली काँग्रेसच्या स्थापनेपासून सुरू झाला. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली भारतीय जनतेने वंगभंग आंदोलन, होमरूल चळवळ, असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग, सत्याग्रह इ. आधारे ब्रिटिशांच्या विरूध्द सतत लढा दिला. भारतीय स्वातंत्र्य लढयाचा शेवटचा टप्पा म्हणून १९४२ च्या चलेजाव आंदोलनाकडे पाहिले जाते.[९९] ८ ऑगस्ट १९४२ रोजी इंग्रजांना शेवटची सूचना देणारा 'चलेजाव' चा ठराव पं.नेहरूंनी मांडला व वल्लभभाई पटेल यांनी अनुमोदन दिले.[१००] ठराव प्रचंड टाळयांच्या गजरात संमत झाला. यावेळी गांधीजी म्हणाले की, ''आपण भारताला स्वतंत्र तरी करूया किंवा हे प्रयत्न करीत असताना मरून तरी जावूया.''[१०१] देशभर असंतोष पसरला सातारा, कराड, सांगली, मिरज येथे सुध्दा प्रभातफेऱ्या, जाळपोळ, अटक सत्र झाले. कराडमध्ये विद्यार्थ्यांना अटक झाली. मिरजमध्ये हायस्कूल बंद ठेवली.[१०२] दे.भ.महादेवभाई देसाई गांधीचे पट्टशिष्य यांचे पुणे येथे बंदिवासात हृदयक्रिया बंद पडून देहावसन झाले. दि.१५.–८.–४२ यांचे निधनाबद्दल दुखवटा पाळण्यात आला.[१०३] गांधीजींचा संदेश शिरोधार्य मानून अनेकजणांनी इंग्रजांच्या विरूध्द शेवटच्या लढाईचा निर्धार केला. ब्रिटीश सरकारने ९ ऑगस्ट १९४२ च्या पहाटे पाच वाजल्यापासून मुंबईतील काँग्रेस पुढाऱ्यांची सार्वत्रिक धरपकड सुरू केली. सुमारे दोन तासात म.गांधीजी व काँग्रेस वर्किंग कमिटीचे कित्येक सभासद व मुंबईतील स्थानिक सभासद यांना अटक करण्यात आली. मौलाना अबुल

कलाम आझाद, पंडित नेहरू, सरोजीनी नायडू, शंकरराव देव, पट्टभिसितारामय्या, अशोक मेहता, युसूफ मेहरअली इत्यादी नेत्यांना पकडण्यात आले.[१०४] देशभर लोकांनी मिरवणूका काढून सरकार विरोधात तीव्र प्रतिक्रिया नोंदविल्या.

### १.१४ सातारची लोक चळवळ:

म.गांधीजींच्यावर व त्यांच्या विचारावर लोक खूप प्रेम करीत होते. गांधीजी कधी चुकणार नाहीत असा सातारकरांना विश्वास होता. साताऱ्यातील लोकआंदोलनाचे लोकचळवळीत रूपांतर होऊन पोलीसांनी केलेल्या धरपकडीने त्यांची तळपायाची आग मस्तकाला भिडली. बंदहकूम मोडून उत्स्फूर्तपणे त्यांनी हरताळ पाळले. प्रभात व सायंफेऱ्या काढल्या. जाहीर सभा घेतल्या. रेल्वेलाईन, टेलिफोन, पोस्टसेवा, सरकारी इमारती यांना घातपात केले. लोकांचा उत्स्फुर्त उद्रेक गावागावातून दिसला. गांधीजींचा संदेश गावोगावी, खेडोपाडी पोहोचविला. गावागावातून फेऱ्या काढल्या, कॉंग्रेसची गाणी म्हणून, पोवाडयाचे कार्यक्रम करून, किर्तने व भजने इ. कार्यक्रम करून जनजागृती करण्यात आली.[१०५] सरकारची दडपशाही असून सुध्दा लोकचळवळीला लोकपाठिंबा टिकून राहिला. कॉंग्रेसने संकल्प करून लढा चालू ठेवला गांधीजी म्हणाले, हा माझा अखेरचा लढा आहे.[१०६]

प्रत्येक गाव चळवळीचा किल्ला बनला. प्रत्येक व्यक्ती स्वातंत्र्य सैनिक बनली.[१०७] म.गांधीजींच्या तब्बेतीबद्दल अधिकृत पत्रक मुंबई सरकारने प्रसिध्द करावे अशी सूवना मर्चटस चेंबरर्सनी केली. सूचनेप्रमाणे गांधीजींची तब्बेत उत्तम आहे असे वृत्त देण्यात आले.[१०८]

चळवळीला पाठिंबा देऊन राजमती पाटील, लिला पाटील, इंदू पाटणकर यांनी भूमिगत चळवळीत स्वत:ला झोकून दिले. स्वातंत्र्य सैनिक भूमिगत राहिले ते या स्त्रियांच्यामुळे. या माऊलीनी नेत्यांना, भूमिगतांना वेळी अवेळी जेवण दिले, आसरा दिला. पोलिसांनी अतोनात छळ केला तरी त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांचा कधीच विश्वासघात केला नाही. घरात आसरा दिलेले स्वातंत्र्यसैनिक हे आमच्या कुटुंबातील आहेत हे त्या माऊलीनी पोलिसांना ठासून सांगितले.[१०९] स्वातंत्र्यवीर सावरकरानी कॉंग्रेसला सूचना केली, ''हिंदूस्थानच्या अखंडत्वाचे वचन दया. देशाच्या रक्षणासाठी आम्ही बांधले गेलो आहोत.''[११०] लो.टिळकांच्या व स्वा.सावरकरांच्या अभिनव भारताचे अनुयायी सातारमध्ये होते. सन १९०० मध्ये हिंदी राष्ट्रीय प्रांतिक सभेची परिषद सातारला झाली होती.[१११] सातारच्या न्यू इंग्लिश स्कूलचे शिक्षक दामोदर बळवंत भिडे यांचा संबंध अमेरिकेतील गदर पक्षाशी होता. डॉ. वा.वि.आठवले, महादेव हिंगे, निळूभाऊ घाणेकर, सहस्त्रबुध्दे ही सातारची मंडळी लढयात अग्रणी होती.[११२]

### १.१५ निधर्मी चळवळ:

सातारा जिल्हयातील चळवळ निधर्मी होती. राजकीय चळवळीचे संदर्भात चळवळीने स्वत:चे असे वेगळे स्थान निर्माण केले होते. जिल्हयातील कम्युनिस्ट व रॉयवादी चळवळीत सहभागी झाले. ब्रिटीश एक माणूस मानून साताऱ्याने ब्रिटीशांविरूध्द बंड केले. सर्व जातीधर्माच्या, पंथाच्या लोकांना चळवळीत खेचून

आणले. कासेगावकर वैदय, ब्राम्हण, किसनवीर शिंपी यांनी प्रतिसरकारचे डिटेक्टर म्हणून काम केले. तात्या बोराटे माळी सातारचे सुपरवायझर म्हणून कार्यरत होते. बाबू जंगम लिंगायत, बापू कचरे माळी यांनी गट नायक म्हणून काम पाहिले. काशिनाथ देशमुख वाणी, गौरीहर सिंहासने व धोंडीराम माळी लिंगायत, बर्डे मास्तर, अनंत केशव बर्डे व नेमिनाथ कत्ते जैन, रामचंद्र महादेव जोशी, बाबुराव चरणकर, गजानन पानसे ब्राम्हण, चाँद पटवेगार मुसलमान इत्यादी सातारा जिल्हयातील ठळक स्वातंत्र्य सैनिक होते. व्यक्तीच्या जात, धर्म, पंथावर चळवळीत स्थान नव्हते तर व्यक्तीच्या गुणवत्तेवर, त्याच्या कामावर होते.[११३] ९ ऑगस्ट १९४२ रोजी नाना पाटील यांनी विटे येथे गांधी चौकात सभा घेतली व इंग्रजांविरूध्द लढयाचे रणशिंग फुंकले. कार्यकर्ते नाना पाटील यांना भेटावयाला आले. आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी कुंडलला जिल्हयातील कार्यकर्त्यांची एक बैठक बोलविली. आंदोलन व्यापक करण्यासाठी लढयाची दिशा ठरविली. यात लढयाची जबाबदारी नाना पाटील यांच्यावर सोपविल्याने ते लढयाचे सेनापती झाले.[११४]

### १.१६ सातारचे भूमिगत आंदोलन – गनिमी युध्दः

सातारचे भूमिगत युध्द हे गनिमी युध्द होते. याचा प्रारंभ क्रांतिबरोबर म्हणजे ९ ऑगस्ट १९४२ रोजी झाला. १३ ऑगस्ट १९४६ रोजी ते थांबविण्यात आले. गांधीजींना पकडल्याने प्रक्षोभ झाला. त्याचे रूपांतर गनिमी युध्दात झाले. स्वातंत्र्य मिळविण्याचे उद्देशाने लोक प्रेरित झाले होते. त्यांनी गनिमी युध्दाला पाठिंबा दिला. लोकांनी बंडखोरांना जेवण दिले, आसरा दिला, गोपनीय माहिती पुरविली.[११५] चलेजाव चळवळीच्या पार्श्वभूमीवर कराड नगरपालिकेच्या हद्दीत कोणीही काठया व शस्त्रे घेऊन हिंडू नये किंवा ५ पेक्षा अधिक माणसांनी जमावानी फिरू नये असा हुकूम निघाला, हुकूमाचे उल्लंघन केल्यावद्दल ५ मुसलमानांवर खटला भरला. हा पहिलाच गुन्हा आहे म्हणून न्यायाधीशांनी कैद केले व ताकीद देऊन सोडून दिले.[११६] खटाव तालुक्यातील कार्यकर्ते दोशी व जोशी यांनी भाषण बंदीचा हुकूम मोडला म्हणून त्यांना ५० रू.दंड व १ महिना कैद अशी शिक्षा झाली.[११७] संपूर्ण देशात इंग्रज सरकारनी दडपशाहीने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. गोळीबार करून दहशत बसविली. याचा निषेध करण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मामलेदार कचेरीवर शांततामय आणि हिंसात्मक मोर्चे काढून तिरंगा झेंडा फडकविण्याचा निर्णय घेतला. कलेक्टर कचेरी हे अखेरचे लक्ष्य होते.[११८] कराड तालुक्यातील उंडाळे गावी दि.१४ रोजी खेडूतांनी मिरवणूक काढली. कराडहून पोलिस आले लाठीहल्ला करून जमाव पांगवला ११ लोकांना अटक केली.[११९]

### १.१७ कराडचा मोर्चा:

२४ ऑगस्ट १९४२ रोजी मोर्चाचे संपूर्ण नियोजन यशवंतराव चव्हाणांनी केले. मोर्चाचे दोन गट होते.१. बाळकृष्ण अनंत पाटील तथा दादासाहेब उंडाळकर यांच्या नेतृत्वाखालील व दुसरा गट दिनकरराव निकम व भिकुनाना साळुंखे (किवळकर) यांच्या नेतृत्वाखालील. ठरल्याप्रमाणे दादासाहेव उंडाळकर हे उंडाळे, काले, तांबवे, चरेगाव, इंदोली व शिरगाव इ. गावातील हजारो कार्यकर्त्यासह मिरवणुकीने कचेरीकडे आले. त्याचवेळी दुसरा गट श्री.दिनकरराव निकम व भिकुनाना किवळकर यांच्या नेतृत्वाखाली किवळ,

मसूर, शिरवडे, कार्वे, शेरे, दुशेरे, व कराड इ. गावातून हजारो कार्यकर्त्यांसह कराड सब जज्ञ कोर्टाचे आवारात दाखल झाला व ११ वाजता कोर्टाचे कामकाज बंद पाडून ते पहिल्या गटाला येऊन मिळाले. पोलिसांनी त्यांना कंपाऊंड बाहेरच अडविले. दादासाहेब उंडाळकरांनी तेथे भाषण केले. मोर्चाचा उद्‌देश पोलिसांना समजला. त्यांनी दादासाहेबांना अटक केली.[१२०]

**१.१८ पाटणचा मोर्चा:**

कराडच्या मोर्चाप्रमाणे पाटणच्या मोर्चाचे नियोजन यशवंतरावजींनी केले. २४ ऑगस्टचा मोर्चा झाला मोर्चाचे नेतृत्व विठोबा तुकाराम घाडगे उर्फ बुवा म्हावशीकरनी किसन करकरे, गोविंदराव सांगवडकर, शंकर पाटील, गणपा गुरव, श्रीपती नांगरे, हरीभाऊ घोडे, गोविंद ज्ञानोजी साळुंखे उर्फ बापूजी साळुंखे, बाळू चव्हाण इ. मंडळींच्या सहकार्याने हा मोर्चा आयोजित केला. ठरलेल्या वेळी म्हावशी, अढूळ, येरफडे, डेरवण, नानेगाव, सांगवड, सुरूल, बहुले, कुंभारगााव गावातून प्रचार दौरे काढून लोकांना मोर्चात सहभागी होण्यासाठी आवाहन केले.[१२१] २४ ऑगस्टला दुपारी १२ वाजता दोन हजार लोक केरा नदीवरील पुलाजवळ एकत्र जमले. मोर्चा घोषणा देत दुपारी ३.३० वाजता मामलेदार कचेरीच्या गेटजवळ आला. 'आम्ही कचेरीवर झेंडा फडकविण्यासाठी आलो आहोत' असे बुवा म्हावशीकरांनी फौजदाराला सांगितले. परंतु फौजदाराने विरोध केला. मोर्चेवाल्यांना परत जाण्यास सांगितले. मोर्चा विसर्जीत करून सर्वजण घरी परतले. पाटण कचेरीवरील मोर्चा कराड मोर्चाप्रमाणे बराच यशस्वी झाला.[१२२]

**१.१९ तासगावचा मोर्चा:**

तासगाव कचेरीवर मोर्चा नेण्याचे नियोजन नाना पाटील यांनी केले. त्यांनी कृष्णराव कुऱ्हाडे, धुळाप्पा नवले, डॉ.वाय.के.सोहनी, नाथाजी लाड, दत्तोबा सुर्यवंशी, पांडू मास्तर, गोविंदराव खोत, वि.स.पागे इत्यादीनी आजूबाजूच्या खेडेगावात मोठा प्रचार केला व लोकांना मोर्चासाठी तयार केले.[१२३] मोर्चा २ सप्टें.१९४२ रोजी सकाळी ११ वाजता बुर्ली, पलूस, अंकलखोप, निमनी, अमनापूर, येळावी, कुंडल, किर्लोस्करवाडी, दुधोंडी, बहे, चिखलगोठण, निंबळक, ताकारी इत्यादी गावातून हजारो कार्यकर्ते येरळा नदीकाठी जमले. जमावाजवळ काठया, कुऱ्हाडी, भाले, तलवारी इत्यादी शस्त्रे होती. वसंतरावदादा पाटील हे सुध्दा त्यांच्या कार्यकर्त्यासह त्यात सामील झाले. मोर्चात किर्लोस्कर इंजिनिअरिंगचे कामगार होते. मोर्चात अनुचित घटना घडल्यास कोणाला इजा झाली तर उपचारासाठी पलूसचे डॉ.साळुंखे, भिलवडीचे डॉ.गोसावी, किर्लोस्करवाडीचे डॉ.दिवाण मोर्चात होते. मोर्चात नाना पाटील यांची सुरक्षा महत्वाची. त्यांची अटक टाळण्यासाठी निवडक सशस्त्र कार्यकर्त्यासह तेथेच त्यांनी थांबून मोर्चाचे नेतृत्व करावे असे सर्वानुमते ठरले.[१२४]

कृष्णराव कुऱ्हाडे यांचे नेतृत्वाखाली मोर्चा स्वातंत्र्याची गाणी व सरकारविरोधी घोषणा देत येरळा नदीपासून पूर्व बाजूस मामलेदार कचेरीकडे सरकू लागला. सब जज्ञ पाटील यांनी न्यायालय बंद ठेवून तिरंगी झेंडयाचा मान राखावा अशी लोकांना विनंती केली. श्री पाटील सब जज्ञ यांनी ही विनंती मान्य केली. त्यांचे

हस्ते तिरंगी झेंडावंदनाचा कार्यक्रम पार पडला. नंतर मोर्चा मामलेदार कचेरीकडे पुढे सरकला.[१२५] सब जज्ञ पाटील यांनी तहसीलदारांना चिठ्ठी पाठविली. मामलेदाराने कचेरीचे गेट कुलूप लावून बंद केले. वातावरण तंग झाले. मोर्चातील लोक जोरात घोषणा देऊ लागले. एकूण परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये व मालमत्तेला धोका पोहोचू नये म्हणून मामलेदारांनी हेका सोडला व गेट उघडण्यात आले. यानंतर मोर्चा आत आला. मामलेदाराला गांधी टोपी घालून त्यांचे हस्ते ध्वज फडकाविला. कार्यक्रमाची सांगता वंन्दे मातरम म्हणून करण्यात आली.[१२६]

**१.२० विटयाचा मोर्चा** :

नाना पाटील, भगवानराव मोरे पाटील, आप्पासाहेब लाड, गोविंदराव मिरगे, नाथाजी लाड, महादेव मिरगे, मारूती साळुंखे इ.नी विटा कचेरीवर मोर्चा काढावा असा विचार केला. ४ सप्टें. रोजी विटे शहरातून मिरवणूक काढली. मोर्चात लोकांना सहभागी होण्याचे आवाहन केले. मोर्चाची तारीख मोर्चातील लोकांनी सांगितली नाही. पोलिसांना बातमी लागताच डी.एस.पी.नी ६ सप्टें. रोजी हत्यारबंद पोलिस पार्टीसह विटयात धाव घेतली. नाना पाटील यांची सभा चिंचणी पारे येथे असल्याचे समजले. पोलिस तिकडे गेले. नानाची सभा चालू होती. पोलिसांनी नानाला पकडण्यासाठी परिसराला वेढा दिला. नाना अंधाराचा फायदा घेऊन आपल्या सहकार्यासह होनाई डोंगराच्या आश्रयाला पळाले.[१२७] विटयाचा मोर्चा पुढे झालाच नाही.

**१.२१ वडूजचा मोर्चा** :

खटाव तालुक्यातील वडूज गावातील लोकांनी ९ रोजी वडूज कचेरीवर मोर्चा नेला. पोलिसांनी जमावावर गोळीबार केला.[१२८] तासगाव मोर्चा यशस्वी झाला म्हणून संपूर्ण जिल्हयातील जनतेत उत्साह भरला होता. गौरीहर सिंहासने, माणिकचंद दोशी, बापू कचरे, रामभाऊ नलावडे, बंडोपंत लोमटे इ.कार्यकर्त्यांनी यशवंतराव चव्हाणांच्या मार्गदर्शनाखाली वडूज मोर्चाचे नियोजन केले. या मोर्चाचे नेतृत्व पहिलवान परशुराम घार्गे यांच्याकडे होते. जयरामस्वामीच्या वडगावच्या बंडोपंत लोमटे यांनी मामलेदार जी.व्ही.अंकली व फौजदार के.बी.बोंडिगिरी यांची भेट घेऊन ९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या वडूज मोर्चाची वेळ व तारीख सत्याग्रहाप्रमाणे आगावू कळविली.[१२९] परशुराम घार्गे विनम्रपणे मामलेदारांना म्हणाले, ''कचेरीवर झेंडा लावायची आमची इच्छा आहे'' मामलेदाराने त्यास विरोध केला. तरीही मोर्चेवाले पुढे येत राहिले. 'परत फिरा, परत फिरा' पी.एस.आय.ओरडले.'नाही' मोर्चेवाल्यांनी उत्तर दिले. पोलिसांनी गोळीबार सुरू केला. पी.एस.आय.नी नऊ गोळ्या झाडल्या. दोन गोळ्या छातीतून आरपार गेल्या. देह जमीनीवर कोसळला. आश्चर्य म्हणजे अशा स्थितीत त्यांच्या उजव्या हातात तिरंगी ध्वज तसाच फडकत होता.[१३०]

**१.२२ इस्लामपूर मोर्चा** :

इस्लामपूर कचेरीवर मोर्चा १० सप्टें. रोजी होणार होता. याचे नियोजन नाना पाटील यांनी केले. मोर्चाची बातमी डी.एस.पी.ना मिळाली. ते स्वतः इस्लामपूरला दाखल झाले.नियोजनाप्रमाणे किर्लोस्करवाडी, बुर्ली, अमनापूर, खेड, पुणंदी इ.गावातील कार्यकर्त्यासह नाना पाटील, गोविंदराव खोत इस्लामपूरजवळ

आले. अकस्मात अटक टाळण्यासाठी नानांना मोर्चातून वगळण्यात आले. दुसऱ्या बाजूने पांडू मास्तर, के.डी.पाटील, दत्तू पाटील, चंद्रोजी पाटील यांच्या नेतृत्वाखालील दुसरा गट इस्लामपूरात दाखल झाला. बाजारचा दिवस गुरूवार त्यामुळे इस्लामपूरला खूप गर्दी होती.[१३१] सर्व जमाव एकत्रितपणे कचेरीवर चालून आला नाही. पांडू मास्तरांना अटक झाली. कोणतीही सूचना न देता लाठीमार सुरू झाला. इंजिनिअर उमा शंकर पांडे म्हणाले आम्हाला 'स्वराज्य' पाहिजे. डी.एस.पीं.चा ताबा सुटला. क्षणार्धात गोळी झाडून त्यांनी उमा शंकर पांडे यांना ठार केले. पोलिसांनी मोर्चा उधळून लावला.[१३२]

**१.२३ सातारची प्रतिसरकार चळवळ :**

प्रतिसरकार ही चळवळ कोण्या एका व्यक्तीची किंवा व्यक्तिसमूहाची कल्पना नव्हती.प्रतिसरकार चळवळ हा एक परिस्थितीचा परिपाक होता. प्रतिसरकार केवळ घडले ते स्वातंत्र्यआंदोलन पुढे चालू ठेवण्याच्या प्रयत्नातून. प्रतिसरकारच्या स्थापनेची प्रक्रिया ९ ऑगस्ट १९४२ रोजी सुरू झाली. १ जून १९४३ रोजी कामेरी येथे झालेल्या बैठकीत प्रतिसरकारचा औपचारिक प्रारंभ झाला. फेब्रुवारी १९४५ मध्ये प्रतिसरकारला आधुनिक शासनाची सर्व वैशिष्टये प्राप्त झाली. कॉग्रेस मंत्रीमंडळ सत्तेवर आल्यावर काही आठवडयानंतर म्हणजे १३ जून १९४६ रोजी भूमिगत आंदोलन अधिकृत बंद करण्यात आले.[१३३] म्हणजे ९ ऑगस्ट १९४२ ला स्थापनेच्या प्रक्रियेपासून ते १३ जून १९४६ अखेर या प्रतिसरकारचा कालखंड होय. सातारा जिल्हयातील चलेजाव चळवळीचे नेतृत्व यशवंतराव चव्हाणांनी केले. यशवंतराव  व त्यांचे सहकारी यांनी आंदोलनाला वळोवेळी योग्य दिशा दिली. लोकांनी त्यास उदंड प्रतिसाद दिला. प्रतिसरकारचा जन्म शिराळा पेटयात झाला.[१३४] मौजे सवादे येथील बऱ्याच लोकांना अटक झाली. सातारा जिल्हयातील जानुगडेवाडी, येळगाव, कराड येथील काळुगडे, शेवाळे शि.रा.पवार, श.पा.मदने यांना अटक झाली.

प्रतिसरकार हे एक सामुहिक संघटनेचे सामुहिक नाव होते. ब्रिटीशांना भारत सोडावयास लावणे, लोकांच्या हिताचे संवर्धन करणे हे प्रतिसरकार संघटनेचे हेतू होते. ब्रिटीश सरकारने जेव्हा आंदोलन दडपून टाकण्यास सुरूवात केली. प्रतिसरकारने स्वतःचे खडे सैन्य तयार केले.[१३५] वखार भाग सांगलीतील क्रांतीकारकांनी पोलिस चौकी जाळण्याचा प्रयत्न केला. टेलिफोन तारा तोडण्याचा प्रयत्न झाला. गावात भिंतीपत्रके लावलेली दिसत होती.[१३६] सातारमध्ये सोमण यांना अटक झाली म्हणून विद्यार्थ्यांनी दगडफेक केली.[१३७]

**१.२४ समाजव्यवस्थेला प्रतिसरकारमुळे वळण लागले:**

क्रांतिसिंह  नागनाथआण्णा हे जहाल क्रांतिकारक होते. वाळवा परिसरात 'आझाद हिंद सेनेच्या' स्थापनेचे स्वप्न त्यांनी पाहिले. त्यांनी पंजाबमधील नानकसिंग व मनसासिंग या आझाद हिंदमधील दोन सैनिकांना वाळवा येथे आणले.क्रांतिसिंह नागनाथआण्णानी आझाद हिंद सेनेची शाखा स्थापन केली. प्रतिसरकारमध्ये काम करताना ते नेहमी दक्षता घेत.[१३८]

प्रतिसरकार खेडोपाडी पोहोचले. प्रतिसरकारच्या निर्मितीने समाजाला चांगले वळण लागले. दरोडे,

चोऱ्या थांबल्या. दारूचे गुत्ये बंद झाले. हातभट्टया बंद झाल्या. शिक्षणाच्या सोयीमुळे शिक्षणाचे प्रमाण वाढले. बिळाशी गटाचे गणपतराव पाटील, बाबुराव चरणकर, शेख काका, दत्ता लोहार, दत्तू सोनार, अंतूकाका, बापू भाऊ मुलाणी, बर्डे काका, अहमद मुलाणी, भाऊसाहेब भोसले, तुकाराम सितारामेकर हा गट फारच कौशल्यवान होता. गावोगावी त्यांची चांगली जरब होती. ब्रिटीशांचे अटक सत्र चालूच होते. कराड तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष दि.ना.निकम यांना अटक करून सातारला नेण्यात आले.[१३९] सातारा सरकारी हायस्कूल जुन्या राजवाडयाला आग लागली. कोरेगाव रा.म.देवरे वकिलांना अटक झाली.[१४०] कुंडल ग्रुप हा क्रांतिसिंह नाना पाटील यांचा ग्रुप होता. यात जी.डी.बापू, आप्पासाहेब लाड, श्याम लाड, कृष्णासाहेब कुऱ्हाडे, रामभाऊ पवार, तांबटकाका, शाहीर कदम, बाबुराव लाड, किर्लोस्करवाडीचा तरूणवर्ग, कुंडल गावातील घराघरातील लहानथोर मंडळी चळवळीत होती. स्वातंत्र्याच्या चळवळीत ही मंडळी कार्यरत होती. प्रतिसरकार शेतकऱ्यांना सावकारी पाशातून सोडवत होते. 'झटपट दावा, पटपट न्याय' यामुळे सामान्य जनता खुशीत होती.[१४१]

### १.२५ महिलांचे योगदान:

भारतीय स्वातंत्र्ययुध्दात सातारच्या दोन जहाल महिलांचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो. यापैकी ऐतवडयाच्या राजमतीताई पाटील व धुळे जिल्हयातील लीला पाटील, जिल्हयातील अनेक महिलांनी झेंडा सत्याग्रह व स्वातंत्र्य आंदोलनात मोठया प्रमाणावर भाग घेतला.सरस्वतीबाई कुलकर्णी, गीताबाई खरे, ताराबाई ज्ञानू गुरव, हिराबाई जोशी, इंदिराबाई देशपांडे, हौसाबाई मोरे, शांताबाई गणेश देशपांडे, येसूबाई बन्याबापू देशपांडे, सिंधू नलवडे, सोनूताई अच्यूत देशपांडे, मुक्ताबाई नाटकर, इंदूमती पाटणकर, गंगूताई गणपतराव पाटील, गीता पांडुरंग पाटील, धोंडूबाई मस्कर, सीताबाई माळी, कमलाबाई रामकृष्ण मोरे, मैनाताई यमगर, इंदूबाई श्रीपाद वाळवेकर, रतनबाई शहा, सीताबाई शिराळकर, राजूताई बळवंत बिरनाळे, लक्ष्मीबाई नायकवडी, अनुसया मालवणकर, ताई खाडीलकर, शकुंतला कुलकर्णी, आण्णासाहेब पाटील यांची बहिण व दत्तक आई इत्यादी महिलांचे स्वातंत्र्युध्दात मोलाचे योगदान होते.[१४२]

### १.२६ रयत शिक्षण संस्थेचे मोलाचे सहकार्य:

कर्मवीर भाऊराव पाटील, रयत शिक्षण संस्थेचे शिक्षक सेवक वर्ग यांचे १९४२चे स्वातंत्र्यलढयात चांगलेच सहकार्य झाले. क्रांतिवीर नागनाथ आण्णा सातारा जेल फोडून दि.१९ सप्टें.१९४४ रोजी पहाटे बाहेर पडले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी एका शिक्षकास जोडून त्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविले.[१४३] गावोगावी कर्मवीर अण्णांच्या शाळा होत्या. शाळा मास्तर वाटाडे होते. एका शाळेतील वाटाडया शिक्षकांनी पुढच्या शाळेच्या शिक्षक वाडयाला जोडून देऊन मोठे सहकार्य केले. प्रवास करीत क्रांतिवीर नागनाथ व कासेगावकर वैद्य कराड तालुक्यातील इंदोली गावात आले.[१४४]

सातारचे भाऊसाहेब सोमण, आचार्य काका कालेलकर, दत्तात्रय कृष्णा गोसावी, शंकर विष्णू भिडे, लक्ष्मीनारायण जाजू, शिवराम मोडक, कराडचे गणपतराव सखाराम आळतेकर, वामन फडके, बाळकृष्ण

वामन धोपटे, पांडुरंग गणेश भाटे, व्यंकटराव पिराजी पवार, वाईचे शिवराम गोविंद भावे, श्रीराम विठ्ठल वैंशपायन, रामचंद्र नरहर अभ्यंकर, तासगावचे विठ्ठल सखाराम पागे, कलेढोणचे बॅ.बाबासाहेब भोसले या वकिलांनी इ.स.१९२० ते १९४० या कालखंडात लढयात उत्तम सहकार्य करून लढयाचा पाया मजबूत केला.[१४५]

**१.२७ ब्रिटीश पोलीस, दरोडेखोर व भूमिगत :**

सातारा जिल्हयाचा पश्चिम भाग म्हणजे वाळवा, शिराळा, कराड व पाटण हे चार तालुके. या ठिकाणी दरोडेखोरांच्या टोळया मुक्तपणे संचार करीत होत्या. दरोडेखोर सावळया धनगर, तांदुळवाडी, सखाराम बारबट्टे, भिवा कांदेकर व ज्ञानू कुंभार, कामेरी, तुका कांदेकर, राम सपाटे, कांदे, सर्जा धनगर, खुपिरे, महादू रामोशी, पेठ, मारूती रामोशी, शेणे, बळी सुरूडकर व गंग्या लाटवडे, चंदू खुजगावकर व विठ्ठल दळवी, मालेवाडी, हुसेन नायकवडी, चरण, काल्या सोंडूलकर, केदारवाडी, अशा दरोडेखोरांच्या टोळया होत्या.[१४६] सातारच्या पूर्व भागात लुटारू टोळया होत्या. भूमिगतांनी ८ दिवसात दरोडेखोरांना शोधून काढले व त्यांना चोपमार दिला व मुददेमाल हस्तगत केला. भूमिगतांचा प्रवास काले भागातून विंग खिंडीतून चालला होता. त्यावेळी नांदगावच्या ओढयावर दरोडेखोर व भूमिगतांचा सामना झाला. दरोडेखोरांनी गोळीबार केला. तेव्हा भूमिगतांनी प्रतिहल्ला केला. रागरंग बघून दरोडेखोर पळाले. तेव्हा भूमिगतांना घटनास्थळी ३०३ रायफलच्या काडतुसांची टोपणे सापडली. यावरून दरोडेखोर व पोलिसांचे संगनमत होते हे स्पष्ट होते.[१४७]

**१.२८ भूमिगतांचे पहिले डिक्टेटर : यशवंतरावजी चव्हाण**

ता.५ नोव्हें.१९४२ रोजी रात्री एक वाजता कुंभारगाव ता. तासगाव येथील आप्पासाहेव लाड यांच्या जोंधळयाच्या शेतातील खोपीमध्ये श्री. यशवंतरावजी चव्हाण नाना पाटलांना भेटायला आले. नाना पाटील व यशवंतराव चव्हाण परस्परांचे चांगले अभिमानी होते. यशवंतरावांचे तरूण व उमदे तडफदार नेतृत्व पाहून नाना पाटलांना यशवंतरावांचा अभिमान वाटे. यशवंतराव चव्हाण, आत्माराम पाटील (बापू) बोरगावकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे तिघे श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या तत्वज्ञानाने भारावलेले होते. यशवंतराव तरूणांच्यात स्फूर्ती व प्रेरणा देण्याचे काम करीत असत.[१४८]

**१.२९ प्रतिसरकारचे जनता न्यायालय:**

कुंडल प्रतिसरकारची राजधानी. कुंडलला युध्दशाळा होती. 'तुफानसेना' हे प्रतिसरकारचे लष्कर. गावोगावची काळी यादी वाचून गुन्हेगारांना शासन केले जात होते. त्याचे आरोप त्याला वाचून दाखविले जात. त्याला त्याचा गुन्हा कबूल आहे का हे विचारले जाई. जनता कोर्टात जनतेच्यासमोर न्यायदानाचे काम चालत होते. स्त्री अब्रू, जमीनी बळकावल्या असेल तर त्याची अगोदर शहानिशा केली जाई. बाई पळविल्याची मांजर्डे गावची घटना उदाहरणादाखल सांगितली जाते. मांजर्डेचा वतनदार कुलकर्णी उन्मत्त होता. शेतावर एक गरीब मजूर व त्याची बायको काम करीत. बायको दिसायला सुंदर होती. कुलकर्णी यांनी त्या मजूराच्या बायकोला पळवून वाडयावर नेले. मजूर रडत रडत भूमिगतांच्याकडे आला. तुफान दलाचे

शंभर सैनिक वाडयासमोर आले. कुलकर्णी वतनदाराचा दरवाजा मोडला. हात जोडून कुलकर्णी उभा राहिला.[१४९] तुफान दलाचे सैनिक कुलकर्ण्याच्या घरात शिरले. शेतमजूराच्या पत्नीला बाहेर काढून त्यांनी तिला न्याय मिळवून दिला. प्रतिसरकारचे जनता कोर्ट होते. न्यायनिवाडयाचे काम सामान्यत: जी.डी.लाड बापूंच्याकडे होते.[१५०]

**१.३० सातारा ग्रामराज्य:**

१९४२च्या लढयात जे वडूज, तासगाव, इस्लामपूरला झाले तेच सगळीकडे देशात झाले. ऑगस्ट क्रांती दडपण्याचा सरकारचा तीव्र स्वरूपाचा प्रयत्न होता. परंतु सातारच्या प्रतिसरकारचे सैनिक खचून गेले नाहीत. उलट कार्यकर्त्यांच्या निश्चयाला यामुळे अधिकच धार आली. जेलमध्ये जाण्याचे नाकारून तरूण कार्यकर्ते जनतेत वावरत होते. त्यांनी जनतेची प्रतिशक्ती प्रतिसरकारच्या रूपाने जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. अहिंसेचे पालनही करण्याचे त्यांनी ठरविले. यानुसार ऑक्टोंबर १९४२ पासून त्यांनी धोरणात बदल केला.[१५१] इ.स. १९४२ च्या क्रांतीमध्ये श्री.रा.बिवलकर यांना बाहेर राहून काम करण्याची संधी मिळाली. ठिकठिकाणी फिरण्याचे प्रसंग आले. खेडोपाडी प्रतिसरकारचे सैनिक, त्याचा त्याग, स्वातंञ्याची त्यांची ओढ त्यांना अनुभवता आली. सातारा चळवळीत अग्रेसर ठिकाण आहे याबाबत त्यांचे कुतूहल जागृत झाले. प्रतिसरकार भारतीय स्वातंञ्यलढयातील मानबिंदू आहे हे त्यांना राहून राहून वाटले. प्रतिसरकारचा धुमसता संग्राम, चलेजाव आंदोलन, मोर्चा पर्व, त्यांचे गनिमी पर्व, स्वातंञ्य चळवळीकरिता केलेली खजिना लूट, भूमिगतांची सभा, प्रतिसरकारची युध्दशाळा, जनता न्यायालय, गुन्हेगाराला त्यांनी केलेले शासन, क्रांतिकारी महिलांचा त्याग. कुंडल राजधानी त्यावेळचे रूप डोळयांनी पाहता आले. तुफानी दलाचे लष्करी संचलन, मणदूरचा फौजी कॅम्प, प्रतिसरकारच्या कामाची रूपरेषा, त्यांची घटना, त्यांची कार्यपध्दती, प्रत्यक्ष पाहण्याचा योग आला. एके दिवशी देशभक्त शिरूभाऊ लिमये यांनी स्वत: श्री.रा.बिवलकर यांना क्रांतिसिंह नाना पाटीलांचे चरित्र लिहीण्यास सांगितले.[१५२]

स्वातंञ्यपूर्व काळातील लोकांनी लोकांच्यासाठी चालवलेले राज्य म्हणजे प्रतिसरकार. आमचे अडाणी बांधव त्याला पत्रीसरकार म्हणतात. प्रतिसरकारची मुळ संकल्पना शिवरायांच्या राज्यात वसाहत करून राहिलेल्या मुळ ग्रामराज्यात पहायला मिळते. प्रतिसरकार म्हणजे भूमिगतांची चळवळ होय. सातारचे हे ग्रामराज्य होते. आंदोलन चालू ठेवण्याच्या प्रयत्नातून ते घडले.[१५३] यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्हयात बलशाली कॉंग्रेस उभी राहिली. महात्मा गांधीजींचा संदेश ऐकून दुसरे दिवशी यशवंतरावांनी सातारला धाव घेतली. सातारला आल्यावर त्यांनी जिल्हा कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना एकत्र केले. शेकडो सभा झाल्या, प्रभातफेऱ्या झाल्या, सातारची जनता नेत्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली. शासनाला धक्का बसावा अशी स्थिती निर्माण झाली. म्हणून ब्रिटिशांनी धरपकड केली, अटकसत्र सुरू केले.[१५४]

सर्व जग प्रतिसरकारने स्तिमित झाले. सातारच्या चळवळीला साहजिकच समाजातील सामान्य लोकांची मदत, सहकार्य, सहानुभूती होती, हे सातारच्या चळवळीच्या यशाचे गुपित होते.[१५५] १ जून १९४३

पासून १३ जून १९४६ पर्यंत बंडखोरांनी १८३ पेक्षा अधिक खेडयांना भेटी दिल्या. ३५५ पेक्षा अधिक देशद्रोहयांना पकडले, त्यांना शिक्षा केल्या.[१५६] ब्रिटीशांना भारत सोडायला लावणे व भारतीयांच्या हिताचे संवर्धन करणे हा प्रतिसरकार या संघटनेचा हेतू होता. प्रतिसरकार ही एक रचना होती. ब्रिटीशांनी प्रतिसरकारचे आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी राष्ट्र सेवा दल निरोपे, बर्हिजी पथक, तुफान सेना, न्यायालय मंडळे यांच्या सहाय्याने प्रतिसरकारने हे आव्हान स्वीकारले. प्रतिसरकारने स्वत:चे खडे सैन्य उभारण्याचा प्रयत्न केला. ब्रिटीशांनी पोलिस व लष्कराच्या जोरावर बालिया व मदिनापूर येथील प्रतिसरकारे मोडीत काढली पण क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या झुंजार नेतृत्वाखाली चालू असलेले सातारचे प्रतिसरकार मोडून काढण्यात ब्रिटीश साम्राज्यशाहीला यश आले नाही.[१५७]

**समारोप:**

सातारचे स्वातंत्र्यपूर्व योगदान या पहिल्याच प्रकरणात जिल्हयातील राजकीय व सामाजिक चळवळीतून झालेल्या उद्रेकाचा व घटनांचा आढावा घेतला आहे. सन १९४८ मध्ये सातारच्या प्रतापसिंह राजेंचा दत्तक ब्रिटिश सरकारने नामंजूर केला. सन १८५७ मध्ये सातारा येथील स्वातंत्र्य युध्दातील (उठावातील) पाच आरोपींना गेंडामाळ गोसावी पुऱ्यातील वडाला टांगून फाशी दिले. सहा जणांना तोफेच्या तोंडी दिले. सहा क्रांतिकारकांना गोळया घातल्या. विसाव्या शतकात टिळक नेतृत्व आले. ब्रिटिशांच्या शिक्षण, विज्ञान, दळणवळण या सुधारणेमुळे स्थित्यंतर झाले. राष्ट्रवादाचा उदय झाला. महात्मा फुलेंचा उदय झाला. महर्षि.वि.रा.शिंदे यांनी प्रार्थना समाजाच्या माध्यमातून समाजकार्य केले. अस्पृश्यांच्या समस्यांच्या संदर्भांत कार्य केले. म.फुलेंच्या सत्यशोधक समाज चळवळीने जिल्हयात मानवी हक्कांचा क्रांतिकारक विचार पुढे आणला. राजकारण व समाजकारण या क्षेत्रात सातारा अग्रभागी ठरला. स्वातंत्र्यासाठी जिल्हयात सनदशीर व सशस्त्र दोन्ही मार्गाने लढे दिल्याचे दिसते. सन १९३० मध्ये चळवळीचे विघटन झाले. तीन गट निर्माण झाले. बहुजनांच्या एका गटाने कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाचे कार्य केले. दुसरा गट केशवराव विचारे यांच्या मार्गदर्शनाखाली समाजकार्य व सहकाराकडे वळला व तिसरा गट केशवराव जेधे, भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे, क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण इत्यादी मंडळींच्या क्षेत्रात कार्यरत राहिला.

सातारचा स्वातंत्र्यलढा रोमहर्षक ठरला. ९ ऑगस्ट १९४२ रोजी ब्रिटिशांनी महात्मा गांधी व कॉग्रेस वर्किंग कमिटीच्या नेत्यांना अटक केली व देशात व सातारा जिल्हयात असंतोष पसरला. जिल्हाभर आंदोलने, मोर्चे, सायंफेऱ्या, प्रभातफेऱ्या निघाल्या. जाहीर सभा झाल्या. सातारा जिल्हयातील नेते म.गांधींच्या विचारावर खूप प्रेम करीत होती. चळवळी उग्र झाल्या. गांधीजींचा संदेश घरोघरी गेला. चळवळीतून प्रतिसरकारची निर्मिती झाली. जिल्हयातील नेते कार्यकर्ते भूमिगत राहून गनिमी पध्दतीने कार्य करू लागले. कराड, विटा, पाटण, तासगाव, इस्लामपूर, वडूज इत्यादी ठिकाणी मोर्चे निघाले. आंदोलनात ऐतवडयाच्या राजमती पाटील व धुळयाच्या लिला पाटील यांनी जहाल नेतृत्व केले. याखेरीज सरस्वती

कुलकर्णी, गीता खरे, ताराबाई गुरव, इंदूमती पाटणकर, हिरा जोशी, मुक्ताबाई जानकर इ. महिलांनी योगदान दिले. 'रयत शिक्षण संस्थेला' जिल्हयातील वकिल, डॉक्टर व नेते यांचे मोलाचे सहकार्य झाले. प्रतिसरकारचा लढा कोण्या एका व्यक्तीचा वा वर्गाचा नव्हता. ती एक भूमिगतांची चळवळ होती. प्रतिसरकारला तत्कालीन परिस्थितीचा प्रतिसाद होता. गावोगावी जनता या चळवळीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली. ब्रिटिश सत्ता उलथून टाकणे हेच या चळवळीचे उद्दिष्ट होते. त्यांचे स्वत:चे प्रशासन होते. स्वत:ची तुफानसेना उभी केली. या चळवळीचा बोलबाला सातासमुद्रापलिकडे गेला होता. प्रतिसरकारच्या माध्यमातून प्रशासन व न्यायव्यवस्था समाजाला भावले. सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आंदोलकांनी अविरत परिश्रम केले. सातारा जिल्हयाच्या जडणघडणीमध्ये या चळवळींचे मोलाचे योगदान आहे.

**निष्कर्ष** :

सातारमध्ये ब्रिटिश सत्तेविरोधी सन १८५७ मध्ये उठाव झाल्याचे दिसते. सातारा संस्थान खालसा केल्यामुळे असंतोष पसरल्याचे चित्र दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सातारमध्ये सनदशीर व सशस्त्र अशा दोन्ही मार्गांनी प्रयत्न केल्याचे दिसते. सातारा जिल्हयातील क्रांतिकारकांचा गदर पक्षाशी संबंध असल्याचे 'जागृत सातारा' या ग्रंथावरून ज्ञात होते. सामाजिक क्षेत्रात सत्यशोधक चळवळ, ब्राहमणेत्तर चळवळ व विठ्ठल रामजी शिंदे यांची अस्पृश्यता निवारण चळवळ अशा चळवळी साताऱ्यात सुरू झालेल्या होत्या. छ.शाहू महाराजांच्या विचारांचा व म.फुले यांच्या चळवळींचा मोठा प्रभाव केशवराव विचारे व डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर झालेला दिसतो. डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन व दलितांचे शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्था स्थापन केली. क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांचे सहकाऱ्यांनी स्वातंत्र्यलढा दिल्याचे स्मरणात राहते. साताराचे प्रतिसरकार व ग्रामराज्य यांचा सर्वत्र बोलबाला झाला.

**संदर्भ साधने :**


१. पाठक अरूणचंद्र (संपा.), महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, मराठी आवृत्ती (सुधारित), मुंबई, १९९९ पृ.८

२. कित्ता, पृ.१४५

३. कित्ता, पृ.१४५

४. सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड ३, मुंबई, १९८८, पृ.४९ व ५०

५. सातारा शहर नगरपालिका (संपा.), शत सांवत्सरीक महोत्सवी अंक १९५४, पृ.७

६. कित्ता, पृ.११

७. कित्ता, पृ.११

८. कित्ता, पृ.१२

९. पाठक अरूणचंद्र (संपा.), महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, मराठी आवृत्ती (सुधारित), मुंबई, १९९९ पृ.९०१

१०. कित्ता, पृ.१६०

११. कित्ता, पृ.१६१

१२. कित्ता, पृ.१६१

१३. पाटणे संभाजीराव, सातारा संग्रामातील स्वातंत्र्य जिल्हा, प्रकाशन, भिलारे गुरूजी ऑगस्ट क्रांती महोत्सव समिती सातारा, ९ ऑगस्ट १९९२, पृ. ५

१४. पाठक अरूणचंद्र (संपा.), महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, मराठी आवृत्ती (सुधारित), मुंबई, १९९९ पृ.१६२

१५. ठाकरे केशव सिताराम, प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, प्र.आ., मुंबई १९४८, पृ.८०

१६. पाटणे संभाजीराव, वैभवशाली सातारा, परिवर्तन, सातारा जिल्हा कॉंग्रेस(आय.) कमिटी प्रकाशन, फेब्रुवारी १९९०, पृ.०१

१७. पाठक अरूणचंद्र (संपा.), महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, मराठी आवृत्ती (सुधारित), मुंबई, १९९९ पृ.१६४

१८. कित्ता, पृ.१६४

१९. पाटणे संभाजीराव, वैभवशाली सातारा, परिवर्तन, सातारा जिल्हा कॉंग्रेस (आय.) कमिटी प्रकाशन, फेब्रुवारी १९९०, पृ.०२

२०. पाठक अरूणचंद्र (संपा.), महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, मराठी आवृत्ती (सुधारित), मुंबई, १९९९ पृ.९००

२१. कित्ता, पृ.९००

२२. माटे गो.रा., असा घडला सातारा, प्रकाशन माटे, शनिवार पेठ, सातारा, प्र.आ., जानेवारी १९८८ पृ.११९

२३. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, प्रकाशन, सातारा जिल्हा इतिहास संशोधक मंडळ, प्र.आवृत्ती ३० जानेवारी २०१५, पृ.१३

२४. कित्ता, पृ.१४

२५. कित्ता, पृ.१४

२६. किर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, आमच्या समाजक्रांतीचे जनक, पुनर्मुद्रण १९७५, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७५, पृ.१४४

२७. कित्ता पृ.१८

२८. कित्ता, पृ.१८

२९. जावडेकर शं.द., आधुनिक भारत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुष्प, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, ३०, पाचवी आवृत्ती, १९९४, पृ.११३

३०. कित्ता, पृ.११५

३१. पवार जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ महाराष्ट्र इतिहास प्रकाशन, कोल्हापूर, व्दितीय आवृत्ती, २००७, पृ.२१

३२. साळुंखे पी.बी., राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, राजर्षी बर्थ सेन्टेनरी कॉमेमीरेशन, मुंबई, प्र.आ. १९७२, पृ.५१०

३३. नाईक तु.बा., छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन, कोल्हापूर, १९७४, पृ.७६

३४. गोखले पु.पा. जागृत सातारा, लोकसेवा संघ प्रकाशन, सातारा, १९६९, पृ.३

३५. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकार, उषा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००३, पृ.११

३६. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, प्रकाशन , सातारा जिल्हा इतिहास संशोधक मंडळ, प्र.आवृत्ती ३० जानेवारी २०१५, पृ.३२

३७. माटे गो. रा., असा घडला सातारा, प्रकाशन माटे, शनिवार पेठ, सातारा, प्र.आ., जानेवारी १९८८ पृ.११९

३८. गोखले पु. पा. जागृत सातारा, लोकसेवा संघ प्रकाशन, सातारा, द्वि.आ., १९६६, पृ.४०

३९. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकार, उषा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००३, पृ.१२

४०. पाटणे संभाजीराव, 'अजिंक्यताऱ्यावरून' ६६ वे अ.भा.साहित्य संमेलन लेख यावरून, सारडा शंकर (संपा.) पृ.५३
४१. गोखले पु. पा. जागृत सातारा, लोकसेवा संघ प्रकाशन, सातारा, द्वि.आ., १९६९, पृ.३
४२. शिंदे आबासाहेब, साताराचे प्रतिसरकार, उषा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, २००३, पृ.२०
४३. गोखले पु. पा. जागृत सातारा, लोकसेवा संघ प्रकाशन, सातारा, द्वि.आ., १९६६, पृ.८१
४४. केसरी, ०६.०८. १९३७
४५. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, प्रकाशन, सातारा जिल्हा इतिहास संशोधक मंडळ, प्र.आवृत्ती ३० जानेवारी २०१५, पृ.३४
४६. कित्ता., पृ.१७
४७. कित्ता., पृ.१८
४८. कित्ता, पृ.२०
४९. पाटील पंढरीनाथ सीताराम, म.फुले यांचे चरित्र, नागनालंदा प्रकाशन इस्लामपूर, प्र.आ., १९२७, पृ. १४२,१४३
५०. कित्ता, पृ. १४५
५१. कित्ता, पृ. १५२
५२. कित्ता, पृ. १५६
५३. नलावडे उज्वला, सत्यशोधकाची संक्षिप्त गाथा, विचारे फॉर्मस, प्रा.लि.प्रकाशन, ठाणे, १९९८, प्रथम आवृत्ती, पृ. १७
५४. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, प्रकाशन, सातारा जिल्हा इतिहास संशोधक मंडळ, प्र.आवृत्ती ३० जानेवारी २०१५, पृ.४८
५५. फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड पहिला, के.सागर प्रकाशन, शनिवार पेठ, व्दितीय आवृत्ती, १५ नोव्हें.२००५, पृ.५७
५६. पाटील पंढरीनाथ सीताराम, म.जोतीबा फुले, नागनालंदा प्रकाशन, विशालनगर, इस्लामपूर, प्रथम आवृत्ती, १ जुलै १९२७, पृ.६३
५७. सुर्यवंशी राजाराम, गुरूवर्य विचारे, विचारे प्रकाशन, सत्यशोधक समाज घटना, छत्रपती ज्ञानपीठ धुळे, दिनांक नाही, पृ.०१ व ०२
५८. कित्ता, पृ. ४
५९. पाटील पंढरीनाथ सीताराम, म.जोतीबा फुले, नागनालंदा प्रकाशन, विशालनगर, इस्लामपूर, प्रथम आवृत्ती, १ जुलै १९२७, पृ.५६

६०. कित्ता, पृ. ५९

६१. पाटील टी.एस., कोल्हापूर संस्थानातील सत्यशोधक चळवळ, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, क. था. हिरे महाविद्यालय, गारगोटी येथील वार्षिक अधिवेशनात सादर झालेला शोधनिबंध, डिसें. १९९९, पृ.१११

६२. कित्ता, पृ.११२

६३. गुजर जयवंत, जगावेगळा सत्यशोधक, केशवराव विचारे, विचार फॉमर्स प्रा.लि.इदगाव (बदलापूर) जि.ठाणे, प्र.आ., नोव्हें.२००४ पृ.५४, ५५

६४. कित्ता, पृ. ५५

६५. कित्ता, पृ. ५६

६६. कित्ता, पृ. ५६

६७. माने लक्ष्मण (संपा.), परिवर्तन काँग्रेस आय कमिटी, सातारा, प्र.आ., सप्टे.१९९०, पृ.१५

६८. कित्ता, पृ.१५

६९. गुजर जयवंत, जगावेगळा सत्यशोधक, केशवराव विचारे, विचार फॉमर्स प्रा.लि.इदगाव (बदलापूर) जि.ठाणे, प्र.आ., नोव्हें.२००४ पृ.६०

७०. माने लक्ष्मण (संपा.), उपरोक्त, पृ.१५

७१. कित्ता, पृ. १५

७२. कित्ता, पृ. १६

७३. कित्ता, पृ. १६

७४. कित्ता, पृ. १७

७५. कित्ता, पृ. १७, १८

७६. बाबर रा.कृ., वाई, नारायणराव स्मृति ग्रंथ प्रकाशन, द.ना.चव्हाण वाई, प्र.आ.१० मे, १९७१ पृ.७५ व ७६

७७. कित्ता, पृ. ७७

७८. चव्हाण रा.ना., उपरोक्त, पृ.१७

७९. पवार जयसिंगराव, राजर्षि शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, १ जानेवारी २०१२, पृ.७१

८०. पाटील एस. के., महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय विकास, विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. जून १९९४, पृ. २४

८१. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र(१९३० – १९३९) राजकीय इतिहास खंड ४, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी गिरगाव, मुंबई, ४००००४,१९९३ पृ.२१५

८२. मोरे शंकरराव, शेतकरी कामगार पक्ष आढावा, (अहवाल १९४८) प्रकाशन भाई बाबासाहेब देसाई, पुणे १९८८, पृ.१ व २

८३. कित्ता, पृ.१ व २

८४. कित्ता, पृ.२

८५. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, प्रकाशन, सातारा जिल्हा इतिहास संशोधक मंडळ, प्र.आवृत्ती ३० जानेवारी २०१५, पृ.३१

८६. गुजर जयवंत, जगावेगळा सत्यशोधक, केशवराव विचारे, विचार फॉमर्स प्रा.लि.इदगाव (बदलापूर) जि.ठाणे, प्र.आ., नोव्हें.२००४ पृ.९१

८७. कित्ता, पृ.९३

८८. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र राजकीय इतिहास खंड ३, सागर प्रकाशन, १ मे २००८, पृ.२५०

८९. सुर्यवंशी राजाराम, गुरूवर्य विचारे, प्रकाशन सत्यशोधक छत्रपती ज्ञानपीठ धुळे, दिनांक नाही, पृ.२६

९०. कित्ता, पृ.२७

९१. कित्ता, पृ.२८

९२. फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र राजकीय इतिहास खंड ३, के.सागर प्रकाशन, द्वि.आ., १ मे २००८, पृ.२५२

९३. केसरी, २४ मे १९२१

९४. फडके य.दि., उपरोक्त, पृ.२५२

९५. कित्ता, पृ.२५३

९६. कित्ता, पृ.२५३

९७. कित्ता, पृ.२६९

९८. कित्ता. पृ.२७९

९९. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, प्रकाशन, सातारा जिल्हा इतिहास संशोधक मंडळ, प्र.आवृत्ती ३० जानेवारी २०१५, पृ.१२५

१००. केसरी १५.०८.१९४२

१०१. प्रधान ग.प्र., स्वातंत्र्याचे महाभारत, साधना प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८७, पृ.२८८

१०२. केसरी २१.०८.१९४२ व २५.०८.१९४२

१०३. केसरी २१.०८.१९४२ व २५.०८.१९४२

१०४. प्रधान ग.प्र., स्वातंत्र्याचे महाभारत, साधना प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८७, पृ.३१३

१०५. शिंदे आबासाहेब, १९४२च्या क्रांतितील सातारा, परिवर्तन, सातारा जिल्हा कॉंग्रेस (आय.) कमिटी प्रकाशन, प्र. आ., स्मरणिका, सप्टें. २००९, पृ.५६

१०६. केसरी, मंगळवार, १५.०९.१९४२

१०७. कित्ता, पृ.५७

१०८. केसरी, शुक्रवार, २८.०८.१९४२

१०९. कित्ता, पृ.५७

११०. केसरी, मंगळवार, ०४.०८.१९४२

१११. पाठक अरूणचंद्र (संपा.), महाराष्ट्र शासन महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, मराठी आवृत्ती (सुधारित), मुंबई, १९९९ पृ.१७८

११२. कित्ता, पृ.१८०

११३. शिंदे आबासाहेब, १९४२ च्या क्रांतितील सातारा, परिवर्तन, सातारा जिल्हा कॉंग्रेस(आय.) कमिटी प्रकाशन, प्र.आ., स्मरणिका, सप्टें २००९, पृ.५७

११४. शिवणीकर राघव, सातारचा सिंह, क्रांतिसिंह नाना पाटील समग्र चरित्र, प्रकाशन एस. एम. आदाटे, पुणे १६, प्र. आ.१५ ऑगस्ट १९८६ पृ.५६

११५. शिंदे आबासाहेब, १९४२ च्या क्रांतितील सातारा, परिवर्तन, सातारा, माने लक्ष्मण (संपा.), जिल्हा कॉंग्रेस (आय.) कमिटी प्रकाशन, प्र. आ., स्मरणिका, सप्टें २००९, पृ.५८

११६. केसरी, २५.०९.१९४२

११७. केसरी, १८.१२.१९४२

११८. लोकराज्य (संपा.), स्वातंत्र्यदिन विशेषांक १९७२ लेख, तीस वर्षापूर्वी, लेखक यशवंतराव चव्हाण, पृ.९५

११९. केसरी, मंगळवार, २२.०९.१९४२

१२०. पाटील डी.एम., सातारचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार, प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, विभागीय केंद्र, कराड, प्र.आ.२६ जाने. २०००, पृ.८

१२१. बिवलकर श्री.रा. नाना पाटील चरित्र, देशमुख आणि कंपनी प्रकाशन, पुणे, प्र.आ. , पृ.३४

१२२. पाटील डी.एम., सातारचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार, प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, विभागीय केंद्र, कराड, प्र.आ.२६ जाने. २०००, पृ.८

१२३. क्रांतिसिंहांची रोजनिशी, १९४६ ते १९४९, पृ.२७ ते ३०

१२४. कित्ता, पृ.४९

१२५. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, प्रकाशन, सातारा जिल्हा इतिहास संशोधक मंडळ, प्र.आवृत्ती ३० जानेवारी २०१५, पृ.१३६

१२६. क्रांतिसिंहांची रोजनिशी, १९४६ ते १९४९, पृ.२७ ते ३०

१२७. मोरे शंकरराव, शेतकरी कामगार पक्ष आढावा, (अहवाल १९४८) प्रकाशन भाई बाबासाहेब देसाई, १९४८, पृ.८१ व ८३

१२८. केसरी, १५.०९.१९४२

१२९. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, प्रकाशन, सातारा जिल्हा इतिहास संशोधक मंडळ, प्र.आवृत्ती ३० जानेवारी २०१५, पृ.१३८

१३०. पाटील डी.एम., सातारचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार, प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, कराड, प्र.आ.२६ जाने. २०००, पृ.१२

१३१. फडणीस जगन, शेतकरी कामगार पक्ष, शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण, अजब प्रकाशन, कोल्हापूर, १९७८, प्र.आ., पृ.२८

१३२. डी.एम., सातारचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार, प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, विभागीय केंद्र, कराड, प्र.आ.२६ जाने. २०००, पृ.१३ व १४

१३३. शिंदे आबासाहेब, १९४२च्या क्रांतितील सातारा, परिवर्तन, सातारा जिल्हा कॉंग्रेस(आय.) कमिटी प्रकाशन, प्र.आ., स्मरणिका, सप्टें. २००९, पृ.६०

१३४. पाटील डी.एम., सातारचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार, प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, विभागीय केंद्र, कराड, प्र.आ.२६ जाने. २०००, पृ. प्रस्तावना

१३५. शिंदे आबासाहेब, १९४२च्या क्रांतीतील सातारा, परिवर्तन, सातारा जिल्हा कॉंग्रेस(आय.) कमिटी प्रकाशन, प्र.आ., स्मरणिका, सप्टें २००९, पृ.६०

१३६. केसरी, २५.०९.१९४२

१३७. केसरी, २५.०९.१९४२

१३८. कोगनोळे विजय, सांगली जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, २०, प्र.आ. पृ.५२

१३९. केसरी, ०६.१०.१९४२

१४०. केसरी, १२.१०.१९४२

१४१. कित्ता, पृ.५३

१४२. कोगनोळे विजय, सांगली जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, २०,प्र.आ. पृ.५७

१४३. पाटील डी.एम., सातारचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार, प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, विभागीय केंद्र, कराड, प्र.आ.२६ जाने. २०००, पृ. ३८

१४४. कित्ता, पृ.३९

१४५. कित्ता, पृ.३९

१४६. कित्ता, पृ.५१

१४७. कित्ता, पृ.५३

१४८. शिवणीकर राघव, चिटणीस सातारचा सिंह, क्रांतिसिंह नाना पाटील समग्र चरिञ्य, प्रकाशन एस. एम. आदाटे, पुणे १६, प्र. आ.,१५ ऑगस्ट १९८६, पृ.६८ व ६९

१४९. पवार बा.ग., क्रांतिसिंह नाना पाटील, मातृभूमी प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, मुंबई, २००८, पृ.११८

१५०. कित्ता, पृ.११९

१५१. बिवलकर श्री.रा. नाना पाटील चरित्र, देशमुख आणि कंपनी प्रकाशन, पुणे, प्र.आ., दिनांक नाही, पृ.३६

१५२. कित्ता, पृ.३६

१५३. शिंदे आबासो, १९४२ च्या क्रांतितील सातारा, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा(संपा.), १९८७

१५४. पाटील डी.एम., सातारचे पहिले लोकराज्य प्रतिसरकार, प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, विभागीय केंद्र, कराड, प्र.आ.२६ जाने. २०००, प्रस्तावना डॉ.उषा मेहता पृ. प्रस्तावना

१५५. शिंदे आबासाहेब, उपरोक्त, पृ.५९

१५६. कित्ता, पृ.६०

१५७. माने माधवराव, राष्ट्रसेवादलातील अनमोल हिरेमोती, निर्मिती संवाद, कोल्हापूर, प्रकाशन म्हमाणे, प्र. आ. २६ जून २०१५, पृ.८१

## प्रकरण दुसरे

# सातारा जिल्हयातील राजकीय चळवळी

**प्रास्ताविक :**

सातारा जिल्हा कॉग्रेसने स्वातंञ्ययुध्दात व स्वातंञ्योत्तर काळात मोलाची कामगिरी केलेली आहे. जिल्हा कॉग्रेस स्थापनेच्या प्रारंभी दादासाहेब करंदीकर, बळवंतराव कोल्हटकर व रावसाहेब लिमये यांनी जिल्हाभर दौरे काढून राष्ट्रीय सभेचा प्रचार केला. आठल्ये, कळंबे, महादेव हिंगे यांनी क्रांतिकारी संघर्ष केला. सातारा जिल्हा धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही आघाडीवर होता. भाऊसाहेब सोमण, फणसळकर, घाणेकर इत्यादी मंडळींच्या राष्ट्रीय विचारांनी सातारा जिल्हा प्रेरित झालेला दिसतो. क्रांतिसिंह नाना पाटील, वसंतराव दादा, यशवंतराव चव्हाण, जी.डी.लाड, बर्डे मास्तर, किसन वीर, शेख काका, पांडू मास्तर इत्यादींनी प्रतिसरकार म्हणून दरारा निर्माण केला. स्वातंञ्यपूर्व काळात व स्वातंञ्योत्तर काळात सातारा जिल्हा चळवळींचा केंद्रबिंदू ठरला.

इ.स.१९४९ मध्ये महाबळेश्वर येथे प्रांतिक शिबीर झाले. २० नोव्हेंबर १९४९ मध्ये ३४ हजार माजी सैनिकांचा भव्य मेळावा सातारा येथे झाला. माजी सैनिकांच्या कुटुंबियांच्या कल्याणाकरिता 'अभिनव मानधन' योजना करण्याचा प्रस्ताव सरकारपुढे मांडला गेला. जिल्हयातील कराड येथे जो भव्य मोर्चा निघाला.[१] तो महाराष्ट्रातील पहिला शेतकरी मोर्चा होय. हुतात्मा परशुराम, क्रांतिसिंह नाना पाटील, जी.डी.लाड, यशवंतराव चव्हाण, कासेगावकर वैद्य, वसंतराव दादा, किसन वीर, पांडू मास्तर, बाळासाहेब देसाई, आप्पासाहेब सिंहासने, वि.स.पागे, दादासाहेब आळतेकर, बाबुराव गोखले, आबासाहेब पार्लेकर, पी.डी.पाटील, माधवराव जाधव, रघुनाथ पाटील, पांडूअण्णा शिराळकर, तासगावचे जोग, रामानंद स्वामी, वाईचे वाटवे इत्यादीनी जी विराट आंदोलने उभी केली ती स्वराज्य व स्वार्थत्यागाची बोलकी उदाहरणे आहेत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वातंञ्यदिन जिल्हयात दिमाखाने साजरा झाला. स्वामी रामानंद भारती जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले. कराडचे क्रांतिवीर माधवराव जाधव कराड तालुका अध्यक्ष झाले. सन १९४८ ला गांधीहत्येने दंगली झाल्या, आगीचा डोंब उसळला. माधवराव, आळतेकर, व्यंकटराव पवार सिंहासने व नाना पाटील यांनी जनतेची समजूत काढली, शांतीसेना उभारली. कॉग्रेस सेवादलाची स्थापना केली. सन १९४९ ते १९५९ या कालखंडात जिल्हाभर दारूबंदीचे काम झाले.[२] इ.स.१९६० मध्ये महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. सत्तासूत्रे कॉग्रेस पक्षाकडे आली.

इ.स.१९६९ मध्ये कॉग्रेसमध्ये फूट पडली. इंदिरा नेतृत्व गट पुढे आला. उ.स. १९७८ मध्ये इंदिरा गांधी यांचे नेतृत्व मानण्याच्या प्रश्नावरून कॉग्रेस पक्षात पुन्हा फूट पडली. इंदिरा गट व रेडड्डी गट असे दोन गट विभक्त झाले. या घडामोडीचे सातारा जिल्हयात पडसाद उमटले. अंतर्गत वाद सुरू झाले. सातारा जिल्हयात इंदिरा कॉग्रेस व रेडडी काँग्रेस आमनेसामने उभे राहिले. सातारा जिल्हा यशवंतराव चव्हाण यांच्या पाठी ठेवण्याचा किसन वीर व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयत्न केला. काँग्रेसच्या एकसंघ नेतृत्वाला तडा गेला.[३]

सातारा जिल्हयात १९७८ चे निवडणूकीत बरीच पडझड झाली. सातारचे बाबुराव घोरपडे, चिमणराव कदम जनता पक्षाकडून हारले. यशवंतराव चव्हाण यांच्या संदिग्ध भूमिकेमुळे अनेक नाराज झाले. वसंतरावदादा पाटील तर त्यांचे कट्टर शत्रू बनले. पुलोद आघाडी सत्तेवर आली. सातारच्या राजकारणावर याचा मोठा प्रभाव पडला. इ.स.१९७५ ते इ.स.१९८८ या कालखंडात राज्यातील मुख्यमंत्री आठ वेळा बदलले. राज्याप्रमाणे सातारा जिल्हयात कॉंग्रेसमध्ये अस्थिर वातावरण निर्माण झाले. २७ नोव्हें. १९७९ रोजी किसन वीरांचे निधन झाले. सातारच्या राजकीय व सामाजिक जीवनात पोकळी निर्माण झाली. सन १९८० मध्ये वसंतरावदादांनी आपल्या समर्थकासमवेत इंदिरा कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. महाराष्ट्र कॉंग्रेसची फेरमांडणी झाली. वसंतरावदादांना डावलून बॅ.अंतुले मुख्यमंत्रीपदी आले. सन १९८५ नंतर महाराष्ट्रात कॉंग्रेसचा पाया कमजोर होत गेला. राज्यात विकासाचे प्रश्न निर्माण झाले. शेती विकास कुंठीत झाला. प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न ऐरणीवर आला. कारण विदर्भ मराठवाडा यांच्या विकासाचा असमतोल वाढला. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न निर्माण झाला.पुलोद आघाडीतील नेत्यांचे काही कार्यकर्ते कॉंग्रेसमध्ये गेले परंतु उरलेले काही व गाव पातळीवरील बरेचसे कार्यकर्ते शिवसेना व इतर पक्षात गेले. संदिग्धता व घराणेशाहीमुळे अनेक कॉंग्रेस कार्यकर्ते पक्षाबाहेर राहिले. शिवसेनेचा प्रभाव वाढू लागला. डिसें.१९९२ अयोध्या येथील बाबरी मशिद कारसेवकांनी उदध्वस्त केली. मुंबईत जातीय दंगली झाल्या. १९९३ ते १९९५ मध्ये मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न फारच चिघळला. उर्जानिर्मितीसाठी वादग्रस्त एन्रॉनचा प्रश्न पुढे आला. सन १९९५ मध्ये भ्रष्टाचार, पक्षगटबाजी, गुन्हेगारांना निवडणूक तिकिट देणे यामुळे कॉंग्रेसविरूध्द प्रतिकूल वातावरण निर्माण होत गेले. बंडखोरी झाली. भाजप व शिवसेनेने कोकण व मराठवाडयात सत्ता भक्कम केली व कॉंग्रेस पक्षाचा पहिल्यांदा मोठा पराभव झाला. कॉंग्रेस पक्षाचा हा पराभव बऱ्याच वर्षापासून सुरू असलेल्या राजकारणाचा परिणाम होता.[४] पक्षातील बेदिलीमुळे ऱ्हास झाला. पुढे राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना झाली व कॉंग्रेसमध्ये उभी फूट पडली.

आज १२५ वर्षानंतरसुध्दा कॉंग्रेसच सर्वात मोठा देशव्यापी पक्ष आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांचेकडून होणाऱ्या अन्यायापोटी या राजकीय पक्षाने स्वातंत्र्ययुध्दाकरिता जनजागरण केले. होमरूल चळवळ, असहकार चळवळ उभी केली. कामेरी लढा, औंध संस्थान लढा, बिळाशी बंड, १९४२ चा लढा दिला, मीठ सत्याग्रह केला, वंगभंग आंदोलन, परदेशी मालावर बहिष्कार टाकला, प्रतिसरकारच्या माध्यमातून ब्रिटिशांना सळो की पळो केले. राष्ट्र सेवा दल काढले. स्वातंत्र्योत्तर काळात ८० टक्के काळ हा पक्ष सत्तेत राहिला. पक्षातील आक्रमक होण्याची प्रवृत्ती कमी झाली. हवे ते मिळविण्यासाठी कॉंग्रेस पक्ष मुत्सद्दीगिरी करू लागला. सहकारातून पुढे 'शुगर लॉबी' निर्माण झाली. पंचायत राज्यात हा पक्ष प्रत्येक ठिकाणी सत्तेत रहात गेला. यामुळे राजकारण, सेवा, त्याग, सर्वसामान्यांचा उध्दार यापासून हा पक्ष दूर गेला. चळवळीची तलवार म्यान करूनच राहिला.[५]

### सातारा जिल्हयातील कॉंग्रेस पक्ष व चळवळी:

### २.१.१.कॉंग्रेस पक्ष राजकीय चळवळी:

### अ.संयुक्त महाराष्ट्र लढा:

संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाची माहिती शौर्याची व विचारप्रवर्तक आहे. सर्व मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणावा व महाराष्ट्र एक वेगळे राज्य करावे ही मागणी स्वातंत्र्यपूर्व काळापासून होती. कॉंग्रेसने भाषावार प्रांतरचनेला पाठिंबा दिल्यावर तोच न्याय आपल्या भाषेला लागू व्हावा असे मराठी भाषिकांना वाटणे स्वाभाविक होते. यातून ही मागणी पुढे आली. हा लढा सन १९५५ ते सन १९६० अखेर अखंड चालू होता. या लढयात सातारकरांनी आपल्या परीने योगदान दिले. कराडचे आमदार व्यंकटराव पवार यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी प्रश्न विधानसभेत मांडले.(सन १९४८) बरोबर या मागणीचा पुनरूच्चार कराड दक्षिणचे आमदार यशवंतराव मोहिते यांनी करून तसा सन १९५३ मध्ये विधानसभेत ठराव मांडला.[६] सर्व महाराष्ट्रभर आंदोलनाचा जोर वाढला होता. दि.२०.११.१९५५ च्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुनर्रचना समितीने नाकारल्याबाबत खेद व्यक्त केला.[७] २ नोव्हें.१९५५ ला मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करावा असा ठराव मुंबई महानगरपालिकेत करण्यात आला. तरी पं. नेहरू तयार नव्हते. त्यावेळी मुंबई शहर केंद्रशासित ठेवण्याच्या पर्यायावर चर्चा चालू होती. यामुळे मुंबईत दंगल उसळली. मोरारजी देसाई यांनी चळवळ दडपण्याचे आदेश दिले. गोळीबार झाला. १०५ हुतात्मे झाले. या दरम्यान सातारा येथे कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या मिटींगमध्ये यशवंतरावांनी पार्लमेंटचा निर्णय मानला पाहिजे असे सांगितले. त्यावर आप्पासाहेब सिंहासने व माधवराव जाधव यांनी चर्चा घडविली. यशवंतरावांनी एक भाषिक राज्य होण्यास अजून थोडा काळ लागणार आहे हा प्रश्न त्यांच्या परीने हाताळतील असे कथन केले.[८] एक भाषिक महाराष्ट्र सर्वांनाच हवा होता परंतु तो मिळविण्याचे मार्ग मात्र भिन्न होते. कॉंग्रेसला तो प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवावयाचा होता. या लढयात क्रांतिसिंह नाना पाटील यांची भूमिका मोलाची होती. सातारा येथे त्यांनी लढयाचे रणशिंग फुंकले.[९] जनमत संघटित करण्यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर झंझावाती दौरे काढले. मराठी भाषिकांची सर्वांगिण सुधारणा संयुक्त महाराष्ट्र होण्यावरच अवलंबून आहे. हे राज्य निर्माण झाले नाही तर परप्रांतिय भांडवलदार आपल्याच प्रदेशात आपणालाच गुलाम करून टाकतील म्हणून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती आवश्यक आहे अशी खंबीर भूमिका नाना पाटील यांनी मांडली. संयुक्त महाराष्ट्र समितीत कॉंग्रेसखेरीज इतर सर्व राजकीय पक्ष सहभागी झाले होते. यामध्ये शेतकरी कामगार पक्ष, प्रजासमाजवादी कम्युनिस्ट पक्ष, शेडयूल्ड कास्ट फेडरेशन, लाल निशान गट, इत्यादी. यात एस.एम.जोशी, भाई डांगे, प्र.के.अत्रे, क्रांतिसिंह नाना पाटील, प्रबोधनकार ठाकरे, सेनापती बापट, ना.ग.गोरे, दादासो गायकवाड, जयंतराव टिळक, उध्दवराव पाटील, भाई दाजिबा देसाई, इ. नेते होते. आंदोलनाला संघटित स्वरूप आले. ऐक्य भावनेचे दर्शन घडले. महाराष्ट्रभर सत्याग्रह मोहिम झाली. शासनावर जनमताचे दडपण आले. प्रतापगडावर उभारण्यात आलेल्या पुतळयाचे उदघाटन करण्यास नेहरू आले. यावेळी महाराष्ट्राची बाजू

न्यायी आहे असे त्यांच्या प्रत्ययाला आणून दिले. सन १९५९ मध्ये इंदिरा गांधी काँग्रेस अध्यक्षा झाल्या. त्यांनी महाराष्ट्राची बाजू कॉग्रेस श्रेष्ठींना पटवून दिली.[१०] सन १९५६ च्या राज्यपुनर्रचनेच्या विधेयकासाठी नेमलेल्या समितीत कराडचे गणपतराव आळतेकर होते. त्यांनी मुंबई महाराष्ट्रात राहणे न्याय व लोकशाही तत्वास अनुसरून आहे असे मत नमूद केले. पुढे संयुक्त महाराष्ट्र लढयाला फारच उग्र रूप प्राप्त झाले शेवटी मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले.

**मराठवाडा चळवळ:**

**मराठवाडा विकास:**

हैद्राबाद मुक्तीसंग्राम रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली लढविला. यात गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, भाऊसाहेब वैंशपायन, आ.कृ.वाघमारे, अनंत भालेराव होते. हैद्राबादच्या रझाकारने हैद्राबाद स्वतंत्र राहण्यासाठी सेना उभी केली तेव्हा तेथील हिंदूंचा छळ झाला. तेव्हा क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली तुफान सेनेचे नेतृत्व सेनापती जी.डी.लाड यांच्याकडे देण्यात आले.[११] सन १९५७ मध्ये नाना पाटील यांनी भवानीनगर, कारवार, बिदर, निपाणी, भलकी, मुंबई, विदर्भ, नागपूर व मराठवाडयासह महाराष्ट्राची मागणी केली. राज्यनिर्मितीनंतर मराठवाडयाच्या विकासकामावर भर द्यावा असे गोविंदभाई श्राफनी सांगितले. मराठवाडा विकास परिषदेचे दि.१९ व २० आक्टोंबर १९६४ रोजी औरंगाबाद येथे आयोजन केले. तेव्हा कॉग्रेस संघटनेचे अध्यक्ष विनायकराव पाटील व पाटबंधारे मंत्री शंकरराव चव्हाण हे कॉग्रेसचे नेते होते. वसंतराव नाईक यांचेनंतर मराठवाडयाचा मुख्यमंत्री झालाच पाहिजे अशी मागणी होती. जायकवाडी प्रकल्प मागणी पूर्ण करून घेतली. या परिषदेला शंतनुराव किर्लोस्कर, आबासाहेब गरवारे यांना निमंत्रित केले होते. सुमारे ९०० प्रतिनिधी हजर होते. १३ एप्रिल १९७२ मराठवाडा बंदची हाक दिली स्वतंत्र कृषी विद्यापीठाची मागणी पुढे आली. जून १९७२ पासून परभणीला स्वतंत्र कृषी विद्यापीठ झाले. सन १९७४ मध्ये मराठवाडा आंदोलन झाले याचे नेतृत्व विकास परिषदेने केले. रेल्वेमार्ग रूंदीकरण व लातूर मिरज रेल्वेमार्गाचे रूंदीकरण मागणी झाली. सर्व थरातून पाठिंबा मिळाला.

**ब.स्वतंत्र विदर्भाची चळवळ:**

विदर्भ महाराष्ट्रात सामील झाला तरी हा प्रदेश एक स्वतंत्र राज्य असावा अशी काही कार्यकर्त्यांची अपेक्षा होती. एकाच भाषेची दोन राज्ये व्हावीत असा विचार विदर्भवादी नेत्यांचा होता. सन १९५६ मध्ये जेव्हा व्दिभाषिक मुंबई राज्य स्थापन झाले. त्यावेळी घटना दुरूस्तीसाठी जमलेल्या संयुक्त समितीपुढे विदर्भातील सभासदांनी नागपूर करारातील तरतूदींना घटनात्मक दर्जा दिला जावा अशा प्रकारचे निवेदन दिले. यावर कॉग्रेस पक्षाचे नेते मुख्यमंत्री यशवंतराव यांनी याबाबत विदर्भाला निश्चित आश्वासन देणारे निवेदन दिले. विदर्भाच्या हितसंबंधाचे आग्रहपूर्वक रक्षण केले जाईल असे निवेदनात अभिवचन दिले. एवढे होऊनसुध्दा १ मे १९६० रोजी काही लोकांनी नागपूर येथे दंगल केलीच. ते थांबविण्यासाठी दोनदा गोळीबार करावा लागला. यात ७ जण जखमी झाले. महाराष्ट्राची निर्मिती झाली आहे. तेंव्हा आता स्वतंत्र विदर्भासाठी

चळवळ करू नये असे यशवंतराव चव्हाणांनी सांगितले.[१२] विधीमंडळाचे अधिवेशन नागपूर येथे चालू असताना स्वतंत्र विदर्भाची मागणी करणारा मोर्चा १० नोव्हेंबर १९६० मध्ये काढला.[१३] मुख्यमंत्री नागपूरच्या दौऱ्यावर गेले तेव्हा नागविदर्भ समितीने निदर्शने केली. पोलिसांना लाठीमार करावा लागला. नागविदर्भ समिती बरखास्त झाल्यानंतर जांबुवंतराव धोटे यांनी हा संघर्ष पुढे सुरू ठेवला. धोटे हे आक्रमक नेते होते. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भाचा विकास झाला नाही यामुळे जनतेत असंतोष होता. तो त्यांनी या चळवळीतून व्यक्त केला.

**क. मराठवाडा विकास महामंडळ:**

वेगळा स्वतंत्र विदर्भ हवा अशी मागणी विदर्भाची होती. तशी मराठवाडयाची नव्हती. मराठवाडा मागास होता. त्यांच्या विकासाला प्राधान्य द्यावे अशी जनतेची मागणी होती. मराठवाडयाच्या विकासाची मागणी निश्चितपणे पूर्ण केली जाईल असे लेखी करारात दिले. मराठवाडा स्वतंत्र विकास मंडळांची स्थापना करण्याची तरतूद केली. सन १९६७ मध्ये राज्य सरकारने स्वतंत्र मराठवाडा विकास मंडळाची स्थापना केली.[१४] जून १९७२ मध्ये स्वतंत्र कृषी विद्यापीठाकरिता आंदोलन झाले. जून १९७२ मध्ये परभणीला कृषी विद्यापीठ झाले. मराठवाडयातील रेल्वेमार्गाचा प्रश्न प्रलंबित होता. सन १९७४ मध्ये मराठवाडयातील आंदोलनाचा भडका उडाला. आंदोलनासाठी समाजातील सर्व स्तरातून उत्तम प्रतिसाद मिळाला.

**३.कोरेगाव शेतकरी मेळावा :**

एकसळचे ज्ञानोबा भोसले यांचे मार्गदर्शन व परिश्रमाने कोरेगाव येथे भव्य शेतकरी मेळावा झाला.[१५] हा मेळावा सन १९५८ मध्ये कोरेगाव, जि.सातारा येथे झाला. जि.प.उपाध्यक्ष बाबुराव घोरपडे यांनी सन १९६२ ते सन १९६७ या कालखंडात विविध माध्यमातून जनसेवा केली. राष्ट्रपिता म.गांधीजींच्या निर्घृण हत्येनंतर जनतेत प्रक्षोभ झाला. त्यावेळी बाबुराव घोरपडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घराबाहेर पडून फत्यापूर, मत्यापूर, खोजेवाडी, लिंबाचीवाडी, तारगाव, नांदगाव, अतीत, नागठाणे व कामेरी येथे सभा घेतल्या व दंगल भडकलेल्या जनभावना शांत केल्या.

**भूकंप मोर्चा व जिल्हयातून मदतीचा ओघ मिळविण्याचे आंदोलन:**

१० डिसें.१९६७ च्या रात्री पहाटे ४.४५ ला कोयना परिसर भूकंपाने हादरला. सर्वत्र हाहाकार झाला. माधवराव जाधव व काँग्रेसजन कोयनेकडे धावले. ढिगाऱ्याखालून प्रेते बाहेर काढली. जखमींना दवाखान्यात पाठविले. २४ तास पहारा ठेवला. धान्य, कपडा, भाकरी व औषधांचा ओघ सर्वत्र फिरून मिळविला. भूकंप पिडितांची माधवराव, बाळासाहेब, यशवंतराव मोहिते यांनी अहोरात्र थांबून सेवा केली. मदत कमी पडू लागली म्हणून श्री.माधवराव जाधव, भिकूनाना साळूंखे किवळकर यांनी मोर्चा काढून मदत केली. अन्न, कपडा, धान्य गोळा केले.[१६]

### २.१.२ कॉंग्रेस सामाजिक चळवळी:

### अ.जिल्हयातील गुंडगिरीचा बिमोड करण्याची कॉंग्रेस मोहिम:

स्वातंत्र्यप्राप्तीकरिता भूमिगतांनी मोठमोठया चळवळी केल्या. या भूमिगत चळवळीचा काही गुंड गैरफायदा घेत होते. त्यांनी जिल्हयात दहशत माजविली. या गुंडगिरीने सर्वसामान्य घटकांना उपद्रव होत होता. जिल्हा कॉंग्रेस कमिटीने पोलिसांना सहकार्य करून गुंडगिरी आटोक्यात आणली. या कामी वसंतरावदादा पाटील व किसन वीर यांनी पुढाकार घेतला.[१७]

### ब.सातारा जिल्हयातील सत्यशोधक चळवळी:

समाजातील वर्णवर्चस्वाला आव्हान देण्याचे काम सत्यशोधकांच्या माध्यमातून सातारा जिल्हयात केशवराव विचारे, भास्करराव जाधव, केशवराव जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केले. बहुजन समाजात जागृती करणे, शूद्रांची स्थिती सुधारणे, सामाजिक व धार्मिक गुलामगिरी नष्ट करणे, समाजाला शिक्षण देणे, अज्ञान अंधश्रध्दा दूर करणे, भेदाभेद दूर करणे, सामाजिक समता निर्माण करणे इ. कामे सामाजिक चळवळीच्या माध्यमातून केली.[१८]

### सातारी जलसा व लोकशिक्षण:

जलसे तमाशा तंत्राचे होते मात्र त्याचा मंत्र लोकशिक्षणाचा होता. या माध्यमातून अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रध्दा यावर सत्यशोधक समाजाने हल्ला केला. जलसांचे माध्यमातून जातीनिर्मूलनाची चळवळ हाती घेतली. सातारा जिल्हयातील भिलवडीचे पाटोळे, काले येथील रामचंद्र घाडगे, पाडळीचे जोतिराव फाळके, शिवथरचे आबासाहेब साबळे, कासेगावचे तातोबा यादव या सर्वांनी मानवाचे श्रेष्ठत्व ज्ञानावर आहे हा समाजवादी विचार मनोरंजनातून दिला. त्यांनी समाजशिक्षणाचा व लोकशिक्षणाचा पाया घातला. क्रांतिसिंह नाना पाटील व कर्मवीर भाऊराव पाटील हे सुध्दा सत्यशोधकी विचाराचे पाईक होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण सामुदायिक शिक्षणाची मोहिम उभारली.[१९]

### क.रस्ते सुधार मोहिम:

रस्ते हे दळणवळणाचे व विकासाचे साधन आहे. हे विचारात घेऊन कॉंग्रेस पक्षाने रस्ते विकासावर लक्ष केंद्रित केले. तिर्थक्षेत्र, किल्ल्याकडे जाणारे रस्ते, पूल बांधले, वाळवा–इस्लामपूर रस्ता डांबरीकरण करणेस वेळोवेळी सांगून तसे घडत नाही तेव्हा नागनाथआणा यांनी जोपर्यंत रस्ता होत नाही तोपर्यंत शेतसारा भरण्यास नकार दिला. त्यासाठी सर्व शेतकरी मंडळींनी आंदोलन केले. साराबंदी चळवळ सुरू झाल्याबरोबर पोलिसांच्या तुकडयांनी दमदाटी करण्यास सुरूवात केली. सरकारने वाळवे गावाला पोलिस पाठविले. गावाला छावणीचे स्वरूप आले. गावावर सारा भरण्यास दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पुरूष बाया–बापडया लहान मुलांना कडेवर घेऊन हजारोंच्या संख्येने हजर होते. साराबंदीत नागनाथ आण्णा व क्रांतिमाता यांनी मोलाचे सहकार्य केले. स्थानिक पुढाऱ्याने शेतकऱ्यांचे घरावर जप्ती आणून भांडीकुंडी जप्त केली. अखेरीस रस्ता तयार झाला मगच लोकांनी शेतसारा भरला.[२०]

**ड.सातारा जिल्हा दुष्काळ निवारणार्थ कॉंग्रेसची मोहिम:**

सन १९५५ च्या दुष्काळातसुध्दा जिल्हा कॉंग्रेसने जनतेला धान्य, चारा मिळवून दिला. फलटण शेतकऱ्यांच्या खंडवादीचा व कूपर कामगाराच्या प्रश्नाबद्दल वादळीचर्चा थांबवली. कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण व किसन वीर यांनी कामगारांचा व खंडकरी शेतकरी बांधवांचा प्रश्न सोडविला.[२१]

**इ.धोम, कण्हेर धरणाची मागणी – कॉंग्रेस मोहिम:**

विरोधी पक्ष कारवाया आणि दुष्काळी स्थिती यावर कॉंग्रेस पक्षानी किसन वीर यांच्याकडे जिल्हा अध्यक्षपद दिले. किसन वीर यांनी जिल्हा कॉंग्रेसची संघटना मजबूत तर केली व पक्षात एकसंघता ठेवली. गावस्वरूपी तालुका स्वरूपी सभा बैठका घेतल्या. कॉंग्रेस कमिटया बनविल्या. अधिक धान्य उत्पादन मोहिम राबविली. ग्रामविकास संघटना निर्माण करून त्याकडे तरूणांना सामावून घेतले व एकमुखी धोम व कण्हेर धरण योजनेची मागणी केली.[२२]

**२.१.३ सातारा जिल्हा कॉंग्रेस शैक्षणिक चळवळ:**

सातारा जिल्हयात शैक्षणिक चळवळ गतीमान झाली. सन १९८९ चे आकडेवारीवरून जिल्हयात २३१४ प्राथमिक शाळा व त्यामध्ये ३३७ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उच्चशिक्षणाच्या २० संस्था असून त्यामध्ये २९ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[२३] जिल्हयात १४२६ खेडयांना व शहराला वीजपुरवठा केला आहे. आर्थिक उलाढालीत जिल्हा अग्रेसर आहे. सहकारात जिल्हा अग्रेसर आहे. स्वातंत्र्यानंतर नेत्रदिपक सर्वांगीण विकासाचे जिल्हयातील श्रेय शैक्षणिक चळवळीला जाते.

**अ.बहुजन समाजासाठी, वंचित घटकांचेसाठी कर्मवीर भाऊरावांचे शैक्षणिक पर्व:**

सक्तीचे शिक्षण सुरू होण्यापूर्वी शिक्षणप्रसार कमीच होता. डोंगराळ व वंचित घटक शिक्षणापासून दूरच राहिले. अशा दुर्गम भागात सरकारी शाळासुध्दा निघू शकत नाही. अशा कठीण परिस्थितीत ६१५ व्हालंटरी शाळा सुरू करून शैक्षणिक क्षेत्रात जागृतीचे व अस्मितेचे नवे क्रांतिकारी पर्व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केले.[२४]

**ब.शैक्षणिक क्षेत्रातील मोफत शिक्षण सवलत: एक क्रांतिकारक योजना:**

गरीबी ज्ञानार्जनाचे आड येऊ नये म्हणून कॉंग्रेस पक्षाचे माध्यमातून यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाई यांनी ई. बी.सी. (मोफत शिक्षण) योजनेचे धाडसी पाऊल उचलले. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्वाखाली शिक्षणमंत्र्यांनी हा निर्णय घेतला. ज्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रू.१२०० च्या आत आहे. त्या पालकाच्या मुलांना सर्व स्तरावर मोफत शिक्षण देण्याचा धाडसी क्रांतिकारक निर्णय घेतला. हा निर्णय देशाच्या शैक्षणिक इतिहासात अभूतपूर्व ठरला.[२५]

**क.शैक्षणिक उठाव मोहिम:**

सातारा जि.प.ने जिल्हयात शाळा सुधार योजना राबवून शैक्षणिक उठाव केला. या संदर्भात जिल्हयाने भरीव कार्य केले.[२६]

| उठाव मोहिम सहाय्य (प्रगती दर्शक)(रूपये) | उठाव मोहिम सहाय्य (प्रगती दर्शक)(रूपये) |
|---|---|
| १२.७.८७ | १०२३६८० |
| १८.७.८७ | ३२४७९६९ |
| ३१.७.८७ | ५८८४२३५ |
| १३.८.८७ | ६९९६६९० |
| १५.८.८७ | ६७७८२८२ |
| रोख रक्कम | ५१८२८१ |
| वस्तूरूपाने | १६०९८२८ |
| बांधकाम रूपाने | ४६५०१७३ |
| एकूण | ६७७८२८२ |

**३.तांत्रिक शिक्षण: लष्करी शिक्षण**

तांत्रिक शिक्षणाचे वाढीसाठी अनेक प्रयोग राबविले. पुणे, कराड, औरंगाबाद, नागपूर, जे.जे.स्कूल ऑफ आर्टस, व्ही.जे.टी.आय. व वालचंद कॉलेज ऑफ इंजिनियरींग. राज्यात सैनिकी परंपरा उभी रहावी म्हणून तरूणांना लष्करी शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रात एन.सी.सी. हा कोर्स सक्तिचा केला. सातारा येथे जून १९६१ मध्ये सैनिक स्कूल सुरू केले. देशातील चारपैकी एक सैनिकी स्कूल सातारला मिळाले.[२७] या चळवळीतून पुढे पब्लिक स्कूलची योजना सुरू झाली.

**ड.सातारा जिल्हा ग्रंथालय चळवळ:**

जिल्हा ग्रंथालय चळवळीत सातारा व कराडचा फार मोठा वाटा आहे यामध्ये पु.पा.गोखले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. पु.पा.गोखले हे सन १९५५ मध्ये कुलाबा ग्रंथालय परिषदेस व सन १९५८ मध्ये जळगाव येथील ग्रंथालय परिषदेस उपस्थित होते. या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. १९५९–६१ मध्ये ते महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे अध्यक्ष होते. प्रा.डॉ.शिवाजीराव चव्हाण व ग्रंथपाल विठ्ठलराव पाटील यांचे त्यांना उत्तम सहकार्य होते. सुरूवातीच्या काळात प्रा.डॉ.अ.श्री.भडकमकर, प्राचार्य अ.रे.डिसूजा, वि.पु.गोखले, शा.द.घळसासी यांचा सहभाग होता.[२८]

**इ. सातारा जिल्हा प्रौढ शिक्षण:**

प्रौढ शिक्षण मोहिमेचा प्रवर्तक सातारा जिल्हा आहे. जिल्हयाला ‘रेझा पहलवी’ पारितोषिक मिळाले. लोकसंख्या व साक्षरता जनगणनेनुसारी पुढीलप्रमाणे :

| सन | लोकसंख्या | सन | साक्षरता टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९६१ | १४३०१०५ | १९६१ | ३३.९८ |
| १९७१ | १७२७३७६ | १९७१ | ३८.३२ |
| १९८१ | २०३८६७७ | १९८१ | ४८.१५ |

सातारा जिल्हयाचे साक्षरतेचे प्रमाण १९८१ मध्ये ४८.१५ टक्के असून साक्षरतेत १९८१ मध ये तो ७व्या स्थानावर होता.

**सातारा जिल्हा ग्रंथालय:**

सातारचे नेटिव्ह ग्रंथालय जिल्हयातील प्रथम क्रमांकाचे ग्रंथालय आहे. पुढे सन १९५२ मध्ये सातारमध्ये सिटी लायब्ररी व स्टेशन लायब्ररी अशी दोन ग्रंथालये निघाली. सातारच्या नेटिव्ह लायब्ररीचे ‘नगर वाचनालय’ असे नामकरण केले. सन १९६६ मध्ये या ग्रंथालयात ३६६९६ ग्रंथ होते. या ग्रंथालयात १८ दैनिके, २९ साप्ताहिके, नऊ पाक्षिके, ७८ मासिके येतात. साखळी योजनेव्दारा तालुका व ग्रामीण ग्रंथालयाला ग्रंथ वाचनासाठी दिले जातात.[२९] याप्रमाणे तालुकास्तरावर तालुका ग्रंथालये आहेत. वाई येथे सन १९५२ मध्ये लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांचे हस्ते ग्रंथालयाची स्थापना झाली.

**अ.बंडिग योजना धडक मोहिम:**

शेतकऱ्यांची संपन्नता जमिनीच्या उत्पादन क्षमतेवर अवलंबून राहते. सातारा येथे राज्य शेतकरी मेळावा भरला. या मेळाव्यापुढे शेतकऱ्यांना कॉग्रेस पक्षाच्या माध्यमातून कृषीमंत्री बाळासाहेब देसाईंनी मार्गदर्शन केले. जमिनीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी बंडिग योजनेची गरज आहे. जमिनीचा मगदूर (कस) वाढला की उत्पादन वाढते. जमिनीची प्रत सुधारण्यासाठी तळी, बांध घातल्याशिवाय उपाय नाही. जास्तीत जास्त जमिनीला बंडिग करण्याकडे कृषीमंत्र्यांनी लक्ष दिले.[३०]

**ब.सातारा जिल्हा (कॉग्रेस प्रणित) प्रगती मंडळ:**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुढील काळात जिल्हयातील सर्वसामान्य घटक शेतकरी यांच्या उध्दाराकरिता व जनमाणसात कॉग्रेसची पत उत्तम राहावी याकरिता जिल्हा प्रगती मंडळाची स्थापना झाली. या मंडळात किसन वीर आबा, राजारामबापू पाटील, बाबुराव घोरपडे, वसंतराव बेगमपूरे, दादासाहेब जगताप, लक्ष्मणशास्त्री जोशी, भिलारे गुरूजी, भोईटे गुरूजी, माधवराव धुमाळ व अनेक कॉग्रेस कार्यकर्ते सहभागी होते. या प्रगती मंडळामार्फत जिल्हाभर विविध सार्वजनिक उपक्रम व शेतीसुधार चळवळ हाती घेतली. डोंगरी भागातून गुरूत्वाकर्षणतंत्राने शेतीला पाणी देण्याची पध्दत सुरू केली. शेतीसाठी लहानमोठया पाटबंधारी योजना सुरू केल्या. शेतकऱ्याची संघटना बांधून शेतीविकासाच्या बाबतीत सरकारी दरबारी शेतीसुधार योजनाबाबत पाठपुरावा केला.[३१] लोकसंघटन करून श्रमदानायोगे परिसर स्वच्छ ठेवणे, लोकवर्गणीतून जुन्या ग्रामदेवालयाचा जिर्णोध्दार करणे, सामाजिक समता प्रस्थापित करणे, दलित व अस्पृश्यांना आपआपल्या गावातील ग्रामदेवतांची मंदिरे दर्शनासाठी खुली करणे, गाव, वाडी व वस्त्या येथे ग्रामसफाईचे आयोजन करणे. दलितवस्ती सफाई व त्यांच्यासमवेत सहभोजन घेणे ही त्यांची उद्दिष्टे होती. सूतकताई, दारूबंदी, स्वातंत्र्य पोवाडे, प्रभातफेऱ्या हे उपक्रम या मंडळाव्दारे चालविले.

**क.सर्वोदय चळवळ:**

म.गांधी, विनोबा भावे, खेर, शंकरराव देव, मामासाहेब देवगिरीकर, मोरारजी देसाई इ. व्यक्तिंच्या प्रयत्नातून सर्वोदय चळवळ आखण्यात आली. ग्रामविकासाचा विचार यात सातत्याने घडला. सातारा जिल्हयातील डोंगराळ भागातील 'सर्वोदय चळवळ योजना' महाबळेश्वरला सुरू झाली. कार्यकर्ते व जिल्हयातील तरूण खेडोपाडी जाऊन लोकांच्या गाठीभेटी घेत. स्थानिक समस्या लक्षात घेऊन दादा धर्माधिकारी, विनोबा भावे, आप्पासाहेब पटवर्धन, आचार्य भिसे, शामराव पाटील व मधुकरराव चौधरी यांची मदत व मार्गदर्शन मिळत असे.[३२]

**ड.ग्रामराज्य भूदान चळवळ:**

विनोबाजींच्या भूदान चळवळीचाही कृतीशील पुरस्कार केला. स्वतःच्या मालकीची मोठी जमीन त्यांनी भूदान चळवळीत दान केली. साताराचे भिलारे गुरूजी एक आदर्श समाजसेवक होते. कॉंग्रेस पक्षाला मेळाव्यातून, शिबीरातून त्यांनी 'ग्रामराज्याचे' व स्वयंपूर्ण गाव' योजनेचे महत्व सांगितले यानुसार प्रत्येक खेडे आर्थिकदृष्टया स्वावलंबी झाले पाहिजे. प्रत्येक खेडयाचा विकास स्वतः करून घेतला पाहिजे याला शासनानी सहकार्य केले पाहिजे. ग्रामपंचायत ही ग्रामविकासाची ग्रामराज्याची पायाभूत केंद्रे आहेत असे मानण्यात आले होते. सातारा कॉंग्रेसचे भिलारे गुरूजी हे पूर्णपणे गांधी विचारांचे पाईक होते.[३३]

**इ.शेती अधिक उत्पन्न कार्यक्रम मोहिम:**

विशेष घटक योजना: सन १९८२–८३ कॉंग्रेस शासनाने अनु.जाती, नवबौध्द यांच्यासाठी घटक योजना सुरू केली. सहाव्या पंचवार्षिक योजनेव्दारा प्रत्येक पंचायत समितीतून ७० लाभार्थी याप्रमाणे ७७० लाभार्थींची निवड केली. प्रत्येक लाभार्थीला सुधारित बियाणे, सुधारित औजारे इ.मदत दिल्याने उत्पादनात भरीव वाढ झाली. या योजनेअंतर्गत लघुसिंचन योजनेवर भर दिला. जिल्हयात बीजोत्पादन कार्यक्रम राबविला.[३४]

**ई.शेतकऱ्यांना नुकसान भरपाई :**

दि.२५ ते २७ डिसेंबर १९८६ मध्ये सातारा जिल्हयातील खंडाळा, फलटण, माण व महाबळेश्वर या तालुक्यातील ५३ गावामध्ये गारपीट व वादळी अवकाळी पाऊस झाला त्यामुळे रब्बी ज्वारी, पीक नष्ट झाले. तसेच गहू, हरभरा, द्राक्षबागा, डाळींबे व पानमळा पिकांचे नुकसान झाले. या गावांच्या नुकसानीचे पंचनामे करून एकूण ७६५० शेतकऱ्यांच्या ५३९७६४ हेक्टरातील पिकावर अनिष्ट परिणाम झाला. म्हणून संबंधितांना नुकसान भरपाई देण्याचा धडक कार्यक्रम राबविला.[३५]

**३.कॉंग्रेस नेतृत्वाखालील कृषक चळवळ:**

प्रारंभी कॉंग्रेसने शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले असले तरी सन १९१५ नंतर म.गांधींच्या आगमनाने देशव्यापी चळवळीत शेतकऱ्यांचे प्रश्न उचलून धरले गेले. म.गांधीनी चंपारण्य, खेडा व बार्डोली या चळवळींचे नेतृत्व केले.[३६]

**४.दलित भूमिहक्क चळवळी:**

दलितामध्ये महार, मांग, वेठिया इ.जाती वतनदारी होत्या. १९२८ मध्ये डॉ.आंबेडकरांनी कायदेमंडळात वतन दुरूस्ती विधेयक मांडले. काहींना जमिनी नव्हत्या, कोकणातील महार भूमिहीन होते. सरकार व गाव वतनाच्या नावाखाली अन्यायी कामे करून घेत. १६ सप्टें.१९३९ ला वतनदार परिषद झाली. आंबेडकरांनी वतने सोडायला सांगितली. स्वातंत्र्यानंतर वतने खालसा केली.[३७]

**५. कॉंग्रेस व औद्योगिक चळवळ:**

मुंबईमधील औद्योगिकीकरणाची सुरूवात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच झाल्यामुळे महाराष्ट्र हे राज्यनिर्मितीच्यावेळी देशातील अग्रेसर राज्य होते. साठीच्या दशकात महाराष्ट्रातील कॉंग्रेस राज्यकर्त्यांनी औद्योगिकविषयी उदार धोरण स्विकारलेले दिसते. सन १९६१ मध्ये राज्यातील कारखान्यांची संख्या ८२३३ होती ती सन १९६६ मध्ये ९०४३ व सन १९७२ मध्ये १०३८२ झालेली दिसते.(गव्हमेंट ऑफ महाराष्ट्र १९७८ स्टॅटिस्टिकल अ‍ॅबट्रॅक्ट ऑफ महाराष्ट्र स्टेट मुंबई डायरेक्टोरेट ऑफ इकॉनॉमिक्स अ‍ॅन्ड स्टॅटि., मुंबई) देशातील सहकारी बँकाच्या २५ टक्के बँका महाराष्ट्रात होत्या. औद्योगिक अर्थव्यवस्थेचा विस्तार झाला तरी तो समतोल प्रमाणात झाला नाही.

**महाराष्ट्रातील विभागवार औद्योगिक वाढ:**

| विभाग | कारखान्यांची संख्या | | |
|---|---|---|---|
| | १९६१ | १९६६ | १९७२ |
| मुंबई | ४३२६ | ४४९० | ५१३९ |
| कोकण | ६२९ | १४८१ | १२०७ |
| उत्तर महाराष्ट्र (नाशिक, धुळे, जळगाव) | ७६९ | ६६१ | ५९७ |
| पुणे | १९१९ | १८८१ | २११२ |
| औरंगाबाद | २४० | २१७ | २९५ |
| नागपूर | ८८१ | ९४२ | १०३२ |
| महाराष्ट्र (एकुण) | ८७७२ | ९०४३ | १०३८२ |

गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र १९६१–१९७५ को.ऑपरेटिव्ह मुव्हमेंट इन महाराष्ट्र, मुंबई

**उद्योगधंदयातील वाढ:**

सन १९६१ ते १९७२ प्रारंभीचा काळ लक्षात घेतला तर औद्योगिक क्षेत्रात वाढ झाली. परंतु तिचे स्वरूप मुंबई केंद्रितच राहिले. सन १९६१ मध्ये एकूण कारखान्यापैकी ५० टक्के कारखाने व ६५ टक्के मजूर वर्ग मुंबईच होता. १९७२ साली ते प्रमाण थोडेफार घटल्याचे दिसते. उद्योगाचे संपूर्ण केंद्रीयकरण हे बृहन्मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक या पटटयातच झालेले दिसते. जुने उद्योग मुंबई सोडून गेले नाहीत व नवीन उद्योग मुंबई बाहेर गेले नाहीत.

**स्वातंञ्योत्तर औद्योगिकता:**

सन १९४८ मध्ये मुंबई राज्य परिवहन मंडळाने कराड व सातारा येथे वर्कशॉप, दोन छापखाने व भात गिरण्या सुरू केल्या. कोरेगाव येथे वीजनिर्मिती केंद्र झाले. ओगलेवाडीला सोप फॅक्टरी निघाली. लिंब सातारा येथे यंत्रमाग सुरू झाला.

**१९५१ ते १९६०:**

सन १९५४मध्ये फलटण येथे श्रीराम सहकारी साखर कारखाना व कराड येथे हळद पावडरचा कारखाना तर १९५७-५८ मध्ये कोयनानगरला हातमाग व अंबर चरखा तयार करण्याचा कारखाना व फलटणला कॉटन जिनिंग अॅन्ड प्रोसेसिंग फॅक्टरी सुरू झाली.(सातारा जिल्हा गॅझेटियर, मराठी आवृत्ती, १९९९, पृ.४१०)

**१९६० ते १९७०:**

सन १९६४ कराड कोयना सिमेंट वस्तू निर्माण करणारी सहकारी संस्था निघाली. १९६१ सातारला यशवंत सहकारी औद्योगिक वसाहत झाली. १९६७ मध्ये सातारला अजिंक्य इंडस्ट्रिज हा कारखाना सुरु झाला. १९६८ ला भुईंज सहकारी साखर कारखाना, १९६९ मरळी (पाटण) येथे बाळासाहेब साखर कारखाना निघाला व शिरवडे येथे सहयाद्री सहकारी साखर कारखाना निघाला. सातारला महाराष्ट्र औद्योगिक वसाहत स्थापन झाली. १९७१ नंतर जलद गतीने औद्योगिक विकास झाला. अभियांत्रिकी रासायनिक, डिस्टिलरी, कागद, खाद्य, साखर कारखाने इत्यादी उद्योगात वाढ झाली. विजेच्या वाढत्या मागणीतून कोयना जलविद्युत प्रकल्प उदयास आला. सातारा जिल्हयात जलसिंचनासाठी या धरणातून कोयना नदीत काही प्रमाणात पाणी सोडले जाते. या प्रकल्पाशिवाय जिल्हयात वीर (१९७५), यवतेश्वर (१९८८), कन्हेर (१९९०) व धोम (१९९०-९१) ही जलविद्युत केंद्रेही सुरू आहेत.[३८]

**कराड शहराची विकास मोहिम:**

सन १९६२ ते १९८१ या वीस वर्षात कॉंग्रेस राजकीय पक्षाच्या मार्गदर्शनानुसार पी.डी.पाटील यांनी कराड शहर व परिसराचा भरीव विकास केला. नगरपालिकेतील सर्व ठराव एकमताने मंजूर केले. यामुळे सर्व क्षेत्रातील विकासकामे सहज झाली. कराड शहरातील औद्योगिक प्रगती, पालिका इमारत, रस्ता रूंदीकरण, बाजूची गटारे, भुयारी गटार योजना, पाणीपुरवठा, रस्ते, सॅनिटरी विभाग, पथदिवे, प्रा.शाळा, टाऊन प्लॅनिंग, अग्निशमन केंद्र, स्मशानभूमी, शॉपिंग सेंटर, बसस्थानक, भाजी मंडई, शिवाजी स्टेडियम, ग्रंथालय, यशवंतराव चव्हाण स्मृतीसदन, प्रितीसंगम बाग, नागरी पर्यावरण सुधारणा प्रकल्प इ. कामे पी.डी.पाटील व त्यांचे सहकाऱ्यांनी उभी केली. कराडची ही गतीमान चळवळ ही त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देतात.[३९]

**२. भारतीय शेतकरी कामगार पक्ष:**

महाराष्ट्रात कॉंग्रेसचे कार्य सामान्य घटकापर्यंत पोहचविण्याचे काम सत्यशोधक चळवळीने केले. शेतकरी कामगार पक्षाला सत्यशोधक ब्राहमणेत्तर चळवळीची पार्श्वभूमी आहे. शोषणमुक्त समाज हे शेतकरी

कामगार पक्षाचे ध्येय आहे. कॉंग्रेस पक्षात बहुजन समाजाला पुरेसे प्रतिनिधीत्व दिले जात नाही. स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहे. कॉंग्रेसमधील भांडवलधारकामुळे सर्वसामान्यांची मुस्कटदाबी होते आहे म्हणून केशवराव जेधे, शंकरराव मोरे इत्यादी नेतेमंडळी कॉंग्रेसमधून बाहेर पडून त्यांनी सन १९४८ मध्ये शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. देश स्वतंत्र झाल्यापासून काही अपवाद वगळता महाराष्ट्रावर कॉंग्रेसने सातत्याने राज्य केले आहे. महाराष्ट्र इतिहास संशोधक सखोल अभ्यास करतील तेंव्हा ते निष्कर्षाप्रत येतील की प्रत्येक सुधारणेच्या बुडाशी इथला डावा पक्ष आहे. इथल्या डाव्या विचाराच्या पक्षांनी सतत जी आंदोलने केली, जे लढे दिले या रेटयामुळे सत्ताधारींना सुधारणावादी बाबी कराव्या लागल्या. सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाने भांडवलदारांची बाजू घेतली. जनतेला दिलेली वचने पाळली नाहीत. उलट जनतेचे लढे चिरडून टाकले. गेल्या साठ सत्तर वर्षात जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा सत्ताधीश पक्षाला पूर्ण करता आल्या नाहीत. बेकारी व बेरोजगारीचे प्रश्न खूपच गंभीर झाले. भूमिहीन शेतमजूर, मजूर गाव सोडून शहरातील बकाल वस्तीचा आधार घेताना दिसतात. झोपडपट्टया दिवसेंदिवस वाढल्या. राज्यात सहकाराचे पर्व सुरू झाले. अर्थकारणाला गती आली. परंतु सहकारातून घराणेशाही सुरू झाली. सहकारी साखर कारखान्यातून 'शुगर लॉबी' पुढे आली. सामान्य शेतकरी व मजूर कर्जबाजारी झाले. सामान्याच्या उध्दाराचा प्रश्न अनुत्तरीतच राहिला. शिक्षणप्रसार खूप झाला. परंतु डोंगरदऱ्यातील माणूस शिक्षणप्रवाहापासून वंचितच राहिला. दुष्काळ हटविण्याचे ठोस उपाय झालेच नाहीत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला. पर्यावरणाचा समतोल ढळला. भ्रष्टाचाराने देश पोखरला. कायदा व सुव्यवस्था सांभाळणारी यंत्रणा गुंड व गुन्हेगारांची बटीक झाली. वंचितांचे उत्थानासाठी शेतकरी कामगार पक्षाने संघर्ष केला. वेळोवेळी लढे दिले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ मनापासून लढविली. भूमिहीनांसाठी आंदोलन केले. शेतीमालाला रास्त भाव यावा यासाठी रस्त्यावर उतरले. महागाई आणि उपासमारविरोधी प्रखर आंदोलने केली. कापूस एकाधिकार योजनेचा आग्रह धरला. बहुजनांच्या शिक्षणाकरिता श्वेतपत्रिका लढा दिला. धरणग्रस्तांसाठी दीर्घ आंदोलने केली. एन्रॉन हटाव आंदोलन उभे केले. दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी शासनाविरोधी चळवळी केल्या, वीजमंडळाच्या गलथान कारभाराविरूध्द आंदोलने केली. सीमावर्ती मराठी भाषिकांच्या न्यायासाठी लढे दिले. सेझचा लढा उत्तमपणे लढविला. श्रमिकांना वीजेत सवलत देण्याबाबत मोर्चे काढले. जाग तिकीकरणाविरोधी लढा दिला.

**२.२.१ सातारा जिल्हयातील शेतकरी कामगार पक्षाच्या चळवळी:**

सन १९६० ते १९६९ मध्ये कॉंग्रेस पक्षाला राजकीय स्थिरता होती. तरीसुध्दा या कालखंडात विरूध्द पक्ष सक्रिय होता. या सर्वात शेकाप हा प्रभावी पक्ष होता. संयुक्त महाराष्ट्र समितीचे प्रयोजन संपले तरी सरकारला विरोध करण्याची व वेळप्रसंगी रस्त्यावर आणण्याची हिंमत विरोधी पक्षात आलेली होती.

**अ.शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावा व अन्नधान्य व्यापार शासनाने ताब्यात घ्यावा मोर्चा**

१३ डिसेंबर १९६० रोजी आमदार कृष्णराव धुळुप यांचे नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षाने एक प्रचंड मोर्चा विधानसभेवर नेला. या मोर्चामध्ये शेतकरी व शेतमजूर मोठया संख्येने उपस्थित होते. साधारणपणे ५००० शेतकरी या मोर्चात सहभागी झाले होते.[४०]

**ब.इगतपुरी शेतकऱ्यांचे आंदोलन:**

नाशिक जिल्हयातील इगतपुरी येथील भातशेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी भाताच्या भाववाढीसाठी अन्नधान्यमंत्री यांच्याबरोबर वाटाघाटी केल्या. परंतु त्यात यश न आल्याने १९ जाने.१९४९ रोजी येथील शेतकरी जनतेने सत्याग्रह केला. शासनाने दडपशाही केली. शासनाने शेकडो स्त्री–पुरूषांना अटक केली.[४१] ११७ गावातील १२००० शेतकऱ्यांनी सत्याग्रह केला.

**महार वतन : गुलामगिरी थांबविण्याकरीता आंदोलन:**

१९ मार्च १९२८ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी महार वतन समाजाची अधोगती करते तेंव्हा ते नष्ट करण्याचे बील मांडले. यानंतर १९४७ मध्ये बी.सी.कांबळे यांनी पलूस या गावी महार मंडळींनी सवर्णाची कामे करू नये, महारवतनी रयतावा व्हावा म्हणून आंदोलन केले. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांनी वाळवा व तासगाव तालुक्यातील ८० गावातील प्रत्येक गावातून ५ महार प्रतिनिधींची संघटना बांधली.[४२] पडवळवाडीचे वस्ताद तुकाराम खोत व सहकारी यांना बरोबर घेऊन गावोगावी पायी प्रवास करून लोकांना 'वाळवा परिषदे'चे निमंत्रण दिले. या महार परिषदेला उत्तम प्रतिसाद मिळाला. सन १९६० मध्ये कॉग्रेस पक्षाकडे सत्ता आली तेव्हा यशवंतराव चव्हाणांनी महारवतन रदद् करण्याचे बील मांडून ते पास करून घेतले. अशा रीतीने या अमानवी रूढीचे उच्चाटन करण्यास प्रारंभ झाला.

**ड.संयुक्त महाराष्ट्र लढा:**

या लढयात शेतकरी कामगार पक्षाने प्रारंभापासून ते आजअखेर सक्रिय सहभाग घेतला. याकरिता शेकापने मोठमोठी आंदोलने केली. १०५ हुतात्मे झाले. या लढयात क्रांतिसिंह नाना पाटील, जी.डी.लाड, एस.एम.जोशी, प्र.के.अत्रे, केशवराव जेधे, एन.डी.पाटील, ना.ग.गोरे, कॉ.डांगे यांचे मोलाचे योगदान आहे. प्रतापगडावर नेहरूंना काळी निशाणे दाखविली. १ मे १९६० रोजी मराठी भाषिक राज्य झाले. परंतु अजून १० लाखापेक्षा अधिक मराठी भाषिक कर्नाटक राज्यात आहेत. शेकाप व डावी आघाडीने हा लढा अजून जिवंत ठेवला आहे. आजसुध्दा प्रा.एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा 'सीमालढा' चालू आहे.[४३]

**ई.वैरागचा गोळीबार धरणे आंदोलन:**

६ सप्टेंबर १९७१ अधिवेशनाचा पहिला दिवस होता. वैराग व नागपूर येथे शेकापने दुष्काळ आंदोलन केले. आंदोलनाने शासन गडबडून गेले. शेतकरी, मजूर, बलुतेदार यांना जगणे मुश्कील झाले म्हणून शेकापच्या नेतृत्वाखाली आंदोलन पेटले. हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी शासनाने गोळीबार केला. यात पंधरा निरपराध बळी गेले. वैराग या सोलापूर जिल्हयातील ठिकाणी वारंवार दुष्काळ पडतो. या

दुष्काळाविरूध्द दाद मागण्यासाठी शेतकऱ्यांचा विराट मोर्चा बार्शी मामलेदार कचेरीवर नेला. शेकापच्या सोलापूर शाखेच्या नेतृत्वाखाली सांगोला, पंढरपूर, माढा, मोहोळ येथील कचेरीवर मोर्चे काढले. सरकारने शेतसारा, कर्जे माफ अथवा तहकूब केलीच नाहीत.[४४] गुरांना चारा नसल्याने गुरे कत्तलखान्याकडे जाऊ लागली. या बिकट परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी शेकापने विराट आंदोलन केले व बार्शी कचेरीवर मोर्चा नेऊन दुष्काळकामे पुन्हा सुरू करा, कर्जवसुली तहकूब करा, प्रत्येक शेतकऱ्याला एकरी ५०० रू.दया, तगाई विनाविलंब दया अशा सूचना केल्या. वैराग येथील सहकारी गुदामावर धरणे आंदोलन झाले. प्रशासनाने गुदामाचे ६०० फूटावर १४४ कलम लागू केले. मोर्चेकरी १०००० होते. यामध्ये स्त्रिया २००० होत्या. येथे गोळीबार झाला. यात सात युवकांचा बळी गेला.[४५]

### इस्लामपूर येथील १९७२ चा दुष्काळी मोर्चा व गोळीबार:

सन १९७२ चा दुष्काळ महाभयंकर होता. चारा कडबा मिळतच नव्हता. एक रूपयालासुध्दा पेंडी मिळत नव्हती. शासनाने तगाई देण्याचे मान्य केले पण प्रत्यक्ष हाती काहीच नाही. तगाई तलाठयाकडून मिळत असे. त्याला सातबारा जोडावा लागत होता. त्याला पदरचे दोन रूपये दयावे लागत होते. गुरासाठी छावण्या उघडल्या नसल्याने वाळवा परिसरातील स्थिती गंभीर झाली. वाळवा तालुक्यात ८२७७७ जनावरे होती. चारा नाही, मजूरांना मजूरी नाही यामुळे स्वस्त धान्य घेता येत नव्हते. धान्य दुकानदार काळा बाजार करीत. भाई प्रा.एन.डी.पाटील यांनी जनतेच्या न्यायी मागण्यासाठी १९.१०.१९७२ रोजी इस्लामपूर कचेरीवर मोर्चा काढण्याची घोषणा केली.[४६] परिसरातून प्रचंड संख्येने मोर्चेकरी ज्वारीची करपलेली ताटे व वाळलेले भुईमुगाचे वेल घेऊन जमा झाले. मोर्चा शिस्तबध्द झाला. मोर्चा शाळा नं.२ जवळ अडविला. कचेरी परिसरात ३७ कलम पुकारले. मोर्च्यात साधारण १५ मागण्याचे निवेदन दिले यात तालुका दुष्काळी म्हणून जाहीर करा. मागेल त्याला काम दया, दुष्काळग्रस्तांना ४ रू. मजूरी दया, कडबा, चारा त्वरीत दया, शेतसारा माफ करा कर्जे वसुली थांबवा, कोरडया विहीरीची वीजबिले माफ करा, खडी तलाव, हत्ती तलाव यांचे दुष्काळी काम त्वरीत सुरू करा, दुष्काळग्रस्त विद्यार्थ्याला ५० रू. भोजन भत्ता दया. परीक्षा फी सरकारने भरावी. दरडोई १२ किलो धान्य स्वस्त धान्य दुकानातून दयावे इ.

प्रा.एन.डी.पाटील यांचेवर लाठीमार झाला. पाठोपाठ गोळीबार झाला. प्रा.एन.डीचा पुतण्या सुरेश, क्रांतिवीर रंगराव यांचा पुतण्या राजेंद्र तसेच दिलीप निलाखे हे युवक गोळीबारात ठार झाले. जकाईवाडीचा रंगराव गायकवाड ठार झाला.[४७] मे १९६७ ते डिसें.१९७२ या साडेचार वर्षात शासनाने २०५ वेळा गोळीबार केला. ५५१ लोक जखमी झाले. १५३ लोक ठार झाले. मोर्चा चौकशीकरिता पाटकर आयोग नेमला. मोर्चा योग्य असल्याचा निकाल त्यांनी दिला. त्यांच्या १३ पैकी १० मागण्या पूर्णपणे बरोबर होत्या. ९ व १० या दोन मागण्या योग्यच होत्या परंतु त्यांच्या अधिकारक्षेत्रात येत नव्हत्या.

**ऊ.एन्रॉनचा लढा:**

डाव्या पक्षानी प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचे नेतृत्वाखाली हा एन्रॉनचा लढा लढला. २८८ विरूध्द ८ सदस्य असा हा विषय लढा होता. एन्रॉनचे समर्थन करणारे २८० सदस्य होते. शरद पवार, मनोहर जोशी, गोपीनाथ मुंडे यांच्या संख्याबळाविरूध्द शेकापचे पाच, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे दोन व जनता दलाचा एक असे आठ सदस्य होते. प्रा.एन.डी.पाटील यांनी जनतेपुढे सत्य मांडले. प्रशासन उघडे पडले. देशभक्तीचा आव आणणाऱ्यांनी कित्येक कोटी रूपये बळकावले हे त्यात समजले. डावी आघाडी व शेकाप यांनी एन्रॉन घालविण्यासाठी खूप प्रयत्न केले. शासनाने आंदोलनावर गोळीबार व लाठीमार केला परंतु आंदोलक यापासून विचलित झाले नाहीत.[४८]

**२.२.२ शेतकरी कामगार पक्ष: सामाजिक चळवळी:**

**अ.उपासमार विरोधी कृती समिती – महागाई विरोधी आंदोलने:**

सन १९६४ पासून राज्यात जीवनावस्यक वस्तूंची प्रचंड टंचाई निर्माण झाली. सर्वसामान्य लोकांना धान्य, खादयतेल, साखर इत्यादी वस्तू सहजासहजी उपलब्ध होईनात. व्यापारी मंडळी कृत्रिम टंचाई निर्माण करून अधिकाधिक नफा घेऊ लागले. सामान्याकरिता रास्त भावाची सरकारमान्य दुकाने सुरू करण्याची गरज होती. परंतु शासनाचे त्याकडे दुर्लक्ष झाले. इ.स. १९६५ मध्ये प्रमुख विरोधी पक्षानी 'उपासमार विरोधी कृती समिती' स्थापन केली. या आंदोलनात शेतकरी कामगार पक्षाने प्रमुख भूमिका घेतली. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी महाराष्ट्रभर भेटी देऊन जनजागृती केली. सभा, मोर्चे काढले. या संदर्भात प्रा.डॉ.एन.ड ी.पाटील यांना अटक झाली.[४९]

**ब.राज्यातील प्रचंड धान्य टंचाई कृतीसमिती व धान्य सत्याग्रह:**

सन १९६५ मध्ये राज्यात प्रचंड धान्यटंचाई झाली. जीवनावश्यक वस्तूंचा तूटवडा निर्माण झाला. सर्वसामान्य माणूस वैतागून गेला. गोरगरीबांची उपासमार होऊ लागली. प्रा.एन.डी.पाटील यांनी उपासमारीने त्रस्त झालेल्यांची संघटना बांधली. प्रमुख विरोधी पक्षांना एकत्रित केले. सर्वांच्या विचाराने 'उपासमार कृती समिती'ची स्थापना केली. या दरम्यान कोल्हापूर येथे धान्य सत्याग्रह झाला. हा सत्याग्रह फारच गाजला. प्रा.एन.डी.पाटील यांनी यात सक्रीय सहभाग घेतला. त्यांना व त्यांचे सहकार्यांना अटक झाली.[५०]

**क.दुधबंदी आंदोलन:**

दुधनिर्मिती व विक्री हा शेतकऱ्यांचा प्रमुख जोडधंदा आहे. मोठया कष्टाने राबून हा दुधाचा व्यवसाय तो करतो. सन १९४८–४९ मध्ये साखर शिधा पत्रिकेवर मिळत होती. खुल्या बाजारात साखर मिळत नव्हती. शिधा पत्रिकेवर शहरी लोकांना अधिक साखर व खेडयातील लोकांना साखर कमी मिळत होती. तेव्हा क्रांतिसिंह नाना पाटील यांनी ''आम्हाला साखर नाही मग तुम्हाला दूध नाही''[५१] अशी घोषणा केली. ऐन दिवाळीच्या मोक्यावर हे आंदोलन केले. या आंदोलनाची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रभर झाली.

**ड.साखर कारखान्यांचे यशवंतराव प्रतिष्ठान:**

घरकूल, अल्पबचत यशवंतराव प्रतिष्ठानच्या कपाती दोन ते तीन वर्षे कारखान्यांनी कपाती केल्या परंतु त्या प्रतिष्ठानकडे भरल्याच नाहीत. या संदर्भांत प्रा.एन.डी.पाटील यांनी आवाज उठविला. त्यामुळे त्या रकमा प्रतिष्ठानकडे वर्ग करायला लागल्या. विधानसभेत विचारलेल्या प्रश्नाच्या भडिमाराने शासनाला ८० कारखान्यांची खाती गोठवणे भाग पडले.

**भूविकास बँकेवर धडक मोर्चा:**

कवठेएकंद, बहादूरवाडी, कोरेगाव, गोटखिंडी, आष्टा येथील ६००० शेतकऱ्यांनी भाई अविनाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली धडक मोर्चा काढला व भूविकास बँकेवर दबाव टाकला. बँकेच्या तक्रारीचा पाढा वाचला. यामुळे बँकेच्या कामात सुधारणा झाली.[५२]

**इ.वाळवा इस्लामपूर रस्ता डांबरीकरणासाठी साराबंदी आंदोलन:**

स्वातंत्र्यानंतर चोवीस वर्षे झाली तरी वाळवा–इस्लामपूर रस्ता डांबरीकरण झाले नाही. नागनाथ नायकवडी यांनी वाळवा गावच्या शेतकरी व ग्रामस्थांना एकत्र केले व डांबरीकरणाच्या संदर्भांत सत्याग्रह करण्याचा मार्ग सुचविला. जोपर्यंत सरकार डांबरीकरण करीत नाही तोपर्यंत शेतसारा भरायचा नाही असे आंदोलन सुरू केले. या चळवळीत क्रांतीमाता लक्ष्मीबाई नागनाथआण्णा व सौ.कुसुमताई नायकवडी यांनी त्यांच्यात प्रबोधन करून त्यांचे उत्तम संघटन केले. शेवटी शासनाला नमते घ्यावे लागले व रस्ता डांबरीकरण झाले.[५३]

**ई.सातारा रेल्वे चळवळ:**

सातारा शहर रेल्वेमार्गापासून दूर अंतरावर होते. सन १९६९–१९७२ मध्ये लोहमार्गाचे ब्रॉडगेज करण्याचे नियोजन होते. रेल्वे वाहतूक मार्गात थोडा बदल करून रेल्वे सातारारोड ऐवजी सातारा शहराजवळून जावी अशी मागणी जनतेतून झाली. शहरातील सेवाभावी कार्यकर्त्यांनी ही मागणी उचलून धरली परंतु शासन त्यास अनुकुल नव्हते. तेव्हा लोकानी आंदोलन केले. दत्ता वाकळेनी व शहरातील अनेक कार्यकर्त्यांनी याकरिता संघर्ष केला. सुरूवातीला शासन तयार नव्हते परंतु आंदोलन उग्र होते आहे हे पाहून शासनानी नमते घेतले. सातारा रोड ऐवजी सातारा क्षेत्र माहुली गावाजवळ रेल्वेस्थानक झाले. यामुळे पूर्वी कोरेगाव शहरातून जाणारा लोहमार्ग कोरेगावच्या पश्चिमेकडे वळवून नवीन स्थानक उभारण्यात आले.[५४]

**२.२.३ शेतकरी कामगार पक्ष: कृषि चळवळी:**

सरकारचे शेतीविषयक धोरण हे धरसोडीचे आहे. ही ब्रिटिश धोरणे अशीच चालू ठेवल्यास राज्यात टंचाई व दुर्भिक्ष्य येईल. शेतीवर पडणारा अवाजवी भार पर्यायी रोजगार पूरवून हलका करावा. जमिनदारी पध्दतीचे निमूर्लन करावे असे शंकरराव मोरे यांनी सरकारला सांगितले. शेती प्रशासनातील त्रूटी तुळशीदास जाधव यांनी सांगितल्या. कोरडवाहू शेतीकडे शासनाचे दुर्लक्ष होते आहे. शासनाचा बराच खर्च आस्थापनावर

होतोय. शेकापनी शेतीकरिता कायमस्वरूपी पाणी तरतूदीवर जोर दिला. सामूहिक शेतीकडे शासनानी अधिक लक्ष दयावे असे त्यांनी सूचित केले.

**अ.शेतीमालाला योग्य भाव मिळावा:**

शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावा, शेतीमालाच्या किमती शासनानी बांधून दयाव्यात. ही मागणी देशात प्रथम सन १९४८ मध्ये शेतकरी कामगार पक्षाने करून या प्रश्नावर त्यांनी वारंवार आवाज उठविला. हा प्रश्न धसाला लावण्यासाठी वारंवार आंदोलने केली. अडते व सटोडिये शेतकऱ्यांची लूट करतात म्हणून त्यांचे उच्चाटन व्हावे ही मागणी केली. सन १९७० मध्ये भाई प्रा.एन.डी.पाटील यांनी शेतीमालाच्या भावाबद्दल एक पुस्तिका लिहिली. विदर्भातील पांढरे सोने कापूस याला भाव मिळावा. अडते, दलाल लूटमार करतात म्हणून प्रा.एन.डी.पाटील यांनी उग्र आंदोलन करून कापूस एकाधिकार योजना शासनाला करायला भाग पाडले.[५५]

**ब.शेतकऱ्यांचे लेव्ही विरूध्द आंदोलन:**

नागनाथ आण्णांचे नेतृत्वाखाली वाळवा तालुक्यातील शेतकऱ्यांनी लेव्ही विरूध्द आंदोलन केले. शेतकऱ्यांना सरकार लेव्हीचा दर योग्य देत नाही. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना लागणारे सिंमेंटचे पत्रे, सिंमेंट इ. वस्तू रास्त भावाने मिळत नाहीत. या अन्यायी धोरणाविरूध्द जुनेखेड येथे एक भव्य परिषद नागनाथ नायकवडी यांनी घेतली. या परिषदेला क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ.दत्ता देशमुख व यशवंतराव चव्हाण यांनी हजर राहून मार्गदर्शन केले.[५६]

**क.शेतकरी दिंडी: चलो नागपूर (१७ नोव्हें. ते ४ डिसें.१९८८):**

१७ नोव्हें.१९८८ ते ४ डिसेंबर १९८८ या कालखंडात शेतकरी कामगार पक्षाने शेतकरी दिंडी काढली. ती फारच गाजली. या दिंडीचा मूळ उद्देश शेतकऱ्यांशी इमान राखणे हा होता. प्रा.एन.डी.पाटील यांनी शेतकरी, शेतमजूर, शेतमाल यांचेकरिता अनेक मोर्चे काढले. शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न लोकप्रतिनिधीच्या पुढे मांडण्यासाठी बुलढाणा ते नागपूर अशी ७०० कि.मी.ची दिंडी काढली. या दिंडीच्या माध्यमातून काही मागण्याचे निवेदन त्यांनी लोकप्रतिनिधींच्या पुढे ठेवले. गणपतराव देशमुख व प्रा.एन.डी.पाटील शेवटपर्यंत चालत दिंडीबरोबर होते. भाई एस.एम.पाटील, भाई दत्ता पाटील, विठ्ठलराव हंडे यांनी व्यवस्थापन केले. ७५००० जनसमुदाय यावेळी उपस्थित होता. शरद पवारांनी शिष्टमंडळाची भेट घेतली.[५७]

**साखर कारखानदाराची वाटमारी, दादागिरी इ.विरोधी आंदोलन:**

साखर कारखान्यात भ्रष्टाचार होऊ लागला. निधीचा व ठेवीचा गैरवापर होऊ लागला. शेतकऱ्यांचे शोषण व्हायला लागले. या सर्वांच्या विरोधी प्रा.एन.डी.पाटील यांनी जनमत तयार केले. शेकापच्या माध्यमातून भवानीनगर, ताकारी, रेठरे हरणाक्ष, तांबवे, येडेमच्छिंद्र, शिरटे, येडेनिपाणी, कोरेगाव, ढवळी, नेर्ले, रेठरे बु.।। येथील कृष्णा सहकारी व राजारामबापू सहकारी साखर कारखाना कार्यक्षेत्रात सभा घेतल्या

व शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. सभासदांना संघटित केले. शेतकऱ्यांचे मोर्चे काढले. कारखान्याच्या कपातीचे व गैरकारभाराचे चित्र लोकासमोर ठेवले. कारखानदारांना बडगा दाखविला. कायदयानी कपाती बंद केल्या.[५८]

**इ.सेझ: रायगड निर्णायक शेतकऱ्यांचा लढा:**

रायगडमधील ४५ गावातील ३५००० एकर जमीन अंबानींच्या रिलायन्स कंपनीकरिता सरकारने ताब्यात घेतलै. २५ टक्के जमिनीवर सरकारने कब्जा घेतला होता. पेण, पनवेल, उरण, अलिबाग या विभागात यांची औद्योगिक वाटचाल सुरू झाली. १४००० एकर जमीनीत भराव घालण्यासाठी डोंगर फस्त केले. पर्यावरणाची वाट लागली. तेव्हा अंबानींच्या या प्रकल्पाला २२ गावातील लोकांनी विरोध केला. या जमिनी बळकावण्याच्या मोहिमेला शेकापच्या माध्यमातून प्रा.एन.डी.पाटील यांनी विरोध केला. शेवटी निर्वाणीचा उपाय म्हणून सामुदायिक उपोषण केले. प्रा.एन.डी.पाटील यांनी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची भेट घेतली. सर्व राजकीय पुण्याई पणाला लावली. प्रा.एन.डी.पाटील यांनी उपोषणाचा निर्णय घेतला. शेवटी शासनाला नमते घ्यावे लागले व शेतकऱ्यांची नावे त्यांच्या सातबारावर पुन्हा लागली व कष्टकऱ्यांचा विजय झाला.[५९]

**२.२.३ शेतकरी कामगार पक्ष – शैक्षणिक चळवळ:**

**अ.श्वेतपत्रिकेविरूध्द लढा:**

महाराष्ट्र शासनाने सन १९६८ मध्ये शिक्षणविषयक एक श्वेतपत्रिका प्रसिध्द केली. श्वेतपत्रिकेचे स्वरूप शिक्षण क्षेत्रात क्रांती घडविणारे होते. शिक्षण तज्ञांनी या श्वेतपत्रिकेचे स्वागत केले. वरवर पाहता हे श्वेतपत्रिका बील उपयुक्त वाटत होते. परंतु गुणवंता वाढवण्याच्या बुरख्याखाली शिक्षणप्रसाराला पायबंद घालणे यामुळे सामान्य थरातील मुलामुलींना शिक्षणापासून वंचित करणाऱ्या अनेक तरतुदी यात होत्या. सहजासहजी या बिलाची काळी बाजू लक्षात येत नव्हती. यातील मुख्य तरतूद म्हणजे एस.एस. सी. परीक्षा द्विस्तरीय पद्धतीने घेण्याचे ठरविले होते. सामान्यपणे इंग्रजी व गणित या विषयात बहुसंख्य मुले नापास होतात. ती होऊ नये म्हणून सर्वसामान्याला लोअर व हुशारांना हायर अशी तरतूद या बिलात होती. प्रा.एन.डी.पाटील यांनी यातील धोका ओळखला आणि त्वरीत 'श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप' अशी पुस्तिका लिहीली व हे सत्य लोकांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी ४०० सभा घेतल्या. बॅ.पी.जी.पाटील यांनी त्यांना मदत केली. सर्व आमदारांना सभाग्रहाचे बाहेर सभा घेऊन हे सांगितले. परिणाम हा श्वेतपत्रिका ठराव मागे घेण्यात आला.[६०]

**ब. प्रौढ साक्षरता प्रसार मोहिम:**

बहुजन समाजाची प्रगती शिक्षणाशिवाय होणार नाही. सत्यशोधक चळवळीत हे कार्य क्रांतीसिंह नाना पाटलांनी पुढे चालू ठेवले. प्रौढांना रात्रीच्या शाळातून साक्षर करण्याचे काम क्रांतीसिंहांनी कार्यकर्त्यांमार्फत केले. पुढील काळात क्रांतीसिंहांचे सहकारी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचे कार्य हे आपले जिवितकार्य मानले. क्रांतीसिंह हे कर्मवीरांना सहकार्य देत राहिले. क्रांतीसिंहांनी घरच्यांचा प्रखर विरोध असून सुध्दा पत्नीला साक्षर केले.[६१]

**क. भाई प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांची शैक्षणिक मोहिम**

महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाचे कार्य केले. त्यांचे सहकारी मित्र क्रांतिसंह नाना पाटील यांनीसुध्दा समाजशिक्षणाचे काम केले. कर्मवीर आण्णांनी सार्वत्रिक शिक्षणाची चळवळ उभी केली. प्रा.डॉ.एन.डी.पाटील हे त्यांचे खरेखुरे वारसदार आहेत. कर्मवीरांनी चालू केलेली बहुजनाच्या शिक्षणाची चळवळ गेली ४० ते ५० वर्षे ते तळमळीने चालवत आहेत. कर्मवीरांचा विचार व शोषितांचे वंचितांचे शिक्षण ते समर्थपणे करीत आहेत. ग्रामीण भागातील हुशारांसाठी गुरूकुल व आदिवासी विभागात आश्रमशाळा इ.उपक्रम त्यांनी हाती घेतले आहेत.[६२]

**ड.मराठवाडयाकरिता स्वतंत्र कृषी विद्यापीठ चळवळ:**

कृषी विद्यापीठ मराठवाडयाला स्वतंत्र हवे ही मराठवाडयाची जुनी मागणी होती. मराठवाडयातील विद्यार्थ्यांना सापत्नभावाने वागवले जाते अशी विद्यार्थ्यांची तक्रार होती. मराठवाडयातील विद्यार्थ्यांच्यात असंतोष होता. सन १९७२ मध्ये याचा भडका उडाला[६३] व स्वतंत्र मराठवाडयाकरिता कृषी विद्यापीठाच्या मागणीकरिता आंदोलन झाले. मराठवाडा सर्वपक्षिय जनता विकास परिषदेने याला पाठिंबा दिला. १३ एप्रिल १९७२ 'मराठवाडा बंद' ची हाक परिषदेने दिली. शासनाने आंदोलनाची तिव्रता बघून मागणीची त्वरित दखल घेतली व जून १९७२ मध्ये मराठवाडयाकरिता स्वतंत्र कृषी विद्यापीठ दिले.

**कम्युनिस्ट पक्ष:**

संयुक्त महाराष्ट्राचा प्रदीर्घ लढा झाला त्याचे नेतृत्व या डाव्या पक्षाकडे होते. महाराष्ट्र स्थापनेनंतर इथे डाव्या पक्षाच्या नेतृत्वाखाली असणारे सरकार येईल अशी स्थिती त्यावेळी झाली होती परंतु तसे घडू शकले नाही. कॉग्रेस सत्तेवर आले. त्यांच्या डावपेचाचा भाग म्हणजे जातजमातीवादी शक्तींचा उदय झाला व त्या मजबूत झाल्या. डाव्या चळवळीचे खच्चीकरण झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातील एकजूट राहिली नाही. कॉग्रेस पक्षाने सुरू केलेल्या भांडवली राजकारणात विरोधी पक्षसुध्दा सामील होत गेला. युरोपखंडातील भांडवलशाहीच्या उदरात एका मोठया कामगारवर्गाचा उदय झाला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १७ आक्टों. १९२० रोजी ताश्कंद येथे झाली. यात एम.एन.रॉय, एवलिन ट्रेंट, अबनी मुखर्जी, रोझा फिटिंगोफ, महमदअल्ली, महमद शफीक, एम. पी. बी.आचार्य इ. सहभाग होता. १५ डिसें.१९२० मध्ये यांनी कार्यकारी समिती निवडली. कॉमिटर्नने रशियात क्रांतिकारकांना शिक्षण देण्यासाठी एक शाळा चालू केली. यातूनच भारतीय कम्युनिस्ट आंदोलनास प्रेरणा मिळाली. मानवेंद्र रॉय यांनी भारतात कम्युनिस्ट विचार प्रसाराचे कार्य केले.

**३.१ कम्युनिस्ट पक्ष: राजकीय सामाजिक चळवळी:**

सन १९६० ते १९७४ या कालखंडात अन्नधान्याचे उत्पादन सातत्याने कमी होत गेले. यामुळे बाजारामध्ये धान्याचे भाव वाढले. औद्योगिक क्षेत्रात आर्थिक मंदीला सुरूवात झाली. संपूर्ण प्रगतीचा वेग मंदावला. देशातील या परिस्थितीचा परिणाम महाराष्ट्रावरसुध्दा झाला. यामुळे या कालखंडात जनतेचे लढे

उभे राहिले. शासनाच्याविरूध्द जनतेत असंतोष झाला. गिरण्या बंद झाल्या. सर्वत्र बेकारी निर्माण झाली. डाव्या पक्षांनी निषेध सभा घेतल्या. वृत्तपत्र कामगारांचा संप झाला. केंद्रीय कर्मचाऱ्यांचा लढा झाला. विदर्भात कृषि विद्यापीठाच्या प्रश्नावर आंदोलन छेडले गेले. वर्धा जिल्हयातील हिंगणघाट येथील बंद असलेली डागा मिल पुन्हा सुरू करण्यासाठी लोकानी लढा दिला. इचलकरंजी येथील छोटया कारखान्यातील कामगारांना किमान वेतन लागू करिता लढा झाला. बीडमध्ये भूमिहिनाचा सत्याग्रह झाला. नाशिक जिल्हयातील शेतकरी मेळावा नगर हवेली येथील जमिनीचा खंड कमी करण्यासाठी झालेली चळवळ, पडीक जमीन वाटप चळवळ, ठाणे जिल्हयातील गवत कापणीचे दर वाढवून देण्यासाठी केलेली चळवळ सोलापूर, नागपूर, मालेगाव येथील जातीय दंगलीत अल्पसंख्यांकांना संरक्षण देण्याचा प्रयत्न, वर्धा जिल्हयातील मोर धरणाखालील अडीच हजार एकर जमीन शेतमजूरांनी पक्षाच्या नेतृत्वाखाली वहिवाटीस आणण्याचा लढा, ठाणे जिल्हयातील जंगल प्लॉटचा लढा, ४ मार्च १९७० भूमिहीन किसान मोर्चा, १९६९ मध्ये झालेली इंचलकरंजी यंत्रमाग कामगार परिषद, सिएट कामगारांचा यशस्वी संप, दुष्काळी भागातील जनतेच्या मागणीचे लढे कम्युनिस्ट पक्षानी कधी स्वतंत्र तर कधी संयुक्त नेतृत्व करून यशस्वी केले.[६४]

**१.सन १९६९ चा मुंबईतील सीमाप्रश्नी लढा:**

मुंबईत १९६९ मध्ये मोरारजीचे आगमन झाले त्यावेळी मुंबईत दंगल झाली. त्यावेळी सीमाप्रश्नाचे संदर्भांत कम्युनिस्ट पक्षाने मुंबईत सार्वत्रिक संपाची हाक दिली.

**२.जून–जूलै १९६९ ठाणे जिल्हयातील जंगल प्लॉट मोहिम:**

महाराष्ट्र शासनाने ठाणे जिल्हयातील भूमिहीन आदिवासी जनतेला जंगल प्लॉटवरून हाकलून देण्याचे ठरविले तेव्हा पक्षाच्या नेत्या गोदाबाई परूळेकर यांच्या नेतृत्वाखाली प्रतिकारात्मक आंदोलन सुरू केले. पोलिसांनी भातलागणी रोपांची नासधूस केली. त्यावेळी वृत्तपत्रांनी यावर टीका केली. विरोधी पक्षानी विधानसभेत हा प्रश्न उपस्थित केला. या घटनेने शासनाला माघार घ्यावी लागली.[६५]

**३.दुष्काळ महागाईचे पक्षाचे कार्य:**

सन १९७२–७३ मध्ये महाराष्ट्रात अतिशय भयंकर दुष्काळी स्थिती निर्माण झाली. महाराष्ट्रातील सर्व डाव्या शक्तींनी एकत्र येऊन दुष्काळी परिस्थितीशी एकजूटीने काम करण्याचे आवाहन मा.क.प.ने केले. २८ एप्रिल १९७३ ला कमिटीची बैठक झाली व १६ मे १९७३ रोजी दुष्काळी कामावर असलेल्या १३ लाख मजूरांनी संपावर येऊन सर्वत्र निदर्शने केली.[६६]

**दुष्काळ निवारण समिती:**

कॉग्रेसचे महसूल मंत्री भाऊसाहेब हिरे यांनी एम.आर.यार्दी यांची दुष्काळ निवारण कमिशनर म्हणून निवड केली. नाना पाटील दुष्काळ निवारण समितीत सर्वांपेक्षा आघाडीवर होते. दुष्काळग्रस्तांना दिलासा देत त्यांनी झंझावती दौरे काढले. अधिकाऱ्याकडून कोणावर अन्याय होऊ नये म्हणून दक्षता घेतली. क्रांतिसिंहाच्या टीका प्रहारामुळे अधिकारी अगदी सरळ काम करीत होते. क्रांतिसिंह जरी कम्युनिस्ट पक्षात

गेले तरी शेतकरी, कामगार व श्रमिक, मजूर व दलित यांच्यासाठी त्यांनी दौरा करून दिलासा दिला.[६७] क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा क्रांतिदलाच्या समूहाबरोबर श्रमिक व मजूर यांना मदत केली.

**३.२ कम्युनिस्ट पक्ष-शेतकरी लढे:**

**क्रांतिसिंह नाना पाटील यांचे शेतकरी लढे:**

सन १९५२-५३ मध्ये विदर्भ मराठवाडा येथे दुष्काळ पडला. सरकारतर्फे यार्दी या फॅमिन कमिशनर यांची नेमणूक झाली. प्रत्यक्ष दुष्काळग्रस्तांना सहकार्य करण्यासाठी धनंजयराव गाडगीळ यांनी सर्व पक्षिय समिती नेमली. या समितीमध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांचा सहभाग होता. नाना पाटील यांनी महाराष्ट्रभर दौरे काढले. धान्य व पैशाच्या रूपानी मदत गोळा केली. सरकारने दुष्काळावर कायमस्वरूपी मात करावी म्हणून पाझर तलाव, नाला बंदिस्त करावी या तलावात धरणातून पाणी सोडावे, वृक्षारोपण करावे, त्याचे संवर्धन व्हावे असा त्यांनी आग्रह धरला.[६८]

**सामान्य शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर करण्यासाठी जमिनीचे फेरवाटप योजना:**

कम्युनिस्ट पक्षानी सरकार भांडवलदारधार्जिणे असल्याने सरकारवर सडकून टीका केली. शेतकऱ्यांची उन्नती करण्यासाठी त्यांची संघटना केली. शेतीविकासाकरिता आंदोलने केली. संस्थानिक, जहागिरदार, जमिनदार यांच्याकडील अतिरिक्त जमिनी शासनाने काढून घेऊन त्याचे फेरवाटप करावे हा क्रांतिकारक विचार सर्वप्रथम क्रांतिसिंह नाना पाटील यांनी मांडला. यावरून त्यांची शेतकऱ्याबददल तळमळ बघून त्यांना कम्युनिस्ट पक्षाने 'महाराष्ट्र किसान सभेचे' मे १९५५ मध्ये अध्यक्ष केले. शेतकऱ्याच्या विविध प्रश्नावर त्यांनी लढे दिले. आंदोलने, चळवळी, परिषदा, मेळावे घेतले.[६९]

**फलटण खंडकरी शेतकऱ्यांचा लढा:**

साखरवाडी, ता.फलटण येथील खंडकरी शेतकरी मंडळींचा लढा एक अन्यायाचा भाग होता. फलटण संस्थानच्या संमतीने आपटे व मफतलाल यांनी खाजगी साखर कारखाना काढला. त्यांनी १७ गावातील जमीनी खंडाने करार करून घेतल्या. यासाठी नाममात्र खंड एक रूपया होता. करार मुदत २५ ते ३० वर्षे होती. सन १९५२ ला हा करार संपुष्टात आला. तेव्हा शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे खंड वाढवून देण्यास व जमीनी शेतकऱ्यांना परत करण्यास कारखानदारांनी नकार दिला. या त्यांच्या दडपशाहीविरूध्द शेतकऱ्यांनी आवाज उठविला व आंदोलन केले. तेव्हा हे प्रकरण किसान सभेचे अध्यक्ष नाना पाटील यांचेकडे आले. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी याकडे जातीने लक्ष दिले. त्यांना कॉ.हरीभाऊ निंबाळकर, कॅा.दादा ननावरे, कॉ.बाजीराव जगताप, कॉ.माधवराव गायकवाड, कॉ.काकाजी कदम, कॉ.नारायणराव माने, कॉ.शेखकाका यांनी सहकार्य केले. त्याचप्रमाणे सुलोचनादेवी निंबाळकर, बबुताई भिलवडे, काशीबाई पाटील, विठाबाई पोवार इ. महिलांचे सहकार्य झाले. सरकारने नाना पाटील यांना पकडून फलटणच्या तुरूंगात डांबले. ॲड.व्ही.एन.पाटील यांनी खटला चालविला. बंदीहुकूम बेकायदेशीर ठरविला. हा लढा सलग दोन वर्षे चालला. नाना पाटलांनी महाराष्ट्रभर दौरे काढून शेतकऱ्यांची बाजू पटवून दिली. विधानभवनात प्रतिनिधींनी

सरकारला धारेवर धरले. शेवटी सरकारला नमते घ्यावे लागले. शेतकऱ्यांना एक एक हजार खंड वाढवून दिला.[७०]

**शेतीमालाला हमीभाव मिळावा यासाठी संघर्ष:**

शेतीमालाला रास्तभाव मिळावा याकरिता कम्युनिस्ट पक्षाने आंदोलन केले. शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळावा, श्रमाला योग्य दाम मिळावे अशी भूमिका घेणारे नाना पाटील होते. उत्पादन खर्चावर रास्तभाव मिळावा याबाबत त्यांनी जनजागृती केली. शेतकरी हक्काबाबत लोकजागृती घडविली. वेळोवेळी दौरे काढून शेतकऱ्यांचे संघटन केले. हळद, गूळ, शेंगा, मिरच्या, कांदा, ज्वारी, तांदूळ, तूरडाळ इत्यादी उत्पादनाला सरकारने हमीभाव दयावा अशी त्यांनी जाहीर मागणी केली.[७१]

**धरणग्रस्तांचा लढा:**

देशाच्या प्रगतीसाठी धरणे बांधली परंतु पुनर्वसनाचा प्रश्न शासनानी सोडविला नाही. सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील ९८ गावे व त्यातील ९०६९ खातेदार जमीनबाधीत होते. हे खातेदार देशोधडीला लागले. त्यांचे पुनर्वसन झाले नाही. साधारणपणो ३०००० लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न नाना पाटील यांनी हातात घेतला व आंदोलन सुरू केले. प्रथम महाराष्ट्रात फिरून अशा मंडळींना संघटित केले. या विस्थापितांच्यासाठी सरकारने घरे, जमीनी, रस्ते, वीज या गोष्टी अग्रक्रमाने दयाव्यात व त्यांचे पुनर्वसन व्हावे अशा मागणीचा पाठपुरावा क्रांतिसिहांनी केला. आज साठ–सत्तर वर्षानंतरसुध्दा धरणग्रस्तांच्या न्यायी मागणीसाठी डॉ.भारत पाटणकर कार्यरत आहेत. धरणग्रस्तांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे व कोयना धरणातील धरणग्रस्तापैकी ज्यांना अद्याप नोकरी मिळाली नाही त्यांना सरकारने ५ लाख रू.द्यावे व त्यांच्या जमिनीला पाणी मिळेपर्यंत पंधरा हजार निर्वाह भत्ता द्यावा या मागणीसाठी 'श्रमिक दल' लढा देत आहे. या लढयाला यश मिळाले असून सरकारने याबाबत सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे डॉ.पाटणकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. खातेदारांनी कागदपत्रासहित अर्ज करावा म्हणजे त्यांचे खात्यावर रक्कम अदा करण्यात येईल असा आदेश २०१५ मध्ये देण्यात आला आहे. दरमहा निर्वाह भत्ता हातात मिळेपर्यंत श्रमिक दल न थांबता आंदोलन करणार आहे असे वृत्त डॉ.भारत पाटणकर यांनी १२ फेब्रु.२०१६ चे वृत्तपत्रात दिले आहे. तिन्ही जिल्हयात एकाच वेळी ठिय्या आंदोलने करून धरणग्रस्तांची बंद पडलेली पुनर्वसनाची दारे उघडण्यात आली.[७२]

**बळीराजा स्मृती धरण योजना:**

बळीराजा केवळ धरण योजना नाही. ती दुष्काळ हटविण्याची एक चळवळ आहे. बलवडी व तांदूळवाडी येथील माणसे एकत्र आली व येरळेच्या पात्रात उतरून कामाला प्रारंभ केला. बळीराजा स्मृतीधरण लोकश्रमातून बांधण्याचा ठराव केला. मुंबईला या परिसरातील कामाला असणारी मंडळी सन १९८२–८३ मध्ये गावाकडे आली होती. कष्टकरी जनतेच्या संघर्षातून या चळवळीचा जन्म झाला. १६ ऑक्टोंबर १९८६ रोजी धरण प्रस्तावाचे पत्र जिल्हाधिकारी यांना दिले. मुक्तीसंघर्षाचे वतीने धरण

पायाखुदाई करण्याचा मानस व्यक्त केला. दै.केसरीचे भूतपूर्व संपादक चंद्रकांत घोरपडे यांच्या हस्ते प्रारंभ झाला. विटा, कडेपूर, तासगाव व रामानंदनगर येथील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ४० दिवस श्रमदान करून पायाखुदाई केली. १५ जाने. १९८७ रोजी क्रांतिविरांगणा लक्ष्मीबाई नायकवडी यांचे हस्ते बांधकामास सुरूवात झाली. के.आर.दाते यांनी बळीराजा धरणाचे प्लॅन इस्टिमेट करून दिले.[७३]

### ३.३.३ कम्युनिस्ट पक्ष- सामाजिक लढे:

**महागाई व उपासमारविरोधी लढा:**

सन १९६५ मध्ये भारत-पाक युध्दाच्या पार्श्वभूमीवर देशाची आर्थिक अवस्था फार नाजूक झाली. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई झाल्याने सामान्याला जगणे मुश्किल झाले. काही ठिकाणी भूकबळी झाली. क्रांतिसिहांनी उपासमारीविरोधी लढा सुरू केला. डॉ.एन.डी.पाटील यांनी हा लढा चालू ठेवण्यासाठी सर्वपक्षिय कृती समितीची स्थापना केली. या लढयाच्या कृती समितीचे अध्यक्षपद नाना पाटील यांच्याकडे दिले. ११ मे १९६६ रोजी कृती समितीव्दारा परिषद घेऊन कार्यवाही केली.

**धरणग्रस्त पुनर्वसन लढा:**

सन १९७२ मध्ये सांगली जिल्हयातील खुजगाव धरणाचा वाद निर्माण झाला. तेव्हा वसंतरावदादा पाटील पाटबंधारे मंत्री होते. त्यावेळी धरण खुजगाव किंवा चांदोली कोठे व्हावे या संदर्भात वाद झाला. जिल्हयातील पत्रकार, इंजिनियर्स, शेतकरी नेते इ.नी खुजगाव धरणाच्या जागेस भेट दिली. त्यांनी चांदोली नियोजीत धरण जागासुध्दा दाखविण्यात आली. शेतकऱ्यांची पिकावू जमिनी बुडू दयायची नाही. पुनर्वसनाचा प्रश्न मर्यादीतरित्या कसा सोडविता येईल अशी चर्चा झाली व चांदोली धरणाचे काम सुरू झाले.[७४]

**सन १९८६ मधील धरणग्रस्तांचा मंत्रालयावर मोर्चा:**

७ ऑगस्ट १९८६ रोजी क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली ५० हजार धरणग्रस्तांचा मोर्चा मुंबई मंत्रालयावर काढला. कॉम्रेड नाना शेटे यांनी पुनर्वसन कायदा सदोष असल्याचे सांगितले. म्हणून सन १९७६ चा पुनर्वसनचा कायदा रद्द करून सन १९८६चा सुधारित कायदा शासनास करणे भाग पडले.[७५]

**जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा:**

सन १९८६-८७ या काळात सांगली, कोल्हापूर जिल्हयाच्या तहसिलदार कार्यालयावर ९ मोर्चे काढले. यामुळे त्यांना मागण्या मान्यच कराव्या लागल्या तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर ७ दिवसाचे ठिय्या आंदोलन केले. धरणग्रस्तांच्या अडचणी संदर्भात मुख्यमंत्री शरद पवार यांच्याकडे निवेदन दिले.[७६] सन १९९० साली सांगली, सातारा व कोल्हापूर धरणग्रस्तांनी एकत्र करून लोकांचा प्रश्न सोडविला. चांदोली हे अभयारण्य घोषित केले. सन १९८८-८९ मध्ये डॉ.भारत पाटणकर यांनी सातारा, सांगली व कोल्हापूर या ठिकाणी एकाचवेळी १४ दिवस ठिय्या आंदोलन केले. कोयना धरणग्रस्तांची ३९ वर्षे बंद पडलेली पुनर्वसनाची दारे उघडण्यात आली.

**महाराष्ट्रातील इ.कॉ.राजवटीविरूध्द डाव्यांचे आंदोलन:**

राज्यातील जातीय व धार्मिक शक्तींचा मुकाबला करण्यासाठी डाव्या पक्षांचे संयुक्त आंदोलन ३० जुलै १९८३ रोजी मुंबई येथे झाले. राष्ट्रीय एकात्मता परिषद घेतली गेली. कॉग्रेसच्या पक्षनिती भ्रष्टाचारावर सडकून टीका केली. या आंदोलनात मंडल आयोगाच्या शिफारसीबाबत, विनाअनुदानित इंजिनिअरिंग कॉलेजच्या संदर्भांत चर्चा झाली. जातीय दंगलीच्या विरोधात जनमत जागृत करण्यात आले. २२ नोव्हें.१९८३ मध्ये महाराष्ट्रभर जेलभरो आंदोलन करण्यात आले.[७७] सांगली जिल्हयातील १४ गावातील ६६३ कुटुंबाचे १०९ भूमिहिनांचे योग्य पध्दतीने पुनर्वसन करून अभयारण्य प्रकल्पग्रस्तांना चोख न्याय देण्याचे काम नागनाथआण्णांनी केले. ३१ मे १९९७ मध्ये ज्या कुटुंबाचे पुनर्वसन राहिले होते त्यांना पुनर्वसनासाठी आष्टा, पोखर्ली, नेर्ले या ठिकाणी वसाहती उभ्या करण्यात आल्या. धरण व प्रकल्पग्रस्तांच्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासनाविरूध्द कंटाळून कोल्हापूर जिल्हयातील वारणा अभयारण्यग्रस्तांनी वारणा धरणाच्या भिंतीवर प्रवेश केला. या भिंतीवर साधारणपणे एक हजार पुरूष व स्त्रिया ठिय्या मारून बसल्या होत्या. ही बातमी समजताच क्रांतिवीरअण्णा, सहकारी डॉ.भारत पाटणकर, बाळासाहेब नायकवडी इ.सहकारी धरणाच्या भिंतीकडे धावले. या प्रकल्पग्रस्तांच्या धाडसाचे कौतुक केले. अखेर शासनाला प्रकल्पग्रस्त कुटुंबाकरिता १०००० रू.घरबांधणी अनुदान द्यावे लागले. धरणग्रस्तांच्या आंदोलनाकरिता क्रांतिवीर व सहकार्यांनी १२८ मोर्चे व ४० ठिय्या आंदोलने केली. यातील साधारणपणे १० हजार मोर्चेकरी शेतकऱ्यांना नागनाथआण्णांनी हुतात्मा कारखान्याच्या माध्यमातून रोज दोन वेळ जेवण व नाश्ता देण्याचे काम केले. सन १९९६ मध्ये कृष्णा खोरे महामंडळ झाले. यातील धरणग्रस्तांच्या प्रश्नासाठी उरमोडी, वांग, सळवे–महिंद, उत्तरमांड, कुसवडे, महू–हातगेघर इ.धरणावर नागनाथआण्णांनी लढे लढले. पुढे हीच जबाबदारी डॉ.भारत पाटणकर यांच्याकडे आली. महाराष्ट्रातील सातारा जिल्हयातील 'उरमोडी पॅटर्न ' फारच गाजला. क्रांतिवीर नागनाथ आण्णांच्या चळवळीची ही मर्दानी झेप होती. या चळवळीने पर्यायी जमीन व जमीनीला पाणी देईपर्यंत महिना ३००० रू.निर्वाहभत्त्याची मागणी केली याकरिता ठिय्या आंदोलने केली. शेवटी 'धरणबंद' आंदोलन करायला भाग पाडले.[७८] नागनाथआण्णांच्या नेतृत्वाखाली जवळपास बरेच पुनर्वसन झाले. सातारा, सांगली, कोल्हापूर येथे ठिय्या आंदोलने करून धरणग्रस्तांचे बरेच प्रश्न त्यांनी मार्गी लावले.[७९]

**६ डिसेंबर १९९३ रोजी बीमोड दिन:**

जातीयवादी धर्मांध शक्तींचा बीमोड करण्याचे ठरवून कोल्हापूर गांधी मैदानावर सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील राबणारी कष्टकरी जनता गर्जना करीत ५००००च्या भव्य संख्येने जमली व धर्मांध शक्तीचा नाश करण्याची गर्जना करू लागली. या बीमोड दिनाचे श्रेय नागनाथ आण्णांच्या नेतृत्वाला व प्रबोधनात्मक उठावाला जाते. असाच बीमोड दिन ६ डिसेंबर १९९५ रोजी सोलापूरला झाला येथेही सातारा, सांगली व कोल्हापूरला मंडळी एकत्र आली. ६ डिसेंबर १९९५ रोजी कराड येथे बीमोड दिन साजरा झाला. ६ मे १९९५ मध्ये मनुस्मृती या ग्रंथाची सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील हजारो ठिकाणी होळी

करण्याचा कार्यक्रम नागनाथआण्णांचे नेतृत्वाखाली झाला.[८०] ६ डिसें. १९९८ रोजी वाळवा येथे बीमोड दिन साजरा करण्यात आला. ६ डिसें. १९९९ रोजी कोल्हापूर येथे बीमोड दिन साजरा करण्यात आला. या संदर्भांत कॉ.नाना शेटे, डॉ.भारत पाटणकर, कॉ.धैर्यशिल पाटील, प्रा.डॉ.बाबुराव गुरव इ.प्रमुख कार्यकर्ते बैठकीला हजर होते.

**आटपाडी पाणी परिषद:**

महाराष्ट्राच्या वाटयाला आलेले ५९४ टीएमसी पाणी ३१ मे २००० पर्यंत अडवणे आवश्यक होते. त्यानुसार ११ जुलै १९९३ रोजी पहिली पाणी परिषद आटपाडी येथे झाली. सुमारे ४०००० शेतकरी उपस्थित होते. डॉ.पाटणकरांनी आटपाडी तालुक्याचा नकाशा टेवलावर ठेवला व मोर्चेबांधणी केली. तालुक्याचा कोपरा अन कोपरा कार्यकर्त्यांनी पिंजून काढला व जनतेत जागृती केली. लोकांच्यात विश्वास निर्माण केला. याचे श्रेय जयंत निकम, धनाजी गुरव, आण्णासाहेब लेंगरे, झिंबल, मारूती माने, सिताराम बापू पुजारी, शेखसाहेब, डॉ.बाबुराव गुरव, डॉ.भारत पाटणकर, सौ.कुसुमताई नायकवडी, श्री.एस.आर.पाटील, श्री.जमादार सर, श्री.बाळासाहेब नायकवडी, इ. मंडळींना दयावे लागेल. क्रांतिवीर आण्णांचे दमदार नेतृत्वाने पाणी चळवळीला गती आली. राजर्षि शाहू महाराजांचा जन्मदिवस २६ जुलै हा पाणी परिषद दिवस ठरविण्यात आला. अभूतपूर्व उत्साह निर्माण केला. विचारसभा, घोषणा, भिंती रंगविणे, पदयात्रा काढणे, पोवाडे, गाणी यामुळे इ.सर्व तालुका ढवळून काढला. गावचावडीवर तहसिलदार कार्यालयावर मोर्चे काढले. ६६ हजार स्त्री–पुरूषांची प्रंचड उपस्थिती व सहयांची मोहिम संपन्न झाली. अभूतपूर्व एकजूट दिसून आली. शासनावर दबाव वाढला. १९९४ ते १९९८ या काळात नागनाथआण्णांनी पाच पाणी परिषदा आयोजित केल्या.[८१] परिषदेतून निळू फुले, ॲड.उस्मानबी शेख, प्रा.शिवाजीराव काळुंगे, बळवंतराव मोरे, चंद्रकांत लोंढे, सौ.कुसुमताई नायकवडी, वैभव नायकवडी इ.नी मार्गदर्शन केले. नागनाथआण्णांच्या नेतृत्वाखाली तेरा दुष्काळी तालुक्यातील जनतेच्या आंदोलनामुळे शासनाने समान पाणी वाटपास तत्वतः मान्यता दिली आहे. पाणी संघर्ष चळवळीने पुण्यात ठिय्या आंदोलन केले.

**२.१.४ पक्षबाहय कृतिशील संघटना व इतर आंदोलने :**

राजकीय प्रक्रियांच्या अभ्यासात पक्षबाहय कृतिशील संघटना यांनासुध्दा महत्वाचे स्थान आहे. शासकीय योजनांची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी अन्यायाविरूध्द झगडण्याकरिता जनतेच्या आशा आकांक्षेला अडीअडचणीला अपेक्षांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी कृतिशील संघटनेची आवश्यकता असते.

**युवक क्रांती दल:**

सन १९६९ मध्ये पुणे येथील एक विद्यार्थी संघटनेने मुंबई, औरंगाबाद येथील विद्यार्थ्यांचे संघटन केले. शेतमजूर दलितांचे प्रश्न संघटनेने हाती घेतले. युवक क्रांती दलाने (युक्रांद) मार्क्स, म.गांधी, फुले व डॉ.बी.आर.आंबेडकर यांच्या विचारातून प्रेरणा घेतली. युक्रांदने ग्रामीण भागातील शोषितांचे संघटन करण्याचा प्रयत्न केला. वर्णजाती वर्गाविरूध्द बंड करणे ही युक्रांदची धारणा होती. युक्रांदने विविध प्रकारची आंदोलने

केली. सन १९६८ ते १९७४ या काळात विद्यार्थ्यांच्या सहाय्याने विविध आंदोलने पुणे, सातारा येथे केली. जून १९७१ मध्ये म.फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथे 'कुलगुरू हटाव' आंदोलन केले. जून १९७२ मधील सोलापूर मेडिकल कॉलेजमधील कॅपिटेशन फी विरोधी आंदोलन केले. ऑगस्ट १९७२ लातूर एस.टी डेपोकरिता आंदोलन केले. मार्च १९७३ पुरीच्या शंकराचार्यासोबत जाहीर वादविवाद. सन १९७४ नंतर युक्रांदने 'ग्रामीण परिवर्तना'चे धोरण अवलंबिले. आणीबाणीच्या काळात युक्रांदने भूमिगत राहून कार्य केले. सन १९८० च्या दशकात एक निर्दलीय संघटना म्हणून सक्रिय राहिली.[८२]

**पक्षबाहय इतर आंदोलने:**

या संघटनेला महाराष्ट्रात इतर ठिकाणीसुध्दा प्रतिसाद मिळाला. या संघटनाची महाराष्ट्रात अनेक केंद्रे झाली. सातारा जिल्हयातील समता आंदोलन, सामाजिक युवक दल या संघटना आंदोलनात उतरल्या. १९७० मध्ये वैशंपायन मेडिकल कॉलेज, सोलापूर डोनेशनविरूध्द झालेल्या आंदोलनात सातारचे पार्थ पोळके व त्यांचे सहकारी यांनी संघर्ष केला तसेच किशोर बेडकिहाळ, दिनकर झिंब्रे, प्रमोद कोपर्डे इ.कार्यकर्त्यांनी परिसरात विविध आंदोलने केली. मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढयात पार्थ पोळकें, दिनकर झिंब्रे, डॉ.नरेंद्र दाभोळकर यांना अटक झाली व दहा दिवसांचा कारावास झाला.[८३]

**एक गाव एक पाणवठा चळवळ:**

भारतीय घटनेनुसार कायदयाने अस्पृश्यता निमूर्लन झाले तरी खेडोपाडयात गावच्या पाणवठयावर अस्पृश्यांना पाणी भरू दिले जात. हा भेदभाव मिटावा व समता प्रस्थापित व्हावी म्हणून पुण्यातील 'महात्मा फुले समता प्रतिष्ठान' या संघटनेव्दारा बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली ही चळवळ सुरू झाली. जातीभेदाचा अंत व्हावा व फुले यांचे समतेचे स्वप्न प्रत्यक्षात यावे असे वाटल्याने सर्व खेडेगावात सर्वांसाठी एक विहीर सुरू करावी हा या चळवळीचा उद्‌देश होता. बाबा आढाव यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी महाराष्ट्रभर दौरे काढून चळवळ सुरू केली. 'एक गाव एक पाणवठा' ही मोहिम सामाजिक समतेची असल्याने त्वरीत शासनाने याची दखल घेतली. जून १९७४ छ.शाहू महाराजांच्या जन्मशताब्दीपासून ही योजना राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतला. शासन जरी ही योजना राबवू शकले नाही तरी महाराष्ट्रातील पुरोगामी संघटनांनी हा मुद्दा लावून धरला. यामुळे सामुदायिक समतेचा मुद्दा ऐरणीवर आला. पाण्याच्या प्रश्नावर भेदाभेद चालणार नाही हा संदेश सगळीकडे गेला. दलित व सवर्ण यांच्यात संवाद निर्माण झाला.[८४] हमीद दलवाई यांनी २२ जून १९७० रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापन केले. हमीद दलवाई एक ध्येयवादी समाज प्रबोधक होते. मुस्लिम समाज सामाजिक व वैचारिक जागृतीचा त्यांनी प्रयत्न केला. मुस्लिम महिलांची स्थिती सुधारण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तलाकपिडीत मुस्लिम स्त्रियांचे पोटगीचे प्रश्न, वारसा हक्काचे प्रश्न, व्दिभार्या प्रतिबंधकाचे प्रश्न त्यांनी हाताळले. विविध समस्यावर त्यांनी आंदोलने केली.[८५]

**दलित पँथर व दलित चळवळीचे सातारा जिल्हयातील काम:**

सन १९८६ ला दलित पँथरची सातारमध्ये स्थापना झाली. किशोर तपासे, अशोक गायकवाड, संजय गायकवाड, प्रा.अरूण गाडे, महेंद्र खरात, चंद्रकांत अहिवळे, अशोक बैले इ.कार्यरत होते. पुढे ते मतभिन्नतेनंतर पार्थ पोळके यांचेबरोबर काम करू लागले. सन १९८७ ला कराड येथे दलित ऐक्य परिषद झाली. त्यानंतर पोळके यांनी १९८९ मध्ये भीमसेना काढली. भीमसेनेने दलित अन्याय, अत्याचाराविरूध्द आक्रमकपणे कार्य केले. झोपडपट्टी व वंचिताकरिता आवाज उठविला. १.झोपडपट्टीवाल्यांचा प्रश्न सोडविला. २.बौध्देत्तर मंडळींना एकत्र आणले. ३.लक्ष्मी टेकडी व भीमाबाई आंबेडकर झोपडपट्टीची जागा मिळवली. ४.मंडल आयोगाकरिता लढे दिले ५.नामांतरचा आग्रह धरला. ६.औरंगाबाद 'लॉंग मार्च ' काढला. जेलमध्ये नामांतर सोहळा केला.[८६] पोळके सरांनी शाळा, संस्था उभ्या केल्या.

**सार्वजनिक सेवा रोटरी क्लब कराड:**

सातारा जिल्हयातील सार्वजनिक क्षेत्रात प्रामाणिक सेवा करणारा क्लब म्हणून रोटरी क्लब प्रसिध्द आहे. याची स्थापना २० फेब्रूवारी १९५७ ची आहे. कराडमध्ये रामभाऊ वसगडेकरांच्या प्रयत्नाने 'आंतरराष्ट्रीय रोटरी क्लब'ची स्थापना झाली. या रोटरीचे कार्यालय कराड इले. सप्लाय कंपनी कराड येथे होते. प्रसिध्द उद्योजक डॉ.निलकंठराव कल्याणी हे पहिले अध्यक्ष होते. व्ही.एन.दातार हे उत्तम क्रियाशील सदस्य होते. रोटरी क्लबच्या चळवळी पुढीलप्रमाणे:

**सन १९७२ ते १९७५:**

बुक बँक ब्लड डोनेशन, पुस्तक जमा, शालेय विद्यार्थी, चित्रकला स्पर्धा, मेडिकल चेकअप, एस.एस.सी. मार्गदर्शन व्याख्यानमाला, बॅडमिंटन टेबल टेनिस.

**सन १९७५-७६:**

गणेशोत्सव आरास, सायन्स कॉलेजमधील २५० विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी, रोटरॅक्ट सभासद सुशिक्षित बेकारांना नोकऱ्या, सोशल क्लब बांधकामासाठी सहाय्य, मराठी साहित्य संमेलन सहकार्य, चंद्रपूर वरोडा येथील बाबा आमटे यांच्या आनंदवन कार्यात सहभाग. सुमारे ४००० रू.औषधे 'आनंदवन' आश्रमास देणगी दिली.[८७]

**रोटरी क्लबची समाजोपयोगी कामे:**

१.सार्वजनिक तीन ठिकाणी पेटी वाचनालये, २.प्रतिवर्षी बॅडमिंटन स्पर्धा फिरती ढाल १९७६, ३.सन १९७२ व १९७६ मध्ये नाक, कान, घसा शस्त्रक्रिया शिबीर, ४.कराड शाळा कॉलेज विद्यार्थी विद्यार्थीनी मोफत वैद्यकिय तपासणी व आरोग्य आर्थिक सहाय्य, ५.रोगनिदान शिबिरे-शेणोली, देवराष्ट्रे, काशिळ-कोपर्डे, चाफळ, किसरूळे, कोयनानगर आरोग्य शिबिरे आयोजन, ६.उंब्रज नेत्र तपासणी शिबिर, ७.आंतरराष्ट्रीय प्रदूषण चर्चासत्र सहाय्य, ८.टांग्यांना रिफ्लेकेटर्सचा पुरवठा, ९.झोपडपट्टी, रिमांडहोम, मिलिटरी बॉईज

विद्यार्थ्यांना शै.साहित्य, कपडे, खाऊ इ., १०.कराड मूक बधिर विद्यालयासाठी आर्थिक सहाय्य[८८] ११. सन १९७५ अ.भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सहकार्य.

**गोवा मुक्ती चळवळ:**

गोवा मुक्ती स्वातंत्र्य चळवळ प्रामुख्याने महाराष्ट्रातून चालविली जात होती. महाराष्ट्रातून सत्याग्रहींचे जथ्थे गोव्यात जात होते. जून १९५५ मध्ये काले, ता.कराड येथील राजाराम पाटील व भाई आत्माराम पाटील आपली तुकडी बरोबर घेऊन गोवे येथे गेले. भाई चितळे यांच्या गोवे स्वातंत्र्य चळवळी मोर्चात सातारा जिल्हयाचे सुमारे १५० आंदोलक होते. १० जून १९५५ रोजी पोर्तुगीज दडपशाहीला न जुमानता या पाच सत्याग्रहींनी पणजीतील पोर्तुगीज सचिवालयावर तिरंगा फडकाविला. त्यापैकी रघूनाथ चव्हाण हे एक होते. दि.१५.८.१९५७ रोजी कराडचे नाथ चव्हाण यांनी बांध आघाडीवर गोळीबारास तोंड दिले. श्रीनिवास लद्दड यांना पोलिसांनी पकडले व मारहाण केली. नगर हवेलीमुक्त करण्यासाठी महाराष्ट्रातून एक तुकडी गेली होती. त्या तुकडीने मोठे धाडस दाखविले व नियोजित स्थळी पोहचली. यात कराडजवळील रेठरे येथील सदुभाऊ पाटील व त्यांचेसोबत दहा साथीदार होते.[८९] दि.१५ ऑगस्ट १९५५ पुणे येथील झेंडावंदनाचे प्रमुख पाहुणे कराडचे बाबुराव गोखले होते. त्याप्रसंगी 'गोवा मुक्तीसाठी पराक्रम करा' असे त्यांनी सांगितले. कराडचे गोवा मुक्ती चळवळीत कृष्णराव चव्हाण, रामचंद्र मल्लू कदम, सीमाराम पांडूरंग देशमूख, शामराव बंडू वाडकर, बादशहा अली मुल्ला, हसन कासम नदाफ, शंकर एकनाथ धावडे, हुसेन गुलाब मुजावर, ज्ञानदेव केशव देसाई, रामचंद्र कृष्णा देसाई, रामचंद्र कृष्णा शिंदे, दिनकर वाघमारे, लक्ष्मण हरी गिजरे, शिवराम नाईकजी चव्हाण हे होते. गोवा मुक्तीसाठी सातारा जिल्हयाच्या सर्व भागातून सत्याग्रही जाऊ लागले होते. सातारा शहरातून रामराव पाटील, केशव साठे, चिंतामण सबनीस, केरूसिंग परदेशी, बाळकृष्ण शेवाळे, रामचंद्र शेलार, मकबूल शेख, भिसे इत्यादी सहभागी झाले. बाळकृष्ण गुजर यांनी सन १९५४ व सन १९५५ मध्ये चारवेळा गोवा मुक्ती आंदोलनात भाग घेतला. त्यांना जबर मारहाण सहन करावी लागली. व्ही.डी.चितळे व ओक यांच्या नेतृत्वाखाली बांदा–पत्रादेवी नाका येथे सत्याग्रह केला. कोंडव्याचे मारूती निंबाळकर, पाडळीच्या भार्गिथी ढाणे, बाबुराव ढाणे, मर्ढे गावचे वामन शिंगटे, सोनवडीचे लक्ष्मण कारंडे असे शेकडो वीर सत्याग्रहात दाखल झाले होते. सातारा जिल्हयातील कराड, मसूर, सार्कोडी, कार्वे, सवादे, काले, कोळे, पार्ले, जिंती, म्हासोली, मलकापूर, दुशेरे, हजारमाची, नडशी, रेठरे येथील शूर तरूण सत्याग्रहात सहभागी झाले होते.

**सातारा आझाद हिंद सेनेत:**

सातारचे महिताब शेख मुलाखत देताना आझाद हिंद सेनेच्या पराक्रमाबददल सांगतात. ते स्वतः १५ फेब्रू.१९४४ आझाद हिंद सेनेत स्वयंसेवक म्हणून दाखल झाले. पुढे १९४३–१९४५ मध्ये ते सिक्यूरिटी सर्व्हिसकडे घेतले. हाका फ्रंटवर काम करताना त्यांना गोळीबारात दोन गोळया लागल्या. त्यांना दोन वेळा संगिणीने भोकसले. नेताजींनी त्यांना स्वतःच्या कार्यालयात घेतले.[९०] सातारा करंजे येथील गुलाबराव

फडतरेसुध्दा आझाद हिंद सेनेत नेताजींचे बॉडीगार्ड होते. आसाममधून नेताजींनी माघार घेतल्यावर ब्रिटिशांना त्यांचा सुगावा लागला. जगन्नाथराव भोसले व फडतरे यांची ३० जणांची टीम बॉडीगार्ड म्हणून काम करीत होती. नेताजींचे मराठी जवानांचे खूप प्रेम होते. नेताजींच्या सांगण्यावरून त्यांनी आसाम व इंफाळवर हल्ला केला.

**हैद्राबाद मुक्तीसंग्रामातसुध्दा सातारा:**

हैद्राबादच्या रझाकारांनी प्रजेवर अत्याचार केला तेथे भूमिगत कार्यकर्त्यांनी लढा दिला. हिंदू-मुसलमान यांच्या दंगली घडविण्याचा रझाकारांनी प्रयत्न केला. वल्लभभाई पटेल यांनी सांगूनसुध्दा हैद्राबाद पंतप्रधान मीर लियाकत अल्ली यास समजावून सांगितले परंतु त्यांनी ऐकले नाही तेव्हा सैन्य पाठवून गृहमंत्री वल्लभभाईने हैद्राबाद ताब्यात घेतले. शामगावचे अनंत हरी क्षिरसागर यांनी हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील भूमिगतांना सहकार्य करून त्यांना आसरा दिला.[९१]

**२.२.७ समालोचन:**

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरच्या राजकीय स्थितीचा विचार करताना त्यामध्ये काही टप्पे करावे लागतात. कॉंग्रेसच्या निर्विवाद वर्चस्वाचा पहिला टप्पा. साधारणपणे हा टप्पा सन १९७८ पर्यंत चालला. यानंतर येतो पुरोगामी विचारांचा दुसरा टप्पा. या छोटयाशा टप्प्यामध्ये भविष्यकालीन राजकारणाची गाथा लिहली गेली. पुढे येतो तो शिवसेना भाजप युतीचा कालखंड. सन १९५७ मध्ये कॉंग्रेसला राज्यात काही ठिकाणी हार पत्करावी लागली. पश्चिम महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीने मुसंडी मारली. राज्य स्थापनेनंतर ही स्थिती पुन्हा बदलली. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण झाले. त्यांनी राज्यात कॉंग्रेस बळकट केली. राज्यनिर्मिती प्रश्नावर जे नेते कॉंग्रेस पक्ष सोडून गेले होते ते पुन्हा कॉंग्रेस पक्षात आले. या संदर्भांत यशवंतराव चव्हाण यांचेवर पक्षफोडीचा आरोप केला जातो. शेतकरी कामगार पक्ष स्थापन झाला होता परंतु त्याला स्वतःची अशी विचारसरणीच मांडता आली नाही. भा.ल.भोळे या संदर्भात म्हणतात, शेकाप अस्मितेच्या शोधात होता खरा परंतु त्याला स्वविचार मांडताच आला नाही. सुरवातीच्या काळात शेकापचे दत्ता देशमुख, क्रांतिसिंह नाना पाटील, व्ही.एन.पाटील पक्षातून बाहेर पडले. शेकापचे संस्थापक सदस्य शंकरराव मोरे, केशवराव जेधे, तुळशीदास जाधव कॉंग्रेसमध्ये गेले. शेकापचे सरचिटणीस रघुनाथ खाडिलकर यांनी नवा पक्ष काढला.

विधानसभेच्याबाहेर शेकाप पक्षाने शेतीमालाला रास्तभाव मिळावा हा लढा सुरू केला. संयुक्त महाराष्ट्राचा लढा दिला, लेव्ही लढा, साराबंदी लढा, सीमाप्रश्न लढा, एन्रॉन लढा, सेझ लढा असे कितीतरी लढे शेतकरी कामगार पक्षाने लढविले. रस्त्यावरच्या लढाईत मात्र शेकाप नेहमीच अग्रेसर सहिला. शेतीमालाला रास्त दर मिळावा हा देशातील पहिला लढा त्यांनी सुरू केला. सन १९६० नंतर कॉंग्रेसने राज्यात पुन्हा जम बसविला. त्यापासून पश्चिम महाराष्ट्र कॉंग्रेसचा बालेकिल्ला आहे. अलिकडे हा भाग कॉंग्रेस व राष्ट्रवादी यांचे प्रक्षेत्र बनला आहे. पुढे महाराष्ट्रात सहकार चळवळ चांगलीच चालली व रूजली. सहकारानी

शेतकऱ्यांच्याकडे चार पैसे आले. पंचायत राज्याने गावपातळीवर विकासाची फळी निर्माण केली. अर्थात ही फळी कॉंग्रेससाठी काम करणारी होती. या कॉंग्रेसच्या भक्कम तटबंदीस कोणीच भेदू शकले नाही. अगदी आणीबाणीनंतरच्या काळातसुध्दा देशभर कॉंग्रेसची पडझड झाली परंतु पश्चिम महाराष्ट्रात कॉंग्रेस खंबीरच राहिली. हीच कॉंग्रेसची ताकद सन १९८० नंतर कमी कमी व्हायला लागली. सन १९९० मध्ये तर ती ताकद फारच कमी झाली.

**डावे पक्ष:**

सन १९८० मध्ये महाराष्ट्रात लोकशाही दलाचा प्रयोग मर्यादीतच झाला. डाव्या समाजवादी पक्षाचे ऱ्हासपर्व सुरू झाले. शेतकरी कामगार पक्ष सन १९५७ नंतर हळूहळू क्षीण होत गेला. महाराष्ट्रव्यापी हा शेकाप पक्ष आज केवळ रायगड जिल्हयापुरताच मर्यादीत राहिला आहे. सोलापूर जिल्हयातील सांगोला मतदारसंघात गणपतराव देशमुख यांनी त्यांच्या आमदारकीची पन्नास वर्षे पुरी केली. तेथे त्यांनी लाल बावटा फडकत ठेवला आहे. परंतु शल्य असे वाटते की गणपतरावांनी ५० वर्षे राहून दुसऱ्या फळीतील नेतृत्व तेथे उभे केले नाही. हे सत्य नजरेआड करण्यासारखे नाही. हे दुखणे शेकाप नव्हे तर अन्य डाव्या आघाडीचे दुःख हेच आहे. दुसऱ्या आघाडीतील नेतृत्व पुढे येत नाही. परिणाम महाराष्ट्राच्या राजकीय नकाशावरून हे पक्ष नामशेष होऊ पहात आहेत. ही गोष्ट पक्षाचे दृष्टीने नुकसानीची आहे. तशीच ती तळागाळातील सामान्यांच्या दृष्टीनेही चांगली बाब नाही. जनसामान्यांसाठी, कष्टकऱ्यांच्यासाठी आज लढे व आंदोलने दुर्मिळ होत आहेत. वाईट याचेच वाटते की जी आंदोलने आज होतात त्यात धंदेवाईक प्रवृत्ती घुसल्यामुळे आंदोलनाचे विकृत स्वरूप पुढे येत आहे. कर्जबाजाराने तो आत्महत्येकडे वळतो आहे. तेव्हा डाव्या पक्षाच्या आंदोलनाची गरज आहे. डाव्यांची आंदोलने चारिञ्यवान असली तरी त्यांची शक्ती कमी कमी होत आहे. उलट आज जी इतरांची आंदोलने होतात ती आंदोलने चारिञ्यशून्य आहेत. डाव्यांनी काळाची पावले ओळखलीच नाहीत. तत्वाचा आग्रह धरताना त्यांचा अहंकार वाढला. त्याचा परिणाम जनाधार कमी कमी होत गेला. पण सामान्याला मात्र याची किंमत मोजावी लागते. विधीमंडळात आमदारांच्या वेतनवाढीचा मुद्दा जेव्हा चर्चेला आला तेव्हा त्याला फक्त मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे मालदाबे के.एल.च विरोध करू शकले.

सन १९५७ ते १९६० या दोन ते तीन वर्षातच कॉंग्रेसची परिस्थिती चिंताजनक होती. परंतु राज्यनिर्मितीनंतर कॉंग्रेसने विरोधकांना नेस्तनाबूत केले. पश्चिम महाराष्ट्रातील मराठा पुढाऱ्यांचे हितसंबंध हे सहकारी चळवळीत होते. हे सर्व पुढारी जिल्हा सहकारी बँक, सहकारी साखर कारखाने, दूधसंघ चालविण्यात गुंतलेले असल्याने समाजाचा विकास, सामान्याचे हित हा विचार मागे पडला. त्यातूनच पुढे घराणेशाही 'शुगर लॉबी' निर्माण झाली.

राष्ट्रपिता म.गांधी यांच्या आवाहनास साथ देऊन स्वातंञ्याच्या झालेल्या संघर्षात सातारा जिल्हा आघाडीवर होता. सन १९४२ ते सन १९४६ या कालखंडात जिल्हयात प्रतिसरकार अस्तित्वात होते. ब्रिटिश सत्ता संपविण्यात जिल्हयाचे मोठे योगदान होते. स्वातंञ्यानंतर सातारा जिल्हयात नेत्रदिपक सुधारणा झाल्या.

बऱ्याच क्षेत्रात सातारा जिल्हयाने प्रथम क्रमांक संपादन केले. हा विकास राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळीमुळे झाला आहे. अनेक राजकीय वादळे येऊनसुध्दा जिल्हयाने आपले स्थान टिकवून ठेवले. प्रारंभीच्या काळात यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, वसंतरावदादा पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, राजारामबापू पाटील, किसन वीर, रामानंद भारती, पी.डी.पाटील, प्रतापराव भोसले, आनंदराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, विलासराव पाटील उंडाळकर, 'जागृत सातारा'चे बाबुराव गोखले, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वि.स.पागे, केशवराव पवार, व्ही.एन.पाटील, डी.एस.जगताप, कर्मवीर भाऊराव पाटील, वि.रा.शिंदे, आर.डी.पाटील, बाबुराव घोरपडे, नागनाथआण्णा, बबनराव गडदरे, सातारचे कॉ.शेख काका, भि.दा.भिलारे, बापू कचरे, भाऊसाहेब जानू, भाऊसाहेब सोमण, गौरीहर सिंहासने, नरूभाऊ लिमये, डॉ.आठल्ये, श्रीधर रामभाऊ पवार, जी.डी.लाड, रा.ना.चव्हाण, गुलाबभाई बागवान, व्यंकटराव पवार, केशवराव विचारे, बन्याबापू गोखले, अच्युतराव पटवर्धन, के.डी.पाटील, बर्डे मास्तर, पांडू मास्तर, संभाजीराव थोरात बाबा, बाबुराव चरणकर, केशवराव पाटील, चंद्रोजी पाटील, रामभाऊ नलवडे, कळंबे गुरूजी, पांडूआण्णा शिराळकर, राघुण्णा धोपटे, करंदीकर, आत्माराम पाटील, बाबुराव कोतवाल, माधवराव जाधव, जयवंतराव भोसले, बब्रुवाहन जाधव, आबासाहेब पार्लेकर, भिकूनाना साळुंखे, रघूनाथराव पाटील, दादासाहेब आळतेकर, भाऊसो बटाणे, लक्ष्मणराव कासेगावकर वैद्य, नाथ घाणेकर, नानासाहेब आगाशे, हरीभाऊ लाड, सुधारणावादी आप्पासाहेब पंत, आचार्य जावडेकर, वडीयेरायबागचे भगवानराव मोरे, आप्पासाहेब लाड, डॉ.उत्तमराव पाटील धुळे, लीला पाटील, बलदेव प्रसाद, छन्नुसिंग चंदेल, पै.विभुते अशा कितीतरी व्यक्तींचा जिल्हयाच्या जडणघडणीत विकासात मोठा वाटा आहे.

सातारा जिल्हयाच्या विकासाचे श्रेय झालेल्या चळवळीला आहे. जिल्हयातील राजकीय, सामाजिक चळवळी शाश्वत विकासासाठी झटणाऱ्या चळवळी आहेत. या चळवळींचे क्षेत्र केवळ सातारा शहरापुरते मर्यादीत नव्हते तर त्याचे क्षेत्र संपूर्ण जिल्हाभर होते. स्वातंत्र्योत्तर 'समाजवादी युवक दल', 'श्रमिक मुक्ति दल', 'दलित हक्क परिषद', 'धरण प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषद', 'अंधश्रध्दा निमूर्लन चळवळ', 'समान पाणी वाटप चळवळ', 'डॉ.आंबेडकर अकादमी', 'भटक्या विमुक्त जाती-जमाती' इ.चळवळी फक्त जिल्हयापुरत्या नव्हे तर देशाला प्रेरणादायी ठरल्या. शोषित मानवाच्या कल्याणासाठी या चळवळी अविरत झटल्या. जनजागृती, लोकसंघटन व शासनावर दबाव असा प्रयत्न त्यांनी केला. चळवळींचा मुख्य आधार म्हणजे 'फुले-शाहू-आंबेडकर' विचार होता.

**निष्कर्ष:**

लोककल्याण व सेवाभावी वृत्तीने कार्यरत असलेल्या सामाजिक संस्था सातारा जिल्हयात होत्या.

**१.समाजवादी युवक दल:**

सामाजिक युवक दलाचे विशेष कार्य करणारी एक प्रभावी चळवळ यात डॉ.नरेंद्र दाभोळकर, दिनकर झिंब्रे, प्रमोद कोपार्डे, विजय मांडके, पार्थ पोळके इ.मंडळी यात सहभागी होती. १९७८ मध्ये चवदार तळयाच्या सत्याग्रहाची आठवण म्हणून यांनी मोठी क्रांती केली हे समजून येते.

**२.विद्रोही चळवळ:**

या चळवळीचे जनक डॉ.आ.ह.साळूंखे, अस्तिक शिरोमणी व चार्वाकद्‌वारे त्यांनी तत्वज्ञान तळागाळापर्यंत पोहचविले. 'हिंदु संस्कृती व महाभारतातील स्त्रिया', 'धर्म व धर्मापलिकडे मनुस्मृतींच्या समर्थकांची संस्कृती', 'विद्रोही तुकाराम' बळीराजा इ.व्दारे समाजप्रबोधन केले. 'बडवे हटाव मोहिम चळवळ' – डॉ.धनाजी गुरव व डॉ.भारत पाटणकर, पार्थ पोळके इ.कार्यकर्ते या चळवळीत सहभागी झाले.

**३.लक्ष्मण माने यांची भटक्या विमुक्तांची चळवळ:**

'उपरा'कार लक्ष्मण माने यांनी अखंड भटकंती करून प्रश्नोत्तरे, मुलाखती प्रबोधनाव्दारे भटक्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. सामाजिक प्रबोधनाचे परिवर्तनाचे प्रभावी काम केले.

**४.मुक्तांगण चळवळ:**

लक्ष्मण माने, प्रमोद कोपार्डे, सुरेश पळणीटकर, डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी सामान्य व दलितांचेसाठी काम केले. अभ्यासिका व ग्रंथालय तसेच दलितांची राहण्याची सोय केली. मुक्तांगणव्दारे विविध उपक्रम राबविलेले आपल्या लक्षात येते.

**५.समता आंदोलन:**

दलितांचे व्यापक संघटन व दलितांच्या न्यायी हक्कासाठी त्यांनी लढे दिले. यात पार्थ पोळके, विजय मांडके व अन्य सहकाऱ्यांनी समता आंदोलनाच्या माध्यमातून चळवळी केल्या. यातून पुढे त्यांनी 'भीमसेना' ही संघटना निर्माण केली. हजेरी माळावर झोपडपट्टींचे पुनर्वसन केलेले दिसते.

**६.डॉ.आंबेडकरी अकादमी:**

सन १९९२ मध्ये डॉ.एन.डी.पाटील यांचे अध्यक्षतेखाली ही अकादमी स्थापन झाली. गेली २० वर्षे राज्यभरातील साहित्यकारांना, विचारवंतांना व्यासपीठ मिळवून देणारी ही संस्था, सामाजिक प्रश्नावर कार्यशाळा घेते. व्याख्याने चर्चासत्राव्दारे प्रबोधन करते. विचारवेध संमेलन भरविते.

**७. परिवर्तन व्यसनमुक्ती संस्था:**

सन १९८९ पासून कार्यरत असणारी संस्था असून या संस्थेचे संस्थापक प्रमुख डॉ.नरेंद्र दाभोळकर हे होते. आज या संस्थेचे कार्य किशोर काळोके, दयानंद कांबळे हे करतात. मादक पदार्थ विरोधी तसेच दारूबंदी, गुटखाबंदी याकरिता ही जनचळवळ त्यांनी उभी केली.

**८.अंधश्रध्दा निमूर्लन समिती:**

महाराष्ट्रभर मोहिमा, बुवाबाजी व अंधश्रध्देविरोधी राज्यभर चळवळी करणारी समिती असून याव्दारे वैज्ञानिक जाणीव समाजात त्यांनी निर्माण केली. यामुळे अंधश्रध्दा चळवळीतून लोक वैज्ञानिक जाणिवेकडे वळलेले दिसतात.

**९.रयत शिक्षण संस्था:**

सातारा जिल्हयातच नव्हे तर राज्य पातळीवर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारी रयत शिक्षण ही अग्रेसर संस्था असून या संस्थेची स्थापना डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केली. शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणारी ही मोठी संस्था असून स्वावलंबन व श्रमाची प्रतिष्ठा हे दोन मूलमंत्र समाजापुढे या संस्थेने ठेवलेले आहेत. म.फुले, म.गांधी, छ.शाहू महाराज यांच्या आदर्शानुसार कार्यरत असलेली व गेली जवळपास ९५ वर्षे काम करणारी रयत शिक्षण संस्था सातारचे व महाराष्ट्राचे भूषण आहे. यामुळे गोरगरीबांचे व बहुजन समाजातील सर्वसामान्यांचे शिक्षण होऊन त्यांचा विकास झाला. याप्रमाणे रानवाटा निसर्ग पर्यावरण मंडळ, रा.ना.गोडबोले यांची सार्वजनिक ट्रस्ट व बालाजी ट्रस्ट व आयुर्वेद प्रसार मंडळी सातारा जिल्हयात कार्यरत आहेत. सातारा जिल्हयातील चळवळी हे सातारचे वैशिष्टय असून याव्दारे प्रबोधन, प्रदूषणमुक्ती, जनजागृती, वृक्षारोपण, स्वच्छता, शेतीपूरक, रोजगार उपलब्धता, आरोग्य असे बहुविध उपक्रम सातारा जिल्हयात राबवून लोककल्याण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**संदर्भ साधने**


१. पाठक अरूणचंद्र (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, मराठी आवृत्ती १९९९, पृ.२०७

२. पालकर वसंत (संपा.), क्रांतिवीर माधवराव जाधव, सत्कार समिती प्रकाशन, कराड, १९७१, पृ.१३

३. धर्माधिकारी भा.वि., क्रांतिवीर, विश्वकर्मा प्रकाशन, १४५, केसरकर पेठ, सातारा २, प्रथम आवृत्ती, ११ ऑगस्ट १९९०, पृ.२४५

४. दि.२८ डिसें.१९७९, साप्ताहिक समर्थ

५. चोरमोरे विजय (संपा.), महाराष्ट्राचे राजकारण नवे संदर्भ, नवता बुक वर्ल्ड, कांदिवली मुंबई, ३१, प्र.आ., मार्च २००४, पृ.५२

६. कित्ता पृ.५६

७. गोखले, वि.पु., देशपांडे का.धों, कऱ्हाड समग्र दर्शन, सोमवार पेठ,कराड, प्र.आ., ६ डिसेंबर २००८, पृ.६०

८. पालकर वसंत(संपा.), उपरोक्त, पृ.१५

९. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील संशोधनात्मक ग्रंथ, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा, प्र.आ. ३० जाने.२०१५, पृ.२७१

१०. क्षिरसागर व्ही.एस., असा हा महाराष्ट्र, के.सागर पब्लिकेशन, पुणे, २५ वी आवृत्ती, सप्टें.२००५, पृ.३१

११. पवार बा.ग., क्रांतिसिह नाना पाटील, मातृभूमी प्रकाशन, पुणे, प्र.आ.२००१, पृ.२४६

१२. दै.केसरी, २४ जून, १९६०

१३. दै.केसरी, ११ नोव्हेंबर, १९६०

१४. दिवाण विजय, संतभूमीचा योध्दा, गोविंदभाई श्रॉफ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्र.आ.२००४, मुंबई, पृ.८१

१५. धर्माधिकारी भा.वि., क्रांतिवीर, विश्वकर्मा प्रकाशन, १४५, केसरकर पेठ, सातारा, प्रथम आवृत्ती, ११ ऑगस्ट १९९०, पृ.१५०

१६. पालकर वसंत (संपा.), उपरोक्त, पृ.२०, २१

१७. देशभक्त बाबुराव घोरपडे (संपा.), गौरवग्रंथ, गौरव ग्रंथ समिती, रविवार पेठ, सातारा, प्र.आ.३० जून १९९०, पृ.४५

१८. धर्माधिकारी भा.वि., सातारा जिल्हा कॉंग्रेस परंपरा, परिवर्तन, सातारा जिल्हा कॉंग्रेस कमिटी सप्टें.१९९०, पृ. ७९

१९. पाठक अरूणचंद्र (संपा.) उपरोक्त, पृ.१८५

२०. धर्माधिकारी भा.वि., क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ आण्णा गौरव समिती वाळवा, प्रथम आवृत्ती, १५ जुलै २००७, पृ. ८५, ८६

२१. परिवर्तन (संपा.), सातारा जिल्हा कॉग्रेस कमिटी (आय.), कॉग्रेस कमिटी प्रकाशन, सप्टेंबर १९८०, पृ.८१

२२. कित्ता पृ.८१

२३. कित्ता पृ.१२२, १२३

२४. सातारा जिल्हा गौरव गाथा सन १९८७ (संपा.), प्रकाशक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा १९८७, शै.वाटचाल, प्रभाकर कोष्टी, पृ. घटक क्र.२

२५. दौलत, ना.बाळासाहेब देसाई (संपा.), एकसष्टी सत्कार समिती अंक ९३, प्र.आ. दौलतनगर, १० मार्च १९७० विशेषांकावरून

२६. कोष्टी प्रभाकर, सातारा गौरवगाथा, वाटचाल, घटक क्रमांक २, जि.प.सातारा, १९८७

२७. डिबेटस महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि व्हॉल्यूम, थर्ड पार्ट, सेकंड मार्च १९६१, पृ.१६१५

२८. गोखले वि.पु., प्रा.देशपांडे का.धों., कराड समग्र दर्शन, सोमवार पेठ, कराड, प्र.आ.६ डिसेंबर २००८, पृ.२२१

२९. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.२०७

३०. सातारा जिल्हा गौरव गाथा सन १९८७ (संपा.), प्रकाशक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा १९८७, शै.वाटचाल, प्रभाकर कोष्टी, पृ. घटक क्र.२

३१. साप्ताहिक ग्रामोदधार, सातारा, सोम. २० मे, १९६३, पृ.२

३२. लोकमित्र दे.भ.भि.दा.भिलारे, गौरवग्रंथ(संपा.), प्रकाशक संभाजीराव पाटणे, शाहूपूरी, सातारा, ऑगस्ट १९९९, पृ.२९

३३. कित्ता पृ.२९

३४. गौरवगाथा (संपा.), स्वप्न हरीतक्रांतीचे, सन १९८७ प्रकाशक मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा लेखावरून

३५. सातारा जिल्हा परिषद गौरव गाथा सन १९८७ (संपा.), प्रकाशक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा १९८७, स्वप्न हरीतक्रांतीचे, प्रतापसिंह कदम कृषिअधिकारी, स्वप्न हरीतक्रांती लेखावरून

३६. देसाई संभाजी (संपा.), महाराष्ट्रातील चळवळी, प्रशांत पब्लिकेशन, प्रतापनगर, जळगाव १, प्र.आ.१७ मार्च २०१३, डॉ.महाजन, कृषक चळवळ, पृ.७६

३७. बोकील निता, महाराष्ट्राचा राजकीय इतिहास, १९६० ते १९७२ मौज प्रकाशन गृह, पुणे, प्र.आ.१ मे २०१२, पृ.१८५

३८. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.४१४

३९. भोसले विकास (संपा.), सहयाद्रीचा पाठीराखा पी. डी. पाटीलसाहेब, जुलै, २००८, पृ.१३३,

४०. दै.केसरी, १४ डिसेंबर १९६

४१. भोळे भा.ल., भारतीय शेतकरी कामगार पक्ष – लोकवाङमय गृह मुंबई, प्र.आ.३० नोव्हे. २०१०, पृ.

४२. धर्माधिकारी भा.वि., क्रांतिवीर गौरव समिती वाळवे, प्र.आ. १५ जुलै २००७, पृ.४३

४३. पाटील टी.एस., भाई प्रा.डॉ.एन.डी.पाटील कार्यगौरव समिती, प्र.आ., दिनांक नाही, कोल्हापूर, पृ.१६

४४. सायनाकर यांची मुलाखत, दि.९.४.२०१६, वेळ दुपारी ३ ते ५, इस्लामपूर

४५. कित्ता

४६. पाटील टी.एस., भाई प्रा.डॉ.एन.डी.पाटील कार्यगौरव समिती, प्र.आ.दिनांक नाही, कोल्हापूर, पृ.२७

४७. सायनाकर विश्वास, प्रा.डॉ.एन.डी.पाटील, श्रमिक प्रतिष्ठान, प्र.आ.सप्टें. २०१२ पृ.५२

४८. पाटील टी.एस., भाई प्रा.डॉ.एन.डी.पाटील कार्यगौरव समिती, प्र.आ.दिनांक नाही, कोल्हापूर, पृ.३०, ३१

४९. कित्ता पृ.१६

५०. कित्ता पृ.२०

५१. पाटील दिनकर विष्णू , एम.फिल.शोधनिबंध, राज्यशास्त्र विणाग, क्रांतिसिंह नाना पाटील आणि शेतकऱ्यांचे प्रश्न (१९२०–१९५२), पृ.१४५

५२. कित्ता पृ.७०, ७१

५३. धर्माधिकारी भा.वि., क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ आण्णा गौरव समिती वाळवा, प्रथम आवृत्ती, १५ जुलै २००७, पृ. ८५, ८६

५४. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.५२१

५५. पाटील टी.एस., भाई प्रा.डॉ.एन.डी.पाटील कार्यगौरव समिती, प्र.आ.दिनांक नाही, कोल्हापूर, पृ.१८

५६. कित्ता पृ.२०

५७. सायनाकर विश्वास, प्रा.डॉ.एन.डी.पाटील, श्रमिक प्रतिष्ठान, प्र.आ.सप्टें. २०१२ पृ.४५, ४६

५८. कित्ता पृ.६७

५९. कित्ता पृ.९१

६०. पाटील टी.एस., भाई प्रा.डॉ.एन.डी.पाटील कार्यगौरव समिती, प्र.आ.दिनांक नाही, कोल्हापूर, पृ.१९, २०

६१. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, सातारा इतिहास संशोधन मंडळ, प्र.आ.३० जाने.२०१५, पृ.५२, ५३

६२. पाटील टी.एस., भाई प्रा.डॉ.एन.डी.पाटील कार्यगौरव समिती, प्र.आ.दिनांक नाही, कोल्हापूर, पृ.३४, ३५

६३. बोकील निता, महाराष्ट्राचा राजकीय इतिहास, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई, प्र.आ.१ मे २०१२, पृ.११५

६४. मोरे विठ्ठल, महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्स कम्युनिस्ट पक्ष, कैलास पब्लिकेशन, प्र.आ.औरंगाबाद, मार्च १९९५, पृ.१४९

६५. बोकील निता, महाराष्ट्राचा राजकीय इतिहास, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई, प्र.आ.१ मे २०१२, पृ.१३१, १३२

६६. मोरे विठ्ठल, महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्स कम्युनिस्ट पक्ष, कैलास पब्लिकेशन, प्र.आ.औरंगाबाद, मार्च १९९५, पृ.१५९

६७. शिवणीकर राघव, क्रांतिसिंह नाना पाटील सातारचा सिंह, प्रकाशक एस.एम.आदाटे, पुणे १६, प्र. आ.१५ ऑगस्ट १९८६ पृ.२५५

६८. कित्ता, पृ. २५५

६९. कित्ता, पृ. २५७

७०. यादव सुमित, क्रांतिसिंह नाना पाटील, सातारा इतिहास संशोधन मंडळ, प्र.आ.३० जाने.२०१५, पृ.२७९

७१. कित्ता, पृ.२८०

७२. कित्ता, पृ.२८१, २८२

७३. म्हमाने अनिल (संपा.), मानवमुक्तीसाठी भारत पाटणकर भा.१, निर्मिती संवाद, प्रकाशन ३०, राजाराम रोड, कोल्हापूर, प्र. आ.५ मार्च २०१२, पृ.८७५, ८७६

७४. धर्माधिकारी भा.वि., क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ आण्णा गौरव समिती वाळवा, प्रथम आवृत्ती, १५ जुलै २००७, पृ. १२६

७५. कित्ता पृ.१२८

७६. कित्ता, पृ. १२८, १२९

७७. मोरे विठ्ठल, महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्स कम्युनिस्ट पक्ष, कैलास पब्लिकेशन, प्र.आ.औरंगाबाद, मार्च १९९५, पृ.१७७, १७८
७८. धर्माधिकारी भा.वि., क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, कैलास पब्लिकेशन, वाळवा, प्रथम आवृत्ती, १५ जुलै २००७, पृ. १३१
७९. कित्ता, पृ.१३१, १३२
८०. कित्ता, पृ.१४८, १४९
८१. कित्ता, पृ.१५२
८२. जोसेफ शाजी, रोहयोच्या अंमलबजावणीतील लोकचळवळीचे योगदान, समाज प्रबोधन पत्रिका, वर्ष ४४, अंक १७४, पृ.१४२ ते १४९
८३. पोकळे पार्थ यांची मुलाखत– दि.२५.१०.२०१४, सातारा
८४. आढाव बाबा, एक गाव एक पाणवठा, मौज प्रकाशन, गिरगाव, मुंबई, प्र.आ.१९७६, पृ.२०८
८५. दलवाई हमीद, मुस्लिम समाज, भारतीय प्रबोधन–समीक्षण व चिकित्सा, शंकरदेव गौरव ग्रंथ, दि.के.बेडकर, संपादक, समाजप्रबोधन संस्था, पुणे, १९७३, पृ.१९९ ते २०७
८६. जगताप अनिल यांची मुलाखत– दि.२३.११.२०१५, सातारा
८७. कराड रोटरी क्लब (संपा.), रौप्यमहोत्सव स्मरणिका, पृ.२६
८८. कित्ता.
८९. गोखले, वि.पु., देशपांडे का.धों, कऱ्हाड समग्र दर्शन, सोमवार पेठ, कराड, प्र.आ., ६ डिसेंबर २००८, पृ.५९
९०. पाटणे संभाजीराव (संपा.), स्वातंत्र्यसंग्रामातील सातारा जिल्हा, ऑगस्ट क्रांती महोत्सव समिती सातारा, १९९२, पृ.१३६, १३७
९१. कित्ता, पृ.१३३ ते १३५

## प्रकरण तिसरे

# सातारा जिल्हयातील सामाजिक चळवळी

**प्रस्तावना :**

एकोणिसाच्या शतकाच्या मध्यापासून वाईमध्ये प्रत्येक आळीमध्ये स्वतंत्र पाठशाळा होत्या. या पाठशाळा गुरूकुल पध्दतीच्या होत्या. ब्रिटीश राजवटीतील शिक्षणपध्दतीचा काहीही संबंध नव्हता.इ.स.१९१६ मध्ये प्राज्ञपाठशाळेची स्थापना स्वामी केवलानंद यांनी केली.[१] 'शतपत्रे'कार लोकहितवादी वाई येथे न्यायाधीश होते त्यांनीच येथे नेटिव्ह जनरल लायब्ररी स्थापन केली. येथे इंग्रजी ग्रंथसुध्दा होते. समाजवादी महिला सभेच्या वतीने वाडयावस्त्यावर बालवाडया चालविल्या जात. स्त्रियांच्याकरिता शिवणकामाचे वर्ग भरविले जात. ग्रामीण महिलाकरिता शिबीराचे आयोजन होत होते. 'चूल आणि मूल' याच्या पलीकडे जाऊन अनेक विषयांचे ज्ञान दिले जात होते.[२] शिक्षणप्रेमी नागरिकांच्या प्रयत्नाने ता.१.८.१९५४ रोजी कराडमध्ये पहिली प्राथमिक मराठी शाळा नं.१ स्थापन झाली. संघटीत प्राथमिक शिक्षणाचा हा पहिलाच संघटीत प्रयत्न असावा.[३]

### ३.१.१ सातारा जिल्हा शिक्षण आरंभ:

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सातारा येथे पहिली मराठी पाठशाळा त्यांच्या 'रंगमहाल' या वाडयात सन १९२९ मध्ये सुरू केली.[४] या शाळेत मराठी, संस्कृत, पर्शियन, इंग्रजी ज्योतिष व व्यायाम इ. शिक्षण देण्याची सोय केली. या कृतीने सनातनी खवळले म्हणून महाराजांनी मुंबईहून डॉ.मिल्न यांच्या मदतीने तीन मिशनरी शिक्षक त्या पाठशाळेत नियुक्त केले.[५] सरकारी पातळीवर प्राथमिक शाळेची सुरूवात होण्यासाठी १८५० साल उजाडले. इ.स. १८८२मध्ये शाळा जिल्हा लोकल बोर्डाकडे सोपविण्यात आल्या. इ.स. १९२३ मध्ये शाळा लोकल बोर्डाकडे आल्या. परंतु शिक्षणप्रसाराला फारशी गती आली नाही. इ.स. १९४६ मध्ये सक्तीचे शिक्षण होईपर्यंत शिक्षणप्रसार झालाच नाही, किंबहुना कमी झाला. दुर्गम व डोंगर वाडीवस्ती हा भाग शिक्षणाचे दृष्टीने वंचित राहिला.[६] सन १९२३ ते १९४६ पर्यंतचा कालखंड जिल्हयाच्या प्रगतीला अडसर ठरला. पाटणचे बाळासाहेब देसाई यांचे नेतृत्व तालुक्याला मिळण्याअगोदर तालुका मागास म्हणून समजला जात होता. त्यांना लोकल बोर्डाचे अध्यक्षपद मिळाल्यानंतर डोंगराळ भागातील शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. खेडोपाडयात शाळा काढल्या. त्यांनी फार परिश्रम करून डोंगराळ भागाचा विकास केला जेथे शाळा नव्हती तेथे शाळा काढल्या. शिक्षण, इमारती, आर्थिक इ. बऱ्याच समस्या होत्या. बाळासाहेब देसाई यांनी समस्यांचा अभ्यास केला व शाळांच्या इमारती बांधण्याचा धडक कार्यक्रम राबविला.[७] बाळासाहेब देसाई ११ वर्षे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. या काळात गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वसतिगृहाच्या सोयी उपलब्ध केल्या.[८]

**जिल्हयातील प्राथमिक शाळा :**

सातारा जिल्हयात इ.स. १८५५-५६ मध्ये देशी भाषेच्या व्हर्नाक्यूलर २५ शाळा व इंग्रजी भाषेची

एक शाळा होती. इंग्रजी भाषेची प्रतापसिंह हायस्कूलची स्थापना १८५१ मध्ये झाली. या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या १८३४ एवढी होती. इ.स. १८६५–६६ मध्ये कन्या शाळा नावाची मुलीची शाळा व १०३ व्हर्नाक्यूलर शाळा होत्या. याशिवाय एक ॲग्लो व्हर्नाक्युलर शाळा होती. तर १८७५–७६ मध्ये मुलीच्या ४ शाळा मिळून एकूण २२३ शाळा होत्या.यामध्ये २२० व्हर्नाक्यूलर व २ ॲग्लो व्हर्नाक्यूलर व एका माध्यमिक शाळेचा समावेश होता. त्यात एकूण ११५११ विद्यार्थी होते.[९] सन १८५५–५६ शी तुलना करता इ.स. १८८२–८३ मध्ये एकूण २४८ शाळा व १४४९८ विद्यार्थी होते. शाळेची संख्या २२२ने तर विद्यार्थी संख्या १२६६४ ने वाढली. कन्याशाळा ही सातारा जिल्हयातील पहिली मुलींची शाळा. सातारा शहरात ती इ.स. १८६५ मध्ये उघडण्यात आली. पुढील १० वर्षात या शाळांची संख्या ४ झाली. सुरवातीला ४८ एवढी पटसंख्या पुढे ती १८५ झाली. सन १८८२–८३ मध्ये पाच शाळेत ४३६ मुली पटावर होत्या.[१०]

सन १८७४–७५ पासून ते १८८३ पर्यंत हायस्कूलमधून ५१ विद्यार्थी मॅट्रिकची परीक्षा पास झाले. वरील नागरी भागातील ११ शाळा वगळता ग्रामीण भागात २०३ प्राथमिक शाळा होत्या.[११]

**इ.स.१८८२–८३ मधील सातारा जिल्हयातील प्राथमिक शाळांची तालुकावार संख्या[१२]**

| **तालुका १** | **गावांची संख्या २** | **लोकसंख्या ३** | **शाळा ४** |
|---|---|---|---|
| जावळी | २५२ | ६३७२९ | १२ |
| कराड | १०२ | १२४९७३ | २८ |
| खटाव | ०८४ | ७४०२७ | १९ |
| कोरेगाव | ०७३ | ७५१०५ | २४ |
| माण | ०७७ | ४६५३० | ०८ |
| पाटण | २०१ | १०८८६६ | १३ |
| सातारा | १४७ | ९१३१२ | १८ |
| वाई | १२४ | ७६९३४ | २१ |
| खानापूर | ०९० | ७५८५० | १८ |
| तासगाव | ०४७ | ६२९२९ | १६ |
| उळवा | १३२ | १३८४३२ | २६ |
| एकूण | १३२९ | ९३८६८७ | २०३ |

सातारा संदर्भ : सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ.६४७

देऊर हे गाव सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्याच्या उत्तरेस डोंगराळ व दुष्काळी भागातील गाव. येथे प्राथमिक शाळा इ.स.१८७१ मध्ये स्थापन झाली.[१३] गोरगरीबांच्या मुलांच्यासाठी त्यावेळी कोरेगाव तालुक्यात विविध शिक्षण संस्था कार्यरत होत्या. तरीसुध्दा डोंगर व दुर्गम भागात काही खेडी गावे वस्तीशाळेपासून वंचित होते. अशा ठिकाणी शंकरराव जगताप यांनी शाळा काढून ज्ञानगंगा खुली केली.[१४]

**सातारमधील १८८७ च्या इंग्रजी शाळा :**

सातारा हायस्कूल ही संस्था वगळल्यास १८८७ सालापासून सातारमध्ये दोन इंग्रजी शाळा होत्या. १.नारायणराव देशपांडे यांची इंग्रजी मराठी शाळा, २.दत्तोपंत जोशी यांची न्यू इंग्लिश स्कूल. पुढे त्यांनी ही शाळा डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे या संस्थेकडे जोडून टाकली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कै. गु. सीतारामपंत देवधर यांचेकडे सोपविण्यात आली.[१५]

**कराडच्या टिळक हायस्कूल स्थापनेचा ठराव :**

२ ऑगस्ट १९२० ला कराड येथे लोकमान्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सभा झाली. त्या सभेत शिक्षण संस्थेच्या रूपाने लोकमान्यांचे चिरस्मरणीय स्मारक उभारण्याचा संकल्प केला व 'शिक्षण मंडळ कऱ्हाड' ही संस्था स्थापन झाली. लो.टिळक स्मारक समितीस 'शिक्षण मंडळ' हे नाव दिले. त्यांचेच विकसित रूप म्हणजे कऱ्हाडचे टिळक हायस्कूल.[१६] विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे सातारा जिल्हयात तालुक्याच्या गावी स्थापन झालेली पहिलीच खाजगी शिक्षण संस्था. संस्थाचालक म्हणून सन १९२० ते १९३० खालील व्यक्तींचे नेतृत्व लाभले.

१.अध्यक्ष : किसनलाल प्रेमराज, पन्नालाल गोपीलाल, पांडुरंग आनंदराव मोहिते २.चेअरमन : कृष्णाजी गोविंद बहुलेकर, गणेश अंताजी जोशी, पांडूरंग गणेश भाटे, लक्ष्मण महादेव देशपांडे, पांडुरंग केशव शिराळकर ३. संचालक : काकासो अराणके, बाळासाहेब पाठक. नगरपालिकेचे उत्तम सहकार्य व प्रारंभी प्रतिवर्षी रू.२००० संस्थेस अनुदान मिळत होते. गुरूनाथ वैद्य यांनी सुमारे एक हजार चौरस फूट खुली जागा बक्षिस रूपाने दिली.[१७]

**जिल्हा स्त्री शिक्षण चळवळ :**

सन १९७१ मधील टिळक हायस्कूलच्या सुवर्ण महोत्सवाबरोबरच कन्या शाळा कराडचा रौप्यमहोत्सव साजरा केला. १९७१ ला भूमिपूजन व १९७४ मध्ये तीन मजली भव्य इमारत प्रत्यक्ष इमारतीचा वापर सुरू झाला.[१८] आण्णासाहेब कर्वे यांच्या हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेची स्थापना २२ ऑक्टोंबर १९२२ या भाऊबीजेच्या दिवशी झाली. त्यावेळच्या राष्ट्रीय शाळेतील ६ मुली व इतर ५ मुली अशा ११ मुली बरोबर घेऊन सातारा येथे शाळा स्थापन केली. कन्या शाळेला अनेक लोकांनी देणग्या देऊन सहकार्य केले. इ.स. १९२७ मध्ये विद्यार्थीनींची संख्या ९५ पर्यंत वाढली.[१९]

**गरज राष्ट्रीय शिक्षणाची :**

इंग्रज सरकारच्या शैक्षणिक धोरणावर देशातील उच्च वर्गाचा प्रभाव होता. हे सर्वप्रथम महात्मा जोतीराव फुले यांच्या लक्षात आले. शूद्र शिक्षणापासून वंचित राहतात. स्त्रिया शिक्षणापासून वंचित राहतात. शूद्र व स्त्रिया हे वंचित घटक शिक्षणप्रवाहात आल्याखेरीज त्यांचे शोषण थांबणार नाही.[२०] हे म.फुले यांनी ओळखले व त्यांनी इ.स. १८४८ मध्ये पुणे येथे अस्पृश्य व स्त्रिया यांच्यासाठी शाळा काढल्या. राष्ट्रीय

शिक्षण गरज आहे असे लो.टिळक, आगरकर व विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी ओळखले.[२१] व पुणे येथे 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना केली. पुण्यानंतर पुढे सातारा येथे शाखा सुरू केली.

### ३.१.२ दलितांचे शिक्षण – कर्मवीर आण्णांच्या शिक्षणाचे फलित:

बहुजन समाजाच्या मुलामुलींना शिक्षण मिळाल्याशिवाय देशाची उन्नती होणार नाही असे सत्यशोधकी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मत होते. मानवनिर्मित जात, गोत, धर्म, पंथ, व भेद त्यांना अमान्य होते.[२२] इ.स. १९१९ मध्ये काले, ता.कराड, जि.सातारा येथे या कार्याचा प्रारंभ केला. प्रथम त्यानी वसतिगृहाची स्थापना केली व तेथील स्थानिक लोकांच्यावर त्याचेवर देखरेखीची जबाबदारी सोपविली. या संस्थेला 'रयत शिक्षण संस्था' हे नाव दिले.[२३] कर्मवीर अण्णांच्या शैक्षणिक कार्याचे नेमके फलित काय या प्रश्नाचे प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी फार मौलिक व चिंतनपर उत्तर दिले आहे ते म्हणतात, '' इ.स. १८८५ मध्ये पुण्याला फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली. पुढे दोन वर्षांनी कर्मवीर अण्णांचा जन्म झाला व त्यानंतर साधारणपणे वीस एक वर्षांनी या शैक्षणिक क्षेत्रात ते उतरले. त्यांनी त्यांच्या कार्याची सुरूवात सातारसारख्या ठिकाणी कॉलेज उघडून केली नाही. तर त्यांनी अठरापगड जातींच्या मुलासाठी एकच वसतीगृह काढले व खेडोपाडयातील मुलांसाठी प्राथमिक शाळा उघडल्या. असे त्यांनी दुहेरी प्रयत्न केले यावरून कर्मवीरअण्णांच्या कार्याचे फलित लक्षात येईल.[२४] एक हरीजन विद्यार्थी घेऊन त्यांनी संस्थेच्या कार्याला सुरूवात केली. सन १९२७ ला राष्ट्रपिता गांधीजींनी छ.शाहू बोर्डिंगला भेट दिली.[२५]

### रयत शिक्षण संस्था प्राथमिक शिक्षण :

रयत शिक्षण संस्थेचे दुसरे अध्यक्ष कै.रा.ब.काळे यांचे स्मृतीदाखल सातारा येथील धनिणीचे बागेत संस्थेने ४.१०.१९३६ रोजी पहिली प्राथमिक शाळा काढली. यानंतर ज्या गावी शाळा नाही तेथे शाळा उघडण्याचा मनोदय त्यांनी केला. इ.स. १९३७ मध्ये मुंबई प्रांतात कॉंग्रेस सत्तेवर आलेले होते. त्यावेळी मंत्रीमंडळाने शिक्षणप्रसाराकरिता 'व्हॉलेंटरी' शाळांची योजना केली. म्हणून अण्णांनी शाळा काढण्याचे काम गतीने केले.[२६] कर्मवीर अण्णांनी पायी प्रवास करून लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले व तेथे शाळा सुरू केल्या. ग्रामस्थांनी सहकार्य केले. इ.स. १९४९–५० मध्ये अशा शाळांची संख्या ५७८ होती व विद्यार्थी संख्या १२०० होती.[२७] कोळपेवाडी येथील शाळा रयत शिक्षण संस्था कोपरगाव सहकारी साखर कारखान्यातील सेवक वर्गाच्या मुलामुलींच्यासाठी चालवित आहे.[२८]

### ३.१.३ शिक्षकांचे करिता प्रशिक्षण ट्रेनिंग स्कूल :

कर्मवीर नेहमी म्हणायचे, ''शिक्षणप्रसार झाला पाहिजे त्यासाठी गावोगावी शाळा पाहिजे व गुणवत्तेकरिता प्रत्येक शिक्षक प्रशिक्षित पाहिजे. दि.६ मे १९३५ रोजी रयत शिक्षण संस्थेचे पहिले अध्यक्ष हमीद ए.अल्ली यांनी सभेत रयत शिक्षण संस्था सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग कॉलेज सुरू करील असे जाहीर केले.[२९] सन १९४२ मध्ये सातारा येथे महिलांसाठी जिजामाता अध्यापक ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. अशी

बरीच कॉलेज संस्थेने सुरू केली. अष्टे (सांगली), रूकडी(कोल्हापूर), जामगाव (नगर), कुसुर (सातारा), माहुली (सांगली) येथे ही कॉलेज सुरू केली.

**इ.स १९७४–७५ ची ट्रेनिंग कॉलेजची स्थिती होती.**[३०] **१.प्रशिक्षणार्थी स्त्री पुरूष एकुण : १००५७**

**२.शिक्षक : ६८९** **३.शिक्षिका : १६९** **वार्षिक खर्च अंदाजे ५९६८०० रूपये.**

### ३.१.४ रयत शिक्षण संस्था – माध्यमिक शिक्षण :

वसतिगृहे, प्राथमिक शाळा व प्रशिक्षण ट्रेनिंग कॉलेज यांचा प्रश्न हाताळल्यावर कर्मवीरअण्णांनी आपला मोर्चा माध्यमिक शिक्षणाकडे वळविला. त्यावेळी माध्यमिक विद्यालये जिल्हा व तालुक्यांच्या ठिकाणी होती. सर्वसामान्याला हा खर्च परवडत नव्हता. यामुळे गरजू व होतकरू विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहात. कर्मवीरांनी माध्यमिक शिक्षण देणाऱ्या विद्यालयांचा प्रारंभ करण्याचा इरादा केला व लगेच इ.स. १९४० मध्ये एक विद्यालय सातारा येथे सुरू केले. त्याचे नामकरण 'महाराज सयाजीराव फ्री ॲन्ड रेसिडेन्सियल हायस्कूल' असे दिले. सन १९३३ ला बडोदयाचे नरेश श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांनी श्री. छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसला भेट दिली. त्यावेळी बोर्डिंगमध्ये सर्व जातीधर्माची २०० मुले होती.[३१]

**रयत शिक्षण संस्था प्राथमिक शाळा**[३२]

| अ.न. | वर्ष | शाळांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या | शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १९३८–३९ | ०६१ | २१६९ | ०६१ |
| २ | १९३९–४० | १६८ | ५८३० | १७५ |
| ३ | १९४०–४१ | १९९ | ६५२४ | २२४ |
| ४ | १९४१–४२ | २४३ | ७७४५ | २८६ |
| ५ | १९४२–४३ | २९५ | ९४४६ | ३८६ |
| ६ | १९४३–४४ | ४१८ | १३४०८ | ४४१ |
| ७ | १९४४–४५ | ४०५ | १३०७९ | ४१४ |
| ८ | १९४५–४६ | ३९५ | १३२८७ | ४१६ |
| ९ | १९४६–४७ | ४३१ | १४७८३ | ४४१ |
| १० | १९४७–४८ | ५०८ | २०४७३ | ६०९ |
| ११ | १९४८–४९ | ५५४ | २३४७३ | ७५० |
| १२ | १९४९–५० | ५७८ | २५१७९ | ६८५ |
| १३ | १९५०–५१ | ५५७ | २६१३७ | ६३९ |
| १४ | १९५१–५२ | ४७८ | २२७७८ | ६०१ |
| १५ | १९५२–५३ | ४६९ | २२२३३ | ६०४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | १९५३–५४ | ४५१ | २०४२३ | ५५१ |
| १७ | १९५४–५५ | ३१९ | १४१०६ | ३८१ |
| १८ | १९५५–५६ | ३०३ | १४१०६ | ३७२ |

मॅथ्यू ए.व्ही., कर्मवीर भाऊराव पाटील ग्रंथ

**३.१.५ रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक विद्यालयांची वैशिष्ट्ये**[३३]

**महाराज सयाजीराव विद्यालय :**

१.विद्यार्थ्याकडून फी न घेता संपूर्ण मोफत चालविलेले विद्यालय २. वसतिगृह युक्त विद्यालय.

३.सर्व विद्यार्थ्यांना दररोज काही तास कामकरावे लागे(श्रमाचे काम). उदा.शेतीकाम, बागकाम, झाडलोट, खडी फोडणे इ.

**लोणंद हायस्कूल :**

डॉ.कर्मवीर भाऊराव पाटलांनी दुसरे माध्यमिक विद्यालय खंडाळा पेटयातील लोणंद येथे सुरू केले. या शाळेचे नाव 'मालोजीराजे विद्यालय' असे दिले गेले.

**प्रवरानगर हायस्कूल :**

प्रवरानगर जि.अहमदनगर येथे मुबलक ऊसाचे उत्पन्न येते. येथील शेतकऱ्यांनी श्री.विठ्ठलराव विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहकारी साखर कारखाना काढला. साखर कारखान्याने एक शाळेसाठी इमारत बांधली व ती रयत शिक्षण संस्थेला देऊन टाकली. ऊस उत्पादक शाळेकरिता ग्रामस्थ देणगी स्वरूपात रक्कम जमवितात. या पाठिंब्यामुळे रयत शिक्षण संस्था आठवी ते अकरावीपर्यंतचे हायस्कूल विद्यार्थ्यांच्याकडून कोणतीही फी न घेता त्यांना अभ्यास शिकविला जातो.[३४]

**३.१.६ उच्च शिक्षणास प्रारंभ :**

सन १९४७ मध्ये आण्णांनी सातारला कॉलेज सुरू केले. कर्मवीर भाऊरावांनी महाविद्यालयाला 'छत्रपती शिवाजी कॉलेज' असे नाव दिले.[३५] छत्रपती शिवाजी कॉलेज 'मोफत आणि निवासी महाविद्यालय' म्हणून चार वर्षे चालविण्यात आले.[३६] छत्रपती शिवाजी कॉलेजच्या प्रारंभीच्या काळात रयत शिक्षण संस्थेला सातारच्या जिल्हा लोकल बोर्डाकडून भरीव स्वरूपाचे सहकार्य झाले. शिवाजी कॉलेज झाल्यापासून दरवर्षी पाच हजार रू.मिळत होते. हे बाळासाहेब देसाई यांच्या नेतृत्वाने मिळाले. ज्या काळात कर्मवीरांचेवर सरकारची गैरमर्जी झाली त्या काळातसुध्दा बाळासाहेबांनी हे अनुदान सुरू ठेवले.[३७]

**३.१.७ कर्मवीरअण्णांची शिक्षणाबाबत काही उदात्त तत्वे :**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संदर्भात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या काही संकल्पना होत्या. विद्यार्थी साधा असावा . त्याचा पोशाख राहणीमान साधेसुधे असावे. रोज त्यांनी श्रम केले पाहिजे.[३८]

### ३.१.८ रयत शिक्षण संस्थेची विविध महाविद्यालये :

आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा, स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर, इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, साताराचंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर, रा.ब.नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर, सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, एस.एस.जी.एम.क़ॉलेज, कोपरगाव, दादा पाटील कॉलेज, कर्जत, महात्मा फुले कला, विज्ञाान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल, प्रा.डॉ.एन.डी.पाटील महाविद्यालय, मलकापूर, बळवंत कॉलेज, विटा, महाराज जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर, चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी, महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, वीर वाजेकर कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, फुंडे, दहिवदी कॉलेज, दहिवडी, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, रामानंदनगर, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, कला महाविद्यालय, सावळज, कर्मवीर भाऊराव पाटील तंत्रनिकेतन महाविद्यालय, सातारा, शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद, कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव, डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव, एस.एम.जोशी महविद्यालय, हडपसर, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर, आण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत.[३९]

**मुलींचेसाठी विद्यालये** :

१.जिजामाता अध्यापक विद्यालय, सातारा
२.भिमाबाई आंबेडकर कन्या विद्या मंदीर
३.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्या मंदीर, जयसिंगपूर
४.न्यू इंग्लिश स्कूल फॉर गर्ल्स विद्यामंदीर, कोपरगाव
५.डॉ.सी.एम.मेहता कन्या विद्या मंदीर, कोपरगाव
६. लक्ष्मीदेवी गर्ल्स स्कूल, हुपरी
७. न्यू इंग्लिश स्कूल फॉर गर्ल्स, मलकापूर, जि.कोल्हापूर
८.. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कन्या विद्या मंदीर, अहमदनगर
९. गर्ल्स स्कूल, निरा, जि.पुणे
१०. न्यू इंग्लिश स्कूल फॉर गर्ल्स, लोणंद
११. कन्या विद्या मंदीर, दुधगाव, जि.सांगली
१२.साधना मुलींचे विद्यालय, हडपसर
१३. कन्या विद्या मंदीर, कर्जत, जि.अहमदनगर

**वसतिगृहे** :

१..लक्ष्मीबाई पाटील वसतिगृह, सातारा
२.जिजामाता अध्यापक विद्यालय वसतिगृह, सातारा
३.महाविद्यालयीन विद्यार्थीनी वसतिगृह, सातारा
४.सौ.सुमतीबाई पांडुरंग पाटील वसतिगृह, सातारा

**१९७४–७५ चे अहवालानुसार सांख्यिकी माहिती** [४०]

१.संस्थेच्या वसतीगृहात २४४ विद्यार्थीनी आहेत. यापैकी १.दुय्यम शिक्षण घेणाऱ्या : ९२, २. कॉलेज शिक्षण घेणाऱ्या : ७६, ३. डी.एड कोर्स शिक्षण घेणाऱ्या : ७६

२.संस्थेतील विद्यार्थी वर्ग एकूण : ११६१८२ ३.यापैकी विद्यार्थीनी : ०२४५५९

४.मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण : २१ टक्के ५.संस्था सेवक वर्ग : ६३५६

पैकी स्त्री सेवक वर्ग : ४२५ शेकडा प्रमाण : ६.६६ टक्के

**रयत शिक्षण संस्था, सातारा**

कार्याचा विस्तार १९७४–१९७७ [४१] अंदाजपत्रक १९७४–१९७५ : ४३५८६०२०

प्रत्यक्ष खर्च १९७४–१९७५ : ३७७५१५६५

उच्च शिक्षण महाविद्यालये : १९ कला, शास्त्र व वाणिज्य : ०६ कला, वाणिज्य : ३

कला शास्त्र : १

कला : १ माध्यमिक विद्यालये : ३१२ १.मुलींची माध्यमिक विद्यालये : १२ २.शेती माध्यमिक विद्यालये : १२ १.तंत्रज्ञान माध्यमिक विद्यालये : ०३

प्रशिक्षण अध्यापक विद्यालये : ७ (पैकी स्त्रियांसाठी ०१) प्राथमिक व पूर्वप्राथमिक : ०८

विद्यार्थी महाविद्यालयीन : १४६७९ अध्यापक विद्यालय : ८५८

विद्यार्थी माध्यमिक : ११६१८२ पूर्वप्राथमिक : १४२४ **एकूण : १३३१४३**

सेवक महाविद्यालय : ८३१ माध्यमिक विद्यालय : ५२८९

अध्यापक विद्यालय : १०७ इतर शाखा : ८६ प्राथमिक : ३२ वसतिगृहे : १३

इतर शाखा : ८६ **एकूण : ६३५८**

### ३.१.९ रयत शिक्षण संस्थेची स्वाबलंबी शिक्षण योजना :

प्रत्येक विद्यार्थ्यास श्रम हे केलेच पाहिजे अर्स कर्मवीरांचे तत्व प्रथमपासूनच होते. श्रमातून शिक्षण घेता यावे म्हणून कर्मवीरांनी सरकार व जनता यांचेकडून अनेक गावागावातून नापीक पडीक जमिन मिळविल्या व त्या सुपीक केल्या. वडाळा महादेव जि.अहमदनगर येथे १५५ एकराच्या जमिनीत विविध पिकातून उत्पन्न काढले जाते. देवापूर जि.सातारा येथील राजेवाडी तलावाकाठील १५० एकर पडिक जमिन. छत्रपती शिवाजी कॉलेजमधील 'कमवा आणि शिका' ही योजना एकूण शिक्षणव्यवस्थेतील मानदंड ठरली.[४२]

**छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा कमवा व शिका योजना जमाखर्च तपशील [४३] *सन १९९३-९४***

| विद्यार्थी संख्या | जमा रक्कम | खर्च नियमित | भांडवली | एकूण | नफा तोटा | भांडवली खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| ५० | २११९८३.२० | २१२१९९.९० | १०३४६६.३५ | ३१५६६०.२५ | १०३६७७.०५ | लेव्हलिंग ८३६२ रोपे ४९२७ बंधारा ५११४४ वर्ये शेड ८९८० कॅन्टींग २५५५४.७५ फर्निचर बोर्ड ४५०० एकूण १०३४६६.३५ |
| | | | | | रोपे २१६.७० | |

संदर्भ : शिवगौरव स्मरणिका, जमा-खर्च कमवा व शिका, पृ.३९

**स्वावलंबी शिक्षण योजनेतील सहभागी विद्यार्थी संख्या[४४]**

| **वर्ष** | **विद्यार्थी** | **विद्यार्थीनी** | **एकूण** |
|---|---|---|---|
| १९९१-९२ | ४५ | ०९ | ५४ |
| १९९२-९३ | ५३ | ११ | ६४ |
| १९९३-९४ | ५० | ०७ | ५७ |
| १९९४-९५ | ७० | ०९ | ७९ |
| १९९५-९६ | ५५ | ०७ | ६२ |
| १९९६-९७ | ४० | ०७ | ४७ |
| १९९७-९८ | ५५ | ११ | ६६ |

संदर्भ : शिवगौरव स्मरणिका, जमा-खर्च कमवा व शिका, पृ.३९

**उपक्रम उत्पन्न खर्च नफा तोटा [४५]**

| **वर्ष** | **उत्पन्न(रू.)** | **खर्च(रू.)** | **निव्वळ नफा** | **तोटा** |
|---|---|---|---|---|
| १९८६-८७ | ७६८३४.१४ | ७१३१३.०० | ५५२०.१४ | ----- |
| १९८७-८८ | ८१२८०.९० | ५९१३६.६२ | २२१४४.२८ | ----- |
| १९८८-८९ | १०६२८६.८५ | ७०२०८.५० | ३६०७८.३५ | ----- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९८९–९० | १३१२४७.५६ | ७९४६५.२० | ५१७८२.३६ | ----- |
| १९९०–९१ | १८७९७४.२० | १३३०२१.१६ | ५४९५३.०४ | ----- |
| १९९१–९२ | १२६८२६.३५ | ११०४७६.७० | १६३४९.६५ | ----- |
| १९९२–९३ | २७२७५३.९० | २०४६०७.५० | ६८१४६.४० | ----- |
| १९९३–९४ | २११९८३.२० | ३१५६६०.२५ | ----- | २१६.७० |
| १९९४–९५ | १४३३६६.०० | ३२१६४३.०० | ----- | ११००१३.०० |
| १९९५–९६ | २५३४३३.१५ | २३३४१६.०० | २८५१६.८५ | ----- |
| १९९६–९७ | १८३४२२.०० | १६३७६०.०० | १९७६०.०० | ----- |

संदर्भ : शिवगौरव स्मरणिका, जमा–खर्च कमवा व शिका, पृ.३९

कर्मवीर भाऊराव पाटील गेल्या शंभर दीडशे वर्षातील लोकोत्तर पुरूष आहेत''असे चिंतामणराव देशमुख म्हणतात.[४६] रयत शिक्षण संस्था ही सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रातील अग्रेसर संस्था आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांना दीनदलित समाजाला शिक्षणाचे माध्यमातून विकसित करायचे होते. जात, पात, पंथ, भेद मोडून त्यांना नवा समाज निर्माण करायचा होता.[४७] सर्वजातीधर्माची मुले एकत्र ठेवल्याने लोक भाऊराव आण्णांना दोष देत. परिणाम लोक देणगी देण्यास उत्सुक नव्हते. यामुळे खर्चाची तोंडमिळवणी होत नव्हती. कर्मवीरांचे सत्यशोधक व ब्राह्मणेत्तर चळवळीतील मित्र भाऊरावांना मदत करीत.[४८]

### ३.१.१० महात्मा गांधीजींची वसतिगृहाला भेट :

दि. २५.०२.१९२७ रोजी महात्मा गांधीजींनी कर्मवीर अण्णांच्या सोमवार पेठेतील घरापुढे पडवीतील वसतिगृहाला भेट दिली. त्यावेळी वसतिगृहात एकूण चौतीस विद्यार्थी होते.[४९] त्यांची वर्गवारी :

१.मराठा : १३, २.महार : ११, ३.मांग : ०१, ४.मुसलमान : ०२, ५.परिट : ०१, ६.न्हावी: ०१ ७.वडार : ०१, ८.जैन : ०१, ९.ब्राह्मण : ०१, १०.लिंगायत : ०१, ११. रामोशी : ०१, एकूण : ३४

अण्णांनी हार घालून म.गांधीजीचे स्वागत केले. गांधीजींनी वसतिगृहाचे नामकरण 'छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' असे केले. सर्व जातीधर्माची मुले एकत्र राहतात. झाडलोट करतात. सर्व कामे स्वत:च करतात हे पाहून म.गांधीजींना समाधान वाटले. वसतिगृहातील एक मातंग विद्यार्थी भिंगारदेवे संस्कृत विषयात पहिला आल्याचे पाहून गांधीजींना खूप आनंद झाला त्यांनी गळ्यातील हार भिंगारदेवे यांच्या गळ्यात घातला.[५०]

### ३.१.११ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भेट :

महात्मा गांधी यांच्या भेटीनंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी इ.स. १९२८ मध्ये शाहू बोर्डिंगला भेट दिली. सर्व जातीधर्माची मुले एकत्रित ठेवून त्यांचे अंगी सर्वधर्मसमभाव हे तत्व कर्मवीर भाऊराव पाटील मुलांचे अंगी प्रतिबिंबीत करीत आहे याबाबत आंबेडकरांना विशेष नवल वाटले.[५१]

### ३.१.१२ रयत शिक्षण संस्था अमृत महोत्सवी संस्था :

समाजसुधारणेचा पाया म.जोतीरावांनी घातला. सुधारणेचा विस्तार महर्षी वि.रा.शिंदे, महर्षी कर्वे, छ.शाहू, प्रबोधनकार अशा समाजसुधारकांनी केला. सर्व जातीपंथातील मुले व मुली यांना एकाच छाताखाली शिकविण्याचा आगळा उपक्रम त्यांनी यशस्वी केला. एक नवा माणूस निर्माण करण्याचा क्रांतिकारक पायंडा कर्मवीरांनी यशस्वी केला.[५२]

**अमृत महोत्सवी वाटचाल :**

**प्राथमिक शाळा :**

धोंडेवाडी ता.कराड येथे १९१९ मध्ये एक प्राथमिक शाळा चालविली. सन १९३६ मध्ये सातारा येथे प्राथमिक शाळा उघडली व अन्य ठिकाणी दोन तीन प्राथमिक शाळा उघडल्या. पुढे अशा शाळांची संख्या ५७८ झाली. स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शाळा, बोर्डाकडे वर्ग झाल्या. सध्या संस्था २४ प्राथमिक शाळा चालविते.[५३]

**आश्रमशाळा** : रयत शिक्षण संस्थेने उपेक्षितांचे शिक्षणाकरिता आदिवासी भागात सन १९९१–९२ पासून आश्रमशाळा चालविण्यास प्रारंभ केला आहे. सन १९९८–९९ मध्ये आश्रमशाळेची संख्या ८ होती.

**माध्यमिक शाळा :**

सन १९४० मध्ये सातारा येथे 'महाराजा सयाजीराव विद्यालय' या मोफत माध्यमिक निवासी शाळेची स्थापना केली. १९४८ मध्ये म.गांधी यांना श्रध्दांजली म्हणून त्यांचे स्मरणार्थ १०१ विद्यालये काढण्याची घोषणा कर्मवीरांनी केली. सध्या महाराष्ट्रातील १४ जिल्हयात व कर्नाटकातील दोन जिल्हयात ४३२ माध्यमिक विद्यालये आहेत.

**उच्च शिक्षण :**

सातारा नंतर सैदापूर, ता.कराड या खेडयात सदगुरू गाडगे महाराज कॉलेज कर्मवीरांनी स्थापन केले. कला, शास्त्र, वाणिज्य शिक्षण देणारी महाविद्यालये, प्रशिक्षण देणारी महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, व विधी महाविद्यालये मिळून एकूण ४० महाविद्यालये आहेत. यापैकी १९ महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे.[५४]

**तांत्रिक शिक्षण :**

संस्थेतील २१ माध्यमिक विद्यालयात आज धंदेशिक्षण दिले जाते. त्याठिकाणी वर्कशॉपसहित परिपूर्ण तांत्रिक विभाग सुरू आहे. ज्युनियर कॉलेजमध्ये तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची सोय आहे. सन १९८३ पासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू आहे. पदव्युत्तर अभ्यासाची सोय आहे. संस्थेत ६ ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) कार्यरत आहेत.

**३.१.१३ रयत स्त्रीशिक्षण :**

सन १९४२ मध्ये अण्णांनी जिजामाता अध्यापक विद्यालयाची स्थापना केली. त्याचवर्षी कै.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या स्मरणार्थ सातारा येथे मुलींचे वसतिगृह काढले. सौ.भिमाबाई आंबेडकर यांचे स्मरणार्थ सातारा येथे सन १९६० ला एक माध्यमिक विद्यालय काढले.[५५] सध्या मुलींचेकरिता १ अध्यापक विद्यालय, १२ वसतीगृह व २८ माध्यमिक विद्यालय व ४ महिला महाविद्यालय चालविली जातात.

**पूर्वप्राथमिक** : सध्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या मिळून संस्थेमार्फत ४० बालवाडया चालविल्या जातात.

**प्रौढशिक्षण** : संस्थेव्दारे प्रौढ साक्षरतेचे वर्ग सुरूवातीपासून चालविले जातात.

**संस्थेचा हिरक महोत्सव** : १४ जून १९८२ मध्ये संस्थेचा हिरक महोत्सव संपन्न झाला. प्रमुख पाहुणे भारताचे राष्ट्रपती निलम संजीव रेड्डी व यशवंतरावजी चव्हाण होते.

**रयत सेवक :**

सन १९५० पासून संस्था 'रयत सेवक' या नावाचे षण्मासिक निघत होते. ते आता वार्षिक स्वरूपात निघत आहे. यामध्ये शाखा घडामोडी, विद्यार्थी, सेवक, हितचिंतक यांचे शैक्षणिक सामाजिक कार्यावरील लेखन प्रसिध्द केले जाते.[५६]

**कर्मवीर विद्याप्रबोधिनी :**

विद्यार्थी जीवनातील विविध क्षेत्रात अग्रेसर रहावा म्हणून सन १९७४–७५ मध्ये कर्मवीर विद्याप्रबोधिनीमार्फत सामान्यज्ञान, गणित, इंग्रजी या विषयाच्या एकूण १२ परीक्षा घेतल्या जातात. तसेच निबंध, पाठांतर, हस्तलिखित, चित्रकला, विभागीय व राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेतल्या जातात. 'संशोधन पत्रिका' वर्षातून दोनवेळा प्रकाशित केली जाते.[५७]

**रयत प्रिंटींग प्रेस :**

१९८२मध्ये 'रयत प्रिंटींग प्रेस' विभाग सुरू करण्यात आला.

**रयत शिक्षण संस्था, सातारा**

**विकास दाखविणारा तक्ता. सन १९१९ ते १९७५[५८]**

| **साल** | **अध्यापक विद्यालये** | **प्राथमिक** | **त्रबल** | **अध्यापक विद्यालये** | **प्राथमिक** |
|---|---|---|---|---|---|
| १९१९–२० | ----- | ----- | ----- | ----- | ०१ |
| १९३२–३३ | ----- | ----- | ----- | ----- | ०२ |
| १९४०–४१ | ०१ | १९९ | ०१ | ----- | ०४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९४४–४५ | ०२ | ४०५ | ०४ | ----- | ०६ |
| १९४९–५० | ०३ | ५७८ | २० | ०१ | १३ |
| १९५४–५५ | ०५ | ३१९ | ४९ | ०२ | १६ |
| १९५९–६० | ०६ | १३ | ११० | ०३ | ४७ |
| १९६४–६५ | ०७ | ०३ | २१५ | ०८ | ८१ |
| १९६९–७० | ०७ | ०३ | २८७ | १५ | ७० |
| १९७०–७१ | ०७ | ०३ | २९६ | १८ | ६८ |
| १९७१–७२ | ०७ | ०३ | ३११ | १९ | ६८ |
| १९७२–७३ | ०७ | ०३ | ३११ | १९ | ७४ |
| १९७३–७४ | ०७ | ०३ | ३१२ | १९ | ७५ |
| १९७४–७५ | ०७ | ०३ | ३१२ | १९ | ७५ |

रयत शिक्षण संस्था, अहवालावरून

टीप : सरकारने सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केल्याने संस्थेने चालविलेल्या बहुतेक सर्व प्राथमिक शाळा ज्या त्या जिल्हयाच्या स्कूल बोर्डाच्या ताब्यात दिल्याने १९५०–५१ पासून प्राथमिक शाळेची संख्या घटली आहे.

### ३.१.१४ रयत शिक्षण संस्था कार्यविस्तार:

**जिल्हावार शाखांची यादी १९७४–७५**[५९]

| शाखा | जिल्हे | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. नगर | बीड | पुणे | ठाणे | कुलाबा | मुंबई | नाशिक | सातारा | सांगली | कोल्हापूर | सोलापूर | रत्नागिरी | बेळगाव | एकुण |
| महा विद्यालये | ५ | -- | १ | -- | १ | -- | -- | ७ | २ | १ | २ | -- | -- | १९ |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्यापक विद्यालये | १ | –– | –– | –– | –– | –– | –– | ३ | २ | १ | –– | –– | –– | ०७ |
| माध्यमिक विद्यालये | ७८ | २ | ५० | ३ | १५ | १ | ११ | ६९ | ३९ | १७ | १९ | ६ | २ | ३१२ |
| वसतिगृहे | १८ | १ | ९ | १ | –– | –– | –– | २५ | १० | ६ | ५ | –– | –– | ७५ |
| प्राथमिक व पुर्व प्राथमिक शाळा | ५ | –– | –– | –– | –– | –– | –– | ०३ | –– | –– | –– | –– | –– | ०३ |
| इतर | ३ | –– | २ | –– | –– | –– | –– | ९ | १ | –– | –– | –– | –– | १५ |
| एकूण | ११० | ०३ | ६२ | ०४ | १६ | ०१ | ११ | ११६ | ५४ | २५ | २६ | ६ | २ | ४३६ |

रयत शिक्षण संस्था, अहवालावरून

**सेवक शैक्षणिक लायकीनुसार १९७४–७५**

१.प़रदेशातून पदवी घेतलेले : ०२ २.पी.एच.डी.: ०८ ३.दुहेरी/तिहेरी पदवी धारक एम.ए.बी.टी.: २३७

४.दुहेरी पदवीधारक एम.ए./एम.एस्सी./एम.एड.: ४३४

५. एकेरी पदवीधारक प्रशिक्षित बी.ए.बी.एस्सी.बी.एड.: २०१४

६. एकेरी पदवीधारक बी.ए.बी.एस्सी. : ६४७ ७.पदवी न धारण केलेले परंतु प्रशिक्षित : १०४१

८.पदवी न धारण केलेले परंतु अप्रशिक्षित : ०४ ९.कारकून : ५९२ १०.शिपाई : १३४७

११. प्राथमिक व पूर्व प्राथमिक शिक्षक : ३२ **एकूण : ६३५८**

**कार्यविस्तार १९८४–८५** [६०]

अंदाजपत्रक १९८४–८५ रू.२१७१०८५०० अंदाजपत्रक १९८३–८४ रू.१८६७२५२२०

अंदाजपत्रक १९८३–८४ रू.१७५७०९२९७

**माध्यमिक विद्यालये :**

एकूण : ३१८ इ.१० वी अखेर ३१३ माध्यमिक विद्यालयांपैकी मुलींची १२

उच्च माध्यमिक विद्यालये : १०४ कॉमर्स विद्यालये : ०७ शेती विद्यालये : ११

टेक.विद्यालये : १४ प्रशिक्षण अध्यापन विद्यालये : ०७ (पैकी स्त्रीयांचेसाठी एक)

प्राथ.व पूर्व प्राथमिक : ०९ वसतिगृहे : ८१ इतर शाखा : ४०

**उच्च शिक्षण महाविद्यालये :**

आर्टर्स, सायन्स व कॉमर्स ०७ आर्टस ०३ आर्टर्स, कॉमर्स ०६

सायन्स ०१

आर्टर्स, सायन्स ०१ कॉमर्स ०३ सायन्स व कॉमर्स ०१ प्रशिक्षित महाविद्यालये ०२

अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन ०१ लॉ कॉलेज ०१ **एकूण २६**

## कार्यविस्तार १९९४–९५[६१]

| शाखा संख्या | शाखा प्रकार | शाखा संख्या |
|---|---|---|
| १ | महाविद्यालये (पैकी २१ मध्ये ज्युनियरचे वर्ग) | ४५ |
| २ | माध्यमिक विद्यालये | ४२५ |
| ३ | माध्य.४२५ पैकी मुलींची | २८ |
| ४ | उच्च माध्यमिक विद्यालये | १७२ |
| ५ | कॉमर्स विद्यालये | ११ |
| ६ | शेती विद्यालये | १४ |
| ७ | टेक.विद्यालये | २१ |
| ८ | प्रशिक्षण अध्या पन विद्यालये (पैकी स्त्रीयांचेसाठी एक) | ८ |
| ९ | प्राथमिक | २३ |
| १० | पूर्व प्राथमिक | ४० |
| ११ | वसतीगृहे | ८१ |
| १२ | प्रशासन कार्यालय | ०७ |
| १३ | आश्रमशाळा | ०८ |
| १४ | औद्यो.प्रशिक्षण संस्था | ०६ |
| १५ | इतर शाखा | ५४ |
| | एकूण | ६९२ |

| अ.न. | शाखा प्रकार | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | महाविद्यालय सिनीयर विभाग (पैकी पदव्युत्तर वर्गातील ५०२९) | ३८६५७ |
| २ | ज्युनि. कॉलेज | २२७५४ |
| ३ | माध्यमिक विद्यालये (पैकी उच्च माध्य. ३०८३६) | ३०३७४६ |
| ४ | अध्यापक विद्यालये | ६८८ |
| ५ | शिवणकला विद्यालये | ३७ |
| ६ | प्राथमिक विद्यालये | ८८७७ |
| ७ | पूर्व प्राथमिक विद्यालये | ३२४० |
| ८ | आश्रमशाळा | ७७८ |
| ९ | औद्यो.प्रशिक्षण संस्था | ६५५ |
| १० | एकूण विद्यार्थी | ३७९४३२ |

| अ.न. | शाखा प्रकार | सेवक संख्या |
|---|---|---|
| १ | महाविद्यालय सिनीयर विभाग | २६९३ |
| २ | ज्युनि. कॉलेज | ७४४ |
| ३ | माध्यमि क विद्यालये (पैकी उच्च माध्य. १०२१) | १२७०४ |
| ४ | अध्यापक विद्यालये | ११७ |
| ५ | प्राथमिक विद्यालये | १९७ |
| ६ | पूर्व प्राथमिक विद्यालये | १२७ |
| ७ | वसतिगृहे | ७१ |
| ८ | प्रशासन कार्यालये | १६९ |
| ९ | आश्रमशाळा | ४८ |
| १० | औद्यो.प्रशिक्षण संस्था | ४४ |
| ११ | इतर शाखा | ०४ |
| १२ | एकूण सेवक | १६९१८ |

संदर्भ–कार्यविस्तार रयत अहवाल १९९४–९५

**कार्यविस्तार १९९८ ९९**[६२]

| शाखा प्रकार | शाखा संख्या |
|---|---|
| महाविद्यालये (पैकी २१ मध्ये ज्युनियरचे वर्ग) | ४० |

| | |
|---|---|
| माध्यमिक विद्यालये | ४३२ |
| माध्य.४३२ पैकी मुलींची | २८ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | १५६ |
| शेती विद्यालये | १७ |
| टेक.विद्यालये | २१ |
| प्रशिक्षण अध्यापक विद्यालये (पैकी स्त्रीयांचेसाठी एक) प्राथमिक शाळा मुलींच्यासाठी एक | ८ |
| पूर्व प्राथमिक शाळा | २५ |
| वसतिगृहे पैकी मुलींची १२ | ३६ |
| प्रशासन कार्यालय | ७४ |
| आश्रमशाळा | ०७ |
| औद्यो.प्रशिक्षण संस्था | ०८ |
| महिला शिवणकला विद्यालये | ०६ |
| एकूण | ६० |
| माध्यमिक विद्यालये | ६९६ |

| अ.न. | शाखा प्रकार | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | महाविद्यालय सिनीयर विभाग | ६०३४३ |
| २ | ज्युनि. कॉलेज | २३४३३ |
| ३ | माध्यमिक विद्यालये (पैकी उच्च माध्य. ३३१६८) | ३३६१०४ |
| ४ | अध्यापक विद्यालये | ८२७ |
| ५ | शिवणकला विद्यालये | ३३ |
| ६ | प्राथमिक विद्यालये | ११६३४ |
| ७ | पूर्व प्राथमिक विद्यालये | ३७१२ |
| ८ | आश्रमशाळा | १८४८ |
| ९ | औद्यो.प्रशिक्षण संस्था | २९९ |
| १० | एकूण विद्यार्थी | ४१४८०० |

| अ.न. | शाखा प्रकार | सेवक संख्या |
|---|---|---|
| १ | महाविद्यालय सिनीयर विभाग | २४९४ |
| २ | ज्युनि. कॉलेज | ७८३ |
| ३ | माध्यमि क विद्यालये (पैकी उच्च माध्य. १८४८) | १३९६६ |
| ४ | अध्यापक विद्यालये | १०८ |
| ५ | प्राथमिक विद्यालये | २५८ |
| ६ | पूर्व प्राथमिक विद्यालये | १३२ |
| ७ | वसतिगृहे | ५० |
| ८ | प्रशासन कार्यालये | १७३ |
| ९ | आश्रमशाळा | ८८ |
| १० | औद्यो.प्रशिक्षण संस्था | ३६ |
| ११ | इतर शाखा | ०३ |
| १२ | एकूण सेवक | १८०९१ |

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था : प्रारंभ**

दि.१९.१०.१९५४ रोजी कराड येथे डॉ.बापूजी साळुंखे व त्यांचे मित्र जमले व विचारविनिमय करून नवीन शिक्षण संस्था स्थापन करण्याच्या शपथा घेतल्या. पुढे १.११.१९५४ रोजी तासगाव तालुक्यातील तुरची या गावी त्यांचे सहकारी बी.ए.बाबर यांच्या मळयात रात्री बारा वाजता बैठक झाली. बैठकीत चर्चा होऊन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था नामकरण निश्चित केले.[६३]

**३.१.१५ श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था : शैक्षणिक चळवळ :**

दि.६ जून १९५५ रोजी कोल्हापूर येथील जुना बुधवार पेठेतील भूसारवाडयात हायस्कूल स्थापन केले. शिक्षणतज्ञ जे.पी.नाईक उद्घाटक होते. प्रारंभी इ.८ वी व इ.९ वीचे वर्ग हायस्कूल मिळाले. विद्यार्थ्यांची संख्या ४५ चे जवळपास होती. गरीब विद्यार्थ्यांच्याकरिता एक वसतिगृहसुध्दा स्थापन केले. तुकाराम कांबळे, एकनाथ कांबळे, वाय.डी.कांबळे व आबासाहेव कांबळे हे हरिजन विद्यार्थी वसतिगृहात होते. या वसतिगृहातील विद्यार्थी आबासाहेब कांबळे पुढे एम.बी.बी.एस. होऊन डॉ.चोकाककर म्हणुन प्रसिध्दीस आले.[६४] डी.एस.खांडेकर संस्थेचे पहिले अध्यक्ष झाले. डॉ.बापूजी साळुंखे हे पहिले कार्यवाह, मुख्याध्यापक व वसतिगृहाचे अधिक्षक झाले.[६५]

**शासकीय मान्यता :**

स्थापनेनंतर डॉ.बापूजी साळुंखे व सहकारी उत्साहाने कामाला लागले. सोसायटी रजिस्ट्रेशन कायदयानुसार असि.चॅरिटी कमिशनर, कोल्हापूर यांच्या कार्यालयात ३१ डिसेंबर १९५४ रोजी संस्था रजिस्टर झाली.

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था – शैक्षणिक कार्य :**

कोल्हापूर, सातारा व सांगली या जिल्हयात ६ जून १९५५ मध्ये पाच माध्यमिक, एक ट्रेनिंग, दोन वसतिगृहे एकाच वेळी स्थापन झाली. श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे पहिल्या वर्षीचे अंदाजपत्रक केवळ ६३००० रूपयांचे होते.[६६] बजेट ३१ मार्च २००८ मध्ये संस्थेचे बजेट १३३६५२२२४५ रू.एवढे झाले. या उलाढालीवरून आजच्या गतीमान कार्याची कल्पना येते.[६७] सन १९५९ मध्ये ३३ माध्यमिक विद्यालये स्थापन केली. दोन वसतिगृहे व ९ अध्यापक विद्यालये स्थापन केली. एकूण ४४ केंद्रे स्थापन झाली. पाटण डोंगराळ तालुक्यात बापूजींनी ज्ञानगंगा पोहोचविली. बी.एन. काका उर्फ काकासाहेब चव्हाण यांचेशी संपर्क साधून त्यांचे सहकार्य घेऊन वाल्मिकी विद्यामंदीराची स्थापना केली. सातारचे जिल्हाधिकारी बी.आर उर्फ आबासाहेब पाटील, ना.दादासो जगताप, राज्याचे शिक्षण संचालक डॉ.आप्पासाहेब पवार यांचेबरोबर चर्चा करून त्यांचे सहकार्याने श्री.भवानी विद्यामंदीराची स्थापना सातारा येथे केली. प्रथमतः हे विद्यालय प्रतापगंज पेठेतील पी.जी.जाधव यांच्या वाडयात जून १९५८ मध्ये सुरू केले. सातारमध्ये गर्ल्स हायस्कूल, श्री भवानी वसतिगृह, श्री भवानी नाईट हायस्कूल, पं.नेहरू हिंदी शिक्षक सनद संस्था इ.स्थापना केली.[६८]

**३.१.१६ सातारा, सांगली येथे शिक्षणप्रसार :**

सन १९६० मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची सर्वात जास्त सांस्कृतिक केंद्रे सातारा जिल्हयात सुरू झाली. वाई तालुक्यातील पाचगणी व ओझर्डे, कोंडवे येथे न्यू इंग्लिश स्कूल, क्षेत्र माहुली येथे श्रीराम हायस्कूल, नूने येथे श्री.शिवाजी हायस्कूल स्थापन केले. कराड तालुक्यात तांबवे, सदाशिवगड, इंदोली, हेळगाव, विंग इत्यादी हायस्कूल सुरू झाली. जावली तालुक्यात कुडाळ, रायगाव (शिवनगर), कोरेगाव तालुक्यात चिमणगाव व कुमठे येथे, खटाव तालुक्यात कातर खटाव, चितळी. फलटण तालुक्यात निंबळक, आदर्की माध्यमिक विद्यालये सुरू केली. खंडाळा तालुक्यात कण्हेरी व भीद येथे शाळा काढल्या. माण तालुक्यात बिदाळे येथे विद्यालय सुरू केले. पाटण तालुक्यात आमणी येथे हायस्कूल स्थापन केले.

**स्त्री शिक्षण :**

सन १९६६–६७ मध्ये पटावर विद्यार्थीनींची संख्या ८१ होती. ती सन १९८०–८१ मध्ये विद्यार्थीनी संख्या ५५९ झाली. इचलकरंजी येथे गर्ल्स हायस्कूल काढले. स्त्री उध्दारक म.जोतीराव फुले यांचा वारसा डॉ.बापूजींनी उत्तम प्रकारे चालविला.[६९] डॉ.बापूजी वारंवार शाखेना भेटी देत असत. विद्यार्थ्यांची बैठक घेत. प्रार्थनेचे महत्व सांगत. मंगळवार दि.१० डिसेंबर १९६८ मध्ये तळमावले विंग शाखेला भेट दिली. अशी कितीतरी उदाहरणे त्यांनी आपल्या दैनंदिनीत नोंद केली आहेत.[७०] त्यांनी ज्ञान, विज्ञान व सुसंस्काराचे शिक्षण देण्याचे मोठे कार्य केले. सेवा, त्याग, सत्य, प्रामाणिकपणा, चारित्र्य या पंचसूत्रीचा मार्ग स्विकारून संस्थेच्या माध्यमातून उपेक्षित दीन दुबळया, दलित व दुर्गम भागातील पाल्यांच्या शिक्षणाचे मोठे कार्य केले. आयुष्यभर कष्ट केले.[७१] या शिक्षण प्रक्रियेत सुमारे ९००० सेवक ३७२ शाखामधून अडीच लाखाचेवर विद्यार्थी घडविण्याचे कार्य करीत आहेत.[७२]

## संस्था जिल्हावार कार्यविस्तार २००४–२००५[७३] (आजची स्थिती)

| क्र. | विभाग | कोल्हापूर | सांगली | सातारा | पुणे | रत्नागिरी | ठाणे | मुंबई | उ. बाद | सोलापूर | बीड | रायगड | सिंधुदुर्ग | बेळगाव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | माध्यमिक विद्यालय | ३० | २२ | ६३ | १६ | ०७ | ०१ | ०१ | ०३ | ०६ | ०२ | २० | ०२ | ०१ | १७४ |
| २ | ज्युनि. कॉलेज | १२ | ०९ | २१ | ०९ | ०३ | | | ०३ | ०३ | | ०५ | | | ६५ |
| ३ | महाविद्यालये | ०४ | ०५ | ०८ | ०१ | | | | ०४ | | | ०१ | | | २३ |
| ४ | टेक्नीकल | ०१ | ०१ | | ०२ | | | | | | | | | | ०४ |
| ५ | किमान कौशल्य | ०१ | ०१ | ०३ | ०४ | | | | ०२ | | | ०१ | | | १२ |
| ६ | शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ०१ | ०१ | ०२ | | | | | ०३ | | ०१ | | | | ०८ |
| ७ | प्राथमिक विद्यालय | ०४ | | ०२ | | | ०१ | ०१ | | ०१ | | | | | ०९ |
| ८ | पूर्व प्राथमिक विद्यालय | | | | | | | ०१ | | | | | | | ०१ |
| ९ | बालवाडी | ०४ | | ०३ | ०२ | | | ०१ | | | ०१ | | | | ११ |
| १० | इंग्रजी माध्यम शाळा | ०१ | | | ०१ | | | | | | | ०१ | | | ०३ |
| ११ | पदव्युत्तर शैक्षणिक केंद | | ०१ | ०१ | | | | | ०२ | | | ०१ | | | ०५ |
| १२ | शेती विभाग | ०३ | | ०१ | | | ०१ | | | | | | | | ०५ |
| १३ | वसतिगृह | ०६ | ०२ | ०५ | | ०१ | ०१ | | ०२ | ०२ | | | | | १९ |
| १४ | इतर विभाग | ०७ | ०२ | ०४ | ०१ | | | | ०१ | | | | | | १५ |
| १५ | एकूण | ७४ | ४४ | ११३ | ३६ | ११ | ०४ | ०४ | २० | १२ | ०४ | २९ | ०२ | ०१ | ३५३ |

श्री स्वामी विवेकानंद संस्था अहवालावरून

**प्राथमिक शिक्षण :**

सन १९६२ मध्ये प्रा. शाळांची संख्या १४९१ होती. ती सध्या २२०७ झाली. विद्यार्थी संख्या २१८१०२ वरून ३०७३७४ एवढी झाली. शिक्षण संख्या ५१५७ वरून ९३१० वर गेली. सन १९६२ ते १९८६ या काळाची संख्या : शाळा ७१६ ने वाढली तर विद्यार्थी संख्या ८९२७२ ने वाढली. आज २०० पेक्षा अधिक लोकवस्ती असणाऱ्या ठिकाणी प्राथमिक शिक्षणाची सोय आहे.

**तक्ता १ सालवार विद्यार्थी व शिक्षक संख्या[७४]**

| सन | शाळा संख्या | मुले | मुली | एकूण | पुरूष शिक्षक | स्त्री शिक्षक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६२-६३ | १४९१ | १४२६९५ | ७५७०४ | २१८१०२ | ३५७१ | १६२६ | ५१९७ |
| १९७२-७३ | १७४० | १६८६९० | १०३८६५ | २७२५५५ | ५४९८ | २०३४ | ७५३२ |
| १९८२-८३ | २१०७ | १८०२०४ | १४३१२४ | ३२३३२८ | ६९६२ | २१५६ | ८९१८ |
| १९८३-८४ | २१५८ | १७६४२० | १४३७१७ | ३२०१३७ | ६७८० | २२२७ | ९००७ |
| १९८४-८५ | २१५५ | १७४६५० | १४२९६१ | ३१७६११ | ६७४८ | २३७० | ९११८ |
| १९८५-८६ | २१८३ | १६०६२१ | १४१०६८ | ३०१६८९ | ६५१४ | २४०६ | ८९२० |
| १९८६-८७ | २२०७ | १६२४६१ | १४४९१३ | ३०७३७४ | ६७०३ | २६०७ | ९३१० |

**लोकसंख्या व साक्षरता :**

१.सन १९६१ - १४३०१०५ २.१९७१ १७२७३७६ ३.१९८१ २०३८६७७

साक्षरतेचे प्रमाण (जिल्हा प्रमाण) १.सन १९८१ - ४८.१५ टक्के, राज्याचे प्रमाण ४७.१८ टक्के

**तक्ता क्रमांक २[७५] साक्षरता**

| जनगणना वर्ष | एकूण टक्केवारी | पुरूष टक्केवारी | स्त्री टक्केवारी | राज्यात क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १९५१ | २०.६० | ३३.५० | ६.३० | |
| १९६१ | ३३.९८ | ४७.४१ | २१.१६ | |
| १९७१ | ३८.३२ | ५२.३८ | २४.७७ | १० |
| १९८१ | ४८.१५ | ६१.३९ | ३५.६७ | ७ |
| २००१ | ७८.२२ | ८८.२० | ६८.३८ | |

१.सन १९६१ ते १९८१ या काळात साक्षरता १४.१७ टक्केनी वाढली. साक्षरता मोहीम १९५८- ५९ मध्ये सुरू झाली. शिक्षणाधिकारी भ.रा.पाटील यांनी यात फारमोठे योगदान दिले.

**माध्यमिक शिक्षण :**

१८८५ मध्ये वाई येथे द्रविड हायस्कूल, १८८९ मध्ये सातारा येथे न्यू इंग्लिश स्कूल, १८९३ मध्ये फलटणचे मुधोजी हायस्कूल, १८९९ मध्ये औंध येथे श्री हायस्कूल सुरू झाले. सन १९२२ मध्ये सातारा येथे कन्या शाळा सुरु झाली. जिल्हयात सन १९५१ मध्ये पहिले सरकारी हायस्कूल सातारा येथे सुरू झाले. तेच आजचे प्रतापसिंह हायस्कूल. इ.स. १९५१ सातारा जिल्हयात ४१ माध्यमिक शाळा होत्या. सन १९५६ मध्ये माध्यमिक विद्यालयांची संख्या ५५ झाली तर १९६२ मध्ये हायस्कूलची संख्या १३२ झाली.[७६] सन १९७२ मध्ये हायस्कूल संख्या २४० झाली.

**तक्ता क्र.३ माध्यमिक विद्यालये, विद्यार्थी व शिक्षक[७७]**

| सन | शाळा | मुले | मुली | एकूण | शिक्षक | शिक्षिका | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६२६३ | १३२ | १८९२३ | ४१८९ | २३११२ | ८५२ | २१७ | १०६९ |
| १९७२–७३ | २४० | ७३१८३ | ३९१२४ | ११२३०७ | ३०९६ | ६९५ | ३७९१ |
| १९८२८३ | २७० | ९८०२१ | ४५६२४ | १४३६४५ | ३९४८ | ८८० | ४८२८ |
| १९८३८४ | २९७ | १०४८४४ | ५०९४७ | १५५७९१ | ४१७८ | ९७० | ५१४८ |
| १९८४८५ | ३१७ | ११०९१५ | ५५११२ | १६६०२७ | ४३९२ | १११४ | ५५०६ |
| १९८५८६ | ३३२ | ११४५६० | ६००४३ | १७४६०३ | ४५९० | ११११ | ५७०१ |
| १९८६८७ | ३४६ | ११९०४९ | ६४१५७ | १८३२०६ | ४९५० | १२१५ | ६१६५ |

**सातारा जिल्हा आजचे शैक्षणिक चित्र[७८]**

**सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन महाराष्ट्र शासन, मार्च २०१०, पृ.२८**

| विद्यार्थी संख्या | शिक्षण स्वरूप | संस्था संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | पूर्व प्राथमिक शाळा | १७ | २३२१ |
| २ | एकशिक्षकी शाळा प्राथमिक | ७५७ | १९९५६ |
| ३ | कनिष्ठ प्राथमिक शाळा | ६९३ | ८६०८० |
| ४ | वरिष्ठ प्राथमिक शाळा | ७७५ | १८०४२३ |
| ५ | केंद्र सरकारी प्राथमिक शा | ०१ | ६१ |
| ६ | राज्य सरकारी प्राथमिक शाळा | ०२ | ३३० |
| ७ | नगरपालिका प्राथमिक शाळा | १०६ | ३२२९८ |
| ८ | खाजगी मदतीच्या प्राथमिक शाळा | २५ | ५५०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | खाजगी बिगर मदतीच्या प्राथमिक शाळा | ०७ | ९६७ |
| १० | सरकारी व खाजगी माध्यमिक शाळा | ३०३ | १३३४११ |
| ११ | सर्व उच्च माध्यमिक विद्यालये | ५८ | ६८९९८ |
| १२ | उच्च महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान) | २० | ३५४४० |
| १३ | डी.एड.कॉलेज (प्रशिक्षण) | ०९ | ९०० |
| १४ | वैद्यकीय महाविद्यालये | ०२ | २०० |
| १५ | अभियांत्रिकी महाविद्यालये | ०२ | २०० |
| १६ | बी.एड प्रशिक्षण महाविद्यालये | ०२ | ३०० |
| १७ | बी.पी.एड प्रशिक्षण महाविद्यालये | ०१ | १०० |
| १८ | लॉ कॉलेज | ०१ | २०० |
| १९ | फार्मसी महाविद्यालये | ०३ | १०० |
| २० | पॉलिटेक्नीक | ०४ | ४०० |
| २१ | आश्रमशाळा | १६ | --- - |
| २२ | आय.टी.आय. | ०५ | ५०० |
| २३ | शेतीशाळा महाविद्यालय | ०२ | १५० |

संदर्भ : महाराष्ट्र शासन आर्थिक समालोचन, २०१०, पृ.२८

**सारांश व निष्कर्ष** :

बहुजन समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे अशी मागणी शंभर वर्षापूर्वी महात्मा जोतीराव फुले यांनी केली. याप्रमाणे शिक्षण देण्याचे प्रयत्न आजपर्यंत झाले परंतु ती गती फारच सावकाश आहे. चालू शैक्षणिक चळवळीकडे पाहिले तर कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बापूजी साळुंखे इत्यादीनी केलेल्या चळवळीला फाटा दिला जातो आहे. बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना या शिक्षणप्रवाहापासून दूर रहावे लागत आहे. आरक्षण, जात, धर्म, पंथ या समस्येवर समाजात कुठेना कुठे कलह झालेला दिसतो. हे समाजसेवकांना अपेक्षित नव्हते. कर्मवीरअण्णांनी कठीण सामाजिक, आर्थिक स्थितीतून कार्य केले. भारतासारख्या विकसनशील देशाला सार्वत्रिक शिक्षण दयायचे असेल तर स्वावलंबन व श्रमाची प्रतिष्ठा हे दोन मूलमंत्र आहेतच. शिक्षणाशिवाय परिवर्तन शक्य नाही. कोणाच्या कृपेने किंवा दयेने परिवर्तन होणार नाही. परिवर्तनासाठी आत्मविश्वासाची गरज आहे. आजसुध्दा गावोगावी थंडीवाऱ्यात व ऊनपावसात अनवाणी, अर्धपोटी राबणाऱ्या जनतेच्या समस्या आहेत. मानवनिर्मित शोषणप्रवृत्तीतून निर्माण होणाऱ्या जनवेदना दूर करण्यासाठी कार्यरत राहण्याची गरज आहे.

### ३.२ ग्रंथालय चळवळ

### ३.२.१ सातारा जिल्हा ग्रंथालय चळवळ :

**पूर्वकाळ:** सातारचे राज्य खालसा झाल्यावर दि.१०.१२.१८५८ रोजी सातारा जिल्हयाचे पहिले वृत्तपत्र निघाले.[७९] 'शुभसूचक' त्याचे नाव. संपादक रामचंद्रपंत चितळे यांनी शुभसूचक नावाभोवती बाण लावलेले धनुष्य काढले होते. यावरून शुभसूचक काय अन कसे काम करू इच्छितो हे त्यांनी दर्शविले होते. यापूर्वी 'बोधामृत' नावाचे एक पत्र होते असे काहीजण म्हणतात. पुढे हेच काम इस्लामपूर व सातारा या ठिकाणी प्रसिध्द होणाऱ्या कशाळकर मुंडल्याच्या 'प्रतोद'ने व फणसळकरांच्या 'प्रेक्षक'ने केले. राजारामपंत सोहनी तासगाव येथून 'भागवत' हे पत्र १८९७ पासून चालवित होते. सन १९०६ पासून भाऊसाहेब सोमण यांचे 'प्रकाश'ने ही धुरा सांभाळली. पुढे भिडे गोडशांच्या 'प्रकाश' व वाग्भट देशपांडयांचे 'ऐक्य' यांनी १९३० पर्यंत तर ऐक्य आणि समर्थ भारतमाता व श्रीशाहू या चतुष्टयाने १९३५ पर्यंतचा सातारा जिल्हा प्रतिबिंबीत केला. कराड येथे १८८४ मध्ये 'विदुषक' १८८७ मध्ये 'चंद्रगुप्त', १८९६ मध्ये 'सुमंत', इ.स. १९२४ मध्ये 'कैवारी', १९२८ मध्ये 'अभ्युदय' त्याचप्रमाणे विटे १८९४ मध्ये विटावृत्त, तासगाव येथे १८८१ मध्ये 'चंडाशु' व 'आर्यभानु', इस्लामपूर येथे १८८३ मध्ये प्रतोद, १९१० मध्ये 'भारतमाता', १९२७ 'सातारा' शहापूर सांगली येथे 'भारत विजय' १९२० नंतर 'सत्यप्रकाश' सातारमध्ये 'सातारा-विजय' व इस्लामपूर येथे 'भारत-विजय' व 'प्रबोधन' सातारा रोडवरून निघत होते.

### ३.२.२ सातारचे नगर वाचनालय उगम :

सातारचे वाचनालय इ.स.१८५३ चे सुमारास स्थापन झाले. साधारणपणे 'सातारा ग्रंथालयाच्या वाटचालीस' दिडशे वर्षे झाली. प्रतापसिंह महाराज यांच्या काळात लोकोपयोगी बऱ्याच संस्था जन्मास आल्या. यातील एक महत्वाची 'नगरवाचनालय' संस्था होय. प्रतापसिंहांनी विद्या व कलेला प्रोत्साहन दिले. 'ग्रंथसंचय' हा त्यांचा छंद होता. त्यांनी स्वतःचे ग्रंथालय सुरू केले. सातारा नगरवाचनालयाचा जन्म दिवस. तारीख निश्चित उपलब्ध नाही परंतु 'सातारा शहराचे वर्णन' या हतवळणे यांच्या पुस्तकात जो उल्लेख आहे त्यावरून इ.स. १८५३ पासून हे ग्रंथालय जनतेकरिता अर्पण केले. सन १८५३ ग्रंथालयाचा उगम याचा दुसरा बळकट पुरावा म्हणजे गॅझेटियर डेक्कन सातारा या पुस्तकात प्रकरण ११ मधील पृ. क्रमांक ४१४व ४१५ वर सातारामधील वाचनालयावर एक स्फुट लेख आहे. या जिल्हयात २ ग्रंथालये व ६ वाचनालये आहेत. दोन ग्रंथालये म्हणजे सातारा व महाबळेश्वर येथे आहेत. सातारा शहरात १८५२ मध्ये केवळ दोन ग्रंथालये होती. एकाचे नाव 'सातारा सिटी लायब्ररी' व दुसरी स्टेशन लायब्ररी' फेब्रु. १८६६ मध्ये दोन्ही लायब्ररीचे एकत्रीकरण होऊन त्याला सातारा सिटी जनरल लायब्ररी म्हणतात.[८०]

### व्हिक्टोरिया लायब्ररीचे नामांतर नगरवाचनालय :

सातारा ग्रंथालयाचे नाव १९३८ पर्यंत व्हिक्टोरिया लायब्ररी होते. सन १९३७ नंतर इंडियन नॅशनल कॉंग्रेसने अधिकार ग्रहण केल्यापासून संपूर्ण देशात वेगळे चैतन्य आले त्याचा परिणाम या लायब्ररीच्या

नावावर झाला. व्हिक्टोरिया लायब्ररीचे नाव बदलून 'नगर वाचनालय' असे करण्यात आले व ऑर्थर हॉलचे नाव 'पाठक हॉल' केले.[८१]

**सातारा वाचनालयाचे जिल्हा वाचनालयात रूपांतर :**

१ जानेवारी १९४८ पासून नगरवाचनालयाचे रूपांतर जिल्हा वाचनालयात झाले. वाचनालयाला मुक्तदार जिल्हा वाचनालय अशी मान्यता देण्यात आली.[८२]

**३.२.३ सातारा जिल्हा ग्रंथालय संघ वाटचाल :**

सातारा जिल्हयाला ग्रंथांचा, ग्रंथालयाचा उत्तम वारसा आहे. वाई, जि.सातारा येथे लोकहितवादींनी त्याचेच रूपांतर लोकमान्य टिळक स्मारक मंदीर, वाई ग्रंथालय केले. कराड, पाचगणी, पाटण, फलटण, खटाव, शिरवळ, दहिवडी, मेढा, कोरेगाव या ठिकाणी ग्रंथालये झाली. या तालुका वाचनालयाबरोबर मसूर, काले, कलेढोण, ओगलेवाडी, रहिमतपूर, कुंभारगाव, लोणंद, सातारा रोड पाडळी, चितळी, मायणी, उंब्रज, तांबवे, वडूज, पसरणी इ.ठिकाणी ग्रंथालये झाली. स्वातंत्र्यानंतर जिल्हा वाचनालयास रू.४००० व तालुका वाचनालयास ४५० रू. वार्षिक अनुदान मिळत होते. १९७१-७२ मध्ये ग्रंथालय संघाचा पहिला अहवाल तयार झाला. १९६७ ला ग्रंथालय कायदा झााला. १९७१-७२ ग्रंथालय संघाच्या १८ संस्था व ४० व्यक्ती सातारा जिल्हा संघाच्या सभासद होत्या. कराडचे रहिवासी सातारा जिल्हयातील थोर समाजसेवक, विचारवंत, लेखक'जागृत सातारा' ग्रंथाचे लेखक माजी आमदार पदमश्री पु.पा.तथा बाबुराव गोखले हे ग्रंथालय संघाचे पहिले अध्यक्ष होते. यावेळी प्रा.शिवाजीराव चव्हाण हे या ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष होते. श्री.बा.आचार्य व वि.वि.पाटील, कराड हे कार्यवाह होते. श्री.सोहनी वि.सी.हे कोषाध्यक्ष होते. पहिल्या मंडळात १० सदस्य होते.[८३] नवीन ग्रंथालय सुरू करण्याबाबत विचार विनीमय होत असे. सन १९६९-७० मध्ये मंडळाच्या पंधरा सभा झाल्या.

**सन १९७९-८० या वर्षी पुढीलप्रमाणे तालुकानिहाय ग्रंथालये होती.**

१.सातारा तालुका ग्रंथालये संख्या : ०६

२. कोरेगाव तालुका ग्रंथालये संख्या : ०२

३.महाबळेश्वर तालुका ग्रंथालये संख्या : ०२

४.माण तालुका ग्रंथालये संख्या : ०१

५.पाटण तालुका ग्रंथालये संख्या : ०६

६.फलटण तालुका ग्रंथालये संख्या : ०२

७.खंडाळा तालुका ग्रंथालये संख्या : ३२

८.खटाव तालुका ग्रंथालये संख्या : ०५

९.वाईतालुका ग्रंथालये संख्या : ३४

१०.कराड तालुका ग्रंथालये संख्या : ११

११.जावली तालुका ग्रंथालये संख्या : ०२

एकूण सातारा जिल्हयातील ग्रंथालये संख्या १०३ होती. या वाचनालयाव्दारे ग्रंथप्रदर्शने भरविली जात होती.[८४]

**ग्रंथालय चळवळ अधिवेशन:**

शनिवार १७.०३.१९७८ रोजी सायंकाळी ५ वाजता अधिवेशन सुरू झाले. व १८ मार्च रोजी ४ वाजता संपले. ठिकाण सरस्वती इंग्लिश स्कूल, कोरेगाव होते. सातारा जिल्हयात सन १९८१ साली १४० ग्रंथालये होती. सातारा जिल्हयाचे जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी रत्नाकर वाघ यांनी वाचनालय निर्माण होण्यासाठी फार मोठे योगदान दिले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आमदार विलासराव पाटील, जि.प.माजी अध्यक्ष लक्ष्मणराव पाटील, जिल्हाधिकारी श्री.व्ही.पी.राजा, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.भोसले व संपतराव शिंदे यांनी ग्रंथालय चळवळीस मार्गदर्शन केले.[८५]

सन १९८३ साली जिल्हयामध्ये अनुदान प्राप्त ग्रंथालये २२५ होती. सातारा जिल्हा विकास मंडळाने १९८३–८४ या वर्षामध्ये १४०००० रू.तरतूद केली. नामदार प्रतापराव भोसले ग्रामविकास मंत्री व जिल्हाधिकारी बी.आर.सावंत यांनी ग्रंथालय चळवळीस फार मोठे सहकार्य केले. दरवर्षी ग्रंथालय संख्या वाढत गेली. या प्रयत्नात यशवंतराव चव्हाण यांची भूमिका त्याचप्रमाणे ग्रंथालयाचे नि: स्पृह कार्यकर्ते यांचे फार मोलाचे योगदान आहे. नांदेड येथील ५९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात ग्रंथालयीन सेवकांच्या प्रश्नाबाबत ठराव मंजूर करण्यात आला. जिल्हा ग्रंथालय संघाने चळवळ वाढ करण्यासाठी विचार केला. १९६५ साली ग्रंथालय संघ स्थापन झाले. ५० वर्षे होताच 'गौरवगाथा' प्रकाशित केली.[८६]

**३.२.४ सातारा जिल्हा ग्रंथालय चळवळ इतिहास व कार्य :**

महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद स्विकारले. महाराष्ट्राच्या नवनिर्मितीकरिता व सांस्कृतिक जीवनाच्या विकासाकरिता 'गाव तेथे ग्रंथालय' ही भूमिका मांडली. महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळ संघटीत करण्याची संकल्पना कराडचे समाजभूषण बाबुराव गोखले यांनी बोलून दाखवली. नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ या संस्थेची निर्मिती झाली.[८७] यानुसार सातारा जिल्हयात 'सातारा ग्रंथालय संघाची निर्मिती करण्यासाठी एक अस्थायी समिती जाहीर केली. डिसेंबर १९६७ मध्ये सातारा ग्रंथालय संघाची सहाय्यक धर्मादाय आयुक्तांच्याकडे नोंदणी करण्यात आली.

सातारा जिल्हयात ग्रंथालय संघाच्या कामाचा शुभारंभ सन १९७४ मध्ये झाला. वाई तालुक्यात नवीन ३० ग्रंथालये सुरू करण्यात आली. सातारा जिल्हा ग्रंथालय संघ यांनी पुढे १९८२ च्या २७ व २८ फेब्रुवारीमध्ये महाराष्ट्र संघाचे ३१सावे अधिवेशन वाई येथे घेतले. जेष्ठ साहित्यिक रणजित देसाई अध्यक्ष होते.[८८] ग्रंथमित्र डॉ.शिवाजीराव चव्हाण यांच्या प्रयत्नाने व जिल्हा ग्रंथालय संघाचे वतीने वाई येथे ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा वर्गाचे केंद्र १९८५ मध्ये सुरू केले. यासाठी प्रशिक्षण शिबीर आयोजित केले. सन १९८६–८९ करिता राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्षपदी लक्ष्मणराव पाटील यांची निवड झाली. जिल्हयात ग्रंथालय चळवळ वाढावी म्हणून चर्चा झाली. सन १९७९–१९८० या वर्षात नवीन ३० ग्रंथालये उघडली.

### ३.२.५ नगर वाचनालय सातारा (जिल्हा मुक्तव्दार शासनमान्य ग्रंथालय):

**वार्षिक अहवाल १९९७–९८**

**कार्यकारी मंडळ :** अध्यक्ष : श्री.सी.व्ही दोशी, उपाध्यक्ष : श्री.श्री.बा.आचार्य, कार्यवाह : १.श्री.अ.बा.वाळिंबे २.श्री.अ.भा.कुबेर

कार्यकारी मंडळ सदस्य : अॅड.श्री.गि.प.कुलकर्णी डॉ.श्री.मो.प.खडके श्री.बा.ग.जोशी

श्री.गो.आ.लेले श्री.वि.गो.कुलकर्णी श्री.ज्यो.चं.कोल्हटकर

डॉ.श्री.राजेंद्र माने (स्वीकृत) श्री.ल.स. उथळे (स्वीकृत)

सन १९९७–९८ करीता १५०००० शासकीय अनुदान मिळाले यातून एक नवीन संगणक खरेदी केला.[८९]

**वार्षिक तपासणी :**

पुणे विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक श्री.म.वि.उरणेसाहेब व निरीक्षक श्री.उ.य.राणे यांनी वार्षिक तपासणी केली. नगर वाचनालयाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार २६.७.१९९८ रोजी सायंकाळी ६ वाजता नगरवाचनालय, पाठक हॉलमध्ये संपन्न झाली. एकूण सभासद १३७७ होते. ग्रंथालयात १३ वृत्तपत्रे येत होती. मासिके एकूण ६४ देणगीदाखल नियतकालिके : दैनिके – एकूण ९, साप्ताहिके – ११, पाक्षिके – १, मासिके – १४. नगरवाचनालय ग्रंथ खरेदी (नवीन): एकूण : १५१४, देणगी ग्रंथांची संख्या : २९८ वाचनालयातील एकूण ग्रंथसंख्या : ४५३४०

अ.चालू वर्षी खरेदीव्दारे १.नगर वाचनालय : ८५५ २.साखळी योजना : ३६१

ब.चालू वर्षी देणगीव्दारे : २९८ ग्रंथालयातील एकूण ग्रंथसंख्या : ४६८५४[९०]

ग्रंथालयाव्दारे सांस्कृतिक कार्यक्रम : व्यक्तीचे विचार एकमेकापर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने मान्यवरांचे कार्यक्रम घेतले जातात.

| अ.न. | दिनांक | प्रमुख वक्ते | विषय |
|---|---|---|---|
| १ | २.९.१९९७ | डॉ.श्री.माधव मुतालिक | माझे तसे ठीक चालले आहे |
| २ | ४.९.१९९७ | श्री.महेंद्र सेठिया, पुणे | मुलांच्या अभ्यासात शिक्षकांचा व पालकांचा सहभाग |
| ३ | १४.१२.१९९७ | श्री.अशोक वाळिंबे | ग्रंथ प्रदर्शन ग.दि.माडगुळकर स्मृतिदर्शन |
| ४ | १८.०१.१९९८ | श्री.शांताराम ज.बरडे | विविध स्पर्धाचा बक्षिस समारंभ |
| ५ | २२.०१.१९९८ | श्री.छ.राजमाता सुमित्राराजे भोसले शिवशाहीर पुरंदरे | श्री.द.मा.मिरासदार यांचा सत्कार |
| ६ | ०२.०२.१९९८ | श्री.दा.सी. देसाई | कै.भाऊसाहेब मोडक स्मृती दिनानिमित्त व्याख्यान विषय भाकरी व पिझ्झा |

वाचनालयाचे वतीने शारदीय व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात.

| अ.न. | दिनांक | प्रमुख वक्ते | विषय |
|---|---|---|---|
| १ | ३.१०.१९९७ | डॉ.श्री.वा.पु.गिडे | कादंबरी विश्वातील खांडेकरांचे योगदान |
| २ | ४.१०.१९९७ | श्री.सौ.सुप्रिया अत्रे, पुणे | अप्रकाशित साहित्यातून घडलेले 'आनंदी गोपाळाचे दर्शन' |
| ३ | ०५.१०.१९९७ | श्री.माधव वझे, पुणे | आठवणी श्यामच्या आईच्या वेळच्या |
| ४ | ०६.१०.१९९७ | सौ.मिरा बोरवणकर, जिल्हा पोलिस प्रमुख | पोलिसांच्या नागरिकाकडून अपेक्षा |
| ५ | ०७.१०.१९९७ | श्री.अभय देवरे, सातारा | कथाकथन गोष्ट सांगेन आवडीच्या |
| ६ | ०८.१०.१९९७ | श्री.गुलाबभाई बागवान, सातारा | आमची हाजयात्रा |

**वाचक व्यासपीठ** :

वाचनाची आवड वृध्दींगत व्हावी म्हणून वाचकाचे व्यासपीठ आयोजित केले जाते.[९१] ग्रंथालयातील निरनिराळ्या पुस्तकांचा परिचय व्हावा म्हणून 'वाचक व्यासपीठ' नवीन उपक्रम. दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी सायंकाळी ६.१५ वाजता आयोजित केले जाते.

**सातारा नगरवाचनालयाची एकशे साठ वर्षाहून अधिक वर्षाची वाटचाल** :

प्रतापसिंह महाराजांनी अनेक विद्या व कला यांना प्रोत्साहन दिले. ग्रंथसंचय हा त्यांचा छंद होता. त्यांनी स्वतःचे म्हणून एक ग्रंथालय काढले. त्यांचे मूत्यूनंतर त्यांचे बंधू आप्पासाहेब यांनी त्याची जोपासना केली. त्यांचे कालखंडात देशी विदेशी वृत्तपत्रे येत होती. याचा लाभ सुरवातीला अल्प लोकांना मिळत होता.[९२] शहरवासियांची सभा घेऊन ग्रंथालयाची इमारत दुरूस्त करून 'सातारा व्हिक्टोरिया' हे नाव दिले.[९३]

**जिल्हा ग्रंथालय म्हणून काम** :

सन १९४९ पासून ग्रंथालयाला जिल्हा ग्रंथालय म्हणून मान्यता आहे. हे ग्रंथालय जिल्हा ग्रंथालय संघाचे सहकार्याने कार्य करीत आहे. जिल्हयातील वाचनालयाला मार्गदर्शन करते. सातारा तालुक्यात अशी बावीस ग्रंथालये आहेत. ग्रंथालयात बाल विभाग, महिला विभाग आहेत.

**वाई ग्रंथालयाची परंपरा** :

'वाईचे ग्रंथालय' गोपाळ हरी देशमुख तथा लोकहितवादी यांनी ते वाई येथे तहसीलदार असताना सुरू केले. त्याचे रूपांतर टिळक स्मारक मंदिर ग्रंथालयात झाले. वाचकवर्गाची गरज ते आजही उत्तमरित्या पुरवित आहे. तसेच ५० वर्षापूर्वी प्राज्ञपाठशाळा मंडळाचे संस्कृत, इंग्रजी, मराठी साहित्याचे मोठे ग्रंथालय स्थापन झाले.[९४] वाईच्या प्राज्ञपाठशाळा मंडळाने हिंदुधर्म सुधारणेचे आंदोलन चालविले. महादेवशास्त्री दिवेकर यांनी 'आर्य संस्कृतीचा उत्कर्षापकर्ष', 'हिंदुधर्म शिक्षण', 'धर्मशास्त्र मंथन', 'धर्म बाहयाचे शुध्दीकरण', 'विद्यार्थी धर्म', ब्राह्मणातील एकीकरण', 'अस्पृश्यतेचे उच्चाटन', ब्रहमज्ञान व बुबावाजी' इ. ग्रंथ लिहले.[९५]

बाळकृष्णबुवा मार्तंड चौंड ' हे गोरक्षणाच्या आंदोलनाचे प्रमुख नेते होते. वैदिक धेनुगाथा, गोज्ञान इ.ग्रंथाचे लेखन केले. मकरंद मालाकार, नरहर नारायण पटवर्धन व इतिहास संशोधक श.ना.जोशी अनेक लेखक होते. पटवर्धनांनी 'इला सुंदरी', 'जीवितयात्रा', 'राणी चंद्रावती' या कादंबऱ्या मकरंदमालेमध्ये प्रसिध्द केल्या. श.ना.जोशी यांनी शिवचरित्र साहित्यखंड भारत इतिहास संशोधन मंडळव्दारा प्रसिध्द केले. मग्युत्तम नाना फडणीस, शकावली हे त्यांचे पुस्तक स्मरणात ठेवण्यासारखे आहे. सन १९६२ मध्ये वाई येथे प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या इमारतीत मराठी शासनव्दारा मराठी विश्वकोशाच्या संपादन कार्यालयाची स्थापना झाली. प्रमुख संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. सुमारे पाचशेपेक्षा अधिक लेखक, समीक्षक म्हणून आपले लेखन पाठवित असत.[९६]

### ३.२.६ सातारा जिल्हा ग्रंथालय संघ:

१. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाची स्थापना वर्ष : १९६७ २.शासनाची मान्यता वर्ष : सन १९७०

**आजअखेर सातारा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष**

| अ.न. | अध्यक्ष | कार्यकाल |
|---|---|---|
| १ | श्री.पु.पा.तथा बाबुराव गोखले | १९६८–१९७४ |
| २ | श्री. विठ्ठलराव जगताप | १९७४–१९८३ |
| ३ | श्री.शंकरराव गाढवे | १९८३–१९९५ |
| ४ | श्री.लक्ष्मणराव पाटील | १९९५–१९९९ |
| ५ | श्री.लक्ष्मण माने | १९९९–२००८ |
| ६ | श्री.संभाजीराव पाटणे | २००८–२०१४ |

### ३.२.७ सातारा जिल्हयातील ग्रंथालय संघ – चळवळीतील योगदान :

सातारा जिल्हयामध्ये ग्रंथालय कायदा झाल्यावर चळवळी प्रयत्न विशेष जोमाने झाले. इ.स. १९६७ मध्ये ग्रंथालय स्थापना झाली. पदमश्री बाबुराव गोखले, डॉ.शिवाजीराव चव्हाण, श्री. विठ्ठल वि.पाटील इत्यादी ग्रंथप्रेमिकांनी चळवळ जनमाणसात रूजविण्याचे प्रयत्न केले. विश्वस्त कायदयाखाली ग्रंथालय संघाची नोंदणी इ.स. १९७७ मध्ये झाली. शासन मान्यता प्राप्त झाल्यावर दरवर्षी रू.५०० अनुदान मिळू लागले. त्यानंतर शासनाने संघास २३०० रू.अनुदान दिले. सन २०१०–२०११ पासून संघास वार्षिक अनुदान २५०० मिळू लागले.[९७]

**मोर्चे, उपोषण, धरणे आंदोलने :**[९८]

| अ.न. | दिनांक | मोर्चा चळवळीचा हेतू (उद्देश) स्वरूप |
|---|---|---|
| १ | १४.०३.१९८८ | आमरण उपोषण नोटीस |
| २ | १५.०७.१९९७ | राज्यव्यापी मोर्चा मुंबई |

| | | |
|---|---|---|
| ३ | १४ ते २०.११.१९९७ | निषेध सप्ताह आयोजन |
| ४ | ०१.०५.१९९९ | अनुदान कपातीबाबत मूकमोर्चा व जिल्हाधिकारी यांना निवेदन |
| ५ | १५.११.१९९९ | ग्रंथालय मागण्यासाठी धरणे आंदोलन |
| ६ | १४ ते २०.११.२००० | जिल्हा शासकीय ग्रंथालयाच्या निधीसाठी धरणे आंदोलन |
| ७ | ०३, ०४.१२.२००० | नागपूर विधानसभेवर भव्य मोर्चा |
| ८ | २१.११.२००२ | जिल्हा अधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन |
| ९ | १५, १७.०३.२००४ | सार्वजनिक ग्रंथालय बंद तीन दिवस आंदोलन |
| १० | २६.११.२००४ | विविध मागणी मोर्चा |
| ११ | १०.१२.२००८ | ग्रंथालयीन कामगार नागपूर येथे भव्य मोर्चा |
| १२ | ११.०८.२००९ | जिल्हा ग्रंथालय बंद आंदोलन जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर |
| १३ | ०४.१०.२०१० | ग्रंथालय अनुदान दुपट्टीसाठी सेवक वेतनश्रेणी सेवाशर्तीसाठी मुकमोर्चा |
| १४ | २४.०३.२०१२ | विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर काळया फिती लावून मोर्चा, धरणे व आंदोलन |
| १५ | १९.१२.२०१२ | नागपूर विधानसभेवर मोर्चा |
| १६ | ११.०६.२०१४ | आझाद मैदान मुंबई येथे धरणे आंदोलन सहभाग |

**ग्रंथालयीन सेवक अधिकारी कार्यशाळा / शिबीर :**[९९]

| अ.न. | दिनांक | कार्यशाळा किंवा शिबीराचा हेतू (उद्देश) स्वरूप |
|---|---|---|
| १ | ०८, ०९.११.१९८६ | सातारा जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने महाबळेश्वर येथे राज्यव्यापी ग्रंथालयीन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन |
| २ | ०२.०८.१९९८ | ग्रंथालयीन सेवक पदाधिकारी यांचे प्रशिक्षण शिबीर |
| ३ | २०.०५.२००१ | राजमाता श्री.छ.सुमित्राराजे भोसले ग्रंथालय, सातारा |
| ४ | ०८, ०९.०७.२००० | क्रांतीस्मृती शिक्षण संकुल सातारा येथे विभागीय कार्यकर्ता शिबीर आयोजन |
| ५ | ०६.०७.२००३ | सदर बझार सातारा येथे पुणे विभागीय ग्रंथालयीन कार्यशाळा आयोजन |

**विशेष सत्कार अधिवेशन नोंदी :**

१.दि.१४.३.१९८१ रोजी आटके ता.कराड येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा सत्कारसोहळा संपन्न झाला. २.२७ व २८ फेब्रु.१९८२ रोजी जेष्ठ साहित्यिक रणजित देसाई यांचे अध्यक्षतेखाली वाई येथे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे ३१ वे वार्षिक अधिवेशन संपन्न झाले. ३.महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या

अध्यक्षपदी सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष मा.लक्ष्मणराव पाटील यांची निवड (१९८६–१९८९) ४.१९९४–९५ पासून तालुका ग्रंथालय संघ निर्मिती प्रयत्न. ५.सातारा जिल्हा शासकीय जिल्हा ग्रंथालयाची सन २००३ रोजी स्थापना (सातारा जिल्हा ग्रंथालयाचे प्रयत्नातून) ६. सातारा जिल्हा ग्रंथालयीन सेवक संघटनेची स्थापना. ७. सातारा ग्रंथालय संघाचा 'ग्रंथ महोत्सव' सातारामध्ये सहभाग व सहकार्य. ८.पुण्यशील राजमाता श्रीमंत छ.सुमित्रा राजे भोसले सार्वजनिक ग्रंथालय सदर बझार विभागात विभागीय स्थापनासन २००१. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाचे वतीने यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेचे आयोजन.

**ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा वर्गाचे आयोजन :**

ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा वर्ग सन १९८५ पासून चालविण्यात येतात. जिल्हयातून या परीक्षेसाठी १६०० विद्यार्थी विद्यार्थीनींनी लाभ घेतला. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण म्हणतात, "एखादया गावात देवालय नसले तरी चालेल परंतु ग्रंथालय असेल तर ते गाव समृध्द असते."[१००]

**३.२.८ सातारा जिल्हा ग्रंथालय संघ अधिवेशन (इ.स. १९६९ ते इ.स.२०००):**

१.सन १९६९ चे पहिले वार्षिक अधिवेशन २.सन १९७० चे दुसरे वार्षिक अधिवेशन

३.ग्रंथालय संघाचे तिसरे वार्षिक अधिवेशन दि. १० जानेवारी १९७१

स्थळ : लोकमान्य टिळक ग्रंथवाचनालय वाई, ता.वाई प्रमुख पाहुणे : श्री.कृ.मु.उजळंबकर

या समारंभात अध्यक्ष : श्री.पु.पा. तथा बाबुराव गोखले

४.चौथे वार्षिक अधिवेशन दि. १५ व १६ जानेवारी १९७२

स्थळ : काळगाव वाचनालय , काळगाव , ता.पाटण अध्यक्ष : श्री.र.पु.कुलकर्णी

५.पाचवे वार्षिक अधिवेशन : सदरचे अधिवेशन दि. २५ मार्च १९७३

स्थळ : नगरपालिका नगरवाचनालय, कराड, ता.कराड अध्यक्ष : सुधारक श्री.बाबुराव गोखले

६.सहावे वार्षिक अधिवेशन दि. २४ व २५ फेब्रुवारी १९७४

स्थळ : माने देशमुख विद्यालय, पाटण, ता.पाटण अध्यक्ष : श्री.र.पु.कुलकर्णी

७.सातवे वार्षिक अधिवेशन दि. ०८ व ०९ मार्च १९७५

स्थळ : विद्यार्थी संघटना मोफत वाचनालय, ओंड, ता.कराड प्रमुख पाहुणे : मा.द.मा.मिरासदार

अध्यक्ष : श्री.र.पु.कुलकर्णी

८.आठवे वार्षिक अधिवेशन दि. २७ व २८ मार्च १९७६

स्थळ : केवलानंद स्मारक मंदिर वाई, ता.वाई प्रमुख पाहुणे : बॅ.पी.जी.पाटील

अध्यक्ष : आमदार विठ्ठलराव जगताप

९.नववे वार्षिक अधिवेशन दि. ०५ व ०६ फेब्रुवारी १९७७

स्थळ : रामदास मोफत वाचनालय, शिरवळ, ता.खंडाळा प्रमुख पाहुणे : मा.रा.य.सराफ

अध्यक्ष : आमदार विठ्ठलराव जगताप

१०.दहावे वार्षिक अधिवेशन दि. १७ व १८ मार्च १९७९

स्थळ : न्यू सरस्वती इंग्लिश स्कूल कोरेगाव, ता.कोरेगाव अध्यक्ष : आमदार विठ्ठलराव जगताप

प्रमुख पाहुणे : श्री.भा.रा.भणगे, कुलगुरू शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

११.अकरावे वार्षिक अधिवेशन दि. १४ व १५ मार्च १९८१

स्थळ : न्यू इंग्लिश स्कूल व्दारा सार्वजनिक वाचनालय आटके, ता.कराड

प्रमुख पाहुणे : मा.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अध्यक्ष : बाबासाहेब चोरेकर

१२.बारावे वार्षिक अधिवेशन दि. २१ मार्च १९८२

स्थळ : नगर वाचनालय, सातारा प्रमुख पाहुणे : श्री.व्ही.पी.राजा

अध्यक्ष : लक्ष्मणराव पाटील

१३.तेरावे वार्षिक अधिवेशन दि. २७ फेब्रु.१९८३

स्थळ : सार्थ साधना वाचनालय, बनवडी, ता.कराड प्रमुख पाहुणे : प्रा.रा.कृ.कणबरकर

अध्यक्ष : श्री.बी.आर.सावंत

१४.चौदावे वार्षिक अधिवेशन दि. १८ मार्च १९८४

स्थळ : हिंद वाचनालय, रहिमतपूर, ता.कोरेगाव प्रमुख पाहुणे : श्री.नरेंद्र दाभोळकर

अध्यक्ष : श्री.लक्ष्मणराव पाटील

१५.पंधरावे वार्षिक अधिवेशन दि. १२, १३ जानेवारी १९८५

स्थळ : आझाद वाचनालय, दहिवडी, ता.माण प्रमुख पाहुणे : श्री.कृष्णचंद्र भोईटे

अध्यक्ष : श्री.एम.एस.चहांदे, संचालक ग्रंथालय महाराष्ट्र राज्य, मुंबई

१६.सोळावे वार्षिक अधिवेशन दि. ०९, १० नोव्हें.१९८५-८६

स्थळ : रामानंद शेतकरी मोफत वाचनालय, चाफळ, ता.पाटण

प्रमुख पाहुणे : आमदार विक्रमसिंह पाटणकर अध्यक्ष : प्राचार्य मधुकर देशपांडे

१७.सतरावे वार्षिक अधिवेशन दि. २१, २२ फेब्रु.१९८७ जिल्हा ग्रंथालय संघ

स्थळ : कार्तिकेय वाचनालय, अंभेरी, ता.खटाव प्रमुख पाहुणे : श्री.केशवराव पाटील

अध्यक्ष : गणपतराव पवार, पुणे

१८.अठरावे वार्षिक अधिवेशन दि. २७, २८ फेब्रु.१९८८

स्थळ : ग्रामपंचायत वाचनालय, भुईंज, ता.वाई आझाद वाचनालय, भुईंज

१९.एकोणिसावे वार्षिक अधिवेशन दि. २८, २९ जानेवारी १९८९

स्थळ : सरस्वती विद्यालय कोरेगाव, ता.कोरेगाव प्रमुख पाहुणे : श्री.बापूसाहेब जाधव

अध्यक्ष : डॉ.आनंद यादव

२०.विसावे वार्षिक अधिवेशन दि. २४, २५ मार्च १९९०

स्थळ : छ.शिवाजी वाचनालय, वाई, ता.वाई, प्रमुख पाहुणे : श्री.मदनराव पिसाळ, अध्यक्ष : मो.व.मवारे

२१.एकविसावे वार्षिक अधिवेशन दि. ३१ मार्च १९९१

स्थळ : नगर वाचनालय, सातारा प्रमुख पाहुणे : प्राचार्य शिवाजीराव भोसले

२२.बावीसावे वार्षिक अधिवेशन दि. १४, १५ मार्च १९९२

स्थळ : कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा प्रमुख पाहुणे : श्री.जयवंत गुजर

अध्यक्ष : प्राचार्य शंकरराव निकम

२३.तेविसावे वार्षिक अधिवेशन दि.०५, ०६ फेब्रु.१९९४

स्थळ : श्रीमंत नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय, पाटण

प्रमुख पाहुणे : श्री.जयवंतराव पाटील अध्यक्ष : विक्रमसिंह पाटणकर

२४.चोविसावे वार्षिक अधिवेशन दि. १८ मार्च १९९५

स्थळ : दे.भ.क्रांतिकारक दिनकररावनिकम सार्वजनिक वाचनालय, इंदोली, ता.कराड

प्रमुख पाहुणे : श्री.संभाजीराव थोरात अध्यक्ष : श्री.संभाजीराव पाटणे

२५.सन १९९६ चे अधिवेशन निवडणूकामुळे होवू शकले नाही.

२५.पंचविसावे वार्षिक अधिवेशन दि. २९ मार्च १९९७

स्थळ : शारीरिक शिक्षण महाविद्यालय, सातारा प्रमुख पाहुणे : श्री.शंकरराव गाढवे, अध्यक्ष : शंकर सारडा

२६.सव्वीसावे वार्षिक अधिवेशन दि. १४, १५ मार्च १९९८

स्थळ : जनसेवा सार्वजनिक वाचनालय, अटके, ता.कराड प्रमुख पाहुणे : श्री.पी.बी.पाटील

अध्यक्ष : श्री.बाबासाहेब पाटील

२७.सत्ताविसावे वार्षिक अधिवेशन दि. ०४, ०५ जानेवारी १९९९

स्थळ : भैरवनाथ वाचनालय, वेळे, ता.वाई प्रमुख पाहुणे : डॉ.आ.ह.साळुंखे अध्यक्ष : श्री.लक्ष्मण माने

२८.अठ्ठाविसावे वार्षिक अधिवेशन दि. २६, २७ मार्च २००० झाले.[१०१]

स्थळ : छ.प्रतापसिंह महाराज सार्वजनिक ग्रंथालय पिरवाडी, ता. सातारा

प्रमुख पाहुणे : श्री.कन्हैया कुंदप अध्यक्ष : श्री.लक्ष्मण माने

**३.२.९ ग्रंथाचिये संगे आम्ही 'बी' घडलो :**

पुणे विद्यापीठाचे नामवंत ग्रंथपाल डॉ.महाजन यांचा 'हिस्टरी ऑफ दि पब्लिक लायब्ररीज इन वेस्टर्न महाराष्ट्र' हा ग्रंथ इतिहास लेखनाचा मानदंड मानला जातो.[१०२] त्यांचे लेखन कलाकृती ग्रंथाच्या व ज्ञानवंतांच्या सहवासातील कामाची आठवण आहे. ग्रंथामुळे माणूस घडला जातो. त्याचे ज्ञान वृध्दिंगत होते. ग्रंथांच्या सहवासात त्याला बरेच काही मिळते. म्हणून ग्रंथाचिये संगे आम्ही 'बी' घडलो असे ज्ञानी म्हणतात. समाजभूषण बाबुराव गोखले एक ध्येयवेडे व्यक्तिमत्व होते. त्यांनी जुन्या सातारमधील गाव ना गाव पायी प्रवास करून राष्ट्रभक्ती, आर्थिक स्वावलंबन, व्यसनमुक्ती, दलितोध्दार, अंधश्रध्दा निर्मूलन, सहकार,

पत्रकारिता, शिक्षण, ग्रंथालय चळवळ इ.बाबीत झोकून देऊन काम केले. सातारा जिल्हयातील सामाजिक चळवळीत ग्रंथालय चळवळीत त्यांचा मोठा वाटा होता. सातारा जिल्हयातील 'जागृत सातारा' या नावाने राजकीय इतिहास लिहला. वाङमयाचा त्यांचा गाढा व्यासंग होता.[१०३]

### ३.२.१० शब्दप्रभू ग्रंथप्रेमी यशवंतराव चव्हाण :

शालेय जीवनापासून यशवंतराव चव्हाण यांना ग्रंथाचे वेड होते. काव्य, लेखन, वाचन याची त्यांना मनापासून आवड होती. यशवंतराव ग्रंथप्रेमी रसिक होते. 'कृष्णाकाठ' हे त्यांचे आत्मनिवेदनपर पुस्तक आहे. त्यांचे रसिक मन, त्यांनी केलेल्या लोककला, नाटयकला, तमाशाकला, मराठी भाषा यातून समजते. यशवंतरावांनी एकूण बारा पुस्तके लिहिली. यापैकी विचारधारा, सहयाद्रीचे वारे, युगांतर, भूमिका हे त्यांचे भाषणसंग्रह आहेत. ऋणानुबंध हा त्यांचा लेखसंग्रह व कृष्णाकाठ हा आत्मचरित्राचा खंड आहे. विदेशदर्शन व विरंगुळा हा त्यांनी वेणूताईंना लिहीलेल्या पत्रांचा संग्रह आहे. त्यांना 'सागरतीरी' हे मुंबई जीवनावर मुंबईतील त्यांच्या वास्तव्यावर व 'यमुनातिरी' हे दिल्ली वास्तव्यावर असे दोन ग्रंथ लिहावयाचे होते परंतु तसे घडले नाही याची त्यांना खंत होती. 'गाव तेथे ग्रंथालय' यासाठी ते आग्रही होते.[१०४]

**सातारा जिल्हा ३१ डिसेंबर २०१३ अखेर शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची यादी[१०५]**

| जिल्हास्तरीय अ.न. | ग्रंथालयाचे नाव | गाव | पत्रव्यवहाराचा पत्ता | दूरध्वनी | दर्जा | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सातारा जिल्हा (०२१६१) ग्रंथालय श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले) नगरवाचनालय | सातारा | ३६, भवानी पेठ | २८२४८८, २८१३८८ | जि/अ | १९५२ |
| २ | कराड तालुका(०२१६४) ग्रंथालय नगरपालिका नगरवाचनालय | कराड | यशवंतराव चव्हाण स्मृती सदन | २२२३०९ ९४२०४८७९८२ | ता/अ | १९४८१९४९ |

**इतर ग्रंथालये:**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | कै.यशवंतराव चव्हाण वाचनालय | धोंडेवाडी | धोंडेवाडी | ९८९०७०५८४४ | इ/ब | १९९३-१९९४ |
| ४ | खोडजाईमाता वाचनालय | खोडजाई वाडी | खोडजाई वाडी | ९९२१७०४८०८ | इ/ब | १९९०-१९९१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | चैतन्यप्रसाद मोफत वाचनालय | टेंभू | टेंभू | ९९२२०९९०९१ | इ/ब | १९९७–१९९८ |
| ६ | जनसेवा सार्वजनिक वाचनालय | आटके | आटके | ९९७००३५७७९ | इ/ब | १९९६–१९९७ |
| ७ | जागृती ग्रंथालय व वाचनालय | वाण्याची वाडी | वाण्याची वाडी | ९९२२७१७५९२ | इ/ब | २००३–२००४ |
| ८ | दे.भ.क्रांतिकारक कै.दिनकरराव निकम वाचनालय | इंदोली | इंदोली | ९४२३८६४३७१ | इ/ब | १९९३–१९९४ |
| ९ | प्रसाद वाचनालय | ओगलेवाडी | ओगलेवाडी | ९४२३८६५०६१ | इ/ब | २००३–२००४ |
| १० | महात्मा फुले वाचनालय | काले | काले | ७०८३९८२४५४ | इ/ब | १९८२–१९८३ |
| ११ | मा.जयवंतराव भोसले सार्व.वाचनालय | रेठरे बुद्रुक | रेठरे बुद्रुक | २८१२२५, ९८८१९५८१७७ | इ/ब | २००३–२००४ |
| १२ | विद्यार्थी संघटना मोफत वाचनालय | ओंड | ओंड | –– | इ/ब | १९७५–१९७६ |
| १३ | श्री जोर्तिलिंग मोफत वाचनालय | उंडाळे | उंडाळे | –– | इ/ब | १९८३–१९८४ |
| १४ | श्री दत्त वाचनालय | किवळ | किवळ | २५९१०० | इ/ब | १९८३–१९८४ |
| १५ | श्री.भिकेश्वर सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालय | वोडोली | वोडोली भिकेश्वर | ९९७५८०६६६४७ | इ/ब | २००२–२००३ |
| १६ | श्री.यशवंतराव चव्हाण सार्व.वाचनालय | शेणोली | शेणोली | –– | इ/ब | १९८९–१९९० |
| १७ | समाज प्रबोधन सार्वजनिक वाचनालय | मलकापूर | मलकापूर | ९४२११७८१०० | इ/ब | १९९२–१९९३ |
| १८ | समाजभुषण बाबुराव गोखले सार्व. वाचनालय | सैदापूर | विद्यानगर | २७१३०५ | इ/ब | १९९९–२००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९ | सुरूची महिला मंडळ ग्रंथालय | कराड | ४०१, सोमवार पेठ | २२३१७२, २२९६३१ | इ/ब | १९७४–१९७५ |
| २० | कै.काकासाहेब माने सार्व.समाजप्रबोधन | खुबी | खुबी | ९७६७४७३३०० | इ/क | २००७–२००८ |
| २१ | कै.मारूती आण्णा सोमदे वाचनालय | जुळेवाडी | जुळेवाडी | २६६५०८, ९८५०६८२३२९ | इ/क | २००६–२००७ |
| २२ | कै.सुहास सुर्वे वाचनालय | अबईनगर | अबईनगर वसंतगड | २५५४७४ ९६०४५२६६०३ | इ/क | २०००–२००१ |
| २३ | कृष्णाकाठ सार्वजनिक वाचनालय | रेठरे बुद्रुक | रेठरे बुद्रुक | २८१३९८ ९९२२१११२१२ | इ/क | २००७–२००८ |
| २४ | ग्रामविकास सार्व.मोफत वाचनालय | तासवडे | तासवडे | ९०९६०८७०३४ | इ/क | २००८–२००९ |
| २५ | चौंडेश्वरी सार्वजनिक वाचनालय | गोवारे | गोवारे | ९९६००८२०७३ | इ/क | २००८–२००९ |
| २६ | नवजागृती वाचनालय | निगडी मसूर | निगडी मसूर | २५२५४० | इ/क | १९८५–१९८६ |
| २७ | पाल ग्रामीण सार्वजनिक वाचनालय | पाल | पाल | २६१४७८ ९४२३१४२७५७ | इ/क | २००४–२००५ |
| २८ | भारत सार्वजनिक वाचनालय | उंब्रज | उंब्रज | ६९५१३२, ९८८११४१२८१८ | इ/क | २००३–२००४ |
| २९ | भैरवनाथ वाचनालय | टाळगाव, उंडाळे | टाळगाव, उंडाळे | २५६२५३, ९४०४२५२५८४ | इ/क | १९८८–१९८९ |
| ३० | मारूती मोरे सार्वजनिक वाचनालय | पाचपुतेवाडी | पाचपुतेवाडी | ९८८१८१३२२३ | इ/क | २००४–२००५ |
| ३१ | रघुवीर मोफत वाचनालय | नांदगाव | नांदगाव | ९९२१४४३४१४ | इ/क | २००६–२००७ |
| ३२ | लोकमान्य सार्वजनिक वाचनालय | शहापूर | शहापूर | ९९७५८०७६६१ | इ/क | २००७–२००८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३३ | शिवशंभो सार्वजनिक वाचनालय | घोलपवाडी | घोलपवाडी | ९७६५७०९८९८ | इ/क | २००८–२००९ |
| ३४ | श्री जोर्तीलिंग सार्वजनिक वाचनालय | शिरवडे | शिरवडे | ९९२२९४९४५४ | इ/क | २००७–२००८ |
| ३५ | श्री तुकाईदेवी सार्वजनिक वाचनालय | गायकवाड वाडी | गायकवाड वाडी | ९९२३८०४८४९ | इ/क | २००८–२००९ |
| ३६ | श्री राम सार्वजनिक वाचनालय | करवडी | करवडी | ९९२२२०८६३७ | इ/क | २००८–२००९ |
| ३७ | श्री सिध्दीविनायक ग्रंथालय | कराड | कोयना वसाहत | २४१३६५ ९८८१७४५७०४ | इ/क | २००६–२००७ |
| ३८ | श्री स्वामी समर्थ सार्व.वाचनालय | सुर्ली | सुर्ली | २७८१२५ | इ/क | २००४–२००५ |
| ३९ | श्री हनुमान सार्वजनिक वाचनालय | नारायणवाडी | नारायणवाडी | ९६५७९५७६३७ | इ/क | २००८–२००९ |
| ४० | संकल्प सार्वजनिक वाचनालय | गोळेश्वर | गोळेश्वर | २२५७६३ | इ/क | २००६–२००७ |
| ४१ | संत काशिबा महाराज गुरव वाचनालय | बनवडी | लक्ष्मी सहकारी गृहनिर्माण | २७२४२६ ९८६०७७५६१० | इ/क | १९९९–२००० |
| ४२ | सहयाद्री सार्व.ग्रंथालय वाचनालय | वाठार | वाठार | ९२२५८१४५४३ | इ/क | २००८–२००९ |
| ४३ | सावित्रीबाई फुले सार्व.ग्रंथालय | कराड ग्रामीण | निसर्ग वाकण रस्ता | ९९७०११८११९ | इ/क | २००३–२००४ |
| ४४ | सार्वजनिक वाचनालय ग्रामपंचायत | कार्वे | कार्वे | २८००७३ | इ/क | १९७२–१९७३ |
| ४५ | सिध्देश्वर सार्वजनिक वाचनालय | कोर्टी | कोर्टी | २६५३७४ ९८६०१४५५१६ | इ/क | २००४–२००५ |
| ४६ | अनुचंद्र ग्रंथालय व वाचनालय | शेवाळेवाडी | शेवाळेवाडी | ९८५०१६५२१५ | ड | २०११–२०१२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४७ | अरूणोदय सार्व. वाचनालय व ग्रंथालय | तांबवे दक्षिण | तांबवे दक्षिण | ९९२३०३८८२१ | ड | २०११–२०१२ |
| ४८ | अष्टविनायक वाचनालय | नवीन कवठे | नवीन कवठे | ९८२३७६३२१८<br>९८२२७९२४०२ | ड | २०१०–२०११ |
| ४९ | आद.बाबुराव थोरात आण्णा सार्वजनिक ग्रंथालय | कालवडे | कालवडे | २८८०७५ | ड | २००७–२००८ |
| ५० | आद.पी.डी.पाटील सार्व.ग्रंथालय | नडशी | नडशी | ७५८८३८२७९० | ड | २००९–२०१० |
| ५१ | आनंद सार्वजनिक वाचनालय | शेरे | शेरे | ९९२३०३१२०२ | ड | २००९–२०१० |
| ५२ | कपिलेश्वर सार्वजनिक ग्रंथालय | कापिल | कापिल | –– | ड | २०१२–२०१३ |
| ५३ | कै.गुलाबराव बापूसाो मोहिते सार्व. ग्रंथालय | कोरीवळे | कोरीवळे | ७५८८०६०६६४ | ड | २००९–२०१० |
| ५४ | चि.नितीन मोहन जाधव सार्वजनिक ग्रंथालय | कार्वे | कार्वे | २८००६६ | ड | २००७–२००८ |
| ५५ | कै.तानाजीराव पवार सार्वजनिक ग्रंथालय | गोंदी | गोंदी | २६६०७९<br>९७६६४३७६२२ | ड | २००७–२००८ |
| ५६ | कै.धनंजय पाटील आबा सार्वजनिक वाचनालय | घोगाव | घोगाव | ९८८१४८४५२३ | ड | २००८–२००९ |
| ५७ | कै.बाबुराव बाळा डांगे सार्व.वाचनालय | वाघेरी | वाघेरी | ९२७०२११२१२ | ड | २०११–२०१२ |
| ५८ | कै.शांताबाई सार्व.वाचनालय | रेठरे खुर्द | रेठरे खुर्द | ९४२३८६२३४४ | ड | २०११–२०१२ |
| ५९ | गणोजी भोसले सार्व.मोफत वाचनालय | भोसलेवाडी | भोसलेवाडी | ८४२१००३२६ | ड | २००८–२००९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६० | जनविकास सार्व.वाचनालय | काले | काले | -- | ड | २००८-२००९ |
| ६१ | जय गुरूदत्त सार्व.वाचनालय | उत्तर कोपार्डे | उत्तर कोपाडे | ९८८१३५२०६१ ९९७५२७९०३१ | ड | २०११-२०१२ |
| ६२ | जय गुरूदत्त सार्व.वाचनालय | बेलवाडी | बेलवाडी | ९५७५८०६६४७ | ड | २०११-२०१२ |
| ६३ | जय हिंदमाता सार्व.वाचनालय | वनवासमाची | वनवासमाची | ९७६७५४०८७६ | ड | २०१०-२०११ |
| ६४ | जागृती वाचनालय | बनवडी | बनवडी | ९४२०७७२३७५ | ड | २०१०-२०११ |
| ६५ | जानाई सार्व.वाचनालय | पेर्ले | पेर्ले | ९८२२५१४९०५ | ड | २०११-२०१२ |
| ६६ | जिव्हाळा सार्व.वाचनालय | मलकापूर | मलकापूर | ९७६६५९८६३० | ड | २००९-२०१० |
| ६७ | द्रोपदामाई सार्व. वाचनालय | हिंगनोळे | हिंगनोळे | ७६२०१५५४१६ | ड | २०११-२०१२ |
| ६८ | प.आत्मगिरी महाराज सार्वजनिक वाचनालय | दुशेरे | दुशेरे | ९८२२५९८८७८ | ड | २००५-२००६ |
| ६९ | पाडळेश्वर सार्व.वाचनालय | वाघेश्वर | वाघेश्वर | २५२९०१ | ड | २०१०-२०११ |
| ७० | प्रितीसंगम सार्व.वाचनालय | शिवडे | शिवडे | -- | ड | २०१०-२०११ |
| ७१ | प्रितीसंगम सार्व.वाचनालय | सैदापूर | सैदापूर | -- | ड | २००९-२०१० |
| ७२ | प्रेरणा जनप्रबोधन वाचनालय | जखिणवाडी | जखिणवाडी | ९६२३४२३९४० | ड | २०१०-२०११ |
| ७३ | बंडुदादा साळुंखे वैचारिक विकास ग्रंथालय | वडगाव हवेली | वडगाव हवेली | ९४२२४००४७३ | ड | २०१०-२०११ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७४ | बाबा साईराज सार्व. वाचनालय | लोहारवाडी | लोहारवाडी | ९८२२५१७३५९ | ड | २००९–२०१० |
| ७५ | महाकाली सार्व.ग्रंथालय | विजयनगर | विजयनगर | ९८२२९९४०५० | ड | २००८–२००९ |
| ७६ | मा.जयवंतराव भोसले सार्व.वाचनालय | बाबरमाची | बाबरमाची | ९७६६२३१८७९ | ड | २०१०–२०११ |
| ७७ | मा.जयवंतराव भोसले सार्व.वाचनालय | येणके | येणके | ९९२२८१४००९ | ड | २०११–२०१२ |
| ७८ | मुंबई माजी महापौर बाबुराव शेटे सार्व. वाचनालय | येळगाव | येळगाव | २५७३७८ | ड | २००३–२००४ |
| ७९ | राजा शिवछत्रपती वाचनालय | कोपार्डे हवेली | कोपार्डे हवेली | ९९२२०१९७०४ | ड | २०१०–२०११ |
| ८० | शिवकृपा सार्व.वाचनालय | म्हासोली | म्हासोली | ७३५०५३७८२६ | ड | २०१०–२०११ |
| ८१ | शिवशंभो सार्व.वाचनालय | उंब्रज | उंब्रज | ९९७५८०६६४७ | ड | २०१०–२०११ |
| ८२ | श्री.अंबिकादेवी सार्व.वाचनालय | अंबवडे | अंबवडे | ९६७३५८७३९७ | ड | २०१०–२०११ |
| ८३ | सरकारमान्य मुक्त सार्व.वाचनालय | कराड | कराड ४४२, सोमवार | २२२७८० | ड | १९९५–१९९६ |
| ८४ | श्री गणेश सार्व.वाचनालय | बानुगडेवाडी | बानुगडेवाडी | ७३८७२३२८२१ | ड | २०१०–२०११ |
| ८५ | श्री गणेश सार्व.वाचनालय | हेळगाव | हेळगाव | ९८६०९१६३५० | ड | २००९–२०१० |
| ८६ | श्री ज्योर्तिलिंग सार्व. वाचनालय | मरळी | मरळी | ९८२२९३५२६८ | ड | २०१२–२०१३ |
| ८७ | श्री नटेश्वर सार्व.वाचनालय | साजूर | साजूर | ९८८११७९८७२ | ड | २०११–२०१२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८८ | श्री भैरवनाथ सार्व.वाचनालय | येवती | येवती | ९३७१६७८१९१ | ड | २०११–२०१२ |
| ८९ | श्री महालक्ष्मी वाचनालय | पार्ले | पार्ले | ७८७५८३२०७९ | ड | २०१०–२०११ |
| ९० | श्री वाग्वेदी सार्व.वाचनालय | चौरे | चौरे | ९७०२१५७७८४ | ड | २०१०–२०११ |
| ९१ | सिध्दनाथ सार्व.वाचनालय | कांबीरवाडी | कांबीरवाडी | ९९७५८०६६४७ | ड | २०११–२०१२ |
| ९२ | स्वामी समर्थ सार्व.वाचनालय | खराडे | खराडे | ७७७५९६५८६५ | ड | २०११–२०१२ |
| ९३ | संभाजीराव ज्ञानदेव यादव सार्व. वाचनालय | आणे | आणे | ९८५०८३२७५२ | ड | २०११–२०१२ |
| ९४ | समाज प्रबोधन सार्व.वाचनालय | बेलवडे बु. | बेलवडे बु. | ९८६०९६८९९१ | ड | २००६–२००७ |
| ९५ | समाज प्रबोधन सार्व.वाचनालय | केसे | केसे | ९७३६३८८७२९९ | ड | २०१०–२०११ |
| ९६ | सहयाद्री सार्व.वाचनालय | यशवंतनगर | यशवंतनगर | ९९२२४०९९९८ | ड | २०१०–२०११ |
| ९७ | सुखशांती सार्व.वाचनालय | नांदलापूर | नांदलापूर | ९८५०५४३७५४ | ड | २०११–२०१२ |
| ९८ | लक्ष्मण जिजाबा पिसाळ सार्व.वाचनालय | घोणशी | घोणशी | ९४२२६०३३२४ | ड | २०१०–२०११ |
| ९९ | आप्पाजी भैरव कुलकर्णी सार्व. वाचनालय | येरावळे | येरावळे | ९४२००५०६५१ | ड | २००९–२०१० |

**सातारा जिल्हा – ३१ डिसेंबर २०१३ अखेर शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालय संख्या**

| **तालुका** | **संख्या** |
|---|---|
| कोरेगाव तालुका (०२१६३) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये २४ |
| खंडाळा तालुका (०२१६९) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये २२ |

| | |
|---|---|
| जावळी तालुका (०२३७८) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये १६ |
| पाटण तालुका (०२३७२) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये ३७ |
| फलटण तालुका (०२१६६) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये ६२ |
| महाबळेश्वर तालुका (०२१६८) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये ०३ |
| माण तालुका (०२१६५) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये ४७ |
| वाई तालुका (०२१६७) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये २१ |
| कराड तालुका (०२१६४) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये ९९ |
| सातारा तालुका (०२१६२) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये ३९ |
| खटाव तालुका (०२१६१) ग्रंथालय | एकूण ग्रंथालये २३ |
| | एकूण ३९३ |

**ग्रंथालय चळवळीचा एक उपक्रम ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार[१०६]**
**सातारा जिल्हा ग्रंथालय संघ, सातारा**
**महात्मा फुले आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार**

| अ.न. | काल | पुरस्कारप्राप्त कार्यकर्त्याचे नाव |
|---|---|---|
| १ | सन १९९५-१९९६ | श्री.श्रीराम बा.आचार्य, सातारा |
| २ | सन १९९६-१९९७ | श्री.विठ्ठल विष्णू पाटील, ग्रंथपाल सौ.वेणूताई चव्हाण ट्रस्ट , कराड |
| ३ | सन १९९७-१९९८ | श्री.ॲड.अशोकराव भट, वाई |
| ४ | सन १९९८-१९९९ | श्री.हरीभाऊ वि.निंबाळकर अध्यक्ष श्री.छ.शिवाजी वाचनालय, फलटण |
| ५ | सन १९९९-२००० | मा.खासदार लक्ष्मणराव पा.पाटील, माजी अध्यक्ष जिल्हा ग्रंथालय संघ, सातारा |

### ३.२.११ कराड नगरवाचनालय :

कराड शहरातील नागरिकांच्या सहकार्याने इ.स. १८५७ मध्ये नगरपालिकेच्या ऑफीसच्या माडीवर एका भागात हे वाचनालय सुरू केले. या वाचनालयाची व्यवस्था कराडातील नागरिकांच्या हाती होती. नगरपालिका वाचनालयाला ग्रँट देत असे. ती ग्रँट वार्षिक असे. इ.स. १८५७ मध्ये हे ग्रंथालय 'नेटिव्ह

जनरल लायब्ररी' या नावाने सुरू झाले.[१०७] इ.स.१८५७ साली ग्रंथालय चावडी चौकातील चावडीच्या पडक्या अपूऱ्या जागेत होते. इ.स. १९५२ या वर्षी हे ग्रंथालय नगरपालिकेच्या ताब्यात दिले तेव्हा ग्रंथालयात फक्त ३३७ पुस्तके होती.[१०८]

त्यावेळी सकाळ वृत्तपत्राचे बातमीदार श्री.म.कुलकर्णी शिवाजी शिक्षण मंडळाचे संस्थापक श्री.शंकरराव करंबळेकर व कराडचे शिल्पकार पी.डी.पाटील यांच्या प्रयत्नानी, जनसंपर्कांनी या वाचनालयाचे स्वरूप बदलले. नगरपालिकेने चावडी चौकातील पडक्या इमारतीतून ते रविवार पेठेतील पाण्याच्या टाकीखाली असलेल्या नगरपालिकेच्या कार्यालयात आणले. या इमारतीत हे नगर वाचनालय १९६२ पर्यंत होते. १९६४–६५ नगरपालिकेने आपल्या अंदाजपत्रकात ग्रंथालय खर्चाकरिता स्वतंत्र मोठया रकमेची तरतूद करण्यास सुरूवात केली. यामुळे नवीन ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्या संख्येत खूपच वाढ करण्यात आली.[१०९] वाचनालयात एक लिपिक व एक शिपाई एवढेच दोघे काम करीत होते. वर्गणीदार फक्त १४० होते. वर्गणीदारांची वर्गणी दरमहा ३७ पैसे होती. १९६४ मध्ये ग्रंथालय नगरपालिकेच्या नवीन इमारतीत नेण्यात आले. सन १९७१ मध्ये वर्गणीदार ७४९ झाले व ग्रंथ १७६३९ झाले. १९७१ पर्यंत ७ संशोधकांना संशोधनाकरिता ग्रंथालयाची मदत झाली. १९८५ मध्ये ग्रंथसंख्या ४०८७५ झाली व वर्गणीदार ३४८१ झाले. १९८५ अखेर ग्रंथांची किंमत ११ लाख रूपयांवर गेली. वाचनालयाला जागा अपूरी पडू लागली.[११०] तेव्हा टाऊन प्लॅनिंग स्कीम कराड नं.१ ही योजना १ जाने. १९६२ मध्ये अमलात आली. सन १९८७ मध्ये यशवंतराव चव्हाण स्मृतीसदन या वास्तूत ३५ बाय २५ फुटाची चार दालने नगरवाचनालयाला देण्यात आली. पुस्तक विभाग तळमजल्यावर १०७ बाय ५७ मध्ये आहेत. यात महिला विभाग तसेच बाल विभाग आहेत. ग्रंथालयाच्या पुढील ८० बाय २४ फुटाचे दालन कलादालनाकरिता आहे. प्रदर्शनाकरिता याचा वापर केला जातो.

**ग्रंथालयाची १९६० ते २००० अखेर प्रगती**

| वर्ष | ग्रंथसंख्या | वर्गणीदार | दैनिक | साप्ताहिक | पाक्षिके | मासिके |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५२ | ३३७ | ६३ | ०६ | ०५ | ०२ | १६ |
| १९६२ | २२४५ | १४० | १४ | १५ | ०५ | ३४ |
| १९७१ | १७६२९ | ७४९ | २४ | ४१ | १३ | १४९ |
| १९८५ | ४०८७५ | ३४८१ | ३० | ६२ | १९ | १६९ |
| १९९३ | ४४७८० | ५००० | २८ | –– | –– | –– |
| २०१५ | ३२५८१० | १९६९३५ | २१ | १३ | ०४ | ६८ |

**समारोप व निष्कर्ष** :

जीवन आनंदी होण्यासाठी 'ग्रंथालय' हाच उत्तम पर्याय आहे. आपल्या देशात सुमारे ५४००० ग्रंथालये आहेत. महाराष्ट्रात शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ८५९८ आहेत. सातारा जिल्हयात ग्रंथालयाची

संख्या ३२८ एवढी आहे. तरीसुध्दा ही संख्या कमी आहे. जिल्हयात पाचशेच्यावर लोकसंख्या असणाऱ्या गावात ग्रंथालय असावे अशी अपेक्षा आहे. नवीन पिढी ज्ञानसंपन्न, चारित्र्यसंपन्न, विचारसंपन्न होण्यासाठी त्या ठिकाणी ज्ञानाचे केंद्र म्हणजे ग्रंथालय हवे आहे. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाच्या स्थापनेचा विचार सन १९६५ मध्ये सुरू झाला. पद्मश्री बाबुराव गोखले, डॉ.शिवाजीराव चव्हाण व श्री. विठ्ठल पाटील इ. ग्रंथालय चळवळीतील जिव्हाळा असणाऱ्या बुजुर्ग मंडळींनी ग्रंथालय संघाची इ.स. १९७७ मध्ये विश्वस्त कायदयानुसार नोंदणी केली. 'ग्रंथालय चळवळ' एक पवित्र कार्य म्हणून हे काम त्यांनी हातात घेतले. ग्रंथ हे गुरूस्थानी आहेत. त्यांचा लाभ समाजाला व्हावा शासनाचा त्यात सहभाग असावा म्हणून निरनिराळ्या स्तरावर आंदोलने झाली.

## सातारा जिल्हयातील ग्रंथालये :

सातारा जिल्हयातील तालुक्यात असणाऱ्या ग्रंथालयाची यादी खाली दिलेली आहे. ३१.०३.२००९ अखेर दर्जा वर्गविहीन शासनमान्य ग्रंथालयांची माहिती :

| तालुका | जिल्हा | तालुका | | | इतर | | | | | योजना | | | तालुका | | ग्रामपंचायत इतर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ | अ | ब | क | अ | ब | क | ड | एकुण | ड | एकुण | | ब | क | अ | ब | क | ड | एकुण |
| कराड | – | १ | – | – | – | ९ | १७ | १४ | ४१ | १६ | १६ | ५७ | – | – | – | – | १ | – | १ |
| कोरेगाव | – | – | – | – | १ | २ | २ | ४ | ९ | ८ | ८ | १७ | १ | – | – | – | – | १ | २ |
| खटाव | – | – | १ | – | – | २ | ८ | ६ | १७ | ६ | ६ | २३ | – | – | – | – | – | २ | २ |
| खंडाळा | – | – | – | – | – | २ | ५ | १ | ८ | ७ | ७ | १५ | १ | – | १ | – | २ | – | ४ |
| जावळी | – | – | १ | – | – | – | ३ | ५ | ९ | ५ | ५ | १४ | – | – | – | – | – | – | ० |
| पाटण | – | १ | – | – | – | ३ | ८ | १० | २२ | ९ | ९ | ३१ | – | – | – | – | – | – | ० |
| फलटण | – | – | १ | – | १ | ३ | ९ | ११ | २५ | २४ | २४ | ४९ | – | – | – | – | – | – | ० |
| महाबळेश्वर | – | – | १ | – | – | – | १ | २ | ४ | – | ० | ४ | – | – | – | – | – | – | ० |
| माण | – | – | १ | – | – | ५ | ७ | २६ | ३९ | ९ | ९ | ४८ | – | – | – | – | – | – | ० |
| वाई | – | १ | – | – | १ | १ | ४ | १ | ८ | २ | २ | १० | – | – | – | – | ९ | ४ | १३ |
| सातारा | १ | १ | – | – | – | ६ | ८ | १० | २६ | ११ | ११ | ३७ | – | – | – | – | – | १ | १ |
| | १ | ४ | ५ | ० | ३ | ३३ | ७२ | ९० | २०८ | ९७ | ९७ | ३०५ | २ | ० | १ | ० | १२ | ८ | २३ |

जिल्हा ग्रंथालय संघ अहवालावरून

सन १९६७ साली ग्रंथालय कायदा अस्तित्वात आल्यानंतर आज सातारा जिल्हयात ३९३ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत. लोकसंख्येच्या निकषानुसार ग्रंथालये असावीत ५०० ते १०००० लोकसंख्येपर्यंत एका ग्रंथालयास शासनमान्यता मिळते. १०००१ ते २५००० लोकसंख्या असलेल्या गावामध्ये दोन ग्रंथालये होतात. २५००१ ते ५०००० लोकसंख्येकरिता तीन ग्रंथालये व ५०००१ ते १००००० लोकसंख्येसाठी चार ग्रंथालये शासनमान्य होतात. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाने नवीन ग्रंथालये निर्माण करण्याचा संकल्प केला आहे.

**३.३ सामाजिक चळवळी : अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ**

**प्रस्तावना :**

संपूर्ण महाराष्ट्रात अंधश्रध्दा निर्मूलनाची चळवळ समर्थपणे उभी आहे. श्याम मानव, डॉ.नरेंद्र दाभोळकर, डॉ.आ.ह.साळुंखे, डॉ.बाबूराव गुरव, नीलीमा टाटके, प्रा.प.रा.आर्डे, कुमार मंडपे, प्रा.उषा शहा, शालिनी ओक, विनायक साबळे, माधव बावगे यासारख्या दिगज्ञांनी अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य प्रबोधन व चळवळी यांच्या माध्यमातून केले.[११२]

**३.३.१ अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ मुलत: प्रबोधनात्मक चळवळ :**

अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ तिमिरातूनी तेजाकडे नेणारी चळवळ आहे.गुढ वाटणाऱ्या गोष्टी, रूढी परंपरा, धर्मातील गोष्टी, या सर्वाबाबत सत्य कसे शोधावे याबाबतचे मार्गदर्शन करणारी ही एक चळवळ आहे. प्रत्येक घडणाऱ्या गोष्टीच्या पाठीमागे कारण असते ते कारण कसे शोधावे याबाबत मार्गदर्शन करणारे ते विज्ञान आहे.[११३] या विश्वातील घडामोडी कुठल्यातरी दैवी शक्तीच्या सामर्थ्यांनी घडतात असा बहुसंख्य लोकांचा समज असतो. ते तसे नाही असे जर कोणी सांगितले तर त्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही. जुन्या वळणाचा बहुजन समाज कोणाचे ऐकत नाही. जर कोणी तसे करण्यास प्रतिबंध केलातर तो चळवळीच्या विरोधात उभा राहतो.[११४]

अंधश्रध्दा निर्मूलन करणे म्हणजे वैज्ञानिक दृष्टीकोण निर्माण करणे. आता वैज्ञानिक दृष्टीकोण काय सांगतो, प्रत्येक कार्यामागे कारण असते. ते माणसाच्या बुध्दीला समजू शकते. अंधश्रध्दा निर्मूलन करणे याचा अर्थ आपल्या आजूबाजूच्या घटनातील कार्यकारणभाव शोधणे समाजसुधारक आगरकर म्हणतात, '' घुबडाचे रडणे, मांजर आडवे जाणे, तारा पडणे, चंद्राभोवती खळे पडणे, स्वप्नात साप दिसणे, सवाष्ण, साप किंवा गाय समोर येणे. पूर्वजन्म, पुर्नजन्म, आत्मा, कैलास, वैकुंठ, पाताळ, यम या बाबी काल्पनिक आहेत. या अंधश्रध्दांना कोणताही आधार नाही.[११५] महात्मा फुले यांनी कार्यकारणभावाचा विचार अनेक उदाहरणांनी स्पष्ट मांडला आहे. ''जप अनुष्ठाने पाऊस पाडती  आर्य का मरती जळावीण ।। अंधश्रध्देबाबत जोतिराव प्रश्न विचारतात, ''प्रत्येक लढाई मुर्हूतावर करणारी पेशवाई का बुडाली? लग्नपत्रिकेतील ३६ गुण जमणाऱ्यांच्या कपाळी अकाली वैधव्य का येते. दीडशे वर्षापूर्वी अंधश्रध्देचे बाबतीत जोतीराव फुले यांनी हा युक्तीवाद केला आहे.[११६]

### ३.३.२ अंधश्रध्दा म्हणजे काय ?:

गोष्ट मुळात खरी नसताना तिच्यावर विश्वास ठेवणे . ती मानणे म्हणजे अंधश्रध्दा होय. अंधश्रध्दा ही केवळ अज्ञान नाही तर ती एक प्रक्रिया आहे.[११७] डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देव व धर्म नाकारणारा बौध्द धर्म स्वीकारला. चाळीस वर्षाच्या प्रयत्नाने ही मंडळी देव व धर्मही मानत नाहीत. म्हणून त्यांच्यातील अंधश्रध्दा दूर झाल्या आहेत असे मानणे योग्य नव्हे. अशीच परिस्थिती अंधश्रध्देच्या संदर्भांत सामान्य जनतेची झाली. अंधश्रध्देविरूध्द आपली लढाई आहे. याचा अर्थ आपली खरी लढाई शब्दप्रामाण्याविरूध्द आहे. चिकित्सा न करण्याच्या प्रवृत्तीविरूध्द आहे.[११८]

**अंधश्रध्दा – एक प्रक्रिया :**

अंधश्रध्दा ही एक प्रक्रिया आहे. ती केवळ अज्ञानजन्य नाही.अज्ञानामुळे अंधश्रध्दा निर्माण झाल्या हे खरे आहे. मेंदूचे दोन भाग. एक जागृत मन (व्यक्त मन) कॉन्शस माइंड व दुसरा भाग सुप्त मन सबकॉन्शस माईंड. जागृत मन हे तार्किक पध्दतीने विचार विश्लेषण करू शकते. प्रत्येक माणसाला जागृत मन असते. ते तार्किक पध्दतीने विचार करून विश्लेषण करून त्याची वर्गवारी करून माहिती स्विकारते. मनाला वैज्ञानिक प्रक्रियेने व बुध्दीवादी प्रक्रियेने विचार करता येतो.[११९]

### ३.३.३ अंधश्रध्दा नेमक्या कोणत्या प्रकारच्या असतात :

अंधश्रध्दा अज्ञान, अडाणीपणा, शकुन अपशकुन यांच्या कल्पनेचे खेळ असतात.उदा. जखम झालेल्या व्यक्तीनी भात खाल्ला तर जखमेत पू होतो. पाल चुकचुकणे, दिवा विझणे, मांजर आडवे जाणे, कावळा ओरडणे, अंगात येणे, डोळयातून खडे काढणे, भूतानी झपाटणे, लंगर तोडणे, बुवाबाजी, पुर्नजन्म, प्लँचेट, आत्मा, भानामती, नरबळी, कोंबडा कापणे इ.अंधश्रध्देपायी कित्येकांचे नरबळी दिले जातात. संशयाचे निराकरण करण्यासाठी बाईला उकळत्या तेलाच्या कढईत हात घालावयास सांगणे, हातावर कापूर जाळणे, देवदासी बनविण्याचे प्रकार अशा अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा आहेत.[१२०] यज्ञयाग करणे यात तेलतूप धान्य जाळणे. वटपौर्णिमेच्या झाडाला प्रदक्षिणा घालणे. अंधश्रध्देत काही भाग अमानुष व अघोरी स्वरूपाचा असतो.[१२१]

**मनोविकार व अंधश्रध्दा :** मनोविकाराचे अज्ञान व गैरसमज यामुळे अंधश्रध्दा निर्माण होते. वरवर दिसणारी व्यक्ती अचानकच वेगळे वर्तन करू लागते. या व्यक्तीचा चेहरा, हावभाव, आवाज बदलतो. त्यामुळे मन आजारी पडते. खरा हा तर मनाचा आजार परंतु कोणीतरी याला झपाटले आहे असे म्हणतात.[१२२]

### ३.३.४ स्त्रिया आणि अंधश्रध्दा :

स्त्रियांमध्ये अंधश्रध्दा जास्त आहेत. या त्यांच्या बळी व वाहकसुध्दा आहेत. त्यांना मानसिक गुलामीमुळे अंधश्रध्देतून होणारे शोषण जाणवत नाही. पुरूषप्रधान कुटुंबव्यवस्था, समान संधींचा अभाव, धर्माने दिलेले दुय्यमत्व स्त्रिचे शारीरिक व मानसिक अनारोग्य हे तिला अंधश्रध्देला बळी पाडण्यास भाग पाडतात. समाजात पुरूषापेक्षा स्त्रिया अधिक अंधश्रध्दाळू आहेत. नवसानी मुले होत नाहीत. संत तुकारामांनी

३५० वर्षापूर्वी सांगितले 'नवसे सायासे पुत्र होती तो का करणे लागी पती ? मंगळागौर, वटपौर्णिमा, वैभवलक्ष्मी, संतोषीमाता अशी व्रत वैकल्ये जास्ती प्रमाणात करताना स्त्रिया दिसतात.[१२३]

**स्त्रीचे आरोग्य व अंधश्रद्धा :**

स्त्रीयांचे आरोग्याकडे समाजात हवे तेवढे लक्ष दिले जात नाही. गरजेपेक्षा कमी आहार उरलेले शिल्लक अन्न खाऊन स्त्रिया समाधान मानतात. बऱ्याच स्त्रियांची तब्बेत कुपोषित राहते. लवकर लग्न लवकर मुले यामुळे व आई दोधांचे आरोग्य चांगले राहत नाही. भारतात प्रसुतीमध्ये लाखो स्त्रिया दगावल्या जातात.[१२४] स्त्रीयांचे हे दुबळे आरोग्य अंधश्रद्धांना जन्म देते. असंख्य गैरसमजूती व अंधश्रध्दा आहेत. ग्रहण पाहू नये, ग्रहणात भाजी चिरू नये. लहान मूल रडू लागले तर त्याची दृष्ट काढावी इ . माणूस सारासार बुध्दी गहाण टाकतो.[१२५]

**रूढी व परंपरा :**

पती निधनानंतर स्त्री सती जात होती. स्त्रीचा बळी घेणाऱ्या अनेक प्रथा आहेत. त्यापैकी एक राजस्थान देवराळ येथील घटना. या घटनेमुळे सगळीकडे खळबळ उडाली. राजकुॅवर सती गेल्यानंतर तिच्या आईवडीलांचे मन अभिमानाने भरून आले. अंधश्रध्देचा हा बळी खोटया प्रतिष्ठेपायी सती गेला मानसिक गुलामगिरीचे  हे चित्र समाजानी पाहिले.[१२६] देवदासी रूढी म्हणजे काय लहानपणी दारिद्रयामुळे केसाला तेलपाणी नसते. वेणीफणी केली जात नाही. यामुळे केसातला गुंता सुटला जात नाही. कोणीतरी देवऋषी या गुंत्याकडे बोट दाखवून 'तुमच्या लेकीला यल्लमा आईची जट आहे.' मग पुढे त्या मुलीची शाळा बंद होते व सौंदत्तीला नेऊन तिचे देवाशी लग्न लावतात.[१२७]

**३.३.५ श्रध्दा व अंधश्रध्दा :**

मानवाचे व्यक्तीमत्व हे विचार अन भावना यांच्या संतुलनाने घडलेले असते.[१२८] नरबळी देणे, मरीआईचा कोप झाला असे समजून गाडा ओढणे या गोष्टीला अंधश्रध्दा म्हणतो. एखादया स्त्रीला चेटकीण समजून तिची नग्न धिंड काढणे किंवा पाऊस पडला नाही तर गाभारा पाण्याने भरणे देव पाण्याने कोंडून ठेवणे.[१२९]

**अंधश्रध्देबददल काही प्रश्न उत्तरे :**

१.अमेरिकन व्हाईट हाऊस (निवासस्थानी) मध्ये अब्राहम लिंकनचे भूत किंवा भारतातील साप्ताहिकातील वृत्त भूते दिसतात ही संकल्पना खरी का खोटी?

सर्व खोटे आहे. कारण भूत कल्पनाच खोटी आहे. या कथा भाकडकथा आहेत. साप्ताहिकातील अशा भ्रामक कथाने त्यांचा भपका व खप वाढतो.

२.काही लोक भूत पाहिल्याचे सांगतात मग ते खरे का खोटे ?

प्रत्यक्षात नाही ते असणे म्हणजे भास होय. ते मनाचे भ्रम असू शकतात.

३.अंगात येणे व भुताने झपाटणे हया एकाच स्वरूपाच्या विकृती आहेत काय ?

अंगात येणे किंवा भुताने झपाटणे दोन्ही बाबी मनाचे आजार आहेत. माणसांना मानसिक ताणतणावामधून जावे लागते. भूताने झपाटणे हे ढोंग नव्हे तर त्याचा मानसिक तोल ढळलेला असतो.

४. झपाटलेली व्यक्ती न बोललेली भाषा बोलते हे आम्ही पाहिलेले आहे खुलासा करा.

मागच्या जन्मातील स्मृतींनी व्यक्ती न बोललेली भाषा बोलते हा समज चुकीचा आहे. या विकृतीला Glassolalia असे म्हणतात.

५. बायकांच्या अंगात जास्त का येते ?

आपल्या देशात स्त्रियांना दुय्यम प्रकारचे स्थान आहे. विशेषतः गरीब मागासवर्गीय स्त्रियांच्या अंगात येण्याचे प्रमाण जास्त आहे. स्त्रियांच्या मनाचा कोंडमारा केला जातो. त्यातून मनाचे संतूलन ढळते.

६. प्लँचेटच्या सहाय्याने मृतात्म्यास आवाहन करता येते व माहिती मिळविता येते हे खरे की खोटे?

अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी विविध प्रकारची प्लँचेटस करून पाहिलेली आहेत. प्लँचेट करणे ही बनवेगिरी आहे. हाच निष्कर्ष निरीक्षणांनी येतो. बल लावल्याशिवाय वस्तू हलत नाही हे भौतिक सत्य आहे. शक्ती लावल्याशिवाय ते हलत नाही.[१३०]

### ३.३.६ अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ: वाटचाल

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भगवान गौतमबुध्द व महात्मा कबीर या दोन गुरूंच्याबरोबर महात्मा फुले यांना गुरू मानीत.[१३१] थॉमस पेन यांच्या विचारांचा फुले यांच्यावर प्रभाव होता. ते स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान व इहवादाचा पुरस्कार करणारे होते. समाजक्रांतीजनक होते. अस्पृश्यांसाठी त्यांनी भारतात पहिली शाळा काढली. जातीभेद, मुर्तीपूजा, सामाजिक समस्या, दारूबंदी, विवाह इ.गोष्टीत त्यांनी मोठे कार्य केले. शेतकरी समाजाचा केंद्रबिंदू मानून जन्मभर कार्य केले.[१३२] सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचे व बालविवाह प्रथेविरूध्द कार्य केले. आधुनिक मराठी संत व समाजसुधारक संत गाडगे महाराज यांनी कीर्तनातून लोकशिक्षणाचे कार्य केले. देवापुढे पशुबळी देऊ नये, दारू पिऊ नये, कर्ज काढू नये, असा सल्ला त्यांनी गावोगावी जाऊन दिला. अनिष्ट रूढी, चालीरिती व अंधश्रध्दा इ.बाबीच्या निर्मूलनासाठी हयातभर कार्य केले.[१३३] गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, राजर्षी शाहू महाराज, जांभेकर, न्यायमूर्ती रानडे, नारायण मेघाजी लोखंडे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व कर्मवीर भाऊराव पाटील इ. सुधारकांनी समता, श्रमप्रतिष्ठा, अस्पृश्यता, अंधश्रध्दा निर्मूलन इ.बाबीकरिता मोठे समाजकार्य केले.[१३४]

गांधीवादी विचारवंत, अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे संस्थापक व कार्याध्यक्ष, साधनाचे संपादक, डॉ.नरंद्र दाभोळकर वय वर्षे एकोणसत्तर यांची मंगळवार दि.२० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी सव्वासातच्या सुमारास पुणे येथील ओंकारेश्वरच्या पुलावर दोन अज्ञात हल्लेखोरांनी अगदी जवळून गोळया झाडून हत्या केली.[१३५]आजही समाजामध्ये भानामती, भूतबाधा, जादूटोणा यासारखे प्रकार घडत आहे. यामध्ये नागरी समाजसुध्दा मागे नाही. कारण हे प्रकार अज्ञानातून घडतात. शहरी भागात बुवाबाजीचे प्रकार वाढू लागलेले आहे. बुबामहाराजांचे प्रस्थ वाढत आहे. समाजातील मंत्रतंत्र, जादूटोणा, पशुहत्या इ. गैरप्रकारातून समाजाला

बाहेर काढण्यासाठी अंधश्रध्दा निर्मूलन समिती काम करीत आहे.[१३७] सन १९८४–८५ मध्ये समविचारी कार्यकर्ते एकत्र आले. या सर्वांनी देशपातळीवरची 'अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन समिती' या संघटनेची स्थापना केली.[१३८] या संघटनेचे अध्यक्ष 'श्याम मानव' हे होते. काही कालावधीनंतर यात दोन गट पडून १९८९ मध्ये अंधश्रध्दा निर्मूलन समितीची स्थापना झाली. नरेंद्र दाभोळकरांच्याकडे या संघटनेचे नेतृत्व होते. या काळात 'अनिस' ने खूप मोठे परिवर्तनाचे काम केले.[१३९]

**डॉ.नरेंद्र दाभोळकरः चिंतन, लेखन व संघटन :–**

डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या मनात अंधश्रद्धा, वाईट अनिष्ट प्रथेचे संदर्भात विचार आले. समाजातील शहाणी अडाणी बरेच मंडळी भोंदू बाबांच्या प्रभावाखाली कशी येतात व फसली जात हे दाभोळकरांच्या लक्षात आले. या अंधश्रद्धेच्या संदर्भात संघटना बांधण्याचा विचार त्यांच्या मनात आला. 'अंधश्रद्धा निर्मूलन' करीता त्यांनी लेखन चिंतन केले. वैद्यकीय व्यवसायात त्यांचे मन रमेना. समाजकार्यामुळे त्यांची ओढाताण होऊ लागली.[१४०]

**३.३.७ सामाजिक कार्य प्रारंभः–**

इ.स.१९७० ते १९८२ या कालखंडात डॉ. नरेंद्र यांनी 'समाजवादी युवक दल' ही युवा संघटना स्थापन केली. आणि स्वत:ला सामाजिक चळवळीत झोकून दिले. त्यांनी बाबा आढाव यांच्या 'एक गाव एक पाणवठा' या सामाजिक चळवळीत महत्वपूर्ण सहभाग घेतला.[१४१] पुढे त्यांनी श्याम मानव यांनी स्थापन केलेल्या 'अंधश्रद्धा निर्मूलन' चळवळीत काम करण्यास सुरूवात केली. इ.स. १९८९ मध्ये 'अंधश्रद्धा निर्मूलन' समितीची स्थापना केली.[१४२] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठास देण्याच्या मागणीस झालेल्या चळवळीत त्यांना दोन वेळा १५ दिवसाचा तुरूंगवास झाला. सातारमधील पुरोगामी कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन त्यांनी 'एकता शिक्षण प्रसारक'संस्थेमार्फत विविध उपक्रम राबविले. या संस्थेला शासनाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' दलित मित्र पुरस्कार मिळाला.[१४३] सन १९८६ मध्ये श्याम मानव व जेष्ठ विचारवंत डॉ.आ.ह.साळुंखे यांचे बरोबर अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम सुरू केले. इ.स. १९८९ मध्ये महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीची स्थापना केली. इ.स. १९९१ मध्ये सातारा येथे माहिती परिषद घेतली. जनजागृतीकरिता सन १९९६, १९९७,१९९९ मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी परिषदा घेतल्या व अंधश्रध्देबददल जनजागृती केली.[१४४] काही पुस्तकांचे प्रकाशन केले. साने गुरूजी यांनी स्थापन केलेल्या 'साधना साप्ताहिकाचे' ते इ.स.१९९८ पासून तहहयात संपादक होते. त्यांची अंधश्रध्दा प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम, अंधश्रध्दा विनाशाय इ. गंथांचे लेखन व प्रकाशन त्यांनी केले.[१४५]

**३.३.८ डॉ.नरेंद्र दाभोळकर : अंधश्रध्दा निर्मूलन कार्य व कार्यपध्दती:**

डॉ.दाभोळकरांनी डोक्यातील विचार कागदावर घेतले. विविध परिषदा, शिबीरे, मोहिमेचे आयोजन केले. वैज्ञानिक जाणिवा लोकांच्या मनात उतरवण्यासाठी चर्चासत्रांचे आयोजन केले. परिसंवाद घेतले. वृत्तपत्रातून लेखन केले. लोकांना डोळस बनविण्यासाठी त्यांची प्रत्यक्ष भेट घेण्याचे नियोजन केले.

अंधश्रध्देच्या बेडया तोडण्यासाठी सतत लेखमाला लिहल्या. पुस्तकाचे लेखन केले. लोकजागृती घडविण्यासाठी टीम तयार केली. प्रथम विचारांचे देवघेवीतून या समस्या सोडविण्याचे ठरविले.[१४६] अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या माध्यमातून समाजात पसरलेल्या वर्षानुवर्षाच्या जटील, अघोरी, अमानूष रूढी, अनिष्ट प्रथा यांच्या विरोधात ठाम उभे राहून विवेकनिष्ठ विचाराची कास धरून डॉ.दाभोळकर शेवटच्या श्वासापर्यंत लढले. डॉ.नरेंद्र दाभोळकर म्हणजे समाजाला तिमिरातून तेजाकडे नेणारी प्रकाशवाटच होय.[१४७]

**डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचे अंधश्रध्दा निर्मूलन विविधांगी उपक्रम :**

समाजातील अंधश्रध्देचा पगडा दूर करण्यासाठी डॉ.नरेंद्र यांनी विविध पातळीवर प्रयत्न केले.अंधश्रध्दा निर्मूलन म्हणजे लोकांच्या मनात वैज्ञानिक जाणिवा आणणे. यासाठी संघटनेच्या माध्यमातून माध्यमिक शाळेतील शिक्षकांचेसाठी विविध शिबीरांचे आयोजन केले. या माध्यमातून १५ ते १६ हजार शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले.[१४८] अंधश्रध्दा निर्मूलन प्रकल्पांतर्गत एक लाख विद्यार्थ्यांना परीक्षेला बसविण्यात आले. 'विज्ञान बोधवाहिनी' हा उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत व्ही.डी.ओ. प्रोजेक्टरवर चित्रफिती तयार करण्यात आल्या.[१४९]

**३.३.९ डॉ.नरेंद्र दाभोळकर अनिसचे उपक्रम व कार्य :**

१.शनि शिंगणापूरच्या मंदिरात महिलांना प्रवेस मिळत नसल्याची बाब 'अनिस'च्या नजरेतून सुटली नाही. हे त्यांचे पहिले आंदोलन होते. धर्मातील अंधश्रध्दामुळे स्त्रीयांना याठिकाणी प्रवेश नाकारला. या संदर्भांत प्रत्यक्ष शनिशिंगणापूर येथे जावून आंदोलन छेडले.

२.इ.स.२००० मध्ये या रूढीविरूध्द पंढरपूर ते नगर 'अनिस'चे कार्यकर्ते यांनी समता यात्रा काढली. ही मोहिम मुत्सद्दीपणे व शांतपणे चालविली. संपूर्ण महाराष्ट्र या लढयाने विचारप्रवण झाला. या लढयात प्रा.डॉ.एन.डी.पाटील, डॉ.श्रीराम लागू, पुष्पा भावे, बाबा आढाव यांचे बहुमोल योगदान होते.[१५१]

३.अंगापूर जि.सातारा रूक्मीणीच्या कणगीतील धान्य 'चेटूक' पळवते. येथे भेट देऊन समस्या सोडविली.हे सर्व रूक्मीणीची सुन करायची व तेल साबणाकरिता खर्च करायची.

४.पाचगणी, जि.सातारा येथील पाटलांचे घरावर दगडे पडतात. त्यांच्या घरापुढे टाचण्या, लिंबु, मिरच्या या ढीग. भानामती प्रकारचे स्थळी भेट दिली व प्रबोधन करण्यात आले. अनिसने त्यांचा शोध लावला.

५.परभणी येथील बारावीच्या सुमन नावाच्या मुलीचे अंगावर रोज काळया फुल्या उठत.

६.सातारा शहरातील सहा वर्षाचा मुलगा एकदम बोलायचा बंद झाला. त्याला भूतबाधा झाली.

७. 'पटवर्धन व बोलका पत्थर' श्री पटवर्धन बोलका पत्थरचा खडा दैवी, मौल्यवान म्हणून गुजरातमधून अल्प किमतीत आणून मोठया किमतीला विकत. 'अनिस'ने दुकानासमोर निदर्शने केली. पटवर्धन यांनी कोर्टात केस केली. ही केस संपूर्ण महाराष्ट्रात गाजली. १९८७ मध्ये या केसचा निकाल लागला. पटवर्धन यांना जसा व्यवसायाचा अधिकार आहे तसा अधिकार डॉ.दाभोळकरांना वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार करण्याचा आहे असा न्याय दिला.

८. 'भूत दाखवा अन अकरा लाख मिळवा' असे अनिसने आवाहन केले. यामुळे सर्वसामान्यांचे प्रबोधन घडले.[१५२]

९.जगात भूत, भानामती नाहीतच 'शोध भुताचा, बोध मनाचा' हा उपक्रम राबविला.

१०.अनुराधा देशमुख यांना सोमनाथाचा साक्षात्कार झाला. त्या ध्यानस्थ बसून चमत्कार दाखवू लागल्या. या फसवणुकीचे पितळ अनिसने उघड केले. वाईची हातचलाखी उघड केली. हजारोच्या साक्षीने चित्रफितींच्या सहाय्याने ही बाब उघड केली.[१५३]

११.सातारमधील डॉ.नरेंद्र यांच्या घरासमोरच्या कॉलनीतील प्रसंग. मुस्लीम समाजातील नायब तहसीलदारच्या घरातील प्रसंग– एक गुढ चमत्कारी बाई आली. सात दिवसात एक चमत्कारी बाई म्हणुन प्रसिध्दीस आली. अनिस कार्यकर्ते पोलिस पत्रकार व्हिडीओसह या ठिकाणी दाखल झाले. तपासणी केली व साहिबजादीवर खटला भरला.[१५४]

१२.पुणे खेड शिवापूर 'कमरअली दरवेशाचा दर्गा ' दर्गा आहे. दर्ग्यासमोर एक दगड आहे. अनिस कार्यकर्ते दाखल झाले व भांडाफोड केली.[१५५]

१३. लंगरचा चमत्कार: चालता बोलता लंगर चमत्कार प्रश्न कोणताही असो उत्तर मिळे, पंचक्रोशीत याचा बोलबाला झाला. गुरूवार अमावस्या व पौर्णिमा कौल लावण्याचे दिवस. श्री. प्रा. आर्डे, मूळचे नागराळ, जि.सांगली परंतु सातारला शिक्षक होते. ओ.बी.सी. संघटनेचे नेते नेताजी गुरव, कराडचे पत्रकार प्रविण लांजेकर हे नागराळला पोहचले. कराडच्या छात्र भारतीचे ८ ते १० विद्यार्थीही होते. सर्वजन नागराळला पोहोचले.पी.एस.आय. होते.

सर्व कार्यकर्ते आत गेले व तेथील या प्रकाराबाबत भोंदूगिरीबाबत भांडाफोड केली. खरेखोटे झाले. गावकरी प्रभावित झाले. शाळेत सभा झाली. ८,९,१० वी चे विद्यार्थी होते. गावकरी व विद्यार्थी यांचा प्रतिसाद उत्तम होता.[१५६] अशा कितीतरी घटना घडत होत्या. सन १९८२ मध्ये भानुदास गायकवाड बारामतीचा तरूण म्हणे उंबराच्या झाडाखाली झोपला आणि अंगात गोडी संचारली. छोटया मुलीची मोठी भानामती कडेगाव जि.सांगली येथील जि.प.कन्याशाळेतील प्रकार. दि.१३ मार्च ची कथा. मुलीच्या डोळयातून खडे कुमार मंडपे, मारूतराव पांगे, बर्वे डॉक्टरांचा दवाखाना शाळेत मुख्याध्यापक, वर्गशिक्षिका विमलाबाई शिंदे पत्रकार पिरजादे. तनुजा मानसिंग माने वय वर्षे १०. अनिसव्दारा सत्य वस्तुस्थिती दाखविली.[१५७]

### ३.३.१० अनिसव्दारा दिलेले अंधश्रध्देचे लढे :

१.शनि शिंगणापूर जि.अहमदनगर येथे पत्रकार परिषद घेतली. डॉ.दाभोळकरांच्या तोंडाला शिवसैनिकांनी काळे फासण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. (वृत्तपत्र बातमी १८ मार्च १९९३)

२.बुलढाणा चिखली रस्त्यावरील ठिकाण शिरपूर ठिकाण. शेषराव महाराजांची दारूबंदी

३.लक्षावधींना नेत्रहिन करणारे गुरव बंधू. कुशिरे ता.पन्हाळा येथील गुरव बंधु स्वप्न पडले. डॉ.दाभोळकर

पोलिसप्रमुख मीरा बोरवणकर. गुरव बंधूंच्यावर कारवाई दि.२७.१०.१९९७ रोजी कारवाई संदर्भांत पत्र दिले.[१५८]

४.'शोध भुताचा बोध मनाचा' महादू मोरे हमखास भूत दाखवितो डॉ.दाभोळकर प्रा.डॉ.एन.डी.पाटील नानासाहेब गोरे.

५.नवसासाठी पशूहत्या– मांढरदेवी काळूबाई, चिवरीची लक्ष्मीआई, आरेवाडी – बिरोबा कमालीची पशुहत्या.झाडाला टांगलेली बकरी– अनिसव्दारा अनिष्ट प्रथा बंद, १९९१, मुंबई उच्च न्यायालय १९९६ (औरंगाबाद) खंडपीठात दि.२३.७.९८ रोजी महाराष्ट्र शासनाच्या वतीने ए.जी.पी.श्री.देशमुख यांनी न्यायालयात औरंगाबाद येऊन स्पष्ट केले.

६.दैववादाची होळी – ज्योतिषविरोधी वैचारिक लढतानाचा कृती कार्यक्रम ३ नोव्हें.१९९५ ते ५ नोव्हें.१९९५ ज्योतिष विद्यापीठाची स्थापना या परिषदेला हे ज्योतिष नाही यावर २१ प्रश्न परिवर्तन चळवळीने दिले होते परंतु एकाही प्रश्नाचे उत्तर त्यांना देता आले नाही. 'अनिस', 'दैववादाची होळी' हे अभिनय राबविण्यात आले. समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ.एन.डी.पाटील व जेष्ठ विचारवंत डॉ.आ.ह.साळुंखे यांची भाषणे झाली. नियोजनबध्द चळवळीचा आराखडा तयार केला. कुमार मंडपे व संजय देशमुख यांनी मोहिमेचे संघटन केले.[१५९]

७.भ्रामक वास्तुशास्त्राबाबतचा वैज्ञानिक जाहीरनामा प्रस्तुत करण्यासाठी पहिली सही डॉ.जयंत नारळीकर

८.भानामती प्रबोधन धडक मोहिम उदघाटन श्री.निळु फुले, कुलगुरू जनार्दन वाघमारे.

९.अंधरूढीच्या बेडया तोडा अभियान डॉ.आ.ह.साळुंखे, प्रा.डॉ.एन.डी.पाटील व डॉ.नरेंद्र दाभोळकर

१०. अंधरूढीच्या बेडया तोडा चर्चासत्र डॉ.श्रीराम लागू, डॉ.आ.ह.साळुंखे, दादासाहेव रूपवते, पुष्पाताई भावे

११. चर्चासत्र अंधरूढीच्या बेडया तोडा आण्णा हजारे १२. विवेक जागर डॉ.श्रीराम लागू व डॉ.नरेंद्र दाभोळकर

### ३.३.११ अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीवरील डॉ.नरेंद्र दाभोळकर यांचे लेखन :

डॉ.दाभोळकरांच्या प्रत्येक पुस्तकात निश्चित वेगळेपण आहे. विश्वातील घडामोडी कुठल्यातरी दैवी शक्तीच्या सामर्थ्याने, आशीर्वादाने घडतात. यावर डॉ.नरेंद्र दाभोळकरांचा विश्वास नाही. लोकांनी स्वत:ला येणाऱ्या सर्व समस्येचा, प्रश्नांचा विचार करावा. विवेकाच्या चिकीत्सक बुध्दीच्या आधारे त्याची सोडवणुक करावी असे डॉ.नरेंद्र दाभोळकरांना वाटते.[१६०]

**त्यांची ग्रंथसंपदा : १.भ्रम आणि विज्ञान:** ईश्वराएवढाच विज्ञाननिष्ठा महत्वाचा घटक आहे. विज्ञानावरील निष्ठा म्हणजे विज्ञाननिष्ठा. विज्ञानाच्या उदयालाच धर्मसंस्थापकांचा आणि धर्मोपदेशकांचा विरोध होता. धर्मनिष्ठा व विज्ञाननिष्ठा या परस्परविरोधी प्रवृत्ती आहेत.

**२.अंधश्रध्दा आणि पुर्णविराम** : अंधश्रध्दा निर्मूलनासाठी गेली खूप वर्षे भ्रमंती चालू आहे. चर्चा, शिबीरे, वादविवाद घडत आहेत. व्याख्यान, भ्रमंती चर्चेत त्याठिकाणी प्रश्नांना महापूर येतो. प्रश्न विविध प्रकारचे

काही प्रश्न कुतुहलापोटी, काही विज्ञान समजून घेण्यासाठी, काही वादाला तोंड फुटावे म्हणून. मांडणी ९ विषयात: बुवाबाजी, संमोहन, भुताने झपाटणे, आत्मा पुर्नजन्म प्लँचेट, भानामती, फलज्योतिष, संकीर्ण श्रध्दा, अंधश्रध्दा.[१६१]

**३. अंधश्रध्दा विनाशाय** : अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे दर्शन या पुस्तकात आहे. शिव्या आणि ओव्या दोन्हीही बाबी स्वीकारत ही चळवळ पुढे पुढे चालत आहे. लोक कार्यकर्त्यांना तोच तोच प्रश्न विचारतात. अंधश्रध्दा निर्मूलनाचे नावाखाली तुम्ही श्रध्दाच उखडावयाला निघाला आहात.[१६२] या पुस्तकात बोलका पत्थर, लंगरचा चमत्कार, मती भानामती, छोटया मुलांची मोठी भानामती, जहर ऊतरणारा दुआॅ, कमरअली दरवेश चा पुकार, मीरावलीबाबाच्या दर्ग्याचा कबुलीजबाब, झाशीच्या राणीचा पुर्नजन्म, हरवलेला सापडला त्याची गोष्ट, मरता क्या नही करता, अनुराधादेवीची मिटलेली मुठ आणि उघडा चमत्कार, निर्मला माताजीचे हिंसक आध्यात्म, नवसाचे बळी की ग्रामीण अंधश्रध्देचा गळफास, पळ भैरवनाथाचा शोध भूताचा, जटानिर्मूलनाची कथा आणि व्यथा, धडका संपविण्याची धडक मोहिम.[१६३]

**४. विचार तर कराल** : अंधश्रध्दा निर्मूलनाचे चौथे पुस्तक. तिसऱ्या पुस्तकात प्रत्यक्ष चळवळीचे कथन केले आहे. चौथ्या पुस्तकात थोडे वेगळेपण आहे. अंधश्रध्देच्या घटना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष घडत असतात. काही वेळा आपण विस्मयचकित होतो. सत्य शोधण्याची सवय नसते. त्याबाबत अज्ञान असते, भिती असते. हे सगळे करायची आपणाला काय गरज पडली आहे. अशी सामान्यत: बऱ्याच लोकांची वृत्ती असते. या ग्रंथात धर्मचिकीत्सा व विवेकवाद हा भाग आहे.[१६४]

**५.श्रध्दा अंधश्रध्दा** : हा डॉ.नरेंद्र दाभोळकरांचा पाचवा ग्रंथ. प्रत्येकाची श्रध्दा असते. मग श्रध्दा म्हणजे काय ? अंधश्रध्दा म्हणजे काय ? त्या कोणकोणत्या आहेत ? वरवर पाहिले तर श्रध्दा व अंधश्रध्दा आपला गोंधळ उडतो. अंधश्रध्दा निर्मूलनाची व्यापक वैचारिक भूमिका आहे. 'अनिस'ची वैचारिक भूमिका या ग्रंथात मांडली आहे.[१६५] श्रध्दा अंधश्रध्दा, वैज्ञानिक दृष्टीकोण, फलज्योतिष्याचे थोतांड, मन मनाचा आजार, भुताचे झपाटणे, स्त्रिया व अंधश्रध्दा निर्मूलन अंधश्रध्दा निर्मूलन वैचारिक भूमिका, अंधश्रध्दा निर्मूलन व देव कल्पना. अंधश्रध्दा निर्मूलन व नीती विचार[१६६]

**६.ठरलं.डोळस व्हायचय** : युवा सकाळमध्ये डॉ.नरेंद्र दाभोळकर दर आठवडयाला एक लेख प्रसिध्द करत असत. या लेखात वाचकांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देत असत. त्याचे स्वरूप प्रश्नोत्तर स्वरूपात नाही. पत्रलेखनाचा नमुना म्हणुन हे लिखाण त्यांनी केले आहे. साधारणपणे ४३ लेख यामध्ये समाविष्ठ केलेले आहेत. युवकांना डोळस करण्याचा त्यांचा हेतू आहे. श्रीलंकेचे रहिवासी व मुळ भारतीय वंशाचे अब्राहम कोवूर हे अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे पितामह यांची माहिती दिली आहे.[१६७] डॉ.नरेंद्र दाभोळकर म्हणतात, ''प्रिय तरूण मित्रांनो आजच्या घडीला कधी नव्हे एवढी या विचाराची, आचाराची गरज आहे. कराल तर विचार![१६८]

**७.तिमिरातुनी तेजाकडे** : या ग्रंथाची प्रथम आवृत्ती एप्रिल २०१० मध्ये निघाली व आक्टों. २०१३ मध्ये

पाचवी आवृत्ती निघाली. साधारणपणे २५ ते २६ वर्षे अंधश्रध्दा निर्मूलनासाठी वैज्ञानिक दृष्टीकोण व विवेकवाद यावर डॉ.दाभोळकर व्याख्याने देत आहेत. चर्चा करीत आहेत. शिबीरे घेतात. लेखन करीत आहेत. कृतीने प्रत्यक्ष समाजात जाऊन लोकांना समजावून त्यांना श्रध्दा व अंधश्रध्दा या संदर्भांत डोळस व्हायला सांगतात. हे पुस्तक लेखनाचा हेतू अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीकडे अभ्यासू वृत्तीने पहाणाऱ्या व्यक्तींना एकसंघ सम्यक मांडणी नव्हती ती सम्यक मांडणी उपलब्ध करून देण्याचा आहे.[१६९] या ग्रंथाचे तीन भाग १.पहिला भाग – थेट अंधश्रध्दा निर्मूलनाशी संबंधीत आहे. २.दुसरा – अनिसने दिलेली कृतीशील झुंजीबाबत.३.तिसरा भाग – सैध्दांतिक स्वरूपाचा हा तिसरा भाग. पहिल्या भागात वैज्ञानिक दृष्टीकोण, फलज्योतिष विज्ञानाच्या कसोटीवर वास्तूशास्त्र नव्हे वास्तुश्रध्दाशास्त्र.

**८.मती भानामती** : अंधश्रध्दा निर्मूलन या विषयाचे डझनभर लेख प्रत्येकांच्या खूप आवृत्या निघतात. परंतु मती–भानामती अनुत्तरीत राहीली. पुढे तिमीरातुनी तेजाकडे या ५०० पानाच्या ग्रंथात यातील ५ ते ७ पानेच मती भानामतीला देण्यात आली. तरीसुध्दा मती–भानामती अधुरीच राहीली. म्हणून भानामती प्रकार उदा घरावर दगड पडणे, कपडे फाडणे,कपडे जळणे, अन्नात मीठ किंवा विष्ठा मिसळणे, अंगावर ओरखडे उठणे, बिब्याच्या फुल्या उठणे, बंद कपाटातून पैसे गायब होणे या सर्व बाबीना भानामती म्हणजे काळी जादू होय.[१७०]

**९.प्रश्न मनाचे** : समाजात मनाबददल कुतूहल आहे. २१ नोव्हें.२०११ ला मानसिक आरोग्य व अंधश्रध्दा या विषयावरची राज्यव्यापी परिषद चाळीसगाव येथे झाली.[१७१] समाजपरिवर्तनासाठी मन निरोगी हवे. या ग्रंथात १४ No health without mental health. पासून ते मनाचे आजार, चिंता, व्यसन, मन व स्वभाव, फिट सारखा आजार इ. बाबी व औषधोपचार या बाबीचा समावेश आहे.[१७२]

### ३.३.१२ डॉ.नरेंद्र दाभोळकर – पुरोगामी समर्पित नेतृत्व :

भाई वैद्य म्हणतात डॉ.दाभोळकरांनी अनेक वर्षे तळमळीने अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य केले. ते पुरोगामी विचाराचे होते. अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम सुरू झाल्यापासून कोणताही नवीन बाबा महाराष्ट्रात आला नाही ही याची मोठी उपलब्धी म्हणावी लागेल.[१७३] अंधश्रध्दा निर्मूलनाचा कायदा करण्यासाठी समितीने खूप प्रयत्न केले. गेल्या काही वर्षापासून दाभोळकर यासंदर्भांत रान उठवित होते. विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात या संदर्भातील विधेयक मंजूर व्हावे असा त्यांचा आग्रह होता.[१७४] डॉ.दाभोळकर, डॉ.कुमार सप्तर्षी यांचे विचारानुसार अतिशय सौम्य, कुशल संघटक व समर्पित होते. परंतु 'अनिस'चे संस्थापक व कार्यकर्ते यांच्यामुळे आपल्या पोटावर पाय येतोय व यातून पुढे संघर्ष होतो. हा एक विचारांचा संघर्ष होय. गांधी हत्येनंतर त्यांचे विचार नष्ट झाले नाहीत उलट गांधीवाद म्हणून ते समाजात मुळ धरून आहेत.[१७५] दारूचे व्यसन जीवन उध्वस्त करते प्रसंगी जीवन संपते म्हणून दारूधंदयाविरोधी महिला संघटीत व्हावे असे डॉ.नरेंद्र दाभोळकर कृती मेळाव्यात बोलत होते. या प्रसंगी ॲड.वर्षा देशपांडे, डॉ.वैशाली चव्हाण, सुमन कांबळे, शालन वाघमारे सोशल ग्रुपचे कार्यकर्ते उपस्थित होते.[१७६] डॉ.दाभोळकर यांनी गणपतीचे विसर्जन

करताना माती, रंग व त्यातील विषारी द्रव्ये पाण्यात मिसळतात म्हणून गणेशमुर्तीचे विसर्जन करू नका त्या मुर्ती दान करण्याचे आवाहन केले.[१७७] श्रध्दा व अंधश्रध्दा आणि व्यवहार याबाबत आपण गोंधळून जातो घटलेल्या घटनेचे संदर्भात आपण घटनेचे विज्ञाननिष्ठा ठेवून त्याआधारे त्याचा विचार करावा असे दि.२१.०८.१९९१ रोजी त्यांनी सभेत मार्गदर्शन केले.[१७८]

**सारांश :**

अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे अध्यक्ष व पुरोगामी चळवळीचा कणखर आवाज म्हणून डॉ.नरेंद्र दाभोळकर ओळखले जात. त्यांनी सामाजिक चळवळीत सातारचे नाव सातासमुद्रापार नेले. अंधश्रध्दा निर्मूलन समितीने व्यापक परिवर्तनाशी आपली बांधिलकी कायम जपली. डॉ.नरेंद्र दाभोळकर तरूण वयापासून सामाजिक कार्याकडे ओढले गेले. राष्ट्रसेवा दलात काम करत असताना त्यांच्या सत्यशोधक आणि चिंतनशील प्रवृत्तीला चालना मिळत गेली. समाजातील विवेकाचे झालेले अध:पतन व अनिष्ट रूढी यामुळे सर्वसामान्यांचे होणारे शोषण यामुळे त्यांचे मन अस्वस्थ झाले. कालबाहय रूढी, परंपरा व अंधश्रध्देमुळे झालेले थोतांड, बुवाबाजी यामुळे डॉ.दाभोळकर व्यथित झाले. सन १९७७ चा राज्य सरकारी नोकरांचा संप झाला. राजपत्रित अधिकारी असून ते संपात उतरले व प्रक्षोभ भाषणबाजी केली. परिणामी नोकरी गेली. वैद्यकिय सेवेत असताना नगरपालिकेतील भ्रष्टाचाराविरूध्द आंदोलन केले. चौकात सभा घेतल्या. जयप्रकाश नारायण यांच्या सभेतील 'कुछ तो बनो' या शब्दानी डॉ.नरेंद्र दाभोळकरांच्या मनावर गहरा असर झाला. नरेंद्र यांचा जन्म सातारचा. सन १९६९ चे दरम्यान ते एम.बी.बी.एस. झाले.१९७१मध्ये त्यांनी युवक संघटना स्थापन केली. युक्रांदचे नेते डॉ.कुमार सप्तर्षी, केरळचे बी.प्रेमानंद यांच्या प्रेरणेने त्यांनी सामाजिक कार्याची सुरूवात केली. याच काळात युवक संघटना चांगलीच बहरात आली होती. गं.बा.सरदार, नरहर कुरूंदकर, बाबा आढाव यांच्या विचाराने ते चांगलेच मोहित झाले. जातीभेदाची बंधने तोडून त्यांनी मुलाचे नाव 'हमीद' ठेवले. घरात देव्हारा नाही. कधी सत्यनारायण घातला नाही. १९८९ मध्ये श्याम मानव व त्यांच्यात मतभेद झाले. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन संस्था व अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन असे दोन भाग झाले. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम डॉ. नरेंद्र गेल्या अनेक वर्षापासून समर्थपणे सांभाळत आहेत. महाराष्ट्र, बेळगाव, कर्नाटक व गोवा राज्यात २०० पेक्षा अधिक शाखा आहेत. डॉ.नरेंद्र यांचा चळवळीकडे पाहण्याचा मानवतावादी दृष्टीकोण होता.

## ३.४ डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी व परिवर्तन चळवळ

**प्रस्तावना :**

सातारची डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी ही प्रबोधनात्मक चळवळ आहे. राजकीय अन सामाजिक या दोन्हीही क्षेत्रात ही अकादमी प्रबोधनाचे काम करते आहे. नागरिक व कार्यकर्त्यांना एकत्रित करून त्यांच्याशी संवाद करणे, त्यांचेबरोबर चर्चा करून पुरोगामी विचारांच्या आधारे त्यांची सोडवणूक करणे हे महत्वपूर्ण काम ही अकादमी करते. प्रा.डॉ.एन.डी.पाटील हे या अकादमीचे नेतृत्व करीत आहेत. राज्यातून

अनेक विचारवंत, परिवर्तनवादी व चळवळीतील कार्यकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी कार्यात सहभागी होतात.[१७९]

### ३.४.१ डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा: उद्‌देश व स्थापना :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमीची स्थापना जून १९९२ मध्ये सातारा येथे झाली. समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांची उकल करणे हे या चळवळीचे उद्‌दिष्ट आहे. या समस्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रकारच्या असतात. कार्यकारिणी, सदस्य व समाज परिवर्तन चळवळीत अभिरूची असणारे कार्यकर्ते यांनी सवड काढून एकत्रित येऊन आपाआपले अनुभव, निरीक्षणे, विचार परस्परात देवघेव करावी, चर्चा करावी आणि तटस्थ वृत्तीने म्हणजे वैज्ञानिकांच्या सत्यशोधक वृत्तीने परस्परांच्या अनुभवाने निरीक्षण करावे व विचारांची मुक्तपणे देवघेव करावी. विचार, निरीक्षणे यांच्या जोरावर आदानप्रदान करावे. विचाराचे विविध पैलू जनमाणसात रूजवून नवीन परिवर्तनीय पुरोगामी समाज निर्माण करण्याचे काम अकादमी करीत आहे.[१८०]

### ३.४.२ डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी : कार्यकारिणी रचना :

विचारमंथनातून नवविचाराचा जन्म होतो. समाजाचे प्रबोधन घडते. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचेकडे राजकीय, सामाजिक चळवळींचा विचारांचा प्रदीर्घ अनुभव आहे आणि म्हणून कार्यकारिणी त्यांच्या अध्यक्षतेखाली व नेतृत्वाखाली कार्यशील आहे.सुरूवातीला डॉ.आ.ह.साळुंखे, प्रा.रा.ग.जाधव व किशोर बेडकिहाळ हे अकादमीचे निमंत्रक होते. आजमितीला अकादमीची वाटचाल पुढे दिलेल्या रचनेप्रमाणे चालू आहे. अकादमी कार्यकारिणी रचना पुढीलप्रमाणे[१८१]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी**

अध्यक्ष : प्रा.डॉ.एन.डी.पाटील

कार्याध्यक्ष: किशोर बेडकिहाळ उपाध्यक्ष: प्रा.डॉ.भा.ल.भोळ

कार्यवाह : दिनकर झिंब्रे सहकार्यवाह : अशोक काळे कोषाध्यक्ष : प्रा.एम.ए.शेख

कार्यकारिणी सदस्य – प्रा.फक्रुद्‌दिन बेन्नूर प्रा.पुष्पा भावे प्रा.आण्णासाहेब होवाळे प्रा.डॉ.अशोक चौसाळकर श्री. प्रमोद कोपार्डे प्रा.डॉ.यशवंत सुमंत श्री. प्रकाश कांबळे

**अकादमीची गरज:**

२० व्या शतकात मानवी जीवनात, समाजात क्रांतिकारक बदल घडले. समाज, संस्कृतीवर त्याचा परिणाम झाला. म्हणून धर्मकारण, राजकारण, समाजकारण व संस्कृती या सर्व क्षेत्रातील घडामोडींचा अभ्यास अकादमीत येतो. यातूनच 'विचारवेध' याचा जन्म झाला.[१८२] विचारवेध संमेलनाची सुरूवात विसाव्या शतकातील धर्मचिंतनाने झाली. पुढील संमेलनात 'परिवर्तन चळवळीची सामाजिक फलश्रुती', 'स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारण', 'भारतीय अर्थकारणाची बदलती क्षितीजे', 'विसाव्या शतकातील जातीव्यवस्था', 'विसाचे शतक आणि भारतातील समाजविचार', 'विसाव्या शतकातील संस्कृती विचार', '

भारतातील समाजपरिवर्तन' संकल्पना प्रक्रिया व व्यवहार', 'भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने', ' जागतिकीकरण व भारतीय समाजासमोरील यक्षप्रश्न', 'समकालीन शिक्षण: अपेक्षा आणि वास्तव', 'विकास, वाटचाल आणि समस्या' , 'वंचित समुह : सद्यस्थिती आणि भवितव्य' इत्यादी विषयांची पूर्णपणे चर्चा झाली. या विविध संमेलनाचे अध्यक्षपद प्रा.मे.पु.रेगे, प्रा.डॉ.रावसाहेब कसबे, प्रा.डॉ.य.दि.फडके, प्रा.बापट, प्रा.नलिनी पंडित, प्रा.राम बापट, प्रा.डॉ.भा. ल. भोळे, प्रा.आ.ह.साळुंखे, प्रा.गोपाल गुरू, डॉ.एन.डी.पाटील, श्री.वसंत पळशीकर, प्रा.डॉ.रमेस पानसे, साथी बगाराम तुळपुळे, प्रा.डॉ.यशवंत सुमंत इ.विचारवंतांनी उपस्थित राहून भुषविले आहे.

**संमेलन उद्देश :**

संमेलन भरविण्याचा मुख्य उद्देश परिवर्तन होय. 'तळागाळातील सामान्य माणूस' हा या विचारचिंतनाचा केंद्रबिंदू असतो. मार्क्स, फुले, गांधी, आंबेडकर यांच्या विचाराचे प्रामाण्य राखले जाते.[१८३]

**३.४.३ डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी उपक्रम :** १.वार्षिक साहित्य चर्चा २.विचार संमेलने.

**१.वार्षिक साहित्य चर्चा :**

साहित्य चर्चासत्र सातारा येथे गेली तेरा वर्षे होत आहे. विविध साहित्यिकांच्या कलाकृती, साहित्य व सामाजिक चळवळ, विविध साहित्य कलाकृतीवर चर्चा, मराठीतील नामवंत लेखक, समीक्षक, नवोदित लेखक, साहित्य अभ्यासक या साहित्यचर्चेला आवर्जुन हजेरी लावतात व साहित्यचर्चेत सहभाग घेतात.

**२.विचार संमेलने :**

विचार संमेलने पुढीलप्रमाणे झाली[१८४] संकलन: बेडकिहाळ किशोर, विचारवेध संमेलन, खंड १, पृ.६

| **अ.न.** | **विचार संमेलन विषय** | **स्थळ** | **दिनांक** | **अध्यक्षपद** |
|---|---|---|---|---|
| १ | विसाव्या शतकातील धर्मचिंतन: तत्वज्ञानात्मक पार्श्वभूमी | सातारा | १९.०२.१९९४ | प्रा.मे.पु.रेगे |
| २ | परिवर्तन सामाजिक चळवळीची फलश्रुती | लातूर | ०७.१२.१९९५ | प्रा.डॉ.रावसाहेब कसबे |
| ३ | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारण | इचलकरंजी | २५.०५.१९९६ | प्रा.डॉ.य.दि.फडके |
| ४ | भांडवलशाहीच्या बदलत्या दिशा आणि पुरोगामी जबाबदाऱ्या | नाशिक | २७.१२.१९९६ | प्रा.राम बापट |
| ५ | विसाव्या शतकातील जातीव्यवस्था | औरंगाबाद | २८.११.१९९७ | प्रा.नलिनी पंडित |
| ६ | विसावे शतक आणि भारतातील समता विचार | सोलापूर | २७.११.१९९८ | प्रा.डॉ.भा.ल.भोळे |
| ७ | सांस्कृतिक इतिहासाची पुनर्मांडणी करूया | बेळगाव | १७.१२.१९९९ | प्रा.आ.ह.साळुंखे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | भारतीय सामाजिक बदल विशिष्टतेकडून वैश्विकतेकडे | सावंतवाडी | १५.१२.२००० | प्रा.गोपाल गुरू |
| ९ | नवसाम्राज्यवादी युगातील भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने | परभणी | १४.१२.२००१ | डॉ.एन.डी.पाटील |
| १० | जागतिकीकरण व भारतीय समाजासमोरील यक्षप्रश्न | वर्धा | २०.१२.२००२ | श्री.वसंत पळशीकर |
| ११ | समकालीन शिक्षण: वास्तव आणि अपेक्षा | वाशी नवी मुंबई | २६.२७.२८. १२.२००३ | प्रा.डॉ.रमेश पानसे |
| १२ | विकास, वाटचाल आणि समस्या | बार्शी | २६.२७.२८. ११.२००४ | बगाराम तुळपुळे |
| १३ | वंचित समुह : सद्यस्थिती आणि भवितव्य | मुंबई | २३.२४.२५. १२.२००५ | प्रा.डॉ.यशवंत सुमंत |
| १४ | भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीचे बदलते आयाम | शिरूर | १५.१६.१७. १२२००६ | डॉ.छाया दातार |
| १५ | एकविसाव्या शतकातील भारत | सातारा | २८.२९.३०. १२.२००७ | डॉ.आनंद तेलतुंबडे |

**३.४.४ विचारवेध संमेलन : साध्य व महत्व :**

सहाव्या विचारवेध संमेलनाचे अध्यक्ष प्रा.डॉ.भा.ल.भोळे विचारवेध संमेलनाला हिरवळीची उपमा देतात. ते म्हणतात, '' वैचारिक क्षेत्रात सगळीकडे रखरखीतपणा आढळून येतो. अशा वेळी विचारवेध संमेलने हिरवळीचा दिलासा देतात.''[१८५]

**विचारवेध संमेलन : मराठी विचार विश्वात रूजलेला तोलामोलाचा विचार :**

विचारवेध संमेलन ही घटना विचारविश्वात घट्टपणे रूजली आहे. 'विचारवेध' हा शब्द आता परका न वाटता तो आपलासा वाटतो. विचारवेध संमेलनातील निवडक निबंधाचा संग्रह 'शतकानंतरच्या वळणावर' या ग्रंथरूपाने आंबेडकर अकादमी, सातारा व्दारे दि.१० जून २००६ रोजी प्रसिध्द करण्यात आला. आतापर्यंत पंधरा विचारवेध संमेलनातून साठ ते सत्तर निबंधाची मांडणी झाली. विषय व आशय सर्वच सारख्या गुणवत्तेचे, तोलामोलाचे व सर्वसामान्याच्या विकासाचे आहेत. निबंधाचे वैशिष्टये असे सांगता येईल की एकाच विषयावरील भिन्न भिन्न पैलू वाचायला मिळतात, अनुभवता येतात.निबंधाचे दुसरे वैशिष्टय म्हणजे निबंधाला विसाव्या शतकातील चर्चाविश्वाची परिभाषा लाभली आहे.[१८६]

डॉ.सुहास पळशीकर यांच्या निबंधात जात, प्रदेशवाद आणि भारतातील लोकशाही राजकारण यांचा सहसंबंध तोलामोलाचा सूक्ष्म वाटतो. डॉ. प्रदीप पाटकर यांचेसारखा मनोविकारतज्ञ मानसशास्त्रज्ञ राजकीय

संदर्भांत आजच्या विविध प्रश्नांची उकल करतो. श्री.वसंत पळशीकर व छाया दातार यांच्या निबंधातून पर्यायी उपाय स्पष्ट केलेला दिसतो. डॉ.यशवंत सुमंत यांच्या 'बहुजनवादी राजकारण' या निबंधात बहुजनांची दिशा व योगदान स्पष्ट होते. देश आपली जलनिती जाहीर करतो. ही मानवाची समस्या, त्यातून उपाय, दुष्काळ व विकास यांचा अंतरसंबंध स्पष्ट करणारा श्री द.ता.देसाई यांचा निबंध जलविषयक धोरण स्पष्ट करतो.

डॉ.भा.ल.भोळे यांच्या 'भारतीय राष्ट्रनिर्मितीचे तत्ववैज्ञानिक व सामाजिक आधार' या निबंधात ऐतिहासिक दृष्टीकोण व्यक्त झाला आहे. भारतीय समाजात 'जात' वास्तव प्रगतीच्या आड आल्याचे दिसते. विसाच्या शतकाच्या जातीसंस्थेवर काय परिणाम झाला आहे. या सर्व बाबींची चर्चा डॉ.कुमार शिराळकर यांच्या जातिव्यवस्थेवरील निबंधात येत आहे. नव्या वास्तवातील आधार गटांचा शोध घेतल्याशिवाय क्रांतीचे पाऊल पडणार नाही. या विचाराकडे डॉ.आनंद तेलतुंबडे आपले लक्ष्य वेधून घेतात. प्रा.जयदेव डोळे यांनी ग्राहककेंद्री विचार व्यक्त केला आहे. प्रसारमाध्यमांचे स्वरूप, आर्थिक हितसंबंध व ग्राहक यांचा परस्परसंबंध प्रा.जयदेव डोळे यांच्या निबंधातून व्यक्त झाला आहे.[१८७]

सोलापूरच्या सहाव्या विचारवेध संमेलनात स्त्री–प्रश्नांची चिकित्सा केली आहे. या संदर्भांत गांधी, फुले, आंबेडकर यांच्या भूमिकेच्या अंगाने स्त्री समस्येवर, स्त्री प्रश्नावर चर्चा केली आहे. श्रीमती रेखा ठाकूर यांनी गांधीजीच्या विचारातून स्त्री प्रश्नांची मांडणी केली आहे. फुले, आंबेडकर यांच्या विचाराचा संदर्भ घेतल्याशिवाय स्त्री चळवळ पुढे जाणार नाही. याची जाणीव श्रीमती लता प्र.म. यांच्या निबंधातून व्यक्त झाली आहे.[१८८] विचारवेध संमेलनातून समाजकारण, अर्थकारण, राजकारण, धर्मकारण व संस्कृती, विकास व पर्यावरण व शिक्षण या विषयावरची चर्चा निबंध प्रस्तुत केले गेले आहेत. विचारवेध संमेलनातील अध्यक्षीय भाषणे खंड १, विचारवेध अध्यक्षीय भाषणे खंड २, शतकांतराच्या वळणावर, परिवर्तन विचार इ.ग्रंथ प्रकाशित केले गेले आहेत. जेष्ठ विचारवंत डॉ.गोपाळ गुरू, श्रीमती छाया दातार, श्री.कुमार शिराळकर, श्रीमती लता प्र.म., श्रीमती रेखा ठाकूर, श्री.आनंद तेलतुंबडे, डॉ.राजेश्वरी देशपांडे, श्री.राजीव साने, प्रा.सदानंद वर्दे, प्रा.जयदेव डोळे, डॉ.श्रीनिवास खांदेवाले, डॉ.भा.ल.भोळे, डॉ.यशवंत सुमंत, डॉ.सुहास पळशीकर, डॉ.सुबोध वागळे, डॉ.अशोक चौसाळकर, प्रा.पुष्पा भावे, डॉ.विणा आलासे, श्री.वसंत पळशीकर, श्रीमती मेधा पाटकर, श्री. दत्ता देसाई, श्री.अरविंद वैद्य, डॉ.प्रदीप पाटकर, डॉ.चिंतामणी देशमुख, प्रा.प्रविण चव्हाण, किशोर बेडकिहाळ इ. विचारवंतांनी सहभाग घेऊन आपले विचार व्यक्त केले आहेत.[१८९] या संग्रहामध्ये मार्क्सवाद, समाजवाद, जागतिकीकरण या विषयांचेबरोबर फुले, आंबेडकरी विचार भूमिका लेखकांनी चांगल्या पध्दतीने मांडली आहे. हा विचार वास्तवाशी जुळतो. यात विचारांची 'अस्सलता' आहे.

**३.४.५ अकादमी ध्येय व उदि्दष्ये** :

१.राजकीय, सामाजिक युवक सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण करणे. २.युवकांकरिता कार्यशाळेचे आयोजन करणे.

३.बदलत्या समाजरचनेचा अभ्यास करणे, समाजरचनेच्या अभ्यास करण्यासाठी विद्यापीठे मान्यवर संशोधन संस्थांच्या सहकार्याने संशोधन प्रकल्प हाती घेणे. ४.राजकीय व सामाजिक चळवळींचा अभ्यास करणे.

५. सर्वसामान्य युवकांना देशापुढील समस्यांचे आकलन करून देणे याकरिता चर्चासत्रे, व्याख्याने, कार्यशाळांचे आयोजन करणे.

६. शिक्षण, साहित्य व संस्कृती या क्षेत्रातील समस्यांचा अभ्यास करणे. विविध क्षेत्रातील विचारवंत, थोर साहित्यिक व शिक्षणतज्ञ मंडळींच्या ज्ञानांचा अनुभवांचा लाभ समाजाला करून देणे.

७. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील वैचारिक क्षेत्रातील संस्थेच्या सहकार्यानी 'विचारवेध' संमेलने भरविणे.

८.साहित्य, वैचारिक लेख व पुस्तिका प्रकाशित करणे.नियतकालिके चालविणे.

९. शिक्षण, साहित्य व संस्कृती या क्षेत्रातील समस्यांचा अभ्यास करणे. १०.सुसज्ज ग्रंथालय उभारणे.

११.वैचारिक ग्रंथासाठी व अन्य बाबीकरीता पुरस्कार योजना कार्यवाहीत आणणे.

**आंबेडकर अकादमी, सातारा व्दारा आयोजित चर्चासत्रे/कार्यशाळा/शिबीरे** :

अकादमीच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक व साहित्यिक विषयावर युवकांचेसाठी चर्चासत्रे, कार्यशाळा, शिबीरांचे आयोजनातून तरूणांच्यात आंबेडकरी, शाहू, फुले विचार येऊ पहात आहेत. हे तर आंबेडकरी अकादमीचे उद्दिष्ट आहे.[१९०]

**चर्चासत्रे/कार्यशाळा/शिबीरे** :

| अ. न. | विषय | मांडणी |
|---|---|---|
| १ | विसाव्या शतकातील धर्मचिंतन: तत्वज्ञानात्मक पार्श्वभूमी | प्रा.राजेंद्र व्होरा प्रा.सुहास पळशीकर, प्रा.गोपाळ गुरू (सर्व पुणे ) व किशोर बेडकिहाळ (सातारा) |
| २ | फाळणीचे राजकारण | प्रा.राम बापट, प्रा.फकरूद्दीन बेन्नूर, सोलापूर, साथी विनायक कुलकर्णी पुणे |
| ३ | सोव्हिएट रशियातील घडामोडीचा अन्वयार्थ | प्रा.राम बापट, पुणे |
| ४ | ग्रामीण महिलाआरोग्य/व्यक्तिमत्व विकास/ संघटन व चळवळ | ॲड.अजित कुलकर्णी, पुणे, ॲड.वर्षा देशपांडे सातारा, अभय कांता |
| ५ | स्वातंत्र्योत्तर मुस्लीम राजकारण | श्री.असगरअली इंजिनियर, मुंबई, प्रा.फकरूद्दीन बेन्नूर, सोलापूर, प्रा.सूर्यनारायण रणसुभे, लातूर, प्रकाश बाळ, मुंबई |
| ६ | धर्म संकल्पनेची उत्क्रांती | प्रा.मे.पु.रेगे, मुंबई |
| ७ | भारतीय राज्यसंस्थेचा विकास व स्वरूप | प्रा.अशोक चौसाळकर |

| | | |
|---|---|---|
| ८ | म.फुले, न्या.रानडे,वि.रा.शिंदे व डॉ.आंबेडकर यांची धर्मसंकल्पना (अनिसच्या सहकार्याने) | प्रा.राम बापट, पुणे |
| ९ | नवोदित लेखंकासाठी कार्यशाळा | श्री.म.वि.कोल्हटकर, श्री.शंकर सारडा, श्री.प्रमोद कोपार्डे (सर्व सातारा) |
| १० | गांधी विचार | श्री.वसंत पळशीकर, वाई, प्रा.राम बापट, पुणे |
| ११ | स्त्रीविषयक कायदयाची पुर्नरचना | प्रा.सत्यरंजन साठे, प्रा.वैजयंती जोशी, प्रा.जया सागडे (सर्व पुणे), ॲड.निशा शिवूरकर, संगमनेर |
| १२ | नवीन आर्थिक धोरण व दारिद्र्य निर्मूलनाचा प्रश्न | श्री.बगाराम तुळपुळे, डॉ.भालचंद्र मुणगेकर (सर्व मुंबई), श्री.आनंद करंदीकर, पुणे, प्रा.श्रीनिवास खांदेवाले, नागपूर, वसंत पळशीकर, वाई |
| १३ | गांधीवादाचा मराठी साहित्यावरील परिणाम | प्रा.गो.म.कुलकर्णी, पुणे, प्रा.सीताराम रायकर, वाई, प्रा.गो.मा.पवार, सोलापूर, प्रा.चंद्रशेखर जहागिरदार, कोल्हापूर, श्री.विनय हर्डीकर, पुणे |
| १४ | हिंदुत्वाचे राजकारण | प्रा.अशोक चौसाळकर, कोल्हापूर, प्रा.नलिनी पंडीत, मुंबई, प्रा.श्रावण देवरे, धुळे, प्रा.सुहास पळशीकर, पुणे |
| १५ | शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन | प्रा.देवदत्त दाभोळकर, सातारा, प्रा.राम शेवाळकर, नागपूर |
| १६ | विधानसभा निवडणुक विश्लेषण | श्रीमती रेखा ठाकूर, मुंबई, प्रा.राजेंद्र व्होरा, पुणे, श्री.शांताराम पंदेरे, औरंगाबाद, कॉ.शांताराम गरूड, इचलकरंजी |
| १७ | दलित, भटके, मुस्लिम, आदिवासी व पर्यायी विकास निती | प्रा.राम बापट, श्री.दत्ता सावळे, पंढरपूर, श्री.गजानन खातू , मुंबई, प्रा.राजेंद्र कुंभार, कराड, अन्वर राजन, पुणे |
| १८ | महिला आरक्षण विधेयक स्त्री अभ्यास केंद्राच्या सहकार्याने | प्रा.शमा दलवाई, श्रीमती मृणाल ठाकूर, प्रा.पुष्पा भावे, श्रीमती रेखा ठाकूर (सर्व मुंबई), श्री.रा.प.नेने, श्रीमती विद्या बाळ (सर्व पुणे) |

**३.४.७ व्याख्याने** :

| अ. न. | विषय | वक्ते |
|---|---|---|
| १ | सध्याची सामाजिक व वैचारिक आव्हाने (अकादमीच्या उदघाटन समारंभातील प्रमुख भाषण) | प्रा.य.दि.फडके (मुंबई) |

| | | |
|---|---|---|
| २ | बँक घोटाळा | श्री.प्र.न.जोशी, सातारा (चेअरमन, युनायटेड वेस्टर्न बँक, सातारा) |
| ३ | नर्मदा आंदोलनाची सद्यस्थिती | श्रीमती मेधा पाटकर |
| ४ | कुटुंब संस्थेची पुनर्घटना | श्रीमती विद्या बाळ (पुणे) |
| ५ | नवीन आर्थिक धोरण | श्री.बगाराम तुळपुळे(मुंबई) |
| ६ | वैज्ञानिक दृष्टीकोन | डॉ.जयंत नारळीकर |
| ७ | विश्वाच्या उत्पत्तीचे सिध्दांत | श्री.वसंत पळशीकर, वाई |
| ८ | अयोध्या विवाद : हिंदु विरूध्द हिंदु | अरूण ठाकूर, नाशिक |
| ९ | डंकेल करार | डॉ.सुलभा ब्रम्हे, पुणे |
| १० | हिंदु अस्मितेचे राजकारण २ व्याख्याने | श्री.वसंत पळशीकर, वाई |
| ११ | एडसची समस्या | डॉ.सुरेश महाजन, सातारा |
| १२ | भारतीय राष्ट्रवादाचे भवितव्य | प्रा.गो.पु.देशपांडे, नवी दिल्ली |
| १३ | धर्म व राजकारण फारकत विधेयक | प्रा.अशोक चौसाळकर, कोल्हापूर |
| १४ | भूकंप | डॉ.बी.जी.देशपांडे, मुंबई |
| १५ | प्रसार माध्यमे आणि मूलतत्वाचा मुकाबला | श्री.सदा डुंबरे, पुणे |
| १६ | धर्म आणि राजकारण | प्रा.एन.डी.पाटील, मुंबई |
| १७ | केंद्रीय अर्थसंकल्प | प्रा.अजित अभ्यंकर |
| १८ | उत्तर भारताचा निवडणुक निकालाचा अन्वयार्थ | श्री.जगन फडणीस, कोल्हापूर |
| १९ | काश्मिर समस्या दोन व्याख्याने | श्री.प्रकाश बाळ, नि.संपादक, लोकसत्ता, मुंबई |
| २० | माध्यमे व दहशतवाद | श्री.निखिल वागळे (संपादक, दै.महानगर मुंबई) |
| २१ | रामायण व महाभारताचे ऐतिहासिक मूल्यमापन २ व्याख्याने | श्री.यशवंत रायकर, मुंबई |
| २२ | विनोबा भावे जीवन व कार्य | श्री. राम शेवाळकर, मुंबई |
| २३ | महात्मा गांधी जीवन व कार्य | श्री.देवदत्त दाभोळकर, सातारा |
| २४ | खगोलशास्त्रापुढील आव्हाने | प्रा.मोहन आपटे, मुंबई |
| २५ | जाती, वर्ग, आणि ग्रामीण भारतातील परिवर्तन | प्रा.द.ना.धनागरे, कुलगुरू शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |

| | | |
|---|---|---|
| २६ | वारकरी चळवळ व सामाजिक परिवर्तन | प्रा.सदानंद मोरे, पुणे |
| २७ | श्रीकृष्ण आयोगाचा अहवाल | श्री.रा.प.नेने, पुणे |
| २८ | सामाजिक चळवळीचे आकलन | प्रा.यशवंत सुमंत, पुणे |
| २९ | स्वातंत्र्योत्तर भारतातील प्रशासन व भारतीय नेतृत्व | श्री.माधव गोडबोले, माजी केंद्रीय गृहसचिव, पुणे |
| ३० | गांधीजींचे खुनी महाराष्ट्रातीलच का ? | श्री.जगन फडणीस, कोल्हापूर |
| ३१ | जागतिकीकरण व त्याचे परिणाम | डॉ.एस.पी.शुक्ल, माजी केंद्रीय गृहसचिव, पुणे |
| ३२ | कम्युनिस्ट चळवळीचे भवितव्य २ व्याख्याने | श्री.कुमार केतकर, संपादक, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई |
| ३३ | बहुजनवादी राजकारण | प्रा.हर्ष जगताप, पुणे |
| ३४ | प्रसारमाध्यमे व स्त्री प्रतिमा | श्री.समर नखाते पुणे |
| ३५ | स्वातंत्र्योत्तर भारतातील संस्कृतीकरण | प्रा.पुष्पा भावे (मुंबई) |
| ३६ | नेताजी सुभाषचंद्र बोस | प्रा.य.दि.फडके (मुंबई) |
| ३७ | संत तुकाराम दर्शन | प्रा.सदानंद मोरे, पुणे व दिलीप चित्रे, पुणे |
| ३८ | आधुनिक महाराष्ट्रातील धर्मचिंतन | प्रा.यशवंत सुमंत, प्रा.सदानंद मोरे, पुणे, प्रा.आ.ह.साळुंखे |
| ३९ | इस्लाम आणि सामाजिक परिवर्तन | श्री.असगर अली इंजिनियर, मुंबई |
| ४० | मानव व धर्म चिंतन | प्रा.रावसाहेब कसबे, संगमनेर |
| ४१ | मिळून साऱ्याजणी दिवाळी ९७ च्या अंकांचा प्रकाशन समारंभ | श्रीमती विद्या बाळ (पुणे), श्रीमती मीरा बोरवणकर, जिल्हा पोलिस प्रमुख, श्रीमती कमल वडगावकर, जिल्हा न्यायमूर्ती, श्रीमती स्वाती साठे, जिल्हा कारागृह प्रमुख, श्रीमती वर्षा दिघे, जिल्हा माहिती अधिकारी, अध्यक्ष प्रा.आ.ह.साळुंखे |
| ४२ | जागतिकीकरणाची आव्हाने आणि आपण | डॉ.सुलभा ब्रम्हे, पुणे |
| ४३ | स्त्री मुक्ती माझी कल्पना | डॉ.अनिल अवचट |

| | | |
|---|---|---|
| ४४ | कळ कादंबरी मराठा कादंबरीचा पुढचा टप्पा | डॉ.चंद्रशेखर जहागिरदार, कोल्हापूर, श्याम मनोहर यांच्या कादंबरीचा प्रकाशन समारंभ हस्ते वसंत पळशीकर, वाई |
| ४५ | आमच्या धडावर आमचे डोके | प्रा.आ.ह.साळुंखेंच्या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ हस्ते वसंत पळशीकर, वाई |

अकादमी कार्य अहवाल

आंबेडकर अकादमी, सातारा ध्येय व उद्देश क्र.४ नुसार विविध समस्यांचे आकलन सर्वसामान्यांना करून देण्यासाठी व्यारूयाने आयोजित करते.[१९१]

**पुरस्कार योजना व सर्वेक्षण** :

कै.रा.भि.जोशी 'धर्मचिंतन' पुरस्कार. आधुनिक दृष्टीकोणातून धर्मचिंतनावर लेखन करणाऱ्या विचारवंतांसाठी हा पुरस्कार कै.जोशी यांच्या कन्या निलीमा भावे मुंबई यांच्या सहयोगातून पुरस्कार दिला जातो. अकादमीच्याव्दारा खालील विषयावर सर्वेक्षण करण्यात आले.[१९२]

१.परित्यक्तांचा प्रश्न सातारा जिल्हा – रंजना औटे, सातारा

२.कमवत्या स्त्रियांच्या बदलत्या जाणीवा – अभय कांता व मुक्ता दाभोळकर, सातारा

३.पुरूषांच्या स्त्रिविषयक जाणीवा – अभय कांता व मुक्ता दाभोळकर, सातारा

| वर्ष | लेखन / साहित्यप्रकार | मांडणी |
|---|---|---|
| १९९२ | श्री.रंगनाथ पठारे यांचे साहित्य | प्रा.गो.म.कुलकर्णी पुणे, म.द.हातकलंगलेकर सांगली |
| १९९३ | श्रीमती गौरी देशपांडे यांचे साहित्य | प्रा.अविनाश सप्रे सांगली, प्रा.वासुदेव सावंत गोवा, प्रा.रेखा साने इनामदार पुणे, प्रा.कमल देसाई पुणे |
| १९९४ | श्री.अरूण साधू यांचे साहित्य | प्रा.राजन गवस गारगोटी, प्रा.विद्युत भागवत पुणे |
| १९९४ | १९६० नंतरची मराठी कथा (महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ यांच्या सहकार्याने) | प्रा.रूक्मीणी रॉय, प्रा.पुष्पा भावे, प्रा.प्रभा गणोरकर, प्रा.वसंत आबाजी डहाके सर्व मुंबई, प्रा.चंद्रशेखर जहागीरदार कोल्हापूर, श्री.विनय हर्डीकर, प्रा.सुहास पळशीकर |
| १९९५ | १९८० नंतरची मराठी कविता | प्रा.चंद्रकांत पाटील औरंगाबाद, प्रा.नारायण कुलकर्णी कवठेकर |
| १९९६ | श्री. शाम मनोहर यांचे साहित्य | श्री.सतीश काळसेकर मुंबई, प्रा.चंद्रकांत कुलकर्णी |
| १९९८ | स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी | प्रा.प्रज्ञा लोखंडे मुंबई, प्रा.गो.पु.देशपांडे नवी दिल्ली, श्री.नचिकेत पटवर्धन पुणे, श्री.सतीश तांबे मुंबई, प्रा.निशिकांत ठकार सोलापूर, डॉ.श्रीराम लागू मुंबई, प्रा.सदानंद मोरे पुणे, श्री. प्रवीण चव्हाण सातारा, प्रा.उदय नारकर कोल्हापूर, दीनानाथ मनोहर पुणे, प्रा.प्रभाकर बागल मनमाड, श्री. वसंत पळशीकर वाई, प्रा.तारा |

| | | |
|---|---|---|
| | | भवाळकर सांगली, प्रा.हरीश्चंद्र थोरात मुंबई, श्री. कमलाकर नाडकर्णी मुंबई, श्री.प्रशांत दळवी मुंबई, श्री.रामनाथ चव्हाण पुणे, प्रा.पुष्पा राजापुरे मुंबई, श्री.नारायण सुर्वे मुंबई, प्रा.य.दि.फडके मुंबई, श्रीमती सानिया बंगलोर, श्री.वामन होवाळ मुंबई, श्री.रंगनाथ पठारे संगमनेर, श्री.सुनिल तांबे मुंबई, श्री.राम कोलारकर पुणे |

अकादमी कार्य अहवाल

साहित्य चर्चासत्रासाठी आजवर र.शि.संस्था सातारा आयुर्विमा महामंडळ, मराठा सहकारी बँक हॉटेल यांचे अर्थसहाय्य झाले.[१९३]

**विचारवेध संमेलन** :

अकादमीचा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम म्हणजे विचारवेध संमेलने होय. जून १९९२ मध्ये अकादमीची स्थापना झाल्यापासून विविध विषयावर चर्चासत्रे, कार्यशाळा, एकदिवसीय शिबीरे, व्याख्याने आयोजित करून अकादमी प्रबोधन चळवळ गतीमान करण्याचा प्रयत्न करीत आहे. आजपर्यंत १५ विचारवेध संमेलने झाली. या उपक्रमाला शिवाजी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त यादीत मान्यता आहे.

**विविध संमेलनातील परिसंवाद विषय** :

संमेलन १ १.राजकारणातील धर्माचा प्रभाव
२.लोकांच्या धार्मिकतेमुळे जमातवादाला खतपाणी मिळते काय ?
३.भारतीय धर्मनिरपेक्षता नकली किती ? असली किती ?
४.विविध धर्मातील नवे प्रवाह

संमेलन २ १.स्त्री चळवळीची वाटचाल
२.दलित, आदिवासी, भटके विमुक्त व ओबीसी यांच्या चळवळी
३.श्रमिकांची चळवळ आणि सामाजिक परिवर्तन ४.सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ
५.विविध परिवर्तनवादी चळवळी

संमेलन ३ १.आर्थिक धोरणाचे राजकीय परिणाम २.बहुजनवादी राजकारण
३.भारतातील राष्ट्रनिर्मितीचे सामाजिक व वैचारिक आधार
४.लोकसभा निवडणुका विश्लेषण

संमेलन ४ १.भांडवलशाही व समाजवादाचे बदलते स्वरूप २.असमान विनिमयाचे सिध्दांत
३.जागतिकीकरण आपला प्रतिसाद ४.सरकारी नियंत्रणे अपाय व उपाय
५.ग्रामीण अर्थकारण ६.आर्थिक विकास व जनसंघटनांची भूमिका
७.औद्योगिक संस्कृतीची समीक्षा मानवीय व पर्यावरणीय

संमेलन ५ १.२०व्या शतकातील जातीविषयक सिंध्दांतावरील भर २.धर्म व जात संबंध

३.जातीव्यवस्थेचे बदलते स्वरूप  ४.जाती आणि राजकारण

५.जातीनिर्मूलनाच्या विविध चळवळी

संमेलन ६  १.फुले आंबेडकरी विचार (जातीनिर्मूलन स्त्री विषयक विचार)

२.गांधी विचार (जातीवर्णविषयक विचार स्त्रीप्रश्न विषयक विचार स्वराज्य संकल्पना)

३.मार्क्सवाद(भारतीय इतिहास आणि परंपरांचे मूल्यमापन जाती व वर्ग भारतीय भांडवलशाहीचे आकलन)

४.लोकशाही समाजवाद (नेहरूप्रणीत समाजवाद लोहिया विचार आचार्य जावडेकर विचार)

**विचारवेध संमेलन : सहभागी विचारवंत व मान्यवर :**

फादर फ्रांसिस दिब्रेटो वसई, प्रा.सुहास पळशीकर पुणे, प्रा. गंगाधर मोरजे अहमदनगर, श्री.अरविंद लेले पुणे, प्रा.यशवंत सुमंत पुणे, श्री.अब्दुल कादर मुकादम मुंबई, प्रा.वसंत मून मुंबई, डॉ.श्रीराम लागू मुंबई, रजिया पटेल पुणे, श्री. रमेश पतंगे मुंबई, श्री.निखील वागळे मुंबई, प्रा.अशोक चौसाळकर कोल्हापूर, कॉ.गोविंद पानसरे कोल्हापूर, आचार्य शांताराम गरूड इचलकरंजी, श्री. अन्वर राजन पुणे, डॉ.छाया दातार मुंबई, निशा शिवूरकर संगमनेर, डॉ.राजेंद्र व्होरा पुणे, डॉ.गोपाळ गुरू पुणे, श्री.वहरू सोनावणे शहादा, श्री.शांताराम पंदेरे औरंगाबाद, श्री.उत्तम कांबळे नाशिक, श्री.कुमार केतकर मुंबई, श्री.कुमार शिराळकर शहादा, श्री.राजीव साने पुणे, श्री. भालचंद्र कानगो औरंगाबाद, डॉ.नरेंद्र दाभोळकर सातारा, श्री. सुरेश धोपधरकर मुंबई, प्रा.डॉ.एन.डी.पाटील मुंबई, श्री.हरी नरके पुणे, प्रा.ज.रा.शिंदे औरंगाबाद, डॉ.जनार्दन वाघमारे नांदेड, प्रा.भालचंद्र मुणगेकर मुंबई, प्रा.पी.बी.पाटील सांगली, साथी पन्नालाल सुराणा आसू, श्री.अर्जुन डांगळे मुंबई, प्रा.सदानंद मोरे पुणे, श्रीमती मेधा पाटकर, प्रा.दिगंबर पाध्ये मुंबई, प्रा.मधू दंडवते नवी दिल्ली, डॉ.नरेंद्र जाधव मुंबई, प्रा.सदानंद वर्दे मुंबई, प्रा.रोहिणी भट सहानी पुणे, श्री.विलास वाघ पुणे, प्रा.श्रीनिवास खांदेवाले नागपूर, श्री.पृथ्वीराज चव्हाण कराड, श्री.रविंद्र महाजन मुंबई, प्रा.अजित अभ्यंकर पुणे, प्रा.अजित गुलाबचंद मुंबई, प्रा.राम कापसे मुंबई, प्रा.निळकंढ रथ, श्री.विलासराव साळुंखे सासवड, श्री.विजया जवांधिया वर्धा, डॉ.बाबा आढाव पुणे, श्री. दत्ता सावळे पंढरपूर, श्री.मिनार पिंपरे मुंबई, श्री.एस.ए.दाभोळकर गारगोटी, श्री.किशोर बेडकिहाळ सातारा, श्री.मिलींद मुरूगकर नाशिक, डॉ.द.ना.धनागरे कोल्हापूर, श्रीमती लता प्र.म. मुंबई, वसंत पळशीकर वाई, प्रा.रेखा ठाकूर मुंबई, प्रा.नरेंद्र बदनोरे सोलापूर, श्री.विलास सोनावणे चिंचवड, प्रा.शमा दलवाई मुंबई, डॉ.रत्नाकर महाजन पुणे, प्रा.विक्रम गायकवाड नाशिक, प्रा.योगेंद्र यादव नवी दिल्ली, कॉ.शरद पाटील धुळे, प्रा.वंदना सोनाळकर औरंगाबाद, ॲड.प्रवीण वाघ औरंगाबाद, डॉ.इम्तियाज अहमद नवी दिल्ली, डॉ.निंबा कृष्ण ठाकरे, प्रा.सुभाष भिंगे लातूर. विचारवेधकरिता वरील मान्यवरांनी आपला बहुमोल वेळ खर्च केला. यांनी मानधनाचा कधीही विचार केला नाही. केवळ समाजप्रबोधन हे पवित्र कार्य समजून त्यांनी विचारवेध संमेलनात आपला सहभाग दिला. रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी वेळोवेळी अकादमीला ज्यावेळी गरज लागली त्यावेळी संस्थेने सहकार्य केले.[१९४]

**आंबेडकर अकादमी सदस्य मंडळ :**

| अ.न. | नाव | पदनाम | व्यवसाय |
|---|---|---|---|
| १ | प्रा.एन.डी.पाटील | अध्यक्ष | शिक्षणतज्ञ व सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा |
| २ | प्रा.य.दि.फडके (मृत) | उपाध्यक्ष | जेष्ठ विचारवंत व राजकीय इतिहासकार, मुंबई |
| ३ | किशोर बेडकिहाळ | कार्याध्यक्ष | समाज प्रबोधन पत्रिकेचे संपादन, सातारा |
| ४ | दिनकर झिंब्रे | कार्यवाह | पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते, सातारा |
| ५ | प्रा.महमूद शेख | सहकार्यवाह | अर्थशास्त्राचे प्राध्यापक, सातारा |
| ६ | अभय कांता | कोषाध्यक्ष | पाक्षिक परिवर्तनाच्या वाटेवरील वाटसरूचे संपादक, सातारा |
| ७ | प्रा.राजेंद्र व्होरा (मृत) | कार्यकारी मंडळ सदस्य | समाज प्रबोधन पत्रिकेचे संपादक, राज्यशास्त्राचे प्राध्यापक, पुणे |
| ८ | प्रा.सुहास पळशीकर | सदस्य | समाज प्रबोधन पत्रिकेचे संपादक, राज्यशास्त्राचे प्राध्यापक, पुणे |
| ९ | प्रा.आण्णासाहेब होवाळे | सदस्य | निवृत्त प्राचार्य, सामाजिक कार्यकर्ते, सातारा |
| १० | प्रा.डॉ.अशोक चौसाळकर | सदस्य | राज्यशास्त्र प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| ११ | श्री. प्रमोद कोपार्डे | सदस्य | कवी व कादंबरीकार, सातारा |
| १२ | प्रा.शोभना जाधव | सदस्य | प्राध्यापिका, इतिहास सातारा |
| १३ | धनंजय कासकर | सदस्य | लघुउद्योजक व सामाजिक कार्यकर्ते |
| १४ | प्रकाश बाळ | सदस्य | निवासी संपादक, दै.लोकसत्ता, मुंबई |
| १५ | प्रा.रावसाहेब कसबे | सदस्य | राज्यशास्त्राचे प्राध्यापक व जेष्ठ विचारवंत, संगमनेर |
| १६ | प्रा.डॉ.यशवंत सुमंत (मृत) | सदस्य | राज्यशास्त्राचे प्राध्यापक, पुणे |
| १७ | प्रा.भालचंद्र मुणगेकर | सदस्य | जेष्ठ अर्थतज्ञ, मुंबई |
| १८ | प्रा.सत्यरंजन साठे (मृत) | सदस्य | जेष्ठ कायदेतज्ञ व पुणे विद्यापीठाचे माजी प्र.कुलगुरू |
| १९ | सुमन दाभोळकर (मृत) | सदस्य | राष्ट्र सेवा दलाच्या जेष्ठ कार्यकर्त्या, सातारा |
| २० | डॉ.नरेंद्र दाभोळकर (मृत) | सदस्य | अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष, सातारा |
| २१ | प्रा.चंद्रशेखर जहागिरदार (मृत) | सदस्य | समीक्षक, इंग्रजीचे प्राध्यापक, कोल्हापूर |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | प्रा.राजन गवस | सदस्य | प्रसिध्द मराठी लेखक, गारगोटी |
| २३ | प्रा.पुष्पा भावे | सदस्य | जेष्ठ मराठी समिक्षीका, मुंबई |
| २४ | प्रा.भा.ल.भोळे (मृत) | सदस्य | राज्यशास्त्राचे प्राध्यापक, नागपूर विद्यापीठ, नागपूर |
| २५ | श्रीमती विद्या बाळ | सदस्य | स्त्री चळवळीच्या जेष्ठ कार्यकर्त्या, संपादक, 'मिळूनी साऱ्याजणी', पुणे |
| २६ | अरूण ठाकूर | सदस्य | राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, नाशिक |
| २७ | माधव साठे (मृत) | सदस्य | राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, मुंबई |
| २८ | महंमद खडस | सदस्य | जेष्ठ राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, मुंबई |
| २९ | प्रा.फक्रुद्दिन बेन्नूर | सदस्य | जेष्ठ विचारवंत व राज्यशास्त्र निवृत्त प्राध्यापक, सोलापूर |
| ३० | बाळासाहेब थोरात (मृत) | सदस्य | राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, सातारा |
| ३१ | अशोक काळे | सदस्य | सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ते, सातारा |
| ३२ | हेमा सोनी | सदस्य | स्त्री पुरूष समता मंचच्या कार्यकर्त्या, सातारा |
| ३३ | सुनिता सरदेशमुख | सदस्य | स्त्री पुरूष समता मंचच्या कार्यकर्त्या, सातारा |
| ३४ | संजीव साने | सदस्य | मुंबई सामाजिक कार्यकर्ता |

### ३.४.९ विसाव्या शतकातील विविध प्रवाहांचा वेध : अकादमीचा उपक्रम :

**संमेलनाची पार्श्वभूमी** : कार्यकर्त्यांचे सहकार्यानी चर्चासत्रे, शिबीरे, व्याख्याने सुरू झाली. मानवी जीवनात विसाव्या शतकानी क्रांतिकारक बदल घडवून आणले. विचारवेध चे पहिले संमेलन १९ व २० फेब्रु.१९९४ रोजी झाले. 'धर्म' हा विषय चर्चेसाठी होता. धर्मचिंतनावर अधिकारवाणीने बोलणारे विचारवंत प्रा.मे.पु.रेगे या विचारवेध संमेलनाचे अध्यक्ष होते. या संमेलनात 'राजकारणातील धार्मिक प्रभाव 'विसाव्या शतकातील विविध धर्मातील नवे प्रवाह', लोकांच्या धार्मिकतेमुळे जमातवादाला खतपाणी मिळते काय? भारतीय धर्मनिरपेक्षता नकली किती? असली किती? या विषयावर परिसंवाद झाले.[१९५] दुसरे संमेलन लातूर येथे घेण्याचा आग्रह धरला. लातूर क्रांतिसिंह नाना पाटील ट्रस्टने या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी उचलली. हे संमेलन ७ व ८ जानेवारी १९९५ रोजी संपन्न झाले. विषय 'परिवर्तनवादी सामाजिक चळवळीची फलश्रुती' असा होता. या संमेलनाचे अध्यक्ष प्रा.रावसाहेब कसबे होते. या संमेलनात स्त्रीयांच्या परिवर्तनवादी विचारांची वाटचाल, दलित, आदिवासी, भटके विमुक्त व ओबीसी यांच्या चळवळी सामाजिक परिवर्तन, सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ, युवक चळवळ, मुस्लीम प्रबोधन चळवळ, ख्रिश्चन प्रबोधन चळवळ व अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ असे परिसंवादाचे विषय होते.[१९६]

तिसरे विचारवेध संमेलन 'इचलकरंजी' येथे झाले. 'स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारण'

असा होता. हे संमेलन २५ व २६ मे १९९६ मध्ये झाले. सदर संमेलन जेष्ठ कार्यकर्ते आचार्य शांताराम गरूड यांच्या 'समाजवादी प्रबोधिनी' सहकार्याने झाले. प्रा.य.दि.फडके अध्यक्षस्थानी होते.

चौथे विचारवेध संमेलन 'नाशिक' येथे झाले. प्रा.राम बापट हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. हे संमेलन २७,२८ व २९ डिसेंबर १९९६ मध्ये झाले. पाचवे संमेलन 'जातीव्यवस्थेवर विचारमंथन सदर संमेलनास विषय 'विसाव्या शतकातील जातीव्यवस्था' हा होता. हे संमेलन २८,२९ व ३० नोव्हेंबर १९९७ रोजी औरंगबाद येथे होते अध्यक्षपदी 'नलीनी पंडित' यांची निवड करण्यात आली होती. या प्रसंगी वर्ग व जात, जातीव्यवस्थेचे बदलते स्वरूप, जाती आणि राजकारण, जातीनिर्मूलनाच्या विविध चळवळी या विषयावर परिसंवाद झाले.[१९७]

सहावे संमेलन दि.२७, २८ व २९ नोव्हें.१९९८ मध्ये सोलापूर येथे झाले. विषय 'विसावे शतक आणि भारतातील समता विचार' असा होता. अध्यक्ष विचारवंत प्रा.भा.ल.भोळे सर होते. या प्रसंगी 'फुले आंबेडकरी विचार', जातीनिर्मूलन स्त्रीविषयक विचार, गांधी विचार, मार्क्सवाद, लोकशाही समाजवाद इ.विषयावर चर्चा झाली.

**३.४.१० विचारवेध संमेलनातून नेमके काय साध्य होते :**

विचारवेध मंथनातून नवनवीन विचारांवा उदय होतो. विचारांचे आदानप्रदान होते. विचारमंथनातून नागरिकांची मते बदलतात. सामाजिक बांधिलकीबाबत अधिक जागृती घडते.[१९८]

**अकादमीच्या माध्यमातून साहित्यचर्चा :**

किशोर बेडकिहाळ व प्रमोद कोपर्डे व इतर यांचे चर्चेतून अकादमीव्दारा साहित्यिकाकरिता काहीतरी उपक्रम आयोजित करावा या चर्चेतून या उपक्रमाला चालना मिळाली. समकालीन लेखक समोर ठेवून तीन दिवसांची समग्र चर्चा ठेवली गेली. यातून पुढे लेखक स्वतः हजर राहिल्यास चांगलेच होईल हा विचार पुढे आला. म्हणजे लेखकांचेबरोबर त्यांचे साहित्यसंदर्भात थेटपणे संवाद साधता येईल. अकादमीने ही कल्पना उचलून धरली व १९९२ च्या ऑगस्टमध्ये रा.रंगनाथ पठारे या समकालीन महत्वाच्या कथा कादंबरीच्या दोन दिवसांची चर्चा आयोजित केली. या चर्चेला नवीन लेखकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सर्वच निबंध लेखकांनी आपले निबंध सादर केले. रा.पठारे नव्या लेखकांच्या प्रश्नांना चांगलीच उत्तरे देत. मनः पूर्वक प्रश्नोत्तर कार्यक्रम होत होता. ही चर्चा सर्वांनाच फार उपयुक्त वाटली.[१९९]

**अकादमीव्दारा उपलब्ध प्रकाशने :**

| अ.न. | पुस्तक | लेखक |
|---|---|---|
| १ | विसाव्याशतकातील धर्मचिंतन(विचारवेध संमेलन सातारा अध्यक्षीय भाषण) | प्रा.मे.पु.रेगे |
| २ | परिवर्तनवादी सामाजिक चळवळीची फलश्रृती(विचारवेध संमेलन लातूर अध्यक्षीय भाषण) | प्रा.रावसाहेब कसबे |

| | | |
|---|---|---|
| ३ | स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारण (विचारवेध संमेलन इचलकरंजी अध्यक्षीय भाषण) | प्रा.य.दि.फडके |
| ४ | डॉ.आंबेडकरांच्या हिंदूकरणाची चिकित्सा | प्रा.सुहास पळशीकर |
| ५ | शिवसेना: निमफॅसिस्ट मोहीनी विद्येचा प्रयोग | प्रा.सुहास पळशीकर |
| ६ | हरवलेला सर्वहारा आणि नव्या आशयाचे आव्हान | राजीव साने |
| ७ | भांडवलशाहीचे बदललेले स्वरूप व पुरोगाम्याची जबाबदारी | प्रा.राम बापट |
| ८ | विसाव्या शतकातील जातीव्यवस्था(विचारवेध संमेलन औरंगाबाद अध्यक्षीय भाषण) | प्रा.नलिनी पंडित |
| ९ | विसावे शतक आणि भारतातील समताविचार(विचारवेध संमेलन सोलापूर अध्यक्षीय भाषण) | प्रा.भा.ल.भोळे |

याखेरीज अलीकडे महाविद्यालयात एकदिवसीय शिबिरे घेतली जातात. छ.शिवाजी कॉलेज, सातारा, पिंपरी चिंचवड पुणे, शिरूर, राजापूर, कोल्हापूर, वाशी इत्यादी ठिकाणी महाविद्यालयात युवकांसाठी आयोजित केली जातात. या चर्चासत्रातून शिबीराचे माध्यमातून निरोगी विचार करणारी पिढी तयार होते. सातारच्या या आंबेडकर अकादमीच्या प्रभावाने सध्या पुणे येथे काही मंडळींच्या विचारात अशी एखादी अकादमी पुणे येथे असावी असा विचार चालू आहे. या विचाराने भारलेले तरूण नवीन विचार समाजाला देण्यासाठी पुढे येत आहे. ही आंबेडकर अकादमीच्या व्यासपीठाची फलश्रुती होय.[२००]

**समारोप :**

जून १९९२ मध्ये या अकादमीची सुरूवात झाली. अकादमीने विविध विषयाची चर्चासत्रे, कार्यशाळा, एकदिवशीय शिबीरे तसेच महाविद्यालयामधून उद्‌बोधक व्याख्याने व चर्चा या माध्यमातून अकादमी प्रबोधन चळवळ पुढे पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रारंभी डॉ.आ.ह.साळुंखे, प्रा.रा.ग.जाधव व किशोर बेडकिहाळ हे या अकादमीचे निमंत्रक होते. थोर विचारवंत डॉ.एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली अकादमीची वाटचाल चालू आहे. डॉ. आंबेडकर अकादमीचे दोन राज्यपातळीवरचे उपक्रम म्हणजे १.वार्षिक साहित्य चर्चा २.विचारवेध संमेलन. साहित्य चर्चा सातारा येथेच गेली १३ वर्षे होत आहे. मराठीतील नामवंत लेखक, समीक्षक, नवोदित लेखक व राजकीय, सामाजिक चळवळीचे अभ्यासक या साहित्य चर्चेला आवर्जून हजर राहतात. डॉ.आंबेडकर अकादमीचे डॉ.एन.डी.पाटील, दिनकर झिंब्रे, अभय कांता, प्रमोद कोपार्डे, श्रीमती सुनिता सामक, सरदेशमुख, अशोक काळे, प्रा.आण्णासाहेब होवाळे, श्री.बाळासाहेब थोरात, प्रा.महमूद शेख यांनी खूप कष्ट घेतले आहेत व अजूनसुध्दा कार्यरत आहेत.

## ३.५ सातारा जिल्हा दलित चळवळ

**प्रस्तावना :**

सर्वप्रथम अस्पृश्यता निर्मूलन करण्याचा प्रारंभ महात्मा जोतीराव फुले यांनी केला. 'सत्यशोधक समाज' नावाची एक क्रांतीकारक चळवळ म.जोतीराव फुले यांनी १८ सप्टेंबर १८७३ मध्ये स्थापन केली. हा वारसा पुढे विठ्ठल रामजी शिंदे यांनी चालविला. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दलित उध्दारासाठी अविरत कष्ट घेतले. कायदे करून पुरोगामी विचार त्यांनी समाजात रूजविला. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या या चळवळीने महाराष्ट्राला चांगलेच बळ दिले. मानवमुक्तीच्या या विचार पठडीतील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ही चळवळ गतीमान केली.

### ३.५.१ परिवर्तन युग :

फुले, शाहू, आंबेडकर विचारांनी सातारा जिल्हाभर परिवर्तन चळवळ सुरू झाली. समतेचा लढा, आंबेडकर अकादमीचे काम, समतेची चळवळ, सातारमध्ये करून सत्यशोधक चळवळ यांनी जिवंत ठेवली. सत्यशोधक समाजाच्या विचारातून छत्रपती राजर्षी शाहू यांच्या कार्याच्या प्रेरणेतून डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्हयातील काले ता.कराड येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. सातारा जिल्हयातील दलित चळवळही फुले, आंबेडकर यांच्या विचाराचा एक भाग आहे. चळवळ या शब्दातून नेमके काय व्यक्त होते. विद्यमान प्रशासन अथवा जीवनपध्दती नाकारून नव्या जीवनपध्दतीसाठी केलेली हालचाल होय.[२०१] सन १९७० नंतरची शिक्षित झालेली पिढी स्वत: चा विकास करण्याचा प्रयत्न करू लागली. आर्थिक प्रगतीचा विचार होऊ लागला. आपण माणूस आहे परंतु आपणाला माणसाप्रमाणे वागणूक मिळत नाही तेव्हा सामाजिक परिवर्तन झाले पाहिजे असे तरूण पिढीला वाटू लागले. माणसाचे हक्क व अधिकार आपणाला मिळाले पाहिजेत अशाकरिता लढे दिले पाहिजेत अशी त्यांची भूमिका झाली. आपल्या हक्कासाठी ध्येयवादी तरूणांनी फुल्यांच्या, आंबेडकरांच्या चळवळीत उडी घेतली. यातूनच पुढे न्यायी हक्कासाठी लढे दिले. या दलित चळवळीत सातारा जिल्हयाचे योगदान चांगलेच आहे. सातारा जिल्हयात दलितांनी केलेल्या सामाजिक व राजकीय चळवळीचा उठाव कसा झाला? या दलित चळवळींचा उदय कसा गतीमान झाला याचा अभ्यास करण्याचा मानस आहे.

**दलित चळवळ अभ्यासाचा उद्देश :**

**दलित चळवळीच्या अभ्यासाची उद्दिष्टये** : १.दलित मंडळीच्या सामाजिक, राजकीय चळवळीचा आढावा घेणे. २.विविध दलित चळवळीचा अभ्यास करणे. ३. दलित चळवळीची माहिती नवीन तरूण पिढीला करून देणे. ४. दलितांचे लढे, चळवळीतील कार्यकर्त्यांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

**दलित चळवळीचा इतिहास :**

अनुसूचित जातींना 'हरिजन' असे म्हटले जाते. हरिजन म्हणजे देवाची लेकरे. इ.स. १९३३ मध्ये महात्मा गांधीजींनी ही संज्ञा दिली. काही नेत्यांना ही आवडली नाही. त्यांना हरिजनापेक्षा 'दलित'म्हणणे

जास्त आवडते.[२०२] हिंदू जातिव्यवस्थेमध्ये अनुसूचितांना अवर्ण म्हटले जाते. चातुर्वण्य व्यवस्थेमध्ये त्यांची गणना व्यवस्थेच्या बाहेर आहे. या शूद्र मंडळींना पेरियल पंचम, अंत्यज असेसुध्दा म्हटले जाते. त्यांची सावली, स्पर्श एवढेच नव्हे तर त्यांचा आवाज हिंदुंना वर्ज्य होता. आज जरी यांना कायदयाने अस्पृश्य मानत नसले तरी प्रत्यक्ष व्यवहारात अजून कित्येकांना स्पृश्य–अस्पृश्य भेद सहन करावा लागतो. आर्य लोकांच्या टोळ्या भारतात आल्या. ते घोडेस्वार होते. त्यांनी येथील अनार्य लोकांच्यावर हुकूमत गाजवली. आपली संस्कृती त्यांच्यावर लादली. आर्यांनी पशुहत्या, यज्ञविधी यातून त्यांचेवर वर्चस्व लादले. अशा प्रकारे हे एतद्देशीय आर्यांचे गुलाम झाले. सदरचा कालखंड गौतम बुध्दांच्या अगोदरचा होता. वर्धमान महावीरांनी यांना अहिंसा तत्व ज्ञात करून दिले. गौतमाने या वर्णव्यवस्थेला विरोध केला.

### ३.५.२ आंबेडकरपूर्व दलित चळवळ :

स्त्रियांचेवर अनेक सामाजिक व धार्मिक बंधने होती. स्त्री शिक्षणास उच्चवर्णियांचा विरोध होता. जातीव्यवस्थेत ब्राह्मणांचे वर्चस्व होते. अस्पृश्य मंडळींना सरकारी नोकरी मिळत नव्हती. रस्तेसफाई, संडास साफ करणे, जोडे शिवणे, मृत जनावरांची कातडी सोलणे ही कामे करावी लागत. वेठबिगारी होती. भाऊ लाड, आचार्य जांभेकर, गोपाळ हरी देशमुख, विष्णूशास्त्री पंडीत, दादोबा तर्खडकर, म.गो.रानडे, डॉ.भांडारकर व जगन्नाथ शंकर शेट या समाजसुधारकांनी धर्मातील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला. जातीभेद नष्ट करण्यासाठी प्रबोधन केले. राजा राममोहन रॉय, आगरकर यांसारख्या समाजसुधारकांनी धार्मिक व सामाजिक संघटना निर्माण केल्या. सतीबंदी, विधवा विवाह, पुनर्विवाह, बालविवाह, स्त्रीशिक्षण इत्यादी बाबींचा या सुधारणेत समावेश होता. हे सर्व समाजसुधारक उच्च वर्गातून पुढे आलेले होते. परंतु खऱ्या अर्थाने बहुजन समाजासाठी व अस्पृश्यांसाठी काम करणारे गोपाळ बाबा वलंगकर ही अस्पृश्य समाजातील पहिली व्यक्ती. त्यांनी इ.स. १८९० या वर्षी ‘अनार्य दोषपरिहार्य मंडळी’ अशी संस्था सुरू केली.[२०३]

### ३.५.३ म.फुले यांच्या सामाजिक सुधारणा :

म.फुले आद्य समाजसुधारक होते. पुणे येथे त्यांनी मुलींसाठी, अस्पृश्यांकरिता स्वतंत्र शाळा काढल्या. विधवांसाठी अनाथाश्रम चालविला. स्त्री उध्दाराचे सर्वांगीण प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे अशी मागणी त्यांनी ब्रिटिशांकडे केली. नोकरशाही, भिक्षुकशाही व सावकार यांच्यावर हल्ले चढविले. दलित व शोषित वर्गाचा कैवार घेऊन त्यांना मानवी हक्क मिळवून देण्यासाठी ते आयुष्यभर झगडले. स्त्री शिक्षण, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, केशवपन इ. प्रश्नावर त्यांनी जोर दिला.

### ३.५.४ सत्यशोधक समाज :

४ सप्टेंबर १८७३ रोजी म.फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना पुणे येथे केली. वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था आणि स्त्रिदास्यत्वाचा शेवट झाल्याखेरीज या समाजातील गुलामगिरी नष्ट होणार नाही. डॉ.आंबेडकर यांच्या विचारानुसार ‘गुलामाला गुलामगिरीची जाणीव झाल्याखेरीज तो गुलामीचे जोखड फेकून

देणार नाही.''   १.सर्व एकाच देवाची लेकरे आहेत. २.देवाला प्रसन्न करण्यासाठी मध्यस्थाची आवश्यकता नाही. ३.मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नाही तर तो गुणानी श्रेष्ठ ठरतो. ४.कोणताही ग्रंथ ईश्वरनिर्मित नाही. धर्मग्रंथ मानवनिर्मित आहेत अशी त्यांची विचारधारा होती.

### ३.५.५ सत्यशोधक समाज स्थापनेचे उद्दिष्ट :

कनिष्ठ जाती मधील अज्ञानी लोकांना ब्राह्मणांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणे.[२०४] दर रविवारी बैठक आयोजित केली जात होती. चर्चा पुढील मुददयावर होत होती. १.गुलामगिरीतून मुक्तता करणे.२.कमी खर्चात लग्न समारंभ करणे. ३.सक्तीचे मोफत शिक्षण. ४.दारूबंदी, व्यसनमुक्ती. ५.ज्योतिष, ग्रह, नक्षत्रे, राशी यापासून लोकांची मुक्तता करणे. ६.जातिभेद, मूर्तीपुजा, वर्णव्यवस्था याविरूध्द समाजाचे मतपरिवर्तन. महात्मा फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म ' पुस्तक लिहले. सत्यशोधक समाजाचे संदर्भांत म.फुले यांचे विचार अभ्यासपूर्ण आहेत.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'बहुजन समाजाचा उध्दार हाच माझा धर्म ' या आशयाचे भाषण केले. रयत शिक्षण संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी २७.११.१९४८ रोजी १,११,१११ रूपयांचा निधी दिला. त्यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यांच्यापुढे दिलेल्या भाषणातून व्यक्त झालेले त्यांचे विचारः बहुजन समाजाचा उध्दार हाच माझा धर्म आहे. त्यांना शिक्षण देणे हे माझे काम आहे. मी माझ्या उभ्या जन्मात जाती जातीत भेदभाव मानले नाही. जातीयतेला कधीच स्थान दिले नाही. श्री.एन.एन.जोशी, प्रिन्सिपॉल जिजामाता अध्यापिका विद्यालय, श्री.जी.टी.जोशी हेडमास्तर अष्टे हायस्कूल, श्री.बेडकिहाळ मास्तर उंब्रज हायस्कूल इत्यादी माझ्या संस्थेत शाखाप्रमुख म्हणून काम करीत आहेत. स्पृश्यास्पृश्यता आणि जातीयता मानणार नाही अशी मी महात्मा गांधीजीजवळ शपथ घेतली आहे.[२०५] संतवाङमयातून प्रबोधनाची चळवळ सुरू झाली. वारकरी संप्रदाय, भागवत संप्रदाय यातून एकात्मतेचा विचार पुढे आला. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, संत चोखामेळा, रोहिदास, सावता माळी, श्री गोरोबा काका कुंभार, संत सेना न्हावी, मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सखुबाई, मिराबाई यांच्या भक्तीच्या पंथातून सगळीकडे चांगुलपणाचा विचार समाजात रूजला. समाजात सामाजिक एकात्मता आली.

### ३.५.६ डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रातून समाजजागृती :

अस्पृश्यांची दुःखे समाजापुढे यावीत म्हणून 'मूकनायक' वृत्तपत्र सुरू केले. मे १९२० मध्ये कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे 'भारतीय अस्पृश्य परिषद' झाली. यानंतर बाबासाहेबांनी जनता, समता, प्रबुध्द भारत इ.वृत्तपत्रे सुरू करून समाजात जागृती निर्माण केली. इ.स. १९२३ नंतर डॉ.बाबासाहेबांनी 'दलित मुक्तता' याबददल वैचारिक बैठक ठरविली व दलित विकासाकरिता राजकीय व सामाजिक चळवळ उभी केली. १९२४ मध्ये 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या नावाची संघटना उभी केली.

**हितकारिणी सभा :**

सन १९२७ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. मनुस्मृती ग्रंथाचे दहन केले. पुणे पार्वती मंदीर सत्याग्रह इ.स. १९२९ मध्ये केला. इ.स. १९३० मध्ये नाशिक काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रह केला. सनातनी मंडळींनी त्यांना कडाडून विरोध केला. अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी स्वतंत्र राजकीय चळवळी उभ्या केल्या. इ.स. १९३० गोलमेजमधून राजकीय हक्काची मागणी केली. १९३२ मध्ये पुणे करार झाला. हिंदुधर्माशी संबंध तोडण्यास सांगितले. समान दर्जा, समान संधी, समान वागणूक मिळाली पाहिजे याचा उच्चार केला.[२०६]

**स्वतंत्र मजूर पार्टी** : १५ऑगस्ट १९३६ रोजी टाईम्स ऑफ इंडियाने 'इंडिपेंडेंट लेबर पार्टी' नावाचा राजकीय पक्ष डॉ.आंबेडकरांनी स्थापन केल्याचे वृत्त दिले. त्यानंतर डॉ.आंबेडकरांनी १९ जुलै १९४२ रोजी नागपूरला शेडयूल्ड कास्टस फेडरेसनची (शे.का.फे.) स्थापना केली.[२०७]

**३.५.७ धर्मांतर चळवळ :**

हिंदु धर्माची उभारणी जातीभेदावर, भेदभावावर केलेली होती. काळाराम मंदीर सत्याग्रहाच्या सहा वर्षाच्या काळामध्ये डॉ.आंबेडकरांना फारच कटू अनुभव आला. न्यायसंस्था, पोलिस यंत्रणा, प्रस्थापितांचे बाजूचे काम करतात. हिंदु धर्माला चिकटून राहण्यापेक्षा ही व्यवस्था मोडणे, धर्म सोडणे या गंभीर बाजूकडे आंबेडकर वळले. १३.१०.१९३५ रोजी येवला जि.नाशिक येथे 'दलित वर्ग परिषद' भरली. या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी भाषण केले त्यात त्यांनी 'धर्मांतराची' भीमगर्जना केली.[२०८] '' मी हिंदू म्हणून जन्माला आलो परंतु मी हिंदू म्हणून मरणार नाही.''  या परिषदेत धर्मांतर ठराव झाला. १.समता स्वातंत्र्य प्राप्तीकरिता धर्म परिवर्तन आवश्यक २. महार जाती सामुदायिक धर्मांतरास सिध्द झाली. ३.धर्मांतराचे पहिले पाऊल म्हणून हिंदुदेवतांच्या पूजा सोडून देऊ, हिंदु सण साजरे करणार नाही, हिंदु मंदीरात प्रवेश करणार नाही असे ठरले.

धर्मांतर गर्जनेने जग जागे झाले. हिंदु गडबडले. डॉ.आंबेडकरांची घोषणा युगप्रवर्तक ठरली. डॉ.आंबेडकरांना हिंदु धर्म, कॉग्रेस पक्ष  यांचे कटू अनुभव आल्याने त्यांनी १९५० पासून ही धर्मांतराची भूमिका मांडली. सातारा जिल्हयात ही चळवळ प्रकर्षाने जलद पोहचली, तिचा चांगला प्रसार झाला. गावोगावी कार्यकर्ते पोहोचले. गावपातळीवरील दलितांची, गावकीची कामे, गुरासारखे काम, गुलामगिरी इ. कामे दलितांनी सोडली. लोक आंबेडकरी चळवळीतून निर्भय झाले. दलित लढयात सहभागी झाला. आंबेडकरांना सातारा काही नवीन नव्हता. त्यांनी लोकजागृतीकरिता सातारा, फलटण, वडूज व मसूर येथे सभा घेतल्या. जनजागृती केली. डॉ.बाबासाहेबांचे बालपण व शिक्षण सातारमध्ये झाले होते. एवढेच नव्हे तर आंबेडकर हे नावसुध्दा येथेच मिळाले. थोडक्यात काय चळवळीचा सातारा दलित चळवळीने अधिक क्रांतीकारक झाला. कास्ट फेडरेशनचे आमदार खंडेराव सावंत व सातारा नगरपालिकेचे सदस्य भिकू बनसोडे हे सातारचे होत.

### ३.५.८ दलित चळवळी :

डॉ.आंबेडकरांच्या मरणोत्तर काळात आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व करणारी जहाल युवक चळवळ म्हणजे 'दलित पँथर' चळवळ. सन १९५६ मध्ये दलितांचे विराट धर्मांतर झाले. यानंतर अवघ्या अडीच महीन्यात डॉ.बाबासाहेबांचे 'महापरिनिर्वाण' झाले. यानंतर बाबासाहेबांचे उत्तरदायित्व रिपब्लिकन पक्षाने स्विकारले. १९५७ मध्ये 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' नावाने पक्ष स्थापन झाला.[२०९] अगदी अल्प काळात तो पक्ष फुटला. पुढे यात ऐक्य होण्याऐवजी वेळोवेळी पक्ष फूटतच गेला. 'दलित पँथर' ची स्थापना ९ जुलै १९७२ रोजी झाली. नामदेव ढसाळ, ज.वि.पवार, राजा ढाले, रामदास सोरटे, लतिफ खाटिक, अविनाश महातेकर, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, भाई संगारे, अनिल कांबळे, अरूण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार, रेणावकर, टी.एस.कांबळे, इत्यादी कार्यकर्त्यांनी ही चळवळ वाढविली. दलितांचेबददल जिव्हाळा व विषमतेविरूध्द पेटून उठणे यामुळे ही जनमानसात संघटना उठून दिसली. पँथरची बेदरकार भाषणे, वादळी सभा, मोर्चे हाणामारी, इ.मुळे 'दलित पँथर' ने समाजाचे लक्ष खेचून घेतले. पँथरच्या सभा गाजू लागल्या. 'विद्रोह' हे पॅंथरचे मुखपत्र आहे. राजा ढाले यांचा १५ ऑगस्ट १९७२ चा 'साधना'मधील लेख गाजला.[२१०]

### ३.५.९ दलित पॅंथर चळवळ :

मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेबांचे नाव मिळाले पाहिजे यासाठी आंदोलने केली. नामांतराचा प्रश्न प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी स्वतंत्रपणे लढविला. अरूण कांबळे यांनी नागरिकत्वाचा सामूहिक त्याग करण्याची धमकी दिली. रामदास आठवले यांनी आम्ही हजारोंच्या संख्येने धर्मांतर करू असे सांगितले. इतरांनी बौध्द विद्यापीठ स्थापन करावे व कोकण विद्यापीठाला डॉ.आंबेडकराचे नाव दयावे असे सांगितले. मराठवाडा विद्यापीठ नामांतराचे संदर्भांत उच्चवर्णियांनी प्रचंड खळबळ केली विरोध केला. गंगाधर पानतावणे 'प्रबोधनाची दिशा' या लेखातून सवर्णांना माणसापेक्षा परंपरा प्रिय वाटते असे म्हणतात. यासंदर्भांत सातारच्या शाहूपूरीचे पार्थ पोळके सर यांनी त्यांच्या 'आभारान' आत्मवृत्तातून नामांतराचा प्रश्न ऐरणीवर आणला. फ.मु.शिंदे हे नामांतरावर 'सार्वमत' काव्यसंग्रह प्रस्तुत करतात.[२११] १५ ऑगस्ट १९७२ रोजी नामदेव ढसाळ यांचे नेतृत्वाखाली युवक क्रांती दल व दलित पॅंथर यांच्या संयुक्त विद्यमाने सवर्णाकडून दलितांचा होणारा अन्याय याबाबत मोर्चा काढला. १४ ऑगस्ट १९७२ रोजी दलित पॅंथरने याबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. औरंगाबाद येथील दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसंदर्भात पॅंथरनी १९७३-७४ मध्ये विद्यार्थी आंदोलन केले.[२१२]

### ३.५.१० जानेवारी १९७४ चा वरळी संघर्ष व सातारमधून लाँग मार्च :

५ जानेवारी १९७४ मध्ये मुंबई पोटनिवडणुकीचेवेळी दलित पॅंथरचा मोठा संघर्ष झाला. वरळी आंबेडकर मैदानावर राजा ढाले यांच्या सभेच्या प्रसंगी लाठीने मारले. दलित समाज प्रक्षुब्ध झाला. प्रचंड दंगल झाली.[२१३] दि.१८ जुलै १९७७ ला मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ. युवक क्रांती दल दलित

युवक आघाडी स्टुडंटस फेडरेशन इ.संघटना मोर्चात होत्या. ६ डिसेंबर १९७९ ला नामांतर मागणीसाठी दलित पॅंथरने सत्याग्रह केला. नामांतरवादी कृती समितीने सत्याग्रह केला. प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर औरंगाबाद लाँग मोर्चा काढला. यावेळी मुंबई, पुणे, सातारा, नाशिक, येथून लॉग मार्च निघाले. सातारा शाहूपुरीतील नामांतरवादी नेते पार्थ पोळके मत व्यक्त करतात, '' नामांतराचे निमित्ताने दलित पॅंथरची एकजूट दीर्घकाळ समतेवर प्रभाव टाकणारी होती''[२१४]

**३.५.११ मंडल आयोगाचा लढा :**

१९८७–८८ मध्ये रिडल्सच्या प्रश्नावर दलित पॅंथरने महाराष्ट्रभर आंदोलन केले. २४ जाने.१९८८ मध्ये रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली पुणे येथे दलित एकता परिषद झाली. याचवेळी कराड (जि.सातारा) येथे दलित ऐक्य परिषद झाली. सन १९८० नंतर भारतीय राजकारणात बदल झाले. उत्तरेकडे कांशीराम यांचा बहुजन समाज पक्ष उत्तरेकडे प्रभावी झाला. १९८५–८८ पर्यंत रामदास आठवले यांनी दलित चळवळ खेडयापाडयात प्रज्वलीत ठेवली.[२१५] भूमिहीनांचा सत्याग्रह, नामांतर लढा, दलित साहित्य, दलित पॅंथरचा उदय, या आंबेडकर मरणोत्तर काळातील घटना. ''गुलामाला गुलामीची जाणीव करून दया. मग तो बंड करून उठेल'' हा विचार दलित तरूणाच्या मनात रूजविण्याचे काम दलित पॅंथरने केले सोलापूरच्या पॅंथर च्या जाहीर सभेत टी.एस्.कांबळे म्हणाले, '' आम्हीही शहरे पेटवू शकतो. आम्हाला अतिरेकी होता येते. केवळ दहशतवादाने प्रश्न सुटत असतील तर आम्हालाही दहशतवादी बनावे लागेल. आम्हाला युध्दाचा मार्ग अमान्य आहे. आम्ही बुध्दांच्या मार्गाने जाणारे आहोत.'' दलित लढा म्हणजे केवळ बौध्दाचा लढा नव्हे. डॉ.बाबासाहेब केवळ बौध्दाचे नेते नव्हते. प्रस्थापिताविरूध्द प्रभावीपणे लढा दयायचा असेल तर दलित समाजाला संघटीत करून त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे.''[२१६]

**३.५.१२ सातारा जिल्हा चळवळीचे कार्य :**

सन १९२४ ते १९४८ चे कालखंडात सातारा नगरीचे राजे प्रतापसिंह महाराज यांनी सातारामध्ये शिक्षणप्रसार केला. इ.स. १८५७ मध्ये स्वातंत्र्ययुध्दाचा उठाव सातारा जिल्हयातील 'प्रतिसरकारचा लढा' सातारकरांच्या बहादुरीची व मर्दुमकीची साक्ष देतो. सन १९४२ मध्ये झालेल्या चलेजाव चळवळीचे खरे मर्म हे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी ओळखले. क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ब्रिटिशांच्या शस्त्रसामर्थ्याला शह दिला. ब्रिटिश सरकारला घायाळ केले. सातारमधील हे प्रतिसरकार दीर्घकाळ चालले. जनतेने नाना पाटलांच्या विचाराला, त्यागाला, त्यांच्या बहादूरीला सलाम केला. जनतेने 'क्रांतिसिंह' हा किताब बहाल केला.[२१७] जोतीराव फुले यांनी शाळा काढल्या, पुनर्विवाह घडवून आणले, केशवपनाला खंबीरपणे विरोध केला, अस्पृश्यता निर्मूलनाचे काम हाती घेतले. नवविचाराला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी एक संघटीत प्रयत्नांची गरज म.फुलेंना वाटली आणि म्हणून समविचारी साठ लोकांचे उपस्थितीत 'सत्यशोधक समाज' स्थापन केला.[२१८] या सत्यशोधक चळवळीचे लोण सातारमध्ये जलद पसरले. या चळवळीतून काही सत्यशोधक कार्यकर्ते निर्माण झाले. यामध्ये वाईचे रा.ना.चव्हाण, केशवराव विचारे,

ज्योतीराव फाळके दरम्यानचे काळात ग्रॅट डफ याचे सातारमध्ये आगमन झाले. त्याने सातारमध्ये इंग्रजी शिक्षणास प्रारंभ केला. 'मिशनरी हायस्कूल'ची स्थापना केली. त्यांनी मागासवर्गीय मुलांना सेंट पॉल हायस्कूलमध्ये प्रवेश दिला. त्यांचेकरिता होस्टेलची सोय केली. हे होस्टेल मोफत होते. २ एप्रिल १८८४ मध्ये छ.शाहू महाराजांचे राज्यरोहण झाले. याप्रसंगी छ.शाहू म्हणाले, ''आमची प्रजा सदा सुखी व्हावी अशी आमची अपेक्षा आहे.'' विठोजीराव जाधव यांचेव्दारे सत्यशोधक समाज चळवळीची पुनर्बांधणी कोल्हापूर येथे झाली.[२१९]

### ३.५.१३ सत्यशोधकी जागृती:

सत्यशोधकी जागृतीचा प्रभाव भाऊरावांच्यावर चांगलाच झाला. भाऊरावांची मानसिकता याच स्वरूपाची होती. यामुळे भाऊराव या चळवळीत सक्रिय होऊन काम करीत होते. शाहू महाराज समाजप्रबोधनाकरिता जागृतीकरिता प्रोत्साहन देत. कवी, शाहीर, किर्तनकार, प्रवचनकार इ. माध्यमातून जागृती करीत. या सर्वांना छ.राजर्षी शाहू महाराजांची खूप मदत होत असे. सत्यशोधक गावोगावी जाऊन प्राथमिक शिक्षण, सार्वजनिक वाचनालय, व्याख्याने, सहकार इ.च्या माध्यमातून लोकजागृती करीत. हळूहळू गावोगावी सत्यशोधक समाज चळवळीच्या शाखा निघू लागल्या. केशवराव विचारे व भाऊराव सत्यशोधकाचे प्रचारप्रमुख होते. १९१५ ते १९२१ या सहा वर्षाच्या काळात त्यांचा महाराष्ट्रातील ३० जलशांशी संबंध आला. भाऊराव या जलश्यात मोठया उत्साहाने भाग घेत.[२२०] समाजात जाऊन सत्यशोधक प्रबोधन करीत. सत्यशोधक समाज चळवळीकडे अनेक उत्साही पहाडी आवाजाचे चांगले वक्ते होते. त्या वक्त्यांची भाषणे समाजात होत. उदा. बाबूराव यादव गुरूजी, नाना पाटील, प्रबोधनकार ठाकरे, यांच्या भाषणातून, अस्पृश्यता, ढोंगीपणा, तंत्रमंत्र, बुवाबाजी, भूताखेतांचे थोतांड इ. बाबीवर सत्यशोधक कोरडे ओढत. जलसे, शाहीरी पोवाडे, किर्तन, प्रवचन यांचे कार्यक्रम  जिल्हाभर व महाराष्ट्रात होत. तयामध्ये केशवराव जेधे, भाऊराव पाटील, व-हाडचे रामभाऊ लोखंडे, वर्ध्याचे खंडेराव जाधव, करंजगावचे मोतीराम तुकाराम वानखेडे, सातारा काले येथील रामचंद्र घाडगे, पांडूरंग पाटील, भिलवडीचे भाऊराव पाटोळे, कासेगावचे तातोबा यादव, येलूरचे शंकरराव पाटील इ.मंडळींनी महाराष्ट्रात समाजजागृती केली.

'जलसे' तमाशा तंत्राचे होते. त्यात समाजातील जीवनावर अन्यायी बाबीवर कथा असायची. कथा लोकभाषेत मांडली जायची.लावणी नृत्य व्हायचे. ढोलगी, हलगी, घुमक ही वाद्ये होती. ढोलकी, हलगी या वाद्यातून अन्याय, चीड यांची तीव्रता वाढविली जात असे. रामचंद्र घाडगे फार प्रभावी जलसाबहाददर होते. बेहोश होऊन काम करीत. ही जलसा प्रबोधन करणारी, मंडळींनी आपले आयुष्य समाजप्रबोधनाकरिता खर्ची घातले. त्यांच्या त्यागातून पुरोगामी महाराष्ट्राची घडण झाली. सत्यशोधक गाणी गाणारे कवी तडसरचे मारूती पवार, कालेकर, यादव गुरूजी, कडेगावचे कवी तुकाराम दोडके, निनाम पाडळीचे सदानंद यांनीही पोवाडे रचले.[२२१]

डॉ.बाबासाहेबांच्या शेडयूल्ड कास्टस फेडरेशनचे काम सातारमध्ये झाले. खंडेराव सावंत १९३७ मध्ये आमदार झाले. कॉग्रेसचे नलवडे, ॲड.दिनकरराव कांबळे मु.पो.बावधन ता.वाई हे जिल्हाध्यक्ष होते. सातारा जिल्हयात नाना पाटील, नाथाजी लाड, जी.डी.बापू, नागनाथ यांचे जनजागृतीतून शे.का.पक्षाने जोर धरला. सातारमधून ॲड.व्ही.एन.पाटील तर रेठरे ता.कराड मधून यशवंतराव मोहिते सत्यशोधक चळवळीतून शाहीर साबळे, फरांदे हे कार्यकर्ते तयार झाले. सातारा जिल्हयाने भरीव काम केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सातारा जिल्हा आघाडीवर होता. छ.शिवाजीराजे यांच्या प्रतापगडावरील पुतळयाच्या अनावरणप्रसंगी नेहरू आले होते. समितीचे प्रमुख नाना पाटील व नेहरूंच्याबरोबर व्दिभाषिक राज्याचे मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण ही सारी मंडळी सातारची परंतु त्यांच्या दोघांच्या भूमिका परस्पर भिन्न होत्या. क्रांतिसिंहाबरोबर कॉ.शेखकाका, कॉ.बाबुराव जगताप, विठाबाई पवार, व्ही.एन.पाटील, हरीभाऊ निंबाळकर, कराडचे शेकापचे केशवराव पवार इ. मंडळींनी फार परीश्रम केले. फार त्याग केला. विरोध, राग, लोभ या सर्वांचे चित्र कार्यक्रमात दिसले. पंडित नेहरूनी महाराष्ट्राचे कौतुक केले. महाराष्ट्राने त्यांच्यावर केलेल्या प्रेमाबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. निदर्शने झाली परंतु ती शिस्तबध्द झाली.[२२२]

**३.५.१३ सत्यशोधक जलसे**: १.भाऊराव पाटोळे (भिलवडी), २.तात्याबा पाटील कासेगावकर, ३.शंकरराव पाटील येलूरकर,४.रामचंद्र घाडगे कालेकर सातारा, ५.आबासाहेब साबळे (शिवथर), ६.लोकशाहीर पुंडलिक फरांदे, (सातारा) ७. ज्योत्याजीराव फाळके (पाडळी सातारा), शाहीर कांबळे गिलबीले पाटील. सत्यशोधक चळवळीचा प्रचार व प्रसार राज्यभर सत्यशोधक जलसे करीत होते. जलसामार्फत रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, जातीभेद, अस्पृश्यता निरक्षरता गीते, नाटयाव्दारे प्रबोधन केले जात. धार्मिक ग्रंथातील खोटेपणावर, पुरोहितांचे सावकारीवर, ही मंडळी टिका करीत. बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी हे जलसे तयार करण्यातर आले होते.[२२३] हे जलसे तयार करण्यात छ.शाहू महाराज, ना.भास्करराव जाधव, मुकुंदराव पाटील, केशवराव विचारे, भाऊराव पाटील, ज्योत्याजीराव फाळके, प्रबोधनकार ठाकरे, भिमराव महामुनी, रामचंद्र घाडगे (काले), भाई माधवराव बागल, विनायकराव जवळकर, केशवराव जेधे इ.मंडळी होती. ही नावे केवळ प्रातिनिधीक आहेत. या चळवळीत शेकडो कार्यकर्ते सहभागी होते. सातारा फलटणचे निंबाळकर यांनी दलित मुलांचे शिक्षणासाठी वसतिगृह काढले. या ठिकाणी १५० मुले होती ते वसतिगृह मोफत होते. दरम्यान औंध पंतप्रतिनिधी यांनीही मोफत वसतिगृह काढले. या वसतिगृहात शंकरराव खरात शिकले.

डॉ.आंबेडकर यांच्या शे.का.फे.चे कार्य सातारमध्ये चालू होते. १९३७ मध्ये ॲड.दिनकरराव कांबळे हे बावधनचे रहीवाशी या संघटनेचे जिल्हा अध्यक्ष होते. १९३७ मध्ये या संस्थेमधून विधानसभेच्या १६ जागा लढविल्या. पैकी १४ निवडून आले. शे.का.फेने नगरपालिका निवडणुका लढविल्या. सातारा करंजे येथील भिकू बनसोडे हे नगरसेवक म्हणून निवडून आले. कोर्ट केस संदर्भांत डॉ.आंबेडकर यांचे सातारला येणे जाणे घडत असे. त्यांच्या सातारा जिल्हयात सभा होत. नागठाणे, मसूर, रहिमतपूर, कराड, दहीवडी,

फलटण येथे आंबेडकरांच्या सभा झाल्या.[२२४] सातारमध्ये राष्ट्रसेवा दलाचे काम सुरू होते. या सेवा दलातून पुढे डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी समाज युवक दल स्थापन केले. पुढे समाज जागृती, प्रबोधन या चळवळी सुरू झाल्या. दरम्यानचे काळात सातारमध्ये ग.सा. कांबळे गुरूजी, अँड.आर.पी.कांबळे, महादेव आढाव, नामदेव भिकू बनसोडे, कॅ.साहेबराव बनसोडे, शंकरराव काकडे इत्यादी मंडळी समाजप्रबोधनाचे काम करीत होती. डॉ.आंबेडकरांच्या मानव मुक्तीचा विचार यांनी शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले.[२२५]

### ३.५.१३ शाहीर भाऊ फक्कड :

शाहीर भाऊ फक्कड यांचा जन्म वांग नदीकाठी मंद्रूक कोळे ता.पाटण या गावी झाला. त्यांचे मूळ नाव भाऊ मालोजी भंडारे. हिरा सातू कवलापूरकर व तात्याबा सावळजकर या दोन तमाशाचा अटीतटीचा सामना पाहून त्यांना 'शाहीरीची' प्रेरणा मिळाली. भाऊ फक्कड यांनी गवळणीप्रमाणे शृंगारिक लावण्या, स्त्रीसौदर्याचे रेखीव वर्णन काव्यात लिहीले. भाऊ फक्कड व पठठे बापूराव यांच्यात मुंबई येथे पंधरा दिवस अटीतटीचा सामना झाला.[२२६] भाऊंनी पठ्ठे बापूरावांना पराभूत केले. १९२०–३०चे काळात ते दलितोध्दार चळवळीत सहभागी झाले. ज्या गावात तमाशा असेल त्या गावातील दलित बांधवांच्याकरिता तमाशाच्या करमणूकीचा कार्यक्रम करीत. अस्पृश्यांच्या जागृतीसाठी त्यांनी काव्यरचना केली. डॉ.बाबासाहेबांनी त्यांना बहिष्कृत हितकारिणी सभेच्या कार्यकारिणीवर (मंडळावर) घेतले.[२२७] त्यांच्या नमनातील ओळी: पहिले नमन डॉ.आंबेडकराला, आमच्या कुलदैवताला महात्मा जोतिबा फुल्यांला, छत्रपती शाहू राजाला.'' देवभोळ्या गणेशस्तवनाऐवजी मानवी कतृर्त्वाला उच्चस्थान देणारे पहिले शाहीर म्हणून दलितोध्दार चळवळीत त्यांनी काम केले. मिरज हॉस्पीटलमध्ये त्यांचा अंत झाला.

### ३.५.१४ राष्ट्रसेवक क्रांतीदलाचे जयंत उथळे व सहकारी:

राष्ट्रसेवक क्रांतीदलाचे जयंत उथळे हे शिवाजी उदय मंडळात होते. याच दरम्यान शिवाजी उदय मंडळात डॉ.नरेंद्र दाभोळकर होते. ते चांगल्या प्रकारे कबड्डीचे खेळाडू होते. दाभोळकरांनी पुढे समाजवादी युवक दलाची स्थापना केली.[२२८] त्यांच्यावर समाजवादी मंडळींचा प्रभाव होता. एस.एम.जोशी, डॉ.बाबा आढाव, डॉ.कुमार सप्तर्षी, जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचा त्यांचेवर प्रभाव पडला. कुमार सप्तर्षी यांनी 'युवक क्रांती दल' स्थापन केले. पुणे येथे त्यांनी शंकराचार्यांना अडविले. त्यावेळी तेथे नामदेव ढसाळ आले. आणीबाणीच्या विरोधात ते सर्वजन १९७७ चे दरम्यान एस.टी.त नोकरीला लागले. डॉ.बाबा आढाव यांचे 'एक गाव एक पाणवठा' हे आंदोलन सुरू झाले.१९७५ मध्ये त्यात लक्ष्मण माने आले. इ.स.१९८४ मध्ये कराड येथे राष्ट्र सेवक क्रांती दल स्थापन झाले. त्यामध्ये भूतडा मिनाज सय्यद, संदीप जावळे, सुनिल वाघमारे, अजित साळुंखे ही मंडळी होती. यावेळी मुक्तांगणमध्ये बैठका सुरू झाल्या. या बैठकीला प्रशांत साळुंखे, संजीव निकम, वर्षा देशपांडे हे सदस्य होते. राष्ट्र क्रांती दलाने पुढे वेगवेगळे उपक्रम हाती घेतले. आपल्या परिसरातील बेघर व झोपडपट्टींचा सर्व्हे केला. झोपडवासियांची २०० ते २५० मुले दत्तक घेतली. प्रत्येकाला दप्तरांसाठी रोख पैसे दिले.[२२९]

**द.शि.सवाखंडे :**

एक उत्तम लेखक म्हणून पाटण तालुक्याला ते परिचित आहेत. 'अंधारातून प्रकाशाकडे' या प्रौढ शिक्षणावर आधारित पुस्तकास राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. सवाखंडे यांचे 'मरणकळा' हे आत्मवृत साहित्य संस्कृती मंडळ नवलेखन अनुदान योजनेतून प्रकाशित केले. या ग्रंथाला बंडो गोपाळा मुकादम पुरस्कार मिळाला.[२३०]

**३.५.१५ शाहीर तुकाराम बाबुराव चव्हाण :**

पाटण येथील मातंग समाजातील खूप दारिद्र्यात दिवस काढणारा कै.शाहीर तुकाराम यांचा जन्म २ जून १९४९ रोजी झाला. घरची स्थिती अत्यंत गरीबीची होती. पाटणच्या एस.टी.स्टँडवर हमाली करण्यात तो लहानाचा मोठा झाला. शालेय शिक्षण घेतानाच त्यानी 'वाघाची मिशी' अर्थात पेटते पाणी हे नाटक लिहीले. प्राथमिक शाळेचे त्यांचे शिक्षक नाथाजी विठोबा तेली यांनी हे नाटक बालकलाकार घेऊन सादर केले त्यात स्वतः शाहीर तुकाराम यांनी काम केले.[२३१] इ.स.१९७५ मध्ये 'रसिक नाटयझंकार' मंडळाची स्थापना करण्यात आली. हे स्थापन करण्यात शाहीर तुकाराम यांचा सिंहाचा वाटा होता. या नाटय कंपनीने शाहीर तुकाराम यांचे 'पापाचा भरला घडा' हे नाटक सादर केले. पुढे हेच नाटक पुणे बालगंधर्व येथे सादर झाले. पुढे सेन्सॉर होऊन तमाशा सम्राट श्री.तुकाराम खेडकर यांनी हे नाटक संपूर्ण महाराष्ट्राला सादर केले. शाहीर टी. चव्हाण यांनी ११ तमाशा प्रधान नाटके, ३ सामाजिक नाटके, यांचे लेखन केले. चिनी आक्रमण, भारत पाकिस्तान युध्द, कारगील युध्द यावेळी युवकांच्या देशभक्ती जागृतीकरिता देशभक्तीपर गीते, पोवाडे, संवाद लेख इ.लेखन केले. तसेच व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा, साक्षरता या विषयावर त्यांनी लेखन केले. सन १९९३ मध्ये 'भारतमाते शोक आवर' हे गीत आकाशवाणीवरून गायले. असा हा शाहीर शासकीय मानधनापासून, शासकीय मदतीपासून उपेक्षितच राहिला. नुकतेच त्यांचे विपन्नावस्थेत निधन झाले.[२३२]

**३.५.१६ प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे :**

प्रा.मच्छिंद्र सकटे यांचे वडील रेल्वे माटुंगा वर्कशॉपला नोकरीवर होते. यामुळे डॉ.सकटे यांचे बालपण मुंबईला गेले. त्यांचे बालपण व प्राथमिक शिक्षण मुंबई नायगाव येथे गेले. त्यांचे वडील भजन गायचे. त्याकाळात डोक्यावर बत्ती घेऊन त्यांनी डॉ.आंबेडकरांची भाषणे ऐकली. 'महार आणि मांग' हे जातीवाचक शब्द डॉ.सकटे यांनी इ.दुसरीचे वर्गात असताना ऐकले. भैरवनाथ वसतिगृह त्यावेळी शे.का.प.यांचे ताब्यात होते. ते आठवीला असताना त्यांना चळवळ हा शब्द माहित झाला. इथे त्यावेळीला भाई संपतराव पवार (बलवडी) मुक्ती संघर्ष चळवळीचे प्रमुख. माजी आमदार भगवानराव मोरे बाप्पा (क्रांतिसिंह नाना पाटील यांचे जावई )भगवानराव सुर्यवंशी, सदाशिवराव पवार, रावसाहेब शिंदे इ.सारी मंडळी तेव्हा शेकापचे काम करीत होती. कदम गुरूजी हे सुध्दा त्यांचेबरोबर असायचे. ही मंडळी त्यावेळी शेतकरी, कष्टकरी जनतेचे मेळावे घ्यायचे, मोर्चे काढायचे, आंदोलन करायचे.[२३३] युवक संघटनेच्या कार्यकारिणी निवडीचेवेळी डॉ.सकटे यांना संधी चालून आली.[२३४] कॉलेज शिक्षणाचेवेळी एस.टी.सुरू करणे, फीवाढ रद्द् करणे, मोर्चे काढणे इ.

गोष्टीत ते सक्रीय होते. शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी संघटना स्थापन केली. विद्यार्थी प्रबोधन मंच स्थापन केला. या माध्यमातून महिन्याला व्याख्यान घेत असत. प्रा.एन.डी.पाटील, प्रा.डी.यू.पवार, प्रा.कावळेकर, विलास बन्ने, प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची व्याख्याने झाली. खानापूर तालुका दुष्काळी रोजगार हमीची कामे असायची. काम गुरासारखं व पगार फक्त रूपया. भाई संपतराव पवार व डॉ.भारत पाटणकर यांनी आवाज उठविला. कचेरीवर मोर्चे काढले. डॉ.सकटे यांना दोनवेळा अटक होण्याचा प्रसंग आला.[२३५]

प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे सर राजा ढाले यांना भेटण्यासाठी गेले. मातंग कार्यकर्त्यांची भेट झाली. त्यात श्री.विठ्ठल साठे, लोंढे गुरूजी, मोहन देवकुळे, बाळू माने व बंधू रामदास सकटे या सर्वांचे बरोबर चर्चा झाली. आप्पासाहेब गोपल्यांच्या उपोषणामुळे 'आण्णा भाऊ साठे महामंडळ' शासनाने स्थापन केले असे मातंगांना वाटले. त्यामुळे ते गोपल्यांना नेता मानू लागले. डॉ.मच्छिंद्र सकटे जाहीरपणे म्हणाले की गोपले कदाचित शिवसेनेत जातील आणि इ.स.१९८९ च्या विधानसभा निवडणुकीत गोपले शिवसेनेत दाखल झाले. या गोपले यांच्या सेनेत जाण्यामुळे मातंग समाज खवळून उठला. त्यांचा जाहीर निषेध केला.[२३६]

मातंग समाजची दोन श्रध्दा स्थाने वीर लहुजी वस्ताद व आण्णा भाऊ साठे यांच्या जयंत्या कमी अधिक प्रमाणात महाराष्ट्रात साजऱ्या होतात. नेताजी कांबळे (सांगली), विश्वनाथ कांबळे (विटा) यांच्यात वाद होता. राजकीय पक्ष या छोटया मोठया संघटनेचा स्वत: साठी उपयोग करून घेत असत. जिल्हाध्यक्ष विश्वनाथरावांनी विटयात बंडखोरांचा प्रचार केला. तर रविंद्र भिंगारदेवे, डॉ.राजन भिंगारदेवे यांनी कॉंग्रेसबरोबर राहून त्यांचा प्रचार केला. संघटनेत चांगलीच फाटाफूट झाली.[२३७] ५ जुलै १९९२ मध्ये दलित महासंघाची स्थापना झाली. प्रा.रघूनाथ केंगार(होलार), प्रा.शशीकांत तासगावकर(महार), प्रा.गोरख सांगळे (वंजारी), प्रा.शामराव वटमोरे(रामोशी), प्रा.हिंदूराव पवार(मराठा) प्रथम प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे यांना अध्यक्ष केले. पहिला मेळावा गडहिंग्लज येथे १९९२ मध्ये रामोशी समाजाचा घेतला. बंजारा समाज आंदोलन, बाबरी मशीदचा निषेध केला. नामांतरासाठी मोर्चा काढला. राखीव जागा पुर्नरचना करिता मंडल परिषद घेण्यात आली. पुढे मतभेद होऊन १९९३ मध्ये डॉ.रघूनाथ केंगार बाहेर पडले. १९९५ मध्ये दलित साहित्य संमेलन घेतले. तडसरचे वामन होवाळ अध्यक्ष होते.

### ३.५.१७ डॉ. रघुनाथ केंगार मुलाखत २१ मार्च २०१६ वेळ ११ ते १.३०:

माणदेश कमी पावसाचा ओसाड भूभाग. स्वत:चे अस्तित्व शोधण्याचा ज्यांनी विचार करून संघर्ष केला त्यापैकी कराडच्या वेणुताई चव्हाण कॉलेजचे मराठीचे प्राध्यापक डॉ.रघूनाथ केंगार होत. माण तालुक्यातील नरवणे गावचे. डॉ.रघूनाथ केंगार तळागाळातील होलार जातीतील. भाग ओसाड, दुष्काळी व जात होलार त्यामूळे दारिद्रय अठरा विश्व. दारिद्रय बिकट स्थिती. फक्त केंगार सरांच्या कुटुंबाकडे एक प्लस पॉईंट होता तो म्हणजे झगडणे, संघर्ष करणे हा कुटुंबाचा स्थायीभाव. जिदद, परिश्रम व सातत्य या त्यांच्याकडील जमेच्या बाजूवर त्यांनी उंच उंच शिखरे सर केली. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. म्हणून अगदी शालेय जीवनापासून त्यांनी छोटया मोठया चळवळीत भाग घेतला.[२३८]

डॉ.रघूनाथ यांच्या जीवनाला खरा सूर लागला तो कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेतील कराड तालुक्यातील कुसुरच्या सदगुरू गाडगे महाराज विद्यालयात शिकायला गेल्यावर तेथेच डी.एड.अभ्यासक्रम पूरा केला. इथे त्यांना वाचन, चिंतन व लेखनाचा छंद लागला. या ठिकाणीच डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे, श्री संत गाडगे महाराज, महात्मा फुले यांच्या जीवन कार्याबद्दल जिज्ञासा, ओढ वाटू लागली. पुढे केंगार सर वाई तालुक्यात गुळुंब येथे शिक्षक झाले. यातूनच त्यांनी गती घेतली. बी.ए.एम.ए. झाले. शिक्षणाकरिता डॉ.शिवाजी चव्हाण सर, डॉ.टापरे सर, डॉ.जोशी सर यांचे फार मोठे सहकार्य झाले. एम.ए.झाले. आता त्यांना थोडी गती अधिक गती आली. फलटणच्या मुधोजी कॉलेजच्या ज्युनियर विभागात त्यांना प्राध्यापकाची नोकरी मिळाली. डॉ.शिवाजीराव भोसले यांचा सहवास मिळाला. वाचन लेखनाची संधी मिळाली. येथे असताना 'गावकुसाबाहेरील उपेक्षित होलार समाज' यावर दै.ऐक्यमध्ये एक लेख लिहीला. परिणाम फारच चांगला झाला. शेकडोंची पत्रे आली. काहींनी प्रत्यक्ष भेट घेतली. लोकांच्या दृष्टीक्षेपात आले. त्यांचा परिचय वाढला. या सर्वांचा परिपाक त्यांचे मदतीने त्यांनी होलार समाज संघटना स्थापन केली.[२३९] होलार समाज एकत्रित करून संघटना उभी केली. परंतु यापाठीमागील जिद्द उर्मी प्रेरणाबाबत बोलताना डॉ.केंगार सर म्हणाले, ''आमच्या परिस्थितीने आम्हाला सारं शिकवलं.'' 'फुले, शाहू, आंबेडकर ही आमची श्रध्दास्थाने', 'अगर ये न होते तो हम नही होते' दलित चळवळीतील मंडळी नामदेव, राजा ढाले, ज.वि.पवार, अर्जुन डांबळे, रावसो कसबे इ.च्या सभा होत यातून प्रेरणा मिळाली. कुसुर काले परिसरात असताना प्रा.हिंदुराव यादव यांचे लेखन वाचण्यात आले. असा लेख त्यांनी ऐक्यमध्ये लिहला. यापाठीमागील प्रेरणा सांगताना डॉ.केंगार सर म्हणाले संख्येने आमची होलार मंडळी खूप. पण शिक्षणापासून दूर पिढीजात डफ, सनई, सूर वाजवणे, ताशा बडविणे यात धन्यता मानतात. त्यांनी शिकावे व गुलामगिरी झटकून टाकावी ही यापाठीमागील प्रेरणा होय.[२४०] ज्या समाजातून आपण लहानाचे मोठे झालो त्याचे काहीतरी आपण देणं लागतो म्हणून आम्ही गतीमान झालो. सप्टेंबर १९८९ मध्ये वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड मध्ये प्राध्यापकाची नोकरी लागली. आंबेडकर यांनी समाजासाठी जीवन समर्पित केले. तेव्हा आपल्याला जमते तेवढे आपण करावे. आपण किती वर्षे जगलो या पेक्षा कसे जगलो याला अधिक किंमत आहे.[२४१]

### ३.५.१८ प्रा.डॉ.रघूनाथ केंगार यांच्या दलित चळवळी :

१.माणदेशी साहित्यिकांना आणि हितचिंतकांना एकत्रित करून 'माणदेशी विद्यापीठाची'स्थापना.

२.दहिवडी ता.माण येथे राज्यव्यापी मराठी साहित्य संमेलनचे आयोजन केले. नोव्हें. १९९० मध्ये संमेलन कार्याध्यक्ष डॉ.रघूनाथ केंगार स्वतः होते. स्वागताध्यक्ष सदाशिव पोळ होते. संमेलन अध्यक्ष माणदेशातील जेष्ठ साहित्यिक शंकरराव खरात होते. विशेष अतिथी ना.पतंगराव कदम होते. उदघाटक म्हणून त्यावेळचे समाजकल्याण मंत्री ना.रामदास आठवले होते. या संमेलनास नवोदित साहित्यिकांनी हजेरी लावली. प्रसारमाध्यमांनी याची खास दखल घेतली. डॉ.केंगार सरांच्या कामाची प्रमुख पाहुण्यांनी तोंडभरून स्तुती

केली. देशपातळीवर या कामाची नोंद घेतली. डॉ.रघूनाथ केंगार यांना 'आंबेडकर फेलोशिप' या पुरस्काराने सन्मानित केले.[२४२]

३.याच माणदेशी ज्ञानपीठांचे व्दारा पुसेसावळी भेदिक शाहीरी परिषद घेतली. (डॉ.केंगार सरानी प्रा.डॉ.शिवाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शाहीर हैबती व्यक्ती वाडमय आणि विचार यावर पीएच.डी. केली.)

४.संशोधनाकरिता डॉ.केंगार यांना यु.जी.सी.व्दारा एक वर्षाची फेलोशिप मिळाली. सध्या डॉ.रघूनाथ केंगार पी.एचडी.चे शिवाजी विद्यापीठाचे मार्गदर्शक (गाईड) आहेत.

५.सन १९९३ मध्ये पाटण जि.सातारा येथे पहिले राज्यव्यापी दलित साहित्य संमेलनाचे डॉ.केंगार सर अध्यक्ष होते.

६.सन १९९४ मध्ये नांदेड येथे चौथ्या राज्यस्तरीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृतिसाहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

७.सन १९९६ मध्ये कराड जि.सातारा येथे झालेल्या राज्यव्यापी लोककलाकार परिषदेचे अध्यक्ष होते.

८.सन १९९७ मध्ये कवठे येथे झालेल्या राज्यव्यापी लोककला साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. साहित्यक्षेत्रातील सन्मानाची अध्यक्षपदे भूषविली ही त्यांच्या साहित्यक्षेत्रातील कार्याची पावती आहे.

९.प्रा.डॉ.रघुनाथ केंगार यांनी 'क्रांतिबा' हे त्रैमासिक सुरू केले. डॉ.रघुनाथ केंगार सर स्वत: संपादक आहेत.

**समाजासाठी डॉ.रघुनाथ केंगार यांचे कार्य** :

१.डॉ. केंगार यांनी होलार समाजाचा सर्व्हे केला. समाजाची लोकसंख्या सुमारे ९० लाख आहे. होलार समाज जमीनहीन आहे. मोलमजूरी करून जगतो आहे.[२४३] शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. २.सरकारी नोकरीत ४ टक्के आरक्षण दयावे अशी मागणी केली. ३.लोकसंख्येचे प्रमाणात राजकीय सत्तेत सहभाग दयावा असे ते म्हणतात. ४.समाजाचा सर्वांगिण अभ्यास करण्यासाठी होलार समाज अभ्यास आयोगाची स्थापना करावी या मागण्यासाठी प्रा.डॉ.केंगार सरांनी श्री.गुळीग, श्री.गोरखे, श्री.ऐवळे, श्री.गेजगे, प्रा.बांगर इ.बांधवांना एकत्रित केले व समाजजागृतीचे काम हाती घेतले.

डॉ.रघुनाथ केंगार होलार समाजातील पहिले संशोधक, पहिले सिनेट मेंबर, पहिले पी.एचडी.धारक पहिले लेखक, पहिले संपादक. प्रा.डॉ.केंगार सरांनी महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, लोकमत, पुढारी, सकाळ, ऐक्य इ. दैनिकातून लेखन केले. तसेच अस्मितादर्शक, वसंत, सुगावा, क्रांतिबा, नियतकालिकातून गेली पंचवीस वर्षे लेखन करीत आहेत.[२४४] पुरोगामी विचाराचे वारसदार आहेत. सामाजिक चळवळ गतीमान करण्यासाठी विविध जातीमधील प्राध्यापकांना एकत्रित केले व 'दलित महासंघाची' स्थापना केली. या महासंघाचे माध्यमातून अनेक दीनदलितांचे प्रश्न हाताळले. प्रा.त्रिंबक, प्रा.मच्छिंद्र, प्रा.शशिकांत तासगावकर, प्रा.बांगर यांना बरोबर घेऊन त्यांनी लातूर, बीड येथे जनमोर्चा काढला. कोल्हापूर, कराड, पुणे, बीड इ.ठिकाणी कलेक्टर कचेरीवर धडक मोर्चा काढले.[२४५]

### ३.५.१९ प्राचार्य बी.एन.कालेकर : मुलाखत बुधवार १६ मार्च २०१६ :

प्राचार्य बी.एन.कालेकर एक नामवंत प्राध्यापक, कुशल नियोजक, प्राचार्य व आंबेडकरी चळवळीचे गाढे अभ्यासक आहेत. गेली ३५ ते ४० वर्षे ते शिक्षणक्षेत्रात कार्यरत आहेत. ते कराडच्या वेणुताई चव्हाण कॉलेजचे सन्माननीय प्राचार्य आहेत. कराडपासून १५ कि.मी.दूर असलेल्या काले गावचे ते रहीवाशी. त्यांचा जन्म एका गरीब नवबौध्द समाजात झाला. अगदी प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले. घरी अठरा विश्व दारिद्रय, ना कुणाचा आधार, ना जमीन जुमला. एक आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट. बी.एन.कालेकर व त्यांचे वडील भाऊ युवराज एन.कालेकर अतिशय जिद्दी व परिश्रम करणारे आहेत.[२४६]

माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक समडोळे सर, के.जी.कुंभार सर, व्ही.व्ही.शिंदे सर, भागवत सर, बी.बी.जगताप, एम.डी.गायकवाड सर, आर.बी.पाटील सर्व मंडळींनी मोठी माया व संस्कार दिले. शाळेचे वातावरण गुरूकुल आश्रम शाळेसारखे. इथेच म.फुले , शाहू, आंबेडकर, कर्मवीर भाऊराव यांची नावे कानावर पडली.[२४७] इथे डाव्या गटाची शेकापची मंडळी होती तसेच यशवंतराव चव्हाणसाहेब, उंडाळेचे बाळकू पाटील, किसनवीर आबा, नांदगाव सातारचे बाबुराव घोरपडे, मरळी पाटणचे बाळासाहेब देसाई, रेठरे येथील यशवंतराव मोहिते इ. नेत्यांचा वावर काले येथे होता. सन १९५७-१९६२ चा निवडणूक रणसंग्राम व १९६० चा संयुक्त महाराष्ट्र आंदोलनकाळ बघितला. एवढे कळत नव्हते पण बैलजोडी व बैलगाडी (खटारा) विळालोंबी हातोडा ही चिन्हे लक्षात आली.[२४८]

स्वातंत्र्योत्तर काळ हा चळवळीचा काळ होता. दलित, भटके, विमुक्त, आदिवासी, स्त्री कामगार इ.प्रश्नाबाबत युवकांनी एकत्र येऊन चळवळी केल्या. स्वातंत्र्य शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे. या विचाराने अनेक संघटना व सत्याग्रह सुरू केले. लोकांचे प्रश्न व त्यातून नवे नेतृत्व निर्माण झाले. सामान्य माणसाला हक्क अधिकाराची जागृती झाली.[२४९] गाव, तालुका, जिल्हा, राज्य व देश पातळीवर लोकशाही समाजवादाची चर्चा सुरू झाली. डॉ.बाबासाहेबांनी या सर्व बाबींचा विचार व प्रेरणा घेऊन स्वातंत्र्योत्तर काळात चळवळ सुरू केली. दलितांनी हिंदू देवदेवता नाकारल्या. प्रथा परंपरा झिडकारल्या. धर्मांतराचे लोण खेडयापर्यंत पोहोचले. सवर्णांनी दलितांवर बहिष्कार टाकला. दलितांना गाव बंद केले. दलित सवर्णाच्या तेढीतून परिवर्तनाचे वारे वाहू लागले. परंतु डॉ.बाबासाहेबांच्या निधनानंतर कुटुंबातील कर्ता माणूस गेल्यावर कुटुंबाची दैना होते तसे झाले. दलित चळवळ पोरक्यासारखी झाली. प्रचंड पोरकी झाली. रिपब्लिकन दुर्बल घटकांना, अल्प भूधारकांना, भूमीहिन मजूरांना, श्रमिकांना संघटीत न्याय मिळवून देण्याची घोषणा केली. परंतु रिपब्लिकन नेत्यांचे ऐक्य फार काळ टिकले नाही. डॉ.आंबेडकरांच्यासारखा चळवळीला नेता मिळाला नाही. राजा ढाले, नामदेव ढसाळ अशी मोजकी मंडळी सोडली तर चळवळीला सर्वांना बरोबर घेऊन जाणारा नेता मिळाला नाही. १९८४ मध्ये प्रकाश आंबेडकर यांचे नेतृत्व उदयास आले. रिपब्लिकनमध्ये मतांतर होत गेले. ऐक्याशिवाय भवितव्य नाही. इतर पक्षांनी दलित संघटना हाताशी धरून फायदा उठविला. १९९० ला जनता दलाला की कॉग्रेसला पाठिंबा दयायचा असा प्रश्न निर्माण झाला. यात पुन्हा मतांतर झाले. नेत्यात

मतभेद झाले. नेत्यांच्यात एकमत राहिले नाही. पुरोगामी विचार प्रत्येकानी आपल्या चौकटीत केला. बहुजनांच्या चळवळी हव्यातच. चळवळी म्हणजेच सर्वसामान्य दलितांचा तो आवाज आहे.[२५०] प्राचार्य कालेकर सरांच्या पुढे या संदर्भांत कार्य करण्याचा मनोदय आहे. बहुजन शिकला पाहिजे. शिक्षणाने समाजाला न्याय मिळेल असे त्यांना वाटते. सेवानिवृत्तीनंतर बहुजनाकरिता, गोरगरीबाकरिता स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रे काढण्याचा त्यांचा मानस आहे. किती मिळाले किती गमावलं यापेक्षा सामान्याचा विकास व चळवळ जीवंत राहणे गरजेचे आहे.

**३.५.२० श्री.पार्थ पोळके :**

प्रागतिक भारताचा इतिहास महात्मा जोतीराव फुले यांच्यापासून सुरू होतो. स्त्री शूद्र अत्यंजांच्या सर्व दु:खाचे मूळ अविद्येत शोधणारे म.फुले रचनात्मक नवनिर्माणाचे आद्य संकल्पक होते.[२५१] महाराष्ट्रातील दलित चळवळीचे लढाऊ, विचारवंत व उपक्रम कृतिशील नेते म्हणून पार्थ पोळके सरांचा परिचय आहे. भारतात पूर्वीच्या काळी अस्तित्वात असलेल्या वर्णव्यवस्थेत शुद्राला सर्वात खालचे स्थान होते. शूद्राचा स्पर्श किंवा सावलीसुध्दा दुषित करते असे मानले जात होते. त्यामुळे त्यांना अस्पृश्य असे म्हटले जाते. गावाचे बाहेर त्यांना रहावे लागत असे. लोकसंख्येत अनुसुचित जातीची संख्या १६ ते १७ टक्के आहे. इ.स.२००१ मध्ये त्यांची संख्या १६८० लाख एवढी होती.[२५२] महार, मातंग समाजातील जुनाट रूढीनुसार मरिआईला सोडलेला पोतराज अशी रूढी होती. अशा पोतराजाच्या पोटी पार्थ पोळके सरांचा जन्म झाला. उघडया अंगावर कमरेभोवती चिंध्या गुंडाळून नाचत नाचत चाबकाचे स्वत: चे अंगावर फटके मारत मारत उघडया अंगाचे प्रदर्शन करीत भिक मागणारी मंडळी, भिक मागणारा पोतराज अठरा विश्व दारिद्रय, डोक्यावर मरीआईचा देव्हारा घेऊन व वडील पोतराजाचा खेळ करून कसेबसे जगत होते. हे चित्र बदलायचे असा विचार करून याविरूध्द बंड केले. ते जर पुणे, नागपूर, मुंबईसारख्या ठिकाणी जनसंपर्कांत असते तर मोठे नेते म्हणून नावारूपाला असते. पार्थ पोळके कोल्हापूरला शिकत असताना भेटलेले मित्र प्रताप आसबे, प्रज्ञावंत गौतम, अशोक पांडराळे, लक्ष्मण रानपाखरे, रमेश दावरे, कुमार हुल्ली या मित्रांच्याकडून संघर्षाची जाणीव मिळाली. शिवाजी विद्यापीठ कॅम्पसने सरांना प्रबोधनाचा अर्थ दिला. कोल्हापूरहून ते सातारला आले. सातारमध्ये समाजवादी युवक दलात सहभागी झाले. त्यावेळी समाजवादी युवक दलात डॉ.नरेंद्र दाभोळकर, लक्ष्मण माने, दिनकर झिंब्रे, किशोर बेडकिहाळ, चंद्रकांत शेडगे, धनंजय कासकर, बाळासाहेब थोरात, प्रमोद कोपार्डे व विलास ढाणे इ.मित्र भेटले.[२५३] पार्थ पोळके सर शिवाजी विद्यापीठात झोनल, इंटर झोनल कुस्ती व स्विमिंगमध्ये कुशल होते.

**पोळके सरांचे लेखन साहित्य :**[२५४]

१. ‘आभरान’ आत्मकथन सन १९८५ साली प्रसिध्द. अ.या पुस्तकाला सर्वोत्कृष्ठ साहित्य पुरस्कार मिळाला ब.बंडोगोपाळ मुकादम पुरस्कार मिळाला क.मुंबई विद्यापीठात, मराठवाडा डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात एम.ए.अभ्यासक्रमात समाविष्ठ २.गाव कुसाबाहेरच्या बाया ३. आमी बी माणसं हाय ४.बहुजनांचा

सांस्कृतिक संघर्ष ५.हिंदु विरूध्द वैदिक ६.बुध्द धम्म ते धर्मांतर ७. अफझलखान कृष्णाजी भास्कर कुलकर्णी, प्रतापगडचा लढा ८.५५ कोटींनी गांधीहत्या, लोकसत्ता, लोकमत टाईम्स इ. मधून लेखन. चर्चासत्रात सहभाग.

**३.५.२१ सामाजिक कार्य** :

सन १९७० डॉ.१९७० डॉ.वैंशपायन मेडीकल कॉलेजच्या डोनेशनविरोधी आंदोलन.

सन १९७७ चवदार तळयाच्या सुवर्ण महोत्सवी सातारा ते महाड बदलाचा अभ्यास पायी मोर्चा.

सन १९७८ त्रिपुटी ता.कोरेगाव एक गाव एक पाणवठासाठी सत्याग्रह.

**राष्ट्रीय एकात्मता** :

मा.यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली १९८५ मध्ये सातारा जिल्हयात जातीय दंगली होऊ नये म्हणून मा.बबनराव उथळे, कोंडिंबा सावकर, गुलाबभाई बागवान, अच्युत जाधव, विजय मांडके, इ.सहकार्याने राष्ट्रीय एकात्मता परिषद घेतली. परिषदेला मा.यशवंतराव चव्हाण यांचेबरोबर नानासाहेब गोरे, निहाल अहमद, अरूण कांबळे होते.[२५५]

**झोपडपट्टी पुनर्वसन** :

इ.स. १९८५ पासून सातारा जिल्हयातील निरनिराळया धरणावरती काम करणाऱ्या असंघटीत कामगारांच्या लक्ष्मी टेकडीवर झोपडपट्टी वसविली. त्याचप्रमाणे सेंट्रींग काम करणाऱ्या मजूर कामगारासाठी सदर बझार झोपडपट्टी वसविली. माजी नगराध्यक्ष शिवाजीराव भोसले यांच्या सहकार्याने बोरींग काढून पाण्याची सोय केली. शाहूपुरी आकाशवाणी ते शाहूपुरी पाण्याची टाकीपर्यंत मा.ना.अरूण मेहता यांच्या फंडातून रस्ता तयार करून घेतला. धरणग्रस्त चळवळीत सक्रीय सहभाग घेतला.

**पार्थ पोळके यांचे रचनात्मक कार्य** :

१.कार्याध्यक्ष, समता शिक्षण प्रसारक मंडळ, सातारा   २.मुक बधीर विद्यालय, सातारा

३. मतिमंद विद्यालय, सातारा   ४.मूक बधीर विद्यार्थी वसतीगृह, अंबवडे खुर्द ता.जि.सातारा

५.अध्यक्ष, भिमाबाई आंबेडकर समता प्रतिष्ठान, सातारा

६.अध्यक्ष, मागासवर्गीय धरणग्रस्त समिती, सातारा

मराठवाडा विद्यापीठ नामांतरप्रश्नी अनेकवेळा कारावास[२५६]

**संदर्भसूची :**


१. जयवंत गुजर (संपा.), 'लोकहित' गौरविका' हिरक महोत्सव, वाई मे १९९२, गौरविक वाई, पृ.९२

२. कित्ता, पृ. ९२,९३

३. पाटील पी. डी. (संपा.), कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ १८५५ – १९५५, दि.२८.१२.१९५५, पृ.१३५

४. पाठक अरूणचंद्र (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, मराठी आवृत्ती १९९९,

५. कित्ता, पृ.६४५

६. कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल परिवर्तन, जिल्हा परिषद गौरव गाथा, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सातारा, लेख क्र.३

७. साप्ताहिक ग्रामोदधार, सातारा दि.१७.१२.१९५१

८. मिसाळ सवितादेवी, महाराष्ट्राचे भाग्यविधाते ना.बाळासाहेब देसाई, प्र.आ. १ फेब्रुवारी, १९६७, पृ.८

९. पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, पृ.६४६

१०. कित्ता, पृ.६४६

११. कित्ता, पृ.६४६

१२. कित्ता, पृ.६४७

१३. कदम संभाजीराव (संपा.), श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर सुवर्णमहोत्सवी स्मरणिका, डिसें. २००५, पृ.१२

१४. जगताप सुनिता (संपा.), आठवणींची पुष्पांजली, स्मृतीग्रंथ प्रकाशन, मुंबई ३० सप्टेंबर २०१३, विपीन वैराट, शिक्षण, पृ.५२

१५. शताब्दी महोत्सव स्मृतीग्रंथ (संपा.), सातारा शहर नगरपालिका, २६ जाने.१९५४, पृ.७४

१६. टिळक हायस्कूल, कऱ्हाडच्या स्थापनेचा मुळ ठराव, टिळक हायस्कूल, कऱ्हाड स्मृतिग्रंथ हिरक महोत्सव, डिसें.१९८१, सोमवार, दि. २ ऑगस्ट १९२०, संपादकीय मूळ ठराव छायांकित प्रत

१७. कऱ्हाड स्मृतिग्रंथ (संपा.), टिळक हायस्कूल, हिरक महोत्सव, डिसें.१९८१, पृ.८ व ९

१८. कित्ता, पृ.१९

१९. शताब्दी महोत्सव स्मृतीग्रंथ (संपा.), सातारा शहर नगरपालिका, २६ जाने.१९५४, पृ.७५

२०. परिवर्तन स्मरणिका (संपा.),, सातारा जिल्हा सन १९९०, पृ.११०

२१. कित्ता, पृ.११०

२२. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल १९७४–१९७५, पृ.१

२३. कित्ता, पृ.१

२४. पाटील विमला (संपा.), शिवगौरव सुवर्णमहोत्सवी स्मरणिका, सातारा, पाटील एन.डी., रयत शिक्षण संस्थेचे सामाजिक योगदान, १९९६, ९७, पृ.२३

२५. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल १९७४–१९७५, पृ.२

२६. कित्ता, पृ.४

२७. कित्ता, पृ.५

२८. कित्ता, पृ.६

२९. कित्ता, पृ.६

३०. कित्ता, पृ.७

३१. मॅथ्यू ए. व्ही., कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशन रयत शिक्षण संस्था प्र. आवृत्ती १९८८, पृ. २१८, २१९

३२. कित्ता, पृ.२०७

३३. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल, पृ.११

३४. कित्ता, पृ.२२६, २२७

३५. कित्ता, पृ.१६

३६. मॅथ्यू ए.व्ही., कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशन रयत शिक्षण संस्था प्र.आवृत्ती १९८८, पृ.२४१, २४२

३७. कित्ता, पृ.२६६

३८. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल १९७४–१९७५, पृ.१४

३९. कित्ता, पृ.१४

४०. कित्ता, पृ.१५

४१. कित्ता, पृ.९

४२. पाटील विमला (संपा.), शिवगौरव सुवर्णमहोत्सवी वर्ष स्मरणिका, १९९६–९७, छ.शिवाजी कॉलेज, सातारा, पृ.३८

४३. कित्ता, जमाखर्च, पृ.३९

४४. कित्ता, पृ.३९

४५. कित्ता, पृ.८२, ८३

४६. पाटील विमला (संपा.), शिवगौरव सुवर्णमहोत्सवी वर्ष स्मरणिका, १९९६–९७, छ.शिवाजी कॉलेज, सातारा, पृ.४०

४७. पाटील एन. डी. यांची प्राचार्य मा. के. यादव यांनी घेतलेली प्रदीर्घ मुलाखत, सुवर्णमहोत्सवी स्मरणिका १९९७, पृ.२३
४८. कित्ता, पृ.४१
४९. कित्ता, पृ. ४८
५०. कित्ता, पृ. ४९
५१. कित्ता, पृ.५०
५२. कित्ता, पृ. २२
५३. कित्ता, पृ. ३
५४. कित्ता, पृ. २
५५. वार्षिक अहवाल, रयत शिक्षण संस्था १९९४–१९९५, पृ.३
५६. अमृत महोत्सव (संपा.), अमृत महोत्सवी स्मरणिका, सन १९९९, पृ.३
५७. कित्ता, पृ.४
५८. कित्ता, पृ.६
५९. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल १९८४–१९८५, पृ.४८
६०. कित्ता, पृ.४८
६१. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल, अमृतमहोत्सवी वर्ष १९९४–१९९५, पृ.१६७ मलपृष्ठ
६२. रयत अमृत महोत्सवी स्मरणिका (संपा.), रयत शिक्षण संस्था १९९८–१९९९, पृ.मलपृष्ठ
६३. सुर्वे गजानन, डॉ.बापूजी साळुंखे (व्यक्ती व कार्य), शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे षष्टयब्दपूर्ती समिती कोल्हापूर, कराड, प.आ.१९८१, पृ.९२, ९३
६४. कित्ता, पृ. १००
६५. कित्ता, पृ. १०१, १०२
६६. साप्ताहिक रामप्रसाद, सोम दि.०८.०८.२०११, उदात्तविधायक शिक्षण प्रसारासाठी नवीन शिक्षण संस्था लेख, पृ.९, १०
६७. कित्ता, पृ. १०, ११
६८. सुर्वे गजानन, डॉ.बापूजी साळुंखे (व्यक्ती व कार्य), शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे षष्टयब्दपूर्ती समिती कोल्हापूर, कराड, प.आ.१९८१, पृ.११८,११९
६९. कित्ता, पृ. १३९, १४०
७०. बापूजी साळुंखे, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांची दैनंदिनी, संपा.डॉ.शरद साळुंखे, मलपृष्ठावरील मजकूर, प्रकाशन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, प्र.आ. ८ ऑ.१९८१, पृ.११०

७१. संस्कृती, वार्षिक अहवाल २०१०–११, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, पृ.११

७२. कित्ता, पृ. १२

७३. संस्कृती, वार्षिक अहवाल २००४–०५, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, पृ.१७

७४. कित्ता, पृ. लेख

७५. सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, महाराष्ट्र शासन, मार्च २०१०, पृ.२२

७६. कित्ता, पृ. २२

७७. कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचालपरिवर्तन, जिल्हा परिषद गौरव गाथा, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सातारा, लेखावरून

७८. सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, महाराष्ट्र शासन, मार्च २०१०, पृ.२८

७९. गोखले पु.पा., जागृत सातारा, लोकसेवा संघ सातारा, दुसरी आवृत्ती, १९६६, पृ.२७३, २७४

८०. कित्ता, पृ.लेख नं.१

८१. कित्ता, पृ.लेख नं.१

८२. कित्ता, पृ.लेख नं.१

८३. पाटणे संभाजीराव, सातारा ग्रंथालय संघ, सुवर्णमहोत्सवी वाटचाल, पृ.७

८४. पाटणे संभाजीराव, सातारा ग्रंथालय सुवर्णमहोत्सवी वाटचाल लेखातील व प्रास्ताविक, पृ.८

८५. कित्ता, पृ.८

८६. कित्ता, पृ.९

८७. लाड संतोष, सातारा जिल्हा ग्रंथालय संघ, इतिहास व कार्य, गौरवगाथा, सातारा जिल्हा ग्रंथालय संघ, १७८, सदर बझार, सातारा, प्र.आ., ८.३.२०१५, पृ.५६

८८. कित्ता, पृ.५७

८९. नगर वाचनालय सातारा १९९७–९८ वार्षिक अहवाल, पृ.१

९०. कित्ता, पृ.१२

९१. कित्ता, पृ.१३

९२. नगर वाचनालय सातारा १२५ वर्षांची वाटचाल १८५३ ते १९७८ श्री.वा.आचार्य (संपा), नगर वाचनालय सातारा, स्मरणिका २३.१२.१९७८, लेख नं.२

९३. आचार्य श्री.वा., नगरवाचनालय सातारा १२५ वर्षांची वाटचाल १८५३ ते १९७८ स्मरणिका २३.१२.१९७८, लेख नं.२

९४. आचार्य जोशी लक्ष्मणशास्त्री, गेल्या दिडशे वर्षातील वाई ग्रंथनिर्मिती परंपरा, नगरवाचनालय सातारा १२५ वर्षांची वाटचाल १८५३ ते १९७८ स्मरणिका २३.१२.१९७८, लेख नं.३

९५. कित्ता, पृ.लेख नं.३

९६. कित्ता, पृ.लेख नं.३

९७. सातारा जिल्हा ग्रंथालय संघ, इतिहास व कार्य, गौरवगाथा (संपा), सातारा जिल्हा ग्रंथालय संघ, १७८, सदर बझार, सातारा, प्र.आ., ८.३.२०१५, पृ.१०, ११

९८. कित्ता, पृ.११

९९. कित्ता, पृ.१५

१००. कांबळे प्रदीप, इथे ग्रंथाचे पानासोबत पंखही मिळतात, कोल्हटकर जोत्स्ना (संपा.), शतकोत्तर हीरक महोत्सव, २०१२–२०१३, नगर वाचनालय, सातारा, फेब्रु.२०१३, पृ.३९

१०१. संपादक सातारा जिल्हा ग्रंथालय संघ, गौरवगाथा, संघ वार्षिक अधिवेशने, पृ.१७

१०२. महाजन शां.ज., म.ग्रंथालय चळवळीचे शिल्पकार, प्र.आ.पुणे २०११, पृ.८०

१०३. समाजभूषण बाबुराव गोखले स्मारक समिती, रौप्य महोत्सवी अहवालावरून १९८७–२०१२

१०४. शतकोत्तर हीरक महोत्सव, अक्षरगौरव १८५३–२०१३, प्रकाशन बा.ग.जोशी फेब्रु.२०१३, यातील बेडकीहाळ रविंद्र शब्दप्रभू ग्रंथप्रेमी यशवंतराव चव्हाण यांचा लेख, पृ.६३

१०५. कित्ता, पृ.८४

१०६. सातारा जिल्हा ग्रंथालय संघ, गौरवगाथा, अहवालावरून, पृ.२५

१०७. पाटील पी.डी., संपादक कराड नगरपालिका शतसांवत्सारिका स्मृतीग्रंथ, सन १८८५ ते १९५५, पृ. ४३

१०८. मुलाखत–शिंदे संजय, नगर वाचनालय कराड, दि.१७.११.२०१५

१०९. कराड नगरपालिका मिटींग वृत्तांत, दि.१४.०९.१९९३

११०. ढवळे ना.वा. दैनिक सकाळमधील लेख , दि.१०.१०.१९९२

१११. ग्रंथपाल नगर वाचनालय कराड यांचे मुलाखतीवरून, दि.१७.११.२०१५

११२. दाभोळकर नरेंद्र, भ्रम आणि निरास, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, बारावी आवृत्ती, सप्टें.२०१३, पृ.४

११३. कित्ता, पृ.४

११४. दाभोळकर नरेंद्र, तिमिरातून तेजाकडे, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पाचवी आवृत्ती, ऑक्टो.२०१३, पृ.४१६

११५. कित्ता, पृ.४१८

११६. कित्ता, पृ.४१९

११७. मानव श्याम, वादळ अंधश्रध्देचे, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ, पुणे, सुधारित दुसरी आवृत्ती, ११ ऑगस्ट २०१४, पृ.१०४

११८. मानव श्याम, कित्ता, पृ.१०४ व १०५

११९. मानव श्याम, वादळ अंधश्रध्देचे, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ, पुणे, सुधारित दुसरी आवृत्ती, ११ ऑगस्ट २०१४, पृ.३४

१२०. दाभोळकर नरेंद्र, भ्रम आणि निरास, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, बारावी आवृत्ती, सप्टें.२०१३, पृ.८

१२१. दाभोळकर नरेंद्र, कित्ता, पृ.९, १०

१२२. कित्ता, पृ.४९, ५०

१२३. कित्ता, पृ.६४, ६५

१२४. कित्ता, पृ.९३

१२५. कित्ता, पृ.९३

१२६. कित्ता, पृ.९४

१२७. कित्ता, पृ.९५

१२८. दाभोळकर नरेंद्र, आर्डे प.रा. प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम, राजहंस प्रकाशन, पुणे ३०, १६ वी आवृत्ती, पृ.८१

१२९. कित्ता, पृ.८२

१३०. दाभोळकर नरेंद्र, आर्डे प. रा. यांनी दिलेली उत्तरे, प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, अकरावी आवृत्ती, सप्टें. २०१३, पृ.१० ते ३१

१३१. किर धनंजय, महात्मा जोतिराव फुले, पाप्युलर प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७३, पृ.९

१३२. ताटके निलीमा, महाराष्ट्रातील समाजसुधारक, डायमंड पब्लिकेशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २००९, पृ.१ ते ३

१३३. कित्ता, पृ.१५, १६

१३४. कित्ता, पृ.२८ ते ४२

१३५. दैनिक ऐक्य बुधवार दि. २१.८.२०१३ मुखपृष्ठ

१३६. दै.ऐक्य, दि.२१ ऑगस्ट २०१३

१३७. ताटके निलीमा, महाराष्ट्रातील समाजसुधारक, डायमंड पब्लिकेशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर २००९, पृ.८०

१३८. कित्ता, पृ.८०

१३९. कित्ता, पृ.८०

१४०. दै.सकाळ, सातारा, बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०१३, सकाळ, पृ.९

१४१. दै.सकाळ, सातारा, बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०१३, सकाळ, पृ.४

१४२. दै.सकाळ, सातारा, बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०१३, सकाळ, पृ.४

१४३. दै.सकाळ, सातारा, बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०१३, सकाळ, पृ.९

१४४. दै.ऐक्य, सातारा, बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०१३, डॉ.नरेंद्र दाभोळकर जीवन परिचय, पृ.३

१४५. दै.सकाळ, सातारा, बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०१३, अंधश्रध्देचा ध्यास, पृ.३

१४६. कुंभार अनुसया, दिपस्तंभ अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीकर्ते डॉ.नरेंद्र दाभोळकर, मैत्रेय प्रकाशन, एम.आय.डी.सी.डोंबविली पूर्व प्रकाशन क्र.१०७, प्र.आ.मार्च २०१५, पृ.१६

१४७. कित्ता, पृ.२७

१४८. दै.पुढारी, सातारा, बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०१३, समर्पित नेतृत्व, पृ.४

१४९. कित्ता, पृ.४

१५०. दै.पुढारी, शनि शिंगणापूर मंदिर स्त्रियांना प्रवेश, डॉ.नरेंद्र पुरोगामी विचार, पृ.४

१५१. कुंभार अनुसया, दिपस्तंभ अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीकर्ते डॉ.नरेंद्र दाभोळकर, मैत्रेय प्रकाशन, एम.आय.डी.सी.डोंबविली पूर्व प्रकाशन क्र.१०७, प्र.आ.मार्च २०१५, पृ.३०,३१

१५२. कित्ता, पृ.३१

१५३. कित्ता, पृ.३२

१५४. दाभोळकर नरेंद्र, तिमिरातून तेजाकडे, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पाचवी आवृत्ती, ऑक्टो.२०१३, पृ.१९५

१५५. कित्ता, पृ. १९८

१५६. कित्ता, पृ. २०३,२०४,२०५

१५७. कित्ता, पृ. २०५

१५८. दाभोळकर नरेंद्र, लढे अंधश्रध्देचे, छाया प्रकाशन, सातारा, दुसरी आवृत्ती, ऑगस्ट १९९९, पृ.२३, ८२

१५९. कित्ता, पृ. १२५,१४२,१९७

१६०. दाभोळकर नरेंद्र, भ्रम आणि निरास, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, बारावी आवृत्ती, सप्टें.२०१३, पृ.६

१६१. दाभोळकर नरेंद्र, आर्डे प.रा., प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, अकरावी आवृत्ती, सप्टें.२०१३, पृ. मनोगत

१६२. दाभोळकर नरेंद्र, अंधश्रध्दा विनाशाय, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, दहावी आवृत्ती, जून २०१३, पृ. ५ व ६

१६३. कित्ता, पृ. ८ ते ११

१६४. दाभोळकर नरेंद्र, विचार तर कराल ?, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, दहावी आवृत्ती, ऑक्टों. २०१३, पृ. लेखक मनोगत

१६५. दाभोळकर नरेंद्र, श्रध्दा अंधश्रध्दा, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, अकरावी आवृत्ती, सप्टें.२०१३, पृ.५ ते ७

१६६. कित्ता, पृ. ९ ते २६

१६७. दाभोळकर नरेंद्र, ठरलं ..डोळस व्हायचयं, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ, पुणे, सुधारित नवी आवृत्ती, १५ मार्च २०१०, पृ. ७

१६८. कित्ता, पृ. १०१

१६९. दाभोळकर नरेंद्र, तिमिरातून तेजाकडे, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पाचवी आवृत्ती, ऑक्टो.२०१३, पृ.५, ६

१७०. दाभोळकर नरेंद्र, बागवे माधव, मती भानामती, पृ.५, ६

१७१. दाभोळकर नरेंद्र, डॉ.दाभोळकर हमीद, प्रश्न मनाचे, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, चौथी आवृत्ती, ऑक्टो.२०१४, पृ.४, ५ मनोगत

१७२. कित्ता, पृ. ६, ७, १

१७३. दै.पुढारी, सातारा, बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०१३, भाई वैद्य पुरोगामी विचारवंत, पृ.४

१७४. कित्ता, पृ. ४

१७५. सप्तर्षी कुमार, विचारवंत कार्यकर्ते नरेंद्र दाभोळकर, दै.पुढारी, सातारा, बुधवार, दि.२१ ऑगस्ट २०१३

१७६. दै.ऐक्य, दि.३.५.१९८९ दाभोळकर यांचे आवाहन, दारूधंदयाविरूध्द महिला व संघटना यांनी एकत्र संघटीत व्हावे, वृत्तपत्र

१७७. दै.ऐक्य, दि.२१.८.१९९९ गणेश मूर्तीचे विसर्जन करू नका दान करा: दाभोळकर

१७८. दै.ऐक्य, दि.२१.८.१९९१ रोजी दाभोळकर यांनी श्रध्दा, अंधश्रध्दा व व्यवहार या संदर्भात मार्गदर्शन केले.

१७९. बेडकिहाळ किशोर (संपा.), विचारवेध संमेलन, अध्यक्षीय भाषणे, खंड १, सुगावा प्रकाशन, पुणे ३०, २६ डिसेंबर २००३, संकलन पृ.५,६

१८०. भोळे भा.ल. (संपा.), बेडकिहाळ किशोर, शतकांतराच्या वळणावर, आंबेडकर अकादमी, सातारा, १० जून २००६, मलपृष्ठ

१८१. बेडकिहाळ किशोर (संपा.), विचारवेध संमेलन, अध्यक्षीय भाषणे, खंड १, आंबेडकर अकादमी, डिसेंबर २००३, मलपृष्ठ

१८२. कित्ता, पृ.८

१८३. भोळे भा.ल. (संपा.), उपरोक्त, पृ.१२

१८४. बेडकिहाळ किशोर(संपा.), उपरोक्त, पृ.६

१८५. कित्ता, पृ.९

१८६. भोळे भा.ल. बेडकिहाळ किशोर (संपा.), उपरोक्त, पृ.१४

१८७. कित्ता, पृ.१५

१८८. कित्ता, पृ.१६

१८९. बेडकिहाळ किशोर (संपा.), परिवर्तन विचार, चिंतन आनि चिकित्सा, वसंत पळशीकर, लोकवाङमयगृह, फेब्रुवारी २०१३, मलपृष्ठ

१९०. किशोर बेडकिहाळ यांचे मुलाखतीवरून, दि.१७.११.२०१३

१९१. आंबेडकर अकादमी, सातारा, कार्यवृत्तांत, यादोगोपाळ पेठ, सतारा, कार्यअहवाल दिनांक नाही, प्रारंभीच्या कार्यवृत्तांत अहवालावरून

१९२. कित्ता, पृ.१३

१९३. कित्ता, पृ.१३

१९४. किशोर बेडकिहाळ यांचे मुलाखतीवरून, दि.१७.११.२०१३

१९५. शेख म.अ., सहकार्यवाह आंबेडकर अकादमी, कार्यवृत्तांत अहवाल, प्रकाशन आंबेडकर अकादमी, सातारा, प्र.आ. १९९८, पृ.२

१९६. कित्ता, पृ.३

१९७. कित्ता, पृ.४, ५

१९८. कोपार्डे प्रमोद मनोहर, कार्यवृत्तांत अहवाल, प्रकाशन आंबेडकर अकादमी, सातारा, प्र. आ. १९९८, पृ.६

१९९. कित्ता, पृ.७

२००. किशोर बेडकिहाळ, सातारा यांची मुलाखत, दि.१७.११.२०१३

२०१. मुरूमकर लता, दलित पँथर चळवळ, सुगावा प्रकाशन, ८६१/१, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट १९९५, पृ.१२

२०२. शहा घनश्याम अनुवादक चिकटे प्राची, भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन, १२५५ सदाशिव पेठ, पुणे ३०, मराठी आवृत्ती २००८, पृ.९४

२०३. कांबळे राजेंद्र, रिपब्लिकन पक्ष उदय आणि विकास, निर्मिती संवाद, कोल्हापूर, राजाराम रोड, कोल्हापूर, प्र.आवृत्ती, डिसें.२०१२, पृ.८

२०४. गाठाळ एस.एस., आंबेडकरी चळवळीचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन औरंगपुरा, औरंगाबद, प्र.आवृत्ती १ जाने.२०१०, पृ.७०

२०५. पाटील कर्मवीर भाऊराव, सत्यशोधकांची भाषणे (संपा.), दिलीप नलगे, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, व्दितीय आवृत्ती, मार्च २०१२, पृ.१९९

२०६. जगताप ए.एस., सातारा जिल्हयातील दलित चळवळ, पृ.५७, ५८, प्रबंध

२०७. फडके य.दि.आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे ३०, प्र.आ. १५ फेब्रु.१९९०, पृ.८४

२०८. सिंगारे अनिल, डॉ.घुले विठ्ठल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास १८९१ ते १९९४, अरूणा प्रकाशन , लातूर, प्र.आवृत्ती २६ नोव्हें.२००९, पृ.१३५

२०९. लिंबाळे शरदकुमार, भारतीय दलित पॅंथर, प्रकाशन सौ.नंदिनी गवळी, सम्राटनगर, कोल्हापूर ४१६००८, प्र.आ.जून १९९२, कोल्हापूर, पृ.१

२१०. कित्ता, पृ.१०, ११

२११. लिंबाळे शरदकुमार, भारतीय दलित पॅंथर, प्रकाशन सौ.नंदिनी गवळी, सम्राटनगर, कोल्हापूर ४१६००८, प्र.आ.जून १९९२, कोल्हापूर, पृ.१७, १८

२१२. गुरू गोपाळ, दलित पॅंथर व सम्यक क्रांती एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १० मार्च, १९८९ शोधनिबंध

२१३. कांबळे अरूण, वाटचाल दलित पॅंथर, लिंबाळे शरदकुमार (संपा.), पृ.५१

२१४. पोळके पार्थ, 'सिंध्दांत व व्यवहार दलित पॅंथर', लिंबाळे शरदकुमार (संपा.), पृ.१६४

२१५. जगताप ए.एस., सातारा जिल्हयातील दलित चळवळीचा अभ्यास,१९५२–२००२, पृ.११३

२१६. ढसाळ नामदेव, दै.केसरी, पुणे, दि. ९.१०.१९८४

२१७. यादव सुमित संभाजी, क्रांतिसिंह नाना पाटील (संशोधनात्मक ग्रंथ), प्रकाशन – सातारा जिल्हा इतिहास परिषद, प्र.आ. ३० जाने.२०१५, मलपृष्ठ

२१८. सिंगारे अनिल, घुले विठ्ठल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास १८९१ ते १९९४, अरूणा प्रकाशन , लातूर, प्र.आवृत्ती २६ नोव्हें.२००९, पृ.६६

२१९. नाईक तु.बा. छ.शाहू महाराज, युनव्हर्सल प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आवृत्ती, १९७४, पृ.४२

२२०. मुळे महावीर, सत्यशोधक प्रबोधनकार आणि कर्मवीर, सुनिता प्रकाशन, प्र.आ. २६ जून २००६, मु.पो.काकडवाडी, जि.सांगली, पृ.९८, ९९

२२१. कित्ता, पृ. १००, १०१

२२२. यादव सुमित संभाजी, क्रांतिसिंह नाना पाटील (संशोधनात्मक ग्रंथ), प्रकाशन – सातारा जिल्हा इतिहास परिषद, प्र.आ. ३० जाने.२०१५, पृ.२६५

२२३. खराट संभाजी, सत्यशोधक चळवळ वाटचाल आणि चिकित्सा, प्रकाशन अरूण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, प्रथम आवृत्ती, जुलै २००५, पृ.२२३,२२४

२२४. गायकवाड प्रदीप संपादक , डॉ.बाबासाहेब आंबेदकर यांची समग्र भाषणे खं.१, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर, प्र.आ. २००१, पृ.२९

२२५. जगताप अनिल मुलाखतीवरून, दि.२३.११.२०१५

२२६. चव्हाण डी.डी., आपला पाटण तालुका, जनसेवा सामाजिक संस्था, पाटण, प्र.आ.१५ जून २०१४, पृ.१३८, १३९

२२७. कित्ता, पृ. १३९, १४०

२२८. दै.ऐक्य बुधवार दि.२१.०८.२०१३

२२९. जगताप अनिल मुलाखतीवरून, दि.२३.०१.२०१५

२३०. चव्हाण डी.डी.,आपला पाटण तालुका, जनसेवा सामाजिक संस्था, पाटण, प्र.आ.१५ जून २०१४, पृ.१३६

२३१. कित्ता, पृ. १४४

२३२. कित्ता, पृ. १४४

२३३. लिंबाळे शरदकुमार (संपा.), दलित चळवळ, सकटे मच्छिंद्र, मातंग चळवळ आणि मी, पृ.११५, प्र.आ.एप्रिल १९९१, कोल्हापूर, पृ.११३, ११४

२३४. कित्ता, पृ. ११४

२३५. सकटे मच्छिंद्र, मातंग चळवळ आणि मी, पृ.११५

२३६. कित्ता, पृ. ११६

२३७. कित्ता, पृ. ११८, ११९, १२०

२३८. केंगार रघुनाथ सरांची मुलाखत, सोमवार, २१ मार्च २०१६ वेळ ११ ते १.३०

२३९. कित्ता

२४०. कित्ता

२४१. कित्ता

२४२. रघुनाथ केंगार सरांची मुलाखत, दि.२१.०३.२०१६

२४३. कित्ता

२४४. कित्ता

२४५. कित्ता

२४६. कालेकर बी.एन. सरांची मुलाखत, बुधवार, दि.१६ मार्च २०१६

२४७. कित्ता

२४८. कित्ता

२४९. कित्ता

२५०. कित्ता

२५१. पाटील पंढरीनाथ सीताराम, म.जोतीराव फुले, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर, प्रथम आवृत्ती, १ जुलै १९२७, पृ.मलपृष्ठ

२५२. देवगावकर एस.बी., देवगावकर शैलजा, डॉ.डुमरे जयमाला, सामाजिक चळवळी, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती, जुलै २०१४, पृ.१७०–१७१

२५३. पोळके पार्थ – आभरान, प्रास्ताविकातून व मुलाखतीवरून दि.२५.१०.२०१४

२५४. पोळके पार्थ सरांची मुलाखत, दि.२५.१०.२०१४

२५५. कित्ता

२५६. कित्ता

**प्रकरण चौथे**

## राजकीय नेतृत्व : यशवंतराव चव्हाण

**४.१ प्रस्तावना :**

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे एक लोकोत्तर थोर नेते म्हणून ओळखले जातात. यशवंतराव महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील कमालीचे दारिद्रय असलेल्या शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेले एक असामान्य नेते होते. आपल्या कर्तृत्वाने त्यांनी महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला. ते कराडचे सुपुत्र होते. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, पार्लमेंटरी सेक्रेटरी, मुख्यमंत्री, संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान अशी विविध पदे त्यांनी सांभाळली. भारतीय स्वातंत्र्य लढा, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, कृषी, औद्योगिक सूत्र, संगीत, नाटय, कला इत्यादी क्षेत्रात त्यांनी केलेले काम उल्लेखनीय आहे.

**जन्म व बालपण :**

जुन्या सातारा जिल्हयातील देवराष्ट्रे नावाच्या छोटया खेडयात यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी झाला.[१] तत्कालीन ग्रामीण भागात व्यक्तीविकासाची कसलीही साधने उपलब्ध नव्हती. यशवंतरावांचे मूळ गाव ढवळेश्वर, ता.खानापूर आहे.

**शिक्षण :**

यशवंतराव यांचे कुटुंब कराडला स्थलांतरीत झाले व ते कराडच्या शाळेत जाऊ लागले. सन १९१७ साली प्लेगच्या साथीत वडीलांचे निधन झाले. वयाच्या चार वर्षातच पिताश्रींचा आधार तुटला. यशवंतरावांच्या आईचे नाव विठामाता. स्वातंत्र्याच्या आंदोलनात यशवंतराव १४ ते १५ वर्षाचे असताना सहभागी झाले. १९३० ते १९३२ कायदेभंगाच्या चळवळीत यशवंतरावांना १८ महिन्यांची शिक्षा झाली.[२] घरची गरीबी, अपुरे शिक्षण अशा स्थितीत यशवंतराव लढयात सहभागी झाले. १९३४ मध्ये ते शालांत परीक्षा उत्तीर्ण झाले. १९३८ मध्ये इतिहास व अर्थशास्त्र विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी.ए. पदवी त्यांनी मिळविली. सन १९४० मध्ये पुणे येथे कायदयाची परीक्षा उत्तीर्ण झाले. भास्करराव जाधव यांच्या निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने ते राजकारणात परिचीत झाले.[३]

**यशवंतराव चव्हाणांचा स्वातंत्र्य चळवळीतील प्रत्यक्ष सहभाग :**

सार्वजनिक कार्याकडून यशवंतराव देशाचे स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नाला लागले. २६ जानेवारी १९३० रोजी यशवंतराव यांनी कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये तिरंगा फडकाविला.[४] तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींच्या भाषणांनी यशवंतराव व शेकडो तरूण स्वातंत्र्य चळवळीत ओढले. यशवंतराव म्हणतात, '' शास्त्रींच्या एकाच भाषणातील पहिल्या वाक्याने आमची मने भारली गेली. तुम्ही बसला आहात तो घाट जसा गरम झाला आहे. तशी तुमची मने गरम झाली पाहिजेत. तुमच्याकडे ही देशाची मागणी आहे.''[५] भगतसिंग यांची अटक व फाशी यामुळे यशवंतराव यांनी स्वातंत्र्यलढयाला वाहून घेण्याची प्रतिज्ञा केली. शाळेत तिरंगा

फडकाविला. वंदे मातरम घोषणा दिल्या. पोलीस चौकशी झाली. यशवंतराव म्हणाले, '' हे सर्व मी केले आहे. तसे करत रहाण्याचा माझा निर्धार आहे.''[६] यशवंतरावांना जेल झाली. मॅट्रीक झाल्यावर उच्च शिक्षणासाठी ते जून १९३४ मध्ये कोल्हापूरला गेले. तरीसुध्दा शिकत असताना स्वातंत्र्यलढयात ते प्रत्यक्ष भाग घेतच असत. म.गांधीजींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयात त्यांनी प्रत्यक्ष भाग घेतला. सातारा जिल्हाभर फिरून संघटना बांधण्याचे काम केले.[७]

**सन १९४२ भारत छोडो आंदोलन :**

सन १९४२ सालच्या 'भारत छोडो' या अखेरच्या आंदोलनात यशवंतराव यांनी सातारा जिल्हयाचे नेतृत्व केले. यात सध्याच्या सांगली जिल्हयाचा बराच भाग अंतर्भूत होता. ८ ऑगस्ट १९४२ रोजी कॉग्रेस कार्यकारिणीने ब्रिटीश सत्तेसाठी चलेजाव चा ठराव केला. ९ ऑगस्ट रोजी क्रांती मैदानावरील अधिवेशनात हा ठराव मांडायचा होता.[८] सन १९४२ च्या प्रचंड प्रक्षोभानंतर यशवंतराव आणि त्यांच्या अनुयायांनी भूमिगत चळवळी अंतर्गत संपूर्ण सातारा, कराड, तासगाव, सांगली परिसरात जाज्वल्य देशभक्त फौज तयार केलेली लक्षात येते. या कालखंडात यशवंतराव चव्हाण यांचे पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा होता. पोलिसांचा एवढा पाठलाग असतानासुध्दा ते व त्यांचे अनुयायी अत्यंत आक्रमकपणे कार्यरत असलेले दिसतात. यशवंतराव चव्हाण अत्यंत संयमी व धिरोदात्त होते. त्यांनी कराड, कुंडल, तासगाव, सांगली येथून हजारो देशभक्तांची युवकांची फौज निर्माण केली. यशवंतराव यांनी या काळात ब्रिटीश सत्तेचे वर्चस्व, भय कमी करण्याचे प्रयत्न केले.[९] सरकारविरोधी मोर्चे वाढत चालले होते. चाललेल्या स्थितीचे वर्णन यशवंतरावजी करतात, '' इस्लामपूर व वडूज या दोन ठिकाणी जे मोर्चे निघाले त्या ठिकाणी पोलिसांच्याकडून अत्याचार झाला. यावरून स्पष्ट होते की ब्रिटीश सरकारने या मोर्चाची हाय घेतली होती.[१०] सन १९४२ चे लढयाबाबत ते म्हणतात, '' कराड, पाटण, तासगाव, वडूज व इस्लामपूर या ठिकाणचे झालेले मोर्चे हे एक १९४२ च्या लढयातील सोनेरी पान आहे असे मी मानतो.'' मोठया धडाडीने व कुशलतेने यशवंतराव चव्हाण ही चळवळ चालवित होते. १४ जानेवारी १९४३ रोजी सौ.वेणूताई चव्हाण यांना कराड पोलिसांनी अटक केली.''[११] पुढे पुढे ही चळवळ प्रतिसरकार व पत्रीसरकार नावानी ओळखू लागली.

**यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय प्रवाह :**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९३० मध्ये सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात मोठया उत्साहाने प्रचार करीत फिरत होते. लोकांच्याकडे ब्रिटिशांचे राज्य नष्ट करणे हीच भावना प्रभावी होती. सातारा जिल्हयात राष्ट्रीय क्रांतीचा नवा अर्थ पाहणारा एक लहानसा गट होता. यात यशवंतराव चव्हाण चमकून दिसू लागले.[१२] सन १९३०–३२ च्या कायदेभंग चळवळीत प्रभातफेरी, झेंडावंदन, बुलेटीन चिकटवणे यासारखी सामान्य कार्यकर्त्यांची कामे त्यांनी जेवढया तन्मयतेने केली. तेवढयाच तन्मयतेनी उच्चपदे सांभाळली. लहानमोठया कार्यकर्त्यांशी सहज समरस होण्याचा त्यांचा स्थायीभाव होता. ते म्हणायचे, '' अखेरपर्यंत मी कॉग्रेसचा शिपाई आहे आणि मागे कुणीही नसले तरी कॉग्रेसचा झेंडा आणि विचार कधीच

सोडणार नाही.[१३] स्वातंत्र्यचळवळीत म.गांधीजींच्या 'सत्य, अहिंसा व सत्याग्रह' या विचाराचे विनम्र पाईक झाले.[१४]

### ४.१.२ सन १९५० ते १९६० दशकातील लोककल्याणाचे निर्णय :

इ.स. १९५६ मध्ये यशवंतराव व्दिभाषिक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रात यशवंतराव व कॉग्रेसविरोधी वातावरण तयार झाले. एवढा विरोध असूनही यशवंतराव महाराष्ट्रावर रागावले नाहीत त्यांनी संयम दाखविला. ते जनतेची दु:खे जाणत होते. यशवंतराव पुरोगामी विचाराचे होते. त्यांच्या विचाराला शास्त्रीय बैठक होती. त्यांचे ठायी कळकळ होती, त्यांच्याकडे दूरदृष्टी होती.[१५] कराड उत्तरमधून यशवंतरावांना निसटता विजय मिळाला. कॉग्रेसला प्रचंड विरोध होऊनसुध्दा यशवंतराव निवडून आले. कॉग्रेसला बहुमत मिळाले व यशवंतराव पुन्हा मुख्यमंत्री झाले.[१६] १ मे १९६० रोजी महाराष्ट्र एक घटक राज्य म्हणून अस्तित्वात आले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांची निवड झाली.[१७]

ना.यशवंतराव यांनी मुख्यमंत्री म्हणून सुत्रे हातात घेतली तेव्हा खूप समस्या होत्या. त्यांनी म्हटल्यानुसार महाराष्ट्राचे राजकारण ही मोठी समस्या होती. कारण उघड होते महाराष्ट्राकरिता जो संघर्ष करावा लागला त्याचे घाव अगदी ताजे होते. सर्वच पक्षाने एकदिलाने झगडा केला होता. यशवंतराव या स्थितीचे वर्णन 'भंगलेले मन' असे करतात.[१८] ५ जाने.१९६० रोजी सांगली सभेत भाषण करताना यशवंतराव म्हणाले, '' महाराष्ट्राचे भावनिक ऐक्य घडविणे ही मोठी व गरजेची बाब होती.''[१९] राज्य मराठयांचे होणार किंवा मराठी लोकांचे होणार याबद्दल दलित, अल्पसंख्यांकांना व उच्चवर्णियांना चिंता वाटत होती. मराठी व अमराठी व्यापारी उद्योगपती साशंक होते.[२०] या पार्श्वभूमीवर राज्याची सत्तासूत्रे यशवंतराव यांनी घेतली. सत्ता हातात घेताच त्यांनी आपल्या डोळयासमोर तीन उद्दिष्टे समोर ठेवली. कार्यक्षम प्रशासनाच्या माध्यमातून चोख राज्यकारभार करणे, आर्थिक विकास घडविणे, पंचवार्षिक योजनेची काटेकोर अंमलबजावणी करणे.[२१]

याखेरीज विविध राजकीय पक्ष विरूध्द कॉग्रेस हा संघर्ष होता. थोडक्यात विरोधी पक्ष बलवान होता. पक्ष संघटनेअंतर्गंत महाराष्ट्रीयन नेते व दिल्लीतील नेते यांच्या कात्रीत महाराष्ट्र सरकार मंत्रीमंडळ होते. जुन्या आणि नव्या नेत्यामध्ये सत्ता स्पर्धा होती. शिवाय विदर्भ, मराठवाडा व मुंबई राज्यातील विभाग, यातील भिन्न राजकीय संस्कृती प्रथमच एकत्र येत आहेत. यावर यशवंतराव चव्हाण यांनी विचार चिंतन केलेले दिसून येते. या दोन्ही आव्हानांना तोंड देण्यासाठी यशवंतराव यांनी आपले वैशिष्टयपूर्ण 'बेरजेचे राजकारण' सुरू केले. विरोधीपक्षाप्रती चव्हाणांचे धोरण नेहरूंच्या धोरणाचा एक भाग होता. यशवंतराव यांनी हाच धडा महाराष्ट्र विधीमंडळात गिरविला.[२२] यशवंतराव यांनी राज्यात सहमतीचे राजकारण केले. मराठी भाषिक भाग म्हैसूर राज्यात घातला गेल्याने राज्यात सीमावाद होता. संयुक्त महाराष्ट्र समिती विधीमंडळात व बाहेर वारंवार प्रश्न उपस्थित करीत होती. सहमतीच्या राजकारणाने हा प्रश्न तडीस लावला. विरोधकांचे

मागणीचा त्यांनी अनादर केला नाही. उलट हा प्रश्न ११ मार्च १९६० रोजी केंद्राने सोडवावा असा ठराव केला. या प्रश्नावर दि. २३.०७.१९६० व ०७.०२.१९६१ मध्ये त्यांनी निवेदने केली. हा प्रश्न चळवळीच्या मार्गाने सुटणार नाही असे सांगितले.[२३]

४.१.३ **शेती व शेतकरी यांचेविषयी यशवंतराव यांचे कार्य** :

शेतीत कष्ट करणारा भूमिपुत्र शिक्षणापासून वंचित आहे. तो अज्ञानी असल्याने नवीन तंत्र, नवीन शास्त्रीय दृष्टीकोण यापासून दूर आहे म्हणून महाराष्ट्रात शेती, शिक्षण, शेती संशोधन, गतीमान होण्यासाठी यशवंतराव यांनी राहुरी जि.अहमदनगर येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, विदर्भात कृषी विद्यापीठ निर्माण केले. त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी सहकार्य केले.[२४]

**कसेल त्याची जमीन** :

मुंबई राज्यात नवीन कुळ कायदा लागू करून कसेल त्याची जमीन हे तत्व स्विकारले. यामुळे शेती मालकीच्या संदर्भात प्रचंड क्रांती झाली.

**सहकाराला चालना** :

यशवंतराव यांनी सहकारी संस्थांचा विकास घडवून आणला. सहकारातून समाजवाद निर्माण होईल अशी त्यांची धारणा होती. आज सहकार चळवळ देशभर पसरली आहे. याचे द्रष्टेपण यशवंतरावांना दिले पाहिजे. शेतीसाठी कर्जपुरवठा करणे, शेतीमालाची विक्री करणे, घरबांधणी, दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन इत्यादी सहकार संस्थांना चालना दिली. १९५७ मध्ये यशवंतरावजी सरकारने राज्यामध्ये १८ सहकारी साखर कारखाने उभे केले. आज सहकारी क्षेत्रात १७३ सहकारी साखर कारखाने उभे केले आहेत.

**पाटबंधाऱ्याच्या योजना** :

यशवंतराव यांनी पाटबंधारे मंडळाची स्थापना केली. प्रा.धनंजयराव गाडगीळ, स.गो.बर्वे व दत्ता देशमुख यांचे सहकार्य मिळाले. कोयना जलविद्युत योजनेचा प्रारंभ १ मार्च १९५८ रोजी यशवंतरावांचे हस्ते झाला. या योजनेतील पहिले जनित्रही १६ मे १९६२ रोजी त्यांच्या हस्ते सुरू झाले. मराठवाडयातील पूर्णा प्रकल्प, निरा नदीवरील वीर धरण प्रकल्प तसेच विदर्भातील पारस थर्मल पॉवर स्टेशन इ.कामे यशवंतराव यांनी आपल्या कारकिर्दीत पूर्ण केली.[२५]

**मोफत शिक्षण योजना** :

मोफत शिक्षणाची सोय राज्यात प्रथमच सुरू केली. सातारला कर्मवीर भाऊरावांनी रयत शिक्षण संस्थेचे माध्यमातून शैक्षणिक चळवळ उभी केली. शिक्षणाचा प्रचंड प्रवाह खेडोपाडी पोहोचला. मराठवाडयात शिक्षण प्रसाराकरिता यशवंतराव यांनी स्वतंत्र विद्यापीठाची शिफारस केली. आदिवासीच्या घरापर्यंत शिक्षण पोहचविण्याकरिता आश्रम शाळा योजना चालू केली.[२६]

**महार वतन पध्दत रद्द व भूमिहिनांना जमीन वाटप**:

यशवंतराव यांनी ही महारवतन पध्दत रद्द करण्याचा कायदा केला. दलितांना हजारो वर्षाच्या

गुलामगिरीतून मुक्त केले. महारवतन रद्द करूनसुध्दा मागासवर्गीयांच्या पोटाचा प्रश्न सुटला नव्हता. हा भूमिहीन वर्ग भूकेला होता. या भूमिहिनांच्या भाकरीसाठी पोटासाठी जमीन दया अशी शासनाकडे मागणी होती. दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू केले. ही न्याय मागणी रास्त मानून यशवंतराव यांनी भूमिहीनांना जमीन वाटपाचे काम सुरू केले. हा क्रांतिकारी निर्णय होता.[२७]

**बौध्दांना सवलती** :

यशवंतराव चव्हाण यांच्यावर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा प्रभाव होता. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलन व हरीजन मुलांच्या शिक्षणाचा उपक्रम हाती घेतला. त्याचे उदघाटनाकरिता विठ्ठल रामजी शिंदे यांना निमंत्रित करण्यासाठी यशवंतराव कराडहून पुण्याला गेले. यशवंतराव तेव्हा मॅट्रीकला होते.[२८] हरिजनांनी बौध्दधर्म स्विकारल्याने बौध्द धर्मियांना सवलती देण्याचा निर्णय यशवंतराव यांनी मान्य केला. कारण यशवंतरावांच्यावर विठ्ठल रामजी शिंदे यांचा संस्कार होता.[२९]

**प्रशासकीय विकास** :

महाराष्ट्रात १९६० मध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती, ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय पंचायत राज्य अस्तित्वात आणण्यासाठी मुख्यमंत्री चव्हाण यांचे मोठे योगदान आहे. लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यासाठी राज्यात ११ ठिकाणी त्यांनी सन १९६२ मध्ये प्रशिक्षण केंद्र सुरू केले. यशवंतराव रयतचे अध्यक्ष असताना १९६२ मध्ये राज्य प्रशिक्षण केंद्रे सातारा येथे सुरू केले. आज त्याला ५० वर्षे झाली तरी त्याचे काम अव्याहतपणे चालू आहे.[३०]

**४.१.४ संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची कामगिरी** :

चीनने आक्टोंबर १९६२ मध्ये भारतावर आक्रमण करून 'मॅकमोहन रेषा' ओलांडली. ईशान्येकडील ३०००० चौ.मैल प्रदेश काबीज केला. भारतीय सैन्य शौर्याने लढले परंतु त्यांचा टिकाव लागला नाही. भारताची मानहानी झाली. संरक्षणमंत्री व्ही.के.कृष्ण मेमन यांचे नेतृत्वाबद्दल ओरड झाली. दुबळे, कचखाऊ, नेतृत्वाने भारताची मानहानी झाली. त्यांचेबद्दल जनमत प्रक्षुब्ध झाले.पं.नेहरूंनी यशवंतरावांना दिल्लीला बोलाविले.[३१] नेहरूंना यशवंतराव यांनी पूर्ण सहकार्य देण्याचे ठरविले. यशवंतराव यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे खाली ठेवली व १२.११.१९६२ रोजी भारताचे संरक्षणमंत्री म्हणून सूत्रे हातात घेतली. विदर्भ नेते मारोतराव कन्नमवार यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. २१.११.१९६२ रोजी सकाळी ९ वाजता राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी यशवंतरावांना संरक्षण मंत्रीपदाची शपथ दिली. योग किती विलक्षण बघा. त्याच दिवशी चीनने एकतर्फी युध्दबंदीची घोषणा केली.[३२] यशवंतराव यांनी नेफा व लदाख युध्दभूमीस समक्ष भेट दिली. युध्द आघाडीला भेट देणे तेथे वास्तव्य करणाऱ्या जवानांच्या हालअपेष्टा प्रत्यक्ष अनुभवाव्यात आघाडीवर लढणाऱ्या जवानाचे जीवन अनुभवावे हा युध्दभेटीचा प्रमुख उद्देश होता.[३३]

**संरक्षणपदाची आव्हाने** :

यशवंतराव यांनी रोज सकाळी ९.३० ला लष्करी तिन्ही दलाच्या प्रमुखांची बैठक घेऊन चर्चा

करण्याचा उपक्रम राबविला.[३४] संरक्षण विषयक समस्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी विविध सभा स्थापन केल्या. लोकांच्या मनात संरक्षणाचे संदर्भांत जागृतीकरीता त्यांचा सहभाग निर्माण होण्याचे प्रयत्न केले. संरक्षणाकरीता ५००० कोटीची खर्चाची योजना २३.०३.१९६४ रोजी यशवंतराव यांनी लोकांचे समोर ठेवली. पंचवार्षिक योजनेत ४५ स्काड्रनची हवाई दलाची उभारणी करणे. शस्त्रास्त्र वाढ, जवान प्रशिक्षण, दैनंदीन गरजा, माऊंटन डिव्हीजन डोंगरी सेना, नवीन सहा तुकडया तयार केल्या. संरक्षण साहित्य उत्पादनाकरीता नव्या सहा कारखान्याची उभारणी केली. वस्तुखरेदीचा प्रस्ताव लोकसभेपुढे ठेवला व प्रभावी समर्थन केले. वृत्तपत्रांनी व लोकांनी मनापासून स्वागत केले.[३५]

**भारत पाकिस्तान युध्द :**

भारत पाकिस्तान यांच्यातील युध्द सन १९६५ मध्ये झाले. या संघर्षाचे मूळ कारण काश्मीर हेच होते.१.९.१९६५ रोजी पहाटे ३.३० वाजता शक्तीमान तोफांच्या भडीमारात छांब भागात पाकिस्तानने ऑपरेशन ग्रँड सुरू केले. पाकच्या १२ पायदळ तुकडीने या प्रदेशात तिन्ही भागात तिन्ही बाजूंनी हल्ला केला. भारतीय बनावटीच्या नॅट लढाऊ विमानांनी पाक अमेरिकन बनावटीची एफ ८६ सेबरजेट ही विमाने पाडली. यामुळे भारतीय सैनिकात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. ३.९.१९६५ ला भूसेना व हवाईसेना प्रमुखांसमवेत पंतप्रधानांची प्रदीर्घ चर्चा झाली. देशाची उद्दिष्टे निश्चित केली. १.बळाने काश्मीर घेण्याच्या पाकिस्तानच्या प्रयत्नापासून रक्षण करणे. २.पाक सेनादलाची आक्रमणाची शक्ती नष्ट करणे., ३.सदरची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पाकचा आवश्यक तितका प्रदेश व्यापणे व समाधानकारक निर्णय झाल्यावर तो प्रदेश सोडून देणे. ही युध्दाची दिशादर्शक उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.[३६] अरूणकुमार वैद्य यांच्या नेतृत्वाखाली पाकचे ५ पॅटन रणगाडे नष्ट केले. १० सप्टें.भारतीय ३ ग्रेनेडिअर्सन हवालदार हमीदने तीन पॅटन रणगाडे नष्ट केले तो जागेवर ठार झाला. त्यानंतर लढाईचा कल भारताकडे झुकला. २२ सप्टेंबरला पाकिस्तानने युध्दबंदीचा प्रस्ताव स्विकारला. भारताने ७२० चौ.मैलाचा प्रदेश व्यापला होता तर पाकिस्तानने ४०० मैलांचा प्रदेश व्यापला होता.[३७]

**४.१.५ यशवंतराव व अर्थकारण :**

राजकीय क्षेत्रात सर्वांना समान संधी असावी असे त्यांना वाटत होते. १४.११.१९६६ ते २५.०६.१९७० पर्यंत त्यांच्याकडे गृहखाते होते. या काळात कॉंग्रेसचे विभाजन, बँकांचे राष्ट्रीयीकरण, गरीबी हटाव कार्यक्रम, असे अनेक प्रश्न अर्थमंत्रालयासमोर होते. अन्नधान्य समस्या, व्यापार, बेरोजगार वाढ अशा स्थितीत त्यांनी अनेक निर्णय घेतले. ४ थ्या पंचवार्षिक योजनेने १९६९ ते १९७४ त्यांनी महागाई रोखण्यासाठी प्रयत्न केले. दारिद्रय निर्मूलन, रोजगार याकडे त्यांनी लक्ष दिले. १९७४ ते ७५ च्या अर्थसंकल्पात अर्थव्यवस्था ठिक करण्याचे प्रयत्न केले. म्हणूनच या देशात शेतकऱ्यांची क्रांती झाली पाहिजे हे एन.एन.रॉय यांचे मत ही त्यांना मान्य होते.[३८]

**गरीबांना मोफत शिक्षण** :

ग्रामीण भागातील वाडयावस्तीवर राहणारी मुलेमुली पैशाच्याअभावी शिक्षणापासून वंचित राहतात. शिक्षणाकरिता रू.१२०० चे आत उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलामुलींना मोफत शिक्षण केले.[३९] भारतीय राज्यघटनेच्या ४६ व्या कलमानुसार सरकारने मागासलेल्या लोकांच्या हिताकडे खास लक्ष देण्याची तरतूद केली. गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याचा क्रांतिकारक निर्णय घेणारे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण देशातील पहिले मुख्यमंत्री होते व हा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे पहिले घटक राज्य होय.[४०]

**मराठवाडा विद्यापीठ** :

मराठवाडयातील गरीबांची मुले हुशार असून आर्थिक स्थितीमुळे त्यांना शिक्षण घेता येत नव्हते. उच्च शिक्षणाची सर्वांना समान संधी मिळावी म्हणून दि.२३.०८.१९५८ रोजी पंतप्रधान पं.नेहरू यांच्या हस्ते मराठवाडा विद्यापीठाची स्थापना केली. स्वागतपर भाषणात यशवंतराव म्हणतात, ''उच्च शिक्षणाची दारे आज तुमच्यासाठी उघडी झाली. या संधीचा लाभ दलित वंचित उपेक्षितांनी घ्यावा. तुम्हाला काही कमी पडून देणार नाही अशी ग्वाही देतो. पुढे खर्चाच्या ९० टक्के अनुदान देण्याच्या योजनेने मराठवाडयात शिक्षणाला गती मिळाली.[४१]

**शिवाजी विद्यापीठ** :

द.महाराष्ट्रातून उच्च शिक्षणाच्या प्रसाराच्या दृष्टीने १८.११.१९६२ रोजी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना राष्ट्रपती राधाकृष्णन यांचे हस्ते झाली.[४२] विद्यापीठ शिक्षण हे सर्वांसाठी खुले होऊन गरीब शेतकऱ्यांची मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. या संदर्भांत भा.ल.भोळे म्हणतात, '' शिक्षणाची शहरी अभिमुखता बदलून त्यास ग्रामीण अभिमुखता प्राप्त झाली. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाची स्थापना प्रतिकात्मक म्हणता येईल.

**सैनिक शाळा** :

शिक्षणाला सामर्थ्याची जोड मिळावी या उद्देशाने २३.०६.१९६१ ला त्यावेळचे भारताचे संरक्षणमंत्री कृष्ण मेमन यांच्या हस्ते सातारा सैनिक स्कूलची स्थापना केली. त्यामुळे नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्याची सोय झाली. सातारा सैनिक स्कूल हे भारतातील पहिले सैनिक स्कूल आहे. आज या धर्तीवर प्रत्येक राज्यात सैनिक स्कूल उभे आहे.[४३] याशिवाय आदिवासी मुलांचेसाठी आश्रमशाळा काढल्या. तसेच कराड व औरंगाबाद येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापन केली. सन १९६१ मध्ये संमत झालेला सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा कायदा १ मे १९६२ पासून अमलात आणला. सत्तेचे विकेंद्रीकरण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले घटक राज्य आहे. जि.प.व पंचायत राज्य स्थापनेमुळे प्रा.शिक्षण जि.प.कडे सोपविण्यात आले. थोडक्यात ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार वेगाने झाला.[४४] १९६० ते २०१० या ५० वर्षाच्या काळात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणांच्या संख्येचा आढावा घेतल्यास शिक्षणाच्या प्रगतीची कल्पना येईल. याचे श्रेय यशवंतरावांच्या निर्णयाला दयावे लागेल.[४५]

| | | |
|---|---|---|
| शाळांचा आढावा | १९६० | २०१० |
| प्राथमिक शाळा | ३४५९४ | ७२०५३ दुपटीने वाढ |
| माध्यमिक शाळा | २४६८ | २०३३९ आठपट वाढ |

**रयत शिक्षण संस्था अध्यक्षपदाची कामगिरी :**

शिक्षण खेडोपाडी वाडयावस्त्यांवर गोरगरीबांच्या दारात नेण्याचे प्रचंड काम कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. शिक्षणाखेरीज कर्मवीरअण्णा राजकीय क्षेत्रातसुध्दा होते. कर्मवीर व यशवंतराव यांच्यात राजकीय मतभेद होते. संभाजीबाबा थोरात म्हणतात, '' हे दोन महामानव दीपस्तंभ आमच्या घरी एकत्र आले तेव्हा अण्णांनी यशवंतरावांना संस्थेची धुरा सांभाळण्याची विनंती केली. त्यांनी ही धूरा अखेरपर्यंत सांभाळली.[४६]

**कोयना परिषद :**

यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाई यांचे नेतृत्वाखाली हेळवाक येथे 'कोयना परिषद' संपन्न झाली. भाऊसाहेब हिरे अध्यक्षस्थानी होते. जी.के.मनोळीकर यांनी कोयना धरणाची माहिती दिली. या परिषदेला यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, कर्मवीर भाऊराव पाटील, धनंजयराव गाडगीळ, शंकरराव किर्लोस्कर, नानासाहेब गोरे, प्र.के.अत्रे यांनी कोयना धरणाची गरज सांगितली. कोयना प्रकल्प पंचवार्षिक योजनेत समाविष्ट व्हावा असे सांगितले तसा ठराव केला.[४७] पुढे भाऊसाहेब हिरे व यशवंतराव चव्हाण यांचा मंत्रीमंडळात समावेश झाला. त्यांनी पुढाकार घेऊन कोयना योजना मार्गी लावली.[४८] दि.१९.०१.१९५४ रोजी जलविद्यूत टप्पा १ धरणाच्या बांधकामाचा शुभारंभ तत्कालीन मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या हस्ते झाला. बाळासाहेब देसाई यांनी टप्पा १ व टप्पा २ ची कामे करून घेतली.[४९] यशवंतराव चव्हाण यांच्या मुत्सद्देगिरीने व बाळासाहेब देसाई यांच्या जिद्द व चिकाटीने इ.स.१९६२ मध्ये मुख्य धरण बांधकाम पूर्ण झाले. मोठया अडचणीतून जिद्दीने व चिकाटीने धरणाचे काम झाले.[५०]

**४.१.६ प्रतिभावंत यशवंतराव:**

महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांना प्रतिभेचे देणे आईकडूनच उपजत मिळाले होते. दळताना आईने म्हटलेल्या स्वरचित ओव्यानी पहिला वाङमयीन संस्कार यशवंतरावांच्यावर केला होता. ते मुख्यमंत्री झाले तरी किंवा पुढे केंद्रीय मंत्री झाले तरी मराठी साहित्यिक कलावंत विशेषत: नाटयकलावंतात रंगून जाण्याचा जो छंद होता त्यात खंड पडला नाही. उलट ही क्षेत्रे विस्तारीत गेली. रंगभूमीवरील नाटयप्रवेश, सर्वत्र विखुरलेली सौदर्यस्थळे त्यांनी आवर्जून पाहिली. ती त्यांनी पत्राव्दारे सौ.वेणुताई पर्यंत पोहोचविली. त्यांनी लिहीलेल्या वैचारिक लेखातून, ललित साहित्यातून त्यांच्या सहृदय कलावंताची साक्ष पटते. यशवंतरावांचे 'कृष्णाकाठ आत्मचरित्र खंड १ व ऋणानुबंध' असे दोन भाग त्यांचे आत्मकथन आहेत. यामधून त्यांच्या विचारांचे, त्यांच्या अनुभूतीचे दर्शन घडते.[५१] 'सहयाद्रीचे वारे' हा त्यांच्या निवडक भाषणांचा संग्रह आहे. हा ग्रंथ २६ जानेवारी १९६२ रोजी प्रकाशित झाला. यशवंतराव सन १९५६ मध्ये व्दिभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हापासून ते १९६२ पर्यंत व पुढे १९६२ मध्ये ते मुख्यमंत्रीपदाचा त्याग

करून दिल्लीला संरक्षणमंत्रीपदाचा कार्यभार स्विकारण्यासाठी गेले तो सहा वर्षाचा काळ अतिशय कष्टाचा, कसोटीचा व परिश्रमपूर्वक मिळविलेल्या लोकमान्यतेचा होता. 'सहयाद्रीचे वारे' हा त्यांच्या १९५६ ते १९६१ पर्यंतच्या काळातील निवडक भाषणांचा आहे. शेतीच्या संदर्भातील प्रगतीचे विकासातील शिक्षणाचे स्थान याबाबतचे त्यांचे चिंतन व विचार समजतात.[५२]

'युगांतर' हा यशवंतराव चव्हाण यांचा तिसरा भाषणसंग्रह असून यात १९६५ ते १९७९ या कालखंडातील काही निवडक भाषणे आहेत. भाषणाबरोबर मुलाखतीवर आधारलेले स्वतंत्र असे लेखन यात समाविष्ट केलेले आहे. याचा हेतू एवढाच की विविध विषयावरील व्यक्त केलेले विचार एकत्रित राहाव्यात हा हे पुस्तक प्रसिध्द करण्याचा हेतू आहे.[५३] सर्व भाषणे १९६५ ते १९७९ या चौदा वर्षाच्या पल्लेदार कालखंडातील आहेत. त्यांच्या जीवनात अनेक राजकीय स्थित्यंतरे झाली. ते संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री व शेवटी विरोधी पक्षनेता बनले. त्यांनी पार्लमेंटचा सभासद या नात्याने केलेली भाषणे आहेत. स्थान व काल यात विविधता आहे.[५४] कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून त्यांना महत्वाची पदे मिळाली परंतु पक्षनिष्ठतेशी त्यांनी कधी खेळ केला नाही. पुस्तकाचे नाव भूमिका का दिले हे त्यांनी यात स्पष्ट केले आहे. अनेक विषयावर अनेक घटनेच्या संदर्भात पक्षाची भूमिका व त्यांची भूमिका काय होती हे त्यात त्यांनी व्यक्त केले आहे. १९८०चे निवडणुकीनंतर राजकारणाचे काय चित्र असेल याची खात्री आज देता येत नसली तरी वातावरण धूसर आहे हे त्यांनी व्यक्त केले आहे. राजकारणाबरोबर यशवंतराव साहित्यिक होते. ते आपल्या मनातील भाव, विचार नेमक्या, थोडक्या शब्दात व्यक्त करत. वाचकाच्या हृदयाला ते हात घालणारे आहे. सहयाद्रीचे वारे, युगांतर, शिवनेरीच्या नौबती, वुईडस ऑफ चेंज, ऋणानुबंध, भूमिका, कृष्णाकाठ वाचताना वाचकाला त्याचा अनुभव येतो.[५५]

विविध ग्रंथांना प्रस्तावना लिहून त्यांनी प्रस्तावनाकार म्हणून वेगळे स्थान मिळविले. याचे कारण त्यांचे चतुरस्त्र व्यक्तिमत्व हे होय. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, परराष्ट्रीय व्यवहार, राष्ट्रवाद, राष्ट्रीय ऐक्य इत्यादी विषयांचे त्यांचे ज्ञान अद्ययावत होते. वेगवेगळ्या साहित्यावर त्यांनी आपले स्पष्ट मत नोंदविले. उदा. 'सिंहासन', 'मुंबई दिनांक' या कादंबऱ्यांनी त्यांच्या मनाची पकड घेतली नाही. परंतु भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला', 'जरिला', 'झूल', अनिल अवचट यांची 'माणसं', लक्ष्मण माने यांची 'उपरा' हे ग्रंथ वाचून ते अस्वस्थ झाले. अशी ते नोंद करतात.[५६] 'जागृत सातारा' ग्रंथाचे लेखक पु.पा.गोखले ची प्रस्तावना लिहीण्यापूर्वी त्यातील मजकूर त्यांच्याविषयी चुकीचा आहे तो दुरूस्त करणार असाल तरच प्रस्तावना लिहीतो असे कळविले.ती दुरूस्ती केल्यानंतरच यशवंतराव यांनी प्रस्तावना लिहिली.[५७] यशवंतराव यांनी विविध ग्रंथांना लिहीलेल्या प्रस्तावनेपैकी ग्रंथपाल विठ्ठल वि.पाटील यांना १७६ प्रस्तावना उपलब्ध झाल्या.[५८]

'कृष्णाकाठ' आत्मवृत्ताचा एक चांगला नमुना म्हणून उल्लेख करता येईल. लेखनात विनम्रता आहे, त्यांचे बोलणे व लेखनात संयम आहे, कोणाला काही खुपू नये याची त्यांनी खबरदारी घेतलेली दिसते. त्यात त्यांनी स्वत: चा भलेपणा कोठेही दाखविला नाही, सारं कसं सावधपणे व उत्कटपणानं रेखाटले आहे. यात

कोठेही कडवटपणा दिसत नाही.[५९] पं.भीमसेन जोशी नमूद करतात की यशवंतराव संगिताचे रसिक होते. ते म्हणतात, ''यशवंतराव माझ्या सार्वजनिक किंवा खाजगी गाण्याच्या बैठकीला अनेकदा उपस्थित असायचे. यशवंतराव, सौ.वेणुताई उपलब्ध असतील तेव्हा आवर्जुन हजर असत.[६०] भूतपुर्व प्रधानमंत्री अटलबिहारी म्हणतात, '' देशवासी जिस चव्हाण को भलीभांती जानते है, मानते है वह उनका एक सफल राजनितीज्ञ का रूप है किंतु चव्हाण के व्यक्तित्व के और भी अनेक पैलू है ऋणानुबंध नामक पुस्तक मे उनके व्यक्तित्व के जो नये आयाम उभरे है वे मनको मोह लेनेवाले है[६१]

**मराठी नाटकांची ओढ :**

यशवंतराव चव्हाणांना नाटकाचे विलक्षण वेड होते. ते म्हणायचे, '' मराठी नाटकाचा जन्म कृष्णाकाठी झाला. अन माझासुध्दा म्हणून मला नाटकाचे वेड असावे.'' नाटक पहाण्याची ओढ त्यांना लहानपणापासूनच होती. यशवंतरावांच्या भाषेत सांगायचे झाल्यास ''तोंडाला रंग लावून रंगभूमीवर येण्याची ही माझी लहानपणापासूनची इच्छा तशीच राहून गेली.'' मराठी रंगभूमीसंबंधी शेतकऱ्यांच्या भाषेत बोलायचे झाल्यास रंगभूमीचे सध्या सुगीचे दिवस आहेत.''[६२]

**४.१.७ यशवंतरावांचे विचार :**

कॉंग्रेसमध्ये नेहरूनंतर कोणी प्रभावी विचार दिला असेल तर तो यशवंतराव यांनी. राजकारणाच्या धावपळीतून, दगदगीतून व जेव्हा जेव्हा वेळ मिळेल त्या प्रसंगानुसार ते त्यांचे विचार व्यक्त करीत.[६३] त्यांच्या विचाराचे वैशिष्टय असे की ते विचार मूलगामी असत व ते अगदी साधेपणाने सहज व्यक्त करीत यशवंतराव म्हणत, '' शेतकरी बंधू हो, शेती हा पावसातील जुगार असे म्हणून हताश होवू नका. निश्चयाचे बळ असेल तर डोंगरसुध्दा हलविता येईल. रोजगाराची संधी उपलब्ध करून देताना आपण एक पथ्य जरूर पाळले पाहिजे. गावातील ज्या घरातील कोणी मिळवता नसेल अशा घरातील तरूणाला अग्रक्रमांकाने संधी दिली पाहिजे. संधी देताना जात, पात, रक्ताचे नाते असा विचारसुध्दा करता कामा नये.[६४]

सामाजिक भेदाभेदाची मोठी थोरली उतरंड रचून ठेवल्याने हिंदुस्थान दुर्बल झाला आहे. आम्ही एकमेकांच्या डोक्यावर बसलो आहोत जो खालच्याच्या डोक्यावर बसलेला आहे तो त्याचा गळा धरून बसलेला आहे. ही उतरंड मोडण्याचे काम आपण ज्या दिवशी करू. त्या दिवशी आपण खरी क्रांती केली असे समजावे.[६५] ज्यांना काहीच करता येत नाही. काही समजत नाही अशाने शेती करावी. शेती हा धंदा आहे. हा अडाणी माणसांचा समाज आहे. हा सर्वसामान्यांचा व्यवसाय आहे असे समजले जाते हे मोठे दुर्दैवाचे आहे. हा अत्यंत महत्वाचा उद्योग आहे असे मानले पाहिजे. शहाणा माणूस असल्याखेरीज शेती शहाणी होणार नाही. जीवन समर्पित असेल तर ते कधीच जीर्ण होत नाही. ज्यावेळी देश लढाई करतो त्यावेळी मनगट लोखंडासारखे बळकट करावे लागते.[६६]

**४.१.८ यशवंतराव चव्हाण यांची साहित्यसंपदा :**[६७]

१.लोकांचे समाधान हीच राज्यकारभाराची कसोटी (राज्याच्या ४१ जिल्हयाच्या कलेक्टर परिषदेपुढे केलेल्या

भाषणाची पुस्तिका) प्रकाशन ३.९.१९५७
२.आपले नवे मुंबई राज्य प्रकाशन पुणे – अय्यर एस.एस. १९५७
३.उदयाचा महाराष्ट्र (ना.चव्हाण यांची भाषण पुस्तिका) प्रकाशक चिटणीस म.कॉग्रेस कमिती, मुंबई
४.महाराष्ट्राची धोरण सूची (पुस्तिका) प्रकाशक, महाराष्ट्र राज्य प्रसिध्दी विभाग , मुंबई, मे १९६०
५.महाराष्ट्र – म्हैसूर सीमा प्रश्न (पुस्तिका) प्रकाशक, महाराष्ट्र राज्य प्रसिध्दी विभाग , मुंबई, मे १९६०
६.महाराष्ट्र राज्य निर्मिती विधेयक – प्रकाशक, महाराष्ट्र राज्य प्रसिध्दी विभाग , मुंबई, मे १९६०
७.विचारधारा (भाषण संग्रह) संग्राहक, संपादक लिमये न.वा.मुंबई, सागर प्रकाशन, १९६०
८.विदर्भाचा विकास (महाराष्ट्राचे कर्तृत्व जागे केले पाहिजे) भाषणपुस्तिका, १९६०
९.कोकण विकासाची दिशा, पुस्तिका प्रकाशन महाराष्ट्र शासन , मुंबई, १९६०
१०.ग.वा.मवाळकर व्याख्यानमाला, १९६१ (प्रत्यक्ष आंदोलन और संसदीय लोकतंत्र) व्याख्यान पुस्तिका प्रकाशन, २७.२.१९६१
११.शिवनेरीच्या नौबती, (भाषण संग्रह)तळवळकर गोविंद व लिमये अ.ह.प्रकाशक, व्हिनस बुक स्टॉल, पुणे, १९६१
१२. सहयाद्रीचे वारे (भाषण संग्रह) महाराष्ट्र शासन प्रसिध्दी विभाग , २६ जाने.१९६२
१३.चव्हाण यशवंतराव, असे होते कर्मवीर, पुणे, सहयाद्री दिवाळी अंक १९६८
१४.वचनपुर्तीचे राजकारण – अ.भारतीय कॉग्रेसच्या फरिदाबाद व बंगलोर अधिवेशनातील दोन भाषणे (पुस्तिका), म.प्र.कॉ.कमिटी प्रकाशन, मुंबई, २७.४.६९
१५.युगांतर, (निवडक भाषण संग्रह) पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९७०
१६.मा.यशवंतराव चव्हाण यांची महत्वपूर्ण भाषणे, सत्तरीच्या दशकाच्या शुभारंभ प्रकाशक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, सुवर्णमहोत्सव मुंबई १९७१
१७. Winds of Change, Bombay Somayya Publication Pvt.Ltd.1973
१८.जीवनाचे विश्वरूप, काही श्रध्दा काही अंधश्रध्दा (पुस्तिका), तुषार पवार, प्रकाशक मुंबई, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस कमिटी, १९७३, १९. ऋणानुबंध, (लेखसंग्रह) पुणे, प्रेस्टिज पब्लिकेशन, १९७५
२०. India’s Foreign Policy, Bombay Somayya Publication Pvt.Ltd.1973
२१.भूमिका, पुणे, प्रेस्टिज पब्लिकेशन, १९७९
२२. The Making of India’s Foreign Policy - New Delhi, Allied Publication Pvt.Ltd 1980
२३.कृष्णाकाठ, (आत्मचरित्र खंड १) पुणे, प्रेस्टिज पब्लिकेशन, १९८४
२४.विदेश निर्देश, यशवंतराव यांनी परदेशाहून सौ.वेणूताईस पाठविलेल्या निवडक पत्रांचा संग्रह, संपादक जोशी पुणे, यशोदा प्रकाशन, १९८८

२५.पत्र – संवाद, संपादक स.मा.गर्गे, कार्यकारी संपादक, रामप्रधान मुंबई, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, २००२
२६.पक्षावर अभंगनिष्ठा   (माझी राजकारणातील भूमिका) पुस्तिका प्रकाशन, मुंबई म.प्रदेश कॉंग्रेस कमिटी, प्रकाशन वर्ष दिलेले नाही.

**समारोप** :

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे संस्कारक्षम मुख्यमंत्री प्रथम व्दिभाषिक मुंबई राज्याचे व नंतर १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यावर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होते. सन १९५२ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी कॉंग्रेस पक्षाला प्रचंड विजय मिळवून दिला. व स्वत: कराड उत्तरमधून निवडून गेले. त्यानंतर ते मोरारजी देसाई यांच्या मंत्रीमंडळात नागरी पुरवठा व समाजकल्याण या खात्याचे मंत्री झाले. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली. अनेक मोर्चे, निदर्शने, लाठीमार, गोळीबार झाले. सारा महाराष्ट्र पेटून उठला. परंतु यशवंतराव यांनी स्वत: चा संयम ढळू दिला नाही.

यशवंतरावांना महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणतात. ज्या पध्दतीने त्यांनी यश मिळविले. असे यश कोणालाही मिळाले नाही. ते देशाचे संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री झाले. प्रत्येक खात्याचा कारभार चोखरित्या सांभाळला. देशाचे उपपंतप्रधान झाले. विरोधी पक्षनेते झाले. एवढं घवघवीत यश अन्य कुणा महाराष्ट्रीय नेत्याला मिळाले नाही. अर्थात प्रतिभा पाटील देशाच्या राष्ट्रपती झाल्या हा अपवाद मानावा लागेल. महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. यशवंतराव यांनी विचारपूर्वक पावले टाकली. त्यांनी कृषी, औद्योगिक, आर्थिक, जलसिंचन, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगतीसाठी अनेक पावले उचलली. ते उत्तम वक्ते, उत्तम रसिक, उत्तम साहित्यिक, उत्तम राज्यकर्ते होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनीसुध्दा मी थकलो आता. यापुढे अध्यक्ष म्हणून रयत शिक्षण संस्थेची धुरा तू सांभाळावी'' एवढी मोठी धुरा तुझ्याशिवाय दुसरा कोणीही सांभाळणारा मला दिसत नाही.'' असे सांगितले. यशवंतराव यांनी समाजपरिवर्तनासाठी आुयष्यभर मेहनत घेतली. सर्वसामान्याचे हित जपण्यासाठी त्यांनी माणसे घडविली. आज सत्तरीच्या ऐंशीच्या आसपास असणाऱ्या मंडळीवर यशवंतरावांचे भले मोठे ऋण आहे. शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे. शिक्षण खेडोपाडयापर्यंत नेले. कूळकायदा करून बळीराजाच्या नांगराला धीर दिला. औद्योगिक धोरणातून यंत्राच्या चाकांना गती दिली.

**निष्कर्ष** :

जिल्हयाजिल्हयात यशवंतराव यांनी नेतृत्व उभे केले. आयुष्यभर सामाजिक बांधिलकी पाळली. कॉंग्रेस पक्षाशी ते एकनिष्ठ राहिले. समविचारी लोकांना एकत्रित आणून कॉंग्रेस पक्ष त्यांनी बळकट केला. महात्मा फुले, शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून त्यांनी स्फूर्ती घेतली. मूलत: त्यांचा पिंड क्रांतिकारकांचा नव्हता त्यांनी राजकीय चळवळीला विद्यार्थीदशेपासूनच सुरूवात केली. परंतु या

त्यांच्या राजकीय प्रवासाला सामाजिक पार्श्वभूमी होती. ते आयुष्यभर गांधीजींचे अनुयायी म्हणून वावरले. लोकशाहीच्या मार्गाने परिवर्तन घडून येणे आवश्यक आहे असा त्यांचा विश्वास होता. जीवनाच्या सगळ्या क्षेत्रात यशवंतरावांना रस होता. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात वयाच्या सोळाव्या वर्षी राष्ट्रीय कॉंग्रेसचा तिरंगी झेंडा खांदयावर घेऊन स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेणारा क्रांतीवीर २५.११.१९८४ रोजी अनंतात विलीन झाला.

### ४.२ राजकीय नेतृत्व : बाळासाहेब देसाई

**प्रस्तावना :**

स्व.बाळासाहेब देसाई हे एक लोकनेते होते. खरा लोकनेता लोकशिक्षक असतो. सातत्याने प्रबोधन करावे लागते. वेळी अवेळी त्यांच्या पाठीशी उभे रहावे लागते म्हणून तो लोकशिक्षक असतो. समस्यांची उकल करतो. सन १९४० मध्ये सातारा जिल्हयात बहुजन समाजाचे नेते म्हणून बाळासाहेब देसाई यांच्या नेतृत्वाचा उदय झाला.

### ४.२.१ जन्म व शिक्षण :

बाळासाहेबांचा जन्म १० मार्च १९१० रोजी विहे ता.पाटण येथे झाला. विहे त्यांचे आजोळ होय. त्यांचे पूर्ण नाव दौलतराव श्रीपतराव देसाई.[६८] बाळासाहेब देसाई यांचे मरळी ता.पाटण हे गाव. सन १९३० मध्ये बाळासाहेब मॅट्रीक झाले. सन १९३० ते सन १९३७ अखेर त्यांनी कोल्हापूर येथील प्रिन्स बोर्डिंगमध्ये राहून बी.ए.ची पदवी घेतली. इ.स.१९३७ मध्ये ते एल.एल.बी.झाले. शिक्षण त्यांनी मोठया जिद्दीने व मोठया परिश्रमाने पूर्ण केले.[६९]

**विवाह :**

निपाणीनजिक साधारणपणे सात मैलावर बेनाडी नावाचे गाव आहे. या गावातील वतनदार पाटील दाजीराम अर्जुनराव पाटील यांची सुकन्या वत्सलादेवी उर्फ बनुताई यांचेबरोबर बाळासाहेब यांचा विवाह सन १९३७ वैशाख महिन्यात विवाह समारंभ श्रीमंत क्षात्रजगतगुरू यांच्या बंगल्यावर राजेशाही थाटात संपन्न झाला.[७०]

### दौलतराव देसाई : वकिली व्यवसाय सन १९३७ ते १९४०

वकिली व जनसेवा करण्याचा निर्णय घेतला. सातारा जिल्हयाच्या सप्लाय ऑफिसर व कोल्हापूर नगरपालिका चीफ ऑफिसरची जागा त्यांनी नाकारली.[७१] नोकरीच्या चाकोरीबध्द जीवनापेक्षा वकिली व लोकसेवा त्यांना अधिक पसंत होती.

### ४.२.२ लोकल बोर्ड पोटनिवडणूक :

जिल्हा लोकल बोर्डाचे पोटनिवडणूकीला बाळासाहेब उभे राहिले.मित्रमंडळींनी सहकार्य केल्याने बाळासाहेब निवडणुकीत प्रचंड मताने निवडून आले. या निवडणुकीमुळे त्यांना अधिक लोकप्रियता मिळाली. कराड येथील हरीबुवा लाड यांच्या घरी बाळासाहेब व यशवंतराव यांचा परिचय झाला.[७२] सातारचे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष धनजीशा कुपर होते. ते सातारचे मालक असल्यासारखे होते. सातारा रोड येथे

त्यांचा 'कुपर इंजिनियरिंग वर्क्स ' नावाचा कारखाना होता. जिल्हयातील दारू विक्रीचे सर्व मक्ते कूपर यांच्याकडे होते. कूपर भांडवलदारांचे प्रतिनिधी होते. त्यांच्या पाठीशी ब्रिटिशांची सत्ता होती. कूपर म्हणतील तसे घडत होते. या धनजीशांना शेतकऱ्यांचेबद्दल प्रेम नव्हते ना त्यांना गरीबांशी काय संबंध होता. ते खऱ्या अर्थाने जनतेचे प्रतिनिधी नसून त्यांना ब्रिटिशांचे पाठबळ होते.[७३] अशा भांडवलदारांना नेस्तनाबूत करून जिल्हा लोकल बोर्डात लोकशाही निर्माण करण्याचे काम बाळासाहेबांनी केले.[७४]

**बाळासाहेब देसाई लोकल बोर्डाचे अध्यक्ष :**

बाळासाहेब देसाई यांनी यशवंतराव चव्हाणांच्या मार्गदर्शनाखाली मोठया कौशल्याने सूत्रे हलविली. सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे ते अध्यक्ष झाले. त्यांची निवड ३ जुलै १९४१ रोजी झाली.[७५] जिल्हा लोकल बोर्डाचे प्रेसिडेंट एक आव्हानात्मक काम असूनसुध्दा बाळासाहेबांनी ते चांगले चालविले. यामुळे हे पद त्यांना लागोपाठ तीन वेळेला म्हणजेच १९४१, १९४६ व १९५० मध्ये भूषविले. एकूण सलग ११ वर्षे ते लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. जिल्हयातील विविध क्षेत्रातील कामे, शिक्षण, आरोग्य, व दळणवळण सुधारण्यासाठी रस्ते तयार केले. गावोगावी शाळा बांधल्या. आरोग्य खात्याच्या माध्यमातून जनतेच्या आरोग्याची काळजी घेतली. शिक्षकांची बाजू उचलून धरली. सर्वसामान्यांचा विचार प्राधान्याने केला. त्यांच्या कामाची गती व दिशा चांगली होती. या सर्वांचा परिणाम ते लोकप्रिय झाले.[७६]

**बाळासाहेब देसाई जिल्हा लोकल बोर्ड प्रेसिडेंट म्हणून कार्य : सन १९४१ ते १९५२:**

बाळासाहेब सलग ११ वर्षे सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. या कालखंडात त्यांनी शिक्षण, आरोग्य, दळणवळण इत्यादी क्षेत्रात खूप काम केले. जिल्हा लोकल बोर्डाची तिजोरी रिकामी होती. सातारचे धनजीशा कूपर हे धर्माने पारशी होते. बडे जमीनदार व कारखानदार होते. सातारची नगरपालिका कूपरच्या ताब्यात होती. त्यांनी जिल्हयातील सरंजामदारवर्ग मोठया धूर्तपणे एकत्र केला होता. कोळयाचे आण्णासाहेब कल्याणी, इस्लामपूरचे खानसाहेब युसुफभाई सावकार, कराडचे सय्यदमिया दादामिया जकाते, रहिमतपूरचे चिमणराव माने, चोऱ्याचे काकासाहेब, वाई येथील पापाशेट, सातारचे पंडितराव, विटयाचे विठोबा पाटील, पाडळीचे केशवराव विचारे इ. मोठी मंडळी धनजीशा यांच्या पाठीशी होती.[७७] सरकारी मंजूरीच्या अपेक्षेवर ५५ शाळा व ३८८ शिक्षक जादा नेमून त्यावरील सालाचा खर्च रू.११४६९६ लोकल बोर्ड मोठया जिद्दीने करीत होते. यामुळे ५५ शाळा व ३८८ शिक्षक कमी करण्याचा ठराव १२ मार्च १९४१ रोजी बोर्डाने पास केला. बोर्डाची स्थिती शोचनिय झाली.[७८]

**विविध खात्यावर बाळासाहेबांनी मिळविलेल्या ग्रँटस**

| **खाते** | **त्यातील वाढ रूपये** | **खाते** | **त्यातील वाढ रूपये** |
|---|---|---|---|
| गुरांचे दवाखाने | १०२१ | रस्ते दुरूस्त्या | २५४० |
| चालु दुरूस्त्या | २६२१९ | पेट्रोल टॅक्समधून | ५४६३० |

| | | | |
|---|---|---|---|
| कॉलरा प्रतिबंधक लस | ७५३० | नवीन शाळा जादा ग्रॅट | ९९०० |
| देवीची साथ | ६४३ | नवीन शाळा गृह भाडे | ३२४ |
| असि.शिक्षक जादा ग्रॅट | ६६५६४ | स्कूल बोर्ड २ ज्यादा क्लार्क | ६४० |
| तालुका न्यूज ग्रॅट वाढ | ४६८ | शाळा गृहभाडे | ६६८३ |

जिल्हा स्कूल बोर्ड कारभारात ८८५७९ अशी एकूण २४०८९० एवढी ज्यादा ग्रँट मिळवून बार्डाची पूर्वीची स्थिती बाळासाहेबांनी बदलली.

### ४.२.३ शैक्षणिक कार्य :

सरकारी मंजूरीच्या अपेक्षेवर चालणाऱ्या ५५ शाळा बंद करून ३८८ शिक्षकांना दि.१ एप्रिल १९४१ पासून कमी करण्याचा निर्णय पूर्वीच्या प्रशासनाने घेतला होता. त्यामुळे ५५ शाळा बंद करण्याचा निर्णय अमलात न आणता त्या शाळा चालू ठेवण्याचा निर्णय बाळासाहेब देसाई यांनी घेतला. म्हणून बाळासाहेबांनी मुंबई इलाख्याचे गव्हर्नर रॉजर्स लॅम्लेसाहेब यांची सातारा येथे गाठ घेतली आणि विचारपूर्वक ५५ शाळा व ३८८ शिक्षक यांच्या खर्चावरील अनुदानाचा प्रश्न त्यांच्यापुढे मांडला व या वेतनावरील अनुदान ८१८३ सरकारकडून मंजूर करून घेतले.[७९]

**सक्तीचे प्राथमिक शिक्षण :**

बाळासाहेबांनी शिक्षणप्रसारासाठी विविध योजना राबविल्या त्यापैकी सक्तीची प्राथमिक शिक्षण योजना होय. १९४६ साली कॉंग्रेसने राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली. सरकारने सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अमलात आणली. सरकारने एक धोरण जाहीर केले. पत्र क्रमांक ५९०/१४३८८ (ब)फ.दि.४ जाने.१९४७ च्या पत्रानुसार जे बोर्ड तीन आण्यापर्यंत लोकल फंड सेस वाढवून त्यापैकी १५ पैसे प्राथमिक शिक्षणास देईल त्या बोर्डाच्या हद्दीत जादा लागणारा सर्व खर्च सरकार करेल बाळासाहेबांनी काळाचे आव्हान स्विकारून सक्तीचे प्राथमिक शिक्षण योजना सुरू करण्याचा ठाम निर्धार केला. याकरिता दोन आण्यावरून तीन आणे लोकल फंड वाढवावा लागणार यासाठी कडवा विरोध होणार यावेळी सातारचे सोमण शंकर साठे यांनी हा निर्णय घेऊ नका असे सांगितले.[८०] परंतु बाळासाहेबांनी गरीब शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाविषयी तळमळीने विचार केला. एक लाख लोकल फंड गोळा करून ३८ लाख सरकारकडून घेणार व त्या सर्वांचा गरीबांच्या शिक्षणासाठी उपयोग करणार. सार्वजनिक पैसा माझ्या खिशात घालण्यासाठी कधीच वापरणार नाही असे पाप मी कधी करणार नाही असे ते म्हणत. करवाढीपूर्वी त्यांनी जिल्हयाचा दौरा केला व करवाढ का करतोय हे पटवून दिले आणि परत आल्यावर करवाढीचा आदेश काढला.[८१]

सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजना राबविल्यानंतर झालेला बदल शाळांची संख्या ३०० ने वाढली. १५३० शिक्षकांची अधिक भरती केली. विद्यार्थ्यांची संख्या ५८ हजारांनी वाढली. यामुळे हायस्कूलमध्ये

जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली.[८२] सातारा जिल्हा लोकल बोर्डाने रयत शिक्षण संस्था, श्री.शिवाजी हायस्कूल, कराड, जिजामाता अध्यापिका विद्यालय, सातारा, श्री.लक्ष्मी नारायण इंग्लिश स्कूल, खटाव, कासेगाव प्रसारक मंडळ इत्यादी शिक्षण संस्थेला मदत केली.[८३]

**ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण व वसतिगृहे :**

शिक्षण खेडयापाडयात गेले पाहिजे म्हणून त्यांनी गरीब व हुशार विद्यार्थ्यांचेकरिता वसतिगृहे योजना राबविली. जिल्हा लोकल बोर्ड १ नोव्हें.१९५० व दि. १७ जाने.१९५१ चे खास सभेत सातारा, वाई, कोरेगाव, कराड, पाटण, जावळी, फलटण या ठिकाणी मुलांचेकरिता वसतिगृहे उघडण्याचे ठरविले. १९५०–५१, १९५१–५२ या दोन वर्षात २ लाख २१ हजार ७०७ रू.वसतिगृहाचे कामाकरीता मंजूर केले.[८४] वंचित घटक शिक्षण प्रवाहात येण्यासाठी तालुक्याला एकतरी वसतिगृह असावे हा त्यांचा मानस होता. त्या वसतिगृहाचे बांधकाम त्यांनी सुरू केले. सन १९५१–५२ पासून या वसतिगृहातून २५ विद्यार्थ्यांची सोय केली. कराडला एक वसतिगृह बांधले तसेच पाटण, पुसेसावळी, दहीवडी, पुसेगाव, कोरेगाव या ठिकाणी वसतिगृहे बांधली.[८५]

**गावोगावी शाळा इमारती बांधकाम :**

बाळासाहेबांनी गावोगावी शाळा उघडल्या. खेडोपाडी शाळा व इमारतीची बांधकामे केली. शाळा बांधणी व वसतिगृह बांधणी या दोन्ही बाबी त्यांनी हातात घेतल्या. जिल्हा स्कूल बोर्डाच्या फंडातून ७० हजार रक्कम खर्च करून न्हावी, मालदन, आरळे, आशापूर, चिंचणेर, कवठे, भुईंज, दहिवडी, खानापूर, काळगाव इत्यादी ठिकाणी इमारती बांधल्या. समिती फंडातून १९०१८१ रू.बाळासाहेबांनी काढून इमारती बांधल्या. येतगाव, विसापूर, कातरखटाव, वाघोली, चिकुर्डे, शिरगाव, पलूस, हिंगणगाव, शेरे, किवळ व बानुगडेवाडी, जांब, मरळी इ. ठिकाणी शाळा इमारती उभ्या केल्या. या २९ शाळांच्या खर्चासाठी २७६०८१ रूपयांची तरतूद केली.[८६]

**४.२.४ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यावर अपार प्रेम :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उच्च शिक्षणाकरिता सातारला छत्रपती शिवाजी कॉलेज काढले. शिवाजी कॉलेजच्या इमारतीची पायाभरणी बाळासाहेब देसाई यांनी केली. कर्मवीर भाऊराव यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्याकरिता वसतिगृहयुक्त मोफत शिक्षणाची सोय केली. बाळासाहेब देसाई यांना अण्णांच्या शैक्षणिक कार्याबद्दल आदर होता. अण्णांनासुध्दा बाळासाहेबांचेबद्दल आदर वाटत होता.[८७] कर्मवीर भाऊराव यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून बाळासाहेबांनी सातारा शिवाजी कॉलेजला दरसाल पाच हजार रूपयांची सातारा लोकल फंडाची ग्रँट दहा वर्षे मंजूर केली. बाळासाहेब देसाई यांचे कर्मवीरांच्या कार्यावर अपार प्रेम होते. ते बांधकाम मंत्री असताना देवापूर येथील १०० एकर जमीन व रू.९०० रोख दिले. सातारा लोकल बोर्डाची ५ हजारांची ग्रँन्ट महाराष्ट्र सरकारची ग्रन्ँट बंद होती. त्या काळातसुध्दा चालूच होती.[८८] रयत शिक्षण संस्थेप्रमाणे जिजामाता अध्यापिका विद्यालयाला, कासेगाव शिक्षणप्रसारक मंडळाला व

स्वामी विवेकानंद संस्थेला त्यांनी मदत केली. शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांचे व बाळासाहेबांचे मैत्रीपूर्ण संबंध होते.

**सार्वजनिक आरोग्य :**

शिक्षणाबरोबर आरोग्याकडे त्यांनी लक्ष दिले. माणसांचे व गुरांचे दवाखान्यांना ग्रँट मिळवून देण्याचा प्रयत्न केला. सन १९४४–४५ : ७५३० रू.ग्रँट मिळाली. सन १९४६–४७ : ८००२ रू.ग्रँट मिळाली. सन १९४७–४८ : ७८८३९ रू.ग्रँट मिळाली. अशा प्रकारे आरोग्यविषयक सुविधाकडे बाळासाहेबांनी अधिक लक्ष दिले.[८९]

**४.२.५ पाणीपुरवठा योजना :**

शिक्षण व आरोग्याप्रमाणे खेडोपाडी डोंगरकपारी स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा योजनेकडे बाळासाहेबांनी लक्ष दिले. गावोगावी विहीरी बांधून पाणीपुरवठा करण्याच्या योजनेकडे त्यांनी लक्ष दिले. सातारा जिल्हयात शेकडो गावी स्वच्छ शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी याकरीता गावोगावी विहीरी बांधून पाणीपुरवठा शास्त्रीय पध्दतीने केला. अशा विहीरी यरफळे, शेडगेवाडी, मधलीवाडी, मोराळे, पोपडी, धामणी, उमरकांचन, सोनावडे, मरळी, गारवडे, सोनायची वाडी, माणगेवाडी, नायकवडी, दिवशी माझरा, मालदन, डांबरवाडी, मल्हारपेठ, सणबूर इ. ठिकाणी बांधून पाण्याची सोय केली.[९०] १२ आयुर्वेदिक पध्दतीचे दवाखाने उघडले. इंग्रजी पध्दतीचे दवाखाने मसूर, चाफळ, उचाट गिरवी, जवळे, रेठरे बुद्रुक इ.ठिकाणी सुरू केले. डोंगराळ भागात लोकांना गुणकारी औषध मिळण्यासाठी फार्मसी उघडण्याचा अभिनव प्रयोग केला.[९१] बाळासाहेब देसाई यांनी कुष्ठरोग्यांच्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न केले. महारोगी लोकांच्या औषध उपचाराकडे त्यांनी मानवतेच्या दृष्टीने पाहिले. १९४८ साली त्यांनी म.गांधी स्मारक समितीला पाच हजार रूपयांची मदत दिली. ती महारोगी रूग्णालय उघडण्याचे अटीवर.[९२] या कालखंडात ढेबेवाडी, लाडेगाव, शेणोली, अंगापूर, पाडळी, पार्ले, जानुगडेवाडी, पेठा, करांखोप इत्यादी ठिकाणी धर्मशाळा बांधल्या.

**जिल्हयात श्रमदान योजना :**

जिल्हयातील जी गावे स्वयंस्फूर्तीने आपल्या गावातील लोकहिताची कामे करतील त्यांना केलेल्या कामासाठी झालेल्या खर्चाच्या १/४ एवढी रक्कम बोर्डातर्फे देण्यात आली. या योजनेचे उत्तम स्वागत झाले. यामुळे लोक गावविकासासाठी गावाच्या हिताकरीता श्रम करू लागली. या स्वावलंबनामुळे गाव विकासाकडे वळू लागले. या योजनेसाठी बोर्डाने ५०००ची रक्कम मंजूर केली. गाव विकासाच्या दिशेने गतीमान झाली.[९३] बाळासाहेब देसाई यांच्या या नाविन्यपूर्ण योजनेमुळे जाळगेवाडी ते चव्हाणवाडी हा साधारणपणे ३ मैल लांबीचा रस्ता चव्हाणवाडीतील व आसपासच्या परिसरातील लोकांनी श्रमदानाने तयार केला. हा रस्ता प्रेसिडेंट बाळासाहेबांनी पाहिला व आनंद व्यक्त केला. ''तुम्ही सर्वांनी संघटितपणे केलेले काम आनंददायी आहे. खेडोपाडयातील लोक जागृत झालेले आहेत. आपणासारखी निष्ठावान माणसे देशाचे भले करू शकतील.'' या श्रमदानानी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून बाळासाहेबांनी एक हजार रू. दिले व भागातील

पाणीपुरवठयाकरिता २४५८४६ रू. व रस्त्याकरीता १६३५१ रू.मंजूर केले.[९४]

**४.२.६ बाळासाहेबाचे बांधकाम दळणवळण व पाटबंधारे, वीज मंत्री म्हणून कार्य :**

१२ एप्रिल १९५७ रोजी बाळासाहेब देसाई यांनी मंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली. या खात्याला त्यांनी नवचैतन्य आणले. बारकाईने त्याचा अभ्यास केला. यातील पहिली अडचण म्हणजे पंचवार्षिक योजनेत महाराष्ट्राला मिळालेला पैशाचा वाटा अल्प होता. दुसरी गोष्ट म्हणजे या खात्यातील कामाचे स्वरूप निधीत नव्हते. तिसरी बाब म्हणजे अधिकारी वर्गात बदल करणे गरजेचे होते. प्लॅन इस्टिमेट व्यवस्थित नव्हते. अधिकारीवर्ग शिथील होता. बाळासाहेबांनी अभ्यास करून संपूर्ण योजना आखली व नव्याने कामाला सुरूवात झाली.[९५] रस्ते कामासाठी १६ कोटी रूपयांची तरतूद होती परंतु व्दिभाषिक गुजरात राज्यातील रस्त्यासाठी १४ कोटी व उरलेले रस्त्याकरिता होते. तेव्हा बाळासाहेबांनी महाराष्ट्रातील रस्ते व गुजरातमधील रस्ते व सडका यांचा तौलनिक अभ्यास केला. याबाबत त्यांनी हे प्रकरण मंत्रीमंडळात पोहोचवलं. शेवटी महाराष्ट्रातील रस्त्यावर चौदा कोटी खर्च करावेत असा सरकारने निर्णय दिला. याप्रमाणे पुढील कार्यवाही बाळासाहेबांनी केली.[९६]

**४.२.७ कोयना धरण योजना गतीमान केली :**

बाळासाहेब देसाई यांनी महाराष्ट्राचा भौतिक विकास घडवून आणणारी कोयना योजना जोमाने पुढे रेटली. त्यांच्या प्रयत्नांनी कोयना योजनेला योग्य चालना मिळाली.[९७] कोयना धरण व बाळासाहेब यांचे अतूट नाते होते. कोयना आज घराघरात पोहचली त्यात बाळासाहेबांचे प्रयत्न आहेत.[९८] सन १९६३ मध्ये बाळासाहेब देसाई म्हटले, ''इंजिनियर, कोयनेची वीज गरीबांच्या झोपडीपर्यंत पोहोचली पाहिजे. बाळासाहेबांनी यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कोयना वीजनिर्मिती केली व अनेकांचे संसार उजळले. ते कोयनेचे सुपुत्र ठरले.''[९९]

**कोयनाखेरीज इतर धरण व योजना व कोकणातील वाहतूक सुविधा:**

बाळासाहेबांनी कोयनेखेरीज इतर छोटी मोठी धरणे, कॅनॉल, पाटबंधारे, तलाव इ. कामे मोठया तडफदारीने करून घेतली. मालवण जवळचे तळगावातील धरण बाळासाहेबांच्या प्रयत्नांनी पूर्ण झाले. महाराष्ट्र व गुजरात यांच्यातील कामाच्या बजेटचा बाळासाहेबांचा उत्तम अभ्यास होता. महाराष्ट्रावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी सर्व बाबींचा अभ्यास करून पाठपूरावा केला. कोकणातील लोकांची अडचण दूर व्हावी, त्यांचा प्रवास सोयीचा व्हावा म्हणून मुंबई, गोवा रस्ता हा संकल्प केला. त्यांनी अर्थसंकल्पात त्याची तरतूद करून त्या रस्त्याला अधिक पसंती दिली. हा हमरस्ता जलद गतीने पूर्ण करण्याचे श्रेय बाळासाहेबांना जाते. कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा महाल हा अत्यंत मागास भाग होता. या भागातील लोक लाकडे विकून त्यावर उदरनिर्वाह करतात. बाळासाहेबांनी या परिसराचा दौरा केला व एक घाट फोडून तळकोकणाला जोडणारा रस्ता व्हावा अशी लोकांची अपेक्षा पूर्ण केली. नांदणी–जयसिंगपूर रस्ता पूर्ण केला. मुंबईतील पट्टेवाल्यांच्या निवासाची सोय केली.

### ४.२.८ बाळासाहेब देसाई यांचे इतर सामाजिक कार्य :

कोल्हापूरसाठी त्यांनी एक मोठे काम केले ते म्हणजे कोल्हापूर एस.टी.स्टँड व डेपो. त्यांच्या प्रयत्नांनी एस.टी.बस डेपो तयार झाला. त्याचे उदघाटन १२ ऑगस्ट १९५७ रोजी झाले. ते म्हणाले, '' डेपोचे स्वप्न माझे होते. आज तो पाहून खरच आनंद होतोय. मूळात काम करणे माझी वृत्ती आहे.''[१००] बाळासाहेबांच्या जीवनकार्यात सातत्याने खंबीर साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नीचे दि.२० मे १९६० रोजी आकस्मात निधन झाले.

**रू.१२०० आतील उत्पन्न धारकांना मोफत शिक्षण** :

बाळासाहेबांनी शिक्षण घेताना गरिबीचा काळ अनुभवला होता. शिक्षणमंत्री म्हणून सूत्रे हातात घेताच त्यांनी समाजातील गोरगरीबांच्या मुलांना मोफत शिक्षणाची सवलत सुरू केली. शिक्षणमंत्रीपद गोरगरीबांच्याकरिता बरच काही करण्याची संधी आहे म्हणून आपली सर्व शक्ती पणाला लावून काम केले.[१०१] बाळासाहेबांनी ई.बी.सी. सवलतीचा निर्णय ना.यशवंतराव चव्हाण यांच्या कुशल नेतृत्वाखाली घेतला. हा निर्णय क्रांतिकारी ठरला.[१०२] १३ जून १९६० रोजी सदरचा ठराव बाळासाहेबांनी मांडला व मंत्रीमंडळांची मान्यता घेऊन त्याची सत्वर अंमलबजावणी केली. आज महाराष्ट्रात शिक्षणाचे साक्षरतेचे प्रमाण वाढलेले दिसते ते ई.बी.सी.निर्णयामुळे आहे. त्यांच्या सहकार्याने तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालये निघाली.त्यांनी तांत्रिक शिक्षणावर भर दिला. महाराष्ट्रात पुणे, कराड, औरंगाबाद, नागपूर, जे.जे.कॉलेज ऑफ आर्टस, व्ही.जे.टी.आय वालचंद इंजिनियरींग कॉलेज तसेच रत्नागिरी, यवतमाळ, खामगाव, येथे तंत्रनिकेतन काढण्याचे जाहीर केले.[१०३] बाळासाहेबांनी लष्करी शिक्षणाला महत्व दिले.

**सातारा सैनिक स्कूल** :

जून १९६१ मध्ये सातारा येथे सैनिक स्कूल सुरू केले. महाराष्ट्रात सैनिक शिक्षण घेता यावे व सातारा परिसरातील विद्यार्थ्यांनी देश संरक्षणासाठी सिध्द रहावे अशी इच्छा बाळासाहेब व यशवंतराव चव्हाण यांची होती. म्हणून मध्यवर्ती सरकारकडे प्रयत्न केले. परिणाम देशातील चारपैकी एक सैनिकी शाळा सातारला झाली.[१०४]

**कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ** :

कोल्हापूरला स्वतंत्र विद्यापीठ असावे या कल्पनेचे जनक डॉ.बाळकृष्ण होते. डॉ.बाळकृष्ण १९२२ ते १९४० राजाराम कॉलेजचे प्राचार्य होते. आपल्या गुरूंचे विद्यापीठ स्थापनेचे स्वप्न आपण पूर्ण करू शकलो तर कोल्हापूर नगरीच्या व डॉ.बाळकृष्ण यांच्या ऋणातून उतराई केल्यासारखे होईल असे बाळासाहेबांना वाटत होते.[१०५] ते शिक्षणमंत्री असताना कोल्हापूरात शिवाजी विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी प्रयत्न केले. शिवाजी विद्यापीठाचा कामाचा शुभारंभ ८ आक्टों.१९६२ ला सुरू झाला व विद्यापीठाचे औपचारिक उद्‌घाटन दि.१८ नोव्हें.१९६२ रोजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले.[१०६]

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेस सहकार्य :**

रयत शिक्षण संस्थेला बाळासाहेबांनी मदत केली. त्याचप्रमाणे डॉ.बापूजी साळुंखे यांच्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला त्यांनी मदत केली.[१०७]

**प्रौढ साक्षरतेचे कार्य :**

ग्रामीण जनतेच्या उध्दाराचे फार मोठे काम बाळासाहेबांनी केले. ते शिक्षणमंत्री असताना प्रौढ शिक्षणाचे केलेले काम मोलाचे आहे. समाजातील निरक्षरांना वंचितांना साक्षर करून शिक्षणप्रसार केला. त्यांनी ग्रामशिक्षण मोहिमेला गती दिली.[१०८]

**बंडिंग :**

सातारा येथे शेतकरी मेळावा झाला. या मेळाव्यात मंत्रीमहोदय बाळासाहेब म्हणाले, '' नालाबंडिंग करून उत्पादनक्षमता कस वाढविला पाहिजे. शिवाय जमिनीची प्रत सुधारण्यासाठी तळी बांध घालणे गरजेचे आहे. शेतकरी व शेतकरी संघटनांनी याकामी सहकार्य करावे.''[१०९]

**शेती पाणीपुरवठा विहीरी :**

शेती पाणी पुरवठयाकरीता नवीन विहीरी खुदाई करण्याचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला. १६ हजार विहीरी खुदाईचा संकल्प केला. नव्या विहीरीसाठी २५०० कर्जे व रू.५०० मदत देण्याची योजना सुरू झाली. वर्षभरात १७५०० विहीरींची खुदाई झाली. वर्षभरात जुन्या ४००० विहीरी दुरूस्त केल्या व शेतीला पाणीपुरवठा केला.[११०]

**शेती तगाई ऑईल इंजिन :**

पाणी विहीरीत आले ते शेतात उपसा करण्यासाठी ऑईल इंजिन हवे. ही तगाईवर शेतकऱ्यांना पुरविण्यात आली. याशिवाय आधुनिक शेती अवजारे बी बियाणे, रासायनिक खते, पीक संरक्षक औषध पुरविली. शेती नांगराकरीता ट्रॅक्टर आले.

**कोल्हापूरला कृषी महाविद्यालय :**

जून १९६३ मध्ये कोल्हापूरला बाळासाहेबांच्या प्रयत्नातून कृषी महाविद्यालयाची स्थापना झाली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेतकी महाविद्यालयाची स्थापना करणे ही खूप मोठी खर्चिक बाब होती. साधारणपणे ही बाब दीड कोटी रू. ची होती. अशा विविध समस्या असताना बाळासाहेबांनी कृषी महाविद्यालय स्थापन करण्याचे ठरविले व त्याची तरतूद तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत केली. त्यामुळे शेतीत आमूलाग्र क्रांती झाली.[१११] शेतीमंत्री असताना 'कसेल त्याची जमीन' या कायदयानुसार शेती सुधारणेच्या विविध योजना आखल्या. कर्जाखाली बुडलेला शेतकरी वर काढण्यासाठी संपूर्ण आयुष्यभर विचार केला. मनातला विचार कृतीत आणला.[११२]

**पोलीस खात्याला दिला नवा दृष्टीकोण :**

गृहमंत्री म्हणून बाळासाहेबांची कारकीर्द गाजली. खात्याला नवीन वळण लावले. पोलीस म्हणजे

जनतेच्या जीवित व मालमत्तेचे संपत्तीचे, हक्काचे रक्षक आहेत. मुंबई येथे दहा हजार पोलीस व अधिकारी यांच्या मेळाव्यात बाळासाहेब म्हणाले, '' पोलीस दुष्टाचे शत्रू व दुर्बलाचे मित्र बनले पाहिजेत.''[११३]

**औरंगाबाद स्फोट प्रकरण :**

औरंगाबादमध्ये ८ व ९ जुलै १९६४ रोजी राधामोहन मंदीराजवळ खोकडपुरा व बेगमपूरा परिसरात शोभेच्या दारूच्या साठयाचे स्फोट झाले. १५ इमारतीना भेगा पडल्या. ५० घरांचे नुकसान झाले. बाळासाहेब स्वतः १० जुलै १९६४ रोजी घटनास्थळी गेले. आपदग्रस्तांची भेट घेतली. दवाखान्यात गेले. जखमींना भेटले. प्राणहानी, वित्तहानी आपद्ग्रस्तांची विचारपूस करून त्यांना दिलासा दिला. तात्काळ उपाययोजना केली.[११४]

**युकॅरिस्टिक कॉंग्रेस :**

आंतरराष्ट्रीय युकॅरिस्टिक कॉंग्रेस यांची ३८ वी परिषद मुंबईमध्ये डिसेंबर १९६४ मध्ये संपन्न झाली. स्वतः ख्रिश्चन धर्मगुरू पोप जॉन पॉल यावेळी उपस्थित होते. जगातील कानाकोपऱ्यातून या युकॅरिस्टिक कॉंग्रेसकरिता लोक जमा झाले होते. बाळासाहेबांचे पोलिस खाते रात्रंदिन राबले. सर्वांनी बाळासाहेबांची मुक्तकंठांनी स्तुती केली.[११५]

**कुळकायदयाची अंमलबजावणी :**

बाळासाहेबांनी जातीने लक्ष देवून या कायदयाची प्रभावी अंमलबजावणीकरिता महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. एकूण सोळा लाख अशा प्रकारचे खटले १९५९ पासून प्रलंबित होते पैकी १४ लाख ४४ हजार प्रकरणे निकाली काढली. सन १९६७ ते १९६९ या काळात महसूलमंत्री असताना त्यांनी विविध योजना राबविल्या. कोल्हापूरला महसूल न्यायालय स्थापन केले.[११६]

**४.२.९ आधुनिक शेती व तंत्रज्ञानावर भर :**

शेती आधुनिक तंत्राने करणे आवश्यक आहे हे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले. शेतकरी सभा, मेळावे आयोजित केले. अत्याधुनिक अवजारे, बी-बियाणे, खते सवलतीच्या दरात पुरविली. कोल्हापूर कृषी महाविद्यालयाला पाचशे एकर जमीन संपादन करून दिली. पाच एकरातील कोरडवाहू शेतीतील शेतसारा माफ केला. बाळासाहेबांचे धोरण गोरगरीब शेतकरी यांच्या कल्याणाचे होते. ते उत्तम प्रशासक होते. त्यांचा लौकिक मोठा होता.[११७] पुणे विभागात तीन लाख सदुसष्ठ हजार एकर जमीन तीन लाख चौदा हजार भूमिहीनांना व भूमिहीनांच्या अकराशे एक सोसायटयांना देण्यात आली. यापैकी बहुसंख्य लोक नवबौध्द होते. याशिवाय एकरी शंभर रूपये प्रमाणे ३२ लाख रूपयांची मदत शेतकऱ्यांना देण्यात आली. लिप्ट इरिगेशनने शेतीला पाणीपुरवठा केला. पाटणकरिता २७ लिप्ट इरिगेशन योजना मंजूर केल्या. म्हावशी, मल्हारपेठ, अडूळ, मंद्रूल हवेली इ.इरिगेशन योजना बाळासाहेब देसाईंनी केल्या. नवीन महसूल कायदा व ६०० वाडयांचे स्वतंत्र महसूली गावात रूपांतर असे निर्णय घेतले.[११८]

### ४.२.१० कोयना भूकंपग्रस्तासाठी कार्य :

११ डिसेंबर १९६७ रोजी पश्चिम महाराष्ट्रात मोठा भूकंपाचा धक्का बसला. यामुळे सातारा, सांगली, रत्नागिरी या जिल्हयात मोठया प्रमाणात जीवितहानी व वित्तहानी झाली. मोठया प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान झाले.[११९] भूकंपात मानवहानी झाली. भूकंपाने जीवन उदवस्त झाले. सातारा, कराड, सांगली व कोल्हापूर हॉस्पिटलमध्ये अनेक जखमी उपचारासाठी भरती झाले होते. ११ डिसेंबरचा भूकंप अतिशय भयानक घटना होती. पठारी प्रदेशाला अशी भयानक घटना माहिती नव्हती.[१२०] भूकंप ज्या रात्री झाला त्या रात्री बाळासाहेब देसाई पुणे येथे होते. भूकंपाने पूल ढासळला, वहातूक बंद केली, कोणीतरी व्यक्तीने टेलिफोनच्या डांबावर चढून भूकंप झाल्याची बातमी बाळासाहेबांना दिली. त्वरीत पुण्याहून निघून बाळासाहेब पोहोचले. त्यांनी स्वत: फिरून सर्व भूकंपग्रस्तांची पहाणी केली. भूकंपग्रस्तांना भाकरी, कपडे, जेवणाचे डबे स्वत: फिरून वाटले.[१२१]

माणसे या प्रसंगांनी खचून गेली होती. म्हणून बाळासाहेबांनी आपला मुक्काम तेथेच तंबूत केला. वायूवेगाने बाळासाहेब सगळीकडे फिरून तहानभूक विसरून दिवसरात्र कामकरीत होते. कुठे दिरंगाई झाले की ते खवळून उठत होते.[१२२] परिस्थितीची जाणीव असणाऱ्या कार्यकर्त्यांची फौज घेऊन उभी केली होती. भूकंपाप्रमाणे १९६६ चे दुष्काळातसुध्दा बाळासाहेबांनी स्वत: पायपीट केली.[१२३]

### ४.२.११ बाळासाहेब कोयनेचे सुपुत्र :

बाळासाहेबांना १९४१ मध्ये जिल्हा लोकलबोर्डात नेतृत्व मिळाल्याने त्यांनी जन्मभूमीचा कायापालट केला.[१२४] ४५ वर्षापेक्षा अधिक सेवा करून पाटण तालुका व महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला. शेतकऱ्यांचे जीवन उंचावण्यासाठी प्रदीर्घ परिश्रम केले. भूकंपग्रस्तांचे शिस्तबध्द पुर्नवसन केले. मरळीला सहकारी साखर कारखाना काढला. जोतिबा डोंगरात वीज नेण्याचे कामही त्यांनी केले. डोंगरावर शासकीय विश्रामगृह उभारले. रस्ते रूंदीकरण खडीकरण डांबरीकरण करून डोंगराचे रूप बदलले.[१२५] कोल्हापूरातील संघटना, चळवळी, तालीम संघ, शैक्षणिक संस्था, कार्यालये, उद्योगधंदे इ. निर्मितीत बाळासाहेबांचा मोठा वाटा आहे. कोल्हापूर बसस्थानक, शिरोली ऊस संशोधन केंद्र, यांच्या निर्मितीत मोठा सहभाग आहे. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया व शिवाजी पार्क या ठिकाणी शिवाजी महाराजांचे पुतळे उभे करण्याचे काम त्यांनी केले. २६ जानेवारी १९६१ रोजी पुतळयाचे अनावरण महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले.[१२६]

### कुस्तीगीरांना प्रोत्साहन :

संस्थानाच्या विलीनीकरणानंतर मल्लविद्येचा राजाश्रय तुटल्याने कुस्तीला उतरती कळा लागली. पहिलवानातून पुढे आलेले मामासाहेब मोहोळ यांनी कुस्तीला सावरण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कुस्तीगीर परिषदेची स्थापना केली. बाळासाहेब व मामासाहेब मोहोळ यांनी कुस्तीगीर परिषदेची अधिवेशने भरविली व या कलेचा विकास करण्याचा प्रयत्न केला.[१२७] कुस्तीगीर परिषदांना अनुदान, सरकारी, सहकारी

पहिलवानांना बक्षिसे, पंचाची प्रशिक्षण, शिबीरे भरविली. कुस्तीच्या मैदानावरील करमणूक कर त्यांनी रद्द केला. तमाशा कलावंतांना उत्तेजन देण्याचे काम बाळासाहेबांनी केले.

### ४.२.१२ कोयना एज्युकेशन सोसायटी स्थापन :

डिसेंबर १९६७ मध्ये कोयना एज्युकेशन सोसायटी स्थापना झाली. या संस्थेव्दारा एक माध्यमिक विद्यालय व एक महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयाचे नाव बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण असे आहे. या संस्थेची प्रेरणाशक्ती बाळासाहेब आहेत.[१२८]

### साहित्यिक व बाळासाहेब देसाई :

बाळासाहेब पत्रकार, साहित्यिक, नाटककार, लेखक, निर्माता, दिग्दर्शक यांच्यात रमून जात. आचार्य अत्रे व शिरीष पै यांच्याशी त्यांचे जिव्हाळयाचे संबंध होते. आचार्य अत्रे यांनी बाळासाहेबांना व इतर कॉग्रेस मंडळींना टिका करून हैराण केले होते. परंतु अत्रे हे अफाट बुध्दीमान असून ते महाराष्ट्राचे धन आहे असे बाळासाहेब देसाई श्रध्दांजली व्यक्त करताना म्हणाले. बाळासाहेब खरेच मोठे दिलदार वृत्तीचे होते. पत्रकारांबरोबर त्यांचे जिव्हाळयाचे संबंध होते.[१२९] कोल्हापूरचे पत्रकार गणपतराव जाधव बाळासाहेबांचेबद्दल म्हणतात, ''मी बाळासाहेब देसाई यांना पन्नास वर्षे पहातोय. जिद्द, चिकाटी व परीश्रम या जोरावर त्यांनी शैक्षणिक पदवी प्राप्त केली. महाराष्ट्राची फार मोठी सेवा त्यांनी केली.'' वि.स.खांडेकर म्हणतात, ''जाती धर्म कशाचाच विचार न करता त्यांनी सर्वांची कामे केली.''

रणजित देसाई व बाळासाहेब यांचे जिव्हाळयाचे संबंध होते. रणजित देसाई यांच्या 'श्रीमान योगी' चा प्रकाशन सोहळा मुंबईला रंगभवन येथे बाळासाहेबांनी आयोजित केला. साप्ताहिक धूमकेतूचे कोल्हापूरचे राजाभाऊ जोशी यांचे जिव्हाळयाचे संबंध होते. म.फुले बाळासाहेबांचे दैवत होते. धनंजय कीर यांनी म.फुले यांचे चरित्र इंग्रजीत लिहीले हे पाहून बाळासाहेबांना अत्यानंद झाला.[१३०] वा.सी.बेंद्रे यांनी मालोजी व शहाजीराजे यांचे चरित्र लिहीले. यापाठीमागे बाळासाहेबांची प्रेरणा होती. संत तुकडोजी महाराज व बाळासाहेबांचा जिव्हाळा होता. वृध्द कलाकारांना त्यांनी शासकीय तिजोरीतून पेन्शन सुरू केली. बाळासाहेब एक उत्तम प्रभावी वक्ते होते. लोककला, तमाशा, साहित्य, पत्रकारिता, शिक्षण, संगीत, नाटय, कला सर्वच क्षेत्राचे ते रसिक होते. सर्वसामान्यांचे उध्दारक होते.[१३१]

### सारांश: बाळासाहेब देसाई:

आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात मोलाची कामगिरी करणारे बाळासाहेब देसाई यांचा जन्म कोयना खोऱ्यात झाला. अनंत हालअपेष्टा सहन करून जिद्द, परिश्रम व चिकाटी यांच्या जोरावर शिक्षण घेतले. साधारणपणे एक दिड वर्षाच्या वयातच आईचे निधन झाले. वडील अशिक्षित होते. प्रचंड अडचणीवर मात करून पाटण, कराड व कोल्हापूर या ठिकाणी त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. कोल्हापूरमध्ये त्यांना खूप काही शिकायला मिळाले कोल्हापूरच्या छ.राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक समतेचे मोलाचे कार्य त्यांनी बालपणातच अनुभवले. या महान कार्याचा वारसा जपून ठेवला पाहिजे असे त्यांना राहून राहून वाटायचे.

बाळासाहेबांनी छ.शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज यांचा आदर्श घेऊन जनसेवा करण्याचे ठरविले. पुढे ते जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष झाले. हा त्यांच्या राजकीय जीवनाचा खरा प्रारंभ होता. धनजीशा कूपर यांची एकाधिकारशाही त्यांनी संपुष्टात आणली. लोकल बोर्डाच्या माध्यमातून त्यांना लोककल्याणाच्या खूप गोष्टी करता आल्या. एक तडफदार तरूण म्हणून त्यांची यशवंतरावांच्या बरोबर भेट झाली. यशवंतराव व बाळासाहेब ही जोडगोळी पुढे महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून उदयास आली. १९५२ च्या विधानसभा निवडणुकीत ते आमदार झाले. १९५७ ते १९७० पर्यंत त्यांनी महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात सार्वजनिक बांधकाम, शेती, शिक्षण, महसूल व गृह अशी विविध खाती सांभाळली. शिक्षणमंत्री म्हणून १२०० रू.च्या आतील उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलामुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय क्रांतिकारक निर्णय घेतला. कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठ व कृषी विद्यापीठाची स्थापना केली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी खूप कष्ट घेतले. बहुजन समाजाच्या उध्दाराचा विचार ते कधीच विसरले नाहीत. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल त्यांना अपार श्रध्दा होती. छ.शिवाजी कॉलेजला त्यांनी मोठे सहकार्य केले. त्याचप्रमाणे इतर शैक्षणिक संस्थांना त्यांनी सहकार्य केले.

संकटकाळात जनतेला मदतीचा हात देणे हा बाळासाहेबांचा स्थायीभाव होता. ११ डिसेंबर १९६७ ला कोयना परिसरात भूकंपाचे धक्के जाणवले. घरे जमीनदोस्त झाली. बाळासाहेब पुण्यावरून त्वरीत पाटणला दाखल झाले. त्यांनी अहोरात्र परिश्रम केले. भूकंपग्रस्तांना भाकरी, औषध, कपडे इत्यादी मदतीचा ओघ त्यांनी स्वत: फिरून पोहोचविला. बाळासाहेब उत्कृष्ठ प्रशासक होते.

**निष्कर्ष:**

बाळासाहेब देसाई यांचे 'जीवन व कार्य ' याचा समग्र अभ्यास केल्यावर असे दिसून येते की राज्य उभारणीत त्यांचे बहुमोल कार्य आहे. खूप हालअपेष्टा भोगून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. सन १९४१, १९४६ व सन १९५० सलग अकरा वर्षे ते सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. ही जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या सांभाळलेली दिसते. सन १९५२ ते सन १९८३ या कालखंडात ते ३० वर्षे आमदार होते. सन १९५७ ते सन १९६९ या कालखंडात महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळात बांधकाम, शिक्षण, कृषी, गृह, दारूबंदी, व महसूल खात्याचे मंत्री होते. या काळात त्यांनी या महत्वाच्या जबाबदाऱ्या उत्तमरित्या सांभाळल्या. महाराष्ट्राच्या कल्याणासाठी झगडणारा मंत्री अशी त्यांची ख्याती होती. डोंगराळ भागात त्यांनी रस्त्यांची कामे केली. मुंबई, गोवा रस्त्याकरिता खास लक्ष दिले. दुर्बलांना मोफत शिक्षण, कोल्हापूर बस स्थानक, शिवाजी विद्यापीठ, मुंबई पटटेवाल्यांच्या निवासाची सोय, विविध पाणीपुरवठा योजना, कोयना धरण योजना इ. कामे त्यांच्या कामाची साक्ष देतात. तरूणांच्याकरिता लष्करी व तंत्रशिक्षण देण्याकडे त्यांनी लक्ष दिले. सातारला सैनिक शाळा सुरू केली. रयत व स्वामी शिक्षण संस्थेस त्यांनी उत्तम सहकार्य केले हे स्मरणात येते. ग्रामशिक्षण मोहिमेत त्यांनी उत्तम योगदान दिले. शेतीविकास, बंडिंग, शेतीला पाणीपुरवठा, आधुनिक तंत्रे, बियाणे, रासायनिक खते, तगाई इंजिन, विहिर खुदाई, इ.कामे त्यांनी केल्याचे दिसते. सन १९६७ मध्ये

झालेल्या भूकंपाचेवेळी बाळासाहेब देसाई यांनी जिदद व चिकाटीमुळे ७०००० नवीन घरे बांधली. बाळासाहेब देसाई एक उत्तम प्रशासक व राजकीय नेते होते. लोकांच्या संकटसमयी धावून जाणे हा त्यांचा स्थायीभाव होता.

## ४.३ राजकीय नेतृत्व : किसन वीर

**प्रस्तावना :**

उभी हयात राजकारणात असलेले किसन वीर हे यशवंतराव चव्हाण यांचे जीवलग मित्र होते.[१३२] किसन वीर यांच्या कार्यकालाचे स्थूलमानाने तीन टप्पे पडतात. पहिला टप्पा – संयुक्त सातारा जिल्हयाने स्थापन केलेले व चालविलेले प्रतिसरकार, दुसरा टप्पा –स्वातंञ्यानंतर सुराज्य करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान व तिसरा टप्पा – शेतकरी, मजूर व कामगार कल्याणासाठी त्यांनी घेतलेले कष्ट. सन १९४२ च्या क्रांतीचा जेव्हा खरा इतिहास लिहला जाईल तेव्हा इतिहासकारांना कबूल करावे लागेल की किसन वीरांनी येरवडयाच्या कारागृहाच्या भिंतीवरून मारलेली उडी म्हणजे सातारा जिल्हयातील चळवळीचे नवे पाऊल होते.[१३३]

### ४.३.१ जन्म, बालपण व शिक्षण:

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात सातारा जिल्हयातील वाई खोऱ्यात कवठे या छोटया गावात किसन महादेव वीर या क्रांतिकारकांचा जन्म ११ ऑ.१९०६ रोजी झाला. सातारा जिल्हयातील वाईपासून पूर्व दिशेला साधारणपणे ६ मैल अंतरावर सातारा – पुणे रस्त्यावर कवठे हे गाव आहे. या गावात गोकुळ अष्टमीच्या शुभ दिवशी शिंपी समाजातील महादेवराव यांच्या घरी किसन हा पुत्र जन्माला आला. पिताश्रींचे नाव महादेवराव व आईचे नाव हरीबाई होते.[१३४]

**किसन वीर विवाहबध्द** :

किसन वीर १४ वर्षाचे झाले त्या काळात १४ वे वर्ष विवाहयोग्य वय मानत होते. पाचगणी गावचे हरिभाऊ हे एक बऱ्यापैकी व्यापारी होते. त्यांना राधाबाई नावाची कन्या होती. त्यांनी आपल्या मुलीचा विवाह किसन वीर यांचेबरोबर लावून दिला. त्यावेळी राधाबाईंचे वय अवघे बारा वर्षाचे होते.[१३५] (राधाबाई जन्म १९०८)

**महात्मा गांधीं यांचा सातारा जिल्हयात दौरा** :

खादीचा वापर व प्रचार करण्यासाठी महात्मा गांधींनी सातारा जिल्हयात दौरा काढला. सांगली, दुधगाव, आष्टा, इस्लामपूर, कराड, सातारा येथे गांधीजींच्या सभा झाल्या. सातारा जिल्हा लोकल बोर्डानी गांधीजींना मानपत्र दिले.[१३६] कर्मवीर भाऊराव पाटील यांनी म.गांधीजींच्या हस्ते शाहू बोर्डींगचे उदघाटन केले. गांधीजींच्या आवाहनामुळे ग्रामसुधारणेला, ग्रामसंघटनेला चालना मिळाली. स्वदेश चळवळीचा एक भाग म्हणून किसन वीरांनी आपले मित्रांसह कवठे येथील दारूचे दुकानासमोर निदर्शने केली.

### ४.३.२ किसन वीर राष्ट्रीय विचारांची चांगलीच जागृती :

किसन वीर यांनी मुंबईप्रमाणे परदेशी कपडयांची होळी करण्याचा बेत केला. मित्रांच्यासमवेत घराघरातील परदेशी कपडे, फेटे, मखमली कपडे जमा करून त्यांची सर्वांसमवेत होळी केली. स्वदेशी कपडे वापरण्याचा निश्चय केला. राष्ट्रीय विचारांची चांगलीच जागृती झाली. कवठे गावात किसन वीरांच्या चळवळीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले.[१३७] वाई प्रज्ञापाठ शाळेच्या वतीने इ.स. १९२७ म़ध्ये राष्ट्रीय शिक्षण परिषद झाली. ९ मे १९२७ रोजी अ.भा.कॉ.चे अध्यक्ष श्रीनिवास अय्यंगर यांचा सातारा, कराड, वाई, महाबळेश्वर व पाचगणी असा दौरा झाला. वाई कार्यक्रमास किसन वीर कार्यकर्ते म्हणून हजर होते. वाईला राष्ट्रीय सेवा दलाची स्थापना १० जुलै १९२७ ला झाली. किसन वीरांना नाटय संगीताची आवड होती. सन १९२८ साली किसन वीरानी आपल्या सहकार्यांच्या मदतीने एकच प्याला, भक्त दामाजी, संगीत शारदा अशी नाटके बसविली. १९२७ साली ग्रामसुधारणा चळवळीचे महत्व लोकांपर्यंत येऊन पोहोचले. सर चुनीलाल मेहता यांनी तुकडे बील मांडले. १९२८ मध्ये सातारा जिल्हयात या तुकडे बीलास विरोध करण्यात आला. आळतेकर, बाबुराव गोखले, नाथ घाणेकर, नानासाहेब देशपांडे यांचा लोकजागृतीचा पुढाकार होता.[१३८] सन १९२९ मध्ये सातारा कॉंग्रेसने जिल्हयात खादीचा प्रचार व सरकारी कामावर बहिष्कार असा प्रचार केला. कॉंग्रेस सभासद नोंदणी केली. प्रांतिकची अपेक्षा २५०० सभासद नोंदणीची होती परंतु सातारा कार्यकर्त्यांनी मुदतीपूर्व ४२४३ सभासद नोंदणी केली. किसन वीरांनी वाई तालुक्यात कॉंग्रेस सभासद नोंदणीचे काम झोकून देऊन केले.[१३९]

### ४.३.३ बेलमाची जंगल सत्याग्रह :

कवठे गावाजवळ किकली नावाचे गाव आहे. शेजारी बेलमाचीचा डोंगर आहे. बेलमाचीच्या जंगलात सत्याग्रह करण्याचे किसन वीरांनी ठरविले. तशा लोकांना पूर्वसूचना दिल्या. लोकांनी बेलमाचीच्या जंगलात आपली जनावरे सोडली. किकलीच्या पोलिस पाटलाने सर्व जनावरे पकडून कोंडवाडयात घातली. लोक किसन वीरांच्याकडे गेले. किसन वीरांनी कवठे, चिंधवली, देगाव येथील लोक बरोबर घेतले व किकलीला गेले. तेथे एक छोटी सभा घेतली. गांधीजींचा जयजयकार केला. कोंडवाडयाचे कुलुप फोडले. जनावरे मोकळी केली. या प्रसंगी जनावरासह किसन वीरांनी एक मिरवणूक काढली. हा जंगल सत्याग्रह फारच गाजला. त्यामुळे त्यांना आयुष्यातील पहिला कारावास घडला.[१४०]

किकलीची जनावरे जबरदस्तीने सोडल्याची तक्रार पोलिसपाटलाने केली. दि.२५.९.१९३० रोजी किसन वीरांचे वर खटला भरला. किसन वीर व त्यांचे सहकारी बाबू सातपुते यांना ११ महिन्यांची सक्तमजूरी व रू.२५ दंड झाला. 'जंगल सत्याग्रहा' निमित्त ७५ लोकांना अटक केली. यापैकी संभाजी करपे, गुलाबराव डेरे, गणपती दाहोत्रे, नारायण राऊत, यदू सावळा जगताप, श्रीधर कुलकर्णी या सहा लोकांना ४ महिने सक्तमजूरी व २५ रू.दंड झाला. बाकीच्यांना सोडून दिले. १० ऑगस्ट १९३१ रोजी किसन वीर तुरूंगातून शिक्षा संपवून मुक्त झाले. कवठयाला त्यांची मिरवणूक काढली. याच दरम्यान कराडचे तरूण

कार्यकर्ते यशवंतराव चव्हाण व किसन वीर यांचा परिचय झाला. सातारा जिल्हा राजकीय परिषद मसूर या ठिकाणी राघू लिमये, डॉ.फाटक, सितारामपंत गरूड, विष्णू मास्तर यांच्या नेतृत्वाखाली भरली होती. या सभेत कोल्हापूरहून भाई माधवराव बागल उपस्थित होते. सावकारांनी दामदुपटीपेक्षा जास्त दराने कर्ज वसूल करू नये असा सल्ला दिला. या परिषदेमध्ये किसन वीर, यशवंतराव चव्हाण, आत्माराम पाटील, पांडू मास्तर, गौरीहर सिंहासने पुढे जीवलग मित्र झाले.[१४१]

### ४.३.४ किसन वीर व १९४२ चा चलेजाव लढा :

६ जूलै १९४२ रोजी कॉंग्रेस कार्यकारिणीची बैठक वर्धा येथे बोलविली होती. नऊ दिवस विचारमंथन झाले. यशवंतरावांना या कालखंडात सातारा जिल्हयातच थांबण्यात सांगितले. मुंबईचे अधिवेशनास यशवंतराव चव्हाण, वि.स.पागे, वसंतराव दादा, काशिनाथ देशमुख इ. कार्यकर्ते सातारा जिल्हयातून निघून गेले होते. १९४२ चे अधिवेशन गोवालिया टँक मैदानावर भरणार होते. अरूणा असफअली राष्ट्रीय तिरंगा झेंडा उभारून भाषण करीत असताना पोलिसांनी लाठीमार सुरू केला. अश्रूधूराचा वर्षाव झाला. कार्यकर्ते पांगले. हजारो कार्यकर्त्यांची धरपकड झाली. यशवंतराव यांनी पान बाजारात कार्यकर्त्यांशी चर्चा केली. आदेशानुसार कृती करण्यास कार्यकर्ते सातारकडे परत निघाले. १० ऑगस्ट १९४२ रोजी डी.जी.देशपांडे यांना किसन वीरांचेकडे पाठविले. शिरूभाऊ लिमये यांचा निरोप दिला. आबा भूमिगत राहून काम करू लागले. डी.जी.देशपांडे हे सदैव त्यांचेबरोबर राहिले.[१४२] किसन वीरांनी ११ ऑगस्टला मित्रमंडळींचे हजेरीत भूमिगत राहून ब्रिटिश सत्ता खिळखिळी करण्याचा संकल्प केला. यावेळी बाबासाहेब मुल्ला, आप्पा डेरे, गणपती घाडगे, कृष्णा कांबळे, गणपती डेरे, शंकर ओझर्डेकर, मारूती मोहिते, नारायण पोळ, रामू पोळ, लक्ष्मण भागवत, खंडेराव इ. मंडळींनी पाठिशी राहण्याचे अभिवचन दिले. सातारचे सोमण, रघूनाथ लिमये, शंकर साठे, गणपतराव आळतेकर, तपासे, बुवासाहेब गोसावी या १४ जणांना पोलिसांनी अटक केली. नरूभाऊ लिमये यांना शिरवळ स्टँडवरच अटक झाली. १५ ऑगस्ट १९४२ रोजी यशवंतराव चव्हाण कवठयाला किसन वीरांचे बरोबर चर्चा करण्यासाठी आले.

ओझर्डे गावी किसन वीरांचे हजेरीत कार्यकर्ते यांची मिटींग झाली. तेथे भीमराव पाटील, खोत, शंकर जेजूरकर यांना भाषण करताना अटक झाली. सप्टेंबर व आक्टोंबर महिन्यात वाईचे माधवराव साठे, कापरे वकिल, बंडोपंत कुडेकर, सखाराम महादेव साठे, आनंदा झोरे, सौ.यमुनाताई केळकर, रघूनाथ पोळ, नांदगिरे वामनराव, कुलकर्णी रेळेकर, गोविंदराव गायकवाड, शंकर शिंदे, इंदिराबाई लिमये, सदुभाऊ वाचाळ यांना पोलिसांनी अटक केली. पुण्यामध्ये शिरूभाऊ लिमये चळवळीस मार्गदर्शन करीत होते.[१४३] १८ सप्टें, १९४२ ते पुण्याहून कवठयाला येत होते त्यांचेबरोबर डुप्लेकेटिंग मशिन व दारूगोळा होता. पोलिस आबांचे शोधात होतेच. पोलिस कवठे, करंजखोप, वाई, सातारा करत करत चौकशी करिता पुणे येथे आले. ज्या गाडीने आबा कवठयाला चालले त्या गाडीत सी.आय.डी. पोलिस येऊन बसले. प्रसंगावधान राखून किसन वीर यांनी आणलेले साहित्य मित्राकडे दिले. पोलिसांनी किसन वीरांना पकडले. गावातून शेकडो लोक

किसनवीर आबांना निरोप देण्यासाठी बरोबर होते.

**४.३.५ किसन वीर येरवडा कारागृहातून निसटले** :

किसन वीर, भाई छन्नुसिंग, पांडू मास्तर, बलदेव प्रसाद व भाई विभूते यांनी बेत करून येरवडा कारागृहातून उडया मारल्या व पसार झाले. ३१ आक्टों. १९४२ रोजी ९ वाजता किसन वीर चार साथीदारासहीत अंधारात गडप झाले. प्रथम भाई छन्नुसिंग व पांडू मास्तर भिंती उतरून पार गेले. नंतर किसन वीर शिडी उतरत असताना कशाचा आवाज झाला. पोलिस आवाजाच्या दिशेने आले. घाईघाईने बलदेव प्रसाद व भाई विभूते आतल्या शिडीवरून उतरून बाहेरच्या शिडीवर आले. बाहेरच्या शिडीवरून किसन वीरांसहित तिघेजण उतरत होते. वजनामुळे शिडी कचकली व तिघेजण जमिनीवर पडले. ठरल्यानुसार साऱ्यांनी पळ काढला. कैद्यांना पकडण्यासाठी पोलिस चारही दिशेला पळाले. किसन वीर त्यांच्या चार साथीदारांसहीत येरवडा जेल फोडून बाहेर फरार झाल्याची वार्ता ऐकून यशवंतरावांना आनंद झाला. त्यांना हुरूप आला.[१४४] या दिवसापासून आबा जिल्हयातील चैतन्यमूर्ती झाली. सातारा जिल्हयाचे नेतृत्व करायला श्री.नाना पाटील, श्री.किसनवीर, श्री.पांडू मास्तर, श्री. नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड, बर्डे मास्तर व वसंतराव पाटील दादा यांच्यासारखे जबरदस्त कणखर, कार्यकर्ते चळवळीच्या पाठीशी होते.[१४५]

**भूमिगत जेल फोडून फरार झाले** :

किसन वीर व त्यांचे साथीदारांनी ३१ आक्टोंबर १९४२ रोजी येरवडयाचे अभेद्य जेल फोडून देशप्रेम दाखविले. २४ जुलै १९४३ रोजी वसंतराव दादा पाटील यांनी सांगलीचा जेल फोडून १७ बंदूका पळवल्या. त्यांचेच अनुकरण माधवराव जाधव यांनी केले. माधवराव यांनी कराडचा सबजेल दि.१४ जून १९४४ ला फोडला व आपल्या चार साथीदारांसह ते भूमिगत झाले. नागनाथ नायकवडी यांनी पोलिसांना आटयापाटया खेळात गुंतविले व दिवसा ढवळया ते भिंतीवरून उडी मारून फरार झाले. सर्व भूमिगत जीवाची पर्वा न करता अखेरपर्यंत लढा देत राहिले. भूमिगतांना गुलामगिरीचे जीवन जगणे मान्य नव्हते. किसनवीर यांची येरवडयाच्या भिंतीवरील साहसी उडी तर इतिहासात अजरामर राहिली. या साहसाने चळवळीत नवे पर्व सुरू झाले.[१४६]

भूमिगतांना खर्चासाठी पैसा लागत प्रवासासाठी पैसे लागत. या पैशाची तरतूद म्हणून जोशीकाका व किसन वीर आबा यांनी मुंबई ऑफिस सुरू करून सातारा जिल्हा राष्ट्रीय संघ स्थापन करण्याचे ठरविले. सातारा जिल्हयातील मुंबईत असलेल्या प्रत्येक माणसाकडून महिन्याला एक रूपया घेऊन संघटना उभी करण्याचे ठरले. यामुळे खूप निधी जमा होऊ लागला. या संघटनेचे जवळपास लाखभर सभासद झाले. किसन वीरांनी हे कार्य मुंबईत सुरू केले होते. याचा पोलिसांना संशय आला. ते आबांचा शोध घेऊ लागले. आबा वेष बदलू लागले. ते तारगाव इस्टेट गिरगाव येथे गेले. तेथे ते गोखले यांच्याकडे राहू लागले. दुर्दैवाने यांनाच अटक झाली मग आबांनी जागा बदलली व ते देशपांडे यांच्याकडे राहावयास गेले. परंतु त्यांना सुद्धा पुढे पोलिसांनी पकडले.[१४७] जानेवारी १९४६ मध्ये साने गुरूजींचा सातारा दौरा झाला. भुईंज येथील सभा

यशस्वी करण्यासाठी किसन वीर आबा व प्रतापराव भोसले यांनी प्रयत्न केले. आबा भूमिगत होते. त्यामुळे बुवा कृष्णा पोळ यांचे कपडे घालून त्यांच्या नावाने सभेत वावरत होते.[१४८]

**४.३.६ सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास – सातारा जिल्हा मध्यवर्ती सह.बँक:**

सहकारातून विकास घडविण्याकरीता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हवी याबाबत यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, किसनवीर व रघुनाथ पाटील हे १९४६ पासून प्रयत्नशील होते. पुढे लहानमोठया कार्यकर्त्यांच्या सहकार्याने साधारणपणे पावणे दोन लाख रूपयाचे भांडवल तयार केले व रितसर जिल्हा सहकारी बँकेची नोंदणी केली. दि.११ नोव्हेंबर रोजी सातारच्या कन्याशाळेत ना.यशवंतराव चव्हाण, किसन वीर, बाळासाहेब देसाई यांच्या उपस्थितीत बँकेचे उदघाटन ना.मोरारजी देसाई यांच्या हस्ते झाले. बँकेचे पहिले भागधारक बाळासाहेब देसाई हे सातारा जि.मध्यवर्ती सहकारी बँकेचे पहिले अध्यक्ष झाले. उपाध्यक्ष निळकंठराव कल्याणी झाले. किसन वीरांनी बँकेचे भाग भांडवल गोळा करण्यासाठी खूप परिश्रम केले.[१४९]

**सन. १९५१ चा दुष्काळ :**

इ.स.१९५१ मध्ये दुष्काळ पडला. ग्रामीण भागात दुष्काळाने गंभीर परिस्थिती निर्माण झाली. पाण्यामुळे फारच बिकट स्थिती निर्माण झाली. दुष्काळाने मुलभूत गरजा भागविणे कठिण होऊन बसले. जिल्हा काँग्रेसने सप्टें. १९५१ या दुष्काळाचे संदर्भात बैठक घेऊन लोकांना पुरेसे पाणी, गुरांना चारा शासनाने उपलब्ध करून दयावा अशी शिफारस केली. दुष्काळी स्थितीची पाहणी करण्यासाठी तालुकवार कमिटया नेमल्या व अहवाल गोळा केले.[१५०]

**४.३.७ जिल्हा काँग्रेस अध्यक्ष म्हणून किसन वीर यांचे काम :**

**सातारा मार्केट कमिटी:**

किसन वीर आबा अध्यक्ष झाले तेव्हा दि ॲग्रीकल्चरल प्रोडयूस मार्केट कमिटीची स्थापना झाली. शेतकऱ्यांच्या शेती मालाला रास्त किंमत मिळावी व शेतकऱ्यांची व्यापारी, दलाल, यांचेकडून होणारी पिळवणूक थांबविणे हा हेतू होता. शेतकऱ्यांच्या बद्दलचा आबांचा जिव्हाळा व शेतीची आवड या दोन गोष्टी पाहून त्यांना सर्वानुमते सातारा मार्केट कमिटीचे अध्यक्ष केले. शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याची हमी दिली यामुळे उलाढाल वाढली. हजारो शेतीमालाच्या पोत्यांची आवक वाढली. शेतकऱ्यांच्या सोईसाठी वाई, सुरूर, अतीत, वडूज या ठिकाणी सबमार्केट उघडली. निवडणूकीत खर्च होतो म्हणून निवडणूका बिनविरोधी केल्या. मार्केटसाठी एस.टी.स्टँड समोरील जागा विकत घेऊन इमारत बांधल्या व शेतकरी निवासांच्या माध्यमातून नियमीत उत्पन्न चालू केले. किसन वीरांनी ३ जून १९५३ च्या सभेत धोम धरणाची मागणी शासनाकडे केली व कार्यकर्त्यांना किसन वीरांनी मार्गदर्शन केले. किसन वीर आबांनी तालुका काँग्रेस कमिटया सक्षम करण्याचा प्रयत्न केला. रा.ना.चव्हाण किसन वीर यांच्या संदर्भात म्हणतात, ''ज्यावेळी क्रांतीची गरज निर्माण होते तेव्हा क्रांतीपुरूष क्रांतीसाठी कटीबद्ध होतात. क्रांती म्हणजे आमूलाग्र बदल किसन वीरांचे नेतृत्त्वाने कोणकोणत्या क्षेत्रात क्रांती झाली हे अभ्यासण्याजोगे आहे.''[१५१]

कवठे गावातील रस्त्यांचे काम हजार लोकांच्या श्रमदानाने दोन हजार गाडया मुरूम, पाच हजार गाडया वाळू श्रमदानातून केले. सोळशी अडीच मैल खिंड लोकांनी श्रमदानाने फोडली. त्यांच्या श्रमदानाचा गौरव करताना यशवंतराव चव्हाण म्हणाले, ''हे समाजमंदिर गावच्या विकासाचा एक भाग आहे. आबांनी लोकांना सुशिक्षित व सुसंस्कृत बनवून हे मंदिर आपल्या गावचे श्रमाचे व संस्कृतीचे प्रतीक म्हणून बांधले. आबा माझे चाळीस वर्षाचे मित्र आहेत. ते कर्तव्यनिष्ठतेचे प्रतीक आहेत.''[१५२] यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाने प्रेरणेने व बाळासाहेब देसाई किसन वीरांच्या प्रयत्नाने जिल्हयाच्या कानाकोपऱ्यात श्रमदानाचा प्रचंड उठाव झाला. या संदर्भात गौरव करताना बाळासाहेब देसाई म्हणतात, ''सातारा जिल्हा बहादुरीसाठी प्रसिद्ध आहे. पारतंत्र्यात या आमच्या सातारा जिल्हयाने आपला इतिहास रक्ताने लिहिला. त्याच साताऱ्याने पुढील इतिहास श्रमदानाने लिहिला आहे.'' या योगदानाने १५० मैल लांबीचे रस्ते बांधले. ६०–७० शाळा बांधल्या. श्रमदान मोहिमेतून सातारा जिल्हयाचा कायापालट घडविला आहे.[१५३] कर्तृत्ववान माणसांचा सहवास हा व्यक्तिमत्त्व विकास घडविण्यास उपयुक्त ठरतो. जनतेच्या सहकार्यावर आबांनी लोकांसाठी अखंड काम केले.[१५४]

### ४.३.८ किसन वीर आबांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान :

कवठे परिसरातील खेडोपाडयातील मुलांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय कशी करावी याचा विचार किसन वीर आबांनी केला. सुरूर येथे त्यांनी तेल गिरणी व पिठाची गिरणी सुरू केली. सुरूरचे त्यांचे मित्र श्री.बाबुराव चव्हाण, डॉ.रशिद खान, बाबासाहेब मुल्ला यांची चर्चा झाली व सुरूरमध्ये एक शाळा काढण्याचे त्यांनी नियोजन केले.[१५५] सन १९५१ मध्ये सुरूर येथे प्रांतिक कॉंग्रेस कमिटी कार्यकारिणीची बैठक झाली. बैठक झाल्यावर किसन वीरांनी परिसरातील मुलांच्या शिक्षणासाठी विद्यालय हवे आहे असे यशवंतराव चव्हाण यांच्यापुढे मांडले. यशवंतराव यांनी कराडच्या शिवाजी हायस्कूलव्दारा एक हायस्कूल सुरू केले. १९६० मध्ये सुरूर येथे यशवंत शिक्षण संस्था रजिस्टर केली व या संस्थेव्दारे नवीन हायस्कूल सुरू करण्यात आले. १४ जून १९६० पासून बा.ना. चिटणीस या मुख्याध्यापकांचे मार्गदर्शनाखाली नवीन हायस्कूल स्थापन केले. या यशवंत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष किसन वीर हे होते. उपाध्यक्ष बा.सा.चव्हाण तर सेक्रेटरी वा.ना.चिटणीस होते. सन १९६० ची स्थिती मुले १०० होती. आज त्या हायस्कूलच्या मुलांची संख्या १००० आहे. या संस्थेची वाई, केंजळ, गुळुंब, शिवथर, उडतारे व पांडे येथे शाखा आहेत. आपल्या संस्थेच्या शाळा चांगल्या चालाव्यात अशी आबांची तळमळ होती. आबा शाळेच्या दैनंदीन जीवनात कधी ढवळाढवळ करीत नव्हते. शाळा उत्तम चालावी खूप मुले शिकावीत अशी त्यांची माफक अपेक्षा होती.[१५६] एकूण सहा एकर जमीन शाळेला मिळाल्याने इमारती तयार करून १९७२ मध्ये त्यात शाळा सुरू करण्यात आली. शाळेला शेती होती. त्यात विहीर खुदाईकरिता पंचायत समिती वाईकडून अनुदान मिळाले. शाळेची शेती सुरू करण्यात आली. आबांचा शेती आवडीचा विषय ते वारंवार जाऊन शेतीला भेट देत. सूचना करीत मुलांचे गोड कौतुक करीत असत.[१५७]

**महाविद्यालयाची स्थापना :**

अपुऱ्या शिक्षणाची वेळ आपल्या परिसरातील तरूणांवर येऊ नये म्हणून वाई येथे महाविद्यालयाची स्थापना केली. वाई महाविद्यालयाचे हस्तांतर करताना द्यावयाच्या रकमेसाठी आबांच्या सांगण्यावरून बत्तीस लोकांना आपली स्वत:ची खाजगी घरे व जमीनी सांगली बँकेस तारण दयाव्या लागल्या.[१५८] दि.९.११.१९८१ आबांच्या स्मृती विशेषांकाचे प्रकाशन झाले त्यावेळी यशवंतराव म्हणतात, '' सत्ता उपभोगण्यासाठी नसून लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी आहे.'' परिवर्तन घडविण्याचे सत्ता हे साधन आहे. हे राजकारणी मंडळींनी लक्षात ठेवले पाहिजे. सत्तेच्या आधारे लोककल्याण घडविण्याचा सतत आग्रह किसन वीरांनी धरला. ऊर्जामंत्री ना.जयंतराव टिळक यांच्या हस्ते संस्थेच्या परिसराचे 'वीरबाग' हे नामकरण केले.[१५९] किसन वीर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आ.विठ्ठलराव जगताप, डॉ.प्र.श.मराठे, भा.द.प्रभुणे वकील, आप्पासाहेब भट, नानासाहेब पागे गुरूजी ही मंडळी १६ जुलै १९६१ रोजी एकत्र जमली व महाविद्यालय समिती स्थापन केली.

**४.३.९ किसन वीर आबांचा शेती विकासाचा ध्यास :**

शेतकऱ्याची खरी उन्नती व्हायची असेल तर ऊसासारखी रोख पैसा देणारी पिके केली पाहिजेत. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी वाई परिसरात साखर कारखाना उभा करण्याचा विचार केला. किसन वीरांनी २० एप्रिल १९६८ रोजी आपला विचार शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याकरिता वाई, सातारा, जावली, खंडाळा तालुक्यातील शेतकऱ्यांची सभा सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत बोलाविली. साखर कारखाना उभारणीबाबत आबानी सर्वांना सविस्तर माहिती सांगितली. साखर कारखान्याचा प्रस्ताव तयार केला. तो प्रस्ताव २२ मे १९६८ रोजी केंद्र शासनाकडे राज्यसरकारमार्फत मंजूरीसाठी पाठविला. योगायोग असा की किसन वीर आबांचे जिवलग मित्र आण्णासाहेब शिंदे केंद्रीय शेती खात्याचे राज्यमंत्री होते. त्यांच्याकडे साखर कारखाना निर्मिती विभाग होता. महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांनी परिसरात अपूरा ऊस पिकत असल्याने साखर कारखान्याची शिफारस केली नव्हती. यामुळे केंद्र सरकारचे अधिकारी मंजूरी देण्यास तयार नव्हते. ना.आण्णासाहेब शिंदे यांना ही वस्तुस्थिती माहिती होती. शिवाय किसन वीर आबांचे कर्तृत्वसुध्दा त्यांना माहित होते. कमी पडणारा ऊस कारखान्याला ते अन्य ठिकाणाहून उपलब्ध करतील याबाबत त्यांना विश्वास होता. म्हणून आण्णासाहेब शिंदे यांनी स्वत: च्या जबाबदारीवर दोन तीन महिन्यात मंजूरी पाठविली. शेअर भांडवल गोळा करण्यास गती मिळाली. कारखान्याचा पहिला शेअर रू.१००० चा आबानी घेतला. ३०.९.१९६८ पर्यंत पाच लाखाचे शेअर्स भांडवल गोळा केले. कारखाना उभा करण्यासाठी सर्वच मंतरल्यासारखी कामे करीत होती. सुटटी नाही, विश्रांती नाही एकसारखे काम करून एका वर्षातच कारखान्याची मंजूरी मिळविली.[१६०] आबा १.१०.१९६८ ते ४.९.१९७१ पर्यंत चेअरमन होते. सभासद व संचालकांनी या कारखाना परिसरात 'किसन वीर नगर' नाव दिले.

### ४.३.१० सातारा जिल्हयातील सहकारी मध्यवर्ती बँक : कर्मचारी संघर्ष व किसन वीर अध्यक्ष

बँकेच्या पहिल्या वर्षी बाळासाहेब देसाई अध्यक्ष होते. पुढे कै.रघूनाथ पाटील १४ ते १५ वर्षे अध्यक्ष होते. किसन वीर आबा अपघाताने अध्यक्ष झाले. १९६२–६३ मध्ये बँक कर्मचाऱ्यांनी मोठा संघर्ष केला. बँकेची परिस्थिती बिघडत गेली. या पार्श्वभूमीवर किसन वीर सन १९६५–६६ च्या सुमारास बँकेचे अध्यक्ष झाले. आबा बँकेच्या कर्मचाऱ्यांची भूमिका घेऊन बँकेच्या प्रशासनात उतरले. बँक कर्मचाऱ्यांशी पूर्ण विश्वासाने चर्चा करून त्यांना आबानी स्वत: ची कामाची पध्दत, स्वरूप, जबाबदाऱ्या इ.बाबी सांगितल्या. कर्मचारी एक प्रकारच्या दडपणाखाली काम करीत होते. आबानी संघर्षाचे रूपांतर मोठया कौशल्याने प्रेमात केले. आबा कामाचे अन विकासाचे चाहते होते. खोटे बोललेले त्यांना आवडत नव्हते.[१६१] आबानी बँक अध्यक्षाची सुत्रे हातात घेतली तेव्हा सर्वसाधारण कार्यकर्ता बँकेकडे यायला दबकत होता. आबानी ही अवस्था बदलली. कार्यकर्ता बँकेशी सुसंवाद करू लागला. पैसा हे विकासाचे साधन हे लोकांना चांगलेच समजू लागले. बँक आपली याचा विश्वास निर्माण झाला. बँक आणि जनता एकजीव झाली.[१६२]

बँकेला जिल्हयात चांगले स्थान प्राप्त झाले. यातूनच पुढे आबा राज्य बँकेवर प्रतिनिधी म्हणून गेले. आबांनी बँकींग क्षेत्राचा अभ्यास केला. किसन वीर आबानी त्यांचे विचार राज्यपातळीवर तपासून पाहिले. रिझर्व बँकेच्या सहवासात राहून पारंपारिक विचारात बदल घडवून आणला. बँकेची आजची स्थिती फारच भक्कम आहे. महाराष्ट्रातील एक बलवत्तर बँक म्हणून कार्यरत आहे. ही किसन वीर आबांच्या धोरणाची पुण्याई आहे.[१६३] बँकेच्या सोळा वर्षाच्या काळात १९५१ ते १९६७पर्यंत बँकेचा २२ शाखेत विस्तार झाला. पुढे आबा अध्यक्ष झाल्यावर बारा वर्षात १९७९ पर्यंत नवीन ४२ शाखा उघडण्यात आल्या. बँकेच्या एकूण विस्तार ६४ शाखांत झाला. ठेवी ४२ लाखावर गेला किसन वीरानी दीड लाख रूपये खर्च करून सातारचे कॉग्रेस भवन बांधून घेतले.

### ४.३.११ किसन वीर यांचे संघटन कौशल्य व शेती कार्य :

दुष्काळाचे संदर्भात किसन वीरांनी संपूर्ण सातारा जिल्हा दुष्काळी म्हणून जाहीर करावे, शेतकऱ्यांची कर्जवसुली थांबवावी, भूकंप ग्रस्तांची कर्जे माफ करावीत अशी शासनाकडे मागणी केली. या मागणीत जनतेच्या अपेक्षा आबांनी नमूद केल्या होत्या. त्यामुळे दुष्काळी काम व जनतेच्या मागणीचा प्रश्न याचा सरकारने प्राधान्याने विचार केला व दुष्काळग्रस्तांना दिलासा मिळू शकला. सातारा जिल्हयात १९७२–७३ पासून फारच भीषण दुष्काळी स्थिती निर्माण झाली होती. शेतकरी या आपत्तीने फार दबून गेला होता. आबा म्हणत शेतकरी जगला पाहिजे तरच पुढ काही करता येईल.[१६४]

सामान्यासाठी काय करावे हे सांगताना आबा म्हणाले, ''पाऊस चांगला झाला आहे. शेती विकास कार्यक्रम हाती घ्या. तालुक्याचे गट पाडून शेती उत्पादन वाढविले पाहिजे. जिल्हा परिषद व जिल्हा काँग्रेस यांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. शंकरराव जगताप व चिमणराव कदम यांनी योग्य अधिकाऱ्यांचे सहकार्याने विकास आराखडा तयार करावा.'' काँगेस पक्षावर व यशवंतराव साहेबांच्यावर त्यांचे कमालीचे

प्रेम होते.[१६५] दिल्लीत उठलेल्या राजकीय वादळाची लाट सातारा जिल्हयात पसरली. जिल्हा काँग्रेस अध्यक्ष विलासराव पाटील यांनी २२ जून १९७५ रोजी बैठक बसविली. आबांनी पक्ष संघटनेबाबत कार्यकर्त्यांना इशारा दिला. काँग्रेस पक्षावर त्यांची कमालीची श्रद्धा होती. पक्ष संघटना मजबूत करावी हा विचार त्यांनी अखेरपर्यंत जपला. आबा काँग्रेस पक्षाचे पूजक होते. यशवंतराव चव्हाणांना त्यांनी निरपेक्ष साथ दिली. काँग्रेस पक्षाशी ते एकनिष्ठ राहिले. जेंव्हा यशवंतराव चव्हाण आबांच्या चित्तेजवळ गेले तेव्हा दु:खाने ते पार कोलमडले त्यांना भावना काबूत ठेवता आल्या नाहीत. ते रडू लागले. मित्रत्त्वाच्या मैत्रीचा बांध फुटला. कोणी कोणाला आवरायचे.[१६६]

**किसन वीरांना सेंट जार्ज हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल:**

दि.२८ नोव्हेंबर १९७९ रोजी आबांची तब्बेत फारच बिघडल्याने मुंबई येथील सेंट जार्ज हॉस्पिटलमध्ये दाखल केले. निवडणूक तोंडावर असल्याने यशवंतराव चव्हाण जिल्हयातच थांबले. ३ जानेवारी १९८० रोजी मतदान असल्याने प्रचाराची रणधुमाळी चालू होती. किसन वीरांचेवर डॉक्टर उपचार करीत होते परंतु त्यांची तब्बेत दिवसेंदिवस बिघडतच गेल्याने त्यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले.[१६७] गुरूवार २७ डिसेंबर १९७९ रोजी सातारचा हा लढवय्या साहसी क्रांतिकारक निवडणुकीच्या अगोदर एक आठवडा सर्वांना सोडून गेला. आबांचा अत्यविधी यशवंतरावांच्या सूचनेनुसार वाई येथे कृष्णाकाठी करण्याचे ठरले. आबांचा पार्थिव वाई महाविद्यालयात सर्वांच्या अंत्यदर्शनासाठी ठेवला. आण्णासाहेब शिंदे, वसंतराव दादा, सुशिलकुमार शिंदे, सौ.शालिनीताई पाटील, यशवंतराव मोहिते, दादासाहेब रूपवते, श्रीपतराव बोंद्रे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, तात्यासाहेब कोरे, कलाप्पा आवाडे इत्यादी मंडळींनी पुष्पहार अर्पण करून श्रध्दांजली वाहिली.[१६८] यशवंतराव चव्हाण श्रध्दांजली वाहताना म्हणाले, '' आबासाहेब वीर हा एक अष्टपैलू माणूस होता. त्यांच्या निधनाने माझ्या जीवनात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पन्नास वर्षे सांभाळलेल्या आमच्या स्नेहाची आज अखेर झाली. आमची मैत्री अभूतपूर्व होती. माणूस म्हणून त्यांच्यात जे गुण होते त्याला तोडच नाही. साधी रहाणी त्यांनी कधीच सोडली नाही. एवढया शुध्द चारिञ्याची व्यक्ती क्वचितच आढळते. सहकारी चळवळ हे लोकसेवेचे साधन मानले. स्वत: चा मृत्यू दिसत असतानाही त्यांनी सदैव दुसऱ्यांची चिंता केली.

**समारोप : किसन वीर**

किसन वीर राजकीय व सामाजिक कार्यात रमलेले असल्याने त्यांच्या जीवनाचा मोठा भाग हा सार्वजनिक स्वरूपाचा होता. सातारा जिल्हयातील वाई तालुक्यातील कवठे नावाच्या छोटया गावातील एक नागरिक स्वकर्तृत्वाच्या जोरावर काय करू शकतो याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे किसन वीर आबा होय. सन १९४२ च्या छोडो भारत संग्रामात त्यांनी जीवाची बाजी लावली. त्यांना कैद झाली. परंतु तुरूंगात खितपत पडणे गुलामगिरीत राहणे त्यांना रूचले नाही. यशवंतराव चव्हाण यांना लवकरच येतो आहे असा निरोप दिला व येरवडयाच्या अभेद्य भिंती तोडून ते भूमिगत झाले व पुढील सारे आयुष्य देशसेवेत घालविले. वडिलांची

संपत्ती संपली, कुटुंबाकडे दुर्लक्ष झाले. तरीसुध्दा त्यांनी स्वाभिमान आणि संयम सोडला नाही.

झुंजारवृत्ती हा आबांचा स्थायीभाव होता. स्वपराक्रमाने त्यांचे कर्तृत्व फुलत गेले. त्यांची नम्रता, मनमिळावूपणा, दुसऱ्याला सांभाळून घेण्याची वृत्ती यामुळे त्यांना चांगला मित्र परिवार मिळाला. लोकसंग्रह हा सुध्दा त्यांचा स्थायीभाव होता. गरीब – श्रीमंत, उच्च – नीच, लहान – मोठा असा कोणताच आपपरभाव त्यांचेकडे नव्हता. १९४२ च्या लढयात पोलिसांचे हाती पडू नये याची त्यांनी काळजी घेतली. सत्तेची त्यांनी कधी अपेक्षा केली नाही. १९४७ पूर्वी आबांनी ब्रिटिशाविरूध्द लढून मिळवलेले राजकीय स्वातंत्र्य व स्वातंत्र्योत्तर माझा बांधव दोन घास सुखाने कसा खाईल याकडे लक्ष दिले. देशकार्यापायी स्वत: च्या संसाराकडे दुर्लक्ष केले. ब्रिटिशांना सळो की पळो करणारे आबा स्वातंत्र्यानंतर इथल्या सामाजिक विषमतेविरूध्द लढले. प्रतिसरकारमध्ये सहभागी झालेले आबा सामान्यांच्या उध्दारासाठी आयुष्यभर लढाई लढत राहिले.

शेती हा आबांचा आवडीचा विषय होता. शेतावर चक्कर मारल्याशिवाय त्यांना करमत नसे. आण्णासाहेब शिंदे यांनी आबांना राज्यसभेवर घेण्याची सूचना केली. परंतु आबांनी ती साफ नाकारली. आबांचे मित्र हेच त्यांचे वैभव होते. बाबूराव घोरपडे आबांचेबद्दल म्हणतात, ''आबा खरोखर ज्ञानेश्वर होते. '' सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून गोरगरीबांचे संसार त्यांनी फुलविले. शेतकऱ्यांच्या घरी त्यांनी विकासगंगा पोहोचविली. साखर कारखाना उभारला. धोम–कण्हेर धरणाला गती दिली. बँक आणि जनता एकजीव केली. आजची भक्कम बँक म्हणजे आबांच्या धोरणाची पुण्याई आहे. दुष्काळी स्थितीत किसन वीर आबानी फार मोठी मदत केली. कर्ज वसुली थांबविली. स्वत: चे शिक्षण थांबले अपूरे राहिले म्हणून युवकांना शिक्षणासाठी त्यांनी सोई केल्या. सन १९६० साली यशवंत शिक्षण संस्था काढली. शेतीत आधुनिक तंत्राचा वापर करावा यासाठी ते आग्रही होते. धोम धरण, सातारा सहकारी साखर कारखाना, वाई महाविद्यालय ही तीन आधुनिक मंदिरे त्यांच्या कार्याची, परिश्रमाची साक्ष देतात.

**निष्कर्ष:**

आबांची राहणी साधी, अंत: करण निर्मळ व प्रवाही होते. ते स्वावलंबी होते. आबा कवठे भूमीवर खूप प्रेम करत. कवठे गावचा उत्तम विकास करून त्यांनी जन्मभूमीचे ऋण फेडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. अनेक राजकीय नेत्यानी कवठे गावाला भेटी दिल्या. त्यांचे सहकारी प्रतापराव भोसले म्हणतात, '' आबा खरेखुरे लोकनायक होते. एवढी वर्षे राजकारणात परंतु शहरात राहणे त्यांनी कधीच पसंत केले नाही. खरी सेवा खेडूतांनाच मिळाली पाहिजे, त्यांचे जीवन बदलले पाहिजे असे आबांना वाटत.'' राजकारणात आबांची हयात गेली. नवनवीन विचाराची माणसे त्यांनी पाहिली. काहींना त्यांनी राजकारणात आणले. नवीन रक्ताला त्यांनी वाव दिला. आब खरोखरच निरपेक्ष होते. सन १९२० मध्ये गांधी– नेहरूंचा कॉंग्रेस तिरंगा खांदयावर घेतला. सत्याग्रह चळवळी आणि संघर्ष केला. लढयाचे पर्व संपले कॉंग्रेस पक्ष सत्तेवर आला. पुढे २५ ते ३० वर्षे त्यांनी पक्षाची उत्तम सेवा केली. सत्तेपासून ते दूर राहिले. सत्तेपेक्षा संघटना त्यांनी नेहमीच मोठी मानली.

पक्ष संघटना हे सामाजिक सेवेचे साधन आहे असे ते मानत. पक्षास कमीपणा येईल अशी कोणतीही बाब त्यांना खपत नसे. आबा कुणाबद्दलही कधी द्वेष व्यक्त करीत नसत. कोणाबरोबर त्यांनी कधी सूडाचे राजकारण केले नाही. त्यांचेकडे कमालीची सहनशक्ती होती. मुंबईला ते इतके आजारी असूनसुध्दा, इतक्या यातना होऊनसुध्दा कधी विव्हळले, कधी आक्रोश केला नाही. डॉक्टरसुध्दा त्यांच्या या सहनशक्तीबद्दल आश्चर्य व्यक्त करायचे. आबांनी खूप मित्र जमविले. कारण आबा जीवाला जीव देणारे होते. ते खूप प्रेमळ आणि दुसऱ्याबद्दल नेहमी चिंता करायचे. वागायला ते निर्मळ होते. किसन वीर यांचेकडे निर्भयता, निरपेक्षता व निस्वार्थीपणा होता. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राची राजकीय, सामाजिक, आर्थिक व संघटनात्मक जडणघडण केली. अशा किसन वीरांचे योगदान महाराष्ट्रासाठी अतिशय मोलाचे आहे.

**४.४ राजकीय विचारप्रणाली व नेतृत्व : श्री.यशवंतराव मोहिते**

**प्रस्तावना :**

यशवंतराव मोहिते हे स्वतंत्र प्रज्ञेचे, प्रभावी विचारवंत, कृतिशील तत्वज्ञ होते. एक निष्ठावान पुरोगामी मार्क्सवादी नेते म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत.[१६९] यशवंतराव मोहितेंची ध्येयनिष्ठा, निष्कलंक चारित्र्य, प्रतिभाशाली बुद्धी, तर्कशुद्ध विचारसरणी यामुळे ते महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते बनले. त्यांची सामाजिक, राजकीय, सहकार, अर्थ व शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरी फारच मोलाची आहे.

**४.४.१ यशवंतराव यांचा जन्म व बालपण :**

श्री.यशवंतराव माहिते यांचा जन्म७ नोव्हेंबर १९२० रोजी कृष्णा नदीकाठी असलेल्या रेठरे बुद्रुक या गावात शेतकरी कुटुंबात झाला.[१७०] त्यांच्या वडिलांचे नाव माधवराव व आईचे नाव ताराबाई होते. माधवराव मोहिते यांना तीन मुले होती. यशवंतराव हे जिजाबा मोहिते यांना व जयवंतराव हे कृष्णराव भोसले यांना दत्तक गेले होते.[१७१] यशवंतराव माहिते यांचे महाविद्यालयीन शिक्षण हे कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये झाले. कोल्हापूर सत्यशोधक चळवळीचे मोठे केंद्र असल्याने ते सत्यशोधक चळवळीकडे आकर्षित झाले. शंकरराव देव, आचार्य श.द.जावडेकर, आचार्य भागवत यांचा सहवास त्यांना मिळाला. जनता आंदोलने व जनतेच्या समस्या त्यांना जवळून पाहाता आल्या त्या प्रश्नांचा त्यांना याच काळात परिचय झाला.[१७२] त्यांना कुस्तीचा छंद होता. नदीत तासनतास डुंबणे हा तर आवडीचा छंद होता. नेमबाजीत यशवंतरावांचा चांगला सराव होता.[१७३]

४.४.२ **यशवंतराव मोहिते यांच्या राजकीय कार्याचा आरंभ:**

यशवंतराव मोहिते हे डाव्या विचारसरणीचे म्हणून महाराष्ट्र त्यांना ''कार्ल मार्क्स'' म्हणतो. खटावचे माजी आमदार केशवराव पाटील म्हणतात, ''यशवंतराव मोहिते तथा भाऊ, क्रांतिसंह नाना पाटील, कॉ.व्ही.एन.पाटील, आनंदराव चव्हाण व हरीभाऊ निंबाळकर या मंडळींनी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्रासाठी प्रचंड लढा उभा केला.[१७४] संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सत्याग्रह आदी मार्गाने उग्र आंदोलन उभे केले. शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यात भाऊंचा पुढाकार होता.[१७५] या शेकाप पक्ष स्थापनेच्या वेळी

शंकरराव मोरे, भाऊसाहेब मोरे, तुळशीदास जाधव, बी.डी.किल्लेदार इ.मंडळी हजर होती. सर्वांच्या विचारविनीमयाने शेतकरी कामगार पक्षाची मुहूर्तमेढ १९४७ मध्ये आळंदी येथे रोवली गेली.[१७६] ''आपण एकत्र येऊन काम करूया'' असे यशवंतराव चव्हाणांनी सांगितल्यामुळे शे.का.पक्षातील मंडळी काँग्रेसमध्ये गेली.[१७७] यशवंतराव मोहिते यांचा विवाह २४ मे १९५४ रोजी विदर्भातील बॅरिस्टर रामराव देशमुख यांची सुकन्या वनमाला (जाई) यांचेबरोबर झाला.[१७८]

**४.४.३ यशवंतराव मोहिते व संयुक्त महाराष्ट्र ठराव – विधानसभा १९५३ :**

संयुक्त महाराष्ट्राचा हा ठराव यशवंतराव मोहितेंनी मांडू नये असे प्रयत्न झाले. तो पाठीमागे घ्यावा. यशवंतराव ठाम आहेत त्यांची भूमिका खंबीर आहे हे पाहून भाऊसाहेब हिरे यांनी खंबीर भूमिका घेतली. यशवंतराव मोहितेंनी संयुक्त महाराष्ट्राचा ठराव अगदी हळूवारपणे मांडला. जराही समतोल ढळू दिला नाही. कमालीची विनम्रता, कमालीचा निग्रह त्यांच्या शब्दातून व्यक्त होतो. पुढे शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन झाली. या परिषदेचे यशवंतराव मोहिते सेक्रेटरी होते.[१७९] १०फेब्रु.१९५६ रोजी श्री देव यांनी एक पत्रक काढून संयुक्त महाराष्ट्र परिषद बरखास्त केली. पुण्याच्या शनिवारवाडयाच्या पटांगणात भरलेल्या प्रचंड सभेत संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाल्याचे घोषित केले.[१८०] ८, ९ व १० फेब्रुवारी १९५५ मध्ये सांगलीत शेकाप राजकारण समिती सर्वसाधारण सभा झाली. राऊत जी.डी.लाड, के.एल. देसाई, दाजीबा देसाई, उद्धवराव पाटील, नरसिंहराव देशमुख व वसंतराव तुळपुळे या ७ सदस्यांनी पत्रक काढून खाडिलकरांचेवर आरोप केले. सर्व ४९ जण सभेला होते. खाडिलकरांच्या या कारस्थानात तुळशीदास जाधव, यशवंतराव मोहिते, आनंदराव चव्हाण, आत्माराम पाटील इ.सामील होते. खाडिलकर व तुळशीदास जाधव यांची हकालपट्टी करावी असे ठराव पारित केले.[१८१] २८, २९ एप्रिल १९५५ खाडिलकर गटाने वेगळे अधिवेशन भरविले. हे अधिवेशन भुईंज येथे भरविले. या अधिवेशनात भारतीय मजदूर किसान पक्षाची स्थापना झाली. २ ते ४ एप्रिल १९६० मध्ये कराड येथे भारतीय मजदूर किसान पक्षाचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात यशवंतराव मोहिते यांनी निवेदन सादर केले. व पक्षाचे विसर्जन करण्याचे मत मांडले. सुचनेनुसार पक्षाचे विसर्जन झाले.[१८२]

**४.४.४ यशवंतराव मोहिते यांचे इतर कार्य :**

सन १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. यशवंतराव मोहिते यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे काढून युध्दासारख्या प्रसंगात आपण गोंधळून न जाता त्याला सामोरे जाण्याची गरज आहे असे सांगितले. लष्करात युवकांनी भरती होण्यासाठी त्यांना प्रेरणा दिली. तरूणांना भरतीकरिता पात्र होण्यासाठी ट्रेनिंग स्कूल काढली. महाराष्ट्र राज्यातील पोलिस आसामला पाठविले. त्यावेळी सुमारे ७०००० गृहरक्षक (होमगार्ड) ट्रेनिंग देऊन तयार केले. 'होमगार्ड ' ही संकल्पना १९४८ मध्ये पुढे आली. होमगार्ड ही शिस्तबध्द स्वयंसेवी संघटना मुंबई राज्यात उदयास आली.[१८३] नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांना तातडीने बोलावून त्यांच्यावर संरक्षणमंत्र्याची जबाबदारी सोपविली. त्यांच्या जागी मारोतराव कन्नमवार मुख्यमंत्री झाले. परंतु इ.स. १९६३

मध्ये त्यांचे निधन झाले व वसंतराव नाईक मुख्यमंत्रीपदी आले. यशवंतराव मोहिते शेतीउपमंत्री झाले. तेव्हा त्यांनी शेती खात्याला नवी दिशा देण्याचे आरंभिले. इ.स. १९५४ या वर्षी कृष्णा सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली होती. ते त्याचे पहिले संस्थापक चेअरमन होते. शेतीउपमंत्री झालेवर त्यांनी 'शेती दिशा व्याप्ती व प्राप्ती' हे पुस्तक लिहीले.[१८४] त्यांनी शेतीला पूरक जोडधंदयाला उत्तेजन दिले. काही दिवसातच खेडोपाडी कुक्कुटपालन, वराहपालन, दुग्धव्यवसाय दिसू लागले. सहकारी तत्वावर व्यवसाय उभारणीस प्राधान्य दिले. यशवंतरावभाऊंनी बोरीवली पार्क येथे बेकन ॲण्ड हॅम ही अद्ययावत फॅक्टरी उभारून राज्यभरातून अंडी संकलनाचे काम, खरेदी व विक्री इ. योजना राबविल्या.[१८५] कृषी विद्यापीठ स्थापनेच्या प्रक्रियेत भाऊंनी पुढाकार घेतला. याच प्रयत्नाचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्यात चार कृषी विद्यापीठे स्थापन झाली.[१८६] यशवंतराव लोकशाहीच्या मार्गाबददल सांगतात, ''प्रत्येकाला प्रत्येक क्षेत्रात योग्य वाटा मिळाला पाहिजे.''[१८७] दुग्ध व्यवसायातील भरभराट व्हावी या उद्देशाने चांगल्या प्रतीच्या गाई, म्हैशी यांची पैदास करणे इ.योजना आखल्या.

**४.४.५ कॅबिनेट मंत्री दर्जा – विविध खाती समर्थपणे हाताळली :**

१९६७ मध्ये सार्वत्रिक विधानसभा निवडणुका झाल्या. यावेळी त्यांना कॅबीनेट मंत्री म्हणून दर्जा मिळाला. त्यांना गृहनिर्माण व परिवहन खाते मिळाले. प्रत्येक मिळणारे खाते एक आव्हान समजून काम करणे भाऊंचा स्थायीभाव होता. गृहनिर्माण मंत्री असताना झोपडपट्टी सुधारणा मंडळाची स्थापना त्यांनी केली. (Slum Improvement Board) [१८८] मंत्री या नात्याने त्यांचेकडे जे खाते आले त्याला त्यांनी योग्य न्याय दिला. गृहनिर्माण, राज्यपरिवहन, अन्न व नागरी पुरवठा, सहकार, अर्थ अशी विविध खाती त्यांनी समर्थपणे सांभाळली. आपल्याकडे असलेल्या खात्याचा ते सखोल अभ्यास करत. यामुळे त्या खात्याच्यासंदर्भात कारभार करताना त्या खात्यावर त्यांच्या विचाराची छाप पडत असे.[१८९] ''सन १९६७ मध्ये भाऊ कॅबीनेट मंत्री झाले. एस.टी व हौसिंग बोर्ड ही खाती त्यांचेकडे होती.

**४.४.६ यशवंतराव मोहिते यांचे सहकारमंत्री म्हणून काम :**

नोव्हेंबर १९६९ मध्ये भाऊंच्याकडे सहकारमंत्रीपद आले. सहकारात भाऊ दर्दी होते. सखोल अभ्यासानंतर या सहकारावर त्यांनी श्वेतपत्रिका तयार केली. व्यापारी मंडळीकडून म्हणून डायरक्टोरेट ऑफ मार्केटिंग, यंत्रमाग व हातमाग महामंडळ सूतगिरण्या इ.संस्था निर्माण केल्या. प्रत्येक साखर कारखान्याला ग्रामीण बँकेची सुविधा निर्माण केली. महिला नागरी बँकेतून अल्पबचतीची व बँकिंग व्यवहाराची स्त्रियांच्यात 'सहकार चळवळ' उभी केली. महाराष्ट्र राज्याचे शिलकी अंदाजपत्रक सादर करणारे पहिले अभ्यासू अर्थमंत्री होते.[१९०] सहकारी चळवळीला गती व चळवळीचे पुनरूज्जीवन करण्यासाठी 'सहकारी चळवळीची पुनर्रचना' हा ग्रंथ यशवंतराव मोहितेंनी लिहला.[१९१] या काळात महाराष्ट्रातील कापूस योजना देशभरात नावारूपाला आली. कापूस योजना भाऊंनी आखली. कापूस योजना सुरू करताना मोठया विरोधाला तोंड दयावे लागले. परंतु या विरोधाला न उगमगता त्यांनी जिनिंग प्रोसिंग फॅक्टरी ताब्यात घेऊन या योजनेस १९७२ मध्ये प्रारंभ

केला त्यांनी हातमाग व यंत्रमाग महामंडळाची स्थापना केली.[१९२] एकाधिकार कापूस खरेदी योजना त्यांनी निर्माण केली. महाराष्ट्रातील लाखो कापूस शेतकऱ्यांना याचा लाभ झाला. सहकार खात्यांचा कारभार यशवंतराव यांनी समर्थपणे चालविला. सचिवालयातील सचिव इतर भाऊंच्या सहकार व अर्थमंत्रीपद संदर्भांत गौरवपूर्ण उल्लेख करतात.[१९३]

महाराष्ट्रात त्यांनी यंत्रमागाचे पाच मोठे प्रकल्प उभे केले. वस्त्रोद्योगास चालना देण्यासाठी Directorate Handloom Powerloom and Texttile स्थापन केले. राज्यात त्यांनी पंधरा सूतगिरण्यांची स्थापना केली. शेतीतील तेलबियाकरिता 'तेलबिया प्रकल्प' हाती घेतला. शेती व्यवसायाला खते, बी बियाणे व भांडवल याबाबतीत शेती स्वयंपूर्ण करण्यासाठी गावोगावी विविध कार्यकारी सहकारी सोसायटया निर्माण करून शेती व्यवसायाचा विकास करण्याचा प्रयत्न केला. शेतीमालाच्या विक्रीतून शेतकऱ्यांची कर्जे वसूल करण्याच्या योजना आखून त्या प्रत्यक्षात आणून यशस्वी करण्याचा प्रयत्न केला.[१९४]

**यशवंतराव मोहिते यांचे मार्गदर्शनाने महाराष्ट्र कापूस निर्यात करू लागला :**

कापड व्यवसायाचे संदर्भांत त्यांनी हाँगकाँग, जपान, जर्मनी व मलेशिया या देशाचा दौरा केला तेथील कापूस, कापड, व्यवसायाचा अभ्यास केला परिणाम असा झाला की महाराष्ट्र 'स्टेपल कॉटन' निर्यातीत पुढाकार घेऊ लागला. या यशातील मोठा वाटा यशवंतराव मोहिते यांचा आहे.[१९५]

**४.४.७ ना.यशवंतराव मोहिते यांचे पन्हाळा शिबीर : दि.२०, २१ नोव्हेंबर १९७५ :**

यशवंतराव मोहिते इ.स.१९७५ मध्ये महाराष्ट्राचे अर्थमंत्री झाले. यावेळी यशवंतराव यांनी जवळजवळ ५०० अभ्यासू कार्यकर्त्यांचे अभ्यास शिबीर पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे घेतले. याची त्यांनी जाणीव करून दिली.[१९६] पन्हाळा शिबीर हे २०, २१ नोव्हेंबर १९७५ मध्ये संपन्न झाले. शिबीरासाठी ५०० हून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या जिल्हयातून आले होते. या शिबीरात ज्या विषयावर चर्चा झाली ते विषय. 'कार्यकर्त्याच्या राजकीय प्रशिक्षणाची आवश्यकता', 'सामाजिक एकीकरणाचा पाया', 'इस्लामने आणलेली क्रांती', 'ब्रिटीशांचे कायदयाचे राज्य', 'समाजवादी विचारांची पिछेहाट', 'महात्मा गांधीजींचे व्यक्तीमत्व', 'साम्राज्यशाहीची प्रेरक शक्ती, 'गांधीजींनी लावलेला सुरूंग', 'पोथीनिष्ठ समाजवादाचा मंडळींचे अपयश', 'समाजवादाचे उगमस्थान ', स्वातंत्र्यपूर्व काळातीा प्रयत्न', गांधी नेहरूंचा पक्ष', 'महाबळेश्वर शिबीर', 'कृषी औद्योगिक समाजरचना', 'अन्नधान्य एकाधिकार खरेदी ', 'कापूस एकाधिकार खरेदी', 'क्रांतीकारक मूल्य', 'मूलगामी राजकीय शिक्षणाची गरज', 'ज्ञानाचे स्वरूप', 'शास्त्रीय पध्दत'.[१९७] सन १९८५ मध्ये त्यांनी राजकारणातून पूर्णपणे निवृत्ती पत्करली व स्वत: चे रेठरे गावी आले. त्यांनी उभा केलेला कृष्णा सहकारी साखर कारखाना सुव्यस्थित चालवण्यासाठी मार्गदर्शन केले. कारखान्यातील भ्रष्टाचार निपटून काढला.[१९८]

**४.४.८ यशवंतराव मोहिते एक विचारवंत व कार्यकुशल नेता :**

सन १९५२ ते १९८० पर्यंत कराड दक्षिण मतदारसंघातून ६ वेळा आमदार म्हणून यशवंतराव निवडून

आले. त्याचप्रमाणे १९८० ते १९८५ अखेर लोकसभेचे खासदार होते. त्यांचे राजकीय व सहकार क्षेत्रातील काम फार मोठे आहे. यशवंतराव मोहिते यांचे जीवनकार्य निर्मल, पुरोगामी व लोककल्याणकारी होते. गौतमबुध्दांच्यावर त्यांची अपार श्रध्दा होती. ते वारंवार म्हणत, '' सर्वसामान्य जनतेच्या बोलीभाषेत जनतेशी संपर्क साधला पाहिजे. सामान्याच्या सुखदु:खांशी, आशाआकांक्षाशी एकरूप होण्याची संधी व समाजसेवा हे गौतमांच्या तत्वाचे सार आहे. याकरिता अशोक राजाचे शिलालेख पहा.''[१९९] समाजक्रांतीचा जनक म्हणून जोतीराव फुले हे त्यांचे श्रध्दास्थान होते. छत्रपती शाहूराजांना समाजक्रांतीचा राजा असे ते म्हणत असत. भाऊंनी दि. २५ डिसेंबर १९६६ रोजी सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड येथील स्नेहसंमेलनात आवर्जुन चार युगप्रवर्तकांचा उल्लेख केला. गौतम बुध्द, मार्क्स, महात्मा फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील हे चार युगप्रवर्तक आहेत.''[२००] संयुक्त महाराष्ट्र ही ऐतिहासिक गरज आहे. असे ते म्हणाले. त्यांच्या बोलण्यात वैचारिकता, विनम्रता, सखोलता, अभ्यासपूर्णता इ.गुण दिसून येतात. त्यांच्यावर फुले –शाहू – आंबेडकर यांच्या विचाराचा गहरा प्रभाव होता. कृष्णा सहकारी साखर कारखान्यावर त्यांचा जीव होता. कारखान्याचे व्यवस्थापन उत्तम चालावे म्हणून त्यांनी कमालीचा संघर्ष केला.[२०१]

### **४.४.९ शेतकऱ्यांच्या संदर्भात केलेली कामे** :

यशवंतराव मोहिते यांनी सन १९५४ साली कृष्णा सहकारी साखर कारखाना सुरू केला.[२०२] कारखाना परिसरात कुक्कुट पालन सहकारी संस्था, वराहपालन सहकारी संस्था, पशुखाद्य निर्मिती कारखाना, शिक्षण संस्था, कृष्णा सहकारी बँक इत्यादी संस्था यशवंतराव मोहिते यांच्या मार्गदर्शनाने, सहकार्याने निघाल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे या संस्थांचा विकास झाला. ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला सभासदत्व खुले ठेवले. कारखान्याचे वैशिष्टय म्हणजे साखरेचा चांगला उतारा, नाममात्र दरात शेतकरी सभासदांना साखर वितरण, ऊसाला योग्य दर, कारखान्याच्या माध्यमातून कंपोस्ट खते इत्यादी, कृष्णा काठावरील रेठरे येथील सहकारी साखर कारखाना यांना वेगळेच स्थान आहे.[२०३] ऊसाचे जास्त क्षेत्र व उत्कृष्ट रिकव्हरी करीता कृष्णा कारखाना प्रसिद्ध आहे. १ लाख पोत्याहून आज १२ लाख पोत्यावर विक्रमी उत्पन्न करणारा गाळप करणारा कारखाना म्हणून त्याची ख्याती आहे.[२०४]

फक्त ऊसमळे असतील तर कारखाना काढण्यास शासन परवानगी देते. अशा स्थितीत भाऊंनी हा संकल्प केला. गावोगावी वार्ता गेली. खानापूर तालुक्यातून तडसरचे रामचंद्रराव पवार, तांबव्याचे धोंडोजी काका, बहयाचे थोरात, रेठरे बु. येथील आबासाहेब मोहिते, कार्वे येथील संभाजीबाबा, तात्या मोहिते, माधवराव मोहिते, दादा कुलकर्णी, नरसिंगपूरचे नानासाहेब सावंत इ. मंडळीनी या योजनेचे स्वागत केले. चिपाडावर वीज निर्मिती प्रकल्प हाती घेतला. भाऊ कारखान्याचे आद्य प्रवर्तक आहेत.[२०५] १९६० ला महाबळेश्वरला कॉंग्रेस कार्यकर्त्यांचे शिबीर झाले कॉंग्रेसी तत्वज्ञानाचा प्रचार करण्याची जबाबदारी यशवंतराव मोहिते यांचेवर सोपविलेली होती. भाऊंनी अभ्यासपूर्ण भाषण करून श्रोत्यांची वाहवा मिळविली.[२०६]

**४.४.१० शेतकऱ्यांचे करीता विधानसभेतील केलेले काम:**

सन १९५२ मध्ये विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात पुणे येथे कोयना धरण निर्मितीबाबत ठराव मांडून मंजूर करून घेतला. शेती कसणाऱ्या शेती मजूराला शेतीची मालकी मिळते हे विधेयक शेतकऱ्याला त्याचा हक्क देणारे विधेयक आहे. म्हणून यशवंतराव मोहिते जरी विरोधी पक्षात होते तरी त्यांनी त्यास पाठिंबा दिला.[२०७] श्री.यशवंतराव मोहिते व सावंत यांनी पाणीपुरवठा करण्याचे संदर्भात नैसर्गिक प्रवाहांना कालवे काढण्याबाबत त्यांनी सूचना मांडली.[२०८]

यशवंतराव मोहिते यांनी अन्नधान्यांची एकाधिकार पद्धतीने खरेदी करण्याच्या संदर्भात विचार मांडला व तो कृतीमध्ये आणला. शेतकऱ्यांना सुधारित बियाणे, रासायनिक खते वापरण्यास प्रवृत्त केले. कोयना जलविद्यूत प्रकल्पाचा समावेश पहिल्या पंचवार्षिक योजनेत करून त्यानुसार १९५४ मध्ये कामाला प्रारंभ झाला.[२०९] शेती व्यवसायाला नवी दिशा देण्याकरीता Agriculture Direction Spread And Achievement शेती दिशा व्याप्ती आणि प्राप्ती हे पुस्तक यशवंतराव मोहिते यांनी लिहिले. यातून Area Development Plan चे मॉडेल तयार केले. सन १९७२-७३ ही रोजगार हमी योजना राज्यभर लागू झाली. १९७२-७३ व १९७३-७४ मध्ये दुष्काळ पडल्याने ही योजना चांगली चालली नाही. १९७४-७५ मध्ये पुन्हा या योजनेचा पाठपुरावा केला. २६ जाने १९७९ मध्ये महाराष्ट्रात रोजगार हमी कायदा लागू करण्यात आला. महाराष्ट्रीयन प्रौढ व्यक्तिला अकुशल शारीरिक काम मिळण्याची हमी देण्यात आली.[२१०]

**४.४.११ यशवंतराव मोहिते – कृषी औद्योगिक समाजरचना** :

महाबळेश्वर शिबीरात यशवंतराव मोहिते यांनी ॲग्रो इंडस्ट्रियल सोसायटी निर्माण करण्याबाबत विचार मांडले. साखर कारखाने, तेलबिया गिरण्या, सूतगिरण्या, भात गिरण्या, डाळी गिरण्या या उत्पादकांच्या मालकीच्या झाल्या पाहिजेत हा विचार यशवंतराव मोहिते यांनी मांडला. पुढे हा यशवंतराव मोहिते यांचा विचार भारताचे पंतप्रधान प. नेहरूंना पटला व हे धोरण प. नेहरूंनी व भारत सरकारने स्विकारले. देशातील शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी यांचे जाळे देशभर झाले याचे सर्व श्रेय यशवंतराव मोहिते यांच्याकडे जाते.[२११] शेतीतील कामाचे दाम शेतमालापासून येणारा पैसा थेट गरीब शेतकऱ्यापर्यंत पोहोचला पाहिजे. असे त्यांनी भाषणातून सांगितले.[२१२]

**कोयना योजनेचा पंचवार्षिक योजनेत समावेश** :

जुलै १९५२ मध्ये यशवंतराव मोहिते यांनी विधानसभेत कोयना धरणाचा ठराव मांडला. या योजनेचा समावेश पहिल्या पंचवार्षिक योजनेत व्हावा यासाठी आग्रह धरला. या योजनेपासून जलाशयसाठा, पाटबंधारे, जलसिंचन, वीजनिर्मिती हे सर्व साध्य होत आहे. असे त्यांनी आपल्या भाषणातून मांडले. बाळासाहेब देसाई बांधकाम मंत्री होते. यांच्या आग्रहाने हा प्रकल्प ठराव मंजूर करून १६ जाने १९५४ रोजी या कामास प्रारंभ झाला. शेती सुजलाम सुफलाम झाली. गरीब शेतकरी प्रगत झाला, अन्नधान्य वृद्धींगत झाले. महाराष्ट्राची कृषी व औद्योगिक प्रगती झाली.[२१३]

**उपसा जलसिंचन योजना :**

शेतीला पाणी कमी पडू लागले. यावेळी कृष्णा व इतर सर्व कारखान्याची हीच अवस्था होती. यातून सहकारी तत्वावर चालणाऱ्या उपसा योजना पुढे आल्या. कारखानदारी जशी वाढत गेली तसा पाण्याचा प्रश्न जटील झाला. चार शेतकरी एकत्र येऊन 'जलसिंचन' घडवू लागले. उपसा जलसिंचन योजनेने मोलाची कामगिरी बजावली.[२१४] यशवंतराव व जयवंतराव यांनी शेतकरी मंडळींना एकत्र करून सहकाराच्या माध्यमातून उपसा जलसिंचन योजना हाती घेतली.[२१५] येडेमच्छिंद्र नरसिंहपूर उपसा जलसिंचन योजना १९८१ कार्यक्षेत्र ३००० एकर, बिचुत भवानीनगर रेठरेहरणाक्ष उपसा जलसिंचन योजना १९८१ कार्यक्षेत्र ४००० एकर, काले, धोंडेवाडी पाचवड जखिणवाडी नांदलापूर उपसा जलसिंचन योजना १९८२ कार्यक्षेत्र १२००० एकर, चचेगाव उपसा जलसिंचन योजना १९८१ कार्यक्षेत्र २००० एकर, शेरे जलसिंचन योजना कार्यक्षेत्र ३ ते ४ हजार एकर.[२१६] अशा प्रकारे किरपे, येणके, पोतले, चरेगाव, येरवळे, विंग, घारेवाडी, कार्वे, धानाई, काले, नरसिंगपूर, बिचुत, भवानीनगर, रेठरे हरणाक्ष, टेंभू, कोरेगाव, रेठरे बुद्रुक, रेठरे खुर्द या गावातील शेतीजमीनीला कृष्णा नदीच्या जलसिंचनाचा लाभ झाला. थोडक्यात साधारणपणे १२ ते १४ कोटी रूपये खर्च करून ७०००० एकरांची धाडसी उपसा जलसिंचन योजना आणून क्रांती केली.[२१७] याशिवाय कारखान्याच्या माध्यमातून कामगारांनी कृष्णा नदीवर रेठरे बुद्रुक येथे लाकडी पूल बांधला.[२१८] नांदगाव येथील दक्षिण मांड नदीवर कारखान्याची धरणवजा पूल बांधला.

**४.४.१२ कोयनेच्या भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन :**

लोकनेते बाळासाहेब देसाई यशवंतराव मोहिते यांनी कोयना भूकंपग्रस्तांना विश्वास देऊन पुनर्वसनासाठी परिश्रम घेतले. जखमींना औषधोपचार, दवाखान्यात पाठविणे, ढिगारे उपसणे, त्यांना जेवण, अन्न, वस्त्र, निवारा देणे इ.मदत केली.[२१९]

**फिडमिल (पशुखाद्य) निर्मिती :**

सन १९६९ मध्ये शेतीपूरक व्यवसाय अंतर्गत पशुखाद्य बनविण्याचा व्यवसाय हाती घेतला. यशवंतराव मोहिते यांनी व जयवंतराव भोसले यांनी प्रसंगी तोटा सहन करून ना नफा ना तोटा या तत्वावर पशुखाद्य निर्मिती केली.[२२०]

**४.४.१३ ज्वारी एकाधिकार खरेदी योजना :**

पन्नास साठ वर्षापूर्वी महाराष्ट्रात ज्वारीचे भाव कोसळले. केवळ ३५ रू. क्विंटलने ज्वारी विकली जाऊ लागली. यावेळी ना.वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते त्यावेळी यशवंतराव मोहिते यांनी शेतकरी मंडळीची ज्वारी शासनाने ६५ रू.क्विंटलने खरेदी करावी असा प्रस्ताव मांडला व ही ज्वारी प्रती किलो ३५ पैसे दराने रेशनिंगवर गरीब जनतेला दयावी. हाच प्रस्ताव यशवंतराव मोहिते यांनी मंत्रीमंडळाच्या बैठकीत मांडला व विनम्रपणे तो मंजूर करण्याबाबत आग्रह धरला. वसंतराव नाईकांनी हा प्रस्ताव उचलून धरला व बघता बघता

ठराव मंजूर झाला.[२२१]

**४.४.१४ एकाधिकार कापूस खरेदी योजना :**

कापूस एकाधिकार खरेदी योजना देशातील एकमेव धाडसी योजना. या योजनेला प्रचंड विरोध झाला. २०० च्या वर जिनींग प्रोसिंग फॅक्टरी ताब्यात घेऊन ही योजना सुरू केली. सन १९७२ चा तो कालखंड होता. कापूस उत्पादक शेतकरी ४० ते ५० मैलावरून कापूस बैलगाडीत भरून बाजारपेठेत घेऊन यायचा. मार्केटमधील कापड सुतगिरण्याचे एजंट, दलाल, आडते शेतकऱ्याचा विचार न घेता त्याच्या मालाची ते किंमत ठरवायचे. अक्षरश: ते शेतकऱ्याचा माल कवडीमोलाने घ्यायचे. शेतकरी योग्य दरापासून वंचित राहायचा. उत्पादक शेतकरी लाभापासून अलग राहायचा. यशवंतराव मोहितेंनी ही व्यापारी एजंटाची साखळी बंद करून शेतकरी मंडळीची यंत्रणा व साखळी पध्दत उभी केली. हा विचार शासनात मांडून त्या योजनेस कायदेशीर रूप दिले.

**४.४.१५ शेती जोडधंदा : दुग्धव्यवसाय :**

शेती व दुग्धव्यवसाय परस्परावर अवलंबून असणाऱ्या बाबी आहेत. शेती म्हटले की खते आली. शेती म्हटले की चारा आला.म्हणून शेती करणारे किंवा शेतमजूर मंडळींना उत्तम पध्दतीने करता येणारा दुग्ध व्यवसाय आहे. यशवंतराव मोहिते यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला.शेतकरी मंडळींची आर्थिक उन्नती करण्याकरिता दुग्ध व्यवसाय एक चांगला पर्याय आहे. या बाबीवर त्यांनी चिंतन केले व प्रत्येक गावात सहकारी तत्वावर दुध डेअरी निर्माण करण्याचे प्रयत्न केले.[२२२]

**सहकारी मयूर कुक्कुट पालन सोसायती लि. रेठरे बुद्रुक :**

१९६४ मध्ये यशवंतराव मोहिते यांच्या मार्गदर्शनातून ही मयूर सहकारी कुक्कुटपालन सोसायटी स्थापन झाली. कुक्कुटपालनासाठी शेतकऱ्यांना तांत्रिक ज्ञान, आर्थिक सहाय्य , कच्च्या मालाचा पुरवठा तांत्रिक प्रशिक्षण, वैद्यकीय सहाय्य व मालाचे वितरण करण्यात आले. आशिया खंडातील सर्वात मोठी सहकार क्षेत्रातील संस्था असा नावलैकिक मिळविला. यशवंतराव मोहिते व त्यांचे बंधू जयवंतराव भोसले आप्पा यांनी केवळ सामाजिक बांधीलकीतून हा प्रकल्प उभा केला.[२२३]

**४.४.१६ यशवंतराव मोहिते : शैक्षणिक कार्य :**

**शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ :**

सन १९६२-६३ मध्ये शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. यशवंतराव मोहिते, जयवंतराव भोसले यांच्या कार्याने कारखानास्थळावर रेठरे गावी शिक्षणाची विद्यार्थ्यांच्या निवासाची व भोजनाची सोय करण्यात आली. प्रथम संभाजी विद्यालय व प्राथमिक विभाग सुरू केला. १९७८ मध्ये सौ.ताराबाई माधवराव मोहिते, जयमाला जयवंतराव भोसले इंग्लिश स्कूल व मराठी माध्यमाची शिशु मंदीरे उभारली. सन १९७८ मध्ये कृष्णा महाविद्यालयाची स्थापना केली.[२२४] ग्रामीण लोकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी म्हणून कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट स्थापन करण्यात आला व इ.स.१९८४ मध्ये या ट्रस्टच्या माध्यमातून अत्याधुनिक वैद्यकीय

महाविद्यालय सुरू केले. कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून विविध शाखांचे अभ्यासक्रम सुरू आहेत. शेतकरी शिक्षण प्रसारक व कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थी विद्याभ्यास शिकून प्रगती करेल.ट्रस्टच्या माध्यमातून इंग्रजी माध्यमाची शाळा स्थापन केली. अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली. कृष्णा हॉस्पिटलचे औपचारिक उद्घाटन दि.२५.०८.१९८३ रोजी यशवंतराव चव्हाण यांचे शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी मुख्यमंत्री वसंतदादा उपस्थित होते.[२२५] कृष्णा कारखान्याच्या माध्यमातून यशवंतरावांच्या सहकार्याने इ.स. १९८० मध्ये जयवंतराव भोसले यांनी कृष्णा चॅरिटेबलची स्थापना केली. पुढे ट्रस्टच्या माध्यमातून प्रथम १९८२ मध्ये हॉस्पिटलची स्थापना केली. १९८४ मध्ये कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस हे मेडिकल कॉलेज काढले. १९८३ मध्ये नर्सिंग कॉलेज काढले व नंतर अभिमत विद्यापीठ निर्माण केले.[२२६] हॉस्पिटल सुरु झाल्यापासून १९९२ अखेर ५४५३०६ बाहयरूग्णांची तपासणी तर ७०१४० रूग्णांवर उपचार करण्यात आले.[२२७]

**यशवंतराव मोहिते : भारती विद्यापीठाचे अध्यक्ष :**

यशवंतराव मोहिते यांची भारती विद्यापीठाच्या अध्यक्षपदी निवड झाली तेव्हा भाऊ कृषीखात्याचे उपमंत्री होते. डॉ.पतंगराव कदम यांनी १९७९ मध्ये यशवंतराव मोहिते कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय पुणे येथे स्थापन केले व १९९४ मध्ये यशवंतराव मोहिते यांच्या जन्मभूमीत कराड मलकापूर येथे यशवंतराव मोहिते इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, कराड मलकापूर असे नाव दिले. सामाजिक बांधिलकी या भूमिकेतून मोहिते यांच्या विचाराचे आठवणीकरिता 'यशवंतराव मोहिते चॅरिटेबल फौंडैशन' संस्था स्थापन केली. याव्दारे शैक्षणिक कार्याला मदत केली जाते.[२२८]

**यशवंतराव मोहिते यांचे शैक्षणिक विचार :**

उद्दिष्टानुसार शिक्षण देणाऱ्या संस्था हव्यात असे म्हणतात.[२२९] जातीयवादीना हाकलून देऊन त्याऐवजी समाजवादी धोरणाचा पुरस्कार ते नमुद करताना दिसतात. नागरिकांच्या प्राथमिक शिक्षणाबददल ते आग्रही आहेत. कुंभाराकडे जर तुम्ही गेला जे मडके घडवून, मडवून, भाजून भट्टीतून आलेले दिले व तुम्ही त्याला पुन्हा आकार बदलायला सांगितला तर तो आकार मुळीच बदलणार नाही.[२३०] यशवंतराव मोहिते यांच्यावर माओच्या शिक्षणविषयक धोरणाचा प्रभाव दिसून येतो. परंतु ते माओच्या विचाराचे अनुयायी नव्हते. शिक्षणातील उच्चभ्रू व शहरवासियांचे वर्चस्व कमी केले पाहिजे.'' देशातील लोकांच्यात क्रांती घडवायची असल्यास शैक्षणिक संस्थावर वर्चस्व हवे. श्रमजीवी संस्कृती असली पाहिजे. ज्यांच्याकडे श्रमजीवी संस्कृती नाही त्यांनी श्रमजीवी लोकांच्याकडून प्रशिक्षण घ्यावे.[२३१]

**सारांश :**

यशवंतराव मोहिते स्वतंत्र प्रज्ञेचे विचारवंत आहेत. ''आधि केले, मग बोलले असे कोण जाहले'' महात्माकी हो फुले'' तसे यशवंतराव मोहिते फुल्यांचे शिष्य होते. कृतिशील तत्ववेत्ते होते. पुरोगामी म्हणून सर्वांना परिचीत आहेत. बालवर्गापासून शिक्षण घेताना राजकीय व सामाजिक चळवळींचा अभ्यास केला.

त्यांचे रचनात्मक काम कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेत व वाटचालीत दिसते. शेतकरी कामगार पक्षाचे धडाडीचे कार्यकर्ते. याच शेकापमधून त्यांनी कराड दक्षिण मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढविली व जिंकलीसुध्दा. सन १९६० पासून ते कॉंग्रेस पक्षाचे पुढारी म्हणून नावारूपाला आले. गृहउपमंत्री व कृषीउपमंत्री म्हणून काम केल्यावर इ.स. १९६७ पासून ते कॅबिनेट मंत्री म्हणून गृहनिर्माण, राज्य मार्ग परिवहन, अन्न व नागरी पुरवठा आणि सहकार मंत्री म्हणून एक कुशल व समाजाभिमुख नेता म्हणून सर्वांना परिचित झाले. ही सर्व खाती त्यांनी चांगल्या पध्दतीने सांभाळली. अर्थखात्याची धूरा त्यांनी चांगलीच हाताळली.

सन १९६२ च्या भारत–चीनी युध्दाच्या प्रसंगी लष्करी भरतीसाठी महाराष्ट्र दौरे काढले. ७० हजार होमगार्डना प्रशिक्षण देऊन तयार केले. कॉंग्रेसने केलेली महत्वाची कामे यावर त्यांनी पंधरावीस पुस्तके ल्हिली. शेतीखात्याला नवी दिशा देण्यासाठी विविध चळवळी केल्या ‘शेती दिशा व्याप्ती आणि प्राप्ती या पुस्तकाचे लेखन केले. यशवंतराव मोहिते यांनी सुदान व इजिप्तचा दौरा करून कापूस शेती, कापूस मार्केटिंगचा अभ्यास केला. महाराष्ट्रातील कापूस खरेदी एकाधिकार योजनेला गती दिली. त्यांच्या कापूस योजनेचे फलित महाराष्ट्र कापूस निर्यातीत पुढाकार घेऊ लागला. ‘ज्वारी खरेदी योजना’ एक अभिनव उपक्रम महामंत्री शास्त्रींना त्यांनी कथन केला. शेती व शेतकरी याबददल ते तहहयात राबले. शेती व जोडधंदे याबाबत त्यानी नवीन उपक्रम केले. शेतीला पाणी देण्यावर ते आग्रही राहिले. पाणी जलसिंचनाचे त्यांनी जाळे उभारले. पाझर तलाव विविध योजना उभारल्या. घरदुरूस्ती व पुनर्बांधणी मंडळ स्थापन केले. झोपडपट्टी सुधारणा मंडळ स्थापन केले. कराड येथे हौसिंग कॉलनी निर्माण केली. ‘गाव तेथे रस्ता व रस्ता तेथे एस.टी योजना ‘यशस्वी केली. यंत्रमाग, हातमाग महामंडळाची स्थापना केली. महाराष्ट्रभर नागरी सहकारी बँकेचे जाळे निर्माण केले.

**निष्कर्ष** :

शेतकऱ्याप्रमाणे शेतमजूर व कामगारांना कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे यासाठी यशवंतराव आग्रही होते. कोयना धरण प्रकल्प निर्मिती हा त्यांच्या विचारवेधाचे फलित आहे. जमीन कुळ कायदा, गृहनिर्माण आदी कायदे पास करून घेतले. अगदी संयुक्त महाराष्ट्र चळवळीकरिता ते अग्रेसर राहिले. थोरल्या यशवंतरावंनी त्यांना कॉंग्रेसमध्ये सन्मानपूर्वक घेतले ही त्यांच्या कामाची पावती होती. भाऊचे मोठेपण त्यानी उभारलेल्या विविध संस्थेमधून मिळते. सहकारी क्षेत्रात तर त्यांनी अतुलनीय क्रांती केली. त्यांची श्वेतपत्रिका सर्वश्रृत आहे. महाराष्ट्रातील ऊस उद्योग पन्हाळा शिबीरातील त्यांचा भाषणसंग्रह महाबळेश्वर शिबीरातील त्यांचे विचार विधानसभेतील त्यांनी व्यक्त केलेले विचार दि.५.१२.१९९१ मधील संगमनेर येथील त्यांचे ‘शिक्षण व समाजपरिवर्तन’ विषयावरील अभिभाषण त्यांच्या कार्याची, विचाराची साक्ष देतात. अशा नेत्याची आजसुध्दा देशाला गरज आहे. त्यांचे काम आजसुध्दा समाजाला दिशादर्शक आहे. त्यांचे प्रकल्प, त्यांच्या योजना, त्यांनी केलेल्या विविध राजकीय, सामाजिक चळवळी राष्ट्राला, समाजाला पिढयानपिढया मार्गदर्शक

राहतील.

### ४.५ सामाजिक नेतृत्व : कर्मवीर भाऊराव पाटील

**प्रस्तावना :**

रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील अनेक शिक्षणसंस्थेपैकी एक शिक्षणसंस्था असून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामध्ये, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीमध्ये तिला वेगळे स्थान आहे. बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्याचे क्रांतिकारक काम कर्मवीर भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेने केले. ''गोरगरिबांची मुले दूरवरच्या शाळेत येऊ शकत नसतील तर माझी शाळाच या मुलांच्या दाराशी जाईल.'' असा निर्धार कर्मवीर भाऊराव पाटील यांनी करून शाळांचे जाळे विणले.[२३२]

#### ४.५.१ जन्म, बालपण व शिक्षण :

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म त्यांच्या आजोळी कोल्हापूर संस्थानातील कुंभोज येथे २२ सप्टेंबर १९८७ रोजी झाला. भाऊराव पाटील यांची राहणी अत्यंत साधी होती. नेहरू शर्ट व खादी धोतर. सुरवातीच्या काळात ते खांदयावर घोंगडी घेत असत. काही काळानंतर त्यांनी घोंगडी खांदयावर घेण्याचे बंद केले. ताक कण्या व झुणका भाकर हे त्यांचे नेहमीचे जेवण.[२३३]

**कोल्हापूर डांबर प्रकरण :**

सन १९१४ कोल्हापूर येथे डांबर प्रकरणात श्री लट्ठे यांच्याविरोधी खोटी साक्ष दयायचे  कर्मवीर भाऊराव यांनी नाकारल्याने त्यांना तुरूंगात टाकले. यातून पुढे भाऊराव निर्दोष सुटले.[२३४]

#### ४.५.२ महात्मा फुले भाऊरावांचा आदर्श :

११ जानेवारी १९५९ रोजी कर्मवीर अण्णा आजारातून थोडेफार सावरले होते. तेव्हा त्यांनी पुणे येथील दै.तरूण भारत ला मुलाखत दिली. त्यावेळी अण्णांनी कार्याची प्रेरणा कोणापासून घेतली. या प्रश्नाचे उत्तर देताना भाऊराव पाटील त्यांनी आदरपूर्वक व कृतज्ञपणे कोल्हापूरच्या छ.शाहू महाराजांचा उल्लेख केला. ते म्हणाले, '' महाराजांच्या वाडयातील वास्तव्यात प्रत्यक्ष राजर्षी शाहू महाराजांची बहुजनांच्या उन्नतीसाठी चाललेली धडपड पाहिली.[२३५] त्यांचा चांगलाच प्रभाव त्यांचे मनावर पडला. जातिव्यवस्था प्रबळ असताना शाहू महाराजांनी महाराला जवळ जेवायला घेणे, महार नोकर वाडयात कामाला ठेवणे, कोल्हापूरात महार व्यक्तीला हॉटेल काढण्यास मदत करणे इ.गोष्टी केल्या. सन १९०८ मध्ये 'महार वतन नष्ट करण्यासाठी त्यांनी प्रभावी पाऊल उचलले.[२३६] कर्मवीरांच्या विचारावर महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी यांचा फार मोठा प्रभाव होता. शाहू महाराजांच्या केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे, त्यांनी काढलेल्या वसतिगृहामुळे गोरगरीबांची मुले शिकू लागली. विचाराचे बीजारोपण भाऊरावांच्या मनात घट्टपणे रूजले. वेगवेगळया जातीची, गोरगरीबांची, मुले एकत्र शिकली पाहिजेत. जातीभेद नष्ट झाला पाहिजे. असा विचार त्यांच्या मनात बळावला.[२३७]

### ४.५.३ कर्मवीर भाऊराव पाटील आणि अस्पृश्यता निवारण :

सर्वसामान्यांचा उध्दार करणे हे कर्मवीरांनी जीवनकार्य मानले याकरिता त्यांनी शिक्षणप्रसार हे माध्यम वापरले. जातीभेद दूर करून समतेचे मूल्य रूजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या कार्यापाठीमागे म.फुले यांच्या सत्यशोधकी विचाराची पार्श्वभूमी होती. जातीभेदामुळे माणसामाणसातील विषमता व दुफळी यांचा अनुभव कर्मवीर भाऊरावांना आला. ''या देशातील जातीभेद नष्ट झाला पाहिजे'' असे त्यांचे ठाम मत होते. जातीभेद दूर सारून समतेचे युग आले पाहिजे असे त्यांना वाटे. यासाठी सर्वांनी मनापासून कामाला लागले तर महाराष्ट्राला चांगले दिवस येतील अशी कर्मवीरअण्णांची धारणा होती.[२३८]

### ४.५.४ रयत शिक्षण संस्था स्थापना :

शिक्षणाचे महत्व ओळखून सातारा जिल्हयातील काले ता.कराड या गावी भरलेल्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेत कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'रयत शिक्षण संस्था' स्थापना करण्याची घोषणा केली व ४ आक्टोंबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.[२३९] संस्थेने येथे वसतिगृह सुरू केले. या बोर्डिंगचा अहवाल प्रकाशक रा.रा. मारूती ज्ञानू पाटील व रा.रा.बंडो बाबाजी शेटे ऑनररी सेक्रेटरी यांनी अहवाल प्रकाशित केला. यामध्ये संस्थेचे उद्देश, कार्यकारी मंडळ, आजारी मुलांची व्यवस्था, जमाखर्चाचा तक्ता, विद्यार्थ्यांचा अहवाल, लायब्ररी व खेळ, विद्यार्थी दिनचर्या या बोर्डिंग करता मान्यवरांनी दिलेली धान्य व रोख रकमेच्या स्वरूपातील मदत इ. नोंदी आहेत.[२४०] इ.स.१९१९ मधील काले येथील वसतिगृहानंतर इ.स. १९२१ मध्ये नेर्ले जि.सांगली येथे वसतिगृह सुरू केले. या संस्थेच्या स्थापनेपूर्वी अण्णांचे शैक्षणिक प्रयोग सुरू होते. त्याचाच एक भाग स्थापनेपूर्वी साधारणपणे दहा वर्ष अगोदर दुधगाव, जि.सांगली येथे एक वसतिगृह चालविले होते.[२४१]

### ४.५.५ वसतिगृहयुक्त शिक्षण :

रयत शिक्षण संस्थेने शैक्षणिक कार्याबरोबर जात, पात, पंथ, भेद मोडून एक नवा समाज निर्माण करण्याची उर्मी समाजामध्ये निर्माण केली. वसतिगृहयुक्त शिक्षणाचे संस्कार परिवर्तनाच्या क्षेत्रात मोलाचे आहेत. तो काळच असा होता की ही वसतिगृह स्थापन झाली नसती तर गोरगरीब वंचित मुलांचे शिक्षणच झाले नसते.[२४२] इ.स.१९२४ मध्ये सातारा येथे वसतिगृहाची स्थापना केली. पुढे इ.स. १९२७ मध्ये महात्मा गांधीजींच्या शुभहस्ते त्याचे 'श्री छत्रपती शाहू बोर्डिंग' असे नामकरण झाले. सन १९३२ मध्ये गांधी आंबेडकर 'पुणे करार' स्मृतिदाखल पुणे येथे 'युनियन बोर्डिंग हाऊस' ची स्थापना केली.

### ४.५.६ शिक्षकांचे प्रशिक्षण :

सन १९२१ मध्ये अंगापूर जि.सातारा प्राथमिक शिक्षक संघाचे संमेलन कर्मवीर अण्णांचे हस्ते झाले. या प्रसंगी कर्मवीर भाऊराव पाटील उदगारले, '' देशात प्राथमिक शिक्षणाचा चांगला प्रसार व्हायचा असेल तर सर्व प्राथमिक शिक्षक ट्रेंड झाले पाहिजेत त्यासाठी मी लवकरच एक ट्रेनिंग कॉलेज काढणार आहे.'' त्यानुसार त्यांनी १९३५ मध्ये पंचम जॉर्ज बादशहांचे सिल्व्हर ज्युबिली कार्यक्रमाची सांगता करताना पहिले

खाजगी ट्रेनिंग कॉलेज संस्थेतर्फे सुरू करण्यात आले.[२४३] शाळेविना खेडे असू नये व प्रशिक्षित शिक्षकाविना शाळा असू नये अशी आण्णांची धारणा होती. सध्या संस्थेत एकूण ८ अध्यापक विद्यालये चालविली जातात. पूर्व माध्यमिक शाळातील शिक्षकांचेसाठी १९४८ मध्ये टी.डी.चा वर्ग सुरू केला. काही काळ संस्थेने 'हिंदी शिक्षक सनद'चे वर्ग चालविले. सातारा येथे १९५५ मध्ये पदवीधर माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी अध्यापक महाविद्यालयाची स्थापना केली. सन १९७० मध्ये श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथे अध्यापक महाविद्यालय स्थापन केले. सध्या या महाविद्यालयातून पदव्यूत्तर शिक्षण दिले जाते.[२४४]

**४.५.७ प्राथमिक शिक्षण :**

सन १९१९ मध्ये धोंडेवाडी, ता.कराड येथे एक प्राथमिक शाळा चालविली होती. इ.स.१९३६ मध्ये कै.रावबहाद्दूर रावजी रामचंद्र काळे यांचे स्मरणार्थ संस्थेने सातारा येथे एक व अन्यत्र दोन अशा तीन प्राथमिक शाळा स्थापन केल्या.[२४५] सन १९३८ पासून व्हॉलंटरी शाळा उघडण्यास सुरूवात केली. प्रामुख्याने दुष्काळी अन डोंगराळ भागात शाळा सुरू केल्या. शिक्षणप्रेमी ग्रामस्थांच्या सहकार्याने व कामसू , ध्येयवादी, निष्ठावंत त्यागी शिक्षकांच्या मदतीने कर्मवीरांनी या शाळा उत्तमरित्या चालविल्या. अशा सर्व शाळांची संख्या ५७८ होती.[२४६]

**संस्थेच्या आश्रमशाळा :**

कर्मवीरांचे ध्येयधोरणानुसार गरजू व गरीब आदिवासी यांना शिक्षण मिळाले पाहिजे. म्हणून सन १९९१-९२ पासून संस्थेने आश्रमशाळा चालविण्यास प्रारंभ केला. सध्या संस्थेत ८ आश्रमशाळा आहेत.[२४७]

**४.५.८ माध्यमिक शिक्षण :**

सन १९४० साली संस्थेने महाराज सयाजीराव विद्यालय या मोफत व निवासी माध्यमिक शाळेची स्थापना केली. या विद्यालयातील सर्वांना वसतिगृहात रहावे लागत असे. सर्वांना शारीरिक श्रमाची कामे करावी लागत. परंतु सर्व विद्यार्थ्यांना बदलत्या परिस्थीतीत सातारला येणे अशक्य झाल्याने कर्मवीर अण्णांनी विद्यार्थ्यांच्या गावीच माध्यमिक शाळा उघडण्याची मोहिम सुरू केली. कर्मवीर भाऊराव म.गांधींचे पूजक होते. सन १९४८ मध्ये म.गांधीजींच्या स्मरणार्थ १०१ माध्यमिक विद्यालये काढण्याची घोषणा केली. कर्नाटक व महाराष्ट्र दोन राज्यातील पंधरा जिल्हयात सध्या ४३२ माध्यमिक शाळा आहेत.[२४८]

**उच्च शिक्षण :**

सन १९४७ मध्ये सातारा येथे 'श्री छत्रपती शिवाजी कॉलेज' या उच्च महाविद्यालयाची स्थापना केली. सर्व विद्यार्थ्यांना वसतिगृहात रहावे लागत असे. शारीरिक श्रमाची कामे करावी लागत. आजही छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये 'कमवा आणि शिका' ही योजना सुरू आहे. सध्या संस्थेतर्फे ४० महाविद्यालये चालविली जातात. १९ महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे.

**तांत्रिक शिक्षण :**

रयत शिक्षण संस्थेने माध्यमिक विद्यालयातून तांत्रिक शिक्षणाचे विभाग सुरू केले आहेत. आज

संस्थेच्या २१ माध्यमिक विद्यालयात वर्कशॉपसह परिपूर्ण तांत्रिक विभाग आहेत. १९८३ पासून कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन सुरू केले.[२४९] सध्या सहा ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविल्या जातात.

**४.५.९ स्त्री शिक्षण** :

स्त्री शिक्षिका तयार करण्यासाठी संस्थेने १९४२ ला जिजामाता अध्यापिका विद्यालयाची स्थापना केली. त्याचवर्षी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या स्मरणार्थ सातारा येथे वसतिगृहाची सोय केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री सौ.भिमाबाई आंबेडकर यांच्या स्मरणार्थ १९६० साली मुलींसाठी एक माध्यमिक विद्यालय काढले. मुलींसाठी १२ वसतिगृहे, १ अध्यापक विद्यालय, २८ माध्यमिक शाळा व ४ महिला महाविद्यालये चालविली जातात.[२५०]

**पूर्वप्राथमिक** :

सातारा येथे संस्थेने १९५३ पासून एक बालवाडी व एक बाल वसतिगृह चालविले होते. सध्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या मिळून संस्थेमार्फत ४० बालवाडया चालविल्या जातात.

**प्रौढशिक्षण** :

सुरूवातीपासून संस्थेकडून स्त्री पुरूषांचेसाठी साक्षरतेचे व सामाजिक शिक्षणाचे वर्ग चालविले जातात.

**रयत शिक्षण संस्थेकडून प्रकाशित होणारी नियतकालिके** : रयत शिक्षण पत्रिका

**रयत सेवक** :

सन १९५० पासून रयत सेवक नावाचे षण्मासिक निघत होते. ते आता वार्षिक स्वरूपात निघू लागले. यात शाखांमधील घडामोडी, तसेच विद्यार्थी, सेवक, हितचिंतक यांचे विशेषत: सामाजिक व शैक्षणिक कार्यावरील लेख प्रसिध्द केले जातात.[२५१]

**कर्मवीर विद्याप्रबोधिनी** :

रयतचा विद्यार्थी जीवनाच्या विविध क्षेत्रात अग्रेसर रहावा. म्हणून १९७४–७५ मध्ये विद्याप्रबोधिनीव्दारा सामान्यज्ञान, गणित व इंग्रजी या विषयाचा १२ परीक्षा घेतल्या जातात. तसेच निबंध, पाठांतर, हस्तलिखीत, चित्रकला, राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा इत्यादी स्पर्धा घेतल्या जातात. संशोधन पत्रिका वर्षातून दोनवेळा प्रसिध्द केली जाते.[२५२]

**बडोदयाचे महाराज सयाजीराव गायकवाड** :

सयाजीराव गायकवाड यांनी इंग्लडहून परत येताना भाऊरावांना तार केली[२५३] त्यांना मुंबईस भेटावयास बोलविले. भाऊराव पाटील यांनी त्यांना सांगितले सातारा जिल्हयात १३०० खेडी आहेत. बहुसंख्य शेतकरी आहेत. हा समाज मुंबईला कष्ट करतो. जर त्यांना इंग्रजी शिक्षण मिळाले तर तो डोके व हाताचा वापर करून पैसे मिळवील समाजाची उन्नती होईल. बहुजन समाजाला हे महागडे शिक्षण मोफत दिले पाहिजे. महाराजांना ही भाऊराव पाटलांची स्वावलंबन योजना पसंत पडली. त्यांना कर्मवीर भाऊरावांना

४००० चा चेक दिला.[२५४]

**शाहू बोर्डींग उत्सव – विठ्ठल रामजी शिंदे यांचे हस्ते** :

शाहू बोर्डिंगचा वार्षिक उत्सव (व्दादश) सुप्रसिध्द समाजसेवक दलितउध्दारक विठ्ठल रामजी शिंदे यांचे हस्ते सन १९३७ मध्ये झाला. शाहू बोर्डींगमधून शिकून पदवीधर झालेल्यांची रयत शिक्षण संस्थेसाठी आजन्म वाहून घेण्याच्या शपथविधीचा कार्यक्रम वि.रा.शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या सोहळयात सर्व जातीधर्माचे पदवीधर होते. हे तरूण पाहून वि.रा.शिंदे भावूक झाले. ते म्हणाले, ''भाऊरावांची सेवा आक्रोडाच्या झाडासारखी आहे. तुम्ही लावलेल्या झाडाला बारा वर्षातच फळ आले. यावरून तुमच्या कार्याची थोरवी लक्षात येते.[२५५] कर्मवीरांनी शिक्षणाने बहुजन समाजाचा उध्दार केला. सन १९३८ मध्ये यवतेश्वराचे डोंगरावर शाळा काढली. या शाळा काढण्याची त्यांची गती अतीजलद होती. पाच वर्षात त्यांनी शेकडो शाळा काढल्या. सन १९५० मध्येही प्राथमिक शाळेची संख्या ५७८ झाली. कराडनजिकच्या काले गावात संस्थेची दि.४.१०.१९१९ रोजी स्थापना केली. संस्थेतर्फे एक वसतिगृह, एक प्राथमिक शाळा व एक रात्रशाळा सुरू केली. पुढे १९२४ मध्ये काले येथील रयत शिक्षण संस्थेचे जिल्हयाच्या ठिकाणी स्थलांतर केले व सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्याकरिता एक मिश्र वसतिगृह धनिणीच्या बागेत सुरू केले. म.गांधीजींच्या हस्ते १९२७ मध्ये त्याचे 'श्री.छ.शाहू बोर्डींग हाऊस' असे नामकरण झाले. सर्व जातीधर्माची भावंडाप्रमाणे राहणारी मुले पाहून म.गांधी आनंदी झाले. 'साबरमती आश्रमात जे मला जमले नाही ते तुम्ही येथे यशस्वी करून दाखविले' तुमच्या कार्याला माझे आशिर्वाद आहेत असे ते म्हणाले. गांधीजीप्रणित हरिजन सेवक संघाकडून या वसतीगृहाला सन १९३३ पासून ५०० रू.मिळू लागले.[२५६] सन १९८२ साली हंटर कमिशनपुढे म.फुलेंनी या देशातील प्राथमिक शिक्षणाला वंचित असलेल्या करोडो लोकांची कैफियत मांडली. या संदर्भांत आपल्या मुलाखतीत प्रा.डॉ.एन.डी.पाटील म्हणतात, ''इ.स. १८८५ सालात पुण्यात फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली. स्थापनेनंतर दोन वर्षानंतर म्हणजे १९८७ सप्टेंबर २२ ला कर्मवीरांचा जन्म झाला. आण्णा साधारणपणे वीस एक वर्षानंतर या शैक्षणिक क्षेत्रात आले. त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्याची सुरूवात सातारा सारख्या ठिकाणी महाविद्यालय काढून केली नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांनी अठरापगड जातीच्या सर्व मुलांसाठी एकच वसतिगृह व खेडयापाडयातल्या गोरगरीब मुलांच्याकरिता एक प्राथमिक शाळा काढली. यावरून कर्मवीर अण्णांच्या कार्याचे नेमके फलित लक्षात येईल.[२५७] कर्मवीर अण्णांच्यासमोर समाजातल्या कोणत्या वर्गाचे शिक्षण करायचे आहे हे त्यांना माहीत होते.''

कर्मवीरांनी व्हॉलंटरी शाळा उघडल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्या जिल्हा लोकल बोर्डाकडे वर्ग झाल्या. सन १९४० मध्ये सातारा येथे मोफत महाराज सयाजीराव विद्यालय व सर्व सोयींनीयुक्त वसतिगृह होते. स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा ही विद्यार्थ्यांच्या अंगी बालपणापासून येईल. अण्णांचेसमोर आर्थिक समस्या असूनसुध्दा मोफत विद्यालय सुरू केले कारण त्यांचेसमोर गोरगरीब खेडयापाडयातला शेतकरी मजूरवर्ग होता. यानंतर सातारा शहराबाहेर ठिकठिकाणी हायस्कूल सुरू केली. आपल्या हयातीत त्यांनी १०१ हायस्कूल

काढण्याचे नियोजन केले. माध्यमिक शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या दारात नेले.[२५८] सन १९४७ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'श्री छत्रपती शिवाजी कॉलेज' उघडले. हेसुध्दा मोफत व निवासी होते. या ठिकाणी 'कमवा व शिका' हा स्वावलंबी कृतीयुक्त मंत्र दिला. १९५४ ला कराडला सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज सुरू करून उच्च शिक्षणसुध्दा ग्रामीण परिसरात नेले. आज एकविसाव्या शतकाला सामोरी जाताना भारत सरकार ज्या शैक्षणिक बाबींचा तत्वांचा विचार करते ती तत्वे कर्मवीरांनी साठ सत्तर वर्षापूर्वी प्रत्यक्ष कार्यवाहीत आणली होती यातून त्यांचे द्रष्टेपण दिसून येते.[२५९]

**४.५.१० रयत शिक्षण संस्थेची ग्रँट बंद झाली :**

सन १९४८ मध्ये गांधीहत्या झाली. राज्य शासनाचा गैरसमज झाला किंवा करून दिला. परंतु शासनाने 'रयत शिक्षण संस्थेचे' अनुदान बंद केले. ग्रॅट पुन्हा सुरू करावी अशी मागणी झाली. अखेर लोकमतांच्या दडपणामुळे पुन्हा ग्रॅट सुरू झाली. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रातील जनतेने नैतिक पाठिंबा दिला. सढळ हाताने आर्थिक मदत दिली.[२६०] सातारा जिल्हा विद्यार्थी कॉग्रेसने २७.११.१९४८ रोजी एक लाख रूपयांची थैली बहाल करून त्यांचा सत्कार केला. हे सर्व ग्रँट बंदच्या काळात घडले. पुढे पुढे कर्मवीरआण्णांना बऱ्याच थैल्या मिळाल्या. अनेक मान सन्मान झाले. सन १९५९ मध्ये राष्ट्रपतींच्याकडून 'पदमभूषण' हा किताब प्राप्त झाला. पुणे विद्यापीठाने डी.लिट. ही सन्माननीय पदवी देऊन त्यांचा गौरव केला. यापूर्वी जनतेने त्यांना 'कर्मवीर' ही उपाधी दिलेली होती.[२६१]

**महात्मा गांधीजी कर्मवीरांचे दैवत :**

कर्मवीर भाऊरावांनी शैक्षणिक चळवळीकरिता भ्रमंती केली. अण्णा १९२१ साली जेव्हा 'प्रिन्स ऑफ वेल्स' यांचे आगमन मुंबईला झाले. त्यावेळी महात्मा गांधीजीसुध्दा मुंबईला होते. म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील गांधीजींना पाहण्यासाठी म्हणून मुंबईला गेले. जेव्हा त्यांनी गांधीजींना पाहिले व गांधीजींचे शब्द ऐकले तेव्हा ते मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या अंगात नवचैतन्य निर्माण झाले. त्यांनी स्वतः चे पोशाखाकडे पाहिले. शेमलेदार फेटा, ती शेरवाणी, तो रूबाबदार पोशाख त्यांना निरर्थक वाटला. गांधीजींच्या त्या भेटीने त्यांच्यावर 'गहरा असर' झाला. समोरच धगधगणारी परदेशी कपडयांची होळी होती. त्या होळीत त्यांचे ऐटदार कपडे अर्पण केले अन खादी वापरण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली. एवढेच नव्हे तर गांधीजींच्या साध्या व सात्विकतेचा त्यांच्यावर प्रभाव पडला आणि त्या दिवसापासून कर्मवीर अण्णांनी संत वृत्ती धारण केली. अन प्रतिज्ञा केली, '' यापुढे पायात वहाण व डोक्याला टोपी कधीच घालणार नाही.''[२६२]

**४.५.११ कर्मवीर भाऊराव व ग्रामोध्दाराचे कार्य :**

कर्मवीर अण्णांना त्यांचे स्वीय सहाय्यक मा.भि.काटकर 'प्रबोधनाची धगधगती मशाल' या ग्रंथात म्हणतात. आण्णा संस्थेच्या कामासाठी सारखे फिरतीवरच असायचे. ते नुकतेच परगावाहून आले होते. व तासाभरातच पुन्हा बाहेर पडणार होते. तो दिवस होता. २९ मे १९५१ डॉ.ए.व्ही.मॅथ्यू भाऊराव अण्णांना भेटायला गेले. ते लिहतात, ''अण्णांना काळा वर्ण सूर्याच्या उष्णतेने आणखीन काळा दिसत होता.

सदऱ्याच्या बाहीवर धूळ साचली होती.'' थोडक्यात अण्णांची सारखी भ्रमंती असायची. कसलीच सवड नसायची.[२६३] लोकजागृती, शिक्षणप्रसार संस्थेला मदत गोळा करणे यासाठी ते अनवाणी फिरले. उघडया माथ्यानी उन्हापावसातून हिंडले. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम झाला. ग्रामोन्नतीच्या हेतुने ते जिल्हाभर फिरले. १९५३ मध्ये सर दोहराबजी टाटा ट्रस्टच्या रूरल वेल्फेअर बोर्डाच्या सहकार्याने माण तालुक्यात त्यांनी ग्रामोध्दाराचे काम केले. देवापूर परिसरातील नऊ खेडयाचा त्यांनी कायापालट केला.[२६४]

**४.५.१२ कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासमोर केवळ निरक्षर नव्हे तर कमालीचा दरिद्री समाज होता. त्याला गरज होती प्राथमिक शिक्षणाची. शिकायचे आहे परंतु खायचे वांदे. त्या समाजापुढे उच्च शिक्षण नव्हे तर माध्यमिकसुध्दा दृष्टीक्षेपात नव्हते. इ.स. १८८२ मध्ये मुंबई इलाख्यात ९० टक्के गावात प्राथमिक शाळाच नव्हत्या. यानंतर ३० ते ४० वर्षे या स्थितीत फारसा फरक पडलेला दिसत नाही.[२६५] खत शेंडयाला नाही बुंध्याला घातले पाहिजे हा दूरदृष्टी विचार कर्मवीरांनी केला. शिक्षणाच्या पलिकडे जाऊन त्यांना नवा माणूस, नवा समाज अभिप्रेत होता. त्यांचे विचार मूलतः खेडयापाडयातील गोरगरीब गरजूंना शिक्षण देण्याचा होता. शिक्षण हे ग्रामीण परिसराशी निगडीत असले पाहिजे. त्यांच्या मताचा पुनरूच्चार भारत व अमेरिका या देशातील शिक्षणतज्ज्ञांच्या संयुक्त समितीने केलेला आढळतो. असे पी.टी.आयच्या वृत्तात म्हटले आहे.[२६६]

**गरीब गरजूंना मोफत शिक्षण :**

सन १९४० मध्ये मोफत व निवासी माध्यमिक विद्यालयानंतर सन १९४७ व ४८ मध्ये मोफत व वसतिगृहयुक्त उच्च महाविद्यालय कर्मवीरांनी स्थापन केले. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र ग्रंथाचे लेखक व प्राचार्य डॉ.ए.व्ही.मॅथ्यू व कर्मवीर अण्णांची या संदर्भांत प्रत्यक्ष २९ मे १९५१ रोजी चर्चा झाली. त्यानुसार अण्णा गरीबांना मोफत शिक्षण देण्याच्या भूमिकेवर ठाम होते. वसतिगृहाच्या बाहेरच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांचेकडून फी घेण्याचा विचार कर्मवीरांना अमान्य होता. त्यावर अण्णा म्हणाले, '' आत एक व बाहेर एक करायचे मला मान्य नाही जे वसतिगृहात रहात आहेत त्यांचेकडून फी घ्यायची नाही व बाहेर जे विद्यार्थी येतील त्यांचेकडून फी घ्यायची यालासुध्दा कर्मवीर तयार नव्हते.''[२६७] ते म्हणाले, '' पैसे म्हणून गावातील बाहेरच्यांना प्रवेश दयायचा लोक म्हणतील केवळ फी मिळावी म्हणून प्रवेश दिला. यावर अण्णा म्हणाले माझा पाठीराखा परमेश्वर आहे. देव या संकल्पनेवर अण्णा मार्मिकपणे म्हणाले, ''देव म्हणजे अंतः करणातला देव मी मानतो. स्वर्गात राहणारा देव मी मानत नाही.'' आण्णा पुढे म्हणाले, ''मी काही तत्वज्ञानी नाही. पण परमेश्वर मला मदत करतो कारण हे कार्य करून मी त्याची सेवा करतो. एवढं मला ठाऊक आहे.''[२६८]

**४.५.१३ कर्मवीर भाऊराव व बुकर टी.वाशिंग्टन :**

कर्मवीर भाऊराव व बुकर टी.वाशिंग्टन एक भारतीय व एक अमेरिकन उपेक्षितांना शिक्षण देण्याचे उद्दिष्टे सफल करणारे महामानव. उपेक्षितांना शिक्षण देणे दोघांचे एक उद्दिष्ट व एक कार्य हे खरे दोघांनाही विद्यार्थ्यांच्या शारीरिक श्रमाची महती जाणली होती. विद्यार्थ्यांचे जीवन साधे असावे यावर दोघांनाही भर

दिला. बुकर टी वाशिंग्टनच्या मराठी अनुवादित ग्रंथाचे अण्णांनी वाचन केले होते.[२६९] फरक असा की, दोघांना आपआपला समाज शिक्षित करायचा दोघांच्या मूलभूत उद्दिष्टांत फरक होता. निग्रो मुलांनी उच्च प्रतीचे जीवन जगावे यासाठी वाशिंग्टनची धडपड होती. परंतु 'शक्यतो साधेपणाने रहा साधेपणाने वागायला शिका' असा भाऊरावांचा आग्रह होता.

**कर्मवीर भाऊराव यांचे राहणीमान :**

प्रा.एन.डी.पाटील, इस्माईलसाहेब मुल्ला, बापूसाहेब नलवडे, शंकरराव सुखटणकर, नानासाहेब माने, एस.डी.महादर, बा.म.ठोके, प्राचार्य अब्दुल गनी अत्तार, मा.सा.निकम, बॅ.पी.जी.पाटील, रा.सु.काका व संघटक कर्मवीर अण्णांचे सुपुत्र आप्पासाहेब पाटील यांना कर्मवीरांचा सहवास घडला. त्यांची प्रेरणास्थाने, त्यांची दैवते त्यांचे क्रांतिसिंह नाना पाटील यांचे सहकारी मित्र इ.बाबतीत प्रत्यक्ष ज्यांनी कर्मवीरांना पाहिले ज्यांना त्यांचा सहवास लाभला त्यांना त्यांचा विचार माहित झाला. कर्मवीरांचे व्यक्तीमत्व, त्यांचे राहणीमान साधे सरळ होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी २६.०१.१९५० रोजी धनिणीच्या बागेत 'मोफत शिक्षण' यावर केलेल्या भाषणात म्हणाले, ''मी सतत समाजाची सेवा करीत राहणार आहे.[२७०] माझ्या आईवडीलांनी माझ्या शिक्षणासाठी जे काही केले. त्याबद्दल ऋण फेडण्यासाठी मी समाजाची यथाशक्ती सेवा करीत आहे. त्यांचे राहणीमानाबददल व्यक्तित्वाबददल प्रा.डॉ.विमला पाटील सांगतात, ''मी लहानपणी अण्णांना अगदी जवळून पाहिले. माझ्या वडिलांचे ते मित्र होते. अण्णा त्यांच्या पेठ या गावी यायचे. कर्मवीर अण्णा अगदी साधे, दिसायला धीरगंभीर, पहाडी शरीरयष्टीचे होते.[२७१]

**कर्मवीर भाऊरावांचे व्यक्तिमत्व :**

कर्मवीर पुस्तकी शिक्षण घेतलेले पदवीधर नव्हते. पण मनाने फार मोठे होते. गरीबांच्या, दीनदलितांच्या शिक्षण उध्दारासाठी आयुष्यभर भटकत राहिलेला ध्येयसाधनेचा झरा म्हणजे कर्मवीर होते. त्यांनी कशाचीच फिकीर केली नाही. बडोदा संस्थानचे नरेश महाराज सयाजीराव गायकवाड यांनी दि.(१४.४.१९३३) श्री.छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस या वसतिगृहास भेट दिली. त्याप्रसंगी कर्मवीर अण्णांनी केलेल्या स्वागतपर भाषणात, ''स्वत: माझ्या सारख्या फकीराच्या आमंत्रणास मान दिला'' असा उल्लेख केला आहे.[२७२] जातीभेद या देशातून नष्ट केला पाहिजे. असे त्यांचे ठाम मत होते. कर्मवीरांनी केलेल्या भाषणात सांगितले की माझ्या संस्थेत जातीभेद मानले जात नाहीत. सर्व जातीधर्माचे विद्यार्थी एकोप्याने एकदिलाने शिकत आहेत.[२७३] सर्व जातीच्या धर्माच्या लोकांना कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहू महाराजांनी समान सवलती दिल्या. त्या दृष्टीने कोल्हापूर हे सर्व हिंदुस्थानात आदर्श संस्थान आहे.[२७४]

**४.५.१४ शैक्षणिक तत्वज्ञान :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अत्यंत कठीण अशा सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीत आपल्या कार्यास सुरूवात केली. गरीब देशाला सर्वांगिण व सार्वत्रिक शिक्षण दयायचे असेल तर स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा हे दोन मूलमंत्र त्यांच्यापुढे ठेवले पाहिजेत असे त्यांचे मत होते.[२७५] सातारा जिल्हा विद्यार्थी

कॉग्रेसव्दारा भाऊराव पाटील यांना १११११११ रूपयांचा रोख निधी देऊन सन्मान केला. सदरप्रसंगी सत्कारमूर्ती कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सडेतोड आपले विचार मांडले. त्यांची मातोश्री व दोन बहिणी या समारंभाला हजर होत्या. ते म्हणाले, ''मी शिक्षणातील पदवीधर नाही. मी पदवीधर व्हावे अशी आईवडिलांची इच्छा होती परंतु ती मला पुरी करता आली नाही. 'बहुजन समाजाचा उध्दार' हा माझाा धर्म आहे. शिक्षण प्रसार हे माझे कार्य आहे. या कार्यात अडचणी निर्माण करणाऱ्यांना तसेच अन्याय करणाऱ्याला ठोकरीने उडविणे हा माझा बाणा आहे.''[२७६] घामाशिवाय दाम नाही व स्वावलंबनाशिवाय आनंद नाही हे त्यांचे तत्वज्ञान आहे. श्रमप्रतिष्ठेवर त्याचा विश्वास होता. स्वावलंबन, स्वाध्याय, समता, व स्वातंत्र्य यावर तत्वावर त्यांनी आपली शिक्षणप्रणाली आखली.[२७७]

प्रारंभी एक बाब लक्षात घेणे गरजेचे आहे की, सर्वसामान्याबद्दल यांना मोठा जिव्हाळा होता. गरीबांचेबददल निस्सिम कळवळा हा त्यांचा स्थायीभाव होता. इस्लामपूरच्या शाळेबाहेर बसलेला ज्ञानदेव घोलप त्यांनी आपला मानला. आयुष्यभर अशा लोकांसाठी ते राबत राहिले.[२७८] आपल्या कुटुंबातील लोकांच्याकडे लक्ष दयायला त्यांना फुरसतच मिळाली नाही. वयाच्या बाराव्या वर्षी जो मुलगा मातृसुखाला पारखा झाला. ते आप्पासाहेब त्यांना संस्थेत नोकरी दयायला ही त्यांनी नकार दिला. आपल्यावर पक्षपाताचा आक्षेप येऊ नये. भाऊराव पाटील जीवनातील सामान्य बाबीत सदैव दक्ष असत.[२७९] कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवन पहातो तेंव्हा असे लक्षात येते की त्यांची लोकशाहीवर खरी भक्ती होती. लोकशाही म्हणजे सगळेजण सारखे समान आहेत. समता ही जीवन पध्दती त्यांना अपेक्षित होती. त्याचे कारण असे की महाराष्ट्रात पेशवाईपासून भाऊराव यांच्या काळापर्यंत बहुतेक ब्राहमणच सरकारी अधिकारी असत. सर्वसामान्य शेतमजूर, शेतकरी, कामगार, अस्पृश्य यांचा यात समावेश नव्हता. याकरिता महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज व भाऊराव पाटील यांनी सर्वसामान्य जनतेच्या मागासलेपणाबद्दल उच्चवर्णियांना जबाबदार धरले.[२८०]

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा विचार केला तर आश्चर्याचा धक्का बसतो. जी व्यक्ती स्वत: शैक्षणिक क्षेत्रात छोटया इयत्ता पास करू शकली नाही. अशा विशेष न शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला शिक्षणविषयक नवीन कल्पना सूचत राहिल्या. धनजीशा कूपर या पारशी उद्योगपतीला त्याच्या कारखान्याच्या उभारणीत सहकार्य केले यापाठीमागील कारण त्यांनी आपल्या फायदयातील काही भाग कूपरनी शिक्षणावर खर्च केला पाहिजे अशी भाऊरावांची अट होती. एक दोन वर्षे गेली परंतु कूपर फायदा होऊन कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी काहीच करीना हे त्यांच्या लक्षात आले. भाऊरावांना श्री.कूपर यांचेकडून कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसा नको होता. खुद्द कामगारांनीही कारखान्याच्या वेळेमध्ये काहीतरी शिक्षण देण्याची सोय हवी होती. त्याबाबत भाऊरावांचा आग्रह होता. कूपरनी ही सूचना फेटाळली. कारखाना नफा मिळविण्यासाठी असतात. कामगारांची फिकीर करण्याचे काय कारण अशी त्या काळात कारखानदारांची धारणा होती. त्यावेळचे भाऊरावांचे विचार आज सर्वमान्य झाले आहेत. मालक, अधिकारी

यांच्याप्रमाणे 'श्रमिकांच्या हिताचा विचार व्हायला हवा आहे.'[२८१] कामाच्या मोबदल्यात जेवण, राहणे, व मोफत शिक्षण, 'कमवा आणि शिका' या योजनेत महाविद्यालयात काम कमी पडू लागले. तरी रस्त्यावर दगड फोडणे, इमारतीसाठी क्रॉक्रिट तयार करणे, महाविद्यालय परिसरातील जमीन एकसारखी करणे, महाविद्यालयाच्या आवारात दुग्धशाळा, पिठाची गिरणी इत्यादीत विद्यार्थी कामे करतात अर्थार्जन व अध्ययन या दोन्ही गोष्टी भिन्न ठेवण्याचे कारण नाही,[२८२] त्या एकच आहेत हे तत्व त्यांनी सांगितले.

शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना लाचार व्हावे लागते याला अण्णांना सक्त विरोध होता. फीसाठी कोणाकडे याचना करावी किंवा वारपध्दतीने जेवणाची सोय करून घ्यावी हे त्यांना अमान्य होते. विद्यार्थी कष्ट करायला तयार आहे. शिक्षण घेण्याइतका सक्षम आहे, बुध्दीमान आहे मग तो वंचित राहता कामा नये. विद्यार्थ्यांनी स्वावलंबी असावे, अशी त्यांची स्पष्ट धारणा होती.[२८३] औपचारिक शिक्षणव्यवस्थेत पुस्तकी ज्ञानाला अधिक महत्व आले. यामुळे मानवी श्रमाची प्रतिष्ठा लोप पावू लागली. म्हणून श्रमाला प्रतिष्ठा देण्यासाठी स्वावलंबी शिक्षणाचे प्रयोग जगात सगळीकडे सुरू झाले. या संदर्भांत बॅ.पी.जी.पाटील यांनी चिंतन केले. त्यांनी त्यागी माणसे मग ती जगाच्या कुठेही, कुठल्याही फळाची अपेक्षा न धरता काम करतात. तशी ही स्वावलंबी शिक्षण योजना १.अमेरिकेतील बेरिया कॉलेजमधील स्वावलंबी शिक्षणाचा प्रयोग २.ब्लॅकबर्न कॉलेज यु.एस.ए. मधील स्वावलंबी शिक्षण ३. महाराष्ट्रातील दगडधोंडयातील प्रदेशात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेला स्वावलंबनाचा प्रयोग.[२८४] महाराष्ट्रात जातविरहीत समाज निर्माण व्हावा अशी भाऊरावांची इच्छा होती. म्हणून तर त्यांनी इतरांप्रमाणे वेगवेगळी न काढता सगळयासाठी एकच वसतिगृह काढले. वेगवेगळया जातीकरिता वेगवेगळी वसतिगृहे म्हणजे वेगळेपणाची भावना वाढीस लागते.[२८५] देवापूर जि.सातारा येथे नऊ खेडयातील लोकांना एकत्र आणले. त्यांच्यासाठी मराठी इंग्रजीच्या शाळा सुरू केल्या. त्याचप्रमाणे शेतीकाम, उदा. विहीरी खणणे, लागवडीच्या नव्या पध्दती, सामुदायिक शेती, सुधारीत बी बियाण्यांची जात, त्या ठिकाणी प्रौढ शिक्षण वर्ग, फिरते वाचनालय, फिरते दवाखाने इत्यादी कार्य कर्मवीर आण्णांनी सुरू केले. शिक्षण, ग्रामीण सुधारणा व शेती या सर्वांचा एकत्रित विचार त्यांनी केला. 'लेबर स्किम' च्या विद्यार्थ्यांचेकरिता बाळासाहेब देसाई व भाऊसाहेब हिरे यांच्या पुढाकाराने मुंबई सरकारने राजेवाडी तलावालगत शंभर एकर जमीन दिली आहे.[२८६]

१९३० मध्ये कामेरी येथील जंगल सत्याग्रह करण्याचा खुद्द प्रयत्न भाऊरावांनी केला. सन १९५३ पुणे येथे कै.गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक परिषद भरली. या परिषदेत स्वतः भाऊरावांनी सांगितले. ''महाराष्ट्राने यापुढे ब्राहमण ब्राहमणेत्तर वादाला मूठमाती दिल्याशिवाय त्यांचा उध्दार होणे अशक्य आहे असे त्यांनी सांगितले.''१९४२ च्या स्वातंत्र्यलढयात रयत शिक्षण संस्थेची अनेक केंद्रे आश्रम झाली. भूमिगतांना येथे सल्लामसलत मिळे. भाऊराव पाटील प्रखर पुरस्कर्ते असूनही प्रतापगडावरील शिवछत्रपतींच्या पुतळयाचे अनावरण समारंभात स्वकियांना विरोध न करण्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले.[२८७] रयत शिक्षण संस्थेचा रथ सर्व जातीधर्माचे लोक उत्तरोत्तर ओढत राहिले. कर्मवीर भाऊराव पाटील कधीच एकटे नव्हते.

३.८.१९५२ च्या दरम्यानची बाब शेकापमध्ये जाण्यास क्रांतिसिंह नाना पाटील आरंभी तयार नव्हते. त्यांचे मन वळविण्यासाठी मोरे, राऊत आणि तुळशीदास जाधव यांनी सातारा येथे जाऊन भाऊराव पाटील यांची भेट घेतली. क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी कामगार पक्षात गेले ते केवळ भाऊरावांचा शब्द शिरोधार्य मानून[२८८]

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा मूळ पिंड सामाजिक होता. शैक्षणिक कार्यात त्यांना फार रस होता. त्यांचा पिंड राजकीय नव्हता. लहानपणापासून ते बंडखोर होते. त्यांच्या स्वभावाचा कल डाव्या विचारसरणीचा होता. कर्मवीर स्वत: ची नोकरी सांभाळून शैक्षणिक व सामाजिक कार्य करू लागले. (इ.स. १९२१) ते मुंबई येथे महात्मा गांधीजींना भेटले. त्यावेळी गांधीजींचे परदेशी कापडावर बहिष्काराचे सत्र चालू होते. गांधीजींचा साधा अर्धनग्न देह बघून त्यांनी स्वत: ची उंची कपडे होळीत टाकले. गांधीजींचे ते भक्त बनले. गांधीजींच्या विचाराने तत्वाने कॉग्रेस चालत नाही यांचे त्यांना दु:ख होते. कामेरी, ता.वाळवा येथील इ.स. १९३० मध्ये झालेला जंगल सत्याग्रहाचा त्यांनी प्रयत्न केला.[२८९]

**कर्मवीर भाऊराव पाटील – वसतिगृहे**

**कर्मवीरांच्या वसतिगृहाचे प्रगतीचा आलेख**[२९०]

| साल | वसतिगृहे संख्या | साल | वसतिगृहे संख्या |
|---|---|---|---|
| १९२४–२५ | ०१ | १९६०–६१ | ६२ |
| १९३२–३३ | ०२ | १९६१–६२ | ६८ |
| १९३५–३६ | ०३ | १९६२–६३ | ७७ |
| १९३८–३९ | ०३ | १९६३–६४ | ८० |
| १९३९–४० | ०३ | १९६४–६५ | ८१ |
| १९४०–४१ | ०४ | १९६५–६६ | ८३ |
| १९४१–४२ | ०४ | १९६६–६७ | ७९ |
| १९४२–४३ | ०६ | १९६८–६९ | ८० |
| १९४३–४४ | ०६ | १९६९–७० | ६८ |
| १९४४–४५ | ०६ | १९७०–७१ | ६८ |
| १९४५–४६ | ०७ | १९७१–७२ | ६८ |
| १९४६–४७ | ०८ | १९७२–७३ | ७४ |
| १९४७–४८ | १० | १९७३–७४ | ७५ |
| १९४८–४९ | १२ | १९७४–७५ | ७५ |
| १९४९–५० | १३ | १९७५–७६ | ७० |

| | | | |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | १४ | १९७७-७८ | ७० |
| १९५१-५२ | १४ | १९७८-७९ | ७० |
| १९५२-५३ | १५ | १९७९-८० | ७२ |
| १९५३-५४ | १५ | १९८०-८१ | ७२ |
| १९५४-५५ | १६ | १९८१-८२ | २७ |
| १९५५-५६ | १९ | १९८२-८३ | ७४ |
| १९५६-५७ | २६ | १९८३-८४ | ७६ |
| १९५७-५८ | २८ | १९८४-८५ | ८१ |
| १९५८-५९ | ३६ | १९८५-८६ | ८३ |
| १९५९-६० | ४७ | १९८६-८७ | ७९ |
| | | १९८७-८८ | ८१ |

**प्राथमिक शाळा प्रगतीचा आलेख**

| साल | संख्या | साल | संख्या | साल | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १९३८-३९ | ०६१ | १९५०-५१ | ५५७ | १९६२-६३ | ०६ |
| १९३९-४० | १६८ | १९५१-५२ | ४७८ | १९६३-६४ | ०३ |
| १९४०-४१ | १९९ | १९५२-५३ | ४६९ | १९७८-७९ | ०३ |
| १९४१-४२ | २४३ | १९५३-५४ | ४५१ | १९७९-८० | ०४ |
| १९४२-४३ | २९५ | १९५४-५५ | ३१९ | १९८०-८१ | ०४ |
| १९४३-४४ | ४१८ | १९५५-५६ | ३०३ | १९८१-८२ | ०४ |
| १९४४-४५ | ४०५ | १९५६-५७ | ६५ | १९८२-८३ | ०४ |
| १९४५-४६ | ३९५ | १९५७-५८ | ३० | १९८३-८४ | ०४ |
| १९४६-४७ | ४३१ | १९५८-५९ | १३ | १९८४-८५ | ०४ |
| १९४७-४८ | ५०८ | १९५९-६० | ०६ | १९८५-८६ | ०४ |
| १९४८-४९ | ५५४ | १९६०-६१ | ०६ | १९८६-८७ | ०४ |
| १९४९-५० | ५७८ | १९६१-६२ | ०६ | १९८७-८८ | ०५ |

संदर्भ : रयत शिक्षण संस्था अहवालावरून

**माध्यमिक शाळा प्रगतीचा आलेख**

| साल | संख्या | साल | संख्या | साल | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १९४०-४१ | १ | १९५६-५७ | ६७ | १९७२-७३ | ३०९ |
| १९४१-४२ | १ | १९५७-५८ | ७४ | १९७३-७४ | ३१० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९४२–४३ | १ | १९५८–५९ | ८४ | १९७४–७५ | ३१० |
| १९४३–४४ | २ | १९५९–६० | १०८ | १९७५–७६ | ३११ |
| १९४४–४५ | ३ | १९६०–६१ | १३७ | १९७६–७७ | ३११ |
| १९४५–४६ | ६ | १९६१–६२ | १६९ | १९७७–७८ | ३१२ |
| १९४६–४७ | ८ | १९६२–६३ | १८४ | १९७८–७९ | ३१३ |
| १९४७–४८ | ८ | १९६३–६४ | १९४ | १९७९–८० | ३१३ |
| १९४८–४९ | १३ | १९६४–६५ | २१३ | १९८०–८१ | ३१३ |
| १९४९–५० | १८ | १९६५–६६ | २३१ | १९८१–८२ | ३१३ |
| १९५०–५१ | २२ | १९६६–६७ | २४० | १९८२–८३ | ३१३ |
| १९५१–५२ | २९ | १९६७–६८ | २७५ | १९८३–८४ | ३१३ |
| १९५२–५३ | ३५ | १९६८–६९ | २८१ | १९८४–८५ | ३१८ |
| १९५३–५४ | ४२ | १९६९–७० | २८४ | १९८५–८६ | ३१९ |
| १९५४–५५ | ५१ | १९७०–७१ | २९३ | १९८६–८७ | ३२१ |
| १९५५–५६ | ६० | १९७१–७२ | ३०९ | १९८७–८८ | ३२६ |

संदर्भ : मॅथ्यू ए.व्ही., कर्मवीर भाऊराव पाटील ग्रंथ

**सारांश व निष्कर्ष** :

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजातील गोरगरीब जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी ४.१०.१९१९ रोजी काले येथे संस्थेची स्थापना केली हे शिक्षणक्षेत्रातील एक क्रांतिकारक पाऊल होते. त्यांच्या या महान कार्याला रयत माऊली सौ.लक्ष्मीबाई पाटील यांनी मोलाची साथ दिली. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणाचे जाळे निर्माण केले. संस्थेने शिक्षणविस्ताराचा आणि गुणवत्तेचा विचार केंद्रस्थानी ठेवून गेली ९५ वर्षे समाजातील दुर्बल घटकांना शैक्षणिक प्रवाहात आणून अविरतपणे शिक्षणप्रसाराचे कार्य गतीने चालू ठेवलेले आहे. सध्याच्या काळाच्या गरजा ओळखून संस्थेने केलेले शैक्षणिक प्रयोग नवसमाज निर्मितीसाठी उपयुक्त असेच आहे. 'कमवा आणि शिका' या अभिनव प्रयोगाला जागतिक मान्यता प्राप्त झालेली आहे यातच कर्मवीरांची दूरदृष्टी कळते. या कार्याची महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दखल घेतली व अत्यंत मानाचा शाहू, फुले, आंबेडकर पुरस्कार संस्थेस बहाल केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्र फाऊंडेशन अमेरिका व साधना ट्रस्ट यांनी जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. नवनवीन सॉफ्टवेअर, एल.सी.डी.लॅपटॉप, डिजीटल क्लासरूम इ. सुविधेकरिता सुमारे १६८३६२७९६ रू.खर्च केले. गुणवत्तेचा विचार केंद्रस्थानी ठेवून 'गुरूकुल' निवासी व अनिवासी रयत सीईटी सारखे प्रकल्प राबविले जतात. शिक्षकांना आधुनिक ज्ञानाच्या प्रवाहात आणण्यासाठी उदबोधन वर्ग, व प्रज्ञावान विद्ययार्थ्यांचेकरिता उन्हाळी वर्ग विशेष मार्गदर्शन केले

जाते. रयतव्दारा 'रयत प्रज्ञाशोध', 'रयत ऑलिंम्पियाड' प्रकल्प राबविले जातात. संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी सातारा येथे शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त 'रयत इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट' ची स्थापना केली आहे. रयत शिक्षण संस्थेने सामाजिक जाणीव ठेवून दलित व दुर्बल घटक, अनुसूचित जाती, जमाती व भटक्या जमाती इत्यादी वर्गाचा विकास केलेला आहे. याची नोंद घेऊन १९९४ चा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हा राष्ट्रीय पुरस्कार शासनाच्या वतीने राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांनी संस्थेस प्रदान केला.[२९१] महाराष्ट्रातील १४ व कर्नाटकातील १ मिळून पंधरा जिल्हयात सुमारे १७००० सेवक व असंख्य हितचिंतक व कार्यकर्ते यांच्या सहकार्याने सुमारे चार लाख विद्यार्थी ज्ञान घेत आहेत. संस्थेचे आजचे अंदाजपत्रक शंभर कोटीहून अधिक आहे. संख्यात्मक व गुणात्मक मोठेपणा हे संस्थेचे वैशिष्टय आहे.

**निष्कर्ष :**

रयत शिक्षण संस्थेत सर्व जातीधर्माची मुले एकत्र राहतात, एकत्र जेवतात, श्रम करून घाम गाळतात, संस्थेत श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय व भावनिक एकात्मता, कृतीयुक्त शिक्षणातून दिली जाते. साधी राहणी, स्वावलंबी होऊन गोरगरीबांचे कल्याण व उध्दार करण्याचे उच्च ध्येय संस्थेत जोपासले जाते. शिक्षणाने नवीन आदर्श माणूस घडविता येतो. नवसमाज निर्माण करता येतो हे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक तत्वज्ञान डोळयापुढे ठेवून यशस्वी वाटचाल जोमाने व उत्साहाने चालू आहे. वंचितांचे शिक्षण, सर्वासाठी शिक्षण, संमिश्र वसतिगृहे, स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय, समता, श्रमप्रतिष्ठा, ध्येयवादी शिक्षक, सेवाभावी कार्यकर्ते, नेतृत्व निर्मितीची, आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, राष्ट्रीय एकात्मता, नवसमाज निर्मिती इ. कर्मवीरांचे जीवनविचार उराशी धरून संस्थेची घौडदौड सुरू आहे.

**४.६ राजकीय सामाजिक नेतृत्व : क्रांतिसिंह नाना पाटील**

**प्रस्तावना :**

सन १९४२ मध्ये सातारमध्ये जे स्वातंत्र्य आंदोलन झाले त्याचे बरेच श्रेय या रांगडया पंढरीच्या वारकऱ्याला जाते, एवढे मोठे राजकीय व सामाजिक काम त्यांनी उभे केले.[२९२] त्यांच्या कार्यापाठीमागे प्रेरणा होती म.जोतीराव फुले यांची. सामान्याला दोन वेळचे पोटभर जेवण मिळावे हा त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता.[२९३]

**नाना पाटील जन्म व बालपण :**

क्रांतिसिंह नाना रामचंद्र पाटील यांचा जन्म ३ ऑगस्ट १९०० रोजी सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यातील बहे या त्यांच्या आजोळच्या गावी झाला. जुन्या सातारा जिल्हयातील येडेमच्छिंद्र हे त्यांचे मूळ गाव. नाना पाटलांचा जन्म सामान्य मराठा शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे घराणे वारकरी संप्रदायाचे होते.

**४.६.१ नानांचे बालपण व शिक्षण :**

लहानपणीच त्यांना तालमीचा व व्यायामाचा नाद होता. त्यामुळे त्यांची शरीररप्रकृती उत्तम होती. घरी दुधदूभते होते. कुस्त्या कराव्यात. भरपूर व्यायाम करावा हा त्यांचा दिनक्रमातील एक भाग होता.[२९४]

नाना पाटील १९१८ मध्ये फायनलची परीक्षा पास झाले.

**नाना पाटील – सरकारी नोकरी** :

सन १९२० मध्ये नानाची कराड तालुक्यातील सुरलीसजा या गावी तलाठी म्हणून नियुक्ती झाली. सुरलीसजा येथे दोन वर्षे काम केल्यावर त्यांची बदली कराड तालुक्यातील वाठार येथे झाली.[२९५]

**४.६.२ नाना पाटील व सत्यशोधक समाज** :

इ.स.१९१७ मध्ये कुटुंबाच्या चरितार्थासाठी नानांनी तलाठी नोकरी सुरू केली. शेतकऱ्यांना सातबाराचे उतारे देणे, शेतसारा गोळा करणे, कागदपत्राच्या नकला करणे इ. कामे ते करतच व हे करतानाच ते गावातील तालमीत जाणे, गावोगावच्या जत्रेत फडावर जाऊन कुस्त्या करणे हे नाना पाटलांचे चालूच होते. इ.स.१९१८ चे मध्यावर वाळवा येथे जेष्ठ समाजसुधारक महर्षी वि.रा.शिंदे यांचे 'मराठयांचा इतिहास' या विषयावर भाषण झाले. नाना पाटील आपल्या मित्रांसह तेथे हजर होते. महर्षींच्या भाषणाचा त्यांचेवर चांगलाच प्रभाव झाला.[२९६] त्यावेळी जलसे फारच लोकप्रिय झाले होते. ''माणूस जन्माने श्रेष्ठ नसून कृतीने मोठा होतो.'' हा समाजवादी विचार जलशातून दिला जाई. नाना तर जलशामुळे प्रभावीत झाले. दि.१७ व १८ जुलै १९२० रोजी सातारा येथे भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक कार्यकारणीची बैठक झाली. या परिषदेला सामान्यपणे चार हजार कार्यकर्ते उपस्थित होते. त्यावेळी सातारा जिल्हयात विविध मेळावे घेतले. त्यावेळी सातारमध्ये भाऊराव पाटील, केशवराव विचारे, रामचंद्रराव शिंदे, नाना पाटील, रामचंद्र चव्हाण नलावडे वकील, मानसिंग जगताप इत्यादी कार्यकर्ते प्रभावीपणे काम करीत होते. आक्टोंबर १९२० च्या सुमारास सातारा जिल्हयात या चळवळीचा जोर वाढलेला दिसतो.[२९७]

**गांधीलग्न, साक्षरता व व्यसनमुक्ती** :

तलाठयाचे काम करताना ते सत्यशोधक चळवळीचे काम करीत होते. त्याचवेळी त्यांनी भटजीविना लग्न लावण्याचा सपाटा सुरू केला. समाजसुधारणेच्या कार्यात नाना पाटील यांना रामानंद भारती यांच्यासारखे तळमळीचे कार्यकर्ते मिळाले. नाना पाटील व रामानंद भारती यांनी सातारा जिल्हयात 'गांधी लग्नाची' जोरदार मोहिम उघडली.[२९८] गांधी लग्न म्हणजे अत्यंत कमी खर्चात, सर्व प्रकारच्या धार्मिक विधींना फाटा देवून लावलेले लग्न. वधूवरांना खादी पोशाख. वधूवरांनी परस्परांना हार घातला की झाले लग्न. हुंडा नाही, मानपान नाही, जेवणावळींनासुध्दा फाटा देण्यात आला होता. गांधी लग्नाबरोबर, साक्षरता प्रसार, व्यसनमुक्ती, अस्पृश्यता निवारण इ.मध्ये नानांनी फार मोठे काम केले.[२९९]

नाना पाटील ईश्वरपूजनाच्या विरूध्द नव्हते. ते पंढरपूरच्या विठ्ठलाचे भक्त होते. ते वारकरी होते परंतु त्यांना गरीबांच्याबद्दल अपार प्रेम होते. गोरगरीबांचा उध्दार हीच ईश्वर भक्ती होती. ईश्वर दगडाच्या मूर्तीत नाही. तो लक्षावधी दलित, पतितात आहे. क्रांतिसिंह नाना पाटील व कर्मवीर भाऊराव पाटील या दोघांना दीनदुबळयांच्याबद्दल कणव होती. दोघेही देव मानत होते परंतु तो मुर्तीतील नव्हे. सत्यशोधकाचे प्रचारक होते. भटभिक्षुक, सावकार व जमीनदार यांच्या पिळवणुकीविरूध्द बंड हे या चळवळीचा मुख्य

कार्यक्रम होता.[३००] म.फुले यांच्या संदेशानुसार क्रांतिसिंह नाना पाटील यांनी ब्राहमण पुरोहितांच्यावर बहिष्कार टाकले. लोकांची मने सुधारणेकडे वळविली. स्त्री शिक्षणाबाबत म.फुलेंचा आदर्श त्यांच्यासमोर होता. जसे फुलेंनी सावित्रीबाईंना लिहायला वाचायला शिकविले तसेच नाना पाटील यांनी आपल्या पत्नीला साक्षर करण्याचा निर्धार केला. विरोध झाला तरी त्यांनी त्यावर आत्मसंयमाने मात केली. पत्नीला साक्षर करण्यासाठी ते स्वतः शिक्षक झाले.[३०१]

**घराघरातून प्रौढ साक्षरता मोहिम** :

त्या कालखंडातील समाजाला शिक्षणाचे महत्व समजलेले नव्हते. समाजाला या अज्ञानातून वर काढण्यासाठी शिक्षणाशिवाय उपाय नाही हे ओळखून लोकांचे दु:ख दारिद्र्य दूर करण्यासाठी नानानी शिक्षणप्रसाराचे काम हाती घेतले. प्रौढांना शिक्षण देण्यासाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या.[३०२] नाना पाटील आपल्या भाषणातून सांगायचे, '' ग्रामराज्याच्या पाईकांनो तुम्ही प्रत्येक खेडयातील रस्ते सुधारा, साक्षरता वाढवा, शेतीची उत्तम प्रकारे लागवड करा. उकिरडयावर वसलेली खेडी नंदनवने झाली पाहिजेत.''[३०३] नानांनी घरच्या विरोधाला न जुमानता पत्नीला साक्षर केले.[३०४] क्रांतिसिंह नाना पाटलांची समाजसुधारणा सर्वंकष होती. यामध्ये शिक्षणप्रसार होता, अंधश्रध्दा निर्मूलन होते, अस्पृश्योध्दार होता, त्याचप्रमाणे यात व्यसनमुक्तीसुध्दा होती. क्रांतिसिंहानी तासगाव परिसरात प्रौढ साक्षरता वर्गसुध्दा चालविले. त्यांचा एकच ध्यास होता. 'बळीराजा सुखी झाला पाहिजे'. 'बळीराजा शहाणा झाला पाहिजे.'[३०५] अज्ञानी गरीबांना शहाणे करण्याचा एकच उपाय म्हणजे शिक्षण होय. नाना पाटील यांचे सहकारी मित्र कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणगंगा खेडोपाडी नेली. कर्मवीर व क्रांतिसिंह यांचे काम व सत्यशोधकी विचार परस्परपूरकच होते.[३०६]

**नाना पाटील यांचे प्रबोधन प्रहार** :

देवाच्या नावाखाली भोंदूगिरी या अनिष्ट चालीरितीवर क्रांतिसिंहांनी कडाडून प्रहार केले. ज्यांनी आयुष्यात पुस्तक वा वृत्तपत्र हाती धरले नाही त्यांचे समोर ३/३ तास नाना बोलत रहायचे. त्यांची भाषा शेतकऱ्याची होती. दैनंदिन व्यवहारातील, जीवनातील विनोदी झालर असलेले दाखले त्यात असायचे. जमलेल्या शेतकऱ्यांचे डोळे ते कौशल्याने उघडत असत. अंधश्रध्देवर प्रहार असायचे. नाना बोलायला सुरूवात शड्डू ठोकूनच करायचे.[३०७] त्यांची मुलूखमैदान तोफ एकसारखी धडधडायची, '' आरं म्हारं, मांग, चांभारं, भंगी यांना लांब का ठेवता. ती घाण काम करत्यात म्हणून. तुमचा डावा हात सकाळी उठल्या उठल्या कसलं काम करतो ?[३०८] नाना पाटील फर्डे वक्ते होते. नाना पाटील प्रबोधन करताना सामाजिक परंपरा यांचे दाखले देत गोष्टी सांगत. पिंडाला कावळा शिवणे, मरीआईचा गाडा अंकलखोपच्या म्हसोबाचे डोळे, अस्पृश्यता मानव जातीचा कलंक या संदर्भांत लोकांना प्रबोधन केले.[३०९]

**४.६.३ स्वातंत्र्य चळवळीतील १९४२ चा लढा** :

स्वातंत्र्यचळवळीत १९४२ च्या चलेजाव चळवळीला फार मोठे स्थान आहे. थोडक्यात सातारा जिल्हयातील नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी या चळवळीला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. कॉंग्रेस नेत्यांच्या

बैठका झाल्या. पहिला कार्यक्रम म्हणून तालुका मामलेदार कचेरीवर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला.[३१०] निर्णयाप्रमाणे तासगाव, कराड व पाटण या ठिकाणचे मोर्चे यशस्वीरित्या पार पडले.

**४.६.४ नाना पाटील यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान :**

देशातील बारीक मोठया घटनेवर नानांचे चांगलेच लक्ष होते. म.गांधी, नेहरू, वल्लभभाई पटेल यांचा त्यांनी अभ्यास केला. जेधेचे राष्ट्रीय प्रवाहात येण्याचे आवाहन ऐकून त्यांना आनंद झाला व गणपतराव बटाणेदादांच्या संमतीने त्यांनी वखार सोडली व पूर्णवेळ देशकार्यासाठी वाहून घेतले. १९३० सविनय कायदेभंगाच्या फेऱ्या, मोर्चे काढले. जनजागृतीचे काम गतीने केले.[३११] मुंबईत उषा मेहतांनी गुप्त रेडिओ केंद्र सुरू केले. ऐतवडयाच्या कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणप्रसाराचे काम केले. इस्लामपूर येथे पिकेटींग मंडळ, मिरजेला अंबाबाई तालीम, सांगलीला समर्थ व्यायामशाळा सुरू झाली. कवठेपिरान येथे खासेराव नाना पाटील यांनी एक राष्ट्रीय शाळा सुरू केली. मिरज येथे पुंडलिक कातवडे, तात्यासाहेब शिखरे यांनी स्वदेशी वस्तू भांडार काढले. तासगावचे माधव रघूनाथ यांनी गावोगाव खादीचा व स्वदेशी मालाचा प्रचार केला. डॉ.हिंगमिरे यांनी खादी कापडाचे गठ्ठे पाठीवर घेऊन प्रसार व प्रचार केला. १९३१ पासून परदेशी मालावरचा बहिष्कार गतीमान केला. ३१.१२.१९२९ नेहरूंनी स्वतंत्र हिंदुस्थानचा ध्वज फडकाविला. नाना पाटील यांनी २६ जाने, १९३० रोजी सकाळी वाठारच्या चावडीवरील चौकोनी ओटयावर उभे राहून अंगावरील उंची कपडे सदरा, मलमली धोतर, कोशा पटका काढून खादीचा नेहरू शर्ट, जाडीभरडी लुंगी व गांधी टोपी घालून गावोगाव प्रभात व सायं फेऱ्या काढल्या. व स्वत: फिरून आज संध्याकाळी नाना पाटलांची सभा आहे असे जाहीर केले, अशी दवंडी दिली.[३१२] रात्री सभेला सर्व गावापुढे नानांनी अगदी साध्या भाषेत इंग्रजांची गुलामगिरी तोडून स्वातंत्र्याकरीता गांधाजींच्या मागे खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

**जंगल सत्याग्रह :**

सातारा जिल्हयातील बिळाशीच्या जंगल सत्याग्रहाने इंग्रजांना चांगलाच शह दिला. हे बिळाशीचे बंड म्हणून इतिहास प्रसिद्ध आहे. टाईम्स ऑफ इंडियाने 'Revolt at Bilashi' असे त्याचे वर्णन केले आहे. बिळाशीत ३० फूट उंचीचा सागवानी सोट लोकांनी उभारला व त्यावर तिरंगा फडकावला. या झेंडयाचे रक्षण करण्याकरीता महार, मांग, चांभार, सारे बलुतेदार सहभागी होते. हा ध्वज म्हणजे ब्रिटिशांना एक आव्हानच वाटले.[३१३]

**रेठरे धरण जंगल सत्याग्रह :**

बिळाशी नंतर रेठरे धरण येथे जंगल सत्याग्रह झाला नाना पाटील यांनी यात सहभाग घेतला. विळयाने गवत कापून कायदा मोडायचा. बापूसाहेब देशमुख यांनी चांदीच्या विळयाने गवत कापून या सत्याग्रहाला सुरूवात केली. साधारणपणे ८००० सत्याग्रही होते. लोकांनी नाना पाटलांचा जयजयकार केला. नारळ फूटताच नाना गायब झाले.[३१४]

**देवराष्ट्रे सभा :**

वॉरंटला न जुमानता पोलिसांची नजर चुकवून सभा घेत. श्रावणातील शेवटच्या सोमवारी देवराष्ट्रे ता.खानापूर येथे गावची यात्रा हा मोका साधून कुस्तीचा फड असे. कुस्त्या पाहण्यासाठी नाना पाटील येत. पोलिस नानाला पकडण्यासाठी येत. तेव्हा नानांनी लोकांच्या मनातून पोलिस भिती घालविण्यासाठी सभा घेतली.[३१५] नाना पाटील नियोजनानुसार फडात हजर राहिले. लोकांनी एकच जल्लोष केला. घोषणाबाजीचा जोर थोडा कमी झाला नानांनी पैलवानी पद्धतीने उडी मारली अन एका पायावर गिरकी घेतली. म.फुले, छ.शिवाजी, म.गांधी व भारतमाता यांच्या घोषणा दिल्या.

**नाना पाटील यांची मुंबई सभा :**

मुंबईला कायदेभंगाची चळवळ जोरात सुरू होती. स.का.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बारदान गल्लीत एक सभा होती. नाना पाटील सहकाऱ्यांसह तेथे गेले. नानांचे व्यासपीठावर कोणीही ओळखीचे नव्हते. विनंतीवरून भाषण करायला फक्त पंधरा मिनिटे मिळाली.[३१६] नानांनी अनोख्या गावरान भाषेत विनोदी पद्धतीने भाषण केले. नाना पाटील यांनी दीड तास श्रोतेवर्गाला जागीच खिळवून ठेवले. स.का. पाटील सुद्धा मंत्रमुग्ध होऊन भाषण ऐकत होते. सभा संपताच लोकांनी नानाला उचलून घेतले. एक व्यापारी नानांच्या जवळ आला व हातातील घडयाळ त्यांनी नानांना सप्रेम भेट दिले.[३१७] नाना पाटील इंग्रजांच्या दडपशाहीवर नेहमी टिका करीत. व लढयात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देत असत. ते भूमिगत होण्याअगोदरच त्यांना २२ जाने, १९३२ ला अटक केली. २३ जानेवारी १९३२ चे अहवालात डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट नानाच्याबद्दल म्हणतात.[३१८] This man caused a lot of trouble in civil disobedient. Movement and is also a very violent speaker.

**नाना पाटील यांच्या जीवनातील खडतर प्रसंग:**

सरकारनी नानांना दोन महिन्यानंतर पॅरोलवर सोडले. सोडताना त्यांना अट घातली की इस्लामपूर पोलिसात त्यांना दोनवेळा हजेरी दिली पाहिजे. या काळात प्रश्न पडला जेवणाचा येडयावरून रोजच्या रोज डबा आणण्याची स्थिती नव्हती. इस्लामपूरच्या प्रांतिक पुढाऱ्यांनी मदत केली नाही. उलट ''हमाली करा'' असे सुनावले. आपल्यामुळे कोणाला त्रास नको म्हणून स्वतःचा खर्च भागविण्यासाठी इस्लामपूर बस स्टेशनवर व मार्केट यार्ड परिसरात हमालीला सुरूवात केली. नाना एक पैशात दोन मक्याची कणसे येत ती ते खात व भरपूर पाणी पीत. दुसरा प्रश्न कपडयाचा. नवीन कपडे घेण्यासाठी पैसे नाहीत. लज्जारक्षणासाठी कपडे तर हवेत म्हणून ओळखीच्या गृहस्थाकडून गुपचुप दोन पोती आणली.त्यापैकी एक पोते उसवून त्याचै लुंगी केली. दुसरे पोते मधोमध कापले व दोन बाजूला हात मावतील असे तोडले असा पोत्याचा शर्ट केला. अक्षरशः ते पोतेबुवा झाले. अशी खडतर देशसेवा करत. नाना पाटलांच्या या पोतेबुवाच्या या रूपाची चर्चा संपूर्ण जिल्हाभर झाली.[३१९]

**४.६.६ नाना पाटील यांचे १९३४ ते १९३७ चे देशकार्य :**

नाना पाटील यांनी घरादारावर तुळशीपत्र ठेवले. पूर्णवेळ देशासाठी कार्य केले. प्रभात फेरी, खादीचा प्रसार, परदेशी मालावर बहिष्कार. साक्षरता प्रसार, ग्रामसफाई, व्यसनमुक्ती प्रचार, गांधी लग्ने, स्त्री शिक्षण, अंधश्रद्धा निर्मुलन, अस्पृश्यता निवारण इ.बाबींची जनजागृती केली. जिल्हाभर गांधीजींचे तत्वज्ञान व विचार पोहचविले. या कामी त्यांना लोकांनी उत्तम सहकार्य केले. यामध्ये पुढील मंडळी होती. कुंडलचे आप्पा लाड, जी.डी.लाड, नाथाजी लाड, ईश्वरा लाड, तांबट काका, दत्तोबा लाड, हणमंतवाडीचे नानासाहेब मोरे, बळी मोरे, पलूसचे राजाराम सखाराम पाटील, वडगावचे बाळकू मोहिते, विटयाचे बाबूराव ठाकूर, फुलचंद शहा, धोंडी शेडजी, कुर्ल्याचे प्रभुसिंग धोंडी स्वामी, पारे येथील मांजर्डेकर गुरूजी, मारूती साळुंखे, जिजाबा कोंडीबा पाटील, महादेव मिरगे, शालूताई मिरगे, भगवानराव सूर्यवंशी, सदाशिव पवार, गंगुताई सदाशिव पवार, वाळव्याचे नागनाथ आण्णा इ. नाना पाटलांनी गावोगावी जीवाभावाची माणसं जोडली होती. नाना पाटील यांनी कुंडल गाव अक्षरशः वेडा केला. कुंडल गावातील लोक त्यांना देव मानीत.[३२०]

**नाना पाटील सामाजिक सुधारक : साक्षरता**

साक्षरता – गांधीजींच्या १४ कलमी कार्यक्रमाप्रमाणे नानांनी साक्षरता प्रसार केला. खेडोपाडयात पायी फिरून साक्षरतेचे महत्व पटवून दिले. तासगाव मोराळे येथे प्रौढ साक्षरता वर्ग काढले. काही काळ स्वतः शिकविण्याचे काम केले. पुढे जिल्हाभर प्रौढ साक्षरतेचा प्रसार झाला. काँग्रेसचे प्रौढ साक्षरतेचे एस.आर.भागवत यांनी त्यांना सायकल भेट दिली.[३२१]

**समाजाला विधायक दिशा :**

नाना पाटील व एका स्वामीची भेट रेडयाचीवाडी (सध्याचे सावंतपूर) येथे झाली. स्वामी मूळचे म्हैसूरचे. भाषा कानडी परंतु बरेच वास्तव्यामुळे मोडकी मराठी बोलत ते स्वामी रामानंद भारती. नाना व स्वामीनी समाजाला विधायक दिशा देण्यासाठी संयुक्त दौरे काढले.[३२२] सत्यशोधकी चळवळीला पुन्हा नवजीवन दिले. लग्नातील खर्चाला फाटा देऊन कमी खर्चात लग्न करण्याचा घाट घातला. रूसवे नाहीत अन फुगवे नाहीत. नवरानवरी खादीचा पोशाख. दोन हार व मंगळसूत्र. झाले २० ते २५ रूपयात लग्न. स्वामी रामानंद मंगलाष्टका म्हणत. सामुदायिक विवाह लावले. रामानंद स्वामी एक ब्रहमचारी शेतकऱ्याचे पोरगे. एक साधू अशी लग्ने लावतोय हे क्रांतिकारक कार्य होते.[३२३] धार्मिक गुलामगिरी विरूध्द बंड. दलितांचे पंगतीला बसून नाना जेवले. काही वृध्दांनी विरोध केला पण सर्व गाव दलितांबरोबर जेवला.

**पंडीत नेहरूं यांची कराडमधील सभा :**

सन १९३७ प्रांतिक निवडणूक प्रचाराकरिता नेहरूंनी देशभर प्रचार दौरा केला. पैकी एक प्रचारसभा कराडला झाली. या सभेला नाना पाटील, आत्माराम पाटील असंख्य कार्यकर्त्यासह हजर होते. ही सभा कृष्णा नदीकाठी वाळवंटात होती. सभेची वेळ सकाळी आठ वाजता होती. साधारणपणे ५०००० जनसमुदाय हजर होता. उंच व्यासपीठ होते. लाऊडस्पीकरची सोय केलेली होती. एवढया जनसमुदायाला शांत कसे

ठेवायचे ही जबाबदारी नाना पाटील यांच्यावर सोपविली. लाऊड स्पिकरवर नानांचे नाव पुकारले की कमालीची शांतता पसरली. नेहमीच्या थाटात पैलवानी उडी मारली व भाषणाला सुरूवात केली. आपल्या भाषणाने एवढा जनसमुदाय तास दीड तास हसत ठेवला. नंतर स्वतःच्या खांदयावरून नेहरूंना घेऊन ते गर्दीतून घेऊन व्यासपीठापर्यंत आणले. पंडीत नेहरू नानांच्या कार्यानी प्रभावित झाले.[३२४]

**राष्ट्र सेवा दल :**

सन १९३७ च्या अखेरीस नागनाथआण्णा, बी.एल.गायकवाड, चामुंडाराव पाटील, सखाराम मुकादम इ. मंडळींनी प्रयत्न करून कामेरी येथे विद्यार्थ्यांचे अभ्यास शिबीर घेतले. हे शिबीर शिक्षणतज्ञ बॅरिस्टर खर्डेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

**४.६.७ प्रतिसरकार :**

स्वातंत्र्यलढयाच्या शेवटचा टप्पा म्हणजे १९४२ चा लढा. 'चलेजाव आंदोलन' या आंदोलनात जनतेने असामान्य शौर्य दाखविले. या सर्वांचा कळस म्हणजे प्रतिसरकार चळवळ. स्वातंत्र्याचा लढा दयायचा तर जनतेचा पाठिंबा हवा. याकरिता जनमानसातील आपले स्थान भक्कम हवे, जनतेला तिच्या सुरक्षिततेची जिवीत वित्ताची हमी दिली पाहिजे. या भावनेतून प्रतिसरकार चळवळ स्थापन झाली. मिदनापूर, भागलपूर व बालिया इत्यादी ठिकाणी ९ ऑगस्ट नंतर उठाव झाले पण ते नंतर शांतसुध्दा झाले. परंतु सातारच्या प्रतिसरकारचे तसे झाले नाही ते दिवसेंदिवस अधिकच वाढत गेले, प्रभावी होत गेले.[३२५] ब्रिटिशांची सत्ता नष्ट होऊन स्वकीयांचे स्वराज्य स्थापन झाले. खुद्द नाना पाटील यांच्या शब्दात प्रतिसरकारची व्याख्या, '' इंग्रजांची गुलामगिरी फेकून स्वतंत्र म्हणून वावरणाऱ्या भारतीयांचे सरकार.'' सातारला नाना पाटील नावाचे राज्य चालू आहे'' असे ब्रिटिश खासदार ब्रिटिश पंतप्रधानांना सांगू लागले. थोडक्यात युरोपमध्ये प्रतिसरकारचा बोलबाला झाला.[३२६] एवढया प्रचंड ब्रिटिश साम्राज्याला सातारच्या छोटया चिमुकल्या प्रतिसरकारने आव्हान दयावे ही नामुष्कीची गोष्ट होती. ती ब्रिटिशांना अपमानकारक वाटत होती.[३२७]

**प्रतिसरकार – तुफान सेना:**

नाना पाटील यांनी जी.डी.लाड यांच्या नेतृत्वाखाली 'तुफान सेना' निर्माण केली. या सेनेने एक एक गुंड टोळी वेचून वेचून ठार केली, ठेचून काढली. जुलमी सावकारांची धिंड काढली. सामान्य माणूस गुंड दरोडेखोरांपासून मुक्त केला. न्यायदान कमिटयांचे काम उल्लेखनीय आहे. गरीब , नडलेल्या शेतकऱ्याला न्याय दिला. स्त्रियांच्यावर अत्याचार करणाऱ्याला कडक शासन केले. दारू गाळण्याचे व विक्रीचे धंदे बंद पाडले. दारूबंदी, जुगारबंदी, हुंडाबंदी, गांधीं लग्न प्रचार, अस्पृश्यता निवारण इत्यादी विधायक कार्यक्रमानी ग्रामराज्य सुराज्य बनविले.[३२८]

**४.६.८ प्रतिसरकारचे यश :**

क्रांतिसिंहांच्या नेतृत्वाखाली सातारमधील प्रतिसरकारच्या अभूतपूर्व यशाची पार्श्वभूमी पश्चिम

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सामाजिक इतिहासात आहे. सत्यशोधक चळवळीने या भूमीतील सामान्य माणूस सामाजिक गुलामगिरीविरूध्द बंड करून उठला होता. मुळातच प्रस्थापिताविरूध्द बंड करून उठणे व आपल्या अस्मितेची राखण करणे हा मातीचा गुणच आहे. प्रतिसरकारच्या यशाचे दुसरे कारण त्यांना जनतेचे प्रेम लाभले. जनतेने मोठा पाठिंबा दिला. मोठे सहकार्य दिले. प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांनी पऱ्या लावल्या परंतु गुंडांना. गरीबांना नाही. खजिने लुटले परंतु ते ब्रिटिश सरकारचे. रेल्वे उलथून टाकल्या परंतु सरकारच्या, खाजगी मालकीच्या नव्हे. खुद्द क्रांतिसिंह प्रतिसरकारबद्दल जनतेच्या सहकार्याबद्दल काय म्हणतात, ''सातारचा संग्राम म्हणून जो गाजला तो काही दहा पाच व्यक्तीचा उठाव नव्हे. खेडयापाडयातील हजारो स्त्री पुरूष , बाल –वृध्द यांनी स्वत: चे रक्त आणि अश्रू देऊन चेतवलेला एक महायज्ञ होता.

**४.६.९ स्वातंञ्योत्तर भ्रमनिरास** :

देशाची सूत्रे कॉग्रेस पक्षाकडे आली. भूमिगतावरील वॉरंटे रद्द झाली. स्वातंञ्य आले, आता गोरगरीबांचे, कष्टकऱ्यांचे राज्य येणार हे नाना पाटलांचे गणित होते. कॉग्रेसवर त्यांची श्रध्दा होती. कॉग्रेसच्या झेंडयाखाली परमेश्वराने आपणाला मरण दयावे अशी त्यांची प्रार्थना होती. याच भावनेपोटी नाना पाटील दिल्लीला आचार्य कृपलानी यांना भेटले. त्यांनी आचार्य कृपलानींना विचारले, '' आपला भारत आता स्वतंत्र झाला. आता गरीबांचं राज्य येईल का?'' जगात कुठेही गरीबांचे राज्य झालेले नाही आणि होणारही नाही त्यांचे नाव घ्यायचे आणि राज्य करायचे.'' आचार्यांचे उत्तर कटू होते परंतु सत्य होते. क्रांतिसिंहाच्या कल्पनेला तडा गेला.[३२९]

**४.६.१० क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी कामगार पक्षात** :

ज्या कॉग्रेस पक्षाने स्वातंञ्यपूर्व काळात शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या भल्याचे ठराव केले. ती कॉग्रेस आता पूर्वीची राहीली नाही. त्यांच्याप्रमाणे केशवराव, शंकरराव मोरे, माधवराव बागल, तुळशीदास जाधव होते. या मंडळींचासुध्दा असाच भ्रमनिरास झाला. या मंडळींनी शेतकरी कामगारांच्या, कष्टकऱ्यांच्या राज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शेतकरी कामगार हा मार्क्सवादी तत्वज्ञानावर उभारलेला नवा पक्ष स्थापन केला. हा खराखुरा बहुजन समाजाचा शेतकरी कष्टकऱ्यांच्या हितासाठी झटणारा मार्क्सवादी पक्ष बनला. शेतकरी कामगार संघाच्या उभारणीत बहुमोल वाटा असणारे प्रतिसरकारचे उदगाते नाना पाटील यशवंतराव चव्हाण यांच्याप्रमाणे नवीन पक्षात सामील नव्हते. १३ जून १९४८ ला जेधे मोरे यांनी या पक्षाला 'शेतकरी कामगार पक्ष' असे नाव दिले.[३३०] जनतेच्या जागृतीशिवाय हा नवीन पक्ष मूळ धरू शकणार नाही म्हणून या पक्षात क्रांतिसिंहांचा प्रवेश महत्वाचा आहे असे धुरीणींना वाटले. तेव्हा नानांना पक्षात आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. म्हणून मोरे, जाधव यांनी कर्मवीर भाऊरावांना गळ घालून नाना पाटलांची समजूत घालण्यास सांगितले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या मुख्यालयात नाना पाटील, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव यांची भेट घडवून आणली. अखेरीस कर्मवीरांच्या म्हणण्याला मान देऊन नाना पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षात येण्याचा निर्णय घेतला.[३३१]

**४.६.११ दुधबंदी आंदोलन :**

दुधनिर्मिती व विक्री शेतकरी वर्गाचा जोडधंदा. तो कष्टाचा असतो. शेतकरी रोजच्या प्रापंचिक गरजा भागविण्यासाठी दुध आपल्या मुलाबाळांना न देता पांढरपेशा लोकांना अल्प दरात विकतो. त्यावेळी साखर शिधापत्रिकेवर मिळत असे. खुल्याबाजारात साखर विक्रीस बंदी होती. खेडयात शिधापत्रिकेवर अल्प साखर मिळे व शहरी माणसाला साखर जास्त मिळे. या विषम वाटणीमुळे नाना पाटील यांनी खेडयातील माणसाला साखर नाही तर तुम्हाला दुध नाही. अशी घोषणा करून नाना पाटलांनी १९४८ मध्ये इस्लामपूर येथे दुधबंदी आंदोलन सुरू केले. कृष्णा विठू पाटील, बाबूराव पाटील, धोंडजी पाटील, ज्ञानू बुवा यांनी नानाला सहकार्य केले. या आगळया वेगळया आंदोलनाची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रभर झाली. दुधास दरवाढ मिळाली व शिधापत्रिकेवर समान वाटपाचे आश्वासन मिळाले.[३३२]

**सन १९४८ मध्ये भारतात अन्नधान्य तुटवडा :**

१९४८ मध्ये भारतात अन्नधान्याचा वणवा पेटला. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर होते. मोरारजी गृहमंत्री होते. शेतकऱ्यांनी पिकवलेले धान्य लेव्ही रूपाने घ्यायचे ते दर शेतकऱ्यांना परवडत नव्हते म्हणून शेतकरी व्यासपीठावरून त्यांनी आंदोलन केले. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळाले पाहिजेत. सौदेबाजी बंद करा. शेतीमालाच्या किमती व औद्योगिक मालाच्या किमती समतोल ठेवा अशी त्यांची मागणी होती.[३३३]

**नाशिकमधील इगतपूरी येथील भात लेव्ही :**

नाशिक जिल्हयातील इगतपूरी तालुक्यात भाताच्या दराबद्दल दर सरकारने बांधून दयावेत अशी मागणी होती. शेकापचे नेते विठ्ठलराच हांडे यांच्या नेतृत्वाखाली ही मागणी होती. पाच हजार शेतकरी या लढयात उतरले. काकासाहेब वाघ यांचा या लढयाला पाठिंबा होता. इगतपूरी लढा गाजला.[३३४]

**४.६.१२ नाना पाटील यांनी श्रमिकांच्या प्रश्नाला वाचा फोडली:**

नाना पाटील यांनी सर्व तालुक्यातून फिरून प्रचंड सभा घेतल्या. शेतकऱ्यांच्या कामगारांच्या प्रश्नाला वाचा फोडली. श्रमिकांच्या समस्या मांडून त्याला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. लोकांना नानांच्या सभेचे आकर्षण वाटे. महाराष्ट्रभर प्रचंड सभा घेतल्या.[३३५]

**क्रांतिसिंह नाना पाटील कॉम्रेड झाले :**

शेकापमुळे कॉंग्रेसपक्षाला महाराष्ट्रात उत्तम पर्याय झाला. जनतेच्या एकजुटीची एक भक्कम शक्ती निर्माण होऊ पहात होती. श्रमजीवी जनतेच्या लढयाला नवे सामर्थ्य प्राप्त होत होते. परंतु शेतकरी कामगार पक्षात एकजूट अभेद्य राहू शकली नाही. पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत बरेच मातब्बर कॉंग्रेस पक्षात गेले. नाना पाटीलांचे काही साथीदार कामगार किसान पक्षात गेले. कामगार किसान पक्षाने फारशी उभारी धरली नाही. या सर्व बाबींचा नानांनी विचार करून भारतीय राजकारणात कम्युनिस्ट पक्षच खऱ्या अर्थाने मार्क्सवादी भूमिका बजावू शकतो असे त्यांना वाटले म्हणून राजकारण पुढे रेटण्याचे सामर्थ्य फक्त कम्युनिस्ट पक्षात आहे असे वाटल्याने सन १९५३ मध्ये नाना पाटील कॉम्रेड झाले .[३३६]

**४.६.१३ क्रांतिसिंह नाना पाटील – संयुक्त महाराष्ट्र लढा :**

सन १९४६ पासून भाषावार प्रांतरचनेची मागणी होती. महाराष्ट्र मराठी भाषिकांचे वेगळे राज्य व्हावे अशी मागणी एकसारखी चालू होती. त्यावेळी नाना पाटील शेकापमध्ये होते. त्यांनी शेकापच्या माध्यमातून प्रचार चालविला होता. शेतकरी कामगार पक्षानेही या मागणीला अग्रक्रम देऊन जनमत संघटीत करण्याची जबाबदारी नाना पाटील यांच्यावर दिली होती. तसेच त्यांच्याबरोबर केशवराव जेधेही होते.[३३७] संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस प्रथमपासून कम्युनिस्ट पक्षाचा पाठिंबा होता. यामुळे नाना पाटील कम्युनिस्ट पक्षात गेले तरी या मागणी प्रचारात खंड पडला नाही. मोरारजीनी त्रिराज्य योजना संमतीसाठी १८ नोव्हें. १९५५ ला मुंबई विधानभवनात मांडली. त्याचे निषेधार्थ कामगारांनी २१ नोव्हें.१९५५ ला लाक्षणिक संप पुकारला. आंदोलकांनी बंदी हुकूम मोडला म्हणून पोलिसांनी मोर्चावर गोळीबार केला. त्यात १५ हुतात्मे झाले. नाना पाटलांनी या कृतीचा तीव्र निषेध केला.[३३८] महाराष्ट्र कॉंग्रेस नेत्यांची बैठक ९ डिसें. १९५५ रोजी मनमोहन राजवाडयात फलटण येथे झाली. यात यशवंतराव चव्हाण यांनी 'महाराष्ट्रापेक्षा नेहरूंचे नेतृत्व श्रेष्ठ' असे विधान केले. यशवंतरावांच्या या भूमिकेविषयी कोल्हापूर बिंदू चौकात नाना पाटील यांची सभा झाली. १६ जानेवारी १९५६ रोजी नाना पाटलांनी मुंबईतील कामगार मैदानावर सभा घेऊन संयुक्त महाराष्ट्रासाठी सरकारविरूध्द चळवळ करण्याचे आवाहन केले. संभाव्य आंदोलन दडपण्यासाठी १६ जानेवारीच्या पहाटे नाना पाटलांना अटक केली. १६ जानेवारी रोजी नेहरूंनी त्रिराज्य योजना मांडली. दिवसभर धरपकड चालूच होती. ३३५ लोकांची कच्च्या तुरूंगात भरती झाली. सर्वत्र धरपकडीचा निषेध झाला.[३३९]

**४.६.१४ नाना पाटील यांचे शेतकरी लढे :**

१९५२–५३ च्या दरम्यान विदर्भ व मराठवाडयात दुष्काळ पडला. दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत करण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी धनंजय गाडगीळ यांनी सर्वपक्षीय समिती नेमली होती. नाना पाटील या समितीत होते. नानानी महाराष्ट्रात झंझावती दौरे काढले. धान्य व पैसे रूपाने मदत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेतला. या परिसरात सरकारने पाझर तलाव काढावे, येथे कालवे काढून पाणीपुरवठा व्हावा, धरणाचे पाणी शेतीला पुरवावे असे उपाय सुचविले.[३४०] संस्थानिक, जहागिरदार, जमीनदार, पाटील, देशमुख यांच्याकडील जमीनी काढून जमिनीचे फेरवाटप झाले पाहिजे. हा क्रांतिकारक विचार क्रांतिसिंहानी दिला. त्यांच्या तळमळीमुळे त्यांना कम्युनिस्ट पक्षाने महाराष्ट्र किसान सभेचे अध्यक्ष केले.[३४१]

**फलटण शेतकरी खंडकरी लढा :**

सन १९५२ पर्यंतच्या सर्व खंडांच्या जमिनीचे करार संपुष्टात आले होते. त्यामुळे जमिनी मूळ मालकांना परत करणे किंवा खंड वाढवून देणे पैकी एक व्हायला हवे होते. परंतु कारखान्याच्या व्यवस्थापनाने तसे करण्यास नकार दिला. या अन्यायी बाबीसाठी शेतकऱ्यांनी आवाज उठवून आंदोलन केले. याचा अहवाल अध्यक्ष नाना यांचेकडे आला. नाना पाटील यांनी याबाबत आंदोलन केले. याकामी कॉ.हरिभाऊ निंबाळकर, कॉ.दादा ननावरे, कॉ. बाजीराव जगताप, कॉ.माधवराव गायकवाड, कॉ.काकाजी

कदम, कॉ.नारायणराव माने, कॉ.शेखकाका इत्यादीनी सहकार्य केले. तसेच सुलोचनादेवी निंबाळकर, बनुबाई भिलवडे, काशीबाई पाटील व विठाबाई पवार यांनी महिलांचे नेतृत्व केले. आंदोलने करून निदर्शने केली, सत्याग्रह केला. नाना पाटील व इतरांना फलटण भागात जाण्यास बंदी केली. बंदीहुकूम मोडून तेथे जाऊन लोकांना मार्गदर्शन केले. सरकारने नाना पाटील यांना पकडले आणि तुरूंगात टाकले. नानांच्या वतीने ॲड.व्ही.एन.पाटील यांनी सरकारचा बंदीहुकूम बेकायदेशीर ठरविला. शेवटी सरकारने नमते घेतले. १९६२–६३ या वर्षी शेतकऱ्याला एक एक एकर जमीन परत केली व जमिनीचा खंड रू.६ नी वाढवून दिला. शेतीमहामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला.[३४२]

**शेतीमालाला हमीभाव** :

शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे म्हणून शेतकऱ्याला जागृत करण्यासाठी नानांनी महाराष्ट्रभर प्रचारदौरे काढले. उत्पादकाने भाव ठरविला पाहिजे असे त्यांचे विचार होते. खर्चावर आधारीत योग्य भाव मिळण्यासाठी त्यांनी सर्वसमान्यांना संघटीत केले. हा मूलभूत प्रश्न भारतात प्रथम नानांनी धसाला लावला याची इतिहासात नोंद राहील.[३४३]

**धरणग्रस्तांचा लढा** :

सातारा जिल्हयातील कोयना जलविद्युत प्रकल्पात पाटण तालुक्यातील ९८ गावे व त्यातील ९०६९ खातेदार जमीन बाधित होते. सरकारने त्यांचे पुर्नवसनाचे वचन दिले पण शब्द सरकारने पाळला नाही. अनेक कुटुंबे देशोधडीला लागली. साधारणपणे ३०००० एवढया लोकांच्याकरिता नाना पाटलांनी आंदोलन सुरू केले. याकामी ॲड. व्ही.एन.पाटील व शेखकाका यांनी सहकार्य केले. या लोकांना सरकारने घरे, जमीन, रस्ते, वीज व जीवनावश्यक गोष्टी अग्रक्रमाने पुरवाव्यात. त्यांच्या शेतीला बारमाही पाणी देण्याची व्यवस्था व्हावी याचा त्यांनी आग्रह धरला. नानांनी महाराष्ट्रात धरणग्रस्तावर होणाऱ्या अन्यायाला प्रथम वाचा फोडण्याचे काम केले. शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाचे प्रश्न हाती घेऊन या साठी जन्मभर लढे दिले.[३४४]

**नाना पाटील परदेशी दौरा** :

नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी शिष्टमंडळांनी प्रदीर्घ दौरा केला. हा दौरा रशिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया इ. ठिकाणी करण्यात आला. या दौऱ्यात नाना पाटलांनी साम्यवादी देशांशी भारताचे संबंध अधिकच दृढ होण्यास मदत केली. या दौऱ्यात श्रमिकांचे राज्य जवळून पाहिले. या शिष्टमंडळांनी रशियातील सहकारी शेती, शेतकरी, मजूर यांची घरे पाहिली.

**४.६.१५ किसान सभेचे राष्ट्रीय अधिवेशन अमरावती** :

१० ते १२ जानेवारी १९६८ रोजी अमरावती येथे भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अधिवेशन भरले. या ठिकाणी नाना पाटील यांनी त्यांचे विचार व्यक्त केले. '' या देशात उत्पादनाची साधने ज्याच्या हातात आहेत तोच वर्ग सत्ताधीश आहे. शेतकऱ्यांच्या श्रमाची चोरी हा वर्ग करीत आलेला आहे. शेतकऱ्यांचे राज्य आल्याशिवाय राहणार नाही. परंतु यासाठी आपणाला संघर्ष करीत राहीले पाहिजे.''[३४५]

**राजकारणातून संन्यास** :

खासदारकीची मुदत संपल्यावर नाना पाटील पंढरपूर येथे पुरूषोत्तचार्य महाराजांच्या रामबाग मठात दाखल झाले. ते झाडपाल्याचे औषध मधुमेहावर देत असत. तेथे देव नामस्मरणात ते रहात होते. महाराष्ट्रातून त्यांची जोडलेली माणसे भेटायला येत. मनमुराद गप्पा मारत. राजकारणातून संन्यास घेतल्याने त्या विषयावर चर्चा करणे त्यांना आवडत नव्हते. ते म्हणायचे, '' नको तो विषय आता.' मी पूर्णपणे राजकारणातून अलिप्त झालो आहे.'' नानांची तब्बेत साथ देत नसल्याने राजकारणातून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला.[३४६] रामबाग आश्रमात नागनाथ नायकवडी, जी.डी.लाड, नाथाजी लाड, भगवानराव पाटील बप्पा , बॅ.पी.जी.पाटील इ.मंडळी त्यांना भेटत असत. क्रांतिसिंह पाटलांच्या गळयात तुळशीची माळ होती. क्रांतिसिंह आजन्म शाकाहारी होते.पंढरपूरला गेल्यावर ते विठ्ठलाच्या दर्शनालासुध्दा गेले असतील. ते अस्तिक होते.[३४७] त्यांच्या बिछान्याजवळ श्रीरामाची तसवीर होती. ते निष्ठावंत माळकरी होते. रा.तु.पाटील (तडसरचे पाटील मास्तर) स्वतः म्हणतात, '' मी स्वतः ४४ वर्षे त्यांचे जीवन जवळून पाहिले आहे. त्यांचे व माझे जिव्हाळयाचे संबंध होते. प्रवासालासुध्दा त्यांचेकडे पैसे नसायचे.''[३४८]

**निष्कर्ष व समारोप** :

नाना पाटील यांच्या व्यक्ती व कार्याचा समग्र अभ्यास केल्यावर असे लक्षात येईल की, आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्यांचे महान योगदान आहे. जन्म सर्वसामान्य कुटुंबात झालेल्या नानांनी सत्यशोधक चळवळ, १९४२ चा स्वातंत्र्य लढा, शेतकरी कामगार पक्ष, संयुक्त महाराष्ट्र चळवळ व कम्युनिस्ट पक्ष अशा विविध माध्यमातून राजकिय व सामाजिक चळवळी केल्या. सामान्य माणूस सुखी व्हावा, त्याच्या प्राथमिक गरजा पुऱ्या व्हाव्यात, त्यांचे जीवन सुखी व्हावे हा आशावाद त्यानी मनाशी धरला. तो साध्य करण्यासाठी तहहयात अनेक लढे दिले. अनेक चळवळी केल्या. अथक परिश्रम केले. अनेक वेळा त्यांनी पक्षांतर केले. परंतु आपली वैचारिक भूमिका कधीच सोडली नाही. सन १९४२ चे प्रतिसरकार, सातारा जिल्हयाने उभारलेला स्वातंत्र्यलढा, सातारा क्रांती म्हणून इतिहासात सुवर्णअक्षरांनी लिहावा लागेल. संसाराचे पाश तोडून जन्मभर त्यांनी देशकार्य केले. क्रांतिसिंहाना देशकार्याच्या व्यापातून कधीच स्वतः कडे लक्ष दयायला वेळच मिळाला नाही. महात्मा फुले व राजर्षी शाहू यांच्या विचारांचा त्यांचेवर प्रभाव होता. म.फुलेप्रमाणे ते 'आधि केले मग सांगितले' असे होते. स्वतः चा विवाहसुध्दा त्यांनी सत्यशोधकी पध्दतीने केला. आपल्या गंगुबाई बहिणीचा विवाह केवळ ९ रूपयात केला.

सन १९३० पासून तलाठयाची नोकरी सोडून गांधी विचाराने नाना पाटील कार्यरत राहिले. तरीसुध्दा गांधीजींचा अहिंसावादी मार्ग नाना पाटील यांना पूर्णपणे मान्य नव्हता. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा प्रतिसरकारची स्थापना केली. ग्रामराज्याची संकल्पना इ. ऐतिहासिक घटना समाजापुढे ठेवल्या. न्यायदान कमिटींच्या माध्यमातून गरीब, नडलेल्या शेतकऱ्यावरील अन्याय दूर केला. खादीचा वापर, विदेशी बहिष्कार, ग्रामसफाई, खादीचा प्रसार, दारूबंदी, जुगारबंदी, गांधीलग्न, हुंडाबंदी, अल्प दरात कर्जपुरवठा व

अस्पृश्यता निवारण इ.बाबी त्यांनी राबविल्या. जुलमी जमीनदार पोलीसांचे खबरे, गावगुंड, दरोडेखोर यांचा बंदोबस्त केला. प्रतिसरकारचा कारभार जसा प्रश्न तसे उत्तर या न्यायानी चालविला. प्रतिसरकार चळवळी लोकांच्या पाठिंब्यावर चालणारी लोकचळवळ होती. गांधीहत्येनंतर नानांना ब्राहमणव्द्वेष्टे म्हणून काहींनी हिणवले. परंतु वस्तुस्थिती तशी नव्हती.

स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले. शेतीमालाला भाव मिळावा, खंडकरी शेतकऱ्यांना न्याय मिळावा, धरणग्रस्तांचे योग्य पुर्नवसन व्हावे यासाठी संघर्ष केला. स्वातंत्र्यपूर्व चळवळीत देश स्वतंत्र व्हावा याकरिता व स्वातंत्र्योत्तर काळात कष्टकऱ्यांच्या, गोरगरीबांच्या न्यायी हक्कासाठी नाना पाटील यांनी अखंड काम केले. त्यांचे सहवासात असणारे तडसरचे रा.तु.पाटील व शिवणीचे राघव त्यांना एक स्वयंभू ग्रामीण क्रांतीकारक म्हणतात. कुठल्या तत्वज्ञानाच्या पुस्तकात त्यांनी वाचून तत्वप्रणाली अमलात आणली नाही किंवा विद्यापीठाच्या मोठया अभ्यासातून त्या मिळविल्या नाही. सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी संघर्ष करण्याचा त्यांचा स्थायी भाव होता. त्यांचे व्यक्तीत्व बहुआयामी होते. रा.तु.पाटील त्यांचे ग्रंथात म्हणतात, '' नाना पाटील आभाळाएवढा.''

**वृत्तपत्रे श्रध्दांजली :**

दि.८.१२.१९७६ रोजी दै.महाराष्ट्र टाईम्सने नाना पाटील एक झंझावात योध्दा व सिंहासारखा होता. या योध्दयानी स्वातंत्र्यसंग्रामात केलेल्या पराक्रमाचा विसर आम्हा महाराष्ट्रीयांना पडणार नाही. या झुंझार योध्दयाला आदरांजली. ८ डिसें. १९७६ चे केसरीने क्रांतिसिंहाचे कृतार्थ जीवन असे यथार्थ वर्णन केले आहे. दै.सकाळने क्रांतिसिंह एक खंदा वीर म्हटले आहे. त्यांची 'साधी रहाणी साधी भाषा' हे त्यांचे जीवनसूत्र होते. दै.प्रभात पुणे यांनी नाना पाटील क्रांतीचे सेनानी व शांतीचे पूजक होते असे वर्णन केले आहे.

**४.७ राजकीय व सामाजिक नेतृत्व : प्रा.डॉ.एन.डी.पाटील**

**प्रास्ताविक :**

प्रा.डॉ.भाई एन.डी.पाटील यांच्या जीवनाचा 'संघर्ष' हाच अविभाज्य घटक होऊन राहिलेला आहे. शेतकरी कामगार पक्षाचे ते जेष्ठ नेते आहेत. अठरा वर्षे विधानपरिषद व पाच वर्षे विधानसभेचे सदस्य होते. इ.स. १९७८ मध्ये पुलोद सरकारमध्ये कृषि व सहकार मंत्री होते. कापूस एकाधिकार खरेदी योजनेचे ते खंदे पुस्करर्ते होते. रयत शिक्षण संस्थेचे वीस वर्षे चेअरमन होते. आजही सेझविरोधी व शेती, वीज प्रश्नी अविरतपणे लढा देणारे झुंजार नेते आहेत.[३४९]

**४.७.१ डॉ. एन.डी.पाटील: शिक्षण**

नारायण ज्ञानदेव पाटील यांचा जन्म १५ जुलै १९२९रोजी ढवळी जि.सांगली येथे अशिक्षित शेतकरी कुटुंबात झाला. ते राजाराम कॉलेज, कोल्हापूरमधून बी.ए.झाले व विलिंग्डन कॉलेजमधून एम.ए. झाले. सन १९५४–५७ या कालखंडात छ.शिवाजी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रूजू झाले.[३५०]

**कष्टकरी जनतेचे तत्वनिष्ठेचे बीज:**

डॉ. एन.डी.पाटील सर कष्टकरी जनतेचे लढावू नेते आहेत. ते डाव्या आघाडीचे नेते आहेत. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आहेत. शिक्षणतज्ञ आहेत, पुरोगामी विचारवंत आहेत. महाराष्ट्रातील परिवर्तनवादी सामाजिक व प्रबोधनाच्या चळवळीत काम करणाऱ्या अनेक संस्था संघटनेचे ते आधार आहेत.[३५१] काम करताना कितीही वाईट परिस्थिती आली तरी आपण तत्वनिष्ठेने सुरू केलेले काम सोडता कामा नये. आम्ही तत्वनिष्ठेचे बीज जतन करून ठेवण्याचे काम करतो. जमिनीला जशी घात येईल जसा वाफसा येतो तेव्हा हे तत्वनिष्ठेचे बीज पेरता येईल.[३५२]

**४.७.२ प्रा.डॉ. एन.डी.पाटील यांचे रयत संस्थेतील योगदान** :

प्रा.डॉ. एन.डी.पाटील रयत शिक्षण संस्थेचे विद्यार्थी, प्राध्यापक, वसतिगृहाचे रेक्टर, छ.शिवाजी कॉलेजमधील 'कमवा व शिका' या योजनेचे प्रमुख होते. पुढे ते मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य झाले. श्री.छत्रपती शिवाजी कॉलेजमधील 'कमवा व शिका' या प्रकल्पाचे प्रा.डॉ. एन.डी.पाटील सूत्रधार म्हणून अण्णांनी त्यांची निवड केली.[३५३] स्वावलंबी शिक्षण योजना हे शिवाजी कॉलेजचे ठळक वैशिष्टय आहे. बॅरिस्टर पी.जी.पाटील या योजनेसंदर्भात म्हणतात, ''परमपूज्य अण्णांनी श्री.छत्रपती शिवाजी कॉलेजची स्थापना करताना या महाविद्यालयाचे विद्यार्थी आर्थिकदृष्टया गरीब व खेडयापाडयातील शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा असणारेच असू शकतील.'' अशी घोषणा केली होती.[३५४]

प्रा.डॉ. एन.डी.पाटील यांनी दि.१० मे २००८ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमन पदाची सूत्रे खाली ठेवली. त्यावेळी एन.डी.पाटील यांनी त्यांचे विचार व्यक्त केले त्यानुसार ५ मे १९५९ रोजी प्रा.डॉ. एन.डी.पाटील ससून रूग्णालयात अण्णांना भेटले त्यांनी ६ मे १९५९ रोजी संस्थेला पत्र लिहिले की नारायणला संस्थेचा सदस्य म्हणून घ्यावे. त्यानंतर ९ मे १९५९ रोजी कर्मवीरांचे निधन झाले. अण्णांच्या इच्छेप्रमाणे प्रा.एन.डी.पाटील रयत शिक्षण संस्थेचा घटक झाले. ९ मे १९५९ पासून १० मे २००८ या कालावधीत जे काम केले ते स्वच्छ केले कोणालाही बोट दाखवायला हिंम्मत होणार नाही.[३५५]

**४.७.३ प्रा.डॉ. एन.डी.पाटील चेअरमन झाले:**

रयत शिक्षण संस्था ही कर्मवीर अण्णांनी बहुजन समाजाच्या उद्धाराकरीता विकासाकरीता स्थापन केली. संस्था अण्णांनी घालून दिलेल्या विचारावर चालली पाहिजे. संस्था वाढली पाहिजे. म्हणून एन.डी.सर अहोरात्र कष्ट करीत असतात. संस्थेने जो विकास केला आहे त्यामध्ये एन.डी.साहेबांचा फार मोठा वाटा आहे. संस्थेच्या कामानिमित्ताने फिरत असताना देणग्या गोळा करीत असताना प्रा.डॉ. एन.डी.पाटील यांनी स्वतः चे हित कधीच पाहिले नाही.[३५६] सामान्यांचा उद्धार व संस्थेचे हित याकडे त्यांनी कधीच दुर्लक्ष केले नाही. संस्थेचे चेअरमन शंकरराव देवराम काळे यांचे निधन झाल्याने दि.२३-६-१९९० रोजी प्रा.डॉ. एन.डी.पाटील संस्थेचे चेअरमन झाले. त्यांच्या कालखंडात संस्थेची काही धोरणे ठरविली. चेअरमन म्हणून सूत्रे हातात घेतल्यावर संस्थेतील प्रादेशिक वाद व विभाजनवादी वृत्ती त्यांनी मोडून संस्थेतील एकसंघता

मजबूत केली.[३५७]

**रयत शिक्षण संस्था – सामाजिक शैक्षणिक चळवळ:**

रयतेच्या शिक्षणातून महाराष्ट्र घडला. महाराष्ट्रात जातीय दंगली कमी होतात याचे कारण ग्रामीण भागातील रयतेच्या शाळा, सामाजिक शांतता व सामंजस्य वाढविण्याचे काम रयत शिक्षण संस्थेने केले. सामाजिक चळवळीत रयतेचे मोठे योगदान आहे. एक मोठी पिढी घडविण्याचे काम रयतेने केले. तळागाळातील श्रमिक, दलित, स्त्री, शूद्र रयतेने केंद्रस्थानी आणले. धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, अन्यायाची चीड या मूलगामी विचाराचे संस्कार विद्यार्थ्यात घडविले. संस्कारातून भक्कम डावी चळवळ उभी केली.[३५८]

**४.७.४ स्त्रिया, श्रमिक, दलित यांच्या शिक्षणाला अग्रक्रम:**

स्त्रिया व श्रमिक दलित यांच्या शिक्षणाला अग्रक्रम देण्याचे कर्मवीरअण्णांचे तत्त्व प्रा.डॉ. एन.डी.पाटील यांनी सुद्धा त्यांच्या काळात पुरेपूर वापरले. तसेच डोंगराळ, दुर्गम भागातील आदिवासी इ.मुलामुलींना अधिक प्राधान्य. पनवेल, ठाणे, मोखाडा या भागातून आठ आश्रमशाळा उघडल्या.[३५९] नापासांची शाळा व साखर शाळा:– नापास व गरीब दलितांकरीता त्यांची पुन्हा तयारी करून घेण्यासाठी नापासांची शाळा उघडली. साखर कारखाना परिसरात साखर शाळा उघडल्या.

**४.७.४ प्रा.डॉ. एन.डी.पाटील रयत शिक्षण संस्थेचे 'संरक्षक कवच'** :

आजकाल शिक्षण संस्थेत वेगवेगळया पातळयांवर राजकीय नेते, मतलबी लोक, धनाढय लोक, सहेतूक देणगीदार, संधीसाधू, वशिलेखोर, संस्थेच्या विविध पातळीवर येण्याचा प्रयत्न करतात. यातूनच पुढे गैरसमज होतो. बऱ्याच मंडळींचा शिरकाव होण्याचा प्रयत्न झाला परंतु प्रा.डॉ.एन.डी.पाटील चेअरमन पदावर असेपर्यंत कुणाचाही गैरवाजवी हस्तक्षेप व ढवळाढवळ चालू दिली नाही.[३६०]

**प्रा.डॉ.एन.डी.पाटील 'कृतज्ञता संकल्पना'** :

संस्थेत कृतज्ञता निधी ची संकल्पना एन.डी.सरांनी मांडली व तिची सत्वर कार्यवाही सुरू केली.

**कृतज्ञता निधी संकल्पना पाठीमागील भूमिका** :

ज्याचे रयत शिक्षण संस्थेत शिक्षण झाले अशा अनेकांना संस्थेत नोकरी लागली. रयत शिक्षण संस्थेत शिकून स्वतःच्या जीवनात त्यांनी स्थिरता मिळवली. संस्थेमुळे चांगले संस्कार होऊन त्यांचे जीवन सुखी झाले, संपन्न झाले. या पार्श्वभूमीवर ही संस्था वाढावी आपल्याप्रमाणे अनेक दुर्बलांना संस्थेचा आधार मिळावा. संस्थेला अनेक विकास योजना राबविता याव्यात व संस्था आर्थिक सबल व्हावी म्हणून संस्थेतील सेवकांनी रयत शिक्षण मातृसंस्थेबद्दल कृतज्ञता निधी म्हणून वेतनाच्या १ टक्के रक्कम संस्थेला कृतज्ञता निधी म्हणून दयावी असे आवाहन करून सर्वांना कृतज्ञता निधी दयावा असे सांगितले. परंतु कोणाही सेवकाला सक्ती केली नाही. या योजनेस सेवकांचेकडून चांगला प्रतिसाद मिळाला.[३६१]

**४.७.५ प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचे रचनात्मक कार्य** :

**अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ** : आचार्य शांताराम गरूड म्हणतात महाराष्ट्रात दोनच खऱ्या अर्थाने पुरोगामी आहेत एक डॉ.एन.डी.पाटील सर व दुसरे शांताराम गरूड यांनी कपाळाला गंध, शेंदूर, गुलाल, भंडारा, कधीच लावून घेत नाही. आत्मविश्वासाचा अभाव असला की माणूस अंधश्रध्देच्या कुबडयांचा आधार घेतो.

**अंधश्रध्दा ही शोषण व्यवस्था आहे** :

केवळ माणूस पुस्तकी शिकला म्हणजे तो शिकला नव्हे. मंतरलेले पाणी देणारे, तपोबलाने पुत्रप्राप्ती देणारे महाराज. राज्यपाल पाऊस पडण्यासाठी सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी सामुदायिक प्रार्थना करायला परिपत्रक काढतात, गुप्तधनासाठी नरबळी दिला जातो, पुत्रप्राप्तीसाठी मुलगा, मुलगी यांचा बळी देण्याची प्रथा, मांत्रिक वा चेटकीण समजून स्त्रीची धिंड काढली जाते, अंधश्रध्देतून देवदासी सोडल्या जातात.[३६२]

**४.७.६ प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचा अंधश्रध्देविरूध्द एल्गार** :

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अमावस्येच्या दिवशी बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते छ.शिवाजी कॉलेजच्या इमारतीचा पायाभरणी समारंभ पार पडला. त्यावेळी कर्मवीर म्हणाले, '' ज्याक्षणी मी कामाला सुरवात करतोय ती वेळ शुभच असते.''[३६३] प्रा.डॉ.एन.डी.पाटील अंधश्रध्दा निर्मूलनाच्या चळवळीत एकरूप झालेले त्यांनी आपल्या कृतीशील वर्तमानातून व परखड प्रबोधनातून या चळवळीला दिशा दिली. ते कणखर स्वभावाचे असल्याने वृत्तीत बंडखोर असल्याने अंधश्रध्दा चळवळीचे आधारस्तंभ ठरले. त्यांच्यामुळे चळवळीला चांगले बळ मिळाले. एन.डी.सरांचे व्यक्तीगत जीवनात अंधश्रध्देला मुळीच स्थान नाही. ना कुठल्या मंदिरात प्रवेश, ना नवस, ना देवपूजा, ना भूमिपूजन, ना कुठले कर्मकांड.

एकदा इमारतीचा पायाखुदाईचेवेळी त्यांना भूमिपूजन करायला सांगितले तर त्यांनी नम्रपणे नकार दिला. '' गडी, गवंडी, मजूराशिवाय दगड, विटा व सिमेंटविना भूमिपूजनाने इमारत उभी होणार असेल तर भूमिपूजन मी स्विकारीन.''[३६४] कोल्हापूर चौकातील होळी पेटविण्याचा प्रसंग सर्वश्रुत आहे. चौकात तोबा गर्दी . उत्साही कार्यकर्त्यांनी त्यांना विनंती केली. डॉ.एन.डी.पाटील साहेब म्हणाले, '' मी होळी पेटविणार नाही ते माझ्या तत्वात बसत नाही.'' अंधश्रध्देवर घाव घालताना ते मुळीच भाडभीड ठेवत नाहीत. इचलकरंजी अनिसच्या मेळाव्यात प्रबोधन केले. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात. गाईचे शेपूट लोक तोंडावरून फिरवतात. गाईचे पुढून व पाठीमागून दर्शन घेतात.[३६५] समाजातील या अंधश्रध्दा निर्मूलनाकरिता त्यांनी प्रबोधन केले. अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे प्रणेते डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी महाराष्ट्रातल्या समाजसुधारकांच्या विचाराचा वारसा चालविला आहे. म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा कृतीयुक्त चालविला.[३६६] जातीव्यवस्थेवर डॉ.एन.डी.पाटील घाव घालताना निषाद पारधी जातीतील आदिवासी नेमबाज एकलव्याचा अंगठा मागणाऱ्या द्रोणाचार्याला उपहासाचा विषय बनवतील. चार्तुर्वण्याच्या अन्यायाचे वाभाडे काढतील. शंकराचार्याचे दर्शन घेणाऱ्या इंदिरा गांधी त्यांच्या टिकेचा विषय होतात. संत

गाडगे महाराज बुवाबाजीवर घाव घालतात. सव्वा रूपया दक्षिणा सत्यनारायणाला घालण्याने साधुवाण्याची नाव येते हा विषय हास्यास्पद.[३६७]

**४.७.८ कर्मवीरांचा विश्वास डॉ.एन.डी.पाटील सरांनी सार्थ ठरविला :**

रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदाची सूत्रे डॉ.एन.डी.पाटील यांनी दि.१० मे २००८ रोजी खाली ठेवली. या प्रसंगी त्यांनी त्यांचे विचार व्यक्त केले, ''रयत शिक्षण संस्था गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी व स्वच्छ व्यवहाराचा ठसा उमटवणारी इतर शैक्षणिक संस्थेपेक्षा वेगळी संस्था आहे. डॉ.एन.डी.पाटील सर अण्णांनी पत्राने व्यक्त केलेल्या इच्छेनुसार संस्थेचे घटक झाले.[३६८] राजकारणात टकरा खाण्याची उर्मी होती. कुठलीच अपेक्षा न करता काम करत राहिलो. सामाजिक जीवनात मात्र कोणाची त्यांच्याकडे बोट दाखवायला हिंमत होणार नाही एवढे स्वच्छपणे जगले.'' असे ते म्हणतात.[३६९] प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचा आशावाद व त्यांचा काम करण्याचा आवाका फारच मोठा आहे. अशी जगात दुर्मिळ उदाहरणे आहेत. ही बांधीलकी त्यांच्याकडे कोठून आली याचे उत्तर देताना ते म्हणतात, ''या बांधिलकीत कर्मवीर अण्णांना महत्वाचा वाटा आहे. आम्हाला जे मिळालं ते चांगलं मिळालं. कर्मवीर अण्णा आमचे गुरू आहेत.

**४.७.९ सामाजिक कार्याचे फलित:**

प्रा.डॉ.एन.डी.पाटील कर्मवीर अण्णांच्या कार्याचे नेमके फलित सांगतात, '' इ.स.१८८५ मध्ये पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली. स्थापनेनंतर दोन वर्षानी अण्णांना जन्म झाला. त्यानंतर २० ते २२ वर्षांनी अण्णा शैक्षणिक कार्यात उतरले. त्यांनी शैक्षणिक कार्याची सुरूवात सातारमध्ये महाविद्यालय उघडून केली नाही. त्यांनी आपल्या कामाची सुरूवात अठरापगड जातीच्या मुलांच्यासाठी एकच वसतिगृह यावरून अण्णांच्या कार्याचे फलित लक्षात येईल. कर्मवीरअण्णांच्या समोर समाजाच्या कोणत्या वर्गाचे शिक्षण अपेक्षित होते हे स्पष्ट होते.''[३७०] मधुकरराव चौधरी महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री असताना त्यांनी शिक्षणाविषयक श्वेतपत्रिकेतून शासनाचे शैक्षणिक धोरण जाहीर केले. हे धोरण कष्टकरी ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणारे होते. या शैक्षणिक धोरणाविरोधी 'श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप' या नावाची पुस्तिका लिहली व शैक्षणिक धोरणाची लक्तरे वेशीवर टांगली.[३७१]

**४.७.१० प्रा.डॉ.एन.डी.पाटीलांचे लढे :**

**१.चलो नागपूर लढा १७ नोव्हें. ते ४ डिसें.१९८८ :**

विदर्भातील शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी वाट चाललेली दिंडी. ही दिंडी १७ नोव्हें. ते ४ डिसें.१९८८ पायी चालत वाटचाल.[३७२] मागण्या: १.शेतीमालाला योग्य भाव दया.२.शेतकऱ्यांच्या नावावरील सर्व कर्जे रद्द करा. ३. रोजगार हमी योजनेची काटेकोर अंमलबजावणी करा. ४. शेतमजूरांना निवाऱ्यांची हमी दया. ५.शेतकरी व शेतमजूरांना पेन्शन सुरू करा ६. कामगारविरोधी काळे विधेयक मागे घ्या. ७. महागाईला आळा घाला. भ्रष्टाचार निपटून काढा. ८. बेकारांना बेकारभत्ता रू.५०० दया. ९.मंडल आयोग लागू करा. १०.ओला दुष्काळ जाहीर करा.

**२.१९७२ चा दुष्काळग्रस्तांचा लढा :**

१९७१–७२ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. सरकारचे दुर्लक्ष होते. दुष्काळाची तिव्रता फारच मोठी होती. महाराष्ट्रातील २९ जिल्हयापैकी २५ जिल्हयात मोठा दुष्काळ. पुणे, सातारा, सांगली, बीड, सोलापूर, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर, उस्मानाबाद या जिल्हयात स्थिती फारच बिकट होती. १९ आक्टोंबर १९७२ शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने विराट मोर्चा काढला. या विराट मोर्चावर पोलिसांनी अमानुषपणे गोळीबार केला. यात चार हुतात्मे झाले. पूरा महाराष्ट्र हादरला. गोळीबारांची न्यायालयीन चौकशी झाली. न्यायमूर्तीने 'मोर्च्याच्या मागण्या रास्त होत्या, उचित होत्या, मोर्चा समर्थनीय होता. पोलिसांनी केलेला गोळीबार वाजवीपेक्षा अधिक होता असे निष्कर्ष काढले. १९७२ चा दुष्काळचा लढा महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य शोषित, वंचित व दीनदुबळया शेतकऱ्यांच्या संघर्षाचा आदर्श वस्तुपाठ होता.[३७३] मोर्चाचेवेळी एन.डी.पाटील यांच्यावर लाठीहल्ला झाला. दुपारी ३.३० वाजता अटक झाली. एन.डी सरांना बदनाम करण्याचा त्यांचा कुटिल डाव होता. एन.डी यांना पूर्ण संपविण्याचा राजकीय डाव होता.[३७४] शासनाचा हा कुटिल डाव त्यांनी उधळून लावला. हुतात्म्यांच्या वारसांना वाऱ्यावर न सोडता डॉ.एन.डी.पाटील यांनी पुढाकार घेऊन स्वत:च्या कमाईतून पेन्शन योजना सुरू केली. एक सामाजिक बांधीलकीचा नवा पायंडा घातला.[३७५]

**३.वैराग :**

सोलापूर जिल्हयातील बार्शी नजीकचे वैराग दुष्काळाचे माहेरघर. दाद मागण्यासाठी शेतकऱ्यांचा विराट मोर्चा बार्शीच्या मामलेदार कचेरीवर काढण्यात आला. सोलापूर जिल्हा शेकापने दुष्काळग्रस्तांच्या मागण्या मांडल्या. सांगोला, पंढरपूर, माढा, मोहोळ येथे मोर्चे काढले. शासनाने वैरागला काडेकोट बंदोबस्त ठेवला होता. १४४ कलम जारी केले होते. या मोर्चात २००० स्त्रिया होत्या. एन.डी.पाटील सर वैरागच्या गोळीबाराला 'जालियनवाला बाग' हत्याकांडाची पुनरावृत्ती म्हणतात.[३७६]

**४.मोर्चे, धरणे :**

इस्लामपूरचे पहिले आंदोलन, महागाई व बेकारीविरूध्द केले. त्यापाठोपाठ ८ ऑक्टोंबरला एस.टी.ने केलेल्या भाववाढीविरूध्द एस.टी.बसस्थानकावर 'चक्का जाम' आंदोलन केले. दिवसभरात एकही बस बाहेर पडू दिली नाही. तिसरे धरणे आंदोलन १३ ऑक्टोंबरला मामलेदार कचेरीला २४ तासांचा घेराव घातला. या लढयासाठी भाई एन.डी.पाटील यांनी जुनेखेड, नवेखेड, तांदूळवाडी, ऐतवडे, वाळवे, कामेरी, गोटखिंडी येथे सभा घेतल्या.

मागण्या : १.वाळवा तालुका टंचाईची स्थिती जाहीर करा., २.मागेल त्याला काम दया., ३.दुष्काळग्रस्त मजूराला ४ रू. हजेरी मिळाली पाहिजे., ४.दुष्काळी कामगारांना आवश्यक शेती अवजारे मिळाली पाहिजेत., ५. स्त्रीपुरूषांना समान कामासाठी समान वेतन मिळाले पाहिजे., ६.कडबा तगाई तातडीने मिळाली पाहिजे., ७. शेतसारा कर्जेवसुलीस तहकूब झाली पाहिजे., ८. कोरडया विहीरीतील किमान वीजबील माफ झाले

पाहिजे., ९. इस्लामपुर खडी तलाव, हत्तीतलाव, लहानमोठे बंधारे कामकाज सुरू करा., १०.खुजगाव धरण झाले पाहिजे., ११. जीवनावश्यक वस्तूंचे दर खाली आले पाहिजेत., १२. दुष्काळग्रस्त विद्यार्थ्याला ५० रू. भोजनभत्ता मिळाला पाहिजे.[३७७] में १९६७ ते डिसेंबर १९७२ अखेर साडेचार वर्षात महाराष्ट्र शासनाने २०५ वेळा गोळीबार केला. त्यात ५११ लोक जखमी व १५३ लोक ठार झाले.[३७८]

**पाटकर आयोग :**

मोर्चाच्या वेळी झालेल्या अतिरेकींची चौकशीकरिता न्यायमूर्ती पाटकर यांचे अध्यक्षतेखाली आयोग नेमला. 'बंदीरेषा ओलांडणे' हा मुद्दा सरकारी पक्षाचे सोयीचा होता. वकिल व्ही.एन.पाटील यांनी आपण बंदीरेषा ओलांडली हे नाकारायचे. परंतु एन.डी.सर म्हणाले 'असत्य बोलणे एन.डीचे रक्तात नाही.'[३७९] पाटकर आयोग मोर्चात केलेल्या १३ मागण्यापैकी १० मागण्या योग्य होत्या. मागणी ९ खुजगाव धरण व मागनी १० पाझर तलाव या मागण्या संबंधित कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात नव्हत्या. क्रमांक १२ दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना रू.५० भोजनभत्ता दयावा ही मागणी १०० टक्के योग्य परंतु त्याबाबतची आकडेवारी व साक्षीदार सादर केले नाहीत. थोडक्यात सर्वच मागण्या पाटकर आयोगाने पूर्णतः योग्य असल्याचे सांगितले.

**एन्रॉन हटाव मोर्चा :**

'एन्रॉन' तरी राहील नाहीतरी महाराष्ट्र तरी' प्रा.एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा लढा लढविला. एकूण २८८ आमदारांच्यापैकी २८० विरूध्द ८ असा विषम लढा. ते विरोधी आठ शेकापचे ५, मार्क्सवादी कम्युनिस्टचे २, जनता दलाचा १ असे ८ होते. २८० आमदार एन्रॉनच्या बाजूने होते. प्रा.एन.डी.पाटील सरांनी एन्रॉनचा हिडीस व विद्रुप चेहरा प्रकाशात आणला.[३८०]

**साखर कारखानदारांची वाटमारी व शेतकरी आंदोलन :**

कर्मवीर भाऊराव पाटीलांचेकडे पद्मश्री विखे पाटील आले व म्हणाले मला तुमच्या शैक्षणिक क्षेत्रात काम करायचे आहे. शेतकऱ्यांचे उद्धारासाठी सहकारी चळवळ असे कर्मवीर अण्णांचे म्हणणे होते. शेतकऱ्यांना लुटणारे साखर कारखाने मातीत गेले पाहिजेत.[३८१] असे परखड विचार प्रा.एन.डी.पाटील हुतात्मा स्मृतिदिनानिमित्त बोलताना काढले. साखर कारखाना हा राजकारणाचा अड्डा आहे. याला सत्ताधारी जबाबदार आहेत.[३८२]

**वीज दरवाढ आंदोलन:**

वीजदर आंदोलनात शेतकऱ्यांनी संघटित व्हावे. तसेच साखर कारखान्यांनी ऊसाला योग्य भाव दयावा अशी मागणी शेकाप चे सरचिटणीस प्रा. एन.डी.पाटील यांनी १९ आक्टो, १९७२ रोजी हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यात केली.[३८३]

**दि.२७ आक्टोबर रोजी धरणे आंदोलन:**

ऊसाला १५०० रू.पहिली उचल दयावी. राज्यबंदी उठवावी या मागणीसाठी कोल्हापूर येथे साखर उपसंचालकाच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा मेळाव्यात निर्णय झाला. शेतकऱ्यांची चळवळ

संघटित सामर्थ्य संपन्न आणि धारदार करण्याचे काम एन.डी.पाटील सरांनी केले. साखर कारखानदारांची एकाधिकारशाही मोडून काढणे. भागधारक शेतकऱ्याला निर्भय करण्याचे काम त्यांनी केले. त्यांनी भवानीनगर, ताकारी, बिचूत, बहे, रेठरे हरणाक्ष, तांबवे, येडेमच्छिंद्र, शिरटे, येडेनिपाणी, कोरेगाव, ढवळी, नेर्ले, खेड, रेठरे बुद्रुक इ. कृष्णा सहकारी कारखाना व राजाराम बापू सहकारी साखर कारखाना यांच्या कार्यक्षेत्र परिसरात सभा घेतल्या.[३८४]

**सहकारी मंत्री ना.एन.डी.पाटील यांचा कायदयाचा बडगा:**

ते सहकारमंत्री असताना त्यांनी सहकारसम्राटांना कायदयाचा बडगा दाखवत बेकायदेशीर कपाती कायदयाने बंद केल्या.

**भूविकास बँकेवर धडक मोर्चा:** कवठे एकंद, बहादूरवाडी, कोरेगाव, गोटखिंडी, आष्टा इत्यादी गावच्या ६००० शेतकऱ्यांनी जिल्हा भूविकास बँकेवर धडक मोर्चा काढला. कवठे एकंद या गावाने संपूर्ण गाव बंद ठेवले.[३८५]

**४.७.११ संयुक्त महाराष्ट्राचा लोकलढा:**

सीमाप्रश्नी प्रारंभापासून आजअखेर असणारे नेते म्हणजे प्रा. एन.डी.पाटील या लढयात बांधिलकी स्वीकारून हा लढा जीवंत ठेवण्याचे काम शेकाप पक्षाने केले. प्रा. एन.डी.पाटील यांचा लढयात अखंड सहभाग आहे. रस्त्यावर, तुरूंगात, कोर्टात जिथे गरज पडेल तिथे त्यांनी हा प्रश्न धसाला लावला. बेळगावला सीमाभाषिकांच्या वेदनांना वाचा फोडण्यासाठी धर्मवीर संभाजी चौकातून मराठी भाषिकांचा विराट मार्चा काढला. डाव्या चळवळीतील कायकर्ते धनाजी गुरव म्हणतात, ''खानदेश, मराठवाडा, विदर्भ, कोकण, आदिवासी भाग येथील सर्व आघाडया जीवंत ठेवणारा लढावू नेता म्हणजे प्रा. एन.डी.पाटील होय.'' कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव यांनी प्रा. एन.डी.पाटील यांचा गौरव केला, ''प्रा. एन.डी.पाटील यांनी शेतकरी शेतमजूरांच्या प्रश्नावर उभारलेल्या लढयातून सामान्य माणसाला न्याय मिळवून दिला.''[३८६] डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमीच्या वतीने आयोजित केलेल्या अमृत महोत्सवानिमित्ताने सत्काराला उत्तर देताना शेतकऱ्यांनी संघर्ष करावा असे सांगितले.[३८७]

**४.७.१२ सेझ – प्रा. एन.डी.पाटील यांचा लढा:**

भारतात बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या त्यापाठोपाठ आर्थिक क्षेत्र असणारा सेझही धडकला. अटलबिहारींनी २००० मध्ये सेझ कल्पना मांडली. सन २००५ मध्ये मनमोहन सिंगांनी तेच धोरण अवलंबिले. यामुळे देशात ही सेझ नावाची विदेशी भूमी निर्माण झाली. भारतात ६५ टक्के शेतीवर जगतात. व फक्त २.४ टक्के लोक उद्योगावर जगतात. रायगड जिल्हयातील ४५ गावातील ३५००० एकर जमीन अंबानींच्या रिलायन्ससाठी सरकारने दिली. त्यापूर्वी अंबानींनी जिल्हयाच्या २५ टक्के भागावर कबजा केलेला होता. या जमीनीची पातळी सागराच्या पातळी पेक्षा ६ फूट खाली होती. अंबानींच्या १४००० एकर जमीनीत भराव घालण्यासाठी रायगडचे डोंगरच्या डोंगर फस्त झाले. यामुळे गावच्या गावे पाण्याखाली जाण्याची भिती निर्माण झाली. या कारणासाठी २२ गावातील जमिनी अंबानींना देण्यास रोहयो व पाठबंधारे खात्याने विरोध

केला.[३८८] सेझला सर्व शुल्क माफ होते. स्टँपडयुटी नाही, रजिस्ट्रेशन फी नाही, पाणी, वीजबील वसूली नाही, १० वर्षे आयकर नाही, कस्टम डयुटीत सवलत, आयात निर्यात परवाना गरज नाही. सेझची सालवार देशातील संख्या – सन १९९६ ला जगात ४७ देशात १७३ सेझ कार्यरत होते. सन २००३ ला जगात ११६ देशात ३००० सेझ संख्या झाली. आज १२० देशात ४००० सेझ संख्या आहे. जमीन बळकविण्याचे सत्र सुरू झाले. रायगडमध्ये महिंद्राने ताब्यात घेतलेल्या जमीनीत १५ वर्षांपूर्वी धरण बांधले आहे. परंतु कालवे नाहीत कारण हे पाणी शेतीला मिळाले तर जमीनी बागायती होणार त्यामुळे सेझ ती ताब्यात घेऊ शकणार नाही. आमदार रवी पाटील यांनी शेतकऱ्यांची तर बाजू घेतली नाही उलट म्हणाले, '' जमिनी द्यायला संमती दया.''[३८९]

**सेझ बाधित सामुदायिक उपोषण:**

२२ गावातील शेतकऱ्यांची जीवनमरणाची झुंज सुरू झाली. निर्वाणीचा उपाय म्हणून 'सामुदायिक उपोषण' सुरू केले. उपोषण १७ जुलै ते २६ जुलै पार्यंत चालले यात एक ८४ वर्षाची महिला निर्धाराने उपोषणाला बसली तिची तब्बेत खालावली. प्रा. एन.डी.पाटील यांनी या प्रश्नाची तड लावण्यासाठी थेट मंत्रालयात धाव घेतली. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची भेट घेतली व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून दिले. त्याप्रमाणे मिटींग झाली. एन.डी.ची सूचना ती २२ गावे वगळण्याची होती त्याप्रमाणे निर्णय झाला.

**प्रा. एन.डी.पाटील यांचे उपोषण:**

सरकारने एन.डी.पाटील यांना दिलेला शब्द पाळला नाही. ही संबंधितांची फसवणूक होती. हा प्रश्न सुटला नही तर मी आंदोलन कर्त्यांची फसवणूक केली असे होईल. तेव्हा प्रायश्चित करण्यासाठी एन.डी.सरांनी स्वत: उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला. ठरल्याप्रमाणे २६ जुलै रोजी उपोषण सुरू झाले. शासन खडबडून जागे झाले. संमती पत्रके द्यायची होती.[३९०]

**प्रा. एन.डी.पाटील :**

प्रा. एन.डी.सरांनी ५० हजार फॉर्म छापून घेतले. सर्व गावातील लोकांना भेटी दिल्या. प्रत्येकाकडून दोन फॉर्म भरून घेतले. मला जमीन दयायची नाही असे लिहून द्यायचे. त्यातील एक फॉर्म संबंधित अधिकारी यांच्याकडे दयायचा व दुसरा फॉर्मवर त्या अधिकाऱ्याची पोहोच म्हणून सही घ्यायची. अशा रितीने ९७ टक्के शेतकऱ्यांनी जमीनी सरकारला दयायच्या नाकारल्या. संमतीपत्रके नकारार्थी दिली. प्रा. एन.डी.पाटील यांनी शुन्यातून सुरवात करून २२ गावातील २०००० शेतकऱ्याचे नाव त्याच्या जमीनीच्या सातबारावर पुन्हा लागले.[३९१]

**४.७.१३ तासगाव – पलूस साखर कारखाना खाजगीकरणाच्या विरोधी लोकलढा:**

सन १९८९ – ९० ते २००३ पर्यंत कारखाना चांगला चालला होता. कोणती अडचण नव्हती. दिनकर आबा यांचे नेतृत्वाने कारखाना उभा राहीला होता. कारखान्याचे पहिले चेअरमन दिनकर आबा झाले. राम उगळे, महेंद्र लाड यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याची वाटचाल सुरू होती. कारखाना चेअरमन १ वर्षासाठी

आर.आर. पाटील झाले. क्षेत्र १०५०० एकर व सभासद २७००० दिवसाला गाळपक्षमता २५०० टन सदर कोटी नफा देणारा कारखाना उधळपट्टी, भ्रष्टाचारमुळे ३ वर्षे बंद पडला, थकीत गेला. प्रायव्हेट ट्रीटीचा आधार घेत तासगाव कारखान्याची किंमत पावणे चौदा कोटी ठरवली. राज्य बॅकेने तो साडे चौदा कोटीला आ.संजय पाटील यांना विकला.[३९२] तासगाव कारखान्याच्या लढयात प्रा. एन.डी.पाटील उतरले. आणि ३१ कारखान्याचे लिलाव प्रायव्हेट ट्रीट्री पद्धतीने करण्याचा राजकीय सोय करण्यासाठी शेतकऱ्याला मातीत गाडण्याचा राज्यबँक व राज्यकारण्यांचा डाव साफ उधळला. प्रा. एन.डी.पाटील यांनी ८ दिवसाची डेडलाईन दिली. प्रश्न मार्गी लागला नाहीतर उपोषणाचा इशारा दिला. त्यांनी साखर आयुक्तांना खडसावले. ''तुम्ही महाराष्ट्रातील कारखान्याचे मालक तासगावचे अपहरण झाले ते तुम्हाला कसे समजले नाही? या झाडपट्टीने संबंधितांची झोप उडाली. आर.आर.पाटील यांना त्यांनी कान पिचक्या दिल्या.'' या लढयामुळे सरकारने कारखान्याचा विक्री व्यवहार रद्द केला आजही हा कारखाना भाडेकरारवर चालू आहे.[३९३]

**युती सरकार भाववाढ :**

मुळात वीजदर सुरूवातीला हॉर्स पावरला रू.१२५ होता. तो जवळजवळ २० वर्षे तसाच स्थिर होता. १९७८ मध्ये पुलोद मंत्रीमंडळाने १०० रूपयांच्या खाली आणला. सन १९९५ मध्ये काँग्रेस सरकारने हा दर ३०० रू. नेला. हॉर्स पावरला ३०० रू. वीजबील भरताना शेतकऱ्यांना अवघड होऊ लागले.[३९४] पुन्हा १९९५ – ९६ मध्ये युती सरकार सत्तेवर आले. उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री गोपीनाथ मुंडे यांनी ३०० रूपयेवरून रू १००० वर नेला. शेतकरी वीज संघर्ष समितीने आंदोलन चालू केले. ३३३ टक्के भाववाढ होती. भाई एन.डी.पाटील यांनी ३०० चे वर एक छदाम भरणार नाही शेतकऱ्यांची वीज कनेक्शन तोडण्याची धमकी दिली. तशा नोटिसा दिल्या. भाई एन.डी.पाटीलांनी बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला. गोपीनाथ मुंडेंनी १००० चा दर ६०० रू वर आणला. पुन्हा १९९७ मध्ये हा दर १००० रू नेला. प्रा. एन.डी.पाटील यांच्या खंबीर नेतृत्वाने ६०० ते १००० मधील रू.४०० चा फरक सरकारने वीज मंडळाकडे भरण्याचे मान्य केले.[३९५]

**४.७.१४ पुन्हा विजबील पुन्हा भाई एन.डी.पाटील धरणे मंत्रालयावर:**

सरकार बदलले यामुळे नवीन सरकार शब्द बदलला. वीज नियामक मंडळाचे दर गृहीत धरून वीज मंडळ बील आकारत गेले. सरकारच्या गलथानपणामुळे २५० कोटींच्या खोटया थकबाक्या वाढत गेल्या. ढवळीची मूळ शेती पाणी पुरवठा योजना १६ लाखाची तिला थकबाकीची नोटीस आली. शेती पाणी पुरवठयाची थकबाकी ४ कोटी ५० लाखाची शेतकऱ्यांनी शेती विकून थकबाकी भागविणे शक्य नव्हते जमिनीचे लिलाव झाले असते. शेतकरी देशोधडीला लागला असता हे खरे.[३९६] उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील म्हटले, ''आम्ही बारा तास वीज देतो. उपकार करतो. एन.डी.पाटील म्हणाले, जादा वीज देऊन उपमुख्यमंत्री आमच्यावर उपकार करू नये असे म्हणाले.[३९७] विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनावर परिणाम करणाऱ्या त्या घटनांचे एन.डी.पाटील सर साक्षीदार आहेत.[३९८]

**थकीत वीजबील तोडगा मंत्रालयावर धरणे:**

बेमुदत धरणे अंदोलनाकरीता सातारा, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, मराठवाडा व विदर्भ ७०० ते ८०० निदर्शक मुंबईला आले. १४ दिवसाची आगावू नोटीस देऊन हे धरणे आयोजित केले होते. संघर्ष समितीने २० मोर्चे काढले. ७ वर्षे हा संघर्ष सरकारशी चालू होता. पूर्व तयारी म्हणून भाई एन.डी.पाटील सरांनी अनेक मेळावे घेतले. सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, मराठवाडा, विदर्भ या ठिकाणी झंजावती दौरे काढले.[३९९] धरणे सुरू झाले. हायकोर्टाने बंदी हुकूम काढला. भाई एन.डी.पाटील या धरणे आघाडीचे प्रमुख होते. क्रांतीवीर नागनाथ अण्णा होते. भाई एस.एम.पाटील होते. भाई आ.गणपतराव देशमुख होते. क्रांतिअग्रणी भाई जी.डी.लाड व अशोक पाटील होते. ११ दिवसाच्या अवधीत भाई निहाल अहमद, खासदार हरीभाऊ महाले, विट्ठलराव हांडे, झोपडपट्टीच्या आंदोलक विद्याताई चव्हाण, भाई गणपतराव देशमुख, भाई जयंत पाटील, खासदार रामशेठ ठाकूर, भाई मोहन पाटील, विवेक पाटील, भाई संपतराव पवार, भाई आ.शरद पाटील, श्रीपतराव शिंदे, भाई प्रतापराव होगाडे, प्रद्युम्न कौल, कोल्हापूरचे महापौर भाई शिवाजीराव कदम इ.नेते सातत्याने उपस्थित होते. अखेर मंत्री मंडळाचा निर्णय झाला. या आंदोलनामुळे वीज पंपधारक शेतकऱ्याचे १८ हजार ५०० कोटी रूपये वाचले. लढयातून ३० पैसे युनिट दराने वीज देण्याचे मान्य झाले.[४००]

**४.७.१५ कष्टकरी जनतेचे नेते :**

महाराष्ट्रातील डाव्या आघाडीचे नेते, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जेष्ठ, शिक्षणतज्ञ, पुरोगामी, विचारवंत व कष्टकरी जनतेचे नेते प्रा. एन.डी.पाटील आज ऐंशी ओलांडून पुढे आहेत. गेली साठ पासष्ट वर्षे अव्याहतपणे ते महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनात शोषणमुक्त व समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील परिवर्तनवादी सामाजिक व प्रबोधनाच्या चळवळीत काम करणाऱ्या अनेक संस्था, संघटनाचे व आंदोलकांचे ते आधार आहेत. बऱ्याच संस्था संघटनांचे ते मार्गदर्शक आहेत. रयत शिक्षण संस्था, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण संस्था, बेळगाव, महात्मा फुले शिक्षणसंस्था, इस्लामपूर, समाजवादी प्रबोधिनी इंचलकरंजी, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा महाराष्ट्र राज्य सीमाप्राश्न समिती, जागतिकीकरण विरोधी कृती समिती, नर्मदा बचाव आंदोलन इत्यादी अनेक सामाजिक व परिवर्तनवादी संघटना एन.डी.पाटील यांच्या योगदानामुळे कार्यरत आहेत. प्रस्थापित समाज विरूध्द बंड करून शोषणमुक्त समाज निर्माण करण्याची इच्छा असणाऱ्या युवकांना त्यांचे कार्य मार्गदर्शक आहे.[४०१] प्रा.डॉ.एन.डी.पाटील सन १९४८ ला ज्या पक्षात आले. अनेक स्थित्यंतरे झाली तरी फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारापासून मार्क्स लेनिनवादी विचारापासून दूर गेले नाहीत. प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी आजपर्यंत विविध चळवळी व लढे लढविले. गिरणी कामगारांचा लढा, गोवामुक्ती लढा, संयुक्त महाराष्ट्र लढा, भूमिहीनासाठी भूमिआंदोलन, शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावेत म्हणून लढविलेले लढे, कापूस एकाधिकार लढा, महागाईविरोधी लढा, श्वेतपत्रिकांच्या माध्यमातून लढा,

धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा लढा, अंधश्रध्दा निर्मूलन लढा, वीजदरवाढीविरूध्द लढा व धरणे आंदोलन, एन्रॉन हटाव लढा, जागतिकीकरणविरोधी लढा त्यांचे वैशिष्ट म्हणजे ते लढयात अग्रभागी असतात.[४०२]

शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावा शेतीमालाच्या आधारभूत किंमती ठरवून दयाव्यात म्हणून शेतकरी पक्षाचे माध्यमातून त्यांनी लाखो शेतकऱ्यांना एकत्रित करून मंत्रालयावर मोर्चे काढले. कापूस एकाधिकार त्यांच्या प्रयत्नाचे फल आहे. ही योजना १९७२ ला सुरू झाली व १९७४ ला बंद झाली. १९७५ ला पुन्हा सुरू झाली. पुन्हा १९७७ ला बंद झाली. सन १९७८ ला पुलोद मंत्रीमंडळ आले. त्यांना निमंत्रण दिले. 'कापूस एकाधिकार योजना सुरू करणार असाल तर मी मंत्रीमंडळात येईन' असे खडे बोल सुनावले.[४०३] सन १९६५ मध्ये उपासमारविरोधी कृती समितीच्या वतीने आंदोलन केले. एन.डी.सरांच्या आंदोलनामुळे राज्यातील सरकारमान्य दुकानात रास्त भावाने जीवनावश्यक वस्तू विकल्या जाऊ लागल्या. शासनाने १९६८ मध्ये शिक्षणाविषयक श्वेतपत्रिका प्रसिध्द केली. गुणवत्ता वाढीच्या नावाखाली सामान्य मुलामुलीच्या शिक्षणाला मुकावे लागणार म्हणून एन.डी.सरांनी लोकमत संघटीत केले. राज्याच्या कानाकोपऱ्यात ४०० सभा घेतल्या. श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप' ही पुस्तिका सरांनी प्रकाशित केली.[४०४] १९७२ चे दुष्काळाचे संदर्भांत सरांनी शेतकरी कामगार पक्षाचे व मित्रपक्षाचे माध्यमातून हजारो मोर्चे काढले. इस्लामपूर येथील मोर्चात एन.डी.पाटील सरांचेवर लाठीमार झाला. झालेल्या गोळीबारात त्यांचा पुतण्या सुरेश पाटील रंगराव पाटील यांचा मुलगा राजेंद्र पाटील , दिलीप बिलाखे ही मुले ठार झाली. कितीही वाईट स्थिती आली तर आपले तत्व आपण सोडू नये हे त्यांचे तत्वज्ञान बरेच काही शिकवून जाते. त्यांच्या विचारातून त्यांची कार्यावर प्रखर निष्ठा होते हे दिसून येते.[४०५]

**दसरा चौक कोल्हापूर येथील राज्यातील डाव्या व परिवर्तनावादी संघटनाचे वतीने प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचा अमृतमहोत्सवी सत्कार समारंभ नोव्हें.२००३ :**

शेतकरी कामगार पक्षाचे नेते व जेष्ठ नेते प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त डाव्या आघाडीच्या वतीने त्यांचा खासदार आचार्य यांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला. एन.डी.पाटील यांचा कार्यगौरव करताना आचार्य म्हणाले लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही सर्व एकत्र येत आहोत. संघर्षाशिवाय पर्याय नाही. या प्रसंगी कॉ.ए.बी.वर्धने म्हणाले केंद्र सरकार अमेरिकेच्या धोरणानुसार सर्वच क्षेत्रात खाजगीकरण करीत आहे. यातून पाणीसुध्दा सुटले नाही. नुकताच शासनाने 'शिवनाका' नदीच्या २३ किमी.पाण्याचा प्रवाह एका खाजगी कंपनीला विकला आहे. नदी म्हणजे जीवनदायिनी. भारतीयांना ती प्रत्यक्ष माता. देशभक्तीचे ढोल पिटणाऱ्यांनी भाजपने आता गंगासुध्दा विकायला काढली.[४०६] या प्रसंगी प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी आपले परखड विचार मांडले. मी शेतकऱ्यांची मीठभाकरी खातोय, त्यांच्याशी मी कधीसुध्दा बेईमानी करणार नाही.

**प्रा.डॉ.एन.डी.पाटील श्रमिक नेते यांना शिवाजी विद्यापीठाची डी.लिट. पदवी :**

दि. १४ मार्च २००६ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व्दारा डी.लिट सन्माननीय पदवी देऊन

प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांना गौरविण्यात आले. सदर प्रसंगी त्यांच्या परिवर्तन विचाराबद्दल, त्यांच्या रयत शिक्षण संस्थेतील योगदानाबद्दल, गेली पन्नास साठ वर्षे राजकीय, सामाजिक क्षेत्रात, आर्थिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या महान कार्याबद्दल अनेकांनी त्यांचा गौरव केला.[४०७] शिवाजी विद्यापीठव्दारा डी.लिट.पदवी देऊन गौरव महाराष्ट्राचा हा गौरव रयतेचा व हा गौरव बळीराजाचा असे राजेंद्र जोशी म्हणतात.[४०८] सदर प्रसंगी प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कार्यक्रम विनाविलंब राबविला पाहिजे असे विचार मांडले.[४०९] श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण देण्याचा कार्यक्रम राष्ट्रीय पातळीवर राबवावा. ज्ञान व श्रम यांच्यातील दरी वाढत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली.[४१०]

**४.७.१६ प्रा.डॉ.एन.डी.चा बेळगावचा महामेळावा :**

सीमाप्रश्न व एन.डी.यांचे समीकरण आहे. कर्नाटक पोलिसांनी दंडेलशाही केली. मराठी भाषिकांचा महामेळावा रोखला. पोलिसांनी अत्याचार केले. बेळगावमध्ये प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्यासह २१६ जणांना अटक व सुटका. बेळगाव महामेळाव्यासाठी प्रा.डॉ.एन.डी.पाटील असताना पोलिसांनी त्यांना अटक केली. ‘रहेंगे तो महाराष्ट्रमे नही तो जेल में’[४११] केवळ हुतात्म्यांना आदरांजली पुरेसी नाही. सीमालढयासाठी तरूणांना हाक दिली. दंडेलशाहीमुळे लोकलढा संपणार नाही.[४१२] सीमाभागावर पहिला हक्क मराठी बांधवांचाच. कर्नाटक सरकारच्या सुलतानीमुळे. महामेळावा होऊ शकला नाही. मात्र मराठी अस्मितेचे जाज्वल्य दर्शन सामोरी आले.[४१३]

**सध्या भूषवित असलेली पदे :**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस, रयत शिक्षण संस्था मॅनेजिंग कौन्सिल, सदस्य, समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, उपाध्यक्ष, अंधश्रध्दा निर्मूलन समिती महाराष्ट्र, अध्यक्ष, जागतिकीकरण विरोधी कृती समिती, मुख्य निमंत्रक, महात्मा फुले शिक्षण संस्था, इस्लामपूर, अध्यक्ष, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्था, बेळगाव, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सीमाप्रश्न समितीचे सदस्य, अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी.

**प्रा.डॉ.एन.डी.पाटील लेखन :**[४१४]

१.समाज विकास योजनेचे वस्त्रहरण (पुस्तिका) १९६२, २.शेतजमीन कमल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारच्या प्रतिगामी कायदा (पुस्तिका), ३.कॉंग्रेस सरकार व शेतकरी लूट पुस्तिका १९६२, ४.शेतीमालाला किफायतशीर हमी व किमतीची हमी आणि घाऊक व्यापाऱ्यांचे राष्ट्रीयकरण पुस्तिका १९६३, ५.वाढती महागाई व ग्राहक ससेहोलपट पुस्तिका १९६६, ६.महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्ण स्वरूप (पुस्तिका) १९६७, ७. शेतीमालाच्या किफायतशीर किमतीची कैफियत (पुस्तक) १९७०, ८.शेवटी शिक्षण हे आहे तरी कोणासाठी (पुस्तिका) १९९२, ९.महर्षी वि.रा.शिंदे (पुस्तिका), १०.नववे विचार वेध संमेलन परभणी अध्यक्षीय शिक्षण २००१, नवसाम्राज्यवादी युगातील भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, ११.सर्व वृत्तपत्रातून पुरोगामी लेखन

**सारांशलेखन** :

निःस्पृह, विचारवंत, शैक्षणिक जागृती करणारे प्रबोधनकार प्रा.डॉ.नारायण ज्ञानदेव पाटील यांनी केवळ महाराष्ट्राचीच नव्हे तर संपूर्ण देशाची मान उंचावली आहे. नारायण यांनी 'भारत छोडो' संग्रामात विद्यार्थी दशेत असताना उडी घेतली. म.फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रभावित होऊन त्यांनी सामाजिक जीवनाची वाट सुरू केली. सन १९९० पासून रयतचे ते चेअरमन झाले. नैतिक जबाबदारी पत्करून स्वतः ला झोकून देऊन विधायक व संघटना वृत्तीने काम केले. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य व मॅनेजिंग कौन्सिलचे ३५ वर्षापेक्षा अधिक काळ सदस्य आहेत. अण्णांच्या तत्वज्ञानाला त्यांनी कृतीशील रूप दिले. बदलत्या काळानुसार संस्थेत त्यांनी गुणात्मक बदल केले. त्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन केली. भाऊराव पाटील इन्फर्मेशन अॅड टेक्नीकल इन्स्टिटयूट, स्पर्धा केंद्रे, गुरूकुल प्रकल्प, आश्रमशाळा सुरू केल्या. त्यांनी सामान्याला शिक्षणाची दारे खुली केली. याशिवाय कर्मवीर विद्याप्रबोधिनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, अंधश्रध्दा चळवळ संस्थेच्या माध्यमातून केली. १९८७ ते ९० याकाळात महाराष्ट्र विधानसभेचे ते सदस्य होते. १९७८–८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. मराठी माणसाच्या मनातील धगधगता प्रश्न म्हणजे सीमाप्रश्न होय.सीमाभागातील मराठी भाषिकांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी लढे दिले. या आंदोलनात एन.डी.पाटील यांनी केलेली भाषणे फारच गाजली. समकालीन प्रश्नावर त्यांनी लेखन केले. 'महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप', 'शेवटी शिक्षण हे कोणासाठी?', 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे' इ. विषयावरील लेखन समाजाला प्रेरक ठरले. आजही एवढे शक्य झाले तरी सामाजिक परिवर्तन व शोषणमुक्त समाजनिर्मितीचा त्यांचा काम करण्याचा आवाका आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्ती संग्राम, कापूस एकाधिकार खरेदी योजना, महागाई आणि उपासमारविरोधी आंदोलन, सीमाप्रश्न, धरणग्रस्तांचे आंदोलन, जागतिकीकरणविरोधातील आंदोलन आणि वीजप्रश्नावरील ताजे आंदोलन अशा अनेक पर्वांनी प्रा.एन.डी.पाटील यांची संग्रामगाथा भरलेली आहे.

**निष्कर्ष** :

प्रा.डॉ.भाई एन.डी.पाटील हे श्रमाला, श्रमिकांना न्याय मिळवून देण्यासाठी गेली ७० वर्षे अथक परिश्रम करीत आहेत. त्यांची हिम्मत बुलंद आहे. त्यांचे धाडस, त्यांची झेप फार मोठी आहे. त्यांच्याकडे परिवर्तनाची प्रचंड जिद्द आहे. आयुष्यभर त्यांनी सर्वसामान्य कष्टकरी, शेतकरी, मजूर यांच्याकरिता संघर्ष केला. शेतकरी कामगार पक्षाचे ते जेष्ठ नेते आहेत. १८ वर्षे ते विधानपरिषद व ५ वर्षे विधानसभेचे सदस्य होते. सन १९७८ मध्ये पुलोद सरकारमध्ये कृषि व सहकार मंत्री होते. त्यांनी कापूस एकाधिकार खरेदी योजनेचे काम केल्याचे दिसते. रयत शिक्षण संस्थेचे १८ वर्षे ते चेअरमन होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तत्वानुसार त्यांनी संस्थेची सर्वांगीण प्रगती केल्याचे आढळते. अनेक ज्ञानशाखा डोंगराळ, दुष्काळी आदिवासी भागात उघडून त्यांनी वंचितांचे शिक्षण करण्याचा महाप्रयत्न केला. कर्मवीर भाऊरावांचा विश्वास

त्यांनी सार्थ ठरविला. आज ते अंधश्रध्दा निर्मूलन, परिवर्तन पुरोगामी चळवळीचे कार्य करीत आहेत. एन्रॉन हटवा व सेझ चळवळी त्यांनी लढविल्या. सन १९७२ चा दुष्काळग्रस्तांचा लढा त्यांनी खंबीरपणे लढविला.

### ४.८ सामाजिक नेतृत्व : डॉ.नरेंद्र दाभोळकर

**प्रस्तावना :**

अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या माध्यमातून वर्षानुवर्षाच्या सर्वदूर पसरलेल्या जटील अंधश्रध्दा, अघोरी, अमानुष रूढी, कुप्रथा यांच्या विरोधात उभे राहून, विज्ञाननिष्ठ विचारांची कास धरून शेवटपर्यंत लढलेले डॉ.नरेंद्र दाभोळकर म्हणजे पुरोगामी विचारांचे समर्पित जीवन होय.[४१५] वर्षानुवर्षाच्या जटील अंधश्रध्दा नुकसानकारक आहेत. विवेकबुध्दी विसरून सर्वसामान्य बुवा–बाबा भगतांच्या जाळयात अडकू लागले. अशा बहुसंख्य लोकांची या शोषणापासून मुक्तता व्हावी यासाठी डॉ. दाभोळकरांनी हयातभर अंधश्रध्दांच्या विरोधात लढा दिला. चळवळी, प्रबोधने, चर्चासत्रे, व्याख्याने, शिबीरे, मोहिमा, विविधांगी लेखन याव्दारा जनजागरण केले.

### ४.८.१ डॉ.नरेंद्र दाभोळकर बालपण व जडणघडण

दाभोळकर कुटुंब मुळचे सिंधुदुर्ग जिल्हयातील दाभोली गावचे. सुमारे शंभर वर्षापूर्वी हे कुटुंब सिंधूदुर्ग येथून स्थलांतरीत झाले. नरेंद्र दाभोळकरांचा जन्म १ नोव्हें.१९४५ रोजी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव अच्युत लक्ष्मण दाभोळकर व आईचे नाव  ताराबाई दाभोळकर. थोरले पुत्र दत्तप्रसाद दाभोळकर प्रयोग परिवाराचे प्रणेते श्रीपाद दाभोळकर, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू देवदत्त दाभोळकर.[४१६] डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे वडील नरेंद्र दहा वर्षाचे असताना वारले.[४१७] डॉ.दाभोळकर यांची आई फार व्यापक विचारांची होती.

**प्राथमिक व माध्यमिक शिक्षण :**

सातारच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये डॉ.नरेंद्र यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. डॉ.नरेंद्र दाभोळकर पुढे  सातारमधील प्रसिध्द असलेल्या श्री.शिवाजी उदय क्रीडा मंडळाकडे वळाले. त्यांचे जेष्ठ क्रीडा संघटक बबनरावउथळे गुरूजी त्यांचेबददल काय म्हणतात, '' खेळाडू कसा असावा याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे डॉ.दाभोळकर. ते कबडड्डीचे निष्णात खेळाडू होते. कबडडीतील बोनसलाईन ही कल्पना त्यांनी ३५ वर्षापूर्वी मांडली होती. महाराष्ट्रात दोन शिवछत्रपती पुरस्कार मिळविणारे ते एकमेव होते.''[४१८]

**क्रीडाक्षेत्रातील कामगिरी :**

सातारचे शिवाजी उदय मंडळ देशपातळीवर डॉक्टरांनी नेले. शिवछत्रपती पुरस्कार त्यांना दोनवेळा मिळाला. (एक खेळाडू व दुसरा कार्यकर्ता) ते कबडड्डीचे ते कर्णधार होते. शिवाजी विद्यापीठाने त्यांच्या नेतृत्वाखाली कबडड्डीचे सुवर्णपदक पटकाविले. त्यांनी महाराष्ट्रातील अनेक कबडड्डी स्पर्धा नागपूर, डिग्रज, मुंबई व यवतमाळ येथे गाजविल्या.[४१९] ते कबडड्डीचे डोळस श्रध्दाळू होते. त्यांच्याबददल अर्जुन पुरस्कार सदा शेटये, अर्जुन पुरस्कार शांताराम जाधव, पुणे जिल्हा कबडडी संघटनेचे सल्लागार ज्ञानेश्वर झोडगे,

गुजरातमधील माजी पोलिस आयुक्त त्यांच्या खेळाची प्रशंसा करतात.[४२०] १९६४ ते १९६७ या काळात ते कबडड्डी संघाचे शिवाजी विद्यापीठ कर्णधार होते. बांगला देश कबडड्डी कसोटी झाली त्यावेळी भारतीय संघात डॉ.दाभोळकरांची निवड झाली होती.[४२१]

### ४.८.२ महाराष्ट्रातील समाजसुधारक व अंधश्रध्दा निर्मूलन :

अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य महाराष्ट्रात फार दीर्घकाळ अन प्रभावीपणे चालले होते. लोकहितवादी, म.फुले, शाहू महाराज, सुधारक आगरकर, वि.रा.शिंदे, गाडगेबाबा, सावरकर, प्रबोधनकार, क्रांतिसिंह नाना पाटील, डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील या सुधारकांनी अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री शिक्षण, धर्माचे खरे स्वरूप याबाबत प्रभावीपणे कार्य केले.[४२२] धर्मभोळेपणातून मानसिक गुलामगिरी निर्माण झालेली असल्याने समाजाचे शोषण जाणवत नाही. उलट मानसिक गुलामगिरीचे समर्थन, संवर्धन व उदात्तीकरण केले जाते. समाजाची प्रचंड हानी होते. म्हणून अंधश्रध्देचे निर्मूलन करणे गरजेचे आहे.[४२३]

### ४.८.३ डॉ.नरेंद्र दाभोळकर कार्य : अंधश्रध्दा निर्मूलन चळवळी

डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या भावंडापैकी सर्वात लहान बंधू होते. त्यांनी सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयातून उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करून सन १९७० मध्ये ते मिरज मेडीकल कॉलेजमधून एम.बी.बी.एस.झाले. त्यानंतर त्यांनी सातारा येथे सन १९७० ते १९८२ च्या दरम्यान वैद्यकीय व्यवसाय केला. त्यांनी सन १९६७ मध्ये युवक क्रांती दल चळवळ सुरू केली होती. कर्मकांडावर प्रथमपासून त्यांचा विश्वास नव्हता. इ.स.१९६९ मध्ये त्यांचा डॉ.शैला यांचेबरोबर रजिस्टर पध्दतीने विवाह झाला. सातारमध्ये सन १९७१ मध्ये समाजवादी युवक संघटना स्थापन झाली.[४२४] डॉ.नरेंद्र त्या संघटनेत दाखल झाले त्यावेळी त्यांच्याबरोबर किशोर बेडकीहाळ, दिनकर झिंब्रे, वर्षा देशपांडे होते. सन १९८२ मध्ये त्यांनी समता आंदोलन संघटना स्थापन केली. काही काळानंतर ती संघटना बंद झाली. सन १९८५ मध्ये लोकाधार समिती स्थापन केली. त्यातूनच पुढे गॅस ग्राहक संघटना उभी केली. सन १९८५ मध्ये अंधश्रध्दा निर्मूलनाचे पुरस्कर्ते बी.प्रेमानंद यांचा महाराष्ट्र दौरा झाला तो फारच गाजला. समता, समाजवादी, पुरोगामी डॉ.नरेंद्र दाभोळकर या अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीकडे आकर्षित झाले. याच दरम्यान १९८५ मध्ये नागपूरला अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे दहा दिवसांचे शिबीर झाले त्यात ते सहभागी झाले होते. इ.स. १९८६ मध्ये अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे श्याम मानव, जेष्ठ विचारवंत डॉ.आ.ह.साळुंखे व त्यांचे इतर मित्र यांनी अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे काम सुरू केले. ते त्यांनी अखेरपर्यंत चालविले. इ.स. १९८९ मध्ये त्यांनी महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीची स्थापना केली. इ.स. १९९१ मध्ये सातारमध्ये पहिली परिषद आयोजित केली.[४२५] यानंतर पुढे त्यांनी चळवळीचे काम गतीमान केले. महाराष्ट्रात जनजागृतीकरिता सन १९९६, १९९७, १९९८ मध्ये वगवेगळया ठिकाणी परिषदांचे आयोजन केले व चळवळी महत्व पटवून देण्याची धडक मोहिम चालविली. भेटी, सभा, व्याख्याने, परिषदा व लेखन यातून जनजागृती करण्याचा सपाटा त्यांनी सुरू केला. त्यांनी डझनभर पुस्तकांचे लेखन केले. गुरूवर्य साने गुरूजी यांनी सुरू केलेल्या 'साधना' या लोकप्रिय साप्ताहिकाचे

ते सन १९९८ पासून संपादक होते. त्यांनी अंधश्रध्दा प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम, अंधश्रध्दा विनाशाय, ऐसे कैसे झाले भोंदू, झपाटले ते जाणतेपण, ठरलं डोळस व्हायचयं, तिमिरातून तेजाकडे, प्रश्न मनाचे, भ्रम आणि निरास, विचार तर कराल , विवेकाची पताका घेऊ खांदयावरी इ. पुस्तके त्यांनी प्रकाशित केली.[४२६]

**४.८.४ डॉ.दाभोळकर यांनी राबविलेल्या मोहिमा व परिषदा** :

'अनिस'च्या ३० वर्षाच्या काळात अनेक मोहिमा व परिषदा राबविल्या. त्यांनी तीन मोठया मोहिमा राबविल्या. पहिली युवा एल्गार मोहिम राबविली या २५ हजारापेक्षा अधिक युवकांचेकडून संकल्प चित्रे काढून घेतली. कोकण भुताचा शोध व तिसरी मराठवाडयात भानामती विरूध्द धडक मोहिम महाराष्ट्र अनिसने 'संविधान बांधिलकी महोत्सव'चे आयोजन करून जनजागरणाचा प्रयत्न चालविला. त्यांच्या विविध मोहिमा पुढीलप्रमाणे : शोध भुताचा बोध मनाचा प्रबोधन मोहिम (कोकण विभाग), सर्पविषयक प्रबोधन यात्रा (गोवा, बेळगाव व कोकण), यात्रेतील पशूहत्या विरोधी संघर्ष परिषद (खानदेशस्तरीय), बुवाबाजी संघर्ष यात्रा व परिषद (संपूर्ण महाराष्ट्र), भानामती निर्मूलन धडक मोहिम (मराठवाडा विभाग), चमत्कार सत्यशोधन मोहिम व परिषद (संपूर्ण महाराष्ट्र), फलज्योतिष सत्यशोधन परिषद (उत्तर महाराष्ट्रस्तरीय), डाकीण प्रथा विरोध प्रबोधन (आदिवासी बहुल नंदूरबार जिल्हयातून), वैज्ञानिक जाणिवा कृती परिषदा (महाराष्ट्रस्तरीय), विज्ञान बोध वाहिनी (शाळा, महाविद्यालय संपूर्ण महाराष्ट्र), महिला जाहीरनामा संकल्प परिषद व मोहिम (संपूर्ण महाराष्ट्र), सामाजिक न्याय व धर्मपरिषदा शैक्षणिक परिषद(संपूर्ण महाराष्ट्र), भारतीय विवेकवादाचे अधिवेशन FIRA Conference (राष्ट्रस्तरीय), आंतरजातीय, आंतरधर्मीय, विवाहीतांची समर्थन व संघटन परिषद (महाराष्ट्रस्तरीय), सर्पमित्रांचे संमेलन, महाराष्ट्र शासनाच्या वनविभागासह (महाराष्ट्रस्तरीय), वारसा समाजसुधारकांचा अंधश्रध्दा निर्मूलनाचा विवेकाचा जाहीरनामा परिषद महाराष्ट्राचा सुवर्णमहोत्सव व समितीच्या व्दिदशकपुर्ती निमित्ताने (महाराष्ट्रस्तरीय)[४२७] सन १९९५ मधील चमत्कार विरोधीयात्रेत त्यांनी यात्रेत चमत्कार दाखवा यात्रा अडवा ५ लाख मिळवा अशी घोषणा केली. नोव्हें.२०१० पासूनपुढे त्यांनी वारसा समाजसुधारकांचा महाअभियान राबवून अनेक ठिकाणच्या भोंदुगिरीचा पर्दाफाश केला.

**४.८.५ जादूटोणा विधेयक** :

जादूटोणा विधेयक व्हावे यासाठी वेगवेगळया पध्दतीने आंदोलन केले. कायदयासाठी डॉ.नरेंद्र दाभोळकर शरद पवारांना भेटले.[४२८] जादूटोणा विरोधी कायदा व्हावा म्हणून त्यांनी १६ वर्षे आंदोलनात मागणी केली. याचा पाठपुरावा १६ वर्षे केला. सभा घेतल्या, व्याख्याने दिली, मेळावे घेतले, निवेदने दिली, उपोषणे मोर्चा सर्व लोकशाही मार्गानी प्रयत्न केला.[४२९] राज्य सरकारने हे विधेयक मंजूरीसाठी घेतले परंतु त्याला काही वारकरी संप्रदायांनी व कट्टर हिंदु संघटनांनी विरोध केला. परंतु दाभोळकरांनी आपला लढा म.गांधीजींच्या मार्गानी चालूच ठेवला. दि. २०.०८.२०१३ रोजी त्यांच्या अंत्ययात्रेला मुख्यमंत्री उपस्थित होते. त्यावेळी जनसमुदायांनी 'जादूटोणा विरोधी कायदा झालाच पाहिजे' अशा घोषणा दिल्या. त्यांच्या बलिदानानंतर राज्य सरकारने हा जादूटोणा विरोधी कायदा पास केला. मुख्यमंत्री, गृहमंत्री, संसदीय

कायदामंत्री सातारमध्ये दि.२०.०८.२०१३ रोजी अंत्ययात्रेला आले त्यावेळी त्यांच्या पत्नी डॉ.शैला दाभोळकर यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री संसदीय मंत्री, कार्यमंत्री व पालकमंत्री यांना सुनावले की, ''डॉ.दाभोळकर जादूटोणा विधेयक मंजूर व्हावे म्हणून तुमच्या दालनासमोर तासोनतास ताटकळत बसले तरी तुमची भेट होत नव्हती. सामाजिक हितासाठी जीवनभर तळमळीने आणि समर्पितपणे कार्यकरणाऱ्या माझ्या पतीला व्यक्तिगत काहींच नको होते.[४३०]

प्रा.एन.डी.पाटील याप्रसंगी भावुक झाले अन म्हणाले, 'महाराष्ट्रीयांना शरमेने मान खाली घालायला लागली. राज्याची उदात्त परंपरा आहे. महात्मा फुले यांनी महाराष्ट्राला ख्रिस्त, महंमद, मांग ब्राहमणाशी धरावे पोटाशी बंधुपरी' असा संदेश दिला. सारे धर्म समान असल्याची विश्वबंधुत्वाची संकल्पना मांडली त्यांनी सांगितले'जगाचा निर्मिक एकच आहे.पुरोगामी राज्याने आज समाजसुधारकाची भ्याडहत्या अनुभवली आहे.''[४३१] डॉ.नरेंद्र दाभोळकर समाजातील एका अव्वल प्रश्नावर अनेक वर्षे प्राणाची बाजी लावून लढले. डॉ.एन.डी.पाटील पुढे म्हणतात, ''मला राज्यकर्त्यांना सुचवायचे आहे की डॉ.दाभोळकर एक कायदा संमत करा म्हणून भांडत होते. परंतु गेली १७ ते १८ वर्षे एका सभागृहाने तो कायदा संमत केला व दुसऱ्या सभागृहाने तो अडकून ठेवला. रेंगाळत ठेवलेल्या कायदयाचे दु: ख, वेदना दाभोळकरांना किती होत होत्या हे मी त्यांचा सहकारी होतो. त्या मी जवळून अनुभवल्या आहेत. ज्या अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे ते कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले त्या अंधश्रध्दा निर्मूलन समितीचा मी अध्यक्ष म्हणून काम केले आहे. ते किती जिद्दीने भांडत होते हे मी जवळून अनुभवले आहे. या प्रश्नावर डॉ.दाभोळकर पोटतिडकीने बोलत होते.

महाराष्ट्रातील जनतेला आहे. राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणाचा आणि भेकड वर्तनाचा धिक्कार व्हायला हवा.[४३२] एखादयाला गोळया घालून त्याचे विचार नष्ट होणार आहेत काय ? नक्कीच नाही. जगाच्या पाठीवरचा इतिहास टाहो फोडून तुम्हाला एक गोष्ट नक्की सांगेल, ''एखादया माणसाचा शाश्वत विचार गोळीच्या काडतुसाने कधीच नष्ट होत नाही.''[४३३]

**४.८.६ जादूटोणा विरोधी कायदा घटनेशी सुसंगत सनातन्यांचा विरोध हा समाजद्रोह – डॉ.दाभोळकर** :

डॉ.नरेंद्र दाभोळकर म्हणतात, ''आज आपण विज्ञानयुगात आहोत. जादूटोणा विरोधी कायदयाची वैचारीक भूमिका घटनेशी व शैक्षणिक धोरणाशी सुसंगत आहे. वैज्ञानिक दृष्टीकोण व विवेक हाच कायदयाचा पाया आहे.'' जादूटोणा हा कायदा चर्चेत येऊन १८ वर्षे झाली. या संदर्भांत मुस्लीम, ख्रिश्चन, जैन समाजातील धर्मगुरूंनी आक्षेप घेतला नाही. वारकरी संप्रदायाच्या प्रतिनिधीशी मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. त्यांच्या सूचनेप्रमाने छोटेमोठे २० बदल केले. आक्षेप होणारे कलम पूर्ण वगळण्यात आले. आता बहुसंख्य वारकरी व त्यांचे नेते यांचा विरोध नाही.[४३४] विरोधकांच्या अघोरी विद्या जादूटोणा, तंत्र मंत्र यांचे व्याख्येसंदर्भांत डॉ.दाभोळकर म्हणतात, ''आमचा विरोध मंत्राला नाही तर मंत्राच्या प्रभावाला व योग्य उपचार रोखण्याच्या कृतीला आहे.'' संतांच्या चमत्काराला विरोध आहे काय असे विचारल्यावर डॉ.नरेंद्र दाभोळकर म्हणतात होऊन गेलेल्या घटनेबद्दल आमचा विरोध नाही. यामुळे किर्तनाला विरोध नाही. किर्तन

हे समाजप्रबोधनाचे मोठे माध्यम आहे. प्रवचन व किर्तनावर खटला भरण्याचा प्रश्न येत नाही.[४३५] कायदा व धर्माचा संबंध नाही. कठोर कायदयाने व चोख अंमलबजावणीने परिस्थिती बदलेल यामुळे जादूटोणा कायदा मंजूर होणे गरजेचे आहे असे दाभोळकरांनी नमूद केले.[४३६]

### ४.८.७ पुरोगामी चळवळ :

भूमिगतांचा गनिमी कावा, भूमिगतांची निस्वार्थी, निर्भिड लढत, त्यांची बहादूरी होय. किसन वीर आबांची येरवडा जेल भिंतीवरून मारलेली साहसी उडी ही गोष्ट भूमिगतांच्या शौर्याची साक्ष देते. जीवाची बाजी लावून हे प्रतिसरकारचे लोक लढत होते. मृत्यूची फिकीर त्यांनी कधीच केली नाही. प्रतिसरकारमधील अनेक नेते परस्पर विरोधी विचारांचे परंतु स्वातंत्र्य मिळवण्याच्या ठाम विचारावर होते. या भूमिगतांनी ऊन, वारा, पाऊस, पाणी, दिवस व रात्र या कशाचासुध्दा विचार केला नाही. त्यांच्याकडे विचार होता तो फक्त देशस्वातंत्र्याचा. काटयाकुटयातून ऊन, पावसातून, गर्द अंधारातून वाऱ्यासारखी धावणारी मंडळी ब्रिटीशाविरूध्द जोमाने लढली. क्रांतिसिंह नाना पाटील, किसन वीर, जी.डी.लाड, क्रांतिवीर धन्वंतरी, डी.जी.देशपांडे, रंगराव पाटील, पांडू मास्तर, नाथाजी लाड, शेखकाका, वसंतराव दादा, धोंडीराम माळी, वाय.सी.पाटील, यशवंतराव चव्हाण, राजमती पाटील, इंदूमती पाटणकर, नागनाथआण्णा, बर्डे मास्तर, विठ्ठल घाडगे, बाबूजी पाटणकर, अशी कितीतरी भूमिगत मंडळी वाऱ्यासारखी धावली अन स्वातंत्र्याची मशाल पेटती ठेवली. स्वातंत्र्यानंतरही ही सर्व मंडळी निरपेक्षवृत्तीने जगली. सामाजिक विषमतेविरूध्द लढली. साक्षात मृत्यू समोर दिसत असतानासुध्दा ही मंडळी देशाच्या स्वातंत्र्याचा विचार करत होती. त्यांना जनतेचे उदंड प्रेम मिळाले. ही भूमिगत मंडळी न्यायदानाबरोबर अंधश्रध्दा, अस्पृश्यता निवारण इ.कामे करीत होती. व्यक्तीगत ही भूमिगत मंडळी साधी, सरळ, निरीच्छ होती. त्यांची राहणी साधी, त्यांचा आहार साधा होता. सामाजिक अन्याय व शोषण यांच्याविरूध्द लढणारी ही मंडळी होती.

प्रबंधाचे दुसरे प्रकरणात 'भाषावार प्रांतरचनेच्या आधारावर राज्याची निर्मिती' हे आहे. ही चळवळ मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र चळवळ म्हणून इतिहासात प्रसिध्द आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. भाषेच्या आधारावर राज्यांची पुर्नरचना करण्याची मागणी पुढे आली. ब्रिटीशांच्या कालखंडात प्रांतांच्या निर्मितीमागे कोणतेही शास्त्रीय किंवा प्रशासकीय तत्व नव्हते. ही प्रक्रिया पूर्णपणे ऐतिहासिक अपघातानी घडून गेलेली प्रक्रिया आहे. भाषावार प्रांतरचनेमुळे भारत देशाच्या अखंडत्वाला व एकसंघत्वाला बाधा येईल असे पंडित नेहरूंना वाटले होते. बाकी देशातील प्रमुख व अनुभवी नेते भाषावार प्रांत रचनेच्या बाजूचे होते. भाषावार प्रांतरचनेच्या तत्वामागे मराठी लोकांना आपल्या आशाआकांक्षा साध्य करण्यासाठी केंद्रसरकारने मराठी भाषिक एक घटक राज्य निर्माण करून घ्यावे ही इच्छा होती.

महाराष्ट्रातील लोकांची ही स्वाभाविक आकांक्षा केंद्र सरकार दडपून टाकत आहेत असे जनतेला वाटले व मनातील भावनेच्या पुर्ततेसाठी संयुक्त महाराष्ट्र आंदोलन सुरू झाले. या आंदोलनाच्या माध्यमातून भाषिक व राजकीय भावना अधिक मजबूत झाली. खरंतर संयुक्त महाराष्ट्र वेगळे राज्य व्हावे ही रास्त मागणी होती. परंतु मराठी भाषिक जनतेला इतर कोणत्याही भाषिकापेक्षा तीव्र संघर्ष करावा लागला. प्रा.डॉ.एन.डी.पाटील याबद्दल म्हणतात, '' संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा रणसंग्राम म्हणजे मराठी जनतेच्या बलिदानाचा स्वाभिमानाचा इतिहास आहे. भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर विविध भाषा बोलणारे प्रांत मोडून एक भाषेच्या तत्वावर त्यांची पुर्नरचना केली जाईल असे आश्वासन महात्मा गांधीजीपासून ते सर्व

कॉंग्रेस नेत्यांनी दिले होते. सन १९४६ च्या निवडणुकीच्या निमित्ताने काढलेल्या जाहीरनाम्यात कॉंग्रेसने भाषावार प्रांतरचनेचा पुनरूच्चार केला होता. परंतु प्रत्यक्ष भाषिक घटक राज्य मागणी पुढे आल्यावर त्यांनी कोलांटी उडी मारली! इतर भाषिकांना त्यांच्या मायबोलीची राज्ये मंजूर करणाऱ्या कॉंग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या जनतेचा तो हक्क नाकारला. कारण त्यांना मराठी भाषिकांच्याबद्दल प्रचंड आकस होता. मुंबई महाराष्ट्राला मिळू दयायची नाही असे वाटले. कदाचित मुंबई त्यांना कायम स्वरूपात केंद्रशासित करायची होती.

प्रबंधाचे दुसरे प्रकरणात राजकीय चळवळीचा अभ्यासाचा आढावा घेण्यात आला आहे. राजकारणाचा विचार करताना त्यांचे काही टप्पे करावे लागतात. सन १९७८ पर्यंत कॉंग्रेसच्या निर्विवाद वर्चस्वाचे राजकारण चालले होते त्यानंतरचा १९७८ ते १९८० पर्यंतचा पुरोगामी लोकशाही दलाचा कालावधी होता. यानंतर शिवसेना भाजप युतीचा कालखंड अशा पध्दतीने राजकारणातील टप्प्यांची विभागणी करता येईल. कोणताही टप्पा अगदी स्वतंत्र नाही. आधीच्या टप्प्यातील प्रभावातून दुसरा टप्पा तयार होतो. राज्याची स्थापना होण्यापूर्वी १९५७ मध्ये कॉंग्रेसची व्दिभाषिक सत्ता असताना झालेली निवडणूक कॉंग्रेसला तशी जडच गेली. संयुक्त महाराष्ट्र समितीने मुसांडी मारली. परंतु महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेने परिस्थिती बदलली. मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस बळकट झाली. महाराष्ट्र राज्याच्या प्रश्नावर कॉंग्रेस पक्ष सोडून गेलेले नेते परत कॉंग्रेसमध्ये आले. प्रजा समाजवादी पक्ष व शेतकरी कामगार पक्षातून काही नेते कॉंग्रेसमध्ये आले. यामुळे यशवंतराव चव्हाण यांच्यावर पक्षफोडीचा आरोप केला जातो. शेकाप पक्षातील नेते कॉंग्रेसमध्ये आले.

शेतकरी कामगार पक्षाच्या संदर्भांत जेष्ठ विचारवंत अभ्यासक प्रा.भा.ल.भोळे हे म्हणतात, '' पक्ष स्थापन झाल्यावर हा पक्ष अस्मितेच्या शोधात होता. त्या पक्षाला स्वत: ची अशी विचारसरणी मांडता आली नाही. निवडणूकीच्या राजकारणात शेका पक्ष अयशस्वी ठरला. सुरवातीच्या काळात शेकापमधून दत्ता देशमुख, नाना पाटील, व्ही.एन.पाटील यांच्यासारखे नेते बाहेर पडले. त्यानंतर शंकरराव मोरे, केशवराव जेधे व तुळशीदास जाधव हे पक्षाचे संस्थापक सदस्य कॉंग्रेस पक्षात आले. शेकापचे रघुनाथ खाडीलकर यांनी नवा पक्ष स्थापन केला व शेकापचा त्याग केला.

शेतकरी कामगार पक्षाने 'शेतीमालाच्या रास्त भावाचा लढा', 'संयुक्त महाराष्ट्राचा लढा', साराबंदीचा लढा, सरकारी सक्तीच्या लेव्हीविरूध्दचा लढा, एन्रॉन प्रकल्पाविरोधी लढा, रायगड जिल्हयातील सेझ लढा, सीमाप्रश्नासंदर्भातील लढा असे अनेक लहानमोठे लढे लढविले. शेतकऱ्यांचे कल्याणाकरिता शेकापने अनेक लढे लढविले त्यामध्ये वीज बिले माफ, कर्जे माफ इत्यादी. महाराष्ट्राच्या संसदीय राजकारणात शेतकरी कामगार पक्षाला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. तरी या रस्त्यावरच्या लढायात मात्र हा पक्ष सर्वात पुढे राहिला. शेतकऱ्यांचे कल्याण व कामगारांचे हित जपण्यात त्यांनी मनापासून लढे दिले. शेतीमालाला योग्य भाव मिळण्यासाठी देशातील पहिला लढा शेतकरी कामगार पक्षाने दिला. ही बाब ऐतिहासिक आहे असे दिसून येते. याखेरीज समाजातील सामान्याचे कल्याण, समता, जातीभेद निर्मूलन

ही शेका पक्षाची सामाजिक चळवळीत कामे आहेत.

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर जे पक्षीय राजकारण झाले त्याचे सूत्रात्मक वर्णन 'एकपक्षीय प्रभुत्व' असे करता येईल. कॉंग्रेसचे एकपक्षीय प्रभुत्व हे या कालखंडाचे वैशिष्टय होते. राज्यात कॉंग्रेसचे प्राबल्य होते. स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी हे कॉंग्रेसचे प्रभुत्व प्रस्थापित होण्याचे मुख्य कारण होते. या शिवाय यानंतरच्या काळातील राज्याराज्यातील, जिल्हयाजिल्हयातील कॉंग्रेस पुढाऱ्यांची कर्तबगारीसुध्दा कारणीभूत होती. ग्रामपंचायत, तालुका समिती, जिल्हा परिषद राज्यपातळीवरील संघटना अशी साखळीसुध्दा या कामात उपयुक्त झाली. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राची सूत्रे हातात घेतली तेव्हा महाराष्ट्रापुढे अनेक समस्या होत्या. महाराष्ट्राचे राजकारण हीच मोठी समस्या होती. दरम्यान संयुक्त महाराष्ट्राचा झगडा झाला होता. त्याचे घाव पक्षाच्या मनावर ताजे होते. या स्थितीचे वर्णन चव्हाणांनी 'भंगलेले मन' असे केलेले आहे. कॉंग्रेस व विरोधक यांच्यात उघड संघर्ष होता. थोडक्यात यशवंतराव चव्हाण यांचेवर मोठी जबाबदारी होती. भावनिक ऐक्य घडविणे गरजेचे होते. अगदी तारेवरची कसरत होती. या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाणांनी तीन उद्दिष्टये डोळयासमोर ठेवली एक प्रशासन सक्षम ठेवणे व त्यांच्या माध्यमातून चोख कारभार करणे. पंचवार्षिक योजनेची उत्तम अंमलबजावणी करून आर्थिक विकास साधणे व महाराष्ट्राची एकात्मता उत्तम ठेवून एकसंघ महाराष्ट्र निर्माण करणे. यशवंतराव चव्हाण यांचेसमोर दुसरे आव्हान पक्षांतर्गत होते. जुने व नवे गट यांच्यात सत्तास्पर्धा होती. संयुक्त महाराष्ट्राच्या मुद्दयावर कोणती भूमिका घ्यायची ही समस्या महाराष्ट्रातील कॉंग्रेस पक्षातील सदस्यांची होती. या दोन्हीवर यशवंतरावांनी बेरजेचे राजकारण विकसित केले. नेहरूंचे हे धोरण चव्हाणांनी स्विकारले.

यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांच्या काळात त्यांना आव्हान देऊ शकणारे काही नेते होते. त्यामध्ये बाळासाहेब देसाई पाटण (सातारा), शंकरराव चव्हाण (नांदेड), वसंतरावदादा पाटील (सांगली) इ.चा समावेश होता. बाळासाहेब देसाई वसंतराव नाईकांचे स्वपक्षीय विरोधक होते. १९६०, १९६२ व १९६७ अशा तिन्ही वेळा ते कॅबिनेट मंत्री होते. बाळासाहेब देसाई सातारा जिल्हयातील एक मातब्बर पुढारी होते. मतदारसंघात त्यांचे चांगले वजन होते. पाटण मतदारसंघातून ते बिनविरोध निवडून आले होते. १९७० मध्ये बाळासाहेबांनी मुख्यमंत्री नाईक यांच्या हस्तक्षेपाला कंटाळून राजीनामा दिला. (केसरी वृत्तपत्र ५ जुलै १९७०) दुसरे नेतृत्वाला आव्हान देणारे नांदेडचे शंकरराव चव्हाण. यशवंतराव चव्हाणानंतर पश्चिम महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे खरे पुढारी म्हणजे वसंतरावदादा पाटील होते. स्वातंत्र्ययुध्दातील एक धाडशी बंडखोर यांनी स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळ गतीमान केली. वसंतराव दादांनी साखर कारखानदारी भरभराटीला आणली. सन १९७२ मध्ये ते कॅबिनेट मंत्री झाले. नंतरच्या कालखंडात ते महाराष्ट्राचे चारवेळा मुख्यमंत्री झाले. वसंतरावदादा सर्वमान्य पुढारी होते. १९७२ साली ते सत्तेत आल्यावर 'शुगर लॉबीचे' महत्व अधिकच वाढले. याशिवाय मंत्रिमंडळात पी.के.सावंत (रत्नागिरी), शेषराव वानखेडे नागपूर, गोपाळराव खेडकर अकोला, मधुकरराव चौधरी जळगाव, यशवंतराव मोहिते सातारा इत्यादी मातब्बर नेते होते. महाराष्ट्र

राज्याची स्थापना झाल्यापासून १९७२ पर्यंतचा कालखंड हा राज्याच्या उभारणीचा कालखंड आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पाया याच काळात घातला गेला.

शेतकरी कामगार पक्ष  हा त्या काळात प्रमुख विरोधी पक्ष होता. त्यांचे नेतृत्वसुध्दा बहुतांशी मराठा पुढाऱ्याकडे होते. दि.बा.पाटील पनवेल, गणपतराव देशमुख सांगोला, एन.डी.पाटील कोल्हापूर, कृष्णराव धुळुप कल्याण इत्यादी नेते शे.का.पक्षात होते. ते संख्येने खूप कमी होते. परंतु सर्व आमदार अभ्यासू व विधीमंडळात झुंजार होते. असे त्यांच्या कामाने व दस्ताऐवजावरून दिसून येते. या दरम्यानच्या काळात निवडणूक प्रचारात स्त्रीयांचा वापर केला जात होता. परंतु स्त्रियांना सत्तेच्या पदांच्यामध्ये भागिदारी दिली जात नव्हती. कोणत्याच पक्षात स्त्री सचिव अगर अध्यक्ष या पदापर्यंत पोहोचली नव्हती. परंतु सन १९७७ मध्ये प्रेमलाबाई चव्हाण यांना इंदिरा काँग्रेस पक्षाने अध्यक्षपद दिले. १९७७ नंतर आणि आणिबाणीच्या काळात १९७७ नंतर प्रतिभा पाटील, प्रभा राव, शालिनीताई पाटील, केशरकाकू क्षिरसागर, अनुसयाबाई काळे, या स्त्रिया समोर आल्या. पश्चिम महाराष्ट्रातील सर्व मातब्बर नेते वसंतराव दादा, बाळासाहेब देसाई, शंकरराव मोहिते पाटील, यशवंतराव मोहिते, राजारामबापू पाटील, रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, विठ्ठलराव विखे पाटील, शंकरराव कोल्हे पाटील, शंकरराव काळे, यशवंतराव थोरात हे साखर कारखान्याचे प्रवर्तक वा अध्यक्ष होते. यातील कोरे व रत्नाप्पा कुंभार सोडले तर बाकीचे सर्व पुढारी मराठा होते. महाराष्ट्रात प्रारंभी शेती निसर्गावर अवलंबून होती परंतु पुढे जलसिंचन झाल्याने ऊसाचे क्षेत्र वाढले. त्यामुळे नवनवीन साखर कारखाने उभे होत गेले. हे कारखाने मराठा प्रभुत्वाखाली होते.

सामाजिक स्थान, जात, लिंग या निकषावर विचार केल्यास असे दिसते की या काळातील कॉग्रेसचे प्रभुत्व हे सरंजामशाही एकजातीय व पुरूषप्रधान होते. गावोगावचे पारंपारिक सरंजामदार हेच कॉग्रेसचे आधारस्तंभ होते. जमीन मालकीतून निर्माण झालेल्या अधिकाराच्या जोरावर या पारंपारिक सत्ताधिशांनी ग्रामपंचायत, पंचायत राज्यव्यवस्था, जिल्हा परिषदा या व्यवस्थेवर कब्जा मिळविला. जिल्हा परिषद निवडणूकीत कॉग्रेसचे वर्चस्व या गोष्टीचे उत्तम उदाहरण आहे.

विरोधकांच्या संदर्भांत बोलावयाचे झाल्यास त्यांना जरी राजकीय सत्ता मिळाली नाही तरी जनमाणसाला जागृत व संघटीत करण्याचे काम विविध सामाजिक व राजकीय चळवळीने केले. म्हणून सामूहिक चळवळीच्या अभ्यासाचा भाग महत्वाचा ठरतो. राजकीय अर्थव्यवस्था ही महत्वाची बाब आहे. अर्थव्यवस्थेची ही पायाभूत संकल्पना आहे. कृषी व उद्योग अर्थव्यवस्थेची प्रमुख क्षेत्रे होत. कृषी क्षेत्राचा या संदर्भांत विचार केला तर लक्षात येते. कृषीक्षेत्रातील मुख्य समस्या म्हणजे शेतीची फारच दुरावस्था होती. शेती मुख्यतः मोसमी पावसाच्या लहरीपणवर अवलंबून होती. ती स्थिती दूर करण्याचा एकच मार्ग म्हणजे जलसिंचन. सरकारी कालव्यामार्फत नाममात्र जलसिंचन झाले ते ही काही ठराविक तालुक्यातच उपलब्ध जलसिंचनाचा वापर मुख्यत्वे ऊस पिकासाठीच झाला. त्यामुळे धान्ये, कडधान्ये, तेलबिया यांचे उत्पन्न वाढले नाही. महाराष्ट्र राज्य झाले परंतु उद्योगाचे केंद्र मुंबईच राहिले. उद्योगाचे विकेंद्रीकरण शासनानी

स्विकारले. परंतु प्रत्यक्षात त्याचा रोख बदलला नाही. मुंबई हेच उद्योगाचे केंद्र राहिले व पुणे, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली या पट्ट्यातच उद्योगाची उभारणी झाली.

यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने चांगलाच जम बसविला व त्यापासून पश्चिम महाराष्ट्र कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला झाला. अलिकडच्या काळात कॉंग्रेस व राष्ट्रवादी अशा दोन्ही कॉंग्रेसचे पश्चिम महाराष्ट्र हे प्रभावी क्षेत्र झाले आहे. कॉंग्रेस व राष्ट्रवादी दोन्ही पक्षाच्या घटना वेगवेगळया असल्या तरी वैचारिकदृष्टया त्यात फारसा फरक नाही. सहकार क्षेत्र दोन्हीचा आधार आहे. दोन कॉंग्रेसची सहकारक्षेत्रे साखर कारखाने ही परस्परांची इर्षा करायला लावणारे घटक आहेत. सातारा जिल्हयात निवडणूकीत त्यांना थोडेफार अपयश आले असले तरी आजदेखील ते बालेकिल्ले शाबूत मजबूत आहेत. कारण कॉंग्रेसचा पाया, पक्षबांधणी मजबूत आहे. म्हणून यशवंतरावांचे मानसपुत्र शरद पवार यांनी पश्चिम महाराष्ट्र आपले कार्यक्षेत्र निवडले. सहकार साखर कारखानदारी, सहकारी बँक क्षेत्रे अन्य भागाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रात चांगली रूजली आहेत. येथील शेतीचा, शेतकऱ्याचा विकास झाला आहे. पंचायत राज्य व्यवस्था गावपातळीपासून नेतृत्वाची फळी उभी राहू लागली आहे. सन १९८० नंतर कॉंग्रेसची ताकद कमी होऊ लागली. विधानसभेच्या जागा व मतांची टक्केवारी दोन्हीवर घसरण सुरू झाली.

सन १९८५ नंतर शे.का.पक्ष अधिकाधिक क्षीण होत गेला. संपूर्ण महाराष्ट्रव्यापी पक्ष रायगड जिल्हयापुरता मर्यादीत बनला. सांगोला सोलापूर मतदारसंघात गणपतराव देशमुख यांनी आमदारकीची पन्नास वर्षे पूर्ण केली. लाल बावटयाला पन्नास वर्षे फडकवत ठेवले परंतु दुर्दैवी बाब अशी की त्यांनी दुसऱ्या फळीतील नेतृत्वाला उभारी दिली नाही. असेच इतर डाव्या पक्षाची अवस्था तशीच आहे. डाव्या पक्षातील जेष्ठांनी नवीन नेतृत्व जपले नाही. नवीन नेतृत्वासाठी विशेष प्रयत्न केले नाहीत. याचा परिणाम हळूहळू डावी नेतृत्वाची फळी क्षीण होत गेली. मजूर, कामगार, कष्टकरी व शेतकरी यांचेकरिता केवळ पोटतिडकीने डावेच पक्ष आंदोलने करीत आहेत आणि आजसुध्दा ते आंदोलने करीत आहेत. परंतु अलिकडे हे चित्र बदलू लागलेले आहे. जनसामान्याच्या हितासाठी चळवळी, आंदोलने दुर्मिळ होऊ लागली आहेत. यात धंदेवाईक प्रवृत्ती घुसल्याने आंदोलनाचे खरे स्वरूप पालटले व विकृत स्वरूप येऊ लागले आहे. आंदोलने ही ब्लॅकमेल व स्वतः चे पोट भरण्यासाठी होऊ लागली आहेत. आंदोलन करायचे व स्वतः चे खिसे भरायचे असे घडू लागले आहे. तरीसुध्दा आजही सामान्य लोकांच्या उध्दारासाठी संकटाकरिता फक्त डावे पक्षच रस्त्यावर येत आहेत ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. डावी विचारसरणी मंडळी चारित्र्यवान आहे परंतु त्यांची संख्या ताकद कमी आहे.

जी स्थिती शेकापची तीच स्थिती जनता दलाची, १९७८ मधील आणीबाणी विरोधातील लाटेत जनता दलाला २८ टक्के मते मिळून ९९ जागा मिळाल्या होत्या. त्याला २००४ व २००९ या निवडणुकीत एकसुध्दा जागा जिंकता आली नाही. अगदी अशीच स्थिती कम्युनिस्ट पक्षाची आहे. सन १९९० च्या निवडणुकीत भारतीय कम्युनिस्टांना २४ जागा मिळाल्या होत्या. तो पक्ष आज महाराष्ट्राच्या निवडणुकीतून

हद्दपार झाला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्टाची थोडीफार तीच स्थिती आहे. भाकपला सन १९९५ ला एकुलती एक जागा मिळाली. माकपनेसुध्दा कशीतरी एक जागा टिकवली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सन १९९८ मध्ये शरद पवार यांनी पाठिंबा देऊन चार खासदार निवडून आणले होते हे त्यांचे सर्वात मोठे यश होते. रिपब्लिकन पक्षाला पुढे घेऊन जाणारे प्रभावी नेतृत्व हेच आहे. रिपब्लिकन नेते थोडयाशा यशानी मोठे समजतात. पक्षातील संधीसाधू व अहंकार यामुळे पक्षाची गती कमी झाली. नेत्यांची मने चांगली जुळली असती सर्व रिपब्लिकन नेते एकदिलाने लढले असते तर महाराष्ट्राचे चित्र बदलले असते.

**राजकारणाचा केंद्रबिंदू शरद पवार :**

सन १९७८ पासून आजअखेर महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू शरद पवार आहेत. वसंतराव दादांच्या मंत्रीमंडळातून बंड करून ३४ आमदारासह शरद पवार बाहेर पडले व त्यांनी स्वत: च्या नेतृत्वाखाली पुरोगामी लोकशाही दल स्थापन केले. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली पुलोदचे सरकार बनविले. ही राजकारणाला धक्का देणारी बाब होती. संपूर्ण महाराष्ट्रात प्रभाव असलेले नेते यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव दादा पाटील यांच्यानंतर महत्वाचे नेते म्हणून शरद पवार यांचा उल्लेख केला जातो. गेली पस्तीस चाळीस वर्षे त्यांचा महाराष्ट्रात प्रभाव टिकून आहे.

सन १९८५ च्या निवडणुकीत पवारांनी पुलोद आघाडीच्या माध्यमातून मोठे आव्हान उभे केले. संपूर्ण महाराष्ट्र सभेने ढवळून काढला. तरी पुलोदला १२१ जागाच मिळाल्या. कॉंग्रेसने १६१ जागावर विजय मिळविला. पुढे शरद पवारांनी आपल्या समाजवादी पक्षाने राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस पक्षात विलीनीकरण केले. कॉंग्रेसमध्ये त्यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळाले. त्यावेळी त्यांनी मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला. महिला धोरणाची अंमलबजावणी केली. स्थानिक सत्तेत ३० टक्के महिलांना आरक्षण दिले. शेतीसंदर्भांत काही निर्णय घेतले. राज्य कर्मचाऱ्यांच्या संदर्भांत निर्णय घेतले.

पुढे सोनिया गांधीजींच्या विदेशी मुदयावरून शरदरावांना कॉंग्रेसमधून निलंबित व्हावे लागले. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना केली. साखर कारखानदार व सहकारी चळवळीतील काम करणारी नेते मंडळी राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये गेली. शरद पवारांचे हे दुसरे बंड होते. राष्ट्रवादीच्या वाढीसाठी त्यांनी संपूर्ण कारकीर्द पणाला लावली. राष्ट्रवादी पक्ष स्थापनेने कॉंग्रेसचा राजकीय व सामाजिक पाया कमकुवत झाला. त्यात २००९ ची निवडणूक लागली. कॉंग्रेस राष्ट्रवादी स्वतंत्रपणे लढले. निवडणुकीनंतर त्यांना पर्याय नसल्याने एकत्र यावे लागले. तेव्हापासून गेली १४ वर्षे कॉंग्रेस व राष्ट्रवादी यांचे सरकार सत्तेवर आहे. कॉंग्रेस पक्ष व राष्ट्रवादी पक्षाच्या आघाडीने सेना भाजपचा सन २००४ च्या निवडणुकीत पराभव केला. कॉंग्रेस पक्ष हा नेहमी आघाडयामध्ये जेष्ठ भागीदार राहिला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची दादागिरी त्यांना सहन करावी लागते.

शरद पवार एक उत्तम वक्ते व तज्ञ राजकारणी आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी नेहमी ते दक्ष

असतात. परंतु कॉंग्रेसमधून दोनवेळा बंड करून बाहेर पडल्याने त्यांच्याबद्दलची राजकीय विश्वासार्हतेबद्दल राजकर्ते नेहमीच साशंक असतात. त्यांची राजकारणातील चाल लोकांना संशयीत वाटते. महाराष्ट्राच्या भविष्यातील राजकारणाचा विचार करताना विद्यमान राजकीय पक्ष आघाडया आणि नेते या अनुषंगाने विचार करावा लागतो. कॉंग्रेस पक्षाकडे सक्षम नेतृत्व नाही. विलासराव देशमुख यांच्या निधनाने एक प्रभावी नेता गेला. आदर्श गृहनिर्माणमुळे अशोक चव्हाण मागे पडले. पृथ्वीराज चव्हाण यांचे नेतृत्व चांगले असून त्यांचेकडे राजकीय डावपेच नाहीत. त्यांचा जनसंपर्क कमी पडतो. तरीसुध्दा कॉंग्रेस पक्षाकडे सक्षम नेतृत्वाची कमतरता असली तर कॉंग्रेस केवळ नेतृत्वावर उभी नाही. तळागाळातील कार्यकर्ते ही कॉंग्रेसची खरी ताकद आहे. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर बरेच छोटे मोठे नेते कार्यकर्ते पक्ष सोडून गेले तरीही सर्वात जास्त जागा मिळविणारा कॉंग्रेस हा पक्ष आहे ही वस्तुस्थिती आहे.

आज दलितांचा रिपब्लिकन पक्ष विघटीत अवस्थेत आहे. समर्थ नेतृत्वाचा अभाव आहे. दलित तरूणांना पक्षाचे पूर्वीप्रमाणे आकर्षण राहिले नाही. सुशिक्षित तरूण आज दलित पॅंथर मास मुव्हमेंट, युवक रिपब्लिकन इत्यादी संघटनातून काम करीत आहे. आज रिपब्लिकन पक्षातून शासनकर्त्या पक्षामध्ये मोठया संख्येने लोक गेलेले आहेत. संपत्तीचा, सत्तेचा, चैनीचा, विकासाचा मोह लोकांना अनावर झालेला आहे. पक्षांतर रोखून धरण्यास रिपब्लिकन पक्ष असमर्थ ठरला. पक्षांतर गटबाजीचे प्रमाण खूपच वाढले आहे. रिपब्लिकन पक्षाची अधिवेशने नियमितपणे होत नाहीत. पक्षाव्दारे जनजागरण होत नाही. रिपब्लिकन गटाकडे जनतेपर्यंत आपला कार्यक्रम पोहोचविण्यासाठी आवश्यक असणारे असे वृत्तपत्र नाही. पक्षाचे संघटन मजबूत नाही. पक्षाचे जुने नेते हयात नाहीत काही नेत्यांनी पक्षांतर केलेले आहे. असणारापैकी काहीजण उदासिन आहेत. यामुळे पक्षनेतृत्वाची एक पोकळी निर्माण झालेली आहे असे दिसते. यातून काही युवक पुढे येतात पण त्यांना जुने नेते सामावून घेत नाहीत. दलित बौध्द व्यतिरिक्त पक्षाने अन्य दुर्बल घटकाना अन्य जाती धर्माच्या लोकांना आकर्षित करून घेतले नाही.

आज सर्व दलित, बौध्द रिपब्लिकन पक्षाचे सदस्य आहेत. आज पक्षाला आवश्यक आहे समर्थ नेतृत्वाची रिपब्लिकन एक अल्पसंख्यांक जाती जमातीचा पक्ष आहे त्यामुळे त्यास निवडणुकीत कधीच यश मिळत नाही. रिपब्लिकन पक्ष हा बहुसंख्य आर्थिकदृष्टया मागासवर्गियांचा पक्ष आहे. परंतु त्या सर्व लोकांना त्यांची जाणीव करून देणे गरजेचे आहे. १९७२ च्या दुष्काळात रोजगार हमी योजना ही क्रांतिकारक योजना सुरू झाली होती. जलसिंचन आठ महिने पाणी वाटपाचे धोरण १९८० च्या दशकात स्वीकारले.

प्रबंधातील तिसरे प्रकरणात जिल्हयातील सामाजिक चळवळीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या प्रकरणात सामाजिक चळवळींच्या घडामोडीचा सविस्तर व गतीमान इतिहास नोंदवण्यात आला आहे. पहिली सामाजिक चळवळ 'जिल्हा ग्रंथालय चळवळ' चा आढावा घेण्यात आला आहे. सातारचे थोर राजे श्री. छ.प्रतापसिंह ग्रंथालय चळवळीचे अग्रदूत होते. सन १९३९ साली मुंबई सरकारने एक ग्रंथालय समिती नेमली. नवीन ग्रंथालय व्हावीत म्हणून यशवंतराव चव्हाणांनी 'गाव तेथे ग्रंथालय' अशी अपेक्षा व्यक्त केली

होती. सन १९६७ मध्ये ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला. ग्रंथालयांना जनतेची विद्यापीठे असे म्हटले जाते. ज्ञानार्जन, ज्ञानोपासना, ज्ञानविकास व ज्ञानोपासना ही सर्व उद्दिष्टये सार्वजनिक ग्रंथालयाव्दारे साधता येऊ शकतात. सातारा जिल्हयामध्ये ग्रंथालय चळवळ वाढीस लागावी म्हणून जिल्हा ग्रंथालय संघाची स्थापना झाली. थोर समाजसेवक विचारवंत 'जागृत सातारा'चे लेखक पद्मश्री बाबुराव गोखले हे जिल्हा ग्रंथालय संघाचे पहिले अध्यक्ष प्रा.डॉ.शिवाजीराव चव्हाण उपाध्यक्ष होते. कराडचे वि.वि.पाटील हे कार्यवाह होते. कार्यकारी मंडळात दहा सदस्य होते. त्यांच्या वर्षातून चार सभा होत असत. १९७०–७१ चा खर्च रू.५०० होता. सेवाभावी सदस्यांनी उत्तम योगदान दिले. डॉ.शिवाजीराव चव्हाण यांनी 'वाचनालय' मासिकातून ग्रंथालयाचे प्रश्न मांडले. आज सातारमध्ये ३९८ सार्वजनिक ग्रंथालये आहेत. सातारा ग्रंथालय संघ ही पायाभूत मातृसंस्था आहे. गेली ५० वर्षे याव्दारे चळवळ सुरू आहे. गाव तेथे ग्रंथालय चळवळीतून खेडोपाडी ग्रंथालये रूजविण्याचा प्रयत्न झाला. डॉ.शिवाजीराव चव्हाण यांनी ग्रंथालय चळवळीचे रूपच पालटून टाकले. महाराष्ट्रात ग्रंथालय महोत्सव सुरू केला. महाराष्ट्रात 'सातारा ग्रंथालय पॅटर्न ' राबवून वाचनाची गोडी निर्माण केली. अलिकडे ही चळवळ ग्रंथमित्र संभाजीराव पाटणे यांनी गतिमान केली. खेडोपाडी ग्रंथालय प्रसारामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. भविष्याची चाहुल पाहून ही चळवळ पुढे नेण्याचे काम युवक मित्रानी करावे असे मला वाटते. इंटरनेटच्याव्दारा प्रचंड माहिती साठा खुला करावा असे सुचवावे वाटते. खेडोपाडी तरूण मित्रानी मरगळ झटकून कामाला लागावे. परिवर्तनाच्या चळवळीत स्वत: ला बदलले तरच ग्रंथालयाचे अस्तित्व टिकून राहील. एक विनम्रपणे सुचवावेसे वाटते की दिवसेंदिवस वाढत जाणारी महागाई, ग्रंथांच्या किमती, कर्मचारी मंडळींचे वेतन यातून ग्रंथालयांना वर काढण्यासाठी शासनाने सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात दुपटीपेक्षा अधिक वाढ करावी. ग्रंथालय चळवळीचे अनेक प्रश्न, मागण्या, शासनाकडे प्रलंबित आहेत.

सातारची डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी एक सामाजिक चळवळ आज महाराष्ट्रात चांगली परिचीत झालेली आहे. ही एक प्रबोधनात्मक चळवळ आहे. जीवन जगताना समाजाला अनेक प्रकारच्या समस्या भेडसवतात. त्या राजकीय स्वरूपाच्या असू द्यात, त्या सामाजिक स्वरूपाच्या समस्या असू द्यात, त्या समस्यांची उकल करणे, त्यांचा अर्थ त्यांचे स्वरूप स्पष्ट करणे होय. कार्यकर्ते व नागरिक यांना एकत्र करणे लोकांशी संवाद करणे. युवकमित्रांशी चर्चा करून पुरोगामी विचाराचे आधारे त्याची सुलभ पध्दतीने सोडवणूक करणे हे महत्वपूर्ण काम ही अकादमी करते. या संघटनेची स्थापना जून १९९२ मध्ये झाली. लोकसंग्रहातून प्रबोधन हे मोलाचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी करते. या कामाचे स्वरूप वेगवेगळया पध्दतीने केले जाते. विविध विषयाची चर्चासत्रे घेतली जातात. कार्यशाळेचे आयोजन केले जाते. एकदिवसीय चर्चासत्रे घेतली जातात. महाविद्यालयातून व्याख्याने आयोजित केली जातात. उदबोधक चर्चेचा यात अंतर्भाव असतो. याखेरीज वैचारिक चर्चाचे आयोजन केले जाते. अकादमीव्दारा पुस्तिका, गंथ याचे प्रकाशन केले जाते. लोकशाहीचा विचार लोकशाहीची मूल्ये जनमानसात रूजविण्याचा प्रयत्न केला जातो.

नवीन सदृढ विचार समाजापुढे मांडणे हे पुरोगामी काम या चळवळीच्या माध्यमातून केले जाते.

प्रारंभी डॉ.आ.ह.साळुंखे, प्रा.रा.ग.जाधव, व किशोर बेडकीहाळ या अकादमीचे निमंत्रक होते. नंतर महाराष्ट्रातील व बाहेरील डाव्या चळवळीतील विचारवंत यात सहभागी झाले. प्रा.एन.डी.पाटील या अकादमीचे नेतृत्व करीत आहेत. या अकादमीव्दारा राज्यपातळीवर दोन प्रकारचे उपक्रम राबविले जातात. पैकी एक वार्षिक साहित्यचर्चा व दुसरा विचारवेध संमेलने. आजपर्यंत अकादमीने १५ विचारवेध संमेलने आयोजित केली. नामवंत कवी, लेखक अभ्यासक या संमेलनात आपला बहुमोल वेळ खर्च करून हजर राहिले. विचारवेध संमेलनास हजर राहणारी मान्यवर मंडळी आर्थिक लाभाचा विचार करीत नाहीत. कर्मवीरांची रयत शिक्षण संस्था या अकादमीला वेळोवेळी सहकार्य करते. अकादमीचे अध्यक्षस्थानी प्रा.एऩ.डी.पाटील आहेत. किशोर बेडकीहाळ, दिनकर झिंब्रे, महमुद शेख, अभय कांता, सुहास पळशीकर, अण्णासाहेब होवाळे सदस्य आहेत. ही सर्व मंडळी कोणत्याही प्रकारचा लाभ न घेता हे पवित्र काम करीत आहेत. याचा लाभ नवलेखकांना होतो. अकादमीच्या एकदिवसीय चर्चासत्राचा लाभ महाविद्यालयीन युवकांना होतो. अशा सेवाभावी अकादमीचे विधायक काम समाजातील तरूणांना उपयुक्त ठरते. म्हणून समाजातील तरूण मंडळीनी अशा संघटना बलवान होण्यासाठी सहकार्याचा हात पुढे करावा असे वाटते.

तिसऱ्या प्रकरणात दलित चळवळ या सामाजिक चळवळीचा अभ्यास केलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दलितांचे सर्व प्रश्न सुटतील ही त्यांची अपेक्षा फोल ठरली. उलट काळानुसार या समस्या वाढतच गेल्या. त्यांचा रोजीरोटीचा प्रश्न सुटला नाही. इंग्रजी शिक्षणाने दलितांच्यात बदल घडला. फुले, शाहू, आंबेडकर विचाराने त्यांच्या मानसिकतेत बदल झाला. त्यांना हिंदुंच्या रूढी, परंपरा नको वाटू लागल्या. हिंदुंच्या देव देवता त्यांनी नाकारल्या. सवर्णाची सेवाचाकरी त्यांनी झुगारली. सवर्ण व दलितांच्यांत तेढ निर्माण झाली त्यातून परिवर्तनाचे वारे वाहू लागले व धर्मांतर, नामांतर अशा दलित चळवळी निर्माण झाल्या. दलितांवरील अन्यायाविरोधी प्रतिक्रिया म्हणजे दलित पँथरसारख्या चळवळींनी आकार घेतला. सातारा जिल्हयातील दलित चळवळीचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचा अभ्यास केलेला आहे. अज्ञान, दारिद्र्य, निरक्षरता व भ्रष्टाचार हे चार माणसांच्या जीवनाला ग्रासून टाकणारे शत्रू आहेत. अंधश्रध्दा निर्मूलन चळवळ ही एक व्यापक व मानव मुक्तीची चळवळ आहे. समाज विधायक कृतीने व विचाराने बदलता येतो. ही या चळवळीची धारणा आहे. नागरिकांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्याची गरज आहे याकरिता 'अनिस' ने सामाजिक बांधिलकी महोत्सवाचे आयोजन केले. विविध मोहिमा काढल्या. अनेक परिषदा यशस्वीपणे राबविल्या. तालुका तिथे महाराष्ट्र अनिसची शाखा असे समितीने ठरविले होते. महाराष्ट्र राज्यात सर्व जिल्हयात मिळून २३० पेक्षा अधिक शाखा आहेत. यामध्ये सर्व जातीधर्माचे कार्यकर्ते आहेत. अनिसव्दारा शाळा, महाविद्यालये या ठिकाणी प्रबोधन केले जाते. सर्व स्तरातून उत्तम प्रतिसाद मिळतो. वर्षातून साधारणपणे २००० प्रबोधनाचे कार्यक्रम होतात. 'जादूटोणाविरोधी ' कायदा होण्यासाठी डॉ.दाभोळकर व

समितीचे कार्यकर्ते यांनी १६ वर्षात सभा, व्याख्याने, मेळावे, धरणे, मोर्चे व उपोषणे या प्रकारच्या आंदोलनाचा अवलंब केला. अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य करायचे म्हणजे नक्की कामाचे स्वरूप काय याबाबत डॉ.नरेंद्र दाभोळकरांनी मार्गदर्शन केले. त्यासाठी त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांच्यापुढे चतु: सुत्री ठेवली. मानवी जीवनाचे शोषण करणाऱ्या अंधश्रध्दांना विरोध करणे. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार व प्रसार करणे.

प्रकरण तिसऱ्यामध्ये सामाजिक चळवळीच्या अभ्यासाचा आढावा घेण्यात आला आहे. सातारा जिल्हा शैक्षणिक चळवळीच्याबाबतीतसुध्दा अग्रेसर आहे. ब्रिटिशांना मराठी येत नव्हते व आपणाला इंग्रजी शिक्षण हवे होते. ब्रिटिशांना या देशात त्यांची सत्ता स्थिर करायची होती म्हणून नोकर निर्मितीसाठी इंग्रजांनी पुणे, मुंबई सारख्या शहरात शाळा सुरू केल्या.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक वाटचालीत पुणे व वाई शहराचे मोठे योगदान होते. इ.स. १९१६ मध्ये वाई येथे प्राज्ञपाठशाळेची स्थापना स्वामी केवलानंद यांनी केली. सरदार रास्ते यांनी विकासाकडे लक्ष दिले. सातारच्या छ.प्रतापसिंह राजांनी बहुजन समाज व स्त्री शिक्षणाची महत्व ओळखून सातारा येथे पहिली मराठी शाळा त्यांच्या वाडयातील ‘रंगमहाल’ या ठिकाणी इ.स. १८२९ मध्ये केली. सन १९२३ मध्ये मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम पास झाला. ग्रामीण भागात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू झाले. सन १९२३ च्या कायदयातील त्रुटी दूर करण्यासाठी १९३९ मध्ये नवीन कायदा केला. सन १९६२ च्या जि.प.व पंचायत समिती अधिनियमानुसार प्राथमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी जि.प. कडे देण्यात आली.

शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेने रावबहादूर रामचंद्र रावजी काळे यांचे स्मरणार्थ १९३६ मध्ये सातारा येथे धनिनीच्या बागेत पहिली संस्थेची शाळा सुरू केली. सन १९३८ पासून १९४९–५० पर्यंत ५७८ प्राथमिक शाळा सुरू केल्या. १९४७ मध्ये मुंबई शासनाने सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा मंजूर केला व संस्थेकडील प्राथमिक शाळा हळूहळू जिल्हा लोकल बोर्डाच्या ताब्यात दिल्या. माध्यमिक शिक्षण जिल्हयात इ.स. १८५१ पहिले सरकारी हायस्कूल सातारा येथे सुरू झाले. तेच आजचे प्रतापसिंह हायस्कूल त्यानंतर १८८५ मध्ये वाई येथे द्रविड हायस्कूल, इ.स. १८८९ मध्ये सातारचे न्यू इंग्लिश स्कूल, इ.स. १८९३ मध्ये मुधोजी हायस्कूल फलटण, इ.स. १८९८ मध्ये श्री हायस्कूल औंध अशा माध्यमिक शाळा जिल्हयात सुरू झाल्या. सन १९०१ मध्ये जिल्हयात इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू झाल्या. सन १९२२ मध्ये सातारला कन्या शाळा सुरू झाली.

कर्मवीर भाऊराव पाटलांनी सन १९१९ मध्ये सातारा जिल्हयातील काले, ता.कराड येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. कर्मवीरांनी स्वावलंबी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवताना जातपातविरहीत वसतिगृह उघडली. त्यांनी ‘कमवा आणि शिका’ या योजनेवर भर देऊन शिक्षण जीवनाभिमुख केले. कर्मवीर भाऊरावांनी स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य या चार तत्वांचा अवलंब केला. या कर्मवीरांच्या योजनेमुळे शिक्षणाचा पाया समाजोन्नत व मजबूत झाला. या शिक्षणाच्या प्रसारामुळे बहुजन समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. कर्मवीरांच्या शिक्षणाने प्रभावित होऊन गो.ज्ञा.तथा बापूजी साळुंखे यांनी

नवसमाज निर्मितीसाठी खेडोपाडयातील मुलांना शिक्षणाचा लाभ व्हावा म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना दि.६ जून १९५५ मध्ये केली. व आपल्या संस्थेच्या माध्यमातून कोल्हापूर, तासगाव, कराड, चाफळ, उंडाळे व तारळे या ठिकाणी पाच माध्यमिक मुलांची विद्यालये व एक मुलींचे विद्यालय स्थापन केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची १९९२–९३ मध्ये जिल्हयात ८३ शैक्षणिक केंद्र स्थापन केली. याखेरीज जिल्हयातील अनेक संस्थांची शैक्षणिक केंद्रे होती. रयत शिक्षण संस्थेच्या सन १९९८–९९ च्या कार्यविस्तार पत्रिकेवरून संस्थेच्या एकूण ६९६ शाखा कार्यरत असून त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४१४८०० एवढी आहे.

प्रबंधातील ४ थ्या प्रकरणामध्ये यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, यशवंतराव मोहिते, किसन वीर यांचा राजकीय व सामाजिक नेतृत्व याबाबत आढावा घेतलेला आहे.

**यशवंतराव चव्हाण राजकीय नेतृत्व** :

कै.यशवंतराव चव्हाण एक मोठे लोकनेते होते. लोकनेता म्हणजे लोकशिक्षक असतो तो समाजाला सतत विचार देत असतो. यशवंतरावाची राजकीय विचारप्रणालीच्या संदर्भांत विचार करताना पंडित नेहरू यांचे देशपातळीवरील जे स्थान होते तशा प्रकारचे स्थान यशवंतराव यांचे महाराष्ट्रात होते. आधुनिक भारताच्या शिल्पकाराची भूमिका परिस्थितीने नेहरूंच्या वाटयाला दिली. तशाच प्रकारची भूमिका महाराष्ट्राच्या संदर्भांत यशवंतराव चव्हाण यांच्या वाटयाला आली. एस.एम.जोशी त्यांचे वर्णन ‘आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार’ असे करतात. चव्हाण व नेहरू यांची कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमी एकदम भिन्न होती. नेहरू चव्हाण यांच्यात आर्थिक स्थिती एकदम वेगळी होती. बालपणी यशवंतरावांनी खूप अडचणींचा सामना केलेला होता. राजकीय वारसा नेहरूंना होता. यशवंतराव एक सामान्य कुटुंबातील व्यक्तिमत्व होते. तसेच बऱ्याच बाबतीत साम्य होते. यशवंतराव यांचा चळवळीत सहभाग होता. गांधींच्या विचारांचा प्रभाव यशवंतरावांच्यावर होता. वाचनाचा व्यासंग होता. यशवंतराव नेहरूंना आपले नेते मानत. त्याच दृष्टीने नेहरू हेच युगपुरूष आणि आदर्श होते. यशवंतरावांची नेहरूप्रमाणे धर्मनिरपेक्षता व सहकार यावर श्रध्दा व निष्ठा होती असे दिसते.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रातील लोकांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन त्या भावना त्यांनी कधी दुखावल्या नाहीत. यशवंतराव चव्हाणांनी अत्यंत धोरणीपणाने व मुत्सद्दीपणाने पावले टाकली. विरोधी पक्षांच्या आव्हानांचा सामना त्यांनी यशस्वीपणे केला. यशवंतरावांच्या राजकीय कारकिर्दीकडे पाहिले असता त्यांच्या विविध राजकीय विचारांचे दर्शन घडते. त्यांचा जन्म सातारा जिल्हयातील (जुना सातारा) गरीब शेतकरी कुटुंबात झाला. शिक्षण चालू असतानाच त्यांनी राजकीय चळवळीत सहभाग घेतला. त्यावेळी परिसरात सत्यशोधक समाजाचा जोर होता. परंतु ते जाणीवपूर्वक त्यात सहभागी झाले नाहीत. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा परिचय झाला तरी ते रॉयवादी झाले नाहीत. त्यांच्या वैचारिक आंदोलनाचा मागोवा त्यांनी ‘कृष्णाकाठ’मध्ये घेतला आहे. त्यांच्याकडे एक महत्वपूर्ण पैलू होता तो म्हणजे बेरजेचे राजकारण.

पं.नेहरूंनी सहमतीने राजकारण केले. देशहितासाठी चांगली कामसू माणसे त्यांच्या अचूक लक्षात आली आणि त्या नेत्यांना त्यांनी कॉंग्रेसच्या मुख्य प्रवाहात आणले. पंचायत राज व्यवस्था, सहकारी संस्थांचे जाळे, आणि बहुजनांच्या करिता शिक्षणसंस्थांची उभारणी या तिन्ही गोष्टी व्यापक राजकीय प्रणालीशी जोडल्या होत्या. त्यांच्या कृष्णाकाठ, युगांतर, ऋणानुबंध या ग्रंथाचा अभ्यास केल्यावर आपणाला त्यांच्या विचारप्रणालीची कल्पना येते. त्यांचे जीवनतत्व सत्तालोभीपणाचे नाही. लोकशाही मार्गाने मिळविलेल्या सत्तेवर त्यांची श्रध्दा होती. लोक आपणाला काम करण्यासाठी निवडून देतात. इंदिरा गांधीजींचे एकछत्री व दिल्लीकेंद्री राजकारण सुरू झाले व यशवंतराव निष्प्रभ होत गेले. शेकापचे जेष्ठ नेते मात्र यशवंतराव चव्हाणांचे राजकारण लोक म्हणतात तसे सोज्वल नव्हते असे म्हणतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा मंगल कलश त्यांनी आणला नाही असे प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचे मत आहे. ॲड.शंकरराव खरात यशवंतराव चव्हाण यांचेबद्दल ते पुरोगामी विचाराचे होते, त्यांचे ठायी सर्वसामान्याबद्दल तळमळ होती, पददलितांच्या समस्या सोडविण्यासाठी तळमळ होती. अस्पृश्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी योग्य दृष्टीने पावले टाकली असे म्हणतात. रिपब्लिकन नेत्यांनी १६.१२.१९६० रोजी नागपूर येथील दीक्षाभूमी मैदानावर त्यांचा प्रचंड मोठा सत्कार करून पुष्पवृष्टी केली. गुलामी पध्दतीची महार वतनदारी नष्ट केली. नवबौध्दाचा प्रश्न त्यांनी सोडविला. अस्पृश्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती त्यांना लागू केल्या. १४ एप्रिल (डॉ.आंबेडकर दिनाची) सुट्टी देण्याचे त्यांनी तत्वत: मान्य केले. 'माझ्या कल्पनेतले खेडे' या विषयावर ना.यशवंतराव चव्हाण यांनी पुणे आकाशवाणी केंद्रावर आपले मनोगत व्यक्त केले. नवा माणूस निर्माण केला पाहिजे. नवे ग्रामीण जीवन उभे केले पाहिजे. असे त्यांचे धोरण त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या सांगलीतील भाषणावरून त्यांची भूमिका कळते. नवमहाराष्ट्राचा भाग्योदय मला माझ्या नजरेसमोर दिसतोय. थोडी लांबीची वाट चालावी लागेल. वाट अवघड आहे. कष्ट कमी नाहीत पण यश निश्चित आहे (सांगली भाषण).

**बाळासाहेब देसाई :**

बाळासाहेब देसाई हे पाटणसारख्या डोंगरी भागातून उदयास आलेले नेतृत्व होय. सन १९४० मध्ये त्यांचा बहुजन समाजाचे नेते म्हणून उदय झाला. बाळासाहेब एक दीड वर्षाचे असताना त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले. त्यांचे वडील श्रीपतराव हे सर्वसामान्य शेतकरी होते. त्यांना साधी शेतीसुध्दा करता येत नव्हती. परंतु मुलाने शिकून खूप मोठे व्हावे असे त्यांना वाटत होते. जिद्द, परिश्रम व सातत्य याच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण केले. अगदी प्राथमिक शिक्षणाकरिता त्यांना पायपीट करावी लागली. बालपणाचा काळ फारच खडतर गेला. पोटासाठी जळणाच्या मोळयासुध्दा आणाव्या लागल्या. शिंप्याच्या घरी कामे करावी लागली. प्रसंगी चणेफुटाण्यावर दिवस त्यांना काढावे लागले. कोल्हापूरमध्ये निवारा व दोन वेळच्या जेवणासाठी कडवी झुंज दयावी लागली. कोणाचा कसलाच आधार नाही परंतु या हालअपेष्टामधून ते तावून सुलाखून निघाले. बालवयापासून संघर्ष करावा लागला. ते परिस्थितीवर मात करून कायदयाचे पदवीधर झाले. परिस्थितीशी झगडणे हे त्यांच्या अंगवळणी पडले. वकिल झाले खरे परंतु वकिली करून स्वत: चे

जीवन त्यांना जगायचे नव्हते. सातारा लोकल बोर्डाचे १९४१ ते १९५२ या काळात ते अकरा वर्षे अध्यक्ष होते. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी व मंत्री म्हणून त्यांना काम करण्याची संधी मिळाली. ही संधी म्हणजे आपले कर्तृत्व सिध्द करण्याची वेळ आहे असे त्यांनी मानले. याच काळात जनतेची मनोभावे सेवा केली. सातारा लोकल बोर्ड त्यांनी नावारूपाला आणले. १९५२ मध्ये ते महाराष्ट्र कॉंग्रेसचे सरचिटणीस झाले. १९५७ ते १९६० मध्ये ते बांधकाम मंत्री झाले. या कालखंडातच त्यांनी कोयना प्रकल्पाला गती दिली. राज्य कुस्तीगीर परिषदेचे ते अध्यक्ष झाले. सन १९६० ते १९६२ या काळात ते शिक्षणमंत्री होते. १३ जून १९६० रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ई.बी.सी. योजनेचा क्रांतिकारी निर्णय घेतला. नोव्हें.१९६२ शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली. मुंबई गेट वे ऑफ इंडिया शिवाजी पार्क येथे छ.शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची उभारणी केली. १९६३ ते १९६७ या काळात त्यांनी उपमुख्यमंत्री व गृहमंत्री म्हणून काम केले. या कालखंडात कुळ कायदयाची अंमलबजावणी भूमिहीनांना जमीन देण्याचे काम त्यांनी केले. डिसेंबर १९६७ मध्ये कोयनानगर परिसरात भूकंप झाला. भूकंपग्रस्तासाठी त्यांनी महान कार्य केले. १९६९ मध्ये त्यांनी बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याची निर्मिती केली. १९७७ मध्ये महाराष्ट्राच्या विधानसभेच्या अध्यक्षस्थानी त्यांची निवड झाली.

बाळासाहेब देसाई यांच्या पोलादी नेतृत्वाने अवघड कामेसुध्दा जलद गतीने झाली. भूकंपग्रस्तांना मदत करण्यासाठी अखंड त्या परिसरात स्वत: हजर राहून त्यांनी फार मौलिक काम केले. धाडसी निर्णय घेऊन त्यांनी छ.शिवाजी कॉलेज सातारला आर्थिक सहाय्य केले. प्रत्येक खात्यात त्यांनी धाडसी वैशिष्टयपूर्ण निर्णय घेतलेले दिसून येतात. शेतीला जन्मदात्या आईसमान मानले. शेती व शेतकरी हितासाठी त्यांनी निर्णय घेतले. शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांना ते कडक सूचना देत. बाळासाहेब १९५२ ते १९८३ अखेर ३० वर्षे पाटण विधानसभा मतदार संघातून निवडून गेले. तमाशा लोककलेला त्यांनी प्रोत्साहन दिले. कलाकारांच्या गाऱ्हाण्यांना त्यांनी शासन दरबारी वाचा फोडण्याचे काम केले. शासनातर्फे त्यांना मानधन देण्याची योजना सुरू केली. महाराष्ट्रातील कुस्तीगीरांना त्यांनी आधार दिला. १४ वर्षे मंत्रीपदाची धुरा त्यांनी सांभाळली. सर्व महत्वाची खाती त्यांनी सांभाळली. बाळासाहेबांच्या कामाचा उरक व आवाका मोठा होता. दुष्काळ, भूकंप मोठी संकटे आली तरी जनतेला धीर देत त्यांनी त्यातून मार्ग काढला. महात्मा फुले, शाहू महाराज व छ.शिवाजी महाराज यांचा आदर्श त्यांच्यापुढे होता.

**यशवंतराव मोहिते** :

यशवंतराव मोहिते हे वैचारिकदृष्टया मार्क्सवादी होते. आळंदीला शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेत केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसो राऊत, तुळशीदास जाधव, र.के.खाडीलकर यांच्याबरोबर एक तरूण होता. तो रेठरे ता.कराड येथील होता. यशवंतराव मोहिते, मोरे, जेधे, खाडिलकर व क्रांतिसिंह नाना पाटील हे ही दाभाडी सिध्दांताला रेटण्यात आघाडीवर होते. यशवंतराव मोहिते त्या काळात धडधडणारी मुलूख मैदान तोफ होती. पुढे पं.नेहरूंच्या नेतृत्वाची त्यांच्यावर छाप पडली. त्यावेळी नेहरू यांचा

दौरा कराडला होता. नेहरू आले. त्यांच्याबरोबर यशवंतराव काही बोलणार तेवढयात नेहरूच म्हणाले, 'बोला कॉग्रेसमध्ये कधी येताय ?' १९६० मध्ये मोहितेंनी कॉग्रेसमध्ये प्रवेश केला. यशवंतराव मोहिते यांच्या मंत्रीपदाच्या काळात त्यांनी घरदुरूस्ती महामंडळ बनविले. गृहरक्षकदले तयार केली. साखर संचलनालय सुरू केले. एकाधिकार कापूस खरेदी योजना सुरू केली. रस्ता तेथे एस.टी. ग्रामीण कर्जमुक्ती योजना त्यांच्या मार्गदर्शनाने पुढे आली. यशवंतराव मोहिते यांच्याकडे  ध्येयनिष्ठा, निष्कलंक चारित्र्य, तर्कसुसंगत विचारसरणी, कुशाग्र बुध्दीमत्ता होती. ते उत्तम वक्ते होते. जाहीर भाषणात जनसामान्याच्या व्यवहारातील ते उदाहरणे देत. पन्हाळा येथे यशवंतराव मोहितेंनी दोन दिवसात तीन भागात अठरा तास भाषण केले. मोहिते यांची मूळ बैठकच मार्क्सवादी असल्याने माणसामाणसात भेद करणारा समाज उभा राहिला तर देश रसातळालाच जाईल असे भाष्य त्यांनी केले. ही त्यांची धडाडीच पक्षांतर्गत काही कॉग्रेसजनांना आवडली नाही. ते त्यांना 'रेठरे बुद्रुकचे मार्क्सवादी' असे म्हणत.

**किसन वीर:**

किसन वीर आबा यांचा जन्म ११.०८.१९०६ रोजी वाई तालुक्यातील कवठे या गावी झाला. ते यशवंतराव चव्हाण यांचे जीवलग मित्र होते. उभी हयात त्यांनी राजकारणात घालविली. राजकीय, सामाजिक जीवनात ते रमून गेले. बालपणापासूनच देशकार्याची अभिरूची त्यांना होती. लहाणपणीच आई वारली. पुढील सर्व आयुष्य त्यांनी स्वकर्तृत्वावर घडविले. सन १९४२ च्या स्वातंत्र्य युध्दात जीवाची पर्वा न करता कामे केली. त्यांना अटक झाली. येरवडा येथे त्यांना डांबण्यात आले. या येरवडा जेलच्या भक्कम भिंती तोडून मोठया साहसाने त्यांनी भिंतीवरून उडी घेऊन आपल्या साथीदारासह ते पळाले. गुलामगिरी संपविण्यासाठी त्यांनी प्रसंगी कुटुंबाकडे दुर्लक्ष केले. वडीलोपार्जित संपत्ती संपविली. कर्जबाजारी झाले. पण देशकार्याचे व्रत त्यांनी कधीच सोडले नाही. तुरूंगातून पळाले ते भूमिगत झाले. ते स्वातंत्र्य मिळण्याच्या अगोदर प्रकट झाले. १९३० ला त्यांनी जंगल सत्याग्रहात भाग घेतला. आबा झुंजार वृत्तीचे होते. संघर्ष हे त्यांचे जीवनसूत्र होते. आबा नेहमी मित्रांच्या, सहकाऱ्यांच्या सहवासात असायचे. अचुकपणा, जिद्द, परिश्रम, सातत्य, त्याग व विनम्रता यामुळे कोणतेही अवघड काम सहजपणे सोडवत असत म्हणून ते सर्वांना हवेहवेसे वाटत. त्यांच्याकडे आपपरभाव नव्हता. १९४२ ते १९४६ चा कालखंड भूमिगत राहून त्यांनी ब्रिटिश सत्ता खिळखिळी केली. माणसाच्या चारित्र्याबद्दल ते बऱ्याच वेळा बोलत असत. प्रतिसरकारचे काम त्यांनी मोठया जिद्दीने केले. प्रतिसरकारचे ते सरसेनापती होते. जिल्हयाचे यशस्वी नेतृत्व  केले. सत्तेच्या राजकारणापासून ते नेहमीच दूर होते. पक्ष संघटनेला त्यांनी वाहून घेतले. अनेक तरूणांना त्यांनी राजकारणात संधी दिली.

सातारा जिल्हा कॉग्रेस म्हणजे किसन वीर आबा असे समीकरण झाले होते. १९४६ ला त्यांनी कॉग्रेस कार्यकर्त्यांचे एक शिबीर वाई येथे घेतले. आबांचे मित्र पत्रकार नरूभाऊ लिमये म्हणतात, '' हर प्रकारच्या अडचणी घेऊन लोक आबांच्याकडे येत. सर्वांना आबा आपले वाटत. आबांचे व्यक्तिमत्व दिलखुलास होते शिवाय कसलाही लोभ नाही. ते स्वत: स्वावलंबी वृत्तीचे होते. त्यांची साधी राहणी होती. ते

साधे भाजी भाकरीचे जेवण घेत. त्यांचा स्वभाव निर्मळ, निर्भय, निष्पाप होता. आबांना कधी अन्याय खपला नाही. १९६२ ते १९६७ ते खासदार म्हणून दिल्लीला होते. त्या खासदाराच्यांत त्यांनी स्वत: चे स्थान निर्माण केले. त्यांच्या ठायी प्रेम, लोकसंग्रह, समयसूचकता, जाज्वल्य राष्ट्रप्रेम असे गुण होते. शेवटपर्यंत त्यांनी दुसऱ्याची चिंता वाहिली. अगदी मृत्यू समोर दिसत असतानासुध्दा ते यशवंतराव चव्हाणांची चिंता करीत होते. यशवंतराव चव्हाण त्यांचेबद्दल म्हणतात, '' आबा जेलच्या बाहेर आले व सातारा जिल्हयाचा भूमिगत चळवळीचा एक वेगळा इतिहास घडत गेला. जेव्हा १९४२ च्या क्रांतीचा इतिहास लिहीला जाईल तेव्हा इतिहासकारांना किसन वीर आबांच्या साहसी उडीचे वर्णन करावेच लागेल. स्वातंत्र्य चळवळीत किसन वीर आबांना वेगळे वैशिष्टयपूर्ण स्थान आहे.''

याच प्रकरणात सामाजिक नेतृत्वाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**क्रांतिवीर नाना पाटील:**

क्रांतिवीर नाना पाटील यांच्या १९४२ च्या लढयाचे, प्रतिसरकारचे त्यांच्या जीवनक्रमाचा अभ्यास केल्यावर असे दिसून येते की आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये त्यांचे कार्य बहुमोल आहे. त्यांचा जन्म सर्वसामान्य कुटुंबात झाला. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सत्यशोधक समाज, शेतकरी कामगार पक्ष, संयुक्त महाराष्ट्र चळवळ व कम्युनिस्ट पक्ष अशा विविध माध्यमातून राजकीय व सामाजिक चळवळी केल्या. सामान्य माणसाचे कल्याण साधण्यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. त्यांनी अनेक वेळा पक्ष बदलले. परंतु वैचारिक भूमिका कधीच बदलली नाही. १९४२ च्या लढयात सातारा क्रांती तथा प्रतिसरकारमुळे त्यांचे इतिहासात नाव लिहले गेले.

नाना पाटील यांनी जीवनभर देशकार्य व समाजकार्य केले. लोकामध्ये मूलभूत हक्कांची जागृती केली. त्यांनी सत्ता प्राप्तीपेक्षा समाजसुधारणेचे प्रयत्न केले. क्रांतिसिंह नाना पाटील अभ्यासू, चिंतनशील वृत्तीचे होते. त्यांचे वक्तृत्व ग्रामीण ढंगाचे होते. त्यांनी खेडयापासून ते संसदेपर्यंत हजारो सभा गाजविल्या. आपल्या भाषणांनी त्यांनी लोकांना मंत्रमुग्ध केले. भाषण करण्यापूर्वी ते पहिलवानी थाटात शड्डू ठोकत. शिवाजी महाराज की जय, म.गांधी की जय, भारतमाता की जय म्हणत. भाषणात दैनंदिन जीवनातील दाखले देत. अंधश्रध्दा, धर्मांधता यावर ते आवर्जुन बोलत. त्यांनी जीवनात उच्च नितीमुल्ये पाळली. त्यात त्यांनी कधी तडजोड केली नाही. त्यांचे चारिञ्य निष्कलंक होते. त्यांच्याकडे समर्पणवृत्ती होती. म्हणून ते उच्च दर्जाचे बंडखोर क्रांतिकारक म्हणून नावारूपाला आले.

बॅरिस्टर पी.जी.पाटीलसुध्दा नाना पाटील यांचेविषयी म्हणतात, '' नाना पाटील यांचे जीवन हे महान चमत्कारांनी भरलेले आहे. त्यांचे धाडस, निष्ठा, व मानवसेवा महान आहे. त्यांचे जीवन धगधगते अग्निकुंड आहे.'' घरचा विरोध असताना आपल्या पत्नीला शिकविले. स्वत: चा विवाह सत्यशोधकी पध्दतीने केला. मार्च १९४३ मध्ये म.गांधीजींच्या उपोषणानंतर त्यांनी कुंडल येथे भूमिगतांची सभा घेतली. पोलिसांच्या हातून मरण्यापेक्षा लढत लढतच मरूया हा प्रतिसरकारचा विचार त्यांनी मांडला. यासाठी सशस्त्र सेना निर्माण

करण्यासाठी जी.डी.लाड व नागनाथ नायकवडी यांची नेमणूक केली. क्रांतिसिंहांनी १९२० ते १९७१ पर्यंत सक्रीय राजकारण व समाजकारण केले. सर्वसामान्यांचा उध्दार गोरगरिबांचा सुखी संसार या तळमळीने त्यांनी काम केले. जनतेला आपल्या हक्कासाठी संघर्ष करण्याची शिकवण दिली.

**कर्मवीर भाऊराव पाटील** :

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९१९ ते १९५९ अखेर जीवनभर गोरगरीबांना शिक्षण देण्याचे काम केले. आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये त्यांनी बहुमोल कार्य केले. आज रयत शिक्षण संस्था ही भारतातील सर्वात मोठी व अग्रेसर असणारी शिक्षणसंस्था आहे. याचे संपूर्ण श्रेय कर्मवीर भाऊराव पाटील यांना जाते. त्यांनी ४.१०.१९१९ रोजी संस्थेची स्थापना केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचा समग्रपणे अभ्यास केल्यावर असे दिसून येईल की आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये त्यांचे कार्य मोठे आहे. त्यांनी एका भाषणात आपले परखड विचार मांडले आहेत. ते म्हणाले, '' महात्मा फुले यांच्या संदेशानुसार स्त्री व दलितांचा शिक्षणाने उध्दार करणे मी माझे जिवीत कार्य मानतो.'' कोल्हापूर संस्थानात छ.शाहू महाराजांच्या सहवासात राहण्याचे भाग्य आण्णांना लाभले. ना.तपासे यांना लिहीलेल्या पत्रात अण्णा लिहतात, '' मी कोल्हापूरला शिक्षण घेताना राजवाडयात राहण्याची संधी मिळाली. छ.शाहू महाराजांचे काम प्रत्यक्षपणे पाहण्याचे भाग्य मला लाभले.'' कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९३६ मध्ये राजाराम महाराजांना लिहीलेल्या पत्रात लिहीले., '' सर्व जातीच्या विद्यार्थ्यांच्यासाठी एकच वसतिगृह काढायचे अशी छ.राजर्षी शाहू महाराजांची इच्छा होती. त्यांच्या अकाली निधनाने ती इच्छा पूरी होऊ शकली नाही म्हणून मी सन१९२४ मध्ये सातारा येथे सर्व जातीच्या विद्यार्थ्यांच्यासाठी एकत्र वसतिगृह स्थापन केले. पुढे त्याचा नामकरण समारंभ २५.०२.१९२७ रोजी म.गांधीजींच्या हस्ते झाला. ''

म.फुले व छ.शाहू महाराज यांच्या कार्याचा वारसा अण्णांनी तहहयात चालविला. सार्वजनिक शिक्षणप्रसार व सामाजिक समता याकरिता पुरे आयुष्य अण्णांनी खर्च केले. राष्ट्रसुधारणेचा व लोकशाहीचा खरा पाया म्हणजे शिक्षणप्रसार अशी त्यांची धारणा आहे. 'अस्पृश्यता निवारण' हे त्यांच्या कार्याचा एक भाग होता. सन १९५६ च्या एका पत्रात कर्मवीर म्हणतात, '' स्वावलंबी शिक्षणाकरिता माझे आयुष्य खर्च करणार आहे.'' स्वावलंबनाकरिता ते नापिक जमीन मागत. कर्मवीरांचे त्यागावरच रयत शिक्षण संस्था भक्कमपणे उभी आहे. लक्ष्मीबाईंना संस्थेकरिता महान त्याग करण्याचा प्रसंग आला. अण्णा भाऊक झाले व म्हणाले, ''माझ्या पत्नीनेसुध्दा अपार कष्ट घेतले. स्वतः चे मंगळसुत्रसुध्दा तीने याकामी खर्च केले.'' शिक्षण निवासी करण्यामागे स्वावलंबन, सुसंस्कार व समायोजन हे गुण प्रतिबिंबित करून चारिऱ्यसंपन्न नागरिक बनविणे हा त्यांचा हेतू होता. विद्यार्थ्यांच्या अंगी त्याग, श्रमप्रतिष्ठा यावी असे त्यांना वाटत होते. एका भाषणात ते म्हणाले, '' भांडी घासणे, स्वयंपाक करणे, शेण काढणे, झाडलोट करणे इ.कामे विद्यार्थ्यांचेकडून करून घेण्यात हेतू असा की अशी कामे करण्यात विद्यार्थ्यांना कमीपणाचे वाटू नये. सुशिक्षित व स्वार्थत्यागी हजारो लाखो रयत सेवक त्यांनी निर्माण केले. ना.यशवंतराव चव्हाण म्हणतात, '' कर्मवीर भाऊराव चित्रदर्शी होते.

ते प्राचीन काळातील ऋषीसारखे दिसत. त्यांचे जीवन साधे आणि काटकसरीचे होते. आयुष्यभर त्यांनी अथक परिश्रम केले.'' त्यांनी समाजाच्या परिवर्तनाचा आणि आधुनिकीकरणाचा एक विधायक मार्ग दाखवून दिला आहे.''

**प्रा.डॉ.एन.डी.पाटील :**

प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांच्या जीवनकार्याचा समग्रपणे अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये त्यांनी बहुमोल कार्य केले. ढवळी ता.वाळवा येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी शेतकरी कामगार पक्ष, रयत शिक्षण संस्था, अंधश्रध्दा निर्मूलन समिती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, जागतिकीकरण विरोधी कृती समिती, महाराष्ट्र राज्य सीमा प्रश्न समिती, म.फुले शिक्षण समिती, इस्लामपूर व समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी यांच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय चळवळी केल्या. सर्वसामान्य शेतकरी, श्रमजीवी, कष्टकरी, कामगार, शेतमजूर अशा गरीब दलितांचे दु:खं अगदी जवळून पाहिली. अशा गोरगरिबांना वंचित घटकांच्या कल्याणासाठी सर्वसामान्य शेतमजूर शेतकरी सुखी होण्यासाठी प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी अथक परिश्रम केले.

प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचे घर त्यावेळी भूमिगतांचे आश्रयस्थान होते. साहजिकच एन.डी.पाटील १५ ते १६ वर्षाचे होते. ते सुध्दा त्यात सहभागी झाले. सरकारला रू.६५००० महसूल देणारे पेठ वडगावचे दारू दुकान प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी आपल्या २५ मित्रांच्या सहकार्याने बंद पाडले व इ.स. १९४५ मध्ये त्यांना आयुष्यातील पहिला कारावास झाला. बेडर, निग्रह, संघटनचातुर्य इ.गोष्टीने त्यांनी बालवयातच त्यांनी स्वत: ला समाजकार्यात वाहून घेतले. कॉंग्रेस अंतर्गत जेधे, शंकरराव मोरे, दत्ता देशमुख, रामभाऊ नलावडे यांनी शेतकरी संघ काढला. खुद्द कर्मवीर भाऊराव या पक्षाचे संस्थापक सदस्य होते. यावेळेपासून एन.डी.पाटील यांचे शेका.प.शी नाते जमले आज ५० ते ६० वर्षे झाली. यशवंतराव चव्हाण यांच्या बेरजेच्या राजकारणांनी अनेक मातब्बर नेते कॉंग्रेसमध्ये गेले परंतु नारायणराव आज अखेर पक्षाशी एकनिष्ठ राहिले. एक काळ ते पक्षाचे मुखपत्र ओरडून कोल्हापूरात विकत होते. आज ते सर्वश्रेष्ठ विचारवंत व पक्षाचे सरचिटणीस म्हणून पक्षाची धुरा वाहत आहेत. कर्मवीरअण्णांनी त्यांच्या शिरावर जी जबाबदारी टाकली. त्यांच्याशी इमान राखून प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी संस्थेच्या कार्याची धुरा हातात घेतली. ती आजतागायत ते मनोभावे करीत आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांची कामगिरी उत्तम प्रकारची आहे. शिक्षणमंत्री मधुकर चौधरी यांच्या श्वेतपत्रिकेला एकटया एन.डी.नी विरोध केला. विधानसभेत या श्वेतपत्रिकेच्यावरील चर्चेत एन.डी.पाटील विधानपरिषदेचे २३ वर्षे सदस्य होते. सहकारमंत्रीसुध्दा होते. आ.कराळे यांची कापसाची गाडी विधानभवनाच्या पटांगणात ज्यावेळी पेटविली तेव्हा भाषणे झाली. त्यात एन.डी.पाटील यांचे प्रमुख भाषण होते. सरकारला कापूस एकाधिकार योजना स्विकारावी लागली. शेतकऱ्यांचे आपण मीठ खातो, त्यांच्याशी इमान राखले पाहिजे असे ते म्हणतात.

प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांना वाचनाचा व्यासंग आहे. जिथे वेळ मिळतो तेथे त्यांचे वाचन सुरू असे. एन.डी.यांचा रयत शिक्षण संस्थेशी संबंध आहे. शिक्षणविस्तार तर त्यांनी केलाच याशिवाय कर्मवीरांची तत्वे , ध्येयनिष्ठा, विचार यांची त्यांनी जपणूक केली आहे. जातीपातीचा विचार न करता संस्थेचा कारभार उत्तमरित्या चालविला. दुष्काळी भाग आदिवासी भागात शिक्षणप्रसार केला. एन.डी.पाटील व रयत शिक्षण संस्था यांच्यात एक अविभाज्य नाते आहे. तसे पाहिले तर एन.डी.पाटील डाव्या पक्षाचे कट्टर नेते आहेत. ते मार्क्सवादी व लेनिनवादी आहेत. ते प्रबोधनाच्या आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत नेहमी अग्रेसर असतात. थोर विचारवंत असणाऱ्या प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी सामान्यांचा संसार उत्तम व्हावा हा विचार आयुष्यभर जपला. राजकीय, आर्थिक प्रश्नाइतकेच ते सामाजिक सुधारणेच्या चळवळींना महत्व देतात. कर्मवीर आण्णा, विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांची गुरूस्थाने व स्फुर्तीस्थाने आहेत. वर्गलढा वर्गसंघर्ष जातीअंताचा लढा वरवर न चालवता तो जाणिवपूर्वक चालविला पाहिजे असे ते म्हणतात. ‘एक गाव एक पाणवठा’ मोहिम असो किंवा शनि शिंगणापूरची लढाई असो वा नामांतराची लढाई असो, सीमालढा असो परिवर्तन मोहिम असो एन.डी. एवढे वय होऊनसुध्दा अजून खणखणीत आवाजात त्यांची मते मांडतात. एवढा स्वच्छ, एवढा मोठा नेता, एवढा फर्डा नेता शोधूनसुध्दा सापडणे मुश्किल आहे. प्रश्न मग तो शेतकऱ्यांचा असो, दलितांचा असो, एन.डी.पाटील यांचा शब्द प्रामाण्य मानला जातो. म्हणून तर सौ.सरोज ताई रयत शिक्षण पत्रिकेत एप्रिल १९९९ च्या अंकात एन.डी.ना ‘एक वादळ’ असे म्हणतात. बौध्दीकता हे त्यांचे भांडवल आहे. वक्तृत्व हे त्यांचे शस्त्र आहे. एन.डी.यांनी वरळी आमदार कोटयातून मिळणारी सदनिका नाकारली. सौ.सरोजताई यांना रास्त अभिमान वाटतो. गोरगरीबांच्यासाठी झिजणारा, त्यांच्यावर प्रेम करणारा माणूस म्हणून त्यांचा उल्लेख सौ.सरोजताई करतात. राजकीय क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात उदंड लोकप्रियता असलेले प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचे व्यक्तीगत जीवन सार्वजनिक जीवनाइतकेच स्वच्छ व पारदर्शी आहे.

**डॉ.नरेंद्र दाभोळकर** :

२२५. भोळे भा.ल. व बेडकीहाळ किशोर, शतकानंतरच्या वळणावर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, प्र.आ. १० जून २००६

२२६. भोळे भा.ल. व बेडकीहाळ किशोर, डॉ.एन.डी.पाटील, व्यक्तित्व आणि कर्तृत्व, बदलता महाराष्ट्र, संपादक भोळे भा.ल.व बेडकीहाळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, प्र.आ. १६ जुलै २००३

२२७. भिडे जी.एल. व पाटील एन.डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास इ.स.१८१८–१९५०, फडके प्रकाशन, अथर्व अपार्टमेंट, कोल्हापूर, एकोणिसावी आवृत्ती, जुलै २०११

२२८. भोळे भा.ल., भारतीय शेतकरी कामगार पक्ष, जडणघडण वाटचाल, लोकवाडमयगृह, प्र.आ. २० नोव्हें. २०१०

२२९. भिलारे गुरूजी, आत्मनिवेदन, लोकमित्र गौरव ग्रंथ, ऑगस्ट, प्रकाशन संभाजीराव पाटणे, ऑगस्ट १९९९

२३०. महाजन शां.ग., महाराष्ट्राच्या ग्रंथालय चळवळीचे शिल्पकार , युनिव्हर्सल प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे २, प्र.आ. २०११

२३१. मंत्री रमेश, सुंदर सातारा इ.स.१९२१–२०१०, अनुभव प्रकाशन, श्रीधर हनुमान रस्ता, मुंबई ५७, प्र.आ., २६ जानेवारी १९८६

२३२. मॅथ्यू ए.व्ही.कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकाशन सचिव रयत शिक्षण संस्था, सातारा, प्र.आ. १९८८

२३३. मेश्राम एल.जी.भारतीय रिपब्लिकन पक्ष, कोल्हापूर, प्रचार प्रकाशन, प्र.आ. १९९२

२३४. माने राजा, महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतदादा, सुविद्या प्रकाशन, सोलापूर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ.२७ फेब्रुवारी २०१२

२३५. माने लक्ष्मण, का कराचं शिकून ? ,ग्रंथाली प्रकाशन, गोखले रोड, दादर, मुंबई, प्र.आ.२५ डिसेंबर २००३

२३६. माने डी.ए., शिल्पकार यशवंतराव चव्हाण, नयन प्रकाशन, विसापूर, ता.तासगाव, प्र.आ. ३०.०४.१९८७

२३७. मिसाळ सवितादेवी, महाराष्ट्राचे भाग्यविधाते ना.बाळासाहेब देसाई, प्र.आ., १ फेब्रुवारी १९६७

२३८. विजय शंकर, कराड प्रितीसंगमावरच आदितीर्थ, ग्रंथाली, ज्ञानयज्ञ प्रकाशन, २००९

२३९. स्वातंत्र्यसेनानी माने माधवराव, राष्ट्रसेवादलातील अनमोल हिरेमोती, निर्मिती संवाद प्रा.लि.राजाराम पेठ, कोल्हापूर २, प्र.आ., २६ जून २०१५

२४०. माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, प्रकाशन गो.रा.माटे, शनिवार पेठ, सातारा प्रथम आवृत्ती, जाने १९८८

२४१. मगदूम आ.भा., कर्मवीर भाऊराव पाटील जीवनकार्य, रयत अमृत स्मरणिका, १९९७–९८

२४२. मुरूमकर लता, दलित पँथर चळवळ, सुगावा प्रकाशन, ८६१/१, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट १९९५

२४३. मोरे शंकरराव, शेतकरी कामगार पक्ष आढाव व आराखडा, प्र.आ., पुणे १९४८

२४४. मून मिनाक्षी, फुले आंबेडकरी स्त्री चळवळ, समता प्रकाशन, लष्करी बाग, नागपूर, पाचवी आवृत्ती, २० मार्च २०१४

२४५. मेहेंदळे विश्वास, यशवंतराव चव्हाण ते पृथ्वीराज चव्हाण, अनुबंध प्रकाशन, पुणे ४३, चौथी सुधारीत आवृत्ती, १० ऑगस्ट, २०१२

२४६. मोदी नवाझ (संपा.), भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रिया, मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे ३०, प्र.आ.२००३

२४७. मानव श्याम, वादळ अंधश्रध्देचे, मनोविकास प्रकाशन, नारायण पेठ, पुणे ३०, दुसरी आवृत्ती, ११ ऑगस्ट २०१४

२४८. मेघावी अमित (संपा.), डॉ. साळुंखे आ.ह., तथागत बुध्दांचा उपदेश आणि परिवर्तनवादी चळवळी, साळुंखे आ.ह. यांची भाषणे, लोकायत प्रकाशन, गेंडामाळ, सातारा, पहिली आवृत्ती, जुलै २०१४

२४९. माडखोलकर ग.त्र्य., मराठी भाषिकांचे आशास्थान, यशवंतराव अभिनंदन ग्रंथ, प्रथम आवृत्ती, १२ मार्च १९६१

२५०. म्हमाणे अनिल, गोटल संतोष, मानवमुक्तीसाठी भारत पाटणकर, भाग १, निर्मिती संवाद, कोल्हापूर, प्र.आ.५ मार्च २०१२

२५१. मोरे शंकरराव, शेकाप आढावा व आराखडा, प्रकाशक भाई जयंत पाटील पेझारी, आंबेकर, ता.अलीबाग, प्रथम आवृत्ती, ६ मार्च २०१०

२५२. मोहिते यशवंतराव, निवडक भाषणे, यशवंतराव मोहिते गौरव ग्रंथ, मुंबई विधानसभा ठराव, प्रकाशन मदनराव मोहिते, भारती प्रिटींग प्रेस एरंडवना, पुणे ३८, सन १९५३

२५३. माने राजा, महाराष्ट्राचे शिल्पकार, वसंतदादा, प्रकाशक, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, प्र.आ.,

महाराष्ट्र राज्य साहित्य आनि संस्कृती, २७ फेब्रुवारी १९१२

२५४. मंचरकर र.बा., रयत शिक्षण संस्था आणि अस्पृश्यता निवारण, रयत स्मरणिका, १९९९

२५५. यादव सुमित संभाजी, क्रांतिसिंह नाना पाटील १९००–१९७६, अध्यक्ष, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा, प्र.आ. ३० जाने.२०१५

२५६. रानडे वा.दा., समाजवादी चळवळीची वाटचाल, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे ३०, प्रथम आवृत्ती, २६ जानेवारी २०१०

२५७. राऊत भारतकुमार, शिवसेना हार आणि प्रहार, अनघा प्रकाशन, ठाणे पूर्व, प्रथम आवृत्ती, मार्च २००६

२५८. रयत अमृत (संपा.), रयत शिक्षण संस्था, स्वावलंबी शिक्षणाचे तीन प्रयोग, बॅरि.पी.जी.पाटील अमृत महोत्सवी स्मरणिका १९९७–९८

२५९. रघूवंशी राजेश रमेश, प्रकाशक, शूद्र मूळचे कोण होते ? डॉ.आंबेडकर बाबासाहेब, राजेश प्रकाशन गिरीजा सोसायटी, पुणे ३८, आवृत्ती, १९९६

२६०. लिंबाळे शरणकुमार (संपा.), दलित चळवळ, प्रचार प्रकाशन, कोल्हापुर सागरमाळ, प्रथम आवृत्ती, एप्रिल १९९१

२६१. लिंबाळे शरदकुमार (संपा.), भारतीय रिपब्लिकन पक्ष, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, मार्च १९९२

२६२. लागू त्र्यं.ह., ग्रंथालय संघटन, शि.रा.रंगनाथन स्मारक समिती, पुणे, प्र.आ.१९७५

२६३. लाड जी.डी.पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, भारती विद्यापीठ प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे ३०, प्र.आ. ९ ऑगस्ट १९८६

२६४. लिंबाळे शरणकुमार (संपा.), शतकातील दलित विचार, दिलीपराज प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे ३०, प्रथम आवृत्ती, १५ जुलै २००१

२६५. लिंबाळे शरदकुमार, भारतीय दलित पॅथर, प्रकाशक सौ.नंदिनी गवळी, सम्राटनगर, कोल्हापूर ४१६००८, प्र.आ.जून १९९२

२६६. लिमये मधू, राजकीय जीवनाचे चार अध्याय, यशवंतराव चव्हाण केळकर भा.कृ., महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, प्र.आ. मुंबई २०१०

२६७. वाजपेयी अटलबिहारी, व्यक्तीत्व का सुगंध, केळकर भा.कृ.(संपा.), यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तीमत्व, म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, व्दि.आ. मुंबई, २०१०

२६८. वाघ रामनाथ (संपा.), युगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ प्रकाशन, अहमदनगर, व्दि.आ., २०१०

२६९. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकार, उषा प्रकाशन, राजारामपूरी ४ थी गल्ली, कोल्हापूर,

प्र.आ.डिसेंबर २००३

२७०. शिंदे अरूण (संपा.), सत्यशोधकांचे शेतकरीविषयक विचार, दर्या प्रकाशन, सी १४, शिवस्मृती सोसायटी, भारती विद्यापीठ, कात्रज, पुणे, ४११०४६,प्र.आ. १५ ऑगस्ट २०१२

२७१. शिवणीकर राघव, सातारचा सिंह, क्रांतिसिंह नाना पाटील समग्र चरित्र, प्रकाशक एस.एम.अधाटे पब्लिकेशन, पुणे, प्र.आ., १५ ऑगस्ट २०००

२७२. शिंदे आबासाहेब, प्रतिसरकार, १९४२ च्या क्रांतीतील सातारा, जिल्हा कॉग्रेस आय कमिटी, सप्टें.२००९

२७३. शिंदे रमेश, कर्मवीरांच्या अथक संघर्षाचा इतिहास, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, काल आणि आज निर्मलकुमार फडकुले (संपा.) , मुंबई, २००२

२७४. साळुंखे पी.बी., राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, बर्थ सेन्टेनरी कॉमेमीरेशन, मुंबई, १९७२

२७५. साळवी शंकरराव, स्मृती संकलन भारतीय खेळाचा त्राता, संपादक केळकर भा.कृ., यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तीमत्व, म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, व्दि.आ. मुंबई, २०१०

२७६. सायनाकर विश्वास, पाटील एन.डी, श्रमिक प्रतिष्ठान, बिंदू चौक, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर २०१२

२७७. सायनाकर विश्वास, पाटील एकनाथ, १९७२ चा दुष्काळग्रस्तांचा लढा, प्रा.डॉ.एन.डी.पाटील प्रतिष्ठान सांगली, प्रथम आवृत्ती, १९ आक्टोंबर २००८

२७८. सकटे मच्छिंद्र, मातंग चळवळ आणि मी, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १९९२

२७९. साळुंखे आ.ह., हिंदु संस्कृती आणि स्त्री, लोकवाडमय गृह, प्रभादेवी मुंबई, अकरावी आवृत्ती, मे २०१३

२८०. साळुखे शरद, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे दैनंदिनी, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, ८ ऑगस्ट २०११

२८१. सरदेसाई गो.स.मराठी रियासत, खंड १, सुधारीत आवृत्ती, १९८८, मुंबई

२८२. साळुंखे अभयकुमार, डॉ.बापूजी एक आदशेवत दैवत, साप्ताहिक रामप्रताप, ८.८.२००१

२८३. सिंगारे अनिल, घुले विठ्ठल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास १८९१ ते १९९४, अरूणा प्रकाशन, लातूर, प्र.आवृत्ती २६ नोव्हें.२००९

२८४. सरदेसाई गो.स.मराठी रियासत, खंड ३, सुधारीत आवृत्ती, १९८८, मुंबई

२८५. सुराणा पन्नालाल (संपा.), आजचा महाराष्ट्र, श्री विद्या प्रकाशन, शनिवार पुणे ३०, प्रथम आवृत्ती, २४ ऑक्टों.१९८८

२८६. अभिनेत्री सुलोचना, स्मृतीसंकलन, जीवनाचं सार्थक, केळकर भा.कृ.(संपा.), यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तीमत्व, म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, व्दि.आ. मुंबई, २०१०

२८७. सुर्वे गजानन, डॉ.बापूजी साळुंखे, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे षष्ट्यब्दपूर्ती समिती प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, २००२

२८८. सूर्यवंशी के.जी., बहुजन हिताय, बहुजन सुखाय, प्रकाशन जगताप, शुक्रवार पुणे २, प्रथम आवृत्ती, सन १९६४

२८९. सूर्यवंशी राजाराम, गुरूवर्य विचारे चरित्र प्रकाशन सत्यशोधक, छत्रपती ज्ञानपीठ, धुळे, दिनांक नाही

२९०. सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड २, मुंबई रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ताडदेव, मुंबई, तिसरी आवृत्ती, १९३५( सरदेसाई गो.स.खंड १, खंड ३, खंड ६, खंड ८, पॉप्युलर प्रकाशन, ताडदेव, मुंबई, नवीन संपादित आवृत्ती)

२९१. व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, महाराष्ट्रातील सत्तांतर, ग्रंथाली प्रकाशन, प्र.आ. मुंबई, १ जानेवारी १९९६

२९२. क्षिरसागर रामचंद्र, भारतीय रिपब्लिकन पक्ष, नाथ प्रकाशन, नागेश्वरवाडी, औरंगाबाद, प्र.आ.जुलै १९७९

**English Resources - Secondary Books**

1. Baliga A.V.¸ A versatile Personality¸ Forty eighth Birthday Publication Nagpur/ Mumbai¸ 12 March¸ 1961
2. Choudhari K.K., Maharashtra and Indian Freedom Struggle, Mumbai, First Edition1985
3. Guru Gopal 2001a The Language of Dalit Bahujan Political Discourse - 'In Dalit Identity and Politics, Edited by Gkanshvam Shaha, New Delhi, Sage Publication 2001
4. Nalawade Vijay - The Life and career of Deshbhakta Keshavrao Jedhe, Publication Deshbhakta Keshavrao Jedhe Sanstha, Pune 37, First August 1997
5. Phadake Y.D., Politics and Language, Himalaya Publication, Mumbai, First Edition, 1979
6. Phadake Y.D., 'Social Reforms of Maharashtra' Maharashtra Information Centre, First Edition New Delhi 1985

**स्मरणिका** :

१. उत्तेकर सुनिता, माने राजेंद्र, कदम सुनिता, संपा.– ग्रंथमित्र, दशकपुर्ती स्मरणिका, साहित्य कला विकास प्रतिष्ठान, सातारा प्रकाशन, सातारा २००९

२. बोराटे वसंतराव, पटवर्धन इ.संपा. – प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, अमृतमहोत्सव, स्मरणिका, प्रकाशक प्रा. नानजकर श्रीपाद, वाई, २५ जानेवारी १९९४

३. रौप्य महोत्सवी दुधसागर संपादक व प्रकाशक जाधव भाऊसाहेब धुराजी, दूधसागर, स्मृतिछाया, कराड, २४ आक्टों. १९८३

४. थोरात जे.वाय.किणीकर संपा.काकासो करंबळेकर स्मरणिका १९८० हसरे वैभव, स्मारक समिती, चव्हाण यशवंतराव , पाटील पी.डी., कराड, ५ सप्टेंबर १९८०

५. कराड नगरपालिका, शतसांवत्सारिका स्मृतिग्रंथ सन १८५५–१९५५, दि.२९ डिसें.१९५५

६. रयत शिक्षण संस्था 'रयत अमृत स्मरणिका समिती', – 'अमृतमहोत्सवी स्मरणिका' प्रकाशक प्रा.माने पी.एन. रयत शिक्षण संस्था, सातारा, १७.०५.१९९४

७. मगदूम आ.भा., काटकर मा.भि.व पंडित संपा. – 'कर्मयोगी कर्मवीर'– निवडक भाषणे स्मरणिका

८. रयत शिक्षण संस्था, प्रकाशन, सातारा, प्रथम आवृत्ती, २२ सप्टेंबर १९९६

९. सातारा जिल्हा कॉंग्रेस आय कमिटी प्रकाशक, 'परिवर्तन स्मरणिका', सातारा सप्टंबर १९९०

१०. कोल्हटकर जोत्स्ना (संपा.), 'शतकोत्तर हिरक महोत्सव २०१२–२०१३, नगर वाचनालय, सातारा, फेब्रुवारी २०१३

११. प्रतापसिंह महाराज थोरले नगर वाचनालय, सातारा, प्रकाशक जोशी बा.ग.नगरवाचनालय, सातारा, २ व ३ फेब्रुवारी २०१३

१२. पाटणे संभाजीराव – 'संस्कृती' – आयुष्य लक्ष पावलांचे ठसे, प्रकाशक सौ.पवार सुनिताराजे, नारायण पेठ, प्र.आ.पुणे ३०, १२ मार्च २०१३

१३. रयत शिक्षण संस्था(संपा.), सातारा, हिरकमहोत्सव समिती, हिरक महोत्सव स्मरणिका १९८२, सातारा, १४ जून १९८२

१४. सातारा नगरवाचनालय, १२५ वर्षापूर्वीची वाटचाल, स्मरणिका संपादक, प्रकाशक, नगरवाचनालय, प्र.आ.१५ डिसेंबर १९७८

१५. म.राज्य नागरी सहकारी पतसंस्था, प्रथम अधिवेशन स्मरणिका प्रकाशन, लंगडे दिलीप कराश, ६ जाने.१९९१

१६. लिबर्टी मजदूर मंडळ रौप्यमहोत्सवी, संदर्भ ग्रंथ, 'खेळिया' १९७९ पवार आप्पा संपादक, संसुद्दी शं.म.प्रकाशक, कराड, मे १९७९

१७. जाधव भाऊसाहेब (संपा.), बभ्रुवाहन जाधव कापील, कराड, संचालक, कृष्णा सहकारी साखर कारखाना, 'स्मृतींची चाळता पाने' – स्मरणिका 'दुधसागर', प्रथम आवृत्ती, २४

आक्टों.१९८३

१८. मोहिते दिलीपकुमार, भारतमातेचं अनमोल रत्न, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे, साप्ताहिक रामप्रसाद, ८ ऑगस्ट २०११

१९. दी कराड अर्बन को – ऑप बँक लि.कराड, १९६७, स्मरणिका

२०. टिळक हायस्कूल स्मृतिग्रंथ, हिरक महोत्सव १९२९–१९८१, कुलकर्णी रा.ना. संपादक, टिळक हायस्कूल, कन्या शाळा, आत्माराम विद्यामंदीर, नूतन मराठी शाळा, कराड, प्रकाशक कुलकर्णी शं.पु., नोव्हें.१९८१

२१. टिळक हायस्कूल स्मृतिग्रंथ, १९७१, सुवर्ण महोत्सव १९२१ ते १९७१ पागणीस भा.म. संपादक, प्रकाशक देशपांडे म.रा., कराड, आक्टोंबर १९७१

२२. कन्याशाळा कराड, रौप्यमहोत्सव १९७१ स्मृतीग्रंथ, शिक्षण मंडळ कराड, अध्यक्ष, ओगले शंकरराव नियामक अळतेकर गणेश, कराड, १ डिसेंबर १९७१

२३. म.कर्वे स्त्री शिक्षण संस्था शताब्दि महोत्सव स्मरणिका १९९६–९७ स्थापना, १४ जून १८९६ शताब्दि महोत्सव १२ जाने १९९७, स्मरणिका जोशी वा.भा. संपादक, कर्वेनगर पुणे, जाने १९९७

२४. म.कर्वे स्त्री शिक्षण कन्याशाळा, सातारा, अंतरंग २०११–१२, सौ.शारदा कदम संपादक, सातारा, एप्रिल २०१२

२५. श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था देऊर सुवर्णमहोत्सवी वाटचाल स्मरणिका, सन २००५–०६, डिसेंबर २००५

२६. जयवंतराव भोसले एक समाजधुरीण, कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स, मलकापूर प्रकाशक, प्र.आ.स्मृतिग्रंथ, मलकापूर, कराड २०११

२७. कराड नगरपालिका एक सांस्कृतिक केंद्र, शिवाजी स्टेडियम स्मरणिका, २९ एप्रिल १९७३

२८. सातारा शहर नगरपालिका शताब्दी महोत्सव स्मृतिग्रंथ सप्तर्षि आमची शाहूनगरी, २६ जानेवारी १९५४

२९. 'चैतन्य स्मरण संपादक, वाळवा सहकारी साखर कारखाना, साखराळे, राजारामबापू पाटील स्मरणिका १९८५' स्मरण पहिले, साखराळे, इस्लामपूर, १७ जानेवारी १९८५

३०. आंबेडकर अकादमी सातारा, कार्यवृत्तांत, सातारा, जून १९९२

३१. रोटरी क्लब कराड, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, फेब्रु.१९८२

३२. पाटील लीला, स्त्री कौटुंबिक व सामाजिक स्थिती', – परिवर्तन मंच – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, कराड प्रकाशन, जून २००१

३३. पाटील सुमन, 'लोकसाहित्यातील स्त्री जीवन व परिवर्तनाच्या दिशा', यशवंतराव चव्हाण

प्रतिष्ठान विभागीय केंद्र, कराड प्रकाशन, जून २००१

३४. क्रांतिसिंह कॉ.नाना पाटील जन्मशताब्दी स्मरणिका, महाराष्ट्र राज्य किसान सभा, २०००

**गौरव अंक :**

१. पाटणे संभाजीराव (संपा.), स्वातंत्र्यसंग्रामातील सातारा जिल्हा, ऑगस्ट क्रांती सुवर्णमहोत्सव सातारा, दि. ९.८.१९९२

२. सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, संपादक, पाटणे संभाजीराव, प्रकाशक मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा जिल्हा परिषद, सातारा, सन १९८७

३. पाटणे संभाजीराव (संपा.), वैभवशाली सातारा, परिवर्तन, सातारा जिल्हा कॉंग्रेस (आय) कमिटी प्रकाशन, फेब्रुवारी १९९०

४. संपा.प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ, डिसेंबर १९९९

५. ना.बाळासाहेब देसाई (संपा.) एकसष्टी सत्कार समारंभ अंक, शहा पद्मश्री देवचंद सी श्री.बाळासाहेब देसाई एकसष्टी गौरव विशेषांक, प्र.आ. प्रकाशन वर्ष , १० मार्च १९७०

६. किसन वीर सत्कार समिती (संपा.), किसन वीर सत्कार ग्रंथ, २७ ऑगस्ट १९६७, संपादक लोकमित्र देशभक्त भि.दा.भिलारे गुरूजी गौरव ग्रंथ समिती शाहूपुरी, सातारा, ऑगस्ट, १९९९

७. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ मुंबई १४ (संपा.), ग्रंथालय विचार, वासुदेव भट सत्कार प्रसंगी प्रकाशन दादर, मुंबई, २० जाने.१९७१

८. सहकार गौरव ग्रंथ (संपा.), सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा, २८ जून १९९९

९. पाटणे संभाजीराव (संपा.), देशभक्त बाबुराव घोरपडे गौरव ग्रंथ, रविवार पेठ, सातारा, ३० जून १९९०

१०. पाटणे संभाजीराव, पुण्यशील राजमाता सुमित्राराजे भोसले ग्रंथालय गौरवगाथा प्रकाशन सातारा, रविवार, ८ मार्च २०१५

११. क्रांतीवीर माधवराव जाधव जीवन दर्शन, माधवराव जाधव गौरव समारंभ, संपा. वसंत पालकर, कराड, जुलै १९७१

१२. साळुंखे एम.बी. (संपा.), दे.भ.तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ, प्र.आ., २५ जाने.१९८२

१३. शिवगौरव सुवर्णमहोत्सवी १९९६–१९९७, छ.शिवाजी कॉलेज, सातारा, शिवगौरव स्मरणिका १९९६–९७

१४. मुंडे जीवनगौरव, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, संपादक थोरात राहूल, प्र.आ. १०

मार्च २०१३, डोंबिवली

१५. भक्तिबिंब, वि.पु.गोखले, षष्ठयपुर्ती गौरव समारंभ गौरविका गौरव समिती, कराड, सन १९९८

१६. भोसले जयवंतराव गौरव समिती रेठरे बु.।। गौरव ग्रंथ, २२ डिसेंबर १९७४

१७. गुजर जयवंत, वाई शहराची गौरव गाथा, लोकहित, वाई १९९२

१८. कुलकर्णी मुकुंदराव, ढवळे बाळासाहेब संपा., शंकराप्पा संसुद्यी गौरविका, प्रकाशन गौरव समिती, कराड, १० सप्टेंबर १९९१

१९. भोसले विकास मुकुटराव संकलन, 'भाग्यविधाते आदरणीय पी.डी.पाटील साहेब, वाढदिवस गौरविका, प्रकाशक, भोसले स्वाती, विद्यानगर, कराड, १ जुलै २००८

२०. शेटे आश्विनी अशोक कराड, जयवंतराव भोसले परिचय, ग्रामीण विकास विश्वस्त संघ रेठरे बु.।। ता.कराड, पुस्तिका, दिनांक नाही

२१. मेमन अे.अे., मानवतेचा थोर नंदादिप, ना.बाळासाहेब देसाई आणि त्यांचे काही विचार, दि. १३ फेब्रुवारी १९७०

२२. सातारा जिल्हा ग्रंथालय संघ (संपा.), गौरवगाथा, वार्षिक अधिवेशने, प्र. आ., ८ मार्च २०१५

२३. अमृत महोत्सवी समिती रहिमतपूर (संपा.), लक्षपर्व, मा.खासदार लक्ष्मणराव पाटील गौरवग्रंथ, संपादक पाटणे संभाजीराव, २३ फेब्रुवारी २०१३

२४. प्रकाशक जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ, ४८ वा जन्मदिन, सत्कार समिती नागपूर, १२ मार्च १९६१

२५. ठोके मो.नि., यशवंतराव मोहिते गौरवग्रंथ रेठरे बु.।।, ७ नोव्हें.१९९५

**विशेषांक** :

१. ठोंबरे महादेव शेतकरी (संपा.), आक्टों.नोव्हें., कर्मवीर भाऊराव पाटील विशेषांक, शेतकरी मासिक कृषी संचलनालय पुणे, आक्टों./ नोव्हें.१९८७

२. कार्यकारी संपादक, रयत शिक्षण पत्रिका, कर्मवीर विशेषांक, जुलै ते डिसेंबर २०१४, वर्ष ४९

३. यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय, कराड, यशवंतराव चव्हाण एक स्मरण प्रकाशन, १२ मार्च १९८६

४. जाधव मा.मा. (संपा.), पुरोगामी परिवर्तनवादी त्रैमासिक अक्षरगाथा, डॉ.आ.ह.साळुंखे विशेषांक, वर्ष ३ रे, अंक चौथा, १० जानेवारी २०१३

५. मोहिते सविता (संपा.), अक्षरयज्ञ २००९-१०, यशवंतराव मोहिते स्मृतिविशेषांक,

२००९–१०, रेठरे बु.ता.कराड, जि.सातारा

६. साप्ताहिक साधना, शिंदे रावसाहेब, रयत शिक्षण संस्थेची ग्रामीणतेकडून गुणवत्तेकडे वाटचाल, नरेंद्र दाभोळकर(संपा.), सदाशिव पेठ, पुणे ३०, अंक ३१/१६ मार्च २०१३

७. पाटील एन.डी. (संपा.), यांचा दै.क्रांतिसिंह कार्यगौरव विशेषांक, ३० डिसेंबर २००३

८. चौसाळकर अशोक, महाराष्ट्राचे राजकारण सुवर्ण महाराष्ट्र विशेषांक, नवभारत मे २००९

९. चौगुले एस.एम., आमचे शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई स्मृती विशेषांक सांगली, प्रथम आवृत्ती, जून १९६१

१०. गायकवाड आर.डी. (संपा.) , क्रांतिसिंह नाना पाटील विशेषांक, रयत शिक्षण संस्थेची रयत शिक्षण पत्रिका, सन १९७६

११. यादव उत्तमराव (संपा.), क्रांतिसूर्याची भेट, लोकनेते बाळासाहेब देसाई, कृष्णा कोयना स्व.यशवंतराव चव्हाण जयंती समारंभ विशेषांक २०१०, कामिनी यादव प्रकाशन गारवडे, ता.पाटण, वार्षिक अंक २०१०

१२. जोशी राजाराम (संपा.), साप्ताहिक धूमकेतू, बाळासाहेब देसाई स्मृती विशेषांक, २३ एप्रिल १९८७

१३. लोकनेते विलासकाका, राजकीय सामाजिक कारकिर्द, प्रकाशन २० ऑगस्ट २०१४, कराड, संकलन राजेंद्र पाटील

१४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक, यशवंत कळमकर (कार्यकारी संपादक), प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई २००१, प्रकाशक सीताराम रायकर वाई, २७ जानेवारी २००१

१५. ६६ वे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, शंकर सारडा (संपादक), सातारा १९९३

१६. ७६ वे आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, कराड २००३

१७. अक्षरधन (संपा.), अंक ३८ कराड साहित्य संमेलन विशेषांक कराड, मार्च २००३

१८. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सातारा १९९२–९३, रविवार पेठ, शिवाजी सर्कल, सातारा

१९. ग्रंथमित्र पाटणे संभाजी, नवीन ग्रंथालय मार्गदर्शिका, प्रथम आवृत्ती, शाहूपुरी, सातारा, १७ जानेवारी २०१०

२०. क्रांतिस्मृतीवन सुखद दुःखद कहाणी, बलवडी, कार्यवाह पवार संपतराव, दि. २१.१२.१९९८

२१. सातारा नगरपरिषद सातारा अर्थसंकल्पीय अंदाज पत्रक २०००–२००१

२२. राष्ट्रवादी डिसेंबर २०१२ शरद पवार यांचे वाढदिवसानिमित्त पाणलोट क्षेत्र विकास १२.१२.२०१२, संपादक भोंगळे सुधीर, मुंबई, १२ डिसेंबर २०१२

२३. लाड जी.डी.बापू, क्रांतिपरिक्रमा, स्मृतीअंक, लक्ष्मी प्रेस, कुंडल ८० व्या वाढदिवसानिमित्त, दिनांक नाही

२४. पाटील व्ही.वाय (संपा.), क्रांतिअग्रणी, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे १२५ जयंती निमित्ताने स्मृती अंक, कुंडल, २२ सप्टें.२०१२

२५. पाटील व्ही.वाय (संपा.), क्रांतिअग्रणी, दिवाळी अंक, कुंडल, २७ ऑक्टों.२०१०

२६. पाटील व्ही.वाय, क्रांतिअग्रणी, जी.डी.बापूंना भावपूर्ण श्रध्दांजली, कुंडल, २७ नोव्हें.२०११

**नगरपालिका नगरवाचनालय व्याख्यानमाला** :

१. चव्हाण यशवंतराव व्याख्यानमाला, वर्ष १९७३ नगरपालिका नगरवाचनालय कऱ्हाड, प्रकाशक पाटील पी.डी., वर्ष पहिले, प्रका.१२ मार्च १९७४ ते सन १९९८ पर्यंतचे व्याख्यानमाला १३ विशेषांक.

२. मंगुडकर मा.प., यशवंतराव चव्हाण प्रेरणा व कार्य, प्रकाशक मंगुडकर १९९० सदाशिव पेठ, पुणे ३०, १९९२

**शोधनिबंध** :

१. निवडक शोधनिबंध संग्रह, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद प्रकाशन, फेब्रु.२००७ ते २०११ पर्यंतचे शोधनिबंध

२. निवडक शोधनिबंध संग्रह, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा प्रकाशन, २ ऑक्टों.२०१०, पहिले राज्यस्तरीय अधिवेशन २०१०, २०१४ व २०१५

## (परिशिष्ट – १) क्रांतिसिंहाचे हस्ताक्षर व स्वलिखित पत्र

परिशिष्ट क्र. अ

क्रांतिसिंहांचे हस्ताक्षर :

भगवानराव पाटील (बप्पा) यांना पाठविलेले पत्र पहिले पान

तारीख ॥ जय सं. महाराष्ट्र ॥ शिमोगा लॉकप जेल
३०-१२-५८ जि. शिमोगा
(म्हैसूर राज्य)

आमदार भाई बप्पा यांना

प्रेमपूर्वक नमस्कार :—

आपले सर्वांचे आशिर्वादे करुन शिमोगा जेल मध्यें सुख-रुप आहे कांहीं काळजी नसावी. आपलें तारीख २८ चें व ता. २७ चें अशी दोन पत्रें मिळाली मजकूर समजला ता. २८ चें पत्रांत लिहीलें प्रमाणें श्री. सुरेश यांचे कडून प्रभात व मराठा असे दोन पेपर मिळण्याची व्यवस्था झाली आहे परंतु एखादे वेळीं पेपर मिळत नाहीं त्याला शोगा-चाच कांहीं इलाज नाहीं. कारण जेलचे आफीस मध्यें कोणा ला मराठी भाषा येत नाहीं मला कानडी समजत नाहीं पत्राचाही असाच थोडासा घोटाळा असतो एकंदरीत बरे आहे — आपलें तालुक्यांत ६५ चे वर सत्याग्रही नें सत्याग्रह केल्याचे वाचून फार समाधान झाले. तालुक्यांत काम चांगले चालले आहे हे वाचून आनंद झाला करंजे येथील श्री. भिमराव पैलवान आदींनी सत्याग्रह केल्याचे वाचून आश्चर्य वाटले. भाई धोंडीराम भगवानराव फारच श्रम झाले सर्व कार्यकर्ते आपले परीने काम करीत असल्याचे वाचून फार आनंद झाला. चालू वर्षी पिक पाणी बरे असल्याचे व मळणी झाल्याचे वाचून समाधान झाले नवीन विहीरींचे काम चालू असल्याचे वाचले तसेच सर्व

## (परिशिष्ट– २)

### परिशिष्ट क्र. ब
### क्रांतिसिंह नाना पाटील यांना पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे पत्र

PRIME MINISTER

No. 185-PMH/70

New Delhi,
March 19, 1970.

Dear Shri Patil,

You and Shri Deshmukh have sent me an application from some cultivators of village Patoda in Beed District, asking for the waiving of the bunding loan advanced by the State Government. I am sure you will appreciate that this is not a matter in which the Central Government can do anything. I am sending the application to the Chief Minister of Maharashtra.

With kind regards,

Yours sincerely,

Indira Gandhi

(Indira Gandhi)

Shri Nana Patil, MP,
21 North Avenue,
New Delhi.

## (परिशिष्ट– ३)

### परिशिष्ट– क
### मुंबई पुराभिलेखागार येथील निवडक कागदपत्रे
### होम डिपार्टमेंट फाईल नंबर (१४) अे (१४), १९३२, पृष्ठ – १५

25.1.32
D/15

**Confidential.**

No. 1687. of 193

Satara: 23rd January 193

From

R. S. Hiremath, Esquire, L. Ag.,
District Magistrate, Satara.

To

The Secretary to Government of Bombay,
Home Department (Special), Bomb

Sir,

I have the honour to report that Nana Ramch Patil of Yedemachindra ~~has been~~ was arrested on 22-1-1932 under section of the Ordinance II of 1932 and has been sent to Yeravd Jail with a requisite warrant of remand. The Superintende Yeravda Prison has been requested to detain him in his custody pending further orders from Government.

2. This man caused a lot of trouble in the last Civil Disobedient Movement and is also a very violent speaker. His name appears in the special list. His dete tion in the jail for a period of 2 months is, therefore, recommended. Government may, therefore, be pleased to p early orders in the matter.

## (परिशिष्ट – ४) राष्ट्रपिता गांधीजी व कर्मवीर भाऊराव पाटील यांची हस्ताक्षरे




राष्ट्रपिता महात्मा गांधींनी स्वत:च्या हस्ताक्षरातील पत्राद्वारे कर्मवीर भाऊराव पाटील यांचा केलेला गौरव (९. १. १९४८)

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे हस्ताक्षर

(परिशिष्ट– ५)



सुवर्णमहोत्सव

# रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक योगदान

मा.प्रा.एन.डी. पाटील



**रयत शिक्षण संस्थेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त रयत शिक्षण पत्रिकेसाठी संस्थेचे चेअरमन मान. प्राचार्य एन.डी. पाटील यांची प्राचार्य मा.के. यादव व संपादक मंडळाच्या सभासदांनी घेतलेली प्रदीर्घ मुलाखत पुनर्मुद्रित करीत आहोत.**

**– संपादक**

✦ **अमृतमहोत्सव साजरा करण्यापाठीमागील आपली भूमिका विशद करा.**

✦ रयत शिक्षण संस्था ही एक शिक्षण संस्था असली तरी महाराष्ट्रामध्ये ज्या अनेक शिक्षण संस्था आहेत त्यापैकी एक शिक्षण संस्था असे तिचे स्थान नाही. या संस्थेला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनामध्ये, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीमध्ये आणि पिढ्यान्‌पिढ्या शिक्षणाला वंचित झालेल्या बहुजन समाजाच्या आणि तळागाळातील मुला-मुलींच्या शिक्षणाच्या प्रयत्नांमध्ये एक आगळं, वेगळं असे स्थान प्राप्त झालेलं आहे. त्याची कारणेही तशीच आहेत. ज्या कालखंडामध्ये बहुजन समाजाच्या शिक्षणाचा विचार न करता, समाजाचे त्यावेळचे नेते मूठभरांच्या उच्च शिक्षणाची फारतर माध्यमिक शिक्षणाची विवंचना करीत होते, त्या कालखंडात बहुजन समाजाचे शिक्षण व्हावे म्हणून, रयत शिक्षण संस्थेनेच सर्वप्रथम या उपेक्षित वर्गासाठी त्यांच्या त्यांच्या परिसरामध्ये प्राथमिक शाळा काढण्याचा एक अभिनव उपक्रम केला. 'गोरगरिबांची मुले दूरवरच्या शाळेमध्ये येऊ शकत नसतील तर माझी शाळाच या मुलांच्या दाराशी जाईल' असा निर्धार करुन कर्मवीर अण्णांनी या खेड्यापाड्यांतून प्राथमिक शिक्षणाच्या शाळांचं एक जाळं विणलं आणि बहुजन समाजातल्या आणि विशेषत: चंद्रमौळी झोपडीमध्ये जन्माला आलेल्या गोरगरीब पालकांच्या मुलांची गुणवत्ता या जाळ्यात खेचण्याचे काम त्या माध्यमातून कर्मवीर अण्णांनी साध्य केले. हा झाला गोरगरिबांना शिक्षण उपलब्ध करुन देण्याचा एक भाग. परंतु, याहीपेक्षा आणखी एका महत्वाच्या सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात रयत शिक्षण संस्थेने फार मौलिक आणि म्हटलं तर अभूतपूर्व अशी कामगिरी केलेली आहे. ज्या कालखंडात ज्यांना अस्पृश्य मानले जात होते अशा जातींच्या मुलांना शाळेच्या वर्ग खोलीमध्ये इतर सवर्ण हिंदू मुलांच्या बरोबरीने बसण्याची मुभा नव्हती. एकतर त्यांना शाळेची कवाडं बंद होती, किंवा अशा जातीतील एखादा मुलगा मोठ्या जिद्दीने प्राथमिक शाळेत आलाच तर त्याला वर्गामध्ये न बसविता वर्गाच्या बाहेर बसविले जात होते. अशा काळात कर्मवीरांनी अशाच एका दुर्दैवी मुलाला बरोबर घेऊन, रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आणि आपल्या शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ रोवली. आज हे सारंच चित्र पालटलेलं आपण पाहतोय. तथापि ज्या काळात रयत शिक्षण संस्थेने अठरा पगड जातींच्या मुलांना केवळ शाळेतच नव्हे तर वसतिगृहामध्ये एकत्र आणून, सख्या भावंडाप्रमाणे, एकाच छपराखाली एकाच चुलीवर स्वयंपाक करुन एक नव्या प्रकारचे, सामाजिक जीवन जगण्याची संधी उपलब्ध करुन दिली या गोष्टीचं महत्व हे निश्चितच अनन्य साधारण आहे. आणि म्हणून एका अर्थाने रयत शिक्षण संस्थेने जात, पात, पंथ, भेद विसरुन समाजातल्या सर्व जातीधर्माच्या मुलांना एकत्र आणून, एकत्र शिकवून, एकत्र वाढवून, एक नवा माणूस निर्माण करण्याची, एक अभिनव मूस या रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्राला बहाल केलेली असल्यामुळे अशा संस्थेच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक

परिवर्तनाच्या क्षेत्रात अद्यापि रेंगाळत राहिलेले प्रश्न धसाला लावावेत अशी आमची भूमिका आहे.

**✦ कर्मवीर अण्णांच्या या शैक्षणिक कार्याचे नेमके फलित काय ?**

✦ कर्मवीर अण्णांनी त्या काळामध्ये एक महत्वाची गोष्ट केली. ज्या कालखंडात इंग्रजी राज्यकर्त्यांच्या प्रशासनामध्ये प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या उच्चशिक्षणाचा प्रसार करण्यातच समाजातल्या पुढारलेल्या आणि शैक्षणिक दृष्ट्या आघाडीवर असलेल्या वर्गाची पावले पडत होती. त्या काळात महात्मा फुल्यांचा एक मान्यवर असा अपवाद वगळता, समाजाला उच्चशिक्षण देण्याच्या ऐवजी, सरकारी खजिन्यातील पैसा मूठभराच्या उच्चशिक्षणावर खर्च करण्यापेक्षा, तो प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर खर्च व्हावा अशी भूमिका घेतली जात नव्हती. १८८२ साली, हंटर कमिशनपुढे म.फुल्यांनी या देशातल्या प्राथमिक शिक्षणाला देखील वंचित झालेल्या करोडो लोकांची कैफियत अतिशय प्रभावी रीतीने मांडली. तरी देखील त्यानंतरच्या काळात राज्यकर्त्यांच्या धोरणात, अगर शैक्षणिक क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या वर्गाच्या धोरणात, फारसा फरक पडला नव्हता. १८५८ च्या राणीच्या जाहीर नाम्यानंतर, देशाच्या प्रशासनामध्ये हिंदी माणसांची मोठ्या संख्येने भरती करण्याचे धोरण घोषित करण्यात आले. या देशातल्या पदवीधरांच्यासाठी एक नवं दालन या निमित्तानं सुरु झालं. आणि साहजिकच या दालनात प्रवेश करण्यासाठी आसुसलेला जो मूठभर वर्ग होता, त्यांच्या उच्च शिक्षणासाठी ठिकठिकाणी महाविद्यालये उभारण्यात आली. सरकारी महाविद्यालयांच्या बरोबर काही खाजगी शिक्षणसंस्थांनीही अशी महाविद्यालये उभी केली. १८८५ सालामध्ये पुण्यात फर्ग्युसन कॉलेजच्या स्थापनेनंतर दोन वर्षानंतर कर्मवीर अण्णांचा जन्म झाला आणि अण्णा त्यानंतर वीसएक वर्षानंतर या शैक्षणिक क्षेत्रात उतरले. आणि त्यांनी मात्र आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात साताऱ्यासारख्या ठिकाणी महाविद्यालये उघडून केली नाही तर त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्याची मुहूर्तमेढ अठरापगड जातींच्या मुलांच्यासाठी एकच वसतिगृह आणि खेड्यापाड्यांतल्या मुलांच्यासाठी प्राथमिक शाळा-अशा दुहेरी प्रयत्नांनी केली. यावरुन अण्णांच्या शैक्षणिक कार्याचे फलित आपल्या लक्षात येईल. टिळक, आगरकर आणि कर्मवीर अण्णा यांच्या समोर, समाजाच्या कोणत्या वर्गाचं शिक्षण करायचं आहे यासंबंधीच्या कल्पना अतिशय सुस्पष्ट होत्या. असं मला वाटतं. टिळक आगरकरांच्या समोर असाच एक वर्ग होता की ज्या वर्गाचं प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मोठ्या प्रमाणात सरकारी खर्चाने होत होतं. आणि सरकारी नोकरीमध्ये शिरण्यासाठी त्याला ज्या पदवीपर्यंतच्या उच्चशिक्षणाची गरज होती. ती गरज भागविणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. याउलट कर्मवीर अण्णांच्या समोर असा वर्ग होता की ज्या वर्गाच्या माध्यमिक आणि उच्चशिक्षणाची चिंता ते करुच शकत नव्हते. या वर्गाच्या प्राथमिक शिक्षणाचा जिथे पत्ता नव्हता तिथे त्यांच्यासाठी त्याकाळात माध्यमिक विद्यालये आणि महाविद्यालये काढण्यामध्ये अण्णांना यत्किंचितही स्वारस्य नव्हते. आणि म्हणून अण्णांनी या विभागाचे शिक्षण करण्यासाठी, प्राथमिक शाळेपासूनच श्री गणेशा केला पाहिजे, हे ओळखून त्यांनी खेड्यापाड्यांतली, एरव्ही शिक्षणाला मुकणारी मुलं त्यांनी केवळ प्राथमिक शाळेतच आणली असे नव्हे, तर प्राथिमिक शिक्षणानंतरही पुढील माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण करण्यासाठी देखील, वसतिगृहांच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या शिक्षणाचा मार्ग खुला केला. आणि नेमकं फलित म्हणजे आज महाराष्ट्राच्या असंख्य खेड्यापाड्यांतील बहुजन समाजाची मुलं, बाराबलुतेदारांची मुलं, केवळ प्राथमिक शिक्षण घेऊनच नव्हे तर उच्चशिक्षण घेऊनही आपआपल्या परीने पुढे आली आहेत. आणि महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये ती आपापले योगदान करीत आहेत. कर्मवीर अण्णांनी हे कार्य त्या काळात केलं नसतं तर आज सार्वजनिक जीवनामध्ये ही वेगवेगळ्या स्तरांवर आणि वेगवेगळ्या पदांवर काम करणारी अनेक माणसं गुरं राखताना अगर शेतात औत धरताना दिसली असती.

**✦ कर्मवीर अण्णांच्या शैक्षणिक कार्याच्या सामाजिक बाजूची दखल संस्था आज घेते आहे का ?**

✦ एक तर, रयत शिक्षण संस्थेची सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रातली कामगिरी ही आज फक्त शैक्षणिक प्रश्नापुरतीच मर्यादित आहे की काय ? असा प्रश्न विचारण्याचा यामध्ये उद्देश असावा असं मला वाटतं. एक काळ असा होता की, रयत शिक्षण संस्थेनं शैक्षणिक कार्याबरोबरच जात, पात, पंथ भेद मोडून एक नवा समाज निर्माण करण्याची उर्मी समाजामध्ये निर्माण केली आणि जोपासली होती. त्याचं मुख्य हत्यार ही अठरापगड जातीची वसतिगृहं ही होती. तो काळच असा होता की ही वसतिगृहं स्थापन झाली नसती तर या मुलांचं शिक्षणच झालं नसतं. त्यामुळे 'रयत शिक्षण संस्था म्हणजे वसतिगृह युक्त शिक्षण' असंच समीकरण अनेक वर्ष मांडलं जात होतं. आणि या वसतिगृहयुक्त शिक्षणाचे संस्कार हे सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात अतिशय महत्वाचे होते. आज रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा पसारा माध्यमिक शाळांच्या स्वरुपात आणि महाविद्यालयांच्यां स्वरुपात खूपच वाढला असला तरी या विद्यार्थ्यांची संख्या ही निश्चितच नगण्य ठरत आलेली आहे. आपल्या गावातच किंवा गावाच्या शेजारच्या माध्यमिक विद्यालयात आणि महाविद्यालयात शिकणारी मुलं वसतिगृहात राहण्याच्या ऐवजी जाऊन येऊन शिक्षण घेतात हे लक्षात घेतलं पाहिजे. जात, पात, पंथ, भेद यांना मूठमाती देणारं वसतिगृह हे रयत शिक्षण संस्थेचं त्याकाळात एक खास वैशिष्ट्य होतं. ते वैशिष्ट्य आज त्या प्रमाणे चालू ठेवता आलेलं नाही या गोष्टीच्या संदर्भात हा प्रश्न विचारला गेला असावा असं मला वाटतं. तथापि त्या प्रश्नांच्या पाठीमागची ही जी एक व्यावहारिक अडचण आहे ती लक्षात घेतली पाहिजे. पण मग या प्रश्नाचं उत्तर मी एका वेगळ्या शब्दात देईन. आज

(परिशिष्ट– ६)

नामदार यशवंतराव चव्हाण हे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांना कर्मवीर अण्णांनी पत्र लिहून संस्था पाहण्याची विनंती केली व याप्रमाणे ना. चव्हाण यांनी ता. १७-८-५७ रोजी, सातारा येथील संस्थेचे कार्य पाहिले व आनंद व्यक्त केला. यानंतर कर्मवीरांनी त्यांना स्वावलंबी शिक्षण योजनेसंबंधी पाठविलेले हे पत्र.

# विद्यार्थ्यांनी, स्वावलंबनाने उच्च शिक्षण मिळवावे

श्री. नामदार यशवंतराव चव्हाण,
मुख्यमंत्री, मुंबई राज्य, मुंबई यांना....

भाऊराव पी. पाटील सातारा यांचा स. न. वि. वि.

आपण आमचे विनंतीवरून ता. १७.८.५७ रोजी सातारा येथील संस्थेच्या सर्व शाखा पाहिल्या व आनंद व्यक्त केला. या भेटीच्या वेळी संस्थेने छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये स्वावलंबी शिक्षणाची जी योजना चालविली आहे तीही पाहून आपण समाधान व्यक्त केले, याबद्दल मी आपला आभारी आहे. आजपर्यंत मी शिक्षणविषयक जे कार्य केले आहे व करीत आहे त्यावरून माझे असे ठाम मत झाले आहे की, महाराष्ट्रातील बहुजनसमाजाच्या मुलांना स्वावलंबी योजनेशिवाय शिक्षण घेता येणे कठीण आहे, व त्यानुसार मी १९४७ साली छ. शिवाजी कॉलेज, फ्री ॲण्ड रेसिडेन्शियल असे सुरू केले. परंतु या योजनेमुळे संस्थेस जादा तूट सोसावी लागत असल्याने संस्थेचे प्रेसिडेंट श्री. बापूसाहेब नलावडे व कॉलेजचे त्यावेळचे प्रिन्सिपॉल डॉ. ए. व्ही. मॅथ्यू यांनी मला या माझ्या धोरणापासून परावृत्त केले व इतर कॉलेजेसप्रमाणे

हे कॉलेज चालविण्यास भाग पाडले. त्या वेळी मी या मंडळींच्या विनंतीस तात्पुरता मान दिला. परंतु मला मात्र याबाबत अद्याप समाधान वाटत नाही. अद्यापि छत्रपती शिवाजी कॉलेज फ्री ॲण्ड रेसिडेन्शियल चालवावे असे वाटते.

विद्यार्थ्यांनी स्वावलंबनानेच उच्च शिक्षण मिळवावे अशी माझी इच्छा असून त्याप्रमाणे माझ्या कॉलेजात अल्पसा प्रयत्न सुरू आहे. हा प्रयोग १ टक्काही यशस्वी झाला आहे, असे मी मानावयास तयार नाही. परंतु माझी पावले या दृष्टीने व त्या मार्गावर पडत आहेत, त्याबद्दल मला बिलकूल शंका नाही.

उच्च शिक्षण, स्वावलंबाने विद्यार्थ्यांनी मिळवावे असे माझे ठाम मत आहे व या माझ्या मतप्रणालीस आपण सहमत असल्याचे मजला दिसून आले. त्यामुळे माझे कॉलेज फ्री ॲण्ड रेसिडेन्शियल चालविणे या माझ्या मूळ कल्पनेस व विचारास मोठीच बळकटी आलेली आहे. ता. २६.९.५७ रोजी संस्थेचे प्रेसिडेंट श्री. बापूसाहेब नलावडे हे आपणास भेटण्यास येणार आहेत, तेव्हा या माझ्या विचाराच्या अनुरोधाने आपणही त्यांना चार शब्द सांगावेत अशी विनंती आहे.

कळावे.

आपला,

**भाऊराव पाटील**

रयत सेवक

रयत शिक्षण संस्था, सातारा

२२-९-१९५७

## (परिशिष्ट- ७) मा.यशवंतराव चव्हाण यांचे हस्ताक्षर

### महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक धगधगीत व्यक्तिमत्व

**शुभेच्छा....**

महर्षि शिंदे यांच्या जीवन कार्याचे
दर्शन घडविणाऱ्या श्री. पवार यांच्या
या पुस्तिकेस माझ्या शुभेच्छा / ..

यशवंतराव चव्हाण

23-11-75

चारित्र्यसंपन्न, बुद्धिवान व ध्येयवादी कर्ते सुधारक म्हणून कर्मवीर शिंदे यांनी केलेली समाजसेवा बहुमोलाची आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणाऱ्या या पुस्तकास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

अदालत वाडा,
सातारा शहर.
ता. १९-१२-७५

सुमित्राराजे भोसले

(परिशिष्ट– ८)

# आंबेडकर अकादमीच्या कार्यक्रमांची सूची

७ जून १९९२ ते ३१ मार्च १९९९

## व्याख्याने

| अ.क्र. | विषय | वक्ते |
|---|---|---|
| १ | सध्याची सामाजिक व वैचारिक आव्हाने (अकादमीच्या उद्घाटन समारंभातील प्रमुख भाषण) | प्रा.य.दि.फडके, मुंबई |
| २ | बँक घोटाळा | श्री.प्र.ना.जोशी, सातारा (चेअरमन, यु.वे.बँक, सातारा) |
| ३ | नर्मदा आंदोलनाची सद्यस्थिती | श्रीमती मेधा पाटकर |
| ४ | कुटुंबसंस्थेची पुनर्घटना | श्रीमती विद्या बाळ, पुणे |
| ५ | नवीन आर्थिक धोरण (२ व्याख्याने) | श्री.बगाराम तुळपुळे, मुंबई |
| ६ | वैज्ञानिक दृष्टीकोन | डॉ.जयंत नारळीकर, पुणे |
| ७ | विश्वाच्या उत्पत्तीचे सिद्धांत | |
| ८ | अयोध्या विवाद : हिंदू विरूद्ध हिंदू | अरूण ठाकूर, नाशिक |
| ९ | डंकेल करार | डॉ.सुलभा ब्रम्हे, पुणे |
| १० | हिंदू अस्मितेचे राजकारण (२ व्याख्याने) | श्री.वसंत पळशीकर, वाई |
| ११ | एड्सची समस्या | डॉ.सुरेश महाजन, सातारा |
| १२ | भारतीय राष्ट्रवादाचे भवितव्य | प्रा.गो.पु.देशपांडे, नवी दिल्ली |
| १३ | धर्म व राजकारण फारकत विधेयक | प्रा.अशोक चौसाळकर, कोल्हापूर |
| १४ | भूकंप | डॉ.बी.जी.देशपांडे, मुंबई |
| १५ | प्रसार माध्यमे व मूलतत्त्ववादाचा मुकाबला | श्री.सदा डुंबरे, पुणे |
| १६ | धर्म आणि राजकारण | प्रा.एन.डी.पाटील, मुंबई |
| १७ | केंद्रीय अर्थसंकल्प | प्रा.अजित अभ्यंकर, पुणे |
| १८ | उत्तर भारतातील निवडणूक निकालांचा अन्वयार्थ | श्री.जगन फडणीस, कोल्हापूर |
| १९ | काश्मिर समस्या (२ व्याख्याने) | श्री.प्रकाश बाळ (नि.संपादक, लोकसत्ता, मुंबई) |
| २० | माध्यमे व दहशतवाद | श्री.निखिल वागळे (संपा. दै.महानगर, मुंबई) |
| २१ | रामायण व महाभारताचे ऐतिहासिक मूल्यमापन (२ व्याख्याने) | डॉ.यशवंत रायकर, मुंबई |
| २२ | विनोबा भावे : जीवन व कार्य | प्रा.राम शेवाळकर, नागपूर |
| २३ | महात्मा गांधी : जीवन व कार्य | प्रा.देवदत्त दाभोलकर, सातारा |
| २४ | खगोल शास्त्रापुढील आव्हाने | प्रा.मोहन आपटे, मुंबई |
| २५ | जाती, वर्ग आणि ग्रामीण भारतातील परिवर्तन | प्रा.द.ना.धनागरे (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) |
| २६ | वारकरी चळवळ व सामाजिक परिवर्तन | प्रा.सदानंद मोरे, पुणे |
| २७ | श्रीकृष्ण आयोगाचा अहवाल | श्री.रा.प.नेने, पुणे |
| २८ | सामाजिक चळवळींचे आकलन | प्रा.यशवंत सुमंत, पुणे |
| २९ | स्वातंत्र्योत्तर भारतातील संस्कृतीकारण | प्रा.पुष्पा भावे, मुंबई |
| ३० | कम्युनिस्ट चळवळीचे भवितव्य (२ व्याख्याने) | श्री.कुमार केतकर (संपा., महाराष्ट्र टाईम्स, मुंबई) |
| ३१ | बहुजनवादी राजकारण | प्रा.हर्ष जगझाप, पुणे |
| ३२ | स्वातंत्र्योत्तर भारतातील प्रशासन व भारतीय नेतृत्व | श्री.माधव गोडबोले, (माजी केंद्रिय गृहसचिव, पुणे) |
| ३३ | गांधीजींचे खुनी महाराष्ट्रातीलच का? | श्री.जगन फडणीस, कोल्हापूर |
| ३४ | जागतिकीकरण व त्याचे परिणाम | डॉ.एस.पी.शुक्ल, (माजी केंद्रीय अर्थसचिव, नवी दिल्ली) |
| ३५ | प्रसार माध्यमे व स्त्रीप्रतिमा | श्री.समर नखाते, पुणे |
| ३६ | नेताजी सुभाषचंद्र बोस | प्रा.य.दि.फडके, मुंबई |
| ३७ | संत तुकाराम दर्शन | प्रा.सदानंद मोरे व श्री.दिलीप चित्रे, पुणे |
| ३८ | आधुनिक महाराष्ट्रातील धर्मचिंतन | प्रा.यशवंत सुमंत, प्रा.सदानंद मोरे, प्रा.आ.ह.साळुंखे |
| ३९ | इस्लाम आणि सामाजिक परिवर्तन | श्री.असगर अली इंजिनिअर, मुंबई |
| ४० | मानव आणि धर्मचिंतन | प्रा.रावसाहेब कसबे, संगमनेर |
| ४१ | मिळून साऱ्याजणीचा दिवाळी '९७ च्या अंकाचा प्रकाशन समारंभ | श्रीमती विद्या बाळ<br>श्रीमती मीरा बोरवणकर, जिल्हा पोलीस प्रमुख<br>श्रीमती कमल वडगावकर, जिल्हा न्यायमुर्ती<br>श्रीमती स्वाती साठे, जिल्हा कारागृह प्रमुख<br>श्रीमती वर्षा दिघे, जिल्हा माहिती अधिकारी<br>अध्यक्ष : प्रा.आ.ह.साळुंखे |
| ४१ | जागतिकीकरणाची आव्हाने आणि आपण | डॉ.सुलभा ब्रम्हे, पुणे |
| ४२ | स्त्रीमुक्ती - माझी कल्पना | डॉ.अनिल अवचट, पुणे |
| ४३ | कळ कादंबरी - मराठी कादंबरीचा पुढचा टप्पा (श्री.शाम मनोहर यांच्या कादंबरीचा प्रकाशन समारंभ, हस्ते श्री.वसंत पळशीकर, वाई) | डॉ.चंद्रशेखर जहागिरदार, कोल्हापूर |
| ४४ | आमच्या धडावर आमचे डोके (प्रा.आ.ह.साळुंखे यांच्या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ, हस्ते श्री.वसंत पळशीकर, वाई) | |
| ४५ | लोकसभा ९६ निवडणूक निकाल विश्लेषण | श्री.किशोर बेडकिहाळ, सातारा<br>श्री.अरूण गोडबोले, सातारा<br>श्री.पुरूषोत्तम शेठ, सातारा<br>श्री.देवीदास शेट्टी, सातारा |

(परिशिष्ट– ९)

# हस्ताक्षर

नवी दिल्ली
२६.४-१९८०

प्रिय :- दत्ता, उषा, प्रकाश

सप्रेम नमस्कार

श्रीमती इंदिरा गांधींचे कॉंग्रेस सरकार पंतप्रधान
हुकुमशाहीबद्दल निषेधाचा ठराव व
सभा घेतलेली आहेत असे कळते
[illegible] आहे. [illegible] तरुणांनी
निषेधाचे ठराव व सभा घ्या
जातीयवादी व प्रतिगाम्यांचा
नायनाट करा!

-इंदिरा गांधींच्या राजकारणाची [illegible]
घेतलीच पाहिजे!

-शेतमजूर, कष्टकरी [illegible] यांनी
प्रतिगाम्यांचा पराभव करण्यासाठी
संघटित व्हा!

-दुनियेतील कष्टकरी जिंदाबाद! [illegible] तुमचा,

नागनाथ नायकवडी.

(परिशिष्ट– १०)

# "टिळक हायस्कूल, कऱ्हाड"च्या स्थापनेचा मूळ ठराव

सोमवार ता २-८-१९२० रोजी सायंकाळी ४-३० वाजता लोक मान्य बाळ गंगाधर टिळक यांचे निधना बद्दल दुःख प्रदर्श नार्थ जाहीरसभा कराड येथें तोरीह जनरव कायप्रवर्ति रा. सदाशिव खंडो अकतेकर यांचे अध्यक्षते खालीं ~~[illegible]~~ भरली त्यावेळीं नं. ३ चा ठराव रा. गणपतराव बराणे यानी मांडला :-

नं. ३ "लो० टिळक यांचें अल्पसे स्मारक म्हणून कराड येथें पूर्ण हायस्कूल करावे व त्याचे व्यवस्थे करता खालील गृहस्थांची कमेटी नेमण्यांत आली आहे

१ रा. पांडुरंग केशव शिरवळकर

२ रा. लक्ष्मण महादेव देशपांडे.

३ रा. किसनलाल प्रेमराज मारवाडी.

४ रा. कृष्णाजी गोविंद वऱ्हेकर.

५ रा. सदाशिव खंडो अकतेकर

६ रा. सीताराम गोपाळ परीत

७ रा. सदाशिव गोविंद टकले रेठरे बु.

८ रा. लक्ष्मण महादेव घाडगे. कार्वे.

प्रश्नावली

परिशिष्ट – मुलाखत : मा.किशोर बेडकिहाळ, मुलाखत दि.५.११.२०१५, दुपारी ३.३०

१. सर्वसामान्य नागरिकांना राजकीय व सामाजिक प्रबोधन करणाऱ्या 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी' ची स्थापना केंव्हा झाली व स्थापनेचा उद्देश कोणता ?

२. आपण या अकादमीकडे कसे वळलात ?

३. संघटनेचे संस्थापक सदस्य व अध्यक्ष यांचेसंदर्भांत माहिती सांगा.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमीचे ध्येय, कार्यक्षेत्र, स्वरूप व व्यापकता याबद्दल काय माहिती सांगू शकाल ?

५.अकादमीची चर्चासत्रे, कार्यशाळा, शिबिरे या संदर्भांत विस्तृतपणे काय वृत्तांत सांगू शकाल ?

६. व्याख्यानाचे सर्वेक्षणें व सामाजिक ज्वलंत समस्या या संदर्भांत अकादमीने केलेले काम विस्तृतपणे सांगा.

७. साहित्य, चर्चासत्रे त्यांचे स्वरूप, मिळणारा प्रतिसाद, त्याचप्रमाणे उपक्रमाची फलद्रूपता याबाबत काय सांगाल ?

८. विचारवेध संमेलनाचा उद्देश, व्यापकता व सामाजिक गरज याबाबत थोडक्यात माहिती दया.

९. फुले, शाहू, आंबेडकर विचार परखडपणे मांडताना त्यास समाजाकडून मिळणारा प्रतिसाद, त्याला होणारा वरोध याचे कसे मूल्यमापन कसे कराल ?

१०. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमीदवारा केल्या जाणाऱ्या प्रकाशनाविषयी थोडक्यात काय माहिती सांगू शकाल ?

११. फुले, आंबेडकरी विचार जनमानसात पूर्णपणे रूजविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती सांगा.

१२. अकादमीच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचे कितपत यश मिळाले असे तुम्हाला वाटते ?

१३. सर आपण आपल्या सामाजिक कार्याबद्दल काय सांगाल. आपण केलेले लेखन, संपादन व सहसंपादन याबाबत काय सांगू शकाल ?

सातारा जिल्हा नकाशा(संदर्भ– सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९)



रयत शिक्षण संस्थेचे शेतीविषयक कार्य(संदर्भ– संपा.शेतकरी नोव्हे., १९८७)



## शिक्षण संस्थेचे वर्षवार अंदाजपत्रक (संदर्भ– रयत अमृत महोत्सव )



रयत शिक्षण संस्थेच्या व्हालंटरी शाळांची वाढ दर्शविणारा आलेख (संदर्भ– रयत अमृत महोत्सव)



# संयुक्त महाराष्ट्र चळवळ प्रभातफेरी




एकभाषी महाराष्ट्राच्या मागणीचा संदेश जनमानसापर्यंत पोचविण्यासाठी काढलेल्या प्रभात फेरीत सेनापती बापटांबरोबर गाडगेमहाराजांसारखे संतही सामील झाले

## महाबळेश्वर येथील काँग्रेस शिबीर




## संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेताना मा.यशवंतरावजी चव्हाण




१ मे, १९६० रोजी सकाळी ९ वाजता मंत्रालयातील पटांगणात राज्यपाल श्री. श्रीप्रकाशजी, यशवंतराव चव्हाण यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ देताना...

# अपूर्व योगायोग



कर्मवीर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वागत करताना
थोर संत सद्गुरू गाडगे महाराज

## महोत्सवप्रसंगी भाषण करताना मा.यशवंतराव चव्हाण व यशवंतराव मोहिते.




## कार्यमग्न यशवंतराव, वसंतदादा, किसन वीर व बाळासाहेब देसाई



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी क्षणचित्रे




डॉ. य. दि. फडके अकादमीचे
उद्‌घाटन करत असताना, डाव्या बाजूला
साथी विनायकराव कुलकर्णी




'प्रसारमाध्यमे व समाज परिवर्तन'
चर्चासत्रात बोलताना श्री. कुमार केतकर,
सोबत प्रा. राम बापट,
श्री. दिनकर झिंब्रे




मराठी कादंबरीवरील चर्चासत्रात
बोलताना डॉ. हरिश्चंद्र थोरात,
सोबत प्रा. वासुदेव सावंत,
प्रमोद कोपर्डे




१९८० नंतरची मराठी कविता
यावरील चर्चासत्राचे उद्‌घाटन
करताना कविवर्य नारायण सुर्वे,
शेजारी प्रा. डॉ. चंद्रशेखर जहागिरदार,
प्रा. डॉ. आ. ह. साळुंखे व
श्री. प्रमोद कोपर्डे

# कृष्णा खोरे परिषद



कृष्णा खोरे पाणी परिषद **क्रांतिवीर नागनाथअण्णा** सह **ना. आर. आर. पाटील, मा. गणपतराव देशमुख, मा. साथी निळू फुले व मा. लक्ष्मणराव ढोबळे** (२१ मे १९९७)




शेतमजूर कष्टकरी, शेतकरी संघटनेच्या विद्यमाने सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांची जाहीर परिषद **कॉ. बाबा आढाव, मा. वाय. सी. पाटील, डॉ. भारत पाटणकर, कॉ. जीवनराव सावंत, क्रांतिवीर नागनाथअण्णा, मा. ज्ञानदेव जाधव** (महाराज) **कॉ. नाना शेटे** व **कॉ. धैर्यशील पाटील** (ऑगस्ट १९९७)




**क्रांतिवीर नागनाथअण्णा** ऊस उत्पादक शेतकरी व साखर कामगारांच्या भव्य परिषदेत मार्गदर्शन करताना व्यासपीठावर **मा. वैभवकाका नायकवडी, मा. वसंतराव चव्हाण, कॉ. मधुकर कात्रे, कॉ. माणिकराव जाधव, मा. भारत पाटणकर, मा. गणपतराव देशमुख, मा. आर. बी. शिंदे** आदि मान्यवर

क्रांतिवीर

# क्रांतिवीर नागनाथ अण्णा यांच्या नेतृत्वाखालील चळवळीं.



वाळवा येथील
सावित्रीबाई फुले वसतिगृहाचे
उद्‌घाटन करताना
**खा. फूलनदेवी** (उत्तर प्रदेश)
(२७ मे १९९९)




**ांतिवीर नागनाथअण्णा**
यांच्या नेतृत्वाखाली
**कॉ. नाना शेटे,**
**प्रा. बाबूराव गुरव,**
**आ. प्रा. शरद पाटील,**
**कॉ. भारत पाटणकर,**
**मा. देशमुख सर,**
**कॉ. जालिंदर जमदाडे**
यांच्या समवेत शेतमजूर
करी शेतकरी संघटनेचा
कलेक्टर कचेरीवर मोर्चा
(२६ जून २०००)



**क्रांतिवीर नागनाथअण्णा**
सांगली जिल्हाधिकारी
कचेरी समोर
धरणग्रस्तांच्या मेळाव्यापुढे
मार्गदर्शन करताना.
(सन २०००)

**पुरस्कार :** जीवनगौरव

# संघर्षाला विवेकाची जोड हवी

■ पानसरे यांचे प्रतिपादन ■ के. डी. खुर्द व टी. आर. शिंदे यांचा 'जीवनगौरव' पुरस्काराने शानदार समारंभात सत्कार

**तीन विद्यापीठे ....**

सत्काराला उत्तर देतांना के.डी.खुर्द यांनी डॉ. एन.डी. पाटील, नरेंद्र दाभोलकर, व गोविंदराव पानसरे ही तीन विद्यापीठे आहेत. या विद्यापीठांच्या सहवासात आयुष्याची रेल्वे धावली. अंधश्रध्देविरुध्द संघर्ष हेच आमचे शेवटचे स्टेशन, यावरुनच आमचा प्रवास संपेल.





**विशेष कार्यकर्ता पुरस्कार**

भटक्या विमुक्त समाजाच्या उत्थानासाठी अविरत काम करणाऱ्या कार्यर्त्याला समितीतर्फे दर दोन वर्षांनी विशेष कार्यकर्ता पुरस्कार देण्यात येणार आहे. प्रथम पुरस्कार विदर्भात कार्यरत असणारे नागपूर जिल्ह्यातील पन्नालाल राजपूत यांना चंद्रपूर येथे माजी केंद्रीय मंत्री शांताराम पोटदुखे यांच्या हस्ते देण्यात आला.

**सुधारककार आगरकर प्रबोधन पुरस्कार**

या वर्षी मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे नेते मा.सैय्यदभाई यांना डॉ. श्रीराम लागूंच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले. स्वा.सै.अनंत साठ्ये यांच्या देणगीतून पुरस्कार दिला जातो.

## जादूटोणा विरोधी कायदा :

**कायद्यासाठी ना. शरद पवारांना आवाहन**



जादूटोणा विरोधी कायद्याची मागणी सोळा वर्षांनंतर देखील पूर्ण झालेली नाही. ७ जुलै १९९५ रोजी विधान परिषदेत मंजूर झालेले कायद्याचे अशासकीय विधेयकाचा पाठपुरावा १६ वर्षात सभा, व्याख्याने, मेळावे, निवेदन, धरणे, उपोषणे, मोर्चा, आत्मक्लेष उदा. स्वतःच्या थोबाडीत मारुन व स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून आधी सर्व लोकशाही मार्गांनी केला गेला आहे.

**आदर्श गाव हिवरे बाजारला राज्य बैठक.**



संघटनेच्या सुरुवातीपासून दर ४ महिन्यातून होणारी राज्य कार्यकारणीची एक बैठक आदर्श गांव हिवरे बाजार येथे आयोजित करण्यात आली होती. मा. पोपटराव पवार व गांवकऱ्यांनी आतिथ्यपूर्वक राज्यभरातील कार्यकर्त्यांची व्यवस्था केली आणि ग्रामीण विकासाचा आदर्श वस्तूपाठ दाखवून दिला. लोकशाही पध्दतीने व 'संवादातून परिवर्तनाकडे' असा दृष्टीकोन ठेवून चालविले जाणारे संघटन हे अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे शक्तीस्थान आहे.

# रयत शिक्षण संस्था राष्ट्रीय पुरस्कार




राजर्षी शाहू छत्रपती मेमोरिअल ट्रस्ट, कोल्हापूरचा "राजर्षी शाहू पुरस्कार" संस्थेच्या वतीने स्वीकारताना संस्थेचे चेअरमन प्रा. एन. डी. पाटील



भारताचे राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा यांच्या शुभहस्ते
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार
स्वीकारताना संस्थेचे सचिव प्राचार्य शिवाजीराव भोर (१९९४)

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार

